CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

G-1
69/25

G-1
69/25

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

Provincial Museum
LUCKNOW.

पेशवे दप्तरातून निवडलेले कागद

954.03

२५

G-1
69/25

पेशवा बाळाजी बाजीराव व निजाम.

१७४०—१७६१

[किंमत—४ रुपये १२ आणे किंवा ८ शिलिंग]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी. ए.

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३२

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

STATE MUSEUM, LUCKNOW
LIBRARY

Acc. No.

Book No.

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

BALAJI BAJIRAO PESHWA AND THE NIZAM

(*1740-1761*)

This selection brings together a number of important papers dealing with the memorable period of Peshwa Balaji Bajirao's regime, and elucidates some of the more striking episodes in the perpetual contest for power between him and the Nizam. During the closing years of his career, the Nizam-ul-mulk tried to consolidate his hold on the Karnatak, in which he was strenuously opposed by Raja Shahu. Hence we see both the Peshwa and Babuji Naik Joshi opposing the Nizam in that quarter. But death put an end to the careers of both these striking personalities within a short interval, that of the Nizam occurring on 21st May 1748 and of Shahu on 14th December 1749. A situation of unparalleled confusion ensued. The Nizam's death gave the signal for the outbreak of prolonged disputes over the succession, the main facts of which are already well known to students of history. The papers printed in this selection, over 300 in number, bring into prominence the part played by the Peshwa in the struggle and his endeavours to turn each occasion to his advantage. Many important sardars such as Maharao Nimbalkar, Murarrao Ghorpade, Ramchandra Jadhav, Raghuji Bhonsle, Ibrahim Khan and Muzaffar Khan Gardi and others are found to take their respective shares now in concert with the Peshwa, and again in opposition to him, in the contest which convulsed the whole of South India. Vishvasrao, the Peshwa's eldest son, is also seen winning his spurs in the field of diplomacy and war. Many new names figure among the writers of these papers ; for instance, Wasudeo Dikshit, Raghunath Ganesh, Jivanrao Ganesh, Banaji Mahadeo, Shamrao Yadao, Tubaji Anant, Trimbak Girmaji, Chandrabhan Mudhoji, Shamji Govind : others again are mere spies or clerks submitting routine reports. Others are diplomats employed by the Peshwa in his foreign office. Both Nasarjang and Muzaffarjang met with an early death at the beginning of the contest.

While the French under Dupleix and Bussy were consolidating their influence at Hyderabad and placing their nominee Salabatjang on the masnad, the Peshwa managed to bring Ghazi-ud-din, the eldest and the most influential of the late Nizam's sons, from Delhi to the Deccan. Unfortunately he soon succumbed to a dose of poison treacherously administered to him by his step-mother at Aurangabad. This gave an unexpected turn to the situation and the Peshwa, patching up a treaty with Salabatjang at Bhalki in November 1752, made a temporary diversion into the Karnatak where he secured a series of victories in 1755-56. Bussy in the meanwhile strengthened his position at Hyderabad to such an extent that the Peshwa, apprehending danger, contrived to have him removed from Salabatjang's Court, with the intention of ultimately taking him into his own employ. But Bussy put up such a spirited resistance that Salabatjang was forced to yield. The engagement is

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
known in history as the battle of the Char-Minars (August 1756), in which the Peshwa took a prominent part as an ally of Salabatjang and deputed for that purpose several of his younger commanders, such as Balwantrao Mehendale and others. It was in this campaign that the Marathas observed for the first time the effect of the French artillery, which afterwards became an obsession with Sadashivrao and other commanders. The Char-Minar is still a feature of the town of Hyderabad and the battle is graphically described in a long letter included in these papers. Then followed the campaign of Sindkhed in which Dattaji Sindia and Vishvasrao humbled Nizam Ali and his protege Ramchandra Jadhav. Many fresh papers referring to the battle of Udgir have been discovered, and deserve to be read in conjunction with those which have been already published in Selection No. 1. Altogether the papers collected in this selection will throw much new light on the relations between the Peshwa and the State of Hyderabad.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



Facsimile of the handwriting of Ramchandra Jadhavrao.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

फत्तेसिंग भोसले यांचे हस्ताक्षर

Facsimile of the handwriting of Fatesing Bhonsle. (*Died on 20-11-1760*)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1] [*Nov. 1740 ?*

श्री.

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे
सेवेश

अपत्ये महिपत आनंदराऊ कृतानेक सा नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम ता छ रमजानपरियंत जाणोऊन स्वकीये कुशललेखण केले पाहिजे. यानंतर जासुदाबराबरी पत्र पाठविले पाऊन वर्तमान कलो आले. वर्तमान अवघे लिहिणे म्हनोन आज्ञा व थैलिया नवाब नासरजंग यास व अनवरुलाखानास पाठविल्या. यैसियास पूर्वी येथील वर्तमान विस्तारे अजुरदार कासिद करून सेवेश (पुढील अर्धा बंद गहाळ.)

¶*Letters are despatched to Nasarjang and Anavarullakhan and the fact communicated to Chimaji Appa by Mahipat Anandrao Sumant. The latter half of the letter is lost.*

No. 2] [*1740 ?*

श्री

राजश्री आपा गोसावी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीा पदाजी यादव दंडवत विनंती. येथील कुषल जाणून स्वकीये लेखनआज्ञा करीत गेले पाहिजे विशष. पत्र पाठविले * * * * * * * * * हिले जे राजश्री पिलाजी जाधवराव व राजश्री तुबाजी अनंत फौजेसहित मुलुकगिरीस रवाना केले ; यैसियास तुम्ही आपल्या जमावानिसी लस्करास जाणे. आज्ञेप्रा आजी बुधवारी दशमीस मुहूर्ते निघालो ; याउपरी त्वरेनेच लस्करास पोहचू. विदित जाहले पाहिजे. बहुत काय लिहिणे ? कृपा असो दिली पाहिजे. हे विनंती.

¶*Padaji Yadao informs Chimaji Appa that he has started to join Pilaji Jadhav and Tubaji Anant with his force according to instructions.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 3] [*April 1741* ?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे

शेवेसी

विनंती. शेवक बाबूराये मल्हार सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ मोहरम मुा अवरंगाबाद स्वामीचे कृपेकरून शेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो. खानबालाशन तुरुक-ताजखान यांजसमागमे हिवरियांस गेलो. तेथून त्यांचा निरोप घेऊन आलो ते समयी स्वामीकडे पत्रे पाठविली आणि शहरास आलो. नवाबाची भेटी घेतली. सविस्तर वर्तमान सांगितले. त्यावरून बहुत संतोसी जाले. आपली पत्रे येऊन पावलियाउपरी आठ चौ रोजा दर्शनास येतों. वरकड नवल विशेष वर्तमान तरी नवाब निजामनमुळूक खमामपेठेपावेतो गेले होते. तिकडून फिरोन मजल दरमजल माघारे भागानगरास छ १९ जिल्हेजी येऊन दाखल जाले. धारुरावरी छावणीस यावे यैसा विचार आहे. डेरे धारूरचे रोखे जाले आहेत. याचा काये मतलब काये आहे कलत नाही, यास्तव सेवेसी लिहिणे लागले. विदित जालें पाहिजे हे विनंती.

¶*Baburao Malhar Barve reports from Aurangabad of his visit to the Nizam-ul-mulkh and of his move in the direction of Dharur.*

No. 4] [*Recd. 10-3-1743*

छ २४ मोहरम सुक्रवार.

॥ श्री ॥

पंतप्रधान

श्रीमंत राजश्री

स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित बगाजी यादव सो नमस्कार. विज्ञापना यैसी कीं, स्वामीकडील पत्र राजश्री सुभेदाराचे नावे छ २२ मंगलवारचे राउताबौ पाठविले ते छ २३ बुधवारी प्रातःकाळी प्रविष्ट जाले. ते पत्र बजिनस माहाराव व खान यासी वाचून दाखविले. त्यानी म्हटलें की, याचा तरजुमा करणे, नवाबास गुजरानूं. त्यासी आम्ही त्याचा तरजुमा तयार केला. खान आम्हास दरबारास घेऊन गेले. दरबार जालियावर खलबतींत खानास व आम्हास बोलाविले. गोंविंदराव वकील

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
माहारावजीकडील त्यासहि बोलाविले. नवाबानी तरजुमा वाचून म्हणू लागले की, या मजकुराची पत्रे आगोधर पाठविली आहेत त्याचे उतर अद्यापि आले नाहीं. आमचे जन्मांस ऐंशी काही उणी शंभर वरषे होयासी आली. हाची प्रसंग पाहत गेलो. अद्यापि करारात कोठे अंतर पडले नाही. ज्यासी जे वचन केले ते निभावलें. दगा कोणासी केला थैसे नाही. यामुळेंच ईस्वराने आजीपावेतो आबरू राखिली आहे. सांप्रत चिरंजीव भेटीस आले म्हणून गंगातीरास येणे जाले. तेथे मुकाम जाला तेव्हा जिरात पायेमाल होऊ लागली म्हणून डोंगरकडासीने सिवगाव परगण्यात आलों. उगाच वसवास लोकास जाला असला तर होऊ. आमचे चितांत विघाडाची गोष्ट किमपि नाही. आम्हास साताऱ्याकडे अथवा पुण्याकडे जाणे आहे थैसे नाहीं. प्रस्तुत जो श्नेह आहे तो आहेच. तुम्हांस मालवियाकडे गेले पाहिजे, अम्हासहि आपले कार्यभागास जावे लागते. थैसे असतां गुंता कोणे गोष्टीचा आहे थैसे नाही. पूर्वी पत्रे गेलीच आहेत. सांप्रतहि माहाराव व खान व सुभेदार यानी पंतप्रधानास पत्रे याअन्वये पाठवावी. मजला आज्ञा केली की, तुम्हीहि हा मजकूर लिहिणे म्हणून आज्ञा करून आम्हास खलबतीतून निरोप दिल्हा. त्यासी या मजकुराची पत्रे माहाराव व खान यानी व रा॥ सुभेदार यानी पत्र सेवेसी लिहिली आहेत हे वाचून याची उतरे सत्वर पाठवावी. पूर्वी खानानी व माहाराव यानी पत्रे लिहिली आहेत त्याची उतरे रवाना जालीच असतील. नसतील तर त्वरेने कीजे. बुधवारी संध्याकाळीं पत्र रवाना केले असे. कृपालोभ असावा हे विज्ञापना.

बेलभंडाराविशईं खान व माहाराव म्हणत होते. याविशईं कसा निकाल काढावा काये ते लिहिले पाहिजे. करारमदार जाल्यावाचून उभे पक्षी समाधान होईल थैसे नाही. याविशईचा पर्याय काये तो रौ॥ सुभेदारास लिहिणे हे विनंती.

¶*Bagaji Yadav, writing to the Peshwa, gives a report of an interview with the Nizam in which the latter expressed most friendly sentiments towards the addressee.*

No. 5] [*Dec. 1744*

श्री

उपरी. तुम्ही पत्र पाठविले तें प्रविष्ट जाहाले. अजम अबदुल अजीजखान याचे पत्र तुम्हास आले ते पाहावयास पाठविले व मागाहून खान अजमांचे बजिनस पत्र आम्हास आले त्यावरून सर्व वर्तमान विदित जाहाले. या प्रांतीच्या बंदोबस्तास अजम सैदलस्करखान बमये फौज येत आहेत. त्या (फाटले) तीन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मर्तबे आपण लेहून पाठविले कीं, या प्रांतीचे कामकाज फेसल जाहाले. याउपरी तुम्ही न येणें. यैसे लेहून पाठऊन त्याचे येणे मोकूफ करविले. आपणास दोस्तीपेक्षा दुसरे जरूर आहे यैसे नाहीं. सहल मुकदमा दुरदराज[1] न पोहचे तें करावे म्हणौन खान [2]मोमिले याही लिहिले. यैशास सैदलस्करखान या प्रांती येऊन बंदोबस्त करावयाचा असेल तो करितीलच व अजम अबदुल अजीजखान हेहि करणे ते करीतच आहेत. व त्यांस आणावयाचा मजकूर तरी कु(ल) अर्ज लिहिणें ते लेहून यांहीच आणविले व फिरोन राहविले. ये गोष्टीचे अपूर्व काय असे? वरकड सहल मुकदमा दुरदराज न पोहचे ते करावें म्हणोन हरवख्त लेहून पाठवितात, तरी आम्ही कोणाचे जागिरीचे गाव जप्त केले आहेत किंवा गैरवाजवी कांहीं अमलात आणिले आहे यैसे नाही. त्याजकडूनच स्वराज्याचे गांवी कितेक आपणाकडील वसूल घेतात व फौजदारी मनमाने तैसी घेऊन वेठबेगार नानाप्रकारें रयेतेस लावितात. तथापि इकडून गमखोरी कोणे प्रकारी जाहाली आहे हे तुम्हास ठावकेंच आहे. यैसें असता तेच सहल मुकदमा दुरदराजे न पोहचवावा व सैदलस्करखान येतात व त्यास आपण बदलखातीरदारी मना केले म्हणौन लेहून पाठवितात. यापेक्षा विशेष व अपूर्व काय आहे? वाजबी गोष्टीस आम्हापासून अंतर पडेल यैसे नाही हें जाणून तुम्हास जातेसमई आज्ञा केली आहे त्याप्रा खान माारनिलेस सांगोन उभयपक्षीच्या श्नेहास अंतराये न होये ते गोष्टी करणें. त्याचे पत्र येथे आले होते त्याचें उतर पाठविले असे.

¶*This letter, the writer and the addressee of which cannot be ascertained, refers to the activities of Said Lashkarkhan and Abdul Azizkhan.*

No. 6] [*11-12-1744*

श्री

पुा राजश्री मल्हारजी होलकर व

राणोजी सिंदे गो यासी

सुा खमस आर्बैन मया व अलफ. कोकण प्रांतीचा बंदोबस्त, अवकाशानरूप ते काम करावे. का की आपला संसार केवढा यांचे बगमीची तरतूद आधी केली पाहिजे. बुंधेलियासी बहुत दिवस कटकट करिता काही अमल द्यावा ऐसा केला. आम्ही तो पोटाच्या उद्योगास इकडे आणि तेथील अमल न बसता तरी केले कर्म व्यर्थ गेले. स्वामीनी तेथे बैसोन आपला पैका बाकीचा घ्यावा, अमलाचे निटवावे

---

१ दुरीदराज = परागन्दा होणें; पांगणी. २ मोमीइलै = मशार्निल्हे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ऐसे असता दसऱ्यास कूच न जाहाले. दिवालीस कूच जाहाले न जाले न कले म्हणोन लिहिले (ते) कळले. ऐशास तुम्ही लिहिला अर्थ यथार्थ आहे. आमच्याहि चितात तिकडे जलदीने यावे ऐसेच होते. परंतु कांही पेच दरबारचा होता तो उलगडून कोकणचा गाडा चालता करीतच आहो, तो हडसर[1] व चावंड[1] हे दोन्ही किले हस्तगत जाहाले. या गोष्टीचे नवाब निजामनमुलुक यांनी विशम फारसे मानोन कलहास्पद करावयाच्या साधनसंपतीस लागले. येवढा पेच टाकून कानाडोला करून येता तो न ये. तेव्हा नवाबाचे चिताची स्वछयता हरप्रकारे करून निघोन यावे. अन्यथा जुनर पुणे प्रांते ते कटकट करितील यास्तव रा बगाजी यादव नवाबाजवल होते त्यास लेहून समाधानाच्या गोष्टी सांगणे त्या सागितल्या. तथापि घेतले किले माघारे दिल्याखेरीज त्याचे समाधान नव्हेसे जाहाले. तेव्हा त्याजकडून सैदलस्करखान आले त्याची आमची भेट घोडनदी-च्याकडेस मलठणापुढे जाहाली. ते नवाबाचे मर्जीनरूप बोलतात व घेतले किले माघारे न द्यावे या विचारे आम्ही बोलतो. परंतु काही पर्याये काढल्याविना नवाबाचे समाधान होत नाही ऐसे दृष्टीस पडले. याचा पर्याय चितात आणिला तो अलाहिदा पुरवणीत लिहिला असे. सारांश नवाबाच्या पेचास्तव गुंता पडला तो उलगडून मजल दरमजल तिकडे येता बुंधेल्याकडील काम सुधारणे ते सुधारून व वरकडहि तुमच्या विचारानरूप कर्तव्य ते केली जातील. घर[+]चा उतम प्रकारे बंदोबस्त करावयासाठी राहावे न राहावे याचा विचार लिहिणे म्हणून तुम्हास लिहिले. तुमचे उतर आले की इकडे बुंधेलखड, बोडसे वगैरे कामापेक्षा ते काही अधिक नाही. यास्तव आलस न करता यावे यैसे उतर येताच कूच करावे ऐसा विचार केला तो नवाबाचा पेच प्राप्त जाहाला. त्याजमुळे इतके दिवस राहाणे पडले. नाही तर या दिवसात नर्मदेपासी प्रविष्ट जाहालो असतो. जाणिजे छ १७ जिलकाद. बहुत काय लिहिणे.

लेखन
सीमा.

¶*The Peshwa explains to Malharji Holkar the reasons for his delay in proceeding to the North in answer to the latter's entreaties. There were, he says, certain differences with the Nizam which required adjusting before he could start.*

---

१ जुन्नरजवळील डोंगरी किले.

+ यापुढील मजकूर खुद्द नानासाहेबाच्या हातचा आहे.

No. 7] CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh [24-1-1745?

छ १९ मोहरम नकल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री

भाऊस्वामीचे सेवेसी

विनंती उपर. स्वामीनी छ ८ मोहरमचीं पत्रें पाठविलीं छ ११ मिनहूस माहादेवचे मुकामी साइंकालीं पावलीं. लिहिलें वर्तमान सविस्तर कलों आलें. किले बितिगा[1] याचें वर्तमानाचीं पत्रें छ ३ व छ ४ मोहरमचीं राजश्री शामजी गोविंद याचीं स्वामीस आलीं, त्या पत्राचा अर्थ स्वामीनी येथें लिहिला कीं किले मजकुरानें नवाबास फार खट्टे केले. नवाब इरेस पडले. मासपक्ष दारणातीरीं राणार, म्हणऊन स्वामीनी लिहिलें तें कलों आलें. यैशास पहिल्या तलावरून नवाबाचें कूच जालियाचें वृत्त स्वामीनी पूर्वी लिहिल्यावरून राजश्री स्वामीस निवेदन केलें होतें, व हुजरातची बातमी राजश्री स्वामीकडे आली होती कीं नवाब कूच करून येक मजल गेला म्हणऊन यैसें दोनीकडून राजश्रीस वर्तमान श्रुत जाहालें होतें. त्यास मागती मुकाम नवाबाचा दारणातीरीं जालियाचें वृत सांप्रत स्वामीनी लिहिलें तें राजश्री स्वामीस श्रुत करावेसें जाहालें. यास्तव आजी छ १२ मोहरमी प्रातःकालीं राजश्री स्वामी वाडियांत जातेसमईं गाठून नवाबाचें कूच जाहालें होतें, परंतु मागती मुकाम जाले म्हणऊन अर्ज केला. त्यावर राजश्री स्वामी बोलिले कीं काये निमित्य मुकाम जाहाले? आम्ही विनंती केली किला भांडतो म्हणऊन मुकाम जाहाला. त्यावर राजश्री बोलिलें कीं किल्याची मदत करणे, हे विज्ञापना.

¶*Bhausaheb is informed that news of the Nizam besieging the fort of Bitinga has been communicated to King Shahu, who ordered reinforcements to be sent to the fort.*

No. 8] [Nov.-Dec. 1745?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ जिलकादपावेतों कृपाकटाक्षावलोकनें लस्कर निजामदौला जाणून

---

१ नाशिक जिल्हा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्वानंदातिशय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. येथील सविस्तर वर्तमान जे अढललें तें सेवेसी राजश्री रघुनाथ गणेश यानीं लिहिलें आहे त्याजवरून अक्षरशा चितारूढ होईल. पूर्वी सेवेसी येथून पत्रें आबदुल हुसेनखानाचे रवानगीनंतर पाठविलीं होती, तेथें विनंती लिहिली होती कीं, माारनिले येथून सेवेसी आले ते येकनिष्ठतेने आले नाहीत. त्यास तेथील पत्र पंत प्रतिनिधीचें नरसिंगराव केशवाचे नावें आलें तें आम्हास येके द्वारें हस्तगत जालें. नरसिंगराव तों तेथें आले आसेत. ते पत्र बजिनस सेवेसी पाठविलें आहे. व राजश्री रामचंद्रबावानी खंडोपंत दिलीवाले आले होते त्यास लिा होतें तेहि पाठविलें आहे. त्याजवर पारसी लाखोटा आबदुल हुसेनखानाची मोहर आहे. सेवेसी श्रुत होये. ज्या ज्या समई जें वर्तमान अढलतें ते सेवेसी उभयतां लिहितों. यैकिलें वर्तमान लिहितों. तथ्यमिथ्य ईश्वर जाणें. चौवे मातवर अंतरंगचे. बाहेरंगच्यासी स्नेह स्वामीचे कृपेस्तव जाला आहे. त्याचे मुखीचें वर्तमान आहे. वर्तमान सत्यच, परंतु केले मनसुबे आवघे कोठे होतात? जे बोलिले तें बाहेर येतें, तें अढलतच आहे; तदनुसार लिहितों. येका दिवसांत सात मनसुबे होतात, फिरतात. या गोष्टीचा शब्द सेवक लोकांकडे नाहीं. सेवेसी श्रुत होये. बहुत काये लिहिणें? कृपा निरंतर असू दिधली पाहिजे, हे विज्ञापना.

¶*A news-letter from the camp of Nizamudaula written by Banaji Madhavrao to the Peshwa, which refers to Abdul Husankhan who, the writer remarks, has not gone to the addressee with the best of motives.*

No. 9] [*25-12-1745*?

छ १९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ १२ जिल्हेज मुा लस्कर प्रांत नलदुर्ग कुंभारी मंगरूल कृपावलोकनें जाणून स्वानंदातिशय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. येथील वर्तमान वरचेवर सेवक व रघुनाथ गणेश उभयतां सेवेसी लिहीत आहों. सांप्रतहि रा दामोदर माहादेव यांचे दर्शन कबूचा डोहावर जालें. तेच दिवसीं खलबतहि जालें. दुसरे दिवसीं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कूच जालें ते या मुकामीवर आलें. सदें जालीं. इतकियांत दामोदरपंताचे स्त्रीचें वर्तमान आलें. याजकरितां मशारनिलेस मातमेचा[२] खलत पाठविला. आज उदियांत रुकसतहि होणार. आबदुल हुसेनखान व रजबीखान हे स्वामीकडे आले आहेत, त्यांची मार्गप्रतीक्षा करीत इतकियांत दोंचौ कोसी कूच मुकाम करीत राहतात. सर्व लक्ष तिकडे आहे. सोलापूर प्रांती बंडगर वगैरे यांची ठाणी आहेत ते किलेदारास चैन पडूं देत नाहीत, याजमुळे खिदमत तलबखान, मकबुल आलमाचे पुत्र, व तुरूकताजखान रिसालदार रवाना केले. फौज उभयतांची दीडेक हजार होईल. तोफ समागमें दिल्ही आहे. नसीबयारखान यांस हैदराबादेस तोफ आणावयास आजीच रवाना केले. हिदायेत मोहिदीखानाकडील वर्तमान या आठा दिवसांत काहीं आलें नाहीं. किरकोली मऱ्हाठे सरदार शेंपनासा राऊतांचे येतात त्याची याद पत्रीं रघुनाथपंती सेवेसी लिा आहे. खानाकडीलहि वर्तमान कांहीं नवें आले नाहीं. राजश्री स्वामीस आरोग्य जालियाचे वर्तमान श्रवण करून नलदुर्गचा रोख धरला. याजमुळे त्या प्रांताकडील मोहरा फिरला. मौजे वावी ठाणें बारसी येथील संरक्षणाविषीं आज्ञापत्र रा बहिरो राम यांचे विद्यमानें सादर जालें. सिरसा वंदिले. पूर्वींच जागीरदार निंबालकरानी सा हजार रुपर्यंत खर्च करून खामखा फौज नेऊन ठाणें सोडवावें, श्रीमंतांचे नांव न सांगता जमीदारावरच तुफान करावें यैसा मंत्र फारच योजिला होता तो स्वामीचे प्रतापें सर्व वारापाणी करून देऊन दोघे स्वार व बाणदार ठाणे मजकुरास रक्षणास पाठविले. जागीरदारहि बहुतच पेशमान[३] जाले. सेवक कनिष्ठ, परंतु स्वामीचा प्रताप मस्तकीं आहे याजकरितां सर्व घडून येतें. स्वामीचे प्रतापाची हिमतहि तसीच आहे. त्यानीं ज्यांस रुषवत[४] देऊं केली त्यांची गांठ घालून भय दाखविले कीं, तुम्ही बहुता दिवसांचे स्नेही आहा. जागिरा तुमच्या आहेता. पुढें परिणाम पाहून जे गोष्ट करणें ते करावी. कांहीं थोडेंबहुत खर्चहि केला तो रा बहिरोपंतास लिा आहे. फार तों नाहीं. चारसें रुपर्यंत जालें. हमी साहुकारी देऊन काम चालविलें. मोगलाईत केवल गोष्टीने होत नाहीं. पेंडीची गुरें. इतक्यानें नकष बहुत जाला. सेवेसी कलावें म्हणून लिा आहे. सारांश या प्रांतचा शह वारला. रोख कलबुरग्याकडें जाला आहे. आबदुल हुसेनखानानी आम्हास म्हटलें होतें कीं, साबाजी गौली यानें नवाबाचे सरकारांत रा दाहा हजार कबूल केले ते मान्य न केले, म्हणून श्रीमंतास रुपये कबूल करून नवाबास पत्र पाठविलें आहे. म्हणून या गोष्टीचा प्रत्यय त्यास तेथें येऊन नाहक गरीब फसलें

---

१ सेहत = तन्दुरुस्ती ; प्रकृतिस्वास्थ्य. २ दुखवट्याचा.

३ पेशमान = पस्तावलेला ; दुखी. ४ लांच.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे, त्याचे मुक्ततेविषईं त्याची आर्जी नवाबास ये तो आर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काये लिहिणे? कृपा निरंतर असू दिधली पाहिजे, हे विज्ञापना.

¶Banaji Madhavrao, writing from the Nizam's camp, informs the Peshwa that the Nizam is marching towards Kalburga. The news of the arrival of Damodar Mahadev (Hingne) at the camp is also communicated to the Peshwa.

No. 10] [*30-12-1745*

छ २३ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीकडून ता छ १७ माहे जिल्हेज पावेतों सेवकाचें वर्तमान मो लस्कर नवाब आसफज्याह समीप कलबुरगे ये जागां यथास्थित असे. आज्ञाधारक लस्करदाखल जालियावर अबदुल खैरखानाची भेट घेऊन बोलीचाली जालियाचा अर्थ सविस्तर विनंतीपत्री लेहून छ १२ मिनहूस नागो राम याचे मारिफतीचे जासुदाबराबर रवानगी केली ती विनंतीपत्रें सेवेसी प्रविष्ट होऊन सविस्तर अर्थ विदित जाला असेल. नवाबाची मुलाजमती-करितां अबदुल खैरखानाजवल बजीद असतां आज उद्यां करावयास लागले. राजश्री तुकोपंती व सेवकानें अगोदर दरगाहकुलीखान हरकारे यांचा दरगो याचे व अर्जबेगी यांची भेट घेतलीच होती. मग दरगाहकुलीखानास रोखा लेहून पाठविला. त्याणें नवाबास अर्ज केलां. नवाबानें आज्ञा केली कीं, अबदुल खैरखानाचे मारिफतीने येऊन मलाजमत करणें. छ १३ मिनहूस प्रातःकाली खानांकडे जावयास निघालों. तों स्वामीचीं आज्ञापत्रें सेवकास व नवाब आसफ-ज्याहा व खानांस थैलिया घेऊन बाबाजी नाईक आले. ते वर्तमान मनास आणून थेलिया घेऊन खानाकडे गेलो. थेलिया रुजू केल्या. खान याजबराबर नवाबाच्या देवढीस गेलो. खान नवाबाजवल गेले. सेवकाचा मजकूर केला न केला हे न कले. उभयता सेवक अर्जबेगीचे डेरेयास देवडीसमीप बैसलों होतों तों खान बाहेर निघाले. सेवकानें हटकिलें की आमचें स्मरण न जालें. यावर बोलिले की तुम्हास बोलावितील तेव्हा भेटावयास जाणें म्हणौन उदास उतर केले आण डेरेयास गेले. मनास आणितां नवाबानी आमचा तालुका[1] खानाकडील दूर केला

---

१ सम्बन्ध.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
आण मिरमहमद हुसैनखान पातशाही व खानगी दिवाण यांस आज्ञा मलाजमती-विषई करविली. मारनिलेचा चोपदार आलियावर उभयताही त्यांचे भेटीस गेलों. तो बोलिला कीं तुमचे मुलाजमतीविषई आम्हास आज्ञा जाली आहे. तुम्ही प्रातःकाली हाजीर राहाणें. याउपर छ १४ मिनहूस सुक्रवारी प्रातःकाळी उभयताहि दिवाणाकडे गेलों तों नवाब कलबुरगेयास जावयास निघाले. दिवाणानें डेरेयात जाऊन अर्ज पोंहचावितांच मलाजमतीस बोलाविले. तैसेच भेटीस गेलो. नवाब पालखींत होते. देवडीचे आंतच मलाजमत जाली. तुकोपंतास प्रतिनिधीचें क्षेम वृत पुसिले. यावर सेवकास स्वामीचें नाव घेऊन कुशल आहेत म्हणौन पुसिलें. सेवकानें जाब दिला कीं हजरतीचे करंबकेशी करून खुशहाल आहेत. याजवर बोलिले कीं, आतां आम्ही स्वारीस जातो. तुम्हास खलबतांत बोलाऊन मुफसल हकीकत खातिरेस आणिली जाईल. इतकें बोलोन कलबुरगेयांस गेले. जातांच कोटांत दाखल जाले. तेथे कोणाचे गमन नाहीं. सेवकहि कलबुरगेयांस गेलों होतो परंतु गांठ पडली नाही. छ १६ मिनहूस लस्करचा कूच जाला. कलबुरगे डावे टाकून भिवरेचे सुमारें पांचा कोसांवर कलबुरगेयांचे वाडीवर मुकाम जाला. नवाब छ मारीच परभारे कलबुरगेयाहून कूच करून लस्करदाखल जाले. किले यादगिरी सुरापूरचे रोखें जाणार. भिवरा या मुकामाहून सा कोश आहे. तेथे काही मुकाम होतील. अनवरुदीखान भेटावयास येत आहेत. जानोजीराव निंबालकर अद्याप आले नाही. सुलतानजीराव निंबालकर लस्करास आलियाचें वर्तमान पूर्वी सेवेसी विनंतीपत्री लिहिलेंच होतें. त्यांची भेट छ १२ मिनहूसच संध्याकालचा दोन तीन घटका दिवस असतां जाली. दोन हजार राऊतानसी आले आहेत. पछाडीस राहिले आहेत. बहिरजी पांढरे लस्करांत आले नाही. औरंगाबाजेस नासरजंगाकडे गेले म्हणौन वर्तमान आहे. नवाब आसफज्याहाचे मुलाजमती अगोदर छ १३ मिनहूस संध्याकालीं अबदूलखैरखानाकडे गेलों होतों. त्यांस विनंती केली कीं, आमचे खावंदाने आम्हास आपणापावेतों पाठविले. कितेक मजकूर आपणास विदित करावे, आपण नवाबास अर्ज पोंहचाऊन जाबसाल करून देतील म्हणौन फर्माविलें असतां नवाबसाहेबीं मिरमहमद हुसैनखान दिवाण यांचे मारिफातीनें मुलाजमतीस येणें म्हणौन फर्माविले हे अज्याईब गोष्ट जाली. आंम्ही कितेक मजकूर आपणांजवल जाहीर केले, त्याजमध्ये नवाबास काय अर्ज जाला? आम्ही काय बोलावे? दिवाणाची आमची जाणपछाण नाहीं. आम्हास खावंदांचे जागां आपण आहेत. आम्हास काय फर्माविता म्हणौन कितेक प्रकारे बोलिलों. यावर

2996

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
बोलिले कीं, नवाबाचा हुकूम तो प्रमाण. तुम्ही दिवाणाचे मारिफतीनें मुलाजमत करणें. आम्हांजवल ज्या ज्या गोष्टी बोलिलेत तितक्या नवाबास अर्ज करणे म्हणौन श्रमी होऊन उदासपणें बोलिले. मग आज्ञा घेऊन आलों. मनास आणितां, नवाबाची मर्जी बहुत नाजूक येसे जाणोनच नवाबाजवल खानानीं कांही विदित केलें नाहीं यैसें दिसोन आलें. खानावर नवाब श्रमी व्हावयाचा अर्थ मनास आणितां, नवाब खानांस सावनूर तर्फेस बाबूजी नाईकाचे शाहाकरितां जावयास सांगत होते, परंतु खानानी अनमान केला हे येक व सेवक लस्करास दाखल होताच नवाबास खबर पोंहचली असतां आठ दिवस मुलाजमतीस घालघसर जाली हें दुसरें. याजकरितां आम्हाकडील तालुका उडविला. असो. नवाब येहीं खलबतात बोलाऊन वृत पुसतों म्हणौन फर्माविलेंच आहे. सेवकहि दिवाणाकडे बजीद होऊन नवाबास अर्ज पोंहचाऊन खलबतांत भेट घेतों. आज्ञे-प्रो सविस्तर वर्तमान नवाबास अर्ज करितों. मग जें फर्मावितील तें वर्तमान सविस्तर मागाहून विनंतीपत्री लेहून सेवेसी पाठवितों. स्वामीनें येक पत्र दिवाणास पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे. पंतप्रतिनिधीकडील ठाणेयांचा मजकूर, तूर्त नवाबाचा रोख नाही, याजकरितां तुकोपंती न केला. सेवकास काहीं बोलावें लागलेंच नाही. बाबजी नाईकाबराबर प्रतिनिधीचे मजकुरांत दोन थेलिया स्वामीनें पाठविल्या त्याजमध्यें खानाची थेलीमात्र प्रविष्ट केली. नवाबाची प्रविष्ट केली नाही. प्रस्तुत नवाबाची तबियत बहुत नाजूक जाली आहे. कोणेकावर विश्वास नाही. नासरजंगाकडील वकील हुजुरीमल नवाबाजवल आहे. अकबरशाह नवाबाजवल होता त्याणें दोन वर्षे प्रतीक्षा केली. सेवट परिणाम लागेना याजकरितां माटीच्या तलावर वीष घेऊन प्राणत्याग केला हे वर्तमान सेवेसी विदित जालेच असेल. सेवकास आढलले ते विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. नवाबाचे स्वारीमुलें प्रांतास उपद्रव बहुत होतो. प्रजेमध्ये काही हाल राहत नाही. सेवेसी श्रुत होय हे विनापना.

¶*Raghunath Ganesh writes to the Peshwa his impressions of his first interview with the Nizam, near Kalburga, when only formal views were exchanged.*

No. 11] [*30-12-1745*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री

पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. बाबूजी नाईकाचे मुकाबलेयास हिदायेतमोहीदीनखान व सुलतानजी निंबालकर यांस रवाना करणार म्हणौन बोली आहे. हिदायत-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मोहिदीखानाचे स्वारांच्या मिसलाहि नवाबानें डेरेयांत आणून पाहिल्या व त्याची फौज तमाम भिवरेचे उतरतिरी आणऊन नजरेनेंहि पाहिली. मारनिले व निंबालकर परस्परें येकयेकाचे डेरेयासहि पाठविले इतका मजकूर जाला आहे. वरकड नवाबाचें अंतस्थ तों कोणास कलत नाहीं. सुरापूरकराकडील हेजीब नवाबाचे भेटीस येणार आहेत. नवाबाबराबरील सरदार लोक आढलल्याप्रों सेवेसी विदित व्हावयाकरितां अलाहिदा यादींत लेहून पाठविले आहेत त्याजवरून सेवेसी विदित होईल. रघोजी भोसले यांजकडील तुळजोपंत मारनिलेचा लेक जानोजी समागमें घेऊन पांचसा (ह)जार फौजेनसी वराडांत घासदाणा घेत आहेत. फतेसिंगबाबाकडील त्रिंबक विश्वनाथ वराडात होता तो धरून नेला म्हणौन वर्तमान आले आहे. मारनिलेकडील वकील देवराव नवाबाजवल आहेत. त्यांस नवाबानी पुसिले कीं वराडचे वर्तमान काय ? त्याणें उतर केले कीं, नेमणुके-प्रों घांसदाणा घेतात. जाजती उपसर्ग करीत नाही व हजरतीचे आमिलानी काही नालीस लिहिली नाही म्हणौन जाबसाल केला ते वर्तमान सेवेसी विदित व्हावया-करितां विनंती लिहिली आहे. बाबाजी नाईकाबराबर राव प्रतिनिधीकडील साहित्याविषई नवाबास व अबदुल खैरखानास पत्रें थेलिया दोन पाठविल्या, त्यात आबदुल खैरखानाची थेली दिली. नवाबाची राहिली तेहि त्यांचेचजवल दिली. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिा आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh, writing from the Nizam's camp, informs the Peshwa that Hidayat Mohidinkhan and Sultanji Nimbalkar will probably be sent against Babuji Naik in a few days.*

No. 12] [*30-12-1745*

छ २३ जिल्हेज

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. स्वामीची आज्ञापत्रें सेवकास व नवाब आसफज्याहा व अबदूल खैरखान यास थेलिया दोन बांवजी नाईकाबरोबर सादर जाल्या. थैशास थैलिया कोणे मजकुराच्या हे आज्ञा सेवकाचे आज्ञापत्रीं नाहीं. याजकरितां संदेह जाला. विचारें मनास आणितां राव प्रतिनिधी यांच्याच मजकुराच्या अस-तील. राजश्री तुकोपंत याच्या विचारें, प्रस्तुत ठाणेयांचा मजकूर नवाबाजवल न करावा. निमित्य कीं, प्रस्तुत नवाबाजवल या गोष्टीचा मजकूर नाहीं. त्यास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मोठा मनसुबा बाबूजी नाईकाचा पडिला आहे. याजकरितां नवाबास ठाणेयाचे स्मरण देऊन सावध करावे यांत विशेष काय, म्हणौन तुकोपंती आबदुल खैरखानाजवलहि हा मजकूर केलाच नाही. सेवकास संदेह जाला. कोणे मजकुराच्या थैल्या हें न कले. तेव्हा अबदुल खैरखानाची मात्र थेली दिली. मनास आणितां त्यांत मजकूर प्रतिनिधीकडील थैसें कलले. मग नवाबाची थेली प्रस्तुत ठेऊन घेतली. रुजू न केली. पुढें तो मजकूर पडिलाच तर रुजू करून जाबसाल करावा लागेल. सेवकाबराबरील थेली नवाबास रुजू जाली. त्याजमध्यें परस्परें राव प्रतिनिधीचा व स्वामीचा अकृत्रिम श्नेह इतकाच मात्र मजकूर होता. तो अर्थ नवाबास अवगत जालाच आहे. पुढें नवाबाची मर्जी ठाणेयाविषई जालीच तर आज्ञेप्रो जाबसाल करितों. सेवेसी श्रुत व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh informs the Peshwa that letters from him have been handed over to the respective addressees—the Nizam and Abdul-Khairkhan.*

No. 13] [*4-1-1746*

त असे मीर महमद हुसेनखान दिवाण पातशाही व खानगी याचे मारिफतीने नवाबाची मुलाजमत जालियाचें वर्तमान पूर्वी सविस्तर विनंतीपत्रीं लेहून पाठविलें आहे. याउपर येक दोन वेळा दिवाणाकडे गेलो. अबदूल खैरखानासहि नागो राम याचे समक्ष विचारिलें असतां त्यानी साफ सागितले की, नवाबाचा हुकूम तो प्रमाण. तुम्ही दिवाणाकडे जाऊन जाबसाल करणे. याजकरितां दिवाणास तुकोपंताखेरीज विचारिले की, नवाबसाहेबांची मुलाजमत आपण करविली. यैशास, बाबू नाईकांचे मुकदमेयात बगाजीपंताबराबर नवाबसाहेबी कितेक मजकूर फर्माविले होते त्याचे जवाबांत आमचे खावंदाने आम्हास कितेक वेंजा[1] सांगितले आहे. ते मजकूर नवाबसाहेबांचे खजमतेस गोशगुजार जाले पाहिजेत. ये बाबे आपण नवाबसाहेबास अर्ज पोहचवावा म्हणौन मोघमच बोलिलों. यावर दिवाण बोलिले की, उदैक येणे. अनकूल पाहोन अर्ज करितो. यावर छ १९ मिनहूस प्रातःकाली तुकोपंत व सेवक थैसे दिवाणाकडे गेलो. राव प्रतिनिधी यानी नवाबास वस्त्रे पाठविली आहेत त्यांची याद दिवाणानी आणविली होती ते तुकोपंती दिवाणाजवल दिली. दिवाण बोलिले कीं, समय पाहोन अर्ज करितो. परवानगी जाली म्हणजे वस्त्रें घेऊन येणे. इतके बोलोन तुकोपंतास आज्ञा देऊन डेरेयास रा केले. सेवकास बोलिले की, तुम्ही देवडीवर हाजीर राहाणें. दिवाण डेरेयांत

---

१ तऱ्हा; प्रकार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नवाबाजवल गेले. त्यांचे आज्ञेप्रो सेवक देवडीवर राहिलो. सेवक दिवाण दरबार करून बाहेर आले. त्यांचे बराबर त्याचे डेरेयास गेलो. तेव्हा सेवकास बोलिले की, आम्हास मुलाजमत करावयाचा मात्र हुकूम जाला त्याप्रो आम्ही तुमची मुलाजमत करून दिली. तुम्हास जाबसाल करणे असेल तर अबदुल खैरखानाकडे जाऊन करणे. आपणास जाबसालाविषई आज्ञा असती तर करितों म्हणौन बोलिले. यावर छ २१ मिनहूस प्रातःकाली अबदूल खैरखानाकडे जाऊन त्यास दिवाण बोलिल्याप्रो सविस्तर सांगितलें. यावर बोलिले कीं, या मजकुरांत तुम्हास आम्ही पूर्वी सविस्तर सांगितलेच आहे त्याप्रो तुम्ही लेहून पाठविलेच असाल. त्याचे जाब येऊ देणें. बाबूजी नाईकाचा वकील आला आहे परंतु त्यास नवाब जाबसाल देत नाही. नवाबाचे चितांत बाबू नायकासी सला करावयाचे नाहीं हे गोष्ट करार आहे. इतकेयांत बगाजीपंतहि येतात व आम्हीहि येविसी तुमचे खावंदास लिहिले आहे. तुमचे अगोदर श्रीपतराव याजकडून देवराव आले आहेत. त्यांचे जाबसाल आम्ही श्रीपतराव यांस लेहून पाठविले आहेत, त्याजबराबर आम्ही तुमचे धण्यास लिहिले आहे. तुम्ही उतावली न करणे म्हणौन बोलिले. परंतु तुमचे सांगितलेप्रो आम्ही नवाबास अर्ज केला. नवाब याप्रो बोलिले. नवाबाची मर्जी यैसी आहे हे काहीच गोष्ट बोलिले नाहीं. याजवरून नवाबाचा व खानाचा अंतस्थ विचार काय कसा आहे तो कलत नाहीं. ये स्थली नवाबाची मर्जी येक प्रकार जाली आहे. सर्वास भय प्राप्त जाले आहे. खानच तीन वेला तिही प्रकारच्या गोष्टी सेवकाजवल बोलिले तो अर्थ वरचेवर हुजूर विनंतीपत्रीं लेहून पाठवीत गेलो त्याजवरून विदित जालेंच असेल. असो. जे समई जो मजकूर होईल तो सेवेसी लेहून पाठवावा हा सेवाधर्म आहे. प्रस्तुत दिवाणाने आपणाकडून आमचा तालुका उडविला. मागती खा (अपूर्ण)

¶*In this fragmentary letter, both the beginning and end of which are mutilated, Raghunath Ganesh informs the Peshwa of his attempts to secure a second interview with the Nizam through the good offices of Mahommed Husainkhan and Abdul Khairkhan.*

No. 14] [*4-1-1746 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. बिदनूरकरानी चंदनाची पालखी व हास्ती घोडे वगैरा नवाबास नजर केली. याचे वर्तमान पूर्वील विनंतीपत्रीं सेवेसी लेहून पाठविलें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे त्यावरून विदित जाले असेल. प्रस्तुत छ २१ मिनहूस नवाब सिकारीस गेले त्यासमई चंदनाचे पालखींत स्वारी केली. नवाबाने बिदनूरकरावर मोठीसी कृपा केली. पालखींत स्वारी जाली याजमुळें नवाबानें बिदनूर वकील राजश्री नारोपंत यांस येक हजार रुपये नजर फर्माविली आहे. यानीं रदबदल केली परंतु चालत नाही. हजार रुा द्यावे लागतात. स्वामीचे सेवसी विदित व्हावयाकरितां विनंती लिा आहे. मीर अबदूल हकीमजी करियाखान लाहोरवाला वर्तमान असतां त्याजकडून नवाबास घोडे वगैरा जिनस घेऊन आला होता त्याची रवानगी छ २२ मिनहूस वस्त्रें देऊन केली. व समतकरखान आलम छ २२ मिनहूस नवाबाचे लस्करास आला. समागमें से सवासें स्वार आहेत. पदाजी बाबर पूर्वी गोली लागोन मेला. त्याचा भाऊ लिंगोजी बाबर व लेक यैसे नवाबाजवल आले आहेत. त्यास छ २२ मिनहूस नवाबानें वस्त्रें दिली. गौरसी केली. कलबुरगे तर्फेस गाव बदलला. त्याचे पारिपत्यास नवाबाने दोन हजार फौज पाठविली म्हणोन सेवेसी विनंती लिा होती. मनास आणिता त्या गांवाचे नाव मौजे येलसिंगी कलबुरगेयावरती बारा कोशावर आहे. तेथे येक तोफ व दोन हजार फौज पाठविली होती. नवाबाचे दबावाने ते ठाणे बोस जाली. ते जागां नवाबाचे ठाणे बैसले. ते फौज व तोफ पुढे मेंदरगीकडे जाणार म्हणौन वार्ता आहे. सुरापूरकराचा वकील आला आहे. हिदायत मोहिदीनखानाचे मारिफतीनें नवाबास भेटला. दिडा लक्षावर तेथील खंडणी चुकावयाचा मजकूर जाला आहे. दिलीहून जासूद आले. तेथील वर्तमान पातशाह दिलीहून आठा कोशावर झील म्हणौन स्थल आहे तेथे सिकारास गेले. कमरुद्दीखान लाहोरास अद्याप गेले नाही. डेरा मात्र उभा जाला आहे. वरकड वर्तमान येथास्थित आहे. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. हयातखान खोजा दिलीस पातशाहापासी मातबर होता तो मृत्य पावला म्हणौन वर्तमान नवाबाजवल आले. सेवसी श्रुत होय हे विज्ञापना. हरनुलाखान यास वस्त्रें देऊन नांदेडास रा केला. छ २२ मिनहूस वस्त्रें जाली. येकादो रोजा रवाना होईल हे विज्ञापना. रघोजी भोसले याची फौज येत आहे म्हणौन पाठविला. हे विज्ञापना.

¶*The Peshwa's agent with the Nizam reports to him several news items, viz., the present of a sandalwood palanquin to the Nizam by the ruler of Bednur, the Nizam's presents to several sardars, the quelling of the disturbance at Yelsingi, the news from Delhi about the Emperor, and the death of one Hayatkhan Khoja.*

3001

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 15] [4-1-1746

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. हाजी हुसेन नवाबाचा अर्जबेगी[1] बहुत भला माणूस आहे. छ २० जिल्हेजी दिवाणखानेयांत तमाम लोक आले. दिवाण व बकसीहि आले. त्यांचे नावनिसीची याद अर्जबेगीनें नवाबास गुंजरानिली. ते नवाबानें पाहोन मुनसीजवल दिली. यावर दोंहो घटिकानी अर्जबेगीस पुसिले कीं, दिवाण व बकसी दिवाणखानेयांत आले की नाहीं? अर्जबेगीने हाजीर आहेत म्हणौन सांगितले. याजवरून रागास आले. बोलिले की अगोदरच काय म्हणौन जाहीर न केले. तूं कामाचा नाहींस यैसें बोलोन तेंगीर[2] करून बाहेर घालविला. दिवाणखानेयांत यावयास व मजुरेयास देखील मना केले आण पूर्वी अर्जबेगी होता त्याचा लेक समागमास आहे त्यास आज्ञा केली की, तुम्ही दोन रोज हें कामकाज चालवणें. आम्ही दुसरा अर्जबेगी खास करून ठेवितों. या प्रकारचें वर्तमान जाले ते सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. दिवाणखानेयांत ज्या ज्यास परवानगी आहे तितके निरंतर जाऊन बैसतात. त्याजमधोन ज्यास बोलवावयाचे असेल तितक्यास मात्र आंत बोलाऊन नेतात. ज्यास जितकें पुसावें त्याणें तितकाच जाबसाल करावा. जाजती बोलावयास प्रयोजन नाही. या प्रकारें नवाबाची तबियत बहुत नाजूक जाली आहे. अबदुल नबीखान व अनवरुदीखान भेटीस येणार आहेत म्हणौन बोली आहे. नवाबास प्रस्तुत मनसबा बाबूजी नाइकांचा पडला आहे. मारनिलेकडून नवाबाची बातमी आली कीं कातरखटा-[3]वावर आहेत. समागमे पांच सातेक हजार फौज आहे. नवाबाचे चितांत त्यास कर्नाटकांत प्रवेश करूं देऊ नये यैसे दिसतें. नवाबाचे लस्करांत ज्याचे त्याचे तोंडी बाबूजी नायकाचे नाव आहे. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहा आहे हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh to the Peshwa: describes how the Nizam, for a trifling fault on the part of Haji Husain, dismissed him from service. He further says that the Nizam is daily growing more and more anxious over the advance of Babuji Naik into the Karnatak.*

---

१ लोकांचे अर्ज हुजुरास सादर करणारा. २ बडतर्फ.

३ सातारा जिल्ह्यांत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 16] [*5-1-1746*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामी
व ता राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो विठल दिमत राजश्री नागो राम चेरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत छ २३ जिल्हेज मुकाम सेहर अवरंगाबाद येथे स्वामीचे कृपाद्रिस्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. नवाब असवज्याही नासरजेंगास पत्रे व सांडणी व कासदाची जोडी १ यैसी छ २१ मजकुरी जेलद बोलाऊ पाठविली. बमये फौजेनसी पेडगांवच्या रूखावर बोलाविले अहे व बातशाही मनसबदार जेथवर अहेत त्यांसीहि बोलाऊ पाठविले आहे. युध्यप्रसंगाचा मनसुबा अहे म्हनोन अवाई दरबारी आहे व बाजार वार्ता अहे की, स्वामीसी व नवाबासी युध्य अहे. यास्तव स्वामीस कळावे म्हनोन लिहिले अहे. विशेष काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Naro Vithal reports to the Peshwa that the Nizam is mobilizing his forces and that there are rumours of an impending clash with the Marathas.*

No. 17] [*11-1-1746*

छ ९ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीकडून सेवकाचें वर्तमान ता छ २९ जिल्हेजपावेतों मो लस्कर नवाब आसफज्याह मौजे सरडगी भीमातीर येस्थलीं यथास्थित असे. सेवकाची रवानगी सातारेयाहून जालिया अगोदरच राजश्री राव प्रतिनिधी यांहीं नवाबास व अबदूल खैरखान यांस पत्रें देऊन राजश्री देवराव यादव पाठविले ते येऊन लस्करदाखल होऊन खानांस (पुढील अर्धा बंद गाहाळ). विद्यमाने होत आहे तिकडून जाला तर उतम. नाहीं तेव्हां माहाराज राजे नवाबाचे मर्जीसिवाय आहेत असा अर्थ नाही व अंताजी सिवदेव बाबू नायकास भेटले म्हणौन नवाबास येक प्रकार भासले असेल तर ते गोष्ट नाही. अंताजीपंतास फौजेच्या बंदोबस्ताकरितां पाठविलें आहे. बाबू नायक राहासीर आले तेव्हां

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
भेटावेंच लागले. परंतु ते व हे येके विचारें आहेत असें नाहीं म्हणोन लेहून पाठविलें. याप्रों छ १४ जिल्हेजची पत्रे छ २३ मिनहूस प्रविष्ट जाली. पुढील मजकूर अलाहिदा विनंतीपत्रांचे पुरवणींत लिहीला आहे त्याजवरून सेवेसी विदित होईल हे विज्ञापना.

¶*This letter, half a sheet of which is unfortunately missing, refers to the affair of Babuji Naik. The letter is written to the Peshwa by Raghunath Ganesh from the camp of the Nizam at Sardagi on the bank of the Bhima.*

No. 18] [*11-1-1746*

छ ९ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. संभुनाथ बिरजभुकणदास याचा मजकूर छ २३ मिनहूचे विनंतीपत्रीं सविस्तर सेवेसी लेहून पाठविला आहे. प्रस्तुत माारनिलेयेहीं सेवेसी विनंतीपत्र लेहून लखोटा दिला तो पाठविला आहे. मागती बोलत होते कीं, आम्ही क्षत्री लोक ब्राह्मणाचे दास. धर्मस्थापना होऊन प्रजा सुख पावावी हा आपला मनोदय. जर श्रीमंत चितावर धरून उद्योग करितील तर आपण त्यांचा सेवक अंतस्थे. बाह्यात्कारे पातशाही चाकर. सुरतेसारिखे स्थल उपाय करून घेईन म्हणितल्यास माहा प्रयास आहेत. नाहीतर सलुखाने अप्रयासे हस्तगत करून देतो. याजप्रो भडोज सोरट वगैरा जागे हस्तगत होऊन मोठा लौकीक होऊन प्रजा सुख पावेल. दरबारखर्चास पैका लागेल तोहि आपण प्रस्तुत मागत नाहीं. गुजराथेंत अमल दखल जालियावर पंधरावे दिवसी सावकारी निशा करावा. पेशवे यांचे नाव दिलीचे साहुकारास सांगावे तर गोष्ट फुटेल याजकरितां पेशवे यांचे साहुकारानी आमचे मारिफतीनें दिलीचे साहुकारास हामी द्यावी. करार हाच की अमल दखल वाकई[1] जालियावर पैका द्यावा. मध्यें नाहीं. यैशास गुजराथेत अमल दखल होईल तेथून दिलीस खबर जाईल त्याजउपर पंधरावे दिवसी पैका द्यावें. या गोष्टीत नौदिगर नाहीं. आपण पेशवे यां(चा) चाकर अंतस्थे म्हणवितों. जो पैका पैदा होत जाईल तो त्यांचे पुढे ठेवीन. त्याजमधोन करारदादाप्रो पातशाहास देणें तो देतील. मजला देतील तो घेईन परंतु प्रजा सुख पावावी हा आपला मनोदय. प्रस्तुत काली

---

१ योग्य.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गुजरा(त)चा मामला अफ्तर पडिला आहे. या समयांत दाव साधेल. पुढें यैसा समय सांपडणार नाही याजकरितां तुम्ही आपले खावंदास लेहून पाठवणें. जर तुमचे खावंदाचा या गोष्टीविषई उतम रीतीने भर भरला तर त्यानी सेवकास बोलवावें. आम्ही जाऊन भेटोन निशा करून मनसुबेयास पाहिजे तसा डौल घालितो. पातशाहाचा हुकूम शंभूनाथाची कुम(क) करून अमल बैसऊन देणे म्हणौन पेशवे यास आणून देतो, हे गोष्ट चितावर धरिलेयानीं मोठी कीर्ति होईल. आण हे गोष्ट तुमचे धण्याचे चितांत न आली तर त्यानी उगेंच आम्हास भेटीस बोलाऊन श्रमी करावेंसें नाही. पुढें आम्ही त्यांचे आहों. समयानें भेटोन म्हणोन बहुत प्रकारें बोलिले आहेत. माणूस मातबर आहे. सदरहू मनसुबा प्रजेच्या अद्दानरूप स्वामीचे चितांत आलाच तर मारनिलेचे पत्राचें प्रत्योतर समाधानाचें पाठवावयाची आज्ञा करून हुजूर भेटीस बोलवावा. हा ग्रहस्त भुभुक्षित आहे असे नाही. संपन्न आहे. आहे वर्तमान हुजूर लिहिले आहे. येविसी आज्ञा ते प्रमाण. स्वाम खावंद आहेत हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reveals to the Peshwa the secret overtures of one Sambhunath Brij Bhukandas which aimed at securing by diplomacy Surat, Broach and other places for the Marathas.*

No. 19] [*Recd. 27-2-1746*

पौ छ १७ सफर दोन प्रहर

श्री

राजश्रियाविराजित राजश्री

तुबाजीपंत स्वामी गों

सेवक बाबूजी नाईक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये लेखण करीत आसिले पाहिजे विशेष. तुम्हांस येकदोन पत्रे पाठविली की, जमावानसी आम्हांकडे सत्वर येणे. त्यास तुमचे येणे अद्याप होत नाही हेच अपूर्व आहे. शाहरीहून जासूद आले. त्यास नवाब नासरजंग मजल दरमजल शाहारास येतांत याजकरितां बहुतसा गलबला जाला आहे. शहारातून फौजहि आम्हांवरी निघाली आहे. यैस असोन तुमचे आगमन होत नाही हे उचित नाही. पत्रदर्शणीं स्वार होऊन जमावानसी आम्हांपासी टोकियासी येऊन पोहचणें. येक घडी विलंब करावयाचा समये नाही. बहुत त्वरेन येणे. बहुत काये लिहिणें? लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Babuji Naik entreats Tubajipant to join him with his troops at Toke without any delay as, the writer adds, forces from Aurangabad have already been set in motion against him.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 20] [*12-7-1746*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन सा नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान ता छ ४ माहे रजब मो कसबे वरणगाव येथास्थित असे. स्वामीची आज्ञा मस्तकीं वंदून निघालों तो खेडास आलो. तेथे च्यार दिवस सरंजामाकरितां लागले. तेथोन निघोन येतां मार्गी प्रतिदिवसी पर्जन्यचक्र प्राप्त होत चालिले. छ ११ जमादिलाखरीं नेवासेयांस आलों. तेथें शागीर्दपेशाचे खर्चास दोनशें रुा देवविले होते ते घेतले व घोडीस नालबंदी केली. याजकरितां येक दिवस राहिलो. तेथोन निघोन पुढे जातां येरुलाजवल ताडाचे पिंपलगावांस उंटाचे पायांस अजार जाला याजकरितां तेथें पांच रोज राहावें लागले. तेथोन निघोन चालिलों ते छ २७ जालाखरीं चांगदेवास आलों. पयोष्णी व तपती उभयता नदियांस पाणी बहुत आलें. नवाब नासरजंगहि छ २६ माहे मारीं बऱ्हानपुरानजीक मोहन नालेयावर आले. औरंगाबाजेस त्वरेन जाणार म्हणोन वर्तमान आढललें. जोडी पुढें नवाबाजवल पाठवावी तों तीन दिवस वृष्टि बहुत जाली. येदलाबादेस लस्कर पयोष्णी उतरत होतें. छ ३० रोजी जोडी राजश्री बनाजी माधवराव यांस पत्र लेहून नवाबाचे लस्करास पाठविली ते जोडी जाब घेऊन छ २ रजबीं दोन प्रहरां आली. बनाजीपंती लिहिले कीं, नवाब छ १ रजबीं कूच करून तपती उतरोन येदलाबादे-वर पयोष्णीतीरास गेले. तेथोन बोदवडावरून दरकूच शहरास जातील. तुम्ही माघारे आले मार्गे शहरास जाणे. त्याजवरून सेवक चांगदेवाहून छ २ रजबी दोन प्रहरानंतरे निघोन टांकलीस आलो तो पर्जन्य लागला. छ ३ रजबी वरणगावांस आलो तो वृष्टि बहुत जाली. येथें पर्जन्याकरितां येक दिवस राहिलो. येथोन औरंगाबाजेस जातो. वरकड नवाब तपती उतरतां नावा तीन बुडाल्या. कितेक लोक घोडी वाहवोन गेली. कितेकाची वस्तवानी गेली. पयोष्णीवरहि तसीच घालमेल जाली. येक नाव बुडाली. हें वर्तमान बनाजीपंतानी सविस्तर सेवेसी विनंती लिा आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh, who is on his way to Aurangabad, writes to the Peshwa about his journey to Varangaon. The letter also contains the news that Nasarjang is advancing upon Aurangabad.

3006

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 21] [*12-7-1746*

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंत-

प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. सेवकानें येदलाबादेवर नवाबास भेटावे तर नवाब जलद चालिले. सेवकाचा निभाव त्याजबराबर न होये. पर्जन्य बहुत याजकरितां आले मार्गे माघारा औरंगाबादेस जातो. लस्करांत वैरण दाणा मिळणे प्रयास. सर्व सेवेसी विदित आहे. नवाबाचे स्वारीमुळे मुलकाची तसनस बहुत जाली. चांगदेवांत वस्ती नव्हती. प्रस्तुत वो शंकरभटानी थोडकीसी वस्ती केली तों नवाबाचे स्वारीचा उपसर्ग गावास बहुत जाला. पर्जन्य बहुत. नवाबाचे लस्करची हैरानगत बहुत आहे. नित्य पर्जन्यवृष्टि होतच आहे. सेवेसी श्रुत होय. किले अंतूर येथें अबदुल रहिमानखान किलेदार आहे. त्याचे भावानें औरंगाबाजेस दिवानी कचेरी येक कारकून जिवे मारून पलोन औरंगाबाजेहून कबिलासुधा निघोन किलेयावर आला. याजकरितां अबदुल रहमानखान याने किला बलकाविला. नवाबाने दुसरा किलेदार पाठविला होता परंतु त्यास अमल दिला नाहीं. किलेयावर सामान सरंजाम चढवीत आहे व काही चढविला आहे. आढलले वर्तमान सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिा आहे. सेवकास पर्जन्याकरितां च्यार दिवस अधिक लागले. क्षमा करावयास स्वामी धणी आहेत. जासूद जोडिया समागमे आहेत. त्यानी खर्चास मागितले याजकरितां त्यास खर्चास देविले. त्याची याद अलाहिदा पाठविली आहे. हुजूर दफ्तरी जासुदांचे रोजमरेयांत वजा करावयाची आज्ञा करावयास स्वामी धणी आहेत. सेवकास शंभर रुा खर्चास देविले होते त्याचे खर्चाची याद हुजूर असतां रुजू केली होती. आज्ञा जाली की, लस्करदाखल जालियावर खर्चाविसी लिहिणे, सरंजाम होईल. खर्चाची बेगमी करावयास स्वामी समर्थ आहेत हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports to the Peshwa the trouble the commandant was creating at Aurangabad. Finally he asks for money for the expenses of his establishment.*

No. 22] [*23-7-1746*

पा छ २३ रजब

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नागो राम चेरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ता छ १५ माहे रजब मुाशेहर स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
वर्तमान येथास्थित असे विशेष. पूर्वी पत्र पाठविले ते सेवेसी पावोन वृतांत निवेदन जाहालाच आशल. च्यार दिवस शेहरात दाण्याकरिता फार उपद्रव जाहाला येका दो मातबराच्या इजती गेल्या. याप्रमाणे थोर धामधूम जाहाली. सांप्रत येकदोन पाऊस मातबर जाहाले व नवाब आसफज्या या(ही) बाहेरून ताकीद करून सरकारची उंटे व बईल पाठऊन (फाटले) बइलाच्या खे (फाटले) रस्तहि आली. त्याणेकरून दाणे जोरीबाजरी सातआठ सेर, हरभरे सात सेर, गहू साहा सेर, तूप दीड सेर, तांदूल च्यार सेर याप्रमाणे मिलते. सांप्रत धामधूम होत नाही. राजश्री बाबूजी नाईक याचे भेटीचे वर्तमान पूर्वी लिहिलेच होते. त्यांवर मागाहून रा॥ आबाजी नाईकहि आले. नवाबाची भेट घेऊन नवाबासी प्रसंग केला की, आम्हास आरकाटेचा यैवज पावला नाही तो यैवज येथेच देवावा. निदानी त्या यैवजांपैकी येक लाख रुपये तरी येथे देवावे. दुसरे जाहागिरीचा मजकूर केला की, जाहागीर काही आम्हास देऊन आम्हापासून चाकरी घ्यावी. येका लेकाचे नावे हरबाजीचे आथवा देव कृष्णाचे नावे जाहागीर मागत होते हाहि मजकूर केला. दुसरा करणाटक प्रांतीचा बंदोबस्त पुडील सालची मामलियत येथेच चुकवावी हाहि मार केला. यैस तीन मार केले. त्यास नवाबानी उतर दिले की, आरकाटेस यैवज देवविला तो तेथेच पावेल. दुसरे परवाने ताकिदीचे देववितो तेथेच यैवज पावेल. ते परवानेहि दिले. दुसरा जाहागिरीचा मार केला होता त्यांसी उतर दिले की, जाहागीर द्यावी हे आमचेहि चितात आहेच. परंतु बाजदबरसात तुम्ही येणे. जाहागीरहि थोडीबहुत देऊ. हा जाबसाल जाहाला. पुडील मामलियेत करणाटक प्रांतीची आताच चुकवा म्हणता, तर आताच कसी मामलियेत चुकवावी? तुम्ही सातारियांसी जाऊन बाहाल होऊन या, मग मामलियेत चुकऊ. सातारियांस तुम्हास रिपू फार आहेत. तुम्ही आतासीच मामलियेत कसी चुकविता? बाजदबरसात अवघे तुमचे मुदे करून देऊ. याप्रमाणे गोड मात्र वाचेणे बोलिले. त्यांवरून नाईकास विशाद फार जाला. येथे आल्यावर दोन वेल दर्शन मात्र जाहाले. परंतु दिवसंनदिवस महत्वांस आंतर पाडिले. हयेगईवर गोष्ट पडली. यावरून नाईकास विशाद फार जाला. आपले डेऱ्यास आले आनि विचार केला की, नवाबाजवल जाऊन आति आघरये करावा. ज्याप्रमाणे पुण्यास व सातारियास गतवरसी केला तइसा ये (थे) याचे दारी आनर्थ करावा हा विचार केला. त्यांसी समागमे येकदोन मातबर होते त्यानी वरजिला, की नवाब तुम्हास कोठे सापडतो? उगेच तुम्ही तेथे जाऊन बसाल तेव्हा थोर फजिती होईल म्हणून येकादोघानी वरजिले. खर्चावीन फार श्रेमी होते. शहरात कर्जहि मेलवीत ते न मिले. काही ताटे-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वाट्या व समया वगैरे जिनसहि विकली. नित्यांस समागमे दोनसे सिलेदार व बारगीर यैसे रोजमरियाकरिता दंगा करीत तेव्हा कितीका सिलेदारास आरकाटेवर वराता दिल्या. व आवरंगाबादेच्या सावकाराचे कर्ज देणे, त्यानी आडविले तेव्हा त्यांसहि वरात आरकाटेवर दिल्या. आरकाटेस येणे यैवज साडेतीन तेथे यानी वराता सांडसां[1] लाखाच्या केल्या. याप्रमाणे दिवस घालवितात. यैकिले वर्तमान सेवेसी लिहिले. रा॥ बगाजीपंती सर्व लिहिलेच असेल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Nago Ram, writing from Aurangabad, communicates to Sadashivrao Bhau the substance of the negotiations between Babuji and Abaji Naik on the one hand and the Nizam on the other. The Naik brothers, the writer reports, have become utterly dissatisfied at the Nizam's reluctance to concede any of their requests.

No. 23] [*23-7-1746*

पा॥ छ २३ रजब

श्री

पु॥ श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना यैसीजे. छ १२ रजबी सातारियाहून राजश्री स्वामीचे व दोंही माहालची पत्रे व हुजरे आले. त्यांनी रुपयाची निकड केली. राजश्रीनी हातरोखा लिहिला त्यात आज्ञा की, तुमचा जेष्ठ मासीचा वाइदा, यैवज झाडून पाठवावा, तो न पाठविला आनि इकडेस आलेस नाहीत म्हणून बहुता प्रकार लिहिले. त्यावरून हुजरियानीहि सक्ती फार केली. त्या रागावर साइंकालपरियेंत उभयेता उपास केले. निदानी येथवर प्रसंग आला की, आबाजी नाईकानी विशांची

---

१ साडेसहा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पुडी हातात घेतली. बाबूजी नाईकानी पोटकव्यारी करून घ्यावी या तजविजेत होते. हे वर्तमान रा॥ आत्माराम जोसी बेगमपुऱ्यात आसतात त्यांसी सूचना कलली. त्यांवरून तो आबाजी नाइकाजवल गेला. पुडी हातात काशाची आहे म्हणून पुसिले. त्यास आबाजी नाईक बोलले की, तुम्हास गरज काये? भलती पुडी आमचे हाती असेल. त्यावरून आत्माराम जोसी यानी हातची पुडी हिरून घेऊन बोलिले की, लोकाची घरे का बुडविता? हे बोले तव याचे तोंडावर आबाजी नाईकी दिली. याप्रमाणे वर्तमान जाहाले. हे नवाबासहि बातमी कलली. त्यावरून नवाबहि आजुरदा[1] जाहाला. त्यांसी ते समईच नाईकाचा मध्यस्त दरगाकुलीखान यास आज्ञा केली की, नाईकास सांगून पाठवा की, तुम्ही जाणे, निरोपाचा गुंता नाही म्हणून हती माहालचे दरोग्यासमागमें सांगून पाठविले. त्यावरून नाईकानी छ १४ रजबी कुचे करून श्रीटोक्यास गेले. समागमे सिलेदार होते त्यासीहि लटक्या वराता देऊन सर्वास निरोप दिला. श्री सिधेस्वराजवल जाऊन उभयेता भाऊ बसणार हा विचार आहे. रा॥ सिउबा नाईक थोरात वगैरे सावकार होते त्यांची कर्ज देणे होते त्यास सर्वास काही वराता आरकाटेयावर, काही आदवनी रायेचूर येथे लटक्या वराता देऊन रवाना केले. त्यांनीहि लटक्याच वराता घेऊन निकाल काहाडून शहरात आले. पुडे तिकडेस जाणार. यैवज हातास येव किंवा न येव परंतु तेथवर जावे. घरास जावे तर तेथे कर्जदार बसू देणार नाहीत. या विचारे हा निकाल काहाडला. याप्रमाणे वर्तमान. रा॥ रघोजी भोसले यासहि नवाबानी निरोप दिला. त्यास उमेदवार केले की बाजदबरसात येणे. काही जाहागीर वराड प्रांती देवगडाजवल देऊ केली. यानी वकील ठेऊन जावे, मागाहून सनद करून देऊ हा करार करून बिदागी केली. येका दो दिवसी येथून निघोन सातारियास येणार. रघोजी बावानी नाईकाचे समाधान केले की, सातारिस गेल्यावर माहालातून तुमचे साहित्ये करून फिरोन कर्णाटकची मामलेत करून देवविंतो म्हणून समाधान मात्र केले. नाईक सातारियांस सेंभर वाटे तव येत नाहीत हा विचार आहे. पुडे होईल ते वर्तमान लिहून पाठऊ. स्वामीस यैकिले वर्तमा(न) सेवेसी लिहिल. दवलताबादेस चवक्या भवताल्या बसल्या. स्वामीनी मज(ला) मालीवाडा वगैरे तीन गाव दिले ते उज्याड जाहाले. पैका फसला. प्राकृतापुडे उपाये नाही. स्वाम कृपाळू होऊन हरयेकविशई ऊर्जित-भाव करितात, परंतु हीन आद्रुष्ट त्यास काये उपाये? बरे. स्वामीचे पुन्य समर्थ

---

१ रुष्ट.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे. रिनापासून मुक्त करणार स्वाम मायेबाप आहेत. वगवसिला स्वामीचे पाये आहेत. हे विज्ञापना.

सेवेसी भिकाजी वाकडे दंडवत विज्ञापना. ज्या कार्यास पाठविले ते सेवा करितो हे विज्ञापना.

¶A letter from Nago Ram to Sadashivrao Bhau, stating that Babuji and Abaji Naik, having failed miserably in the Karnatak, have been dismissed by the Nizam. It is further stated that Raghuji will shortly leave the Nizam's camp and proceed to Satara.

No. 24] [*After 14-9-1746*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. स्वामीची आज्ञा वंदून निघालों तो पुणियांस आलों. दोन रोज पुणियांत होतों. तेथोन खेडास आलों. राजश्री वासुदेव नारायेण यांजकडून घोडीस जीन खोगीर सर्व सामान स्वामीनें नवाच देवविला. सनदेप्रो सामान मागतां, आधीं तर जीन नाहीं बोलिले. त्याउपर जिनगरास बोलाऊन जीन मनास आणिता जीन दाहाबारां रुपयांत मिलेल म्हणौन बोलिले. परंतु जीन दरबारपसंद नाही व येक पदार्थ मिलाला तर दुसरा नाहीं यैसे जालें. याजकरितां सनद माघारी घेतली. मग जुना जीन होता त्याचा हणा[1] वगैरा जिनगराजवलोन नीट करऊन घेतला. जिनांत तों काही हाल राहिला नाहीं. खेडामध्यें घोडीचे चाकरीस पोरगा होता तो अजारी पडिला. त्याचा मुबदला दुसरा ठेवावा लागला. याजमुलें शहरदाखल व्हावयास च्यार दिवस अधिक लागले. क्षमा करावयास स्वामी समर्थ आहेत. प्रस्तुत स्वामीने सखलाद देवविली तिणें जीन आछादून खानाकडे जात येत असतों. पुढें जिनाचा सरंजाम करवणार स्वामी समर्थ आहेत. राजश्री बनाजी माधवराव यांस नवाबाची रुसकत अद्याप जाली नाही. रुसकत जाली म्हणजे सेवेसी येतील. जासूदजोडिया ये जागां आहेत त्यांस रोजमरा छ १६ सवाल पावेतो आहे. परंतु शहरी महर्गता बहुत याजकरितां कृपाळू होऊन जासुदाचे रोजमरेयाची आज्ञा करावयास स्वाम समर्थ आहेत. विजयादशमीपर्यंत या प्रांती विरल पर्जन्य पडला. त्या अलीकडे आजपावेतों पर्जन्य केवल नाही. याजकरिता (फाटले) आहे. विजयादशमीपर्यंत वीस

---

१ जिनाचा शेपटीला अडकाविण्याचा पट्टा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
सेर जारी बाजरी होती. आतां सोला सेरप्रो जाली. गहू आठ सेर व त्याचप्रों तांदूल आठ सेर दर रा आहेत. दिवसेंदिवस पर्जन्याकरितां महर्गता होत चालिली आहे. नवाबाकडील वर्तमान तर, रमजानची ईद जालियावर कूच करून शहराकडे यावें म्हणौन आवई बोली आहे. शेवक शहरदाखल जालियावर खानाची भेट जाली. बोलीचालीचें वर्तमान वरचेवर सेवेसी लेहून पाठवावें. त्यास खान बोलिले की, नवाब नासरजंगाची भेट जालियावर जासूदजोडी पाठवणे. त्या घालमेलीकरितां आजपर्यंत प्रतीक्षा केली. क्षमा करावयास स्वामी समर्थ आहेत. खानाचें शरीर विकळच आहे. रमजान महिनेयाचे उपोषणाचा नियम चालत नाहीं. भोजन करीत असतात. आतां काही आरोग्य आहे. राजश्री दीक्षित-बावास आश्विन शुद्ध येकादसीपासोन ज्वराची वेथा निर्माण जाली आहे. अद्याप समाधान वाटत नाहीं. सेवेसी श्रुत व्हावयाकरितां विनंति लिा आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh writes to the Peshwa about his arrival at Aurangabad and the high prices prevailing there on account of scarcity of rain.*

No. 25] [*19-9-1746*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नागो राम चेरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ता छ १४ रमजान मुा नवाब आबदुलमजीदखान याचें लस्करांत नजीक गदक येथे स्वामीकृपेकरून वर्तमान येथास्तित असे विशष. छ ११ मिनहूस कासीदजोडीसमागमे विनंतीपत्रे पाठविली ती सेवेसी पावोन वर्तमान श्रुत होईल. सांप्रत वर्तमान छ १२ रोजी रा बाबूजी नाईक नरगुंदातून कूच करून मनोलीस गेले म्हणून वर्तमान येथे आले. हे वर्तमान नवाबानी यैकिल्यावर फार खुशाल जाले. खुशालीच्या नजरा तमाम लोकानी केल्या. आपणहि आपली जोडी मुजरत बातमीस पाठविली होती. त्यास तेथे नाईकाचे लस्करात चरचा हेच यैकिली की, कृष्णातीरी रा प्रतेनिधीचा गाव आतनी (आथणी ?) म्हणून आहे तेथवर जाऊन तेथे मुकाम करावे. साताऱ्याहून माहाराजानी मातबर सरकारकून पाठऊन बहुत माने करून सातारियास नेले तरच जावे, यैसी चरचा लस्करात जासुदाही येकिली ते आपणास कलली म्हणून यैकिल वर्तमान सेवेसी लिहिले. राजश्री संभाजी राज्य याजकडील रा येसाजी गाईकवाड

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथे नवाबाकडेस शाहूपटीचे रुपये मागावयास व बाबूजी नाईक याचेहि मनसब्यास आले होते. त्यासी शाहूपटीचे रुपये पनास हजार करार आहे त्यांपैकीं साल-मजकुरी रुपये तेरा हजार द्यावे यैसा करार करून चव परगण्यांवर वराता तेरा हजाराच्या करून दिल्या. रोख यैवज दिला नाही. परवाणे करून दिले आनि माारनिलेची रवानगी केली. रा सिवराव सेलार यासहि नवाबाही आज्ञा केली की, तुम्ही आपली सरंजामी करून सतरुसीस जावयास तयार होणे म्हणून छ १३ रोजी सांगितले. रा नारो तुकदेव यास व आपणास सिवरायासमागमेच रवानगी करणार. दीपवाली जाहालियावर सेवेसी येऊन पोहचू. रा हिंदुराव घोरपडे व रा मुरारराव घोरपडे यांचे वर्तमान पूर्वीचे पत्री लिहून पाठविलेच आहे. त्या उभयेतांचीहि पत्रे पाठविली. पत्रावरून सर्व आर्थ कलेल. पत्राचे प्रत्योतर आले म्हणजे येते समई ज्याप्रमाणे आज्ञा केली त्या आज्ञेप्रमाणे कार्यें नेमस्त करून सेवेसी येतो. आज्ञापत्राचा मार्ग रक्षितो सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nago Ram informs the Peshwa that Babuji Naik, a couple of days before, marched from Nargund to Manoli and intends proceeding further towards Athani.*

No. 26] [*24-9-1746*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. सेवक तीन दिवस खानासमागमें रोजेयांस होतों. छ १६ रमजानीं खानाबराबर शहरीं आलों. नवाब नासरजंगास थैली आहे म्हणौन पूर्वीच खानास श्रुत केलें होते. शहरीं आलियावर खान नवाबाचे भेटीस गेले तेव्हां नवाबास विदित केलें. नवाब बोलिले कीं, त्यांस उदैक बोलाऊं. सेवट याचप्राणें दोनच्यार वाइदे टलले. अद्याप नवाबाची भेट जाली नाहीं. खानहि स्वइछेन नवाबाजवल जात नाहीं. जे समई नवाब बोलावितात तेव्हां जातात. या प्रकारचें वर्तमान आहे. कबुतरांची याददास्त खानास रोजेयांचे मुकामीच वाचून दाखविली. स्वामीचे आज्ञेप्रों बोलिलो की यादीप्रों कबुतरें आपण खरीदी करवावी. पैका पडेल तो आम्ही देऊ व येक जाणता माणूस कबुतरांसमागमें देऊन सुरक्षित जनावरें रावसाहेबांजवल पावेत तें आपण करावें. याजवर खान बोलिले कीं, उतम; यादीप्रों खातिरख्वा कबुतरें खरिदी करून रवानगी केली जाईल. राजेयांकडील खरिददार कबुतरांचे आले होते. त्यानी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कबुतरें खरीदी केली. किमतहि मनमाने तैसी दिली. आम्हास ते गोष्टीचा इतला नाही. दस्तक मागावयास आहे (ले) तेव्हां दस्तक मात्र आम्ही दिल्हें. असों. आतां हीं कबुतरे आम्ही खरिदी करून देतों म्हणौन बोलिले. शहरीं आलियावर खानानी पारसी खतानें यादीची नकल करून घेतली. कबुतरांचे पैरवींत आहेत. मागाहून रवानगी करितों. माणिकांचे व पाचेचे व हिरेयांचे मणी यांविषईं वगैरा जिनस खरिदी करावया(ची स्वा)मीची आज्ञा. आज्ञेप्रों सिवराम गोविंद (फाटले) यैशास (फाटले)लत नाही. बाकी जिनस मागा(हून) रवाना करितों. वरकड वर्तमान तर गोविंद (शिवराम) नवाबाजवलोन खानदेशांतील नव माहाल इजारा (फाटले) हरास आले. माहाल बितपसील :

धुले	बाहाल	डांगरी	जलोद	थालनेर
१	१	१	१	१

आंबेपातल	सुलतानपूर	नेर	भामेर
१	१	१	१

येकूण नव माहाल पेस्तर साली जमेवर ज्यादा सवाई त्यापुढें सवाईचे जमेवर निमसवाई त्यापुढें निमसवाईचे जमेवर निमसवाई याप्रो सिसाला सिवाय सिबंदी मामला करून आले आहेत. अद्याप शहरीं आहेत. दिपवालीनंतर खानदेशांत जाणार आहेत. सेवेसी श्रुत व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. खान रोजेयांचे मुकामीं असतां वकिलांची लिहिलीं आलीं होती कीं, गुलशनाबाद[१] तुमचे सिपूर्द जाली. मागाहून यैनायतनामा सादर होईल. खान शहरी आलियावर छ १९ रमजानीं गुलशनाबाद वगैरे सात माहाल सिपूर्द जालियाचा यैनायतनामा खानास येऊन पोंहचला. नवाबाने खास खतानें लिहिलें आहे कीं, तुम्ही हुजूर न येणें. नासरजंगाजवल राहणें. तुम्हास गुलशनाबाद वगैरे माहाल पूर्ववतप्रो सिपूर्द केले आहेत. त्याजवरून खानानी उत्साह केला. नौबत वाजविली. लोकानी नजरा केल्या. याप्रों वर्तमान सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिा आहे. हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh reports to the Peshwa his arrival at Aurangabad, with Said Lashkarkhan. The writer adds that, as desired by the addressee, he is arranging for the purchase of pigeons and other things.

---

१ नासिक.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 27] *[24-9-1746*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-

प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. रोजेयांचे मुक्कामीं खलबतामध्यें खानानी बोलाऊन नेलें तें समईं स्वामीचे आज्ञेंप्रों बोलिलो कीं, आपणास शरीरीं सावकाश नाही म्हणौन रावसाहेबी वर्तमान आइकिलें त्याजवरून बहुत श्रमी आहेत. औषधउपाय करून शरीरास आरोग्य करून घ्यावे म्हणौन बहुतप्रकारें सांगितले आहे. त्यावरून खान बोलिले कीं, आम्हास अजार येक वर्षपर्यंत आहे. वोषधउपाय करितों, दोन महिने समाधान होतें, मागती व्यथा निर्माण होते तेव्हां वोषधांचा उपाय व्यर्थ जातो. औरंगाबाजेमधील हवा मानत नाही याजकरितां रोजेयास येतो. येथे आलियावर समाधान वाटतें. प्रस्तुत समाधान आहे म्हणौन बोलिले व स्वामी शरीरीं समाधानरूप आहेत कीं काय म्हणौन पुसिले. यावर बोलिलो कीं आतां समाधान आहे. यानंतरे बोलिलो कीं, आपले श्नेहामध्यें विक्षेप न व्हावा म्हणौन दीक्षितानी बहुत प्रकारें रावसाहेबांस लिहिलें होतें त्याजवरून रावसाहेबी सागितले आहे कीं खानाचा आमचा श्नेह अकृत्रिम चालत आहे. खान थोर अमीर आहेत परंतु आम्ही रवानगीचा मुकदमा समजतो. परस्परे श्नेहामध्यें विक्षेप व्हावा हे गोष्ट होणार नाही. आमचे अमलदार किरकोल कोठें पैका जाजती घेत असतील तो विचारेच घेत असतील म्हणौन खानास येक प्रकार वाटत असेल तर आमचे अमलदार बेज्या वर्तणूक तो येकंदर करीत नाहीं. कदाचित कोण्ही केलीच तर परस्परें लिहिण्यापढण्यामुलें दुरुस्त होतच आहे. आमची दृष्ट श्नेहावर आहे. रवूजी भोसले याचे तर्फेने वराडांत व देवगड प्रांते काय काय उपसर्ग होत आहेत ते तों खान जाणत असतील. देवगडचा राजा फर्यादीस-देखील नवाबापासी आला होता. सेवट परिणाम काहीच जाला नाही. त्या प्रो तो आम्हाकडून होत नसेल म्हणौन कितेक प्रकारें बोलिलों. यावर खान बोलिले कीं, रावसाहेबांचा आमचा श्नेह चालत आहे त्यामध्यें किरकोलीकरितां आम्ही विक्षेप मानितो यैसे नाहीं. आम्हास रावसाहेबांपेक्षा विशेष काये आहे ? दीक्षितास रावसाहेबी या मजकुरांत लिहीलें होतें तें पत्र दीक्षितानी आम्हास दाखविले. आमचे चितांत श्नेहापेक्षा दुसरा अर्थ किमपि नाही म्हणौन बोलिले. यावर सेवकानें कोठीवाले यांचे बदोबस्ताचा मजकूर केला त्याजवरून बोलिले कीं, आम्ही साल गुा फौज पाठऊन खानदेशप्रांते कोठावाले याचे पारिपत्य केले. गडी घेतली. सेवट तुमचे लोकाच्याने धर धरवला नाहीं. त्यावर मागती आम्ही

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
उपद्वाप करावा तो नासरजंग शहरास आले व नवाबानें आम्हास हुजूर बोलाविलें. नासिक प्रांत आमचे स्वाधीन केला तोहि काढिला याजकरितां चित विक्षेप पावले. तैशामध्यें नासरजंगास सांगोन तंबी पोहचवावयाचा विचार करावा तर त्यांस काये भासेल कलत नाही याजकरितां आम्ही सोडून दिल्हे. आतां नवाबानें मागती नासिक प्रांत आमचे सिपूर्द केला व हुजूर यावयाचे मना केलें. लिहिले आहे कीं, तुम्ही नासरजंगाजवल राहावेत दुतर्फा तहरहमध्ये तुम्हीच आहा याजकरितां तुंम्ही हुजूर न येणे म्हणौन लिहिली आली आहेत. या उपर नासरजंगास समजाऊन सांगोन कोठीवाले याचे पारिपत्य करवितों म्हणौन बोलिले. सेवसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे हे विज्ञापना.

¶*The substance of a conversation between Said Lashkarkhan and the writer pertaining to some administrative matters and to the health of the former is reported to the Peshwa by Raghunath Ganesh.*

No. 28] [*24-9-1746*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. राजश्री बाबूजी नाइकांचा मजकूर खानाजवल बोलिलों की, साल गुदस्तां नवाबाचा करार कोणे प्रकारचा असतां सेवट सारेच येकीकडे ठेऊन नायकांची दस्तगिरी[1] केली. नाइकाची बुनियाद[2] काय याचा विचार नवाबानें चितांत आणिला नाहीं व आम्ही नवाबाचे स्वहिताचे अर्थ सांगत असतां नवाबास येक प्रकारच भासले. असो. नवाब थोर आहेत. आम्ही नवाबाचे खैरख्वा आहो म्हणौन हरयेक मजकूर नवाबाचे किफायतीचा सांगावा लागतो. साल मारीहि गुदस्तांच प्रमाणेच नवाबाचा विचार असला तर तसेच साफ आम्हास कलले पाहिजे. साल गुदस्ता थोडाबहुत तंबीचा विचार सावनूरवाले यानी व मुरारारायानी केला म्हणौनच नाईक हालखुद[3] राहिले म्हणौन कितेक प्रकारें विदित केलियावर खान बोलिले कीं, साल गुा नवाबाने राजेयाचे संकोचाकरितां मात्र बाह्यरंग रक्षिला. सेवट तंबीची पैरवीहि जाली. तुमचे खातीरख्वा

---

१ मदत. २ स्वभाव, शील.

३ आहे त्या स्थितींत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गोष्ट जाली. पेस्तरहि तंबीचाच विचार आहे. प्रस्तुत बाबूजी नाईकाचा मजकूर काय आहे व रावसाहेब बहुत दिवस सातारा आहेत याचा विचार काये म्हणौन खान बोलिले. त्याचा जाब दिल्हा कीं, बाबूजी नाईक नरगुंदास सातआठेकशे स्वारानसी आहेत. आबाजी नाईक सातारेयास आहेत. राजेयाचे सरकारचा पैका दुसाला दाहा लाख रुा नाइकानी द्यावे. त्यांत पैका पावला नाही व कर्जाची बेरीज मबलगा जाली ते सावकार आबाजी नाईकास हमेश हैराण करितात. नायकाचा सिसाल भरला. राजेयांचा पैसा आदा जाल्याविरहित पुढे मनसबा सांगतात हे दिसत नाही. फौज नवी धरावी तर कर्ज मिलावयाची मुस्कील. नायकाचे सरदारीत काही अवसान राहिले असे नाहीं. राजेयानी रावसाहेबास आजलग खोटी करून ठेविले ते येखादी खजमत सागावी म्हणौनच ठेविले आहे. नायकासहि राजेयाची दोन तीन बोलावणी गेली आहेत परंतु नाईक यावयास उजूर करितात. सावनूरवाले व मुरारराव त्याचे पिछास लागलेच आहेत. साल-गुदस्ता अरकाटपौ तीन लाख रुा नाईकास नवाबानें देविले त्याजपौ आदा जाले नाही म्हणौन आईकतो. यैशास तो पैका नवाबानें मामलतीकरितां देवविला. केवल नाईकाचे जातीस दिला यैसे नाहीं. याजकरितां तो पैका नवाबाने मना करवावा. नाईक फौज धरून गेलेच तर पैका पावतील. नाही तेव्हा तो पैका राजेयाचे सरकारचा आहे. व सालगुदस्तांप्रमाणें अरकाट प्रांते सरदारांस ताकिदी पाठऊन तंबीची पैरवी करावी म्हणौन सांगितले. यावर खान बोलिले की, हालीं विचार तोच आहे. नवाबाने पैका मना करविला आहे व सरदार लोकांस ताकिदी गेल्या आहेत. आम्हीहि नवाबास अर्जी करून दृढीकरण करविलें आहे. मागतीहि करवितों. रघूजी भोसले याचा विचार काय म्हणौन खानानी पुसिलें. जाब दिला कीं, त्याचा मनसबा नायकाप्रमाणे आहे. राजे-यानीं हुजूर बोलाविले परंतु ते उजूर करितात. रावसाहेब सातारेयास आहेत. हा दबाव त्याचे मामलेयावरहि आहे. यावर खान बोलिले की तुमचे दरबारांत साहेबकामास रावसाहेब मात्र बेउजूर आहेत. बाकी सरदारांचा विचार कलतच आहे म्हणौन बोलिले. या प्रकारचे वर्तमान सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The conversation that took place between the writer, Raghunath Ganesh, and Said Lashkarkhan, regarding the activities of Babuji Naik in the Karnatak is reported to the Peshwa.*

---

१ (?)

3017

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[29-9-1746

No. 29]

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नागो राम चेरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ता। छ २४ रमजान मुा। लस्कर स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशष. पूर्वी छ ११ मिनहूस पत्रे रवाना केली ते सेवेसी पावोन वर्तमान श्रुत होईल. सांप्रत स्वामीनी ज्या कार्यास रवाना केले ते तव येथे येऊन आज्ञेप्रमाणे कार्य घोरपड्याकडील करून त्याजकडील भला माणूस घेऊन रवाना केला. आठा दाहा दिवसी सत्वरच येऊन पावेल. आपणासहि नवाबाचा निरोप येकादो दिवसी होणार. निरोप जाहालियावर ताबडतोब सेवेसी येऊन पोहचतो. इकडील कितेक आर्थ सेवेसी आल्यावर निवेदन करीन. सारांवंस आर्थ हाच की, या प्रांतात कोनी धनी नाही. संभाजी राजे यास तव या प्रांतात कोनीच मानीत नाही. ये गोष्टीची ईरशा त्यासहि नाही. कदाचित त्यांजकडून स्वामित्व या प्रांतातील श्रीमंत राजेश्री नाना स्वामीही करून घेतल्यास या मुलकाचा बंदोबस्त होईल. येरवी आनयास हा मुलूक बधतो यैसा आर्थ नाही. येथे चर्चाहि लोक करितात की, हा प्रांत पंतप्रधानानी केल्यास या प्रांताचे प्राक्तन उघडेल यैसी सर्वास आशा आहे. जर आवघेच कर्णाटकच तुंगभद्रेपलीकडील सर्व जिला राजश्री स्वामीकडून करून घेतला तर फारच उतम आहे. नाही तरी काही थोडेबहुत नाते करून घेतल्यास फार ये प्रांती दहशत पडेल. येथे येकिलेल वर्तमान सेवेसी लिहिले. वरकड वर्तमान नारोपंताही श्रीमंतास लिहिले त्यावरून आर्थ सविस्तर कलेल. आपणहि सत्वरच आठादाहा दिवसी येतो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Nago Ram, writing to Sadashivrao Bhau from the camp of Nawab Abdulmajidkhan, emphasises the necessity and advisability of establishing the Peshwa's authority in the Karnatak, where, the writer remarks, the rule of King Sambhaji has practically come to an end.*

[10-10-1746

No. 30]

श्री

श्रीमंत राजश्री पंत-

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान तागाईत छ ९ माहे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सवाल पावेतों येथास्थित असे. स्वामीचें आज्ञापत्र छ १६ रमजानचें छ २ सवालीं प्रविष्ट जालें. तेथें आज्ञा की नटवे सरकारात चाकर होते ते सांप्रत शहरीं आहेत. त्यास हुजूर पाठवावे. आज्ञेप्रों त्यांचे प्रेत्नांत आहें. मागाहून तलास करून शोध लागला म्हणजे हुजूर रवाना करितों. नटवे याचें नाव आज्ञापत्रीं नाहीं तथापि शोध करितों. राजश्री बनाजी माधवराव यांस नवाब निजामुदौला याजवलोन रुसकत जाली. छ मारीं खान अजम सैदलस्करखान यांचाहि निरोप जाला. स्वामीने कितेक मजकूर सेवकास आज्ञा केली होती. आज्ञेप्रों खान अजमास विदित केले. खान अजमानी सेवकास नवाबाजवल नेऊन सेवकाजवलोन नवाबास विदित करविले. त्याचे जाबसाल नवाबाही व खानानी बनाजी माधवराव यांस निवेदन केले आहेत. सेवेमध्ये आलियावर सविस्तर विनंती करितील. सरकारचा फर्माइसी जिनस रेसीम व कलाबतू यांजबराबर रवाना केला आहे. बनाजीपंतहि शहरींहून रा जाले. कबुतरांची फर्माईस खानांस आज्ञेप्रो विदित केली. खान बोलिले कीं कबुतरें आम्हीं तलास केली परंतु राजेयाचे लोकी खरिदी केली त्याजमध्ये गेली. तथापि आम्ही काही मेलविली आहेत व मेलवितों. मागाहून रवाना होतील म्हणौन बोलिले. मागाहून कबुतरांची रवानगी करितो. कार्तिक शुध्ध प्रतिपदेस या प्रांती काही पर्जन्य जाला. त्याजवर दोन तीन दिवस विरल विरल वृष्टी कोठे कोठे जाली. त्याउपर नाहीं. सेवसी शृत व्हावयाकरितां विनंती लिा आहे. हे विज्ञापना.

¶*The departure of Banaji Madhavrao from Aurangabad is communicated to the Peshwa. The writer, Raghunath Ganesh, also writes about purchasing pigeons, silks, etc., for the addressee. (Were the pigeons meant for postal service?)*

No. 31] [*19-10-1746*

श्री

श्रीमंत राजश्री पंत-

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार. कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचे वर्तमान ता छ १४ माहे सवाल पावेतो मो शहरीं येथास्थित असे. मोगलाचा किला आवंढा गनिमानें घेतला

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हें वर्तमान नवाब नासरजंगास छ १२ मिनहूस रात्रौ विदित जालें. छ १३ मिनहूस नवाबानें खान अजम सैयद लस्करखान यास बोलाऊन नेऊन खलबत केलें. खान अजम नवाबाकडून अपाले हवेलीस आलियावर सेवकास खलबतांत नेऊन विचारलें की, किला तुम्ही घेतलात म्हणौन वर्तमान आलें याचा विचार काय? रावसाहेबाचा व आमचा करारदाद कोणे प्रकारचा? दौलताबाजेचा किलाहि कदाचित घेतला तर तोहि फिराऊन द्यावा, याप्रमाणे बोली असतां प्रस्तुत किला घेतला तेव्हा परस्परे स्नेह कसा राहेल? तशामध्ये रावसाहेबांचा व आमचा अकृत्रिम स्नेह, किलेजातची खबरदारी नवाबसाहेबी आम्हास फर्माविली असतां हे गोष्ट बहुतच अनुचित जाली. याउपर स्नेह राहत नाही म्हणौन बोलिले. सेवकानें प्रत्योतर दिल्हे की हे गोष्ट आमचे सरकारातून सहसा जाली नाही व होणार नाही. याचा मजकूर आणीक आहे राजेयांची थोरली राणी सिर्कें यांची बेटी. सिर्कें यांची बुनियाद[1] वाढवावी हे गोष्ट त्यास बहुत जरूर. राणीचे हिमायतीनें[2] सिर्कें किलेयांचे तलासात लागले आहेत. सिर्कें याचे तर्फेने हजार पांचसे लोक जमा होऊन कोकणपटींत आमचे सरकारचे किले राजमाची व कोथला वगैरा व मोगलाई किले किले करनाला व गोरखा व वरघाटचे किले मोगलाई व आमचे सरकारचे याचे पिछास लागले आहेत. किले करनालेयास येक वेल फजीतहि पावले तऱ्ही ढंग सोडीत नाहीं. या प्रकारें चोरीनें दगाबाजीचे मनसुबेयावर आहेत. त्यांचे तर्फेने दगा जाला असला तर न कले. मोगलाई किलेयांचा बदोबस्त जो आहे तो आपण जाणतात. आमचे सरकारचे किलेयांची बंदोबस्ती व खबरदारी बहुत म्हणौनच सिर्कें यांचा उपाय चालत नाही म्हणौन सुचल्याप्रो जाबसाल केला. यावर खान बोलिले कीं सिर्कें याकडून किला घेतला असला तर त्याचा इलाज होईल. अमा[3] तुम्हाकडून हे गोष्ट जाली नसावी. सेवक बोलिलो कीं आमचे तर्फेने हे गोष्ट येकंदर जाली नाही. पुढें आपले अजमाईसीस येईल. यावर बोलिले की हे हकीकत रावसाहेबास लेहून जाब जलद आणवणें त्याजवरून हे वर्तमान सेवेसी विनंती केली आहे. येविसीं आज्ञा ते प्रमाण हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh reports to the Peshwa what had passed between him and Nasarjang regarding an attack on the fort of Avadha, which the Nawab attributed to the Peshwa in contravention of the terms of a treaty, but which the writer attributed to Shirke, supported as he was by the Senior Queen of Shahu.

---

१ शील ; जोर. २ वशिला, संरक्षण. ३ पण.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 32] [*After 21-10-1746*

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. नवाब नासरजंग रोजेयांस गेले. समागमें त्यांची मातुश्री बेगमहि गेली आहे. चौ रोजा माघारे फिरोन शहरास येतील. खानवालाशान सैदलस्करखान नासिकास आहेत. प्रस्तुतच शहरास जावयाची बोली नाहीं. नांदेडाहून हिरजुलाखान शहरास आले आहेत. त्यांची नवाबाची भेट जाली. नवाबहि येकदोन वेल त्याचे भेटीस गेले होते. खोजम कुलीखान नवाब आसफ-ज्याहाचे लस्करास रवाना होत आहेत. ये जागां सरकारचा रामचंद्र चोपदार आहे त्यास रोजमरा छ १६ सवालताा पावला. पुढें खर्चावयास पाहिजे. त्याचे खर्चाचे बेगमीची आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. शहरी प्रस्तुत जोंधले-सजगुरे दर रुपयास तेरा सेर पाड झाला आहे. तेल तीन सेर, तूप दोन सवादोन सेर, हरभरे साडेतीन सेर याप्रोा पाड जाला आहे. सेवेसी श्रृत व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे. सरकारची उंटे तिसगाव तर्फेस हणवंत टाकलीस चराईस आलीं आहेत. त्याजपौ दोन उंट चुकले याजकरितां सारवान तलाशास शहरीं आले. सेवकानें कोतवालास सांगोन शहरांत दौंडी पिटऊन ताकीद करविली आहे. सेवेसी श्रृत व्हावयाकरितां विनंति लिहिली आहे.

¶*A news-letter from Aurangabad mentioning, among other things, the departure of Nasarjang, with his mother, to Roza.*

No. 33] [*22-10-1746*

छ ४ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृता-नेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीने सेवकाचे वर्तमान ताा छ १७ माहे सवाल पावेतो मो शहरीं येथास्थित असे. स्वामीने कबुतरांचे फर्माइसीची याददास्त हुजुरून सेवकाबराबर देविली होती. स्वामीचे आज्ञेप्रो कबुतरांचे खरीदीविषई खान अजम सैदलस्करखान यांसी सांगितलें. खानानी आजपर्यंत तलाश करून कबुतरे मेलविली ती स्वामीचे सेवेसी रवाना केली आहेत. कबुतरजोडे यांची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
याददास्त अलाहिदा पाठविली आहे त्याजवरून सेवेसी विदित होईल. खान अजमानी स्वामीचे सेवेसी पत्र पारसी लखोटा दिला तोहि सेवेसी पाठविला आहे, प्रविष्ट होईल. कबुतराची किमत काये जाली म्हणौन खानास विचारिलें. याजवर खान बोलिले कीं, किमतीचा मजकूर काय आहें? आम्ही काही कबुतरे खरिदी केली नाहीं जागांजागांहून मेलऊन आणिली. तुम्ही किमतीचा मजकूर न करणें म्हणौन बोलिले. कबुतरें स्वामीचे सेवेसी निगेने प्रविष्ट जालीं पाहिजेत याजकरितां खान अजमानी गुलाममहमद कबुतरबाज शहरामध्यें तलास करून मेलऊन स्वामीचे सेवेसी रवाना केला आहे. कबुतरबाज कसबी आहे. रात्रौ कबुतरे उडवावयाची याजमध्यें विद्या आहे. खानांनी स्वमुखें कबुतरबाजाविषईं स्वामीचे सेवेसी बहुत प्रकारें ल्याहावयाविषई आज्ञा केली आहे. कबुतरबाज चाकर राहावयाचे उमेदीनें सेवेसी आला आहे. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना. कबुतरांचे रवानगीस लागवड खर्च सरकारपौ जाला. खाटा ३ येकूण रुा २। सवा दोन व जाले १ येकूण रुा १ येक व दोरिया २ यो च्यार पैसे व चौकामधोन सदरहू सामान खानाचे डेरयाजवल न्यावयास मजुरास मजुरी पांच पैसे येकूण दोरिया व मजुरी मिलोन रुा. ·।· येकूण साडे तीन रुा खर्च जाले आहेत. लागवड सामान सरकारांत लागेल. किंमत सिवराम नाइकाचे दुकानपौ घेतली आहे. सनद पाठवावयाची आज्ञा करावयास स्वाम समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh, from Aurangabad, writes to the Peshwa that some pigeons have been sent to the addressee under the care of an expert trainer.

No. 34] *[22-10-1746*

छ ४ जिलकाद

श्री

यादिदास्तः कबुतर जोडे श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी खान अजम सैदलस्करखान यानी शहर औरंगाबादेहून पाठविलीं. सुा सवा आर्बैन मियां व अलफ कबुतर जोडे ३३.

तपसीलः

किता जोडे सुमारः	किा जोडे सुमारः
२ वंडख बसराई	२ कासनी सिराजी
२ लला	२ जर्द सिराजी
२ काला तीर	२ लाल सिराजी
७ जोगिये	३ शाहा सिराजी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

२ शाहा जोगिये
२ जर्द जोगिया
३ लाल जोगिया
—
७
१ गंडेदार
० मुखी दुबार
—
१४

२ सबज सिराजी
२ अंबरी सिस्त्रु
२ शाहा सिस्त्रु
१ मुखी
१ बादल पोटिये
२ लालपोटिये
—
१९

जोडे सुमार,
३३.

येकूण जोड तेतीस रवाना बराबर गुलाम महमद कबुतरबाज व शाहाजी व संताजी जासूदजोडी सरकार, रवाना छ माहे सवाल.

कबुतर जोडे हुजरून फर्माइस[1] सांगितली होती जोडे सुमार ३२.

किा जोडे सुमार:
२ शाहा सिराजी
२ सबज सिराजी
२ लाल सिराजी
२ जर्द सिराजी
२ बब्रा सिराजी
२ कासनी सिराजी
२ काला तीर
—
१४
६ जोगिये
२ लाल जोगिये
२ शाहा जोगिये
२ जर्द जोगिये
—
६
—
२०

किा जोडे सुमार:
४ सिस्त्रु
२ सिस्त्रु लाल
२ शाहा सिस्त्रु
—
४
२ लालपोटिये
२ बंडख बसराई
२ लला
२ घेरणी
—
१२
२० क.
—
३२

१ मागणी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पैकी कमी, तलास करितां जोडे मिलाले नाहीं, साा कमी जोडे:

२ बब्रा सिराजी
२ लाल सिस्त्रु
२ घेरणी
—
८

बाकी जोड सुमार, २६

जाजती खानानी पाठविले जोडे :

२ अंबरी सिस्त्रु
१ मुखी
१ बादल पोटिये
१ लाल जोगिया
१ शाहा सिराजी
१ गंडेदार
—
७

जोड :

२६ फर्माइसपौ
७ जाजती
—
३३

येकूण तेतीस जोड सुमार.

¶*This is a descriptive list of pigeons, of different varieties, which were sent to the Peshwa from Aurangabad by Said Lashkarkhan.*

No. 35] [*3-11-1746*

श्री

श्रीमंत राचश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साां नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान ताा छ २९ सवाल पावेतो मो शहरीं येथाथिस्त असे. छ २७ मिनहूस विनंतीपत्रीं सविस्तर वर्तमान लेहून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विनंतीपत्रें व नवाब नासरजंगाची थैली यैसी सुकदेव चौपदाबराबराबर सेवेसी रवानगी केली आहे त्याजवरून वर्तमान विदित होईल. चाकणजुनरचे मजकुराबाबत खानास पत्र होते तें व सेवकाने सविस्तर अर्थ खानास अर्जी लेहून जासूद जोडी खानाकडे रवाना कली आहे. तेथोन जाबसाल घेऊन परभारे सेवेसी येतील. नवाबानें पत्राचा मुसविदा सेवकाचे विनंतीपत्राबाबत आपणाजवल ठेविला होता तो माघारा घेऊन फाडून टाकला. सेवेसी श्रुत होय. सेवकास खर्चावयाची आबाल बहुत आहे; कृपा करून बेगमी करावयास आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa is informed by Raghunath Ganesh that the letter regarding certain affairs pertaining to Chakan and Junnar, addressed to Said Lashkar-khan, has been transmitted to him.*

No. 36] [*After 13-11-1746*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-

प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. स्वामीचीं आज्ञापत्रें छ २७ सवालची बराबर जासूद जोडी छ १० जिलकादी तिसरे प्रहरीं प्रविष्ट जाली. स्वामीने सेवकास खर्चावयाची बेगमी करून सनद पाठविली ती पावली. वरकड विनंतीपत्रांचे जाबांत स्वामीने जे जे लिहिली ते सविस्तर विदित जाहाली. मेणाची मोहर करून दस्तक दिले या अर्थें स्वामीनें शब्द लाऊन आज्ञा केली ते सिरसा. सेवक पाईच्या नखापासोन डोईचा केशपर्यंत स्वामीचा अपराधी आहे. अपराध क्षमा करावयास व परवर्दा करावयास स्वामी समर्थ आहेत. मेणाची मोहर करून सेवकानें दस्तक दिल्हे त्याचा विचार तर सेवकानें सरकारची मोहर केली नाही व सरकारचे तरीकेयाचे दस्तकहि लिहिले आहे यैसे नाही. दस्तक लिहिलें तेहि दस्तक सरकार अजस्वारी राजश्री रघुनाथ गणेश वकील दिमत श्रीमंत राजश्री पंतप्रधान म्हणोन आपले नावाचें लिहिलें. त्यांत मजकूर लिहिला की, शहरीं गलेयाची गिरानी[1] बहुत जाली याजकरितां नवाब नासरजंगाही वणजारेयास दस्तके देऊन गला आणावयास पाठविला आहे, आम्हास दस्तक द्यावयाची आज्ञा केली त्याजवरून दस्तक दिले आहे, तर कोणेबाबे मुजाहिम न होणे

---

१ महागाई; दुष्काळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
म्हणौन दस्तक लिहिले व मोहर केली. त्यांत लिहिलें की श्रीसदाशिवचरणीं तत्पर रघुनाथ गणेश निरंतर याप्रो लेहून काम चालविले. येथे नवाब दस्तके वकिलाचे मोहरेनसी वकिलाची नावाची देवविताव त्याप्रो द्यावी लागतात. व मागाहून हा पथ चालत आला आहे. सेवकानें आपणाजवल मोहर नाहीं म्हणौन बोलिलेयानें नवाबास प्रमाण वाटणार नाहीं. हास्यास्पद आहे. बाजे वकील आहेत त्यांजवलोन नवाब हरकोणास रहदारीची दस्तकें देवितात ते आपले मोहरेनसी देतात त्याप्रो सेवक लोकी न दिलें तर कसे कार्या येईल? सेवकाचें दस्तक कोण्ही मान्य करील न करी हेंहि कलतच आहे. पुढेंहि हरकोणास रहदारीची दस्तकें देवितील व येक दस्तक नवाबाचे गुरू दिल्लीस गेले त्यांस राहदारीचे नवाबाचे आज्ञेप्रो द्यावे लागले. येथील विचार या प्रकारचा आहे. सेवक अपराधी खराच आहे. आज्ञा होईल तर आपले खासगत नावाची मोहर करून दस्तक देत जाईन. नाहीतर साफच नवाबास विनंती करीन कीं हुजूरचे आज्ञेसिवाय दस्तक देववत नाहीं. ये विषई आज्ञा ते सिरसा आहे. वणजारे यास दस्तक दिलें याचा अर्थ बेगमेस ठावका नव्हता. तें वर्तमान बेगमेस कळतांच वणजारेयास बोलाऊन ताकीद केली कीं नासरजंग लडका आहे, तुजला हासील माफ करून दस्तकें दिलीं, परंतु आपण हासील माफ करणार नाही. याजवरून वणजारा राहिला. गेला नाही. नासरजंगास अर्ज जाला परंतु त्यांचाहि उपाय चालिला नाहीं. सेवेसी श्रुत व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh explains to the Peshwa why he affixed his seal on a permit for corn-dealers to convey goods from place to place.*

No. 37] [*After 13-11-1746*

पा छ १४ जिल्हेज

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

कृतानेक विज्ञापना. नवाब नासरजंग खलबतामध्यें बोलत होते कीं, आम्हास नवाबसाहेबी पूर्वींच दर्शनास बोलाविलें होते. परंतु मध्ये किले आंवढे याचा मुकदमा येऊन पडिला, याजकरितां राहिलों व नवाबसाहेबीं मोकूफ केलें. आतां किला फते जाला याजकरितां जातों. नवाबसाहेबीहि जलद बोलाविलें. पुढें नवाबसाहेब आम्हास शहरीं ठेवणार. आजपावेतों आम्हास शहरीं ठेविले होते ते

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आमची अजमाईस पाहिली कीं, यांचें चलण कसें आहे. त्यास आम्ही नवाबाचे हुकुमाप्रों वर्तणूक केली. याजवरून नवाबसाहेबांची खातीरनिशा जाली. आतां नवाबसाहेब आम्हांस शहरीं ठेऊन तमाम येख्तियार देणार यैसे आहे. परंतु आपणास येक संदेह प्राप्त जाला आहे कीं, आम्ही शहरीं राहिलियानें रावजीचा आमचा श्नेह कसा चालेल ? रावजीचे अमलदार शोखी करावयास चुकणार नाहीं. तेव्हां आम्ही बहुत बुरे आदमी आहों, तेव्हां पारपत्यास चुकणार नाही. येणेकरून श्नेहांत विक्षेप होईल. वरकड आमचे चलण बहुत रास्ती आहे व श्नेहहि च्याहतों. परंतु कृत्रिम सोसणार नाहीं. याचा बंदोबस्त जालियानें आम्ही सर्व प्रकारें राजजीचे आहो व तेहि आमचे आहेत. या गोष्टी तुम्हाजवल बोलिलो. रावजीस न लिहिणें. पुढें तुम्हास रावजीजवल रवाना करूं तेव्हां रुबरू सांगावयास सांगों त्याप्रो सांगोन निशा करणें. आम्ही तुम्हास आपली वकीली मुकरर केली. तुमची सर्व सरंजामी करू व रावजीस लेहून करऊ म्हणोन कितेक प्रकारें बोलिले. सेवकानें जाव दिला कीं, रावसाहेबांचें चलण बहुत रास्त आहे. गैररास्तीचे रवांदार[1] नाहीं. आपले व रावसाहेबांचे श्नेहांत कधी विक्षेप येणार नाही रावसाहेब साहेबाजवलोन पेस्तर उमदे उमदे मनसब्याची बहुत उमेद राखत आहेत. याजवरून संतोष पावले. जालें वर्तमान सेवेसी विदित व्हावयाकरितां सेवेसी विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports to the Peshwa that Nasarjang, in an interview with him, expressed very friendly sentiments towards the addressee and also revealed the Nizam's intention of entrusting him (Nasarjang) with supreme power.*

No. 38] [*16-11-1746*

श्री

श्रीमंत राजश्री पंत-

प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीकडून सेवकाचे वर्तमान ता। छ १३ माहे जिल्काद पावेतो मो। शहरी येथास्थित असे. स्वामीचे आज्ञापत्र छ २७ माहे

---

१ अनुमोदक.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सवालचे बराबर उदेराज चोपदार सादर जालें तें छ १२ जिलकादीं संध्याकाळचा दोन घटिका दिवस असतां पावले. चोपदार मजकुर हुजरून आला तो परभाराच खानवालाशान अजम सैदलस्करखान यांजकडे सिनरास जाऊन खानाचा जाब घेऊन सेवकाजवल येऊन आज्ञापत्र प्रविष्ट केलें. किले आवढे याचे मजकुरांत तपसिलें स्वामीनें आज्ञा केली. सविस्तर विदित जाली. किले माार खान अजमानी घेतला ते वर्तमान छ ११ मिनहूस सविस्तर विनती पत्रीं लेहून बराबर कान्होजी व धर्मोजी जासूद नाईकी जोत्याजी नाईक हुजूर रवानगी केली ते विनंतीपत्र प्रविष्ट जालेयावर सविस्तर अर्थ विदित होईल. छ ८ जिलकादी किला घेतला. छ ९ तेरिखेस खानानी नवाबास अर्जी लेहून प्रातःकाली युजाबषी (?) याची रवानगी केली तो छ १० जिलकादी प्रातःकालचे प्रहर दिवसास शहरी नवाबाजवळ दाखल जाला. नवाबानें त्यास वस्त्रें दिलीं व तेच क्षणी नवाब आसफज्याहास अर्जी लेहून सि * * स्वार रवाना केला हे वर्तमान पूर्वील विनंतीपत्री (लि)हिलेंच आहे. प्रस्तुत खान अजम नाशकास गेले आहेत. तेथून अविलंबेच शहरासहि येतील. महमद हुसैनखान पातशाही दिवाण नवाबाचे लस्कराहून शहरास आले होते. येथून पुन्हा लस्करास जावयाचे उद्देशें उडलगाव, शहराहून दाहा बारा कोश, तेथे जाऊन काहीक दिवस राहिले होते तेथोन मागती शहरास आले. येऊन च्यार पांच दिवस जाले. मागती लस्करास जावयास निघाले. डेरे जसवंताचे तलेयावर केले. सेखअली जुनेदी वगैरा काही लोक बराबर लस्करास जात आहेत. येका दो रोजात जातील. नवाब आसफज्याह यांस शरीरी अस्वस्थ आहे म्हणौन आवाई शहरात बहुत आहे. आवाई खबर, सत्यमिथ्य न कले. लोक म्हणतात नवाब हैदराबादेस असतां व्यथा प्राप्त जालियावर कोटांतच बहुत दिवस होते. त्यावर येका (फाटले)ला कीं, शहरात शुहरत[1] जबून जाली. हे वर्तमान आइकोन नवाबानें घोडेयाची स्वारी तयार करविली. स्वा(र) होते समई देहधर्म जाला. तेणेकरून वस्त्रें भरली मग नवाब श्नान करून पुन्हा घोडेयावर बसोन गोसे महालास आले. अद्याप गोसे माहालांत आहेत. पायास शोफा[2] आहे. हे येक वर्तमान नवाबाने येथे बेगमेस पत्र पाठविलें कीं आम्ही आखैर जिलकाद शहरास येतों. सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports the movements of Said Lashkarkhan subsequent to the capture of the fort of Avadha, and incidentally refers to the illness of the Nizam.*

---

१ शोहरत=आवई ; प्रसिद्धि. २ सूज.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 39] [*26-11-1746*

श्री

श्रीमंत राजश्री पंत-

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान ता॥ छ २३ माहे जिलकादपावेतों मो॥ शहरीं येथास्थित असे. खानवालाशान सैदलस्करखान याहीं घेरणी कबुतरें जोड २ दोन येकूण पक्षी च्यार मिरजा अमानुला बेग याजवलोन देविले ते मिरजा मजकुरानें सेवकाचे हवालीं केले ते रवाना बराबर जावजी कमलोजी व विसाजी नलवडा जासूद सेवेसी पाठविलीं आहेत. त्यांस लागवड खर्च व पोटगी खर्चास रु॥ १ येक सिवराम गोविंद भिडे याजवलोन घेऊन जासुदांजवल दिला आहे. त्याजपौ खर्च होईल तो हिसेब जासूद सेवेसी विदित करितील. पूर्वी कबुतरें हजूर पाठविलीं ते जासूद कबुतरें प्रविष्ट करून माघारे आले. परंतु कबुतरें पावलियाचा जाब सेवकास सादर जाला नाहीं. ते समई रवानगीस लागवड खर्च रु॥ ३॥ साडे तीन जाला त्याचा जाब पाठवावयाची आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. नवाब आसफज्याह माटीची गडी रेणापुरापलीकडे आठां कोशांवर आहे तेथें आले आहेत. नवाब नासरजंगासहि बोलाविले आहे. हेहि जात आहेत. त्यांच्या याच्या भेटी धारूरावर होणार म्हणौन वर्तमान आहे. सेवेसी श्रुत व्हावयाकरितां सेवेसी विनंती लिहिली आहे. श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh informs the Peshwa that two pairs of pigeons have been sent to him with two messengers. The writer also reports that Nasarjang has been summoned by the Nizam and that they will shortly meet, probably at Dharur.*

No. 40] [*11-12-1746*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीने सेवकाचें वर्तमान ता॥ छ ९ जिल्हेज-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
पावेतो येथास्थित असे. नवाब नासरजंग शहरीहून रवाना जालियाचें व सेवकाचे समागमें बोलाविलेयाचें वर्तमान वगैरा सविस्तर छ ७ जिल्हेजी विनंती-पत्रीं लेहून मुजरद अजुरदाराबराबर सेवेसी रवानगी केली तीं पत्रें प्रविष्ट होऊन वर्तमान विदित जाहाले असेल. सेवकहि रवानगीस साहित्य राहुटी वगैरा सिध्ध करून आजच स्वार होऊन नवाबाचे लस्करास रवाना जाहालों. राहुटीचे वोझे-यास बैल भाडेयाचा करितां अनकूल न पडे याजकरितां येक बैल विकत घेतला. राहुटी वगैरा खर्चाची याददास्त अलाहिदा सेवेसी पाठविली आहे त्याजवरून विदित होईल. नवाब नासरजंगाही सेवेसी पत्र लिहिले होते ते थैली काल सेवका-जवल आली ते सेवसी पाठविली आहे त्याजवरून विदित होईल. सेवकाबराबर दोघे पोरगे आहेत, तेहि अजारी आहेत तैसेच समागमे घेऊन रवाना जालो. नवे ठेवावे तर अवकाश नाही. सेवेसी विदित व्हावयाकारितां विनंती लिहिली आहे. नवाब नासरजंगास नवाब आसफज्या हा अरकाट प्रांते रवाना करणार म्हणौन शहरांत आवाई दाट आहे. सुलतानजी निंबालकरावर येतराजी नवाबाची बहुत आहे म्हणौन लोक बोलतात. खानवालाशान सैदलस्करखान यांस स्वामीने पत्र पाठविलें तें पावलें. खानमारनिलेकडे रवाना करितो. सेवेसी श्रृत जालें पाहिजे. सेवकासमागमे जासूदजोडा येक व चोपदार आहे त्यांस खर्चास द्यावयाची आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना. खानाचा लखोटा खानाचे माणसाबराबर नासकास खानाकडे आजच रवाना केला. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh informs the Peshwa that he has started to join the camp of Nasarjang who had left Aurangabad a couple of days before.*

No. 41] [*Jan. 1747*

श्री

रकारपूर्वक मन्हाष्ट्र यांचे चिती आहे कीं, भाग्यनगरी जो पावेतो लोक गोला होत तोवर आपन फौजबंदी करूण जाऊन पोचावे. जैसा आपल्यासी दगा केला तैसा करावा. सांप्रत तीन सहस्र अश्वारूढ आहेत. यैसे वर्तमान त्यांचे येथे आले. आपन हरकारे पाठविले होते कीं, जागीर देतो, कोन्ही पाठवने. यैसि-यास यांचा विचार यैसा आहे. आपनास सूचना असावी म्हणून विनंती लिहिली असे. बहुत काये लिा हे विनंती.

¶*An informer writes of the hostile activities of Raghuji Bhonsle.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 42] [*11-1-1747*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीच्या कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान ताा छ १० माहे मोहरम पावेतो मो लस्कर नवाब आसवज्याहा येथास्थित असे. स्वामींची आज्ञापत्रें छ १८ जिल्हेजची बरावर अजुरदार सादर जालीं तीं छ ७ मोहरमीं दोन प्रहरां प्रविष्ट जाली. नवाब नासरजंगास थैली होती ते पावली. छ ८ मिनहूस खलबतामध्यें नवाबाची भेट घेऊन थैली गुजरानली. यावर बहुत संतोष पावोन पत्र स्वयेंच वाचून पाहिलें. यावर बोलिले की, तुम्हास काय लिहिले आहे ते विदित करणे. सेवकाने आज्ञापत्राप्रमाणें मजकूर सविस्तर मुखवचनेच निवेदन केला. यावर बोलिले कीं रकारपूर्वकाने नवाबाचे खजमतेस [१]रिफाकत केली असतांहि आम्ही रावजीची मर्जी जाणोन नवाबास कैयेक तऱ्हा समजाऊन तंबीची पैरवी केली. नवाब तंबी करावयाचे बाबे मुतवजे होऊन आमचे कनिष्ठ बंधु निजामअली खान बाहादर असदजंग याजबरावर माहाराव जानोजी निंबालकर व खोजम कुलीखान व सेखअलीखान जुनैदी वगैरे हिसाबदार व बाण व रहकले जजाला यैसी फौज दाहा हजार देऊन रवानगी केली. [२]इनशालाहुतआला थोड-केच रोजांत रकारनामक [३]वाकई तंबी पोंहचेल. राजेयाहीं बकारपूर्वकास खलअत व कर्नाटकच्या सनदा देऊन रुखसत केले यावरून अपूर्व वाटले की, रावजीने या गोष्टीचा विचार राजे याजवलोन कांहीच करून घेतला नाही, हैफ आहे. सेवकानें उतर केले की, बकारा ज्याहील बहुत सतेतालीस फाके केले याजबदल राजे नाखूष होत्सातेंहि येगमाज करून ब्रह्महत्येचा संकोच धरून रजा दिली. परंतु याची पैरवी होणे हे गोष्ट आपणापासोनच होईल. त्याजवरून बोलिले कीं बकारे याने कदाचित सिर उ...(पुढील दोन ओळी मजकूर फाटण्यांत गेला आहे) हुशारी जालीच आहे..... .....प्रो तुम्ही रावजीस लेहून पाठवणे व स्वामीचे पत्राचे (प्र)त्योतराचा मुसविदा स्वहस्तेकरून सेवकास स्वमुखे वाचऊन दाखऊन मुनसीजवळ देऊन आज्ञा केली कीं, याप्रमाणे खत तयार करून रवानगीस देणे. व नवाब बोलिले कीं आम्हास शरीरीं सावकाश नाहीं. निरंतर व्यथा होते. आज जुलाब घेतला आहे आण कस्त मेहनत या प्रकारची करितों. आम्हास आरोग्य होय तो विचार रावजीने करावा. हिंदूधर्मामध्ये ब्राह्मण श्रेष्ठ

---

१ स्नेह. २ सर्वश्रेष्ठ प्रभु इच्छील तर. ३ योग्य.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहेत. राव ब्राह्मण आहेत त्यानीं आमचे हकामध्यें श्रीसेवेस दुवा केलियाने त्याची दुवा कबूल होऊन आम्हास सद्य आरोग्य होईल व यासिवाय ब्राह्मण लोकां मोठे मोठे पंडित खुदाई लोक व मुसलमान लोकहि असतील त्यांसहि सांगोन आमचे हकामध्यें दुवा करवावी कीं आम्हास आरोग्य हो, याज प्रों तुम्ही रावजीस जरूर लेहून पाठवणें. तुम्ही लेहून पाठवाल हे गोष्ट रावजीचे प्रत्योत्तरीं आमचे प्रत्ययास आली म्हणजे तुम्ही लिहिलेंत या गोष्टीचा आम्हास इतबार येईल म्हणौन बहुत प्रकारें बोलिलें. ते गोष्ट सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवकानें पुसिले कीं, आपलेहि स्वारीची तयारी जाली आहे. खासा स्वारी कोणे तर्फेस मुतवजे होतील ते गोष्ट रावसाहेबांचे खजमतेस ल्याहावी लागेल. याजवर बोलिले कीं, तयारी जाली आहे, परंतु तूर्त रवानगी मौकूफ आहे. आम्ही नवाबसाहेबांचे रिकाबेत आहो. पेस्तर रुबकार मनसुबा जाणोन तुम्हास आज्ञा करणें ते केली जाईल म्हणौन बोलिले ते वर्तमान सेवेमध्ये विदित व्हावयाकरितां विनंती केली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports to the Peshwa the substance of a conversation that took place between himself and Nasarjang regarding the plan for check-mating the activities of Raghuji Bhonsle by the Nizam, and the appointment of Babuji Naik to the Karnatak by King Shahu.*

No. 43] [*11-1-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. निजामअलीखान बाहादर असदजंग यांस रघूजी भोसले यांवर पाठवावयाकरितां फौजसुधा वेगले केले. परंतु अद्याप कूच करून गेले नाहीं. आजचा दिवस दबेथांचा आहे. उदैक नवाबांचें व त्यांचें कूच बराबरच होईल यैसें दिसतें. असदजंगास रवाना करितेसमईं नवाबानें नासरजंगांकडे पाठविले. त्यांजवलोन वस्त्रपरिधान व शस्त्रधारण करून ताकीद करविली. सेवेसी विदित जालें पाहिजे. रघूजी भोसले यांकडील वकील देवराव कालच लस्करास आले. त्यांस पालखीचा सरंजाम रघूजीबावानीं दिला आहे. असद-जंगाबराबर फौज सातेक हजार दिली आहे. छ ७ मोहरमीं नवाब नासरजंग यानी सेवकास आज्ञा केली कीं, नेवासें वैजापूर परगणेयांत कितेकां गावचा पैका तुमचे आमील वाजिबी वसूल देत नाही. जमाबंदी येक, आण वसूल देतात येक. याजकरितां तुम्ही तजवीज लेहून आमीलांस ताकीद होऊन वाजिबी वसूल

---

१ संबंधीं.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

देत करणें म्हणौन आज्ञा केली व हरदो परगणेयांचे गावगनाचे फर्द तीन सेवेसी पाठवावयाकरितां दिले ते सेवेसी पाठविले आहेत त्याजवरून विदित होईल. त्या फर्दाचा मजकूर मनास आणून आमीलांस ताकीदपत्र पाठवावयाची आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. छ ७ मोहरमीं नवाब नासरजंगांही सेवकास मेवा, दालिंबे सात व साखरनिंबें पाच व नारिंगें सात, येकूण दागिने येकूणीस, पाठविले. येक रुपया इनाम द्यावा लागला. नासरजंगाही दोन थैलिया सेवेसी पाठवावयाकरितां दिल्या. त्यात, येक नेवासें वैजापूरचें मजकुरांत व येक थैली स्वामीनें अजुरदारा (वरा)वर थैली पाठविली त्याचे जाबांत, यैशा दोन थैलिया दिल्या त्या सरकारची जासूद जोडी नासरजंगांकडे परभारी आली होती त्याजबराबर सेवेसी पाठविल्या आहेत. सेवेसी प्रविष्ट होतील. सेवकानें (शहरीं ?) हून अजुरदार हुजूर पाठविला होता. त्याची रवानगी * * * जाली. तो परभारा शहरास गेला. (फाटले) राजश्री शिवराम नाईक भिडे यानी दुसरा अजुरदार करून * * चे आज्ञापत्रांचा लखोटा व नासरजंगांची थैली यैसी सेवकाकडे पाठविली. त्यास काय अजुरा दिला हें लिहिलें नाहीं. मोघम लिहिलें आहे कीं, तुम्हाजवल कधी पावला तें लिहिणें. त्याप्रों अजुरा होईल तो तुमचे नावें लिहितों म्हणोन लिहिलें आहे. सेवेसी श्रुत होय. सेवकास ये जागां खर्चावयाकरितां बहुत आबाल जाली. राजश्री बगाजीपंत परामर्ष करितात परंतु तैशानें निर्वाह होणार नाहीं. स्वामीनें कृपालु होऊन सेवकाची खर्चाची बेगमी करावयाची आज्ञा केली पाहिजे. नवाबाचे लस्करांत माहागाई बहुत आहे याजकरितां विनंती लिहिली आहे. आणीकहि कितेका गोष्टीनें सेवकाची आबाल आहे. पुढें सेवकाचें ऊर्जित करावयास व परवर्दा करावयास स्वामी समर्थ आहेत. नवाब कासेगावप्रांती येणार कीं काय हें तहकीक करून लिहिणें म्हणौन आज्ञा. यैशास, त्या प्रांते नवाब येतात यैसा विचार प्रस्तुत दिसत नाही. यास कारण हेंच की, असदजंग बफौज रघूजीबावावर रवाना केले त्याचे कुमकेवर माघारें नवाबास राहावेंच लागेल व बाबूजी नाईक बारामतीस आले त्यांचा विचार कसा होतो हाहि नवाब मनास आणतील तदनुरूप वर्तणूक करितील असें दिसतें. वरकड नवाबाचा मनसुबा अगम्य; कोणास कलतो असें नाही. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिा आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports to the Peshwa that an army, numbering about 7,000 under the command of Asadjang, has been mobilized, and will shortly start on its march against Raghuji Bhonsle. The writer also asks for funds for his expenses.*

3033

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 44] [*1-2-1747*

पा छ ९ सफर

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार. कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपाअवलोकनेकरून सेवकाचे वर्तमान ता छ २ माहे सफर पावेतो मो लस्कर नवाब आसफज्याह येथास्थित असे. छ २२ मोहरमी मुजरद जासूदजोडीबराबर विनंतीपत्र सेवेसी पाठविले आहे ते प्रविष्ट जालियावर सविस्तर वर्तमान सेवेसी विदित होईल. त्यानंतर नवाब आसफज्याह दरकूच नलदुर्गास आले. छ २४ मोहरमी नलदुर्गास मुकाम झाला. छ २५ मोहरमी नवाब खासा व नवाब नासरजंग यैसे नलदुर्गचे किलेयात किला पाहावयास गेले. लस्करचे कूच जाले. समीपच येका कोशावर मुकाम जाले. नवाब उभयता किला पाहोन रात्रौ लस्करदाखल झाले. छ २६ मोहरमी मुकामच जाला. ते दिवसी कासीमखान वगैरे यांस नवाबाने किला पाहावयास पाठविलें होतें. ते किला पाहोन आले नंतर दुसरे दिवसीं कूच केला. दरकूच छ ३० मोहरम ता कलबुरगेया-समीप पांच कोशाचे अंतरायानें मुकामास आले. छ १ सफरी खासा नवाब व नवाब नासरजंग यैसे सडे स्वारीनसी कलबुरगेयास पिरांचे दर्शनास गेले. तमाम बाहीर मुकामावरच राहिली. कृष्णाजी रघुनाथ बाबूजी नाईकाकडील वकील अरका-टास होता तो प्रस्तुत अरकाटाहून लस्करांत आला. येऊन पांच सा दिवस जाहाले. छ ३० मोहरमीं कासीमखानाचे मारफतीनें नवाबाची मुलाजमत जाली. अरकाटास तीन लाख रुा गुदस्ता नवाबानें देवविले त्याजपौ दीड लाख रुा वसूल आले म्हणोन बोलत होता. सत्य यिथ्य कलत नाही. रघूजी भोसलेयानें फौज आपले पुत्राबराबर देऊन मकसदाबादेस रवानगी केली. आपण खुद सासातेकशें स्वारानशी नागपुरास गेले. निजामअलीखान बाहादर असदजंग बफौज नवाबानें रघूजी भोसलेयावर रवाना केले होते ते माहोरप्रांते आहेत. अद्याप माघारे नवाबानें बोलाविले नाही. सेवेसी श्रुत व्हावयाकारितां विनंती लिा आहे. नवाब छ १ सफरी सडे स्वारीनसी कलबुरगेयांस राहिले. आजहि कलबुरगेयासच मुकाम आहे हे विज्ञापना.

¶The movements of the Nizam and Nasarjang, their halt at Naldurg and an interview between the Nizam and the Vakil of Babuji Naik are communicated to the Peshwa by his news-agent Raghunath Ganesh.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 45] [*7-2-1747*

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान तां छ ८ माहे सफरपावेतों प्रों लस्कर नवाब आसफज्याह पेरोजाबाद भीमातीर येथास्थित असे. नवाब आसफज्याह दरकूच जात आहेत. तीन रोज कलबुरगेयास मुकाम होता. तेथून दरकूच काल या मुकामास आले. आजहि कूच आहे. हिदायत मोहीदीनखान हुनगुदेयासी कजिया करीत होते. तो कजिया फैसल झाला. किती पैका घेतला हे कलले नाहीं. प्रस्तुत कृष्णातीरीं मरलीवर आहेत. रुस्तुमराव पांडरे यांचा लेक बिदराजवल आहे. त्याणें गनिमाई अमल ललोयाजी (लक्याजी?) पांढरे याजवलोन केला म्हणोन नवाबास अर्ज जाला याजवरून नवाब येतराज होऊन रुस्तुमराव यास बोलिले कीं, तुम्ही सरकारी नौकर असतां तुमचा बेटा गनिमाई अमल करितो हे गोष्ट बेज्या[1] आहे. तर तुम्ही जाऊन बेटेयास माकूल करून सांगोन हुजूर घेऊन येणे. यैसें सांगोन रुस्तुमरायास रुसकत केलें. रुस्तुमराव छ ७ सफरी लस्करांतोन निघोन बिदराकडे गेले. वरकड वर्तमान येथास्थित असे. बाबूजी नाईक अद्याप सातारेयास आहेत. पारणे केले नाहीं. पारणें करावें, राजश्री स्वामीची मेजवानी करावी, मग निघावें. आबाजी नाईक जूज[2] फौजेनसी निरानरसींपुरास आले म्हणौन मारनिलेचे वकील बालमुकुंद यानी नवाबास अर्ज केला. सेवेसी विदित झाले पाहिजे. नवाब नासरजंगाचे विचारें सेवकास हुजूर स्वामीचे सेवेसी पाठवावेसे होते. रा बनाजी माधवराव यास हुजरून नवाब नासरजंगाकडे पाठवावयाचा विचार होता. सेवकासही पूर्वी आज्ञापत्रीं आज्ञा आली होती त्याप्रो नवाबास विदित केले त्याजवरून मौकूफ केलें. प्रस्तुत नवाबाची प्रकृत बरी आहे. दरकुचांत हतीवर स्वारी होत नाही. पालखीत बैसतात. नवाब नासरजंग नवाबासमागमें श्रम बहुत करितात. नवाब मजलीनें जातां कधीं सिकार करितात तेव्हां नासरजंग घोडेयावर स्वारी करितात. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिा आहे. सेवकाबराबर तैनाती जासूदजोडिया तीन होत्या त्यापौ येक जोडी हुजरून राजश्री बगाजी यादव यांजकडे दिली. येक जोडी सेवकानें हुजूर रा केली. येक राहिली त्याजपौ येक जासूद आजारी पडिला तो हुजूर पाठविला

---

१ गैर. २ जूज= जुजबी; किरकोळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
आसे. येक जासूद समागमे आहे. सेवेसी शृत होय. चोपदारास खर्चास छ १ जिल्हेजपर्यंत पावले. पुढे त्याची बेगमी करावयाची आज्ञा करावयास स्वाम धणी आहेत. हे विज्ञापना.

¶*The settlement of the affair of Hidayat Mohidinkhan, the despatch of Rustumrao Pandhare by the Nizam to stop the disturbance created by his son, and the movements of both Babuji and Abaji Naik are communicated to the Peshwa by his Vakil Raghunath Ganesh.*

No. 46] [*16-3-1747*

पा छ २४ रबिलौवल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन सा नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान ता छ १५ रबिलावलपावेतों मो लस्कर नवाब आसफजाह समीप वाघणगिरा येथास्थित असे. छ १२ रबिलवली राजश्री बाबूजी नाइकाही नवाबाची मुलाजमत केली. भेटीचे रहस्य गुदस्तांप्रों न जालें. नवाबाची मर्जी, गुदस्तांची बाकी अरकाटपौ व कडपे कर्नोल अदोनीकराकडील झाडून द्यावी. सालमारचा यैवज तनखा करून द्यावा. परंतु नाइकानी पैका घेऊन माघारें सातारेयास जावें. नाईकांची मर्जी कीं, नवाबाजवलोन पैका घेऊन पश्चात मुलकांत जावे. हरपनहली, चितलदुर्ग देवदुर्ग प्रांते जावे. पुढें चंदावराकडेहि जावें. येनदा छावणी करावी, परंतु पैका मबलगा मेलवावा, कर्ज फेडावें, सरकारचा यैवज द्यावा, फौजेची समजावीस करून आपणहि खबरदार व्हावा, इतुका उद्योग योजिला आहे. हे मर्जी नवाबास अनकूल पडत नाहीं याजमुळें हर्षामर्ष आरंभला आहे. नवाब नासरजंग नाइ(काकडे) जाबसालांत आहेत. त्यांची नाईकाची बोली छ (फाटले) रोजी बहुत जाली. नासरजंग नाखूश जाले. नाईकानी दुराग्रहावर घातलें. पुढें होईल वर्तमान ते सविस्तर सेवेसी विनंती लेहून पाठवितों. राजश्री बगाजीपंती विषदें विनंती सेवेसी लिहिली आहे त्याजवरून विदित होईल. नेवासे, वैजापूर येथील ताकीद चितायोग्य न झाली म्हणौन नासरजंग श्रमी आहेत. मालवेयांतील फौजा काय म्हणौन बोलाविल्या व श्रीमंत भाऊ स्वामीसमागमें फौज किती आहे म्हणौन बगाजीपंतास सेवकासमक्ष पृच्छा केली. यानीं फौज वीस हजार सांगितली ते त्यांचे प्रत्ययास न आली. दहा हजार आहे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

म्हणौन बोलिले. व फौजा सहजवृतीनें बोलाविल्या म्हणोन सांगतां प्रमाण वाटलें नाहीं. बोलिले कीं, फौजा आणावयाचें कारण हेंच कीं, रावजीस राजे आज्ञा देत नाहीं. राजे बहुत नाखूश आहेत. याजकरितां फौजा आणविल्या. त्याचे समजासीचा बहाना करून राव पुणियांस जाणार. सारांश, यांस स्वामीचे प्रतापाचा उत्कर्ष साहत नाहीं. सविस्तर बगाजीपंती लिहिलें म्हणौन सेवकानें विनंती संक्षेपें केली आहे. हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh gives an account of the negotiations going on between Babuji Naik and the Nizam. Babuji Naik, he reports, proposes to lead a campaign in the Karnatak and make money out of it while the Nizam desires he should go back to Satara without advancing any further into that province.

No. 47] [पौ *27-3-1747*

पौ छ २६ रावल

शुक्रवार दीड प्रहर दिवस

श्री

सेवेसी विज्ञापना. येमाजीपंती नवाबाचे लस्करचे वर्तमान सांगितले कीं, नाईकाची भेटी होऊन तीन दिवस लस्करानजीक बारावे तेरिखेस नाईकास निरोप झाला. नवाबाचे कूच सतरावे तेरिखेस होणार. तालकोट परगणियात आहेत. बागडकोटास जाऊन ते ठाणे घ्यावे. तेथून सावनूरकरावर जाऊन बंकापुरचा किला घ्यावा हे मसलत आहे. नवाबानी सावनूरकरास बोलावणें पाठविले होते. त्यांणी दोनचार मुदें सांगोन पाठविले आहेत. नासरजंगास औरंगाबादेस पाठवणार इतकें म्हणताच राजश्रीनी भाषण केले की, आमचे मूल तिकडे गेले आहें त्यावर जाणार की काये? येमाजीपंतानी जाब दिल्हा, भाऊवर शेह द्यावा हाहि विचार आहे. सावनूरकरावरी गेला म्हणजे अनयासेच जालें. नाईक निरोप घेऊन कोण्हीकडे जाणार म्हणोन राजश्रीनी आज्ञा केली. येमाजीपंती सांगितले की, सिरेयाचे सुभ्यात चित्रदुर्ग, रायेदुर्ग, हरपनहली या प्रांताकडे जातील; म्हणताच बोलले, 'पाहावे कसे कसे होईल.' त्याउपरी आम्हास आज्ञा केली कीं, तुम्ही लौकर जाऊन आपला सालजाब करा म्हणजे कर्जावामाचा वरकड थोर कारभार आहे तो पर्यायेपर्यायें होईल. आम्ही उतर केले की, माहाराजानी मात्र कायेम असावें म्हणजेच सारेच ठिकाणी लागोन बंदोबस्त उतम रीतीचा होईल. इतकें होताच भोजनास थोरले वाडियात जावयास उठलें. मग आम्ही येमाजीपंत हात धरून बाहेर पालखीचे जागेयावरी उभे राहिलों. त्याणी वर्तमान सांगितले, नाईकास लक्ष रुपये मात्र

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
रोख दिल्हें. सा लक्षावर मामलत चुकविली. त्यात नासरजंगानी लक्ष रुपये घेतलें. सावनुरावर येऊन भाऊवर शेह द्यावासा त्याचा परिछिन्न विचार आहे. नाईकाची बुधि तर कलतच आहे. तुंगभद्रेपलीकडे जाऊ म्हणतात. परंतु अलीकडूनच होयीलसे दिसतें. राजश्री पंतप्रधान यांजकडून (काही) वर्तमान आले असेल. तुकोपंत पैक्याची वरात घेऊन भागानगरास गेलें. कारकून तेथे आहे. त्याणी पत्र लिहिले आहे. श्रीमंतास आपणहि चिठी पाठविली आहे की, नवाबाकडील वर्तमान स्वामीस येणे ते आलेच असेल. याप्रो जाला अर्थ लिहिला आहे. मग येमाजीपंतानी काये लिहिले असेल ते स्वामीस विदित जालेच असेल. दुसरे, राजश्री स्वामीनी तिसरे प्रहरी आम्हास पुसिले की, प्रधानपंताचे पुत्रास देवी निघाल्या म्हणोन ऐकतो; खरे की काये? आम्ही उतर केलें, लिहिले काही आम्हास आले नाहीं. पुत्र किती आहेत म्हणोन विचारिले. आम्ही जाब दिल्हा, दोन आहेत. वडील सिमध्यात सदरेस आणिलें होते तें व त्याहून धाकटे दुसरे आहेत. मग उगेच राहिलें. सेवेसी विदित व्हावें म्हणोन लिहिलें असे हे विज्ञापना.

¶*Govind Khanderao Chitnis communicates to the Peshwa activities of the Nizam, Babuji Naik and Sadashivrao Bhau in the Karnatak.*

No. 48] [*1-4-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. नवाब नासरजंगानी सेवकास आपणाबराबर घेतलें. प्रस्तुत चाकरीचे दिवस. आज्ञा मागतां न ये. समागमें जावेंच लागले. सेवक सर्वा गोष्टीने बेसरंजाम. स्वारीस घोडे आहे तेहि धडधडीत नाहीं. जीन तो अगदी गलोन गेला. समागमे चोपदार व येक जासूदजोडा व दोघे पोरगे आहेत तेहि विदेशीचे. जाणें प्राप्त. त्याहीमध्यें पर्जन्यकाल समीप आला यास्तव श्रमी आहेत. नित्य उठोन हुजूर जावयाकरितां सेवकाजवल निरोप मागतात. पोरगे आहेत ते आपले घरीं जाऊ म्हणतात. आमच्यानें छावणीस येववत नाहीं म्हणौन नित्य कजिया करितात. नवे चाकर ठेवावे तर हा विदेश. येथील भाषा उमजत नाहीं. खर्चावयास स्वामीनें रुा तीनसें देवविले ते हुंडीपत्र आवरंगाबादेस पाठविले. तेथोन हुंडी आली. नवाबाचे लस्करांत महर्गता बहुत, यास्तव खर्च जाजती लागतो. ताा आखेर जिल्हेज उर्फ पौष मास खर्चाचा हिसेब हुजूर

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पाठविला होता त्याजवरून तीन शत रुपये स्वामीने देवविले. यैशास ज्ञा मोहरम ताा अखेर रबिलवल तीन महिने जाले. दर माहा साठ बासष्ट रुपये खर्च लागतो. तीन महिनेयांत येकसें पंच्याइसी रुा स्वारीखर्च जाला. यासिवाय नासरजंगाचे शागीर्दपेशाचा किरकोल खर्च व समागमे जासूद चोपदार आहेत यांस द्यावें लागतें हें वेगले. नासरजंगाचे लस्करांत महर्गता बहुत आहे. नासरजंगाजवल मागावें तर स्वरूप नव्हे. यैशाप्रकारें संकोच प्राप्त आहे. प्रस्तुत आजपासोन पर्जन्यास दोन मास आहेत. येका महिनेयात नासरजंगाचे जाणे कोठपर्यंत होतें, काय करितात, हा निर्गम होतच आहे. पुढें छावणीचा विचार होईल. मग सेवकानें यांजबराबर राहावें यैसे नाहीं. आज्ञा मागोन सेवेसी यावें लागेल. याजकरितां कृपाळु होऊन येक पत्र सेवकास निरोप द्यावयाविषई पाठवावयास आज्ञा जाली म्हणजे सेवक हुजूर येईन. कागदी जाऊन जाबसाल यावयास दिवसगत लागेल याजकरितां आजच सेवेसी विनंती लिहिली आहे. सेवकामध्यें काहीं सामर्थ्य दिसत नाही. स्वामीचा पुण्यप्रताप थोर आहे. सर्व उतम होईल. कृपाळू होऊन नासरजंगास येक पत्र सेवकाविषई पाठवावयास स्वामी धणी समर्थ आहेत हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh, writing from the camp of Nasarjang, entreats the Peshwa to send him money to meet the expenses of his establishment. He also asks permission to return home for the rainy season.*

No. 49] [*3-4-1747*

श्री

कृतानेक विज्ञापना. ताा छ ३ रबिलाखर पावेतों वर्तमान येथास्थित असे. छ १ रोजी नासरजंग तीन कोशांचे कूच करून आले. छ २ रोजी अडचा कोशांचे कूच केले. कृष्णा भीमेच्या संगमासमीप अद कोशावर आहेत. छ ३० रबिलवली विनंतीपत्रे लिहिल्यावर बजाजी नाईकाचा लेक मुधोजी नाईक दोनशे स्वारानशी नवाबाजवलोन नासरजंगाजवल आले आहेत. मराठे सरदारांत इतकेच आहेत. बाबूजी नाईकाकडील वकील गोविंदराव राम छ ३० रबिलवली नासरजंगाजवल येऊन मुलाजमत केली. ते याचे हेमराह[1] आहेत. बाबूजी नाईक तुंगभद्रेसमीप गेले म्हणौन सांगत होते. वकील माार येही नाईकाचा थैली नासरजंगास गुजरानिली. त्याचा जाब छ १ रबिलाखरी वकील माराने

---

१ बरोबर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
नाईकाकडे रवाना केला. आज नवाबाचे कूच आहे. रायेचूरची बोली आहे. सेवेसी श्रुत होय. नासरजंगानी स्वामीचे सेवसी पत्र लेहून थैली दिली ते सेवसी पाठविली आसे. हे विज्ञापना.

¶The arrival of Mudhoji Naik, son of Bajaji Naik, and Govindrao Ram, the Vakil of Babuji Naik, at the camp of Nasarjang is reported to the Peshwa by Raghunath Ganesh. He also gives the news that Babuji Naik has gone towards the Tungabhadra and that Nasarjang intends marching in the direction of Raichur.

No. 50] [*12-4-1747*

श्री

राजश्री पंत प्रधान

गोसांवी यांसी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम छ १० राखर जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपले पत्र छ ७ रोजचे खेडचे मुकामीहून आले की पंढरपूरचे सुमारे न जाणे. मलवडीचे सुमारे फौज व सटवोजी जाधव यासी पाठऊन तुम्ही खासा ये प्रसंगी असावे. वरकड लस्कर आहे त्यास दाणा पाणी मिलते तैसे तुमचे लोकास न मिले येसे काये आहे ? म्हणून विस्तारे लिा. त्यास पूर्वी आपण पंढरीचा रोख लिहिला त्यावरून आम्ही त्याच सुमारे येणार होतों. प्रस्तुत आपली आज्ञा आली त्याच सुमारे येतो. चैत्र शुध त्रयोदसी रविवारी मुहूर्तेकरून निघोन येतो. खावंदाजवल आल्यास वैरण पाणीहि अनकूलच होईल. जिकडे खावंद जातील तिकडे यावयाची अनमान काये आहे? यामागेहि चाकरीस अंतर जाहले नाहीं. पुढेहि होणार नाही ; आमचे शरीराने घालविले. आमचे येणे न होये तरी फौज घेऊन चाकरी करणार धण्याचे पुण्येकरून आहेत, तेच येतील ; चाकरी करून दाखवितील. अंतर होणार नाहीं. आम्हीहि जेथवर येवल तेथपर्यंत येतच आहों. सातारियास आमचे येणे होत नाहीं. उष्णाकडे पाहावत नाहीं. घोड्यावरी बसवत नाहीं. खावंद जेथे असतील तेथवरी येतो. निरोप देणार खावंद आहेत. विशेष काये लिहीणे. कृपा केली पाहिजे. हे विज्ञापना.

¶Pilaji Jadhav to the Peshwa, offering to meet the latter near Malavdi. He regrets he is too old for active service in the field.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
तथा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

पोष्य गोविंद खंडेराव कृतानेक साष्टांग दंडवत प्रा॥ विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. बाबूजी नाइक रायेदुर्ग प्रांती आहेत. तुंगभद्रेपलीकडील बिदनूरचे प्रांतास उपसर्ग करावा, चिकबालपूरकराकडे मिलोन उपद्राप करावासे आहे. नासरजंगहि सिरे प्रांती आहेत. ऐशियांस राजश्री मुरारराव घोरपडें वजारतमाब यांणी स्वामीसी निष्ठा धरून सर्व महदाश्रय स्वामीचा कल्पिला आहे. श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचा निरोप घेऊन गेलियावर तुंगभद्रेपलीकडे उद्योगास लागणार. नाईकाचें उपमर्दास लागावे हे मारनिलेस आवश्यक. त्यास नाईक तीनच्यार हजार फौजेनसी आहेत त्याचे काही अगाध मानीत नाहीत. बिदनूरचा तुंगभद्रेपलीकडील आहे त्यात नाईक चालिल्यास बिदनूरकरास मिलोन जुझणार. चिकबालापुरास गेले तरी आपण श्रीरंगपटणकराकडें होणार. येवंच कोणें येके प्रकारें ज्यावर नाईक रोख करितलि त्याची कुमक करून नाईकास खटें करणार ही मुरारराव याची मसलत आहे. नाईक येंदा आहेत ते कलतच आहेत. याप्रों घडावयास काही अगाध नाही. याप्रों उद्योग जालियास बहुतच उपयोगाची गोष्ट आहे. परंतु नवाब नासरजंग यांणी नाईकाचे साहित्य केल्यास उपयुक्त पडणार नाही. यास्तव नासरजंग यांजकडील धरबंद करावा या उद्येशे राजश्री मुरारराव यांणी मुजरद पत्रें स्वामीकडे रवाना केली आहेत व आम्हास व राजश्री केशवराव यांसहि प्रत्यक लिहिली आली आहेत. ऐसियांस पूर्वीहि नवाब निजामन मुलुक यांजकडील आपणा-विशी साहित्यात असावें म्हणून राव मारनिलेनी विनंती स्वामीस करावयाविशी राजश्री केशवराव यास लिहिले होते त्यावरून याणी विनंती केली. ही स्वामीनी मान्य करून उतरहि मुरारराव यांस लेहविलें आहे. त्याच भरोसियावर सांप्रतहि त्यांणीं पत्रें पाठविली आहेत. तरी स्वामीनी येविसी नवाब असफज्या-हास लिहिणे ते अथवा नासरजंगास ल्याहावयाचे असेल तरी लेहून मुरारराव याचेविसी विपर्यास न मानीत व नाईकास अस्पद न देत असें केलियाने मनसु-ब्यास उपयुक्त पडोन मुरारराव याचे साहित्य केलेसे होते आणि पुढील कितेक अर्थ सिधीस जातात असा विचार आहे. स्वामी सर्वज्ञ आहेत. न कलेसे काये आहे ? याप्रो उद्योग जालियास नाईकाचे पाय तेथें ठिकाणी लागतच नाहीं. गुदस्ताप्रो मनसुबा होतो. जेथें नाईक छावणीस राहावयाचे होतील तेथें हे जाऊन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
उभे राहातील. तरी ये गोष्टीची दुरंदेशी चितात आणून साहित्य खामखा करावें येविसी राजश्री केशवराव याणीहि सेवेसी लिहिले आहें त्यावरून विदित होईल. नासरजंगास कागद लिहिणें अथवा तेथें वकील आहे त्यास लेहून मजकूर करवणें जालियास पत्रे लेहून जासूदजोडी इकडूनच रवाना करावी व मुरारराव यांसहि पत्रे ल्याहावी म्हणजे येथून राव मारानिलेकडें रवाना करू. तेथून पुढें नासरजंगाचे लस्करात जातील. बहुत काये लिहिणें, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*Govind Khanderao suggests to the Peshwa that a letter be despatched to the Nizam or to Nasarjang requesting them not to aid Babuji Naik against Murarrao Ghorpade, who has undertaken to oppose the Naik in his activities in the Karnatak.*

No. 52] [*3-5-1747*

छ ७ जौवल मध्यरात्र

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
अंताजी[1] नारायेण स्वामी गोसावी यांसी

पोष्य सदासिव चिमणाजी नमस्कार विनंती उपरी. येथील कुशलं जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. आम्ही फौजसहवर्तमान मजल दरमजल आजी रविवारी छ ३ जमादिलौवली संवजुतीजवल कृष्णा उतरून मुकाम केला. लोकाची रवानगी केली पाहिजे. त्यांचे रवानगीचे यैवजाविसी लिहिले होतें, त्याचे उतर आले की, पनास हजार रुा पुण्यात जमा करितो, तुम्ही वराता करणें म्हणोन आले. त्यास तीर्थरूपानी यैवज तेथे जमा केला असिला तर उतम. जरी यैवज जमा केला नसिला तर तुम्ही हरइलाज करून लोकास वरातप्रो पैका देणें. आम्ही वराता केल्याच समजणे. अतःपर विलंब नाहीं. लोकास हिसका पडो न देता लोकाचे पदरी यैवज पडे ते करणे. रा छ ३ जमादिलावल. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Sadashiv Chimnaji, on his way back from the Karnatak campaign, writes to Antaji Narayan at Poona, asking him to make arrangements for payments due to the army that had served under him in the campaign.*

---

१ चिमानी अपाचा मुजुमदार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 53] [*5-5-1747*

श्री

श्रीमंत राजश्री पंत–

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन सा नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचे वर्तमान ता छ ५ जमादिलावल पावेतों मो लस्कर नवाब नासरजंग येथास्थित असे. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा की, नासरजंगाचे जागिरीविषई ताकीदपत्र पाठविले होते ते नासरजंगाचे मनास न ये याजकरितां नासरजंगानी मुसविदा करून दिला तो सेवेसी पाठविला आहे त्याजप्रो ताकीदपत्र पाठवावें म्हणौन तुम्ही लिहिलें. यैशास येविसी राघो गोविंदास ताकीद निक्षूण जाली आहे. ते सर्वथा जाजती अमल घेणार नाही. येविसी नासरजंगाचा निशा करावयास राजश्री बगाजी यादव यास लिहिले आहे म्हणौन स्वामीची आज्ञा. यैशास येविसी बगाजीपंती तो सेवकास काहीच लिहिले नाही. नासरजंगानी येक वेल या गोष्टीचा मजकूर केला होता. यैशास जाब आला नाही म्हणौन बोलिलो. सेवसी श्रृत व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh to the Peshwa, asking for orders regarding the affair of Nasarjang's jagir.*

No. 54] [*After 5-5-1747*

श्री

कृतानेक विज्ञापना. छ ४ जौवली संध्याकालीं येक कामाठी सिरेयाहून लस्करांत आला. त्याणें वर्तमान सांगितलें कीं, देवनहलीचा किला श्रीरंगपटणकरानी घेतला. आवाई खबर आहे. मागाहून तहकीक करून सेवेसी लेहून पाठवितों. छ ५ जौवलीं नवाबाचे कूच जाले. हे विज्ञापना.

¶*A report that the fort of Devanhali has been captured by the forces of Seringapatam is communicated to the Peshwa by Raghunath Ganesh.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 55] [पौ 14-5-1747

पौ छ १४ जमादिलौवल.

श्री

श्रीमंत राजश्री पंत–
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. श्रीरंगपटणवाले याचा मजकूर सविस्तर श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंतीपत्री लेहून रवाना केला आहे. सिरेकर दिलावरखानाकडे साडेबारा लाख रुा हजारेयाबाबत नवाबाची बाकी, त्याजपौ येक लाख रुा मात्र पावले. * * त बाकीचा पैका तैसाच राहिला आहे. प्रस्तुत काले दिलावरखान श्रीरंगपटणवाले यांचे तैनात जाला आहे. श्रीरंगपटणकरानी देवनहली किलेयास मोर्चेबंदी केली आहे. स्वार व पावप्यादे मिलोन फौज भारी जमा जाली आहे. दिलावरखान सिरेकर सातसे राउतानसी पटणवालेयास सामील जाला. पटणवाले दररोज दर राऊतास रुा निमप्रो देतात. प्रस्तुत नासरजंग येतात हे आइकोन दिलावरखानाने आपला कबिला सिरेयातून काढून आपणाजवल नेला, याप्रो दिलावरखानाची अवस्था जाली. तेव्हा नासरजंगास त्या(ज)कडून पैका प्राप्त होणे संकट आहे. आधी तर दर्शन व्हावयाचीच भ्रांत आहे. रायेदुर्गवाले याकडील वकील नरसिंगराव व विर * * व गोपालपंत यैसे नासरजंगास येऊन भेटले. बोली करून मागती रायेदुर्गास गेले. येका दो रोजा येतील. त्यांचा काये फैसला होतो तो अर्थ मागाहून विनंतीपत्रीं सेवेसी लेहून पाठवितो. गुढीकोटवाले याचा प्रांत चित्रदुर्गवाला हरमाणाने घेतला आहे. त्याचे पारिपत्याकरितां गुढीकोटवाले याचा मूल नासरजंगास भेटला. प्रस्तुत हमराहीस आहे. नवाब आसफजाह येहीं नासरजंगास आठ लक्ष रुा लस्करचे तलबतनखेकरिता अरकाटेस अनवरुदीनखानाकडे इनायतनामा सादर करून * * विले. नासरजंग तुंगभद्रातीर दाखल होताच तो यैवज आणावयास सजावल पाठविले होते. प्रस्तुत वर्तमान आले आहे की, अनवरुदीखानाने आपला बेटा नासरजंगाचे भेटीस रा केला व खजानाहि रवाना करविला आहे. सिरेयांचे मुकामी नासरजंग दाखल जालियावर ते जागां काही मुकाम होतील. तेथे आरकाटचा खजाना दाखल होईल यैसी बोली आहे. नासरजंग तुंगभद्रातीरास आलियावर यैवज बेगखान सामा पर्जन्याचे सरंजामीचा सामान मोमेजमे[1] वगैरा आणावयाकरितां पैका देऊन आदवानीस पाठविला होता तो दाहा बारा दिवसा सामान घेऊन आला. (आ)दवानीहून व गदवलाहून नवाबास जियाफतहि[2]

---

१ मेणकापडे. २ नजर.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आली होती. सेवेसी श्रुत होय. सेवक येथील वर्तमाने पै दर पै श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंतीपत्री लिहीत असतों. श्रीमंताकडून जासूद जोडिया व कासीद येत जात आहेत. आज ताा सात रवानगिया विनंतीपत्रांच्या जाल्या. नासरजंग वेगले जाले, तेव्हां बगाजीपंत रुसकतीस आले होते. त्याजवल नवाब भाऊ स्वामीचे नांव घेऊन बोलिले कीं, ते आम्हास पत्र पाठवितील की नाही? यानी उतर दिले की, आपण येक इनायतनामा ल्या(हा)याची आज्ञा करावी. नवाब बोलिले कीं, आधीं त्याजकडून पत्र आले पाहिजे. हे वर्तमान सेवकानें श्रीमंताचे सेवेसी लेहून पाठविलें होते त्याजवरून श्रीमंतानी नासरजंगास थैली पाठविली. त्याजवरून परम संतोषी जाले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The news of the advance of Nasarjang into the Karnatak is reported to the Peshwa. Negotiations have been opened with him by the Chief of Raydurg while Dilwarkhan of Sira appears to be inclined to the opposite side.*

No. 56] [*18-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत–

प्रधान स्वामीजीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. छ ५ रोजी नाईकाकडील अर्जी आली ते वकील माराने नवाबास गुजरानिली. नवाब थैलीचा अभिप्राय मनास आणून येतराज जाले कीं नाईकांचा करार बंदगानेआलीचे[1] खजमतेस कोणे प्रकारचा होता? तुंगभद्रा आधीं तर उतरोन न जावे तथापि गेले तर रायेदुर्ग, चितलदुर्ग, हरपनहली इतकेयांतच येक महिना गुजरान करून माघारे जावें यैसें असतां ते गोष्ट येकीकडे ठेऊन या तर्फेस आले. मुलकास इजा दिला आणि किलाहि घेतला. (दु)सरी गोष्ट बेज्या[2] केली. याजवरून बंदगानआली आम्हावर येतराज होतील. आम्हास इतला न देतां येक बयेक हे गोष्ट केली अज्याईब आहे. आतां त्याचे अर्जीचे जबाबांत हे मजकूर कोठवर ल्याहावे? याजकरिता वकिलास फर्माविले की तुम्हीच जाऊन नाइकास खुब माकूल करून सांगोन त्याजवलोन कूच करवणें. माघारे सातारेयाचे वाटेस लाऊन तुम्ही येणे म्हणौन ताकीद केली. अर्जीचा जवाब लेहून दिला. वकिलानें मार्गाचे निभावाकरितां नवाबास अर्ज केला. नवाबाने उमरखान जमातदार दाहा स्वारानसी देऊन रवानगी केली. छ ७ रोजी

---

१ निजामली. २ गैर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
वकील रा जाला. छ ६ रोजी नवाब तृतीय प्रहरानंतरे हतीवर स्वार होऊन निघोन सिरेयाचा कोट बाहेरून चौगीर्द पाहोन डेरेदाखल जाले. छ ८ रोजी कूच करून येक कोस मजल केली. सिरयांचे उतरेहून निघोन दक्षणेस तलेयावर गेले. पुढील नाइकाकडील विचार मनास आणितां नाईकानी कनमडीची[1] बंदोबस्ती करून छ ७ रोजी मडकसिरें घोरपडे यांचा किला तेथें हांवभरी होऊन मोर्चेबंदी करावयास आले. तो किला कनमडीचे दक्षणेस तीन कोशावर आहे. किला मातबर, भरती बहुत, तोफा व जेजाला वगैरा सरंजाम पूर. नाईक किले याचे गिर्दनवाईस येतांच तोफांचा मार दिला. उधळून काढिले. तेथे काही घोरपडे यांचे स्वारहि होते. नाइकांचे जलदीकरितां नाइकाकडील पांच सात घोडी व दाहा पांच माणूस ठिकाणीं लागले व चाली(स) पंनास जखमी जाले. मग नाईक कच खाऊन दिडा कोशाचे अंतरायानें मुकाम करून राहिले. इतकेयांत त्या मुकामास वकील जाऊन पोहचला. त्यांचे याचे खलबत जाले. नाइकाचे मनोगत छावणी करावयाचे. मागें फिरोन जावें तर फजीती. राहिलेयानें काहींबाही भ्रम राहेल यास्तव छावणीचा निश्चय करून नवाबास अर्जी लेहून गोविंदराव वकिलास व उमरखानास रवाना केले. ते छ १० रोजी दोन घटिका रात्रीस येऊन लस्करदाखल जाले. तेच समई उमरखान याणें नवाबास मजुरा करिताच नवाबाने वकिलास बोलाऊन नेले. अर्जी वाचून पाहिलेयावर नवाब बहुत येतराज जाले. वकिलास बोलिले कीं, तुम्हास सांगितले काय आण तुम्ही करून आलेत काय ? त्यास छावणी करून राहावयास दरकार नाहीं व आम्ही राहो देणार नाहीं. जोरावारीनें राहू म्हणतील तर तंबी केली जाईल. याजबदल फेर तुम्ही जाऊन खूब माकूल करून सांगोन माघारे कूच करऊन येणें. यैसी आज्ञा करून मागती उमरखानास दाहा स्वारानसी समागमें देऊन वकील माराची रवानगी केली. अर्जीचा जाब लेहून दिला. वकील मार मध्यरात्र उल्लंघलियावर आपले राहुटीस आला. छ ११ रोजीं प्रातःकाली जावें तो सकाली नवाबाने आपणाजवल बोलाऊन नेला आण मागतियाने मुकरर ताकीद केली. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A letter from Raghunath Ganesh to the Peshwa, dealing with correspondence between the Nizam and Babuji Naik through the latter's envoy, and the displeasure felt by the Nizam on account of Babuji Naik's encampment in his province.*

---

१ कनमडीचा किल्ला सिऱ्याचे पूर्वेस बारा कोसांवर आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 57] [*18-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. छ ११ रोजी वकीलास ताकीद होयपर्यंत दोन प्रहर जाले उपरांत वकील राहुटीस आला तों तेच रोजीं नवाबाने जरिदी[1] व्हावयाविषई लस्करास ताकीद केली. वकील मार ते दिवसीं पछाडीहून निघोन उमरखानसुधा आघाडीसच जाऊन राहिला. छ १२ रोजी प्रातःकाली नाईकांकडे रवाना जाला. जे दिवसीं वकील नाइकाकडून आला ते दिवसीं नाईक मडकसिरेयाहून कूच करून रतनगिरीजवल आले. च्यार कोश कूच केले. दुसरे दिवशीं रतनगिरीचे दक्षणेसच पाहाडांचे आसरेयानें मुकामास आले. नवाबाचे लस्करास व नाईकांस अंतर आठा कोशांचें राहिलें होतें. छ ११ रोजीं नवाबानें आपला जनाना सिरेयाचे कोटांत रवाना केला व दौडेचे स्वारीचे डेरे वेगले केले. येक दिवाणखानेयाचा डेरा व येक खलवतखाना रव्वाबगाह मिलोन डेरा यैसे दोन डेरे वेगले उभे केले. लस्करास ताकीद केली की तमाम भारबारदारी सिरेयांत ठेऊन जरिदा होणें. बाजारबुनगे बहुतेक सिरेयांत जावयास ताकीद केली. श्रीरंगपटणचे वकील व्यंकटराव त्याची कबिला समागमें होता त्यास नवाबानें आज्ञा केली कीं तुम्ही आपला कबिला सिरेयांत ठेऊन जरिदा हमरादीस येणे याप्रो ताकीद जाली. छ १२ रोजी सारा दिवस बुनगे सिरेयात जातच होते. व्यंकटरायानी आपला कबिला सिरेयांत ठेविला. सरदार लोकीं बहुत करून भारबरदारी सिरेयांत ठेऊन जरिदा जाले. ते दिवसीं नवाबाने लोकांस दारूगोली वाटून हरावेल[2] चंडावल[3] दस्तराख (?) दस्तचप (?) फौजबंदीची नेमणूक केली. तोफा होत्या त्या सिरेयांत ठेविल्या. छ १३ रोजी प्रातःकाली नवाबानी लस्करांत जिनबंदी करावयाची ताकीद केली. फौज सिध्ध जाली. बुनगे व स्वार नवाबाचे डेरेयाजवलोन येक कोशपर्यंत नाइकांचे रुखावर पसरोन उभे राहिले. नवाब दीड प्रहर दिवसपर्यंत खलवतखानेयात बैसले होते. नाइकांस तंबी करावयाचा निश्चय केला. सेवट ते दिवसी उपेक्षा करून दोन प्रहर न भरतां कूच करून निघाले ते माघारे सिरेयांचे उतरेस जेथे पूर्वी मुकाम होता तेथेंच येऊन मुकाम केला. पछाडी होती तेथे आघाडी जाली. पछाडी सिरेयांचे शहरपन्हाजवली आली. मुकाम जालियावर नकीबें[4] व चोपदार सजावल लस्करांत फिरऊन तमाम किरकोल बाजारबुनगें

---

१ सडे. २ अघाडी.
३ पिछाडी. ४ भाल्दार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पालें उपडेऊन सिरपेंत संध्याकालपर्यंत दाखल करविले. संध्याकालीं वकील मारहि नाइकाकडून आला. संध्यासमई पर्जन्यवृष्टीहि बहुत जाली. नाईकाकडून पर्जन्य आला. नाईकावर बहुतच वृष्टी जाली. या लस्करावर प्रहर रात्रपर्यंत पर्जन्य पडत होता. वकील मार येतांच नवाबाकडे गेला. नवाबास आर्जी गुजरानली तों नाइकांचा छावणी करावयाचा निश्चय. माघारे गेलियानें आपली स्थित राहत नाही म्हणौन आजीजीनें कितेक पर्यय लेहून व सांगोन पाठविले, याजवरून नवाब बहुत रागास आले. बोलिले कीं हे गोष्ट आम्हास सोसणार नाहीं. आम्ही खासा स्वार होऊन येतों. तंबी करावयास तफावत होणार नाही. फौज जरिदा करविली. तयारी जालीच आहे. तुमचे येण्याविसीं ढील होती. याउपर मुलाहिजा होत ना. फेर तुम्ही जाऊन माकूल करून सागणे म्हणोन आज्ञा केली. वकिलानें अर्ज केला कीं, नाईक आबाजी नाइकास खजमतेमध्यें पाठवणार आहेत. ते रुबरू येऊन अर्ज करितील. नवाब बोलिले की आमची गोष्ट कबूल होत असली तर भेटीस यावें; नाहीतर न यावें. हे विज्ञापना.

¶*The Nizam resents the encroachment of Babuji Naik in the Karnatak and asks him to quit his province, otherwise forces will be sent against him.*

No. 58] *[18-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. याप्रो वकिलास ताकीद जाली. उमरखान बराबर जात येत होता त्यास नवाबाने मौकूफ केलें. वकिलाने बहुत आजीजी केली, तेव्हा पदाजी बाबराचा लेक माधवराव बाबर याचे जमावपौ दाहा स्वार देऊन रवानगी केली. अर्जीचा जाब लेहून दिला. छ १४ रोजीं प्रातःकालीं मागती वकिलास नवाबाने बोलाऊन मुक्रर ताकीद केली. वकील रा जालियावर दीड प्रहर दिवस आला ते समई नवाबानें कूच केले, ते आदकोश जमीन नाइकाचे रुखावर येऊन मुकाम केले. छ १५ रोजी प्रातःकालचा प्रहर दिवसपर्यंत तलावर होते. पश्चात कूच करून निघाले ते बुनगे दोहो बाजूस व पछाडीस ठेविले. त्याचे बाहेर फौज झेंडे खासा हातीचे पाठीमागें, पुढें हरावलीस सडी फौज याजप्रो बदोबस्ती करून थोपत थोपत अडीच कोश जमीन नाइकाचे रुखावर येऊन मौजे मदलूर प्रां सिरे येथे येऊन मुकाम केले. डेरे होत आहेत. नवाब हतीवर स्वार आहेत. पुढे डेरे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दाखल होणार तो नाइकाकडे वकिलाबराबर दाहा स्वार बाबराचे गेले होते ते आले. बराबर जासूदजोडिया नवाबाच्या दोन होत्या त्या आल्या. वकील आला नाहीं. जासुदाबरांबर येक जोडी नाइकाकडील होती त्याजबराबर नाईकानी नवाबास अर्जी पाठविली ते अर्जी गुजराऊन राऊत मिसलेस जातां सेवकाने वलखिले. मग चोपदार त्या राऊताचे मिसलेस पाठविला. राऊत आले आण वकील काय म्हणौन न आला याची तहकीकात केली. चोपदार जाऊन निबाजी बाबरास पुसतां बोलिला कीं, नाइकाचा विचार छावणीचा आहे. उमरखानाबरावर आम्हीच दोन वेला गेलो होतो. नाइकांही आम्हास व उमरखानास वस्त्रें दिली. त्याचा आग्रह छावणी करून राहावयाचा बहुत आहे. या खेपेस नवाबाने आम्हास व उमरखानास मना करून आमचे पथकाचे दाहा राऊत देवविले ते आतां आले. नाइकानी नवाबास अर्जी केली आहे. राउतास सागितले की आम्ही तों नवाबास अनन्य आहों. नवाबानें आम्हास वाचवावे. सातारा गेलो तर जीव वांचत नाहीं याजकरितां नवाब जसे फर्मावितील तसें कबूल करितों. आपणाजवल जितके जमावानसी ठेवितील तितकेयानसी राहतो. परंतु माघारे न पाठवावे. इतके असोन राहो नकोच म्हणतील तर नवाबाने जो पैका आम्हास देविला तो रोख आमचे पदरी या नवाबानी घालावा. आम्हास लोकानी आडविले आहे त्याची समजावीस जाली म्हणजे आम्ही जातो, म्हणौन सागोन व लेहून पाठविले आहे म्हणौन बाबरानें सागोन पाठविलें. राउताबराबर अर्जी नाइकाची आली त्याचा जबाब नवाबानें रवाना करविला त्याचा अभिप्राय मनास आणितां नवाबाने लेहविले की तुम्हास नवाबसाहेबी जो पैका देविला तो पावेलच. तुम्ही उजूर करीत असिले तर आण तो पैका न्यावेसे जाले तर दुसरे जागाहून निशा करून देविला जाईल आगर आम्ही देऊ. परंतु तुम्ही माघारे निघोन जाणे, म्हणौन जाब गेला. नाइकाचा अभिप्राय की, येनंदा छावणी करून राहावें. पोट भरावयाचा विचार चातुर्मासचा चालिला पाहिजे. त्या यैवजास श्रीरंगपटणचा मुलूक योजिला आहे. मृगसाल पावेतों मात्र श्रीरंगपटणकराचे मुलकास उपसर्ग न द्यावा. मृग निघालें म्हणजे दुसरे साल लागले. सुखरूप मुलूक मारून पोट भरावें. साल मारचा यैवज पटणकरांचा सातारा प्रविष्ट जाला म्हणौन मात्र उजूर आहे. सेवसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports that Nasarjang has marched in the direction of Babuji Naik and encamped at Madlur where a communication was received from Babuji begging the Nawab's permission to be allowed to spend the monsoon in the Karnatak as he apprehended that his immediate return to Satara would bring disgrace upon him. The Nawab, the writer says, is not agreeable to such a proposal and desires Babuji to clear off without delay.*

3049

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 59] *[18-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत [प्र]धान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. छ १६ रोजी प्रातकाली नवाब येही फौजबंदी करून प्रहर दिवस न चढला तो कूच केले. नाईकाचेच रुखे चालिले. येक कोशपर्यंत स्वारी आलियावर घोरपडेयांचा वकील अर्जी घेऊन आला. मुरारराव यांचे भाऊ सुबाराव दोन हजार स्वारानसी देवनहलीचे मोर्चेयास श्रीरंगपटणकरास सामील होता तेथोन कनमडी किला नाइकानी घेतला तेथे आले आहेत. तेथोन नवाबास अर्जी केली. नवाबाने हती उभा करऊन अर्जी पाहोन आज्ञा केली कीं, उतरते मजलेस जवाबसाल होईल, पुढें नवाब चालिले. कोशेक जमीन आले तों नाइकाकडून बाबुराव नारायेण केतकर व गोविंदराव वकील नवाबाकडे आले. उभयतां आघाडीस आढलतांच उभे करून नवाबास अर्ज पोहचला. नवाबानें आज्ञा केली की त्याही उतरते मजलीस यावें. याप्रो सांगोन परभारेच ठेविले. रुबरू बोलाविले नाही. यावर नवाबानी आदकोशक जमीन येऊन मौजे मंदुडी प्रा रतनगिरी येथील तलेयावर मुकाम केला. बाबुराव केतकर व गोविदराव वकील यैसे मिरजा महमदखान बकसी यांजकडे आघाडीस बैसले. नवाब डेरे-दाखल जालियावर बकसीस व गोविदरायास बोलाविले. ते उभयता दिवाणखानेयात आले. तेथोन खलवतखानेयांत आधी बकसीस बोलाविले. त्याजवल वर्तमान मनास आणून मग गोविंदरायास बोलाविले. जाबसाल जाला. गोविदराव निघोन बकसीकडे बाबुराव याजवल गेला. यावर रात्रौ बाबुराव यास खलवतात बोलाऊन खलबत केले. प्रातःकाली रवानगी केली जाईल म्हणौन आज्ञा केली. उभय-तानी आर्ज केला की उदैक मुकाम करवावे त्याजवरून नवाबाने मुकाम करावयाची आज्ञा केली. उभयता रात्रौ बकसीकडेच होते. ते दिवसी उभयतांस अन्न प्राप्त जाले नाहीं. उपोषण जाले. नवाबाने नारल व फणस आंबे पाठविले होते. प्रातकाल छ १७ रोजी बाबुराव वकील उभता तलेयावर भोजनाचे उद्देशास आले ते सेवकाचे राहुटीस आले. बाबुराव बोलत होते तो मजकूर आलाहिदा पुरवणीत विनंती लिंहिली आहे. श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶The march of the Nizam towards Babuji Naik, the arrival of two Vakils of Babuji Naik and one from Murarrao Ghorpade and their attempts to open negotiations are reported to the Peshwa by Raghunath Ganesh.

3050

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 60] [*18-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. बाबुराव केतकर बोलत होते कीं आम्हीं नवाबाजवळ छावणी करावयाविषयीं आज्ञा द्यावी म्हणौन कितेक पर्यायें समजाविलें, परंतु नवाब छावणी करू देत नाहीं. बोलतात कीं तुम्हीं तुंगभद्रा न उतरावी म्हणौन बंदगान आलीचे खजमतेस करार केलेत. करारनामा लिहून दिलात यैसे असतां काय म्हणौन या जिलेयांत आलेत. आज दोन वर्षे तुम्ही सिरेयास श्रीरंगपटणास उपसर्ग केलात, त्याजमुलें हर दो जागांचा पैका सरकारचा तटोन राहिला. तुमची नालीस करितात यैसे असोन फेर तुम्ही आलेयाने मुलकास इजा पोहोचेल याजकरितां निघोन जाणे. मग तुंगभद्रापलीकडे खातिरेस येईल तेथे छावणी करणे या सातारेयास जाणे. तुम्हास या जिलेयात सहसा राहूं देत नाही म्हणौन बोलिले. त्यास आम्ही काय करावे? आमचे येजमान दुराग्रही. नवाबाची मर्जी रक्षून कार्य केले तरच स्थित राहेल; नाहीतर राहात नाही. हिमत थोडी, गुसा बहुत. हे फजित व्हावयाची निशाणी. याउपर आम्ही जाऊन प्रबोध करितों. आइकोन माघारे फिरले तर उत्तम; नाहीतर नास आहे. नाईकाच्यानें कर्नाटक प्रांताचा बंदोबस्त सहसा होत नाही. हरकोणाच्या पदरीं पडोन त्या आश्रयानें बंदोबस्त होईल तर न कले. आतां नवाब सावनूरच्या मुलकात छावणी करा म्हणतात तर हेहि गोष्ट नाईकांस कठीण आहे. नवाब तों सर्वथैव छावणी या जिलेयांत करूं देत नाही, म्हणौन कितेक प्रकारें बोलिले. भोजन करून उभयताहि दिवाणखानेयांत गेले. सेवकहि गेलो होतो. नवाबानी यास खलबतखानेयांत बोलवावे ते न केले. नवाब खलवतखानेयांत होते. तेथोन मिरअसकरी मुनसी व मिरजामहमदखान बकसी व नसीब यारखान अर्जबेगी पाठऊन या तिघाजवळोन उभयताजवळ बोली करविली. सदरहूजण दिवाणखानेयाबाहेर सतरंजी टाकून खलबत करीत होते. सदरहू तिघेजण खलबतात जाऊन नवाबास समजाविलें. मग नवाबानें या उभयतास रुबरू नेऊन पानें व थैली देऊन वरचेवर रा केले. रुबरू बहुत बोली न जाली. उभयतां स्वार होऊन दोन प्रहर न भरतां नाईकाकडे रवाना जाले. बाबुराव केतकर यानीं अगोदर नाईकास बातमी पाठविली कीं येथें कांही उपाय चालत नाहीं. खामखा माघारे जाच म्हणतात. याजवरून नाईकानी खासाच बाबुराव याचे येण्याअगोदरच कूच केलें. आले मार्गे निघाले. आबाजी नाईक बाबुराव याची प्रतीक्षा करीत होते. छ १७ रोजी दोन प्रहर न भरतां

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बाबुराव कोतकर नवाब जंजीरान रवाना जाले. बाबुराव आबाजी नाइकाजवळ पोहचलियावर त्यानींहि कूच केलें. नाईक बहुत खफीप जाले. त्याजकडील येक दोघ ग्रहस्त म्हणत होते कीं अतःपर नाईक आश्रय जालियाविना या जिलेयांत येत नाहीं व माघारे सातारेयासही जात नाही. रघूजी भोसले याजकडे जातील. त्याजकडे बारा लाख रुा नाईकांचे कर्ज आहे तें त्यास माफ करावें आण त्यास सामील करून घेऊन मातबर फौज धरून यावे यैसा विचार दिसतो म्हणौन बोलत होते, ते सेवेसी विदित व्हावयाकारितां विनंती लिहिली आहे. नवाब नासरजंग छ १८ रोजी मंदुडीस मुकाम करून राहिले. नाईक दहा बारा कोश माघारे कूच करून गेले. यैसी तहकीक खबर आली. यावर कूच करून जातील. अद्याप छावणीचे मुकरर नाही. बहुधा सिरेयास राहातील यैसे दिसते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. नाईकास व नबाबास आतर तीन कोशांचे राहिले होते हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports that Nasarjang peremptorily demanded the withdrawal of the Naik's forces from the territory south of the Tungabhadra, non-compliance with which, he threatened, would be followed by drastic action. Babuji, yielding to the threat, broke up his camp and marched away. Though his present destination is not known, the writer surmises he will renew his efforts in the Karnatak in concert with Raghuji Bhonsle.*

No. 61] *[18-5-1747*

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. नवाब नासरजंगाजवळ कोणी मुसाइबत उमदा मनुष्य नाही. मीर असकरी मुनसी व महमद माहा अर्जबेगी असतात. शाहा महमुद फकीर औरंगाबाजकर यांचा लेक असतो. याजवर येख्तियार नाही. फरमाबूद आहेत. सैद सिलाखान व हैदर आलीखान व मिरजा माखान बकसी यांजवल खलबत होत नाही. नाईकाचे मध्यस्तीस इतकेयामध्ये कोणी नाही. वकील आला म्हणजे नवाबानें खलबतांत नेऊन जाबसाल करावा. मुनसी जवळ असला तर आसला त्याचप्रो महमदमाहा याप्रो आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब अबदल मजीदखानास भेटोन माघारे देशास गेले म्हणौन येथें वर्तमान आहे. नाईकास

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नवाब समागमें ठेवीत नाहीत. तेथे रोजमरा देऊन ठेवितील हे होणार नाही. नाईकाची बदमामली नवाबास पुर्ती अनभवास आली. अतःपर त्यास विश्वासच नाही. नवाब हैदराबादेस जातील म्हणौन उगीच अफवा आहे. तहकीक नव्हे; परंतु येकेठाई हे गोष्ट आढळली ते सेवेसी विनंती लिा आहे. सेवकाबरोबर जासूद-जोडिया नाहीत. मागाहून वर्तमान लेहून पाठवणे ते अजुरदाराबरोबर लेहून पाठवीन. स्वामीनें नवाबास थैली पाठविली तिचा जबाब या गडबडीकरितां नवाबानी न दिला. आज देतों उद्यां देतों म्हणौन बोलतात. नाईकाकडील फैसल जाला. आतां जाब देतील तो मागाहून रवाना करितो. सेवक आज्ञेप्रो नवाबासमागमे आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबी सेवकास खर्चाकरितां मोहरा आठावीस पाठविल्या त्याजपौ शंभर रुा खर्च जाले. पुढें छावणी जाली तर बेगमी असा(वी). सदरहू थैवजाने परिणाम लागणार नाही. बेगमी करावयास स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh informs the Peshwa that Nasarjang has finally decided not to allow Babuji Naik to camp in the Karnatak.

No. 62] *[19-5-1747*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान ताा छ १९ माहे जमादिलौवल पावेतों मो लस्कर नवाब नासरजंग येथास्थित असे. स्वामीचें आज्ञापत्र छं २१ रविलाखरचें बराबर अनसोजी व निंबाजी जासूद सादर जालें तें छ १२ जमादिलौवलीं तृतीय प्रहरी प्रविष्ट जाहालें. स्वामीनें नवाब नासरजंगास थैली पाठविली तेहि पावली. तेच समई थैली घेऊन नवाबाजवल गेलों. नवाब खलबतांत होते तेथें जाऊन थैली गुजरानिली. नवाबानें थैली स्वहस्तें खोलून पत्र वाचून पाहिलें. बहुत समाधान पावले. स्वामी कोठें आहेत म्हणौन नवाबानें पुसतां कातरखटावांवर मुकाम आहे म्हणौन सांगितलें. ते समई नवाब नाईकांचे तंबीचे गडबडेंत होते. सेवकास आज्ञा केली कीं, या पत्राचें उत्तर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पश्चात तुह्मांस देऊ व मुखवचनेंहि कितेक ल्याहावयास सांगो म्हणौन बोलोन निरोप दिला. आज्ञापत्रीं स्वामीची आज्ञा कीं, नासरजंगांचा व नाईकांचा मनसुबा काय, परस्परें यैक्यता जाली आहे, कोणेकडे जाणार, त्या प्रांती छावणी करणार कीं काय, नवाब नाईकांस आपले हमराहीस[1] ठेवणार ते त्यांचे फौजेस रोजमरा देऊन ठेवणार कीं काय म्हणौन तपसिलें आज्ञा जाली ते सविस्तर चितारूढ जाली. यैशास, येथील वर्तमान ता। छ ४ जौवल सविस्तर विनंतीपत्रीं लेहून सेवेसी रवानगी केली आहे तीं विनंतीपत्रें अविलंबेंच सेवेसी प्रविष्ट होऊन सर्वाभिप्राय विदित होईलच. छ ५ रोजीं नवाब कूच करून सिरेयांसच आले. शहराचे उतरेस समीपच मुकाम करून राहिले. येतांच सिरेयांचे कोटांत जाऊन कोट पाहिला. कोटावरील दोन तोफा जाल्या. मागती नवाब येऊन डेरे दाखलजाले. तेच दिवसीं संध्याकालचा दोन घटका दिवस असतां नाईकाकडून हरिपंत कारकून व जासूदजोडिया दोन नवाबास अर्जी घेऊन गोविंदराव वकील याजकडे आल्या. त्याचा अभिप्राय मनास आणितां नाईक अघहरी वेदवती उतरतांच छ ३ रोजी जाऊन राजश्री मुरारराव घोरपडे यांचा किला कनमडी सिरयांचे पूर्वेस बारा कोशांवर आहे त्या किलेयास लागले. दोन परकोट होते ते वरचेवर घेतले. किला सामान्य व बेसरंजाम होता. किलेयावर च्यालीसेक माणूस होतें त्याजपौ कांही तफरकात जाले होते. बाकी तीसबतीस होते. छ ४ रोजीं नाईकानी किल्यास येलगार केला. सिड्या लाविल्या. आबाजी नाईक येलगारास गेले. दोन सिडिया मोडल्या. आबाजी नाईक यांस किलेकरी यानीं मारून काढिलें. बरकंदाजीखाले दाहावीस माणूस व धोंडेबाजीखालें शंभरेक माणूस नाईकांकडील जखमी जाले. दाहापांच माणूस ठार पडिलें. सेवट खासा नाईक जाऊन परकोटांत येक सिडी सांपडली ते उभी करून किला घेतला. किल्यावरील लोक कौलास आले त्यांस कौल देऊन वस्त्राहरण करून लंगोटीनसी सोडिलें. प्रस्तुत नाईकांचा मुकाम तेथेंच आहे किलेयाचे नाव घोरपडे यानीं सिवगिरी ठेविले होते; नाईकांनीं सिद्धेश्वरगिरी ठेविलें ह्मणोन सांगत होते. हरिपंत आला तो नवे प्यादे दोनशें किले भरतीस चाकर ठेऊन न्यावयाकरितां आला. श्रुत होय हे विज्ञापना. हरिपंतास प्यादे मिलाले नाही हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh, writing from the camp of Nasarjang, informs the Peshwa that Babuji Naik has invested and captured the fort of Kanamadi, twenty-four miles east of Sira.*

---

१ बरोबर.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 63] [*27-5-1747*

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान ता॥ छ २७ माहे जमादिलौवल पावेतों मो॥ लस्कर नवाब नासरजंग यथास्थित असे. हरपनहली राये-दुर्गाकडून नाईक निघोन छ २ जमादिलोवली वेदवती अघहरी नदी उतरोन सिरे उजवे हाते टाकून सिरेयांचे पूर्वेकडे पालेगरांचे डोगरांत सिरोन राजश्री मुरारराव घोरपडे यांचा कनमडीचा किला घेतला हे हर्षाचे वृत व पुढे छा [फाटले]. विचार योजावा ह्मणौन नवाबास अर्जी लेहून पाठविली. नाईकानीं किला घेतला. या प्रांतात यास आसरा जाला. इतके आसरेयाने पुढे उपसर्गास चुकणार नाहीं. या अर्थे नवाबास बहुत विषम वाटले कीं या प्रांती याहीं यावें हे बंदगान आलीची आज्ञाही नव्हती. याजवरून नाईकांचे वकिलाबराबर नाईकांस माकूल करून सांगोन पाठविले. नाईक दुराग्रही. तीन वेला वकील आला गेला परंतु नाईक वाटेवर न येत. मग खासा नवाब जरिदा होऊन बहिरबुनगे सिरेयांत ठेऊन स्वार होऊन निघाले. ता॥ छ १४ ता॥ छ १६ रोज मंदुगूचे मुकामास आले. नवाबास नाईकास चहूं कोशांचे अंतर राहिले. तेच दिवसीं नाईकांसी गाठ घालून तंबी करावी हा नवाबाचा विचार होता, परंतु बाबुराव केतकर व गोविंदराव वकील नाईकाकडून आले ते नवाबास वाटेंत भेटले, त्यावरून नवाबानें मुकाम करविला. बाबुराव यानें बहुत रदबदली केली. याजवरून नवाब रागासच आले. हे वर्तमानाची बातमी नाईकांस पावतांच छ १७ रोजी प्रातःकाली नाईक कूच करून माघारेच आले मार्ग निघाले. बाबुराव केतकर छ मारी दोन प्रहरां नवाबाजवलोन नाईकाकडे गेला हे वर्तमान सविस्तर विनंतीपत्री लेहून सरकारचे जासूद अनसोजी सुकताजी व निबाजी अनसोजी नाईक जोत्याजी नाईक यांजबराबर छ १८ रोजा सेवेसी रवानगी केलीच आहे. त्या विनंतीपत्रांवरून सविस्तर वर्तमान विदित होईल. नाईक माघारे कूच करून निघाले ते रतनगिरीचे उतरेस पहाडा मध्यें चहूं कोशांचे कूच करून मुकामास छ १७ रोजी आले. तेथें येऊन इत्यर्थ केला कीं, नवाबाची तों येतराजी जाली. नवाब आपणास छावणी करू देत नाहीं तेव्हा सर्व प्रकारें आपला वकर गेला. आतां येकच गोष्ट आहे कीं नवाबास भेटोन माघारें जावें याजमध्यें कितेका गोष्टीने आपला उबार राहेल. जर न भेटलों तर आपला विचार बरा नाही यैसी तजवीज करून नवाबास अर्जी लेहून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
गोविंदराव वकिलास छ १८ रोजी नवाबाकडे पाठविला. वकील मार दोन प्रहरा नवाबाजवल आला. भेट जाली तो नवाब बहुत रागात आले की भेट होत नाहीं. ते अद्याप काये ह्मणोन राहिले आहेत? त्यांनीं निघोन जावें. नाहीतर बरी गोष्ट नाही ह्मणौन सांगोन वरेवर रा केला. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

ता।
१ मुख्य पत्र
८ पुरवणी
९

¶*Raghunath Ganesh reports that the occupation of the fort of Kanamadi by Babuji Naik gave great umbrage to the Nawab, who desired his immediate retirement from the Karnatak. So great was his displeasure with the Naik that he refused even the customary interview solicited by the latter before retirement.*

No. 64] [*27-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. नवाब नासरजंगास स्वामीने पत्र लेहून थैली पाठविली होती तिचे जवाबांत नवाबाने पत्र लेहून थैली दिली ते सेवेसी रवाना केली आहे. छ २५ रोजी नवाबानें सेवकास खलबतांत बोलाऊन स्वामीचे सेवेसी ल्याहावयास आज्ञा केली कीं, आम्ही औरंगाबादेंत असतां रावजीस ल्याहावयाकरितां कितेक मजकूर तुम्हास सांगितले होते ते तुम्ही रावजीस लेहून पाठविलेत ते मजकूर त्यांस याद असतील. नवाबसाहेबाचे बंदगीमध्यें गेलियावर बाबू नायकाची फिकीर करितों, त्याजप्रो गोष्ट प्रत्ययास आली की नाही? याच कामाकरितां आम्ही या जिलेयांत आलो. येऊन त्याची पुरती फिकीर केली. बाबू नायकास पेस्तर उमेद बाकीस राहिली यैसे नाहीं. आम्ही रावजीस आपलें जाणोन जे बोलतो त्यास तफावत होऊ देत नाहीं. उभयता कैलासवासी स्वामीची नामें घेऊन बोलिले कीं, त्याजप्रो आम्ही यांस जाणतो. त्यानीहि त्याचप्रो आपले येतिकादास (?) बल (?) बराबर तफावत न करितां रोज बरोज येगानगत[1] वाढवावी. आम्ही या जिलेयांत आलों. आलियावर अबदूल मजिदखानास हाताखाले घातले. त्याजप्रो मुरारराव घोरपडे यास सामील करून घेतले. कडपे कर्नालकर व

---

१ ऐक्य.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

अरकाटवाले वगैरा सरकारचे तैनात आहेत, ते लवकरच येऊन दाखल होतील. या बादज फौजेचा थाट तमाम होईल. इनशालाहुतआला बादजबरसात जी जी कामें करणे आहेत ती ती हुजुरात येतील अमा[1] रावजीनें येक करावे की आम्हास कोठे मातबर काम पडिले, फौज घेऊन जावे लागले, खुसूस[2] गुजराथ सारिखे जिलेयांत तर पंनास हजार स्वारानसी पोहचोन काम सरबरा करावें. पुढें त्याचे हाताने कितेक उमदे मनसबे करणे आहेत. हाली कर्नाटचा बंदोबस्त राजे याजवलोन कस कसा होतो, पेस्तर सालचा विचार काय तो मजकूर रावजीने आम्हास लेहून व दोना[3] आदमी याबराबर सांगोन पाठवावा कीं तो जबानीने अर्ज करील. बादज येथूनहि कितेक मजकूर जुबानी सागोन पाठवणें ते पाठविले जातील. याजकरिता येक दाना माणूस जरूर पाठवावा. आम्ही तो बोलिल्याप्रो करून दाखविले. रावजीनेहि याचप्रो दिवसें दिवस श्नेह वाढऊन श्नेह निदर्शनास आणावा. याप्रो नवाबाने सेवेसी विनंती ल्याहावयास आज्ञा केली. व हे पुरवणी नवाबाने श्रवण केली व या मजकुराचा पारसी तरजुमा करून आपणाजवल ठेविला आहे. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh communicates to the Peshwa that Nasarjang, in a private interview, assured the writer that he would always remain loyal to his friendship and trusted that the Peshwa would entertain the same feelings towards him.*

No. 65] [*27-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. देवनहलीचे किलेयास श्रीरंगपटणकराचा मोर्चा सात आठ महिने होता. पटणकराचे कुमकेस मुरारराव घोरपडे यांचे भाऊ सुभानराव हजार राऊतानसी होते व दिलावरखान सिरेकर सातसे राउतानसी होते हे वर्तमान विनंतीपत्री लिहिले गेलेच आहे. नाइकानीहि दोन हजार स्वार देवनहलीवाले याचे उपरालेयास पाठविले होते. सेवट नाइकाची मदत न पोहचली तों पटणकरानी वैशाख शुद्ध प्रतिपदेस देवनहलीचा कोट घेतला तेव्हा सुभानराव मोकले जाले. नाईक हरपनहलीकडे आले हे बातमी त्यास होतीच. याजकरितां राव मारनिले जलदी करून निघोन मडकसिरे यांस मातुश्री लक्ष्मीबाईचे भेटीस आले.

---

१ पण. २ विशेषत: ३ जाणता; शाहणा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाइकानी कनमडीचा किला घेतला हे श्रवण जालियानें संतप्त होतेच. छ १८ रोजी प्रातःकालीं मडकसिरेयाहून फौजेसहवर्तमान निघोन येतां मार्गी नाइकाचे कहीची गांठ पडली. पचवीसतीसेक तटें कहीची सापडऊन नवाबाचे भेटीस आले तों छमारी नाइकांचे दुर्बुध्धीचा विचार काही नवाबास भासला होता, याजकरितां प्रातःकालीं नवाबानें ताकीद करून फौजा तयार करविली होती. ते फौज गोटा-बाहेर अदकोश कोशाचे दुफासलेयानें नाइकाचे रुखावर चहूकडे उभी होती. सुभानराव आलियाचा अर्ज नवाबास होतांच नवाबानें मिरजा माखान बकसीस पुढे पाठविले व येक अंबारीचा हती पाठविला. बहुमान करून हतीवर स्वार करून राव मारनिलेस भेटीस आणिले. गोविंदराव वकील नाइकाकडे रवाना जालेयावर मग यांचे भेटीचा प्रसंग जाला. भेट होतांच नवाबानें तीन वस्त्रे सिरपाव चौथी पासोडी व जिगा दिला. आगाडीस राहावयाची आज्ञा केली. राव मारनिले आपले गोटांत गेलियावर नवाबानें जियाफत सामान बहुत पाठ-विला. आंबे फणस नारळ यैसी मेवेजातहि पाठविली. यासिवाय दोन जोडिया छिटे व च्यार बारीक धुवट सेले पोशाकाकरितां पाठविले. सरकारचा दरजी पाठऊन पोशाक तयार करावयास फर्माविलें. छ १९ रोजी नाइकानी माघारे सा कोशांचे कूच करून कनमडीचे किलेयाखाले मुकामास आले. नाइकाकडील विष्णु नारायेण सिरेयाची कमावीस करून आला होता तो समेत कारकून पांच सात माणसें व दोन घोडियानसी व नाइकाकडील येक चोपदार व हजाम व उदमी वाणी हेहि दाहा पांच माणूस व नाइकानी बिदनुराव येक हरकारा ब्राह्मण पूर्वी पाठविला होता तो बिदनुराहून जाबसाल घेऊन आला. नाइकास काही खुशबईचें[1] तेल व अतर यैसा सामान त्याजबराबर व येक जोडी जासूद बिदनुर-कराचे समागमे होते यैसे सदरहूजण नाइकांचे फौजेत जाणार ते छ १९ रोजी प्रातःकाली जावयास निघाले. समागमे नवाबाचे तिघे कासीदहि बातमीकरितां चालिले. दोन कोश जमीन गेलियावर वर्तमान कलले कीं नाईक कूच करून गेले. विष्णु नारायेण तों तेथूनच माघारा फिरोन नवाबाचे लस्करात आला. बाकी पुढे गेले. पाहाडामध्यें गेलियावर घोरपडे याचे प्यादे मडकसिरेकर नाइकांचे परामर्षावर होतेच. त्याची यांची गाठ पडली ते समई याचा निर्वाहच करीत होते, परंतु नवाबाचे लस्कराहून आले याजकरितां धरून मडकसिरेयांत नेले. तीन दिवस कैदीत होते. चौथे दिवसी सोडिले. कागदपत्र व खुशबई जिनस व द्रव्य होते ते घेतले. वस्त्रानसी मात्र सोडिले. छ १९ रोजी नाईक कूच करून गेलियाची बातमी नवाबास कलल्लियावर नवाब दोन प्रहर जालियावर

---

१ सुगन्धी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कूच करून निघाले. स्वारी घोडेयावर फर्माविली होती. संध्याकालचा सा घटिका दिवस शेष असतां नाइकाचे तलावरच नवाब मुकामास आले. छ १९ रोजी नाईक कनमडीखाले गेले. ते दिवसी नाइकाकडील चौदा पधरा स्वार गुरे वलावयास गेले होते. त्याजमध्यें हैबतराव म्हणौन इंदापुराकडील राहा(णार) मातबर पूर्वी स्वामीचे सरकारी चाकर होता. आपले सरकारचीच दोन कडी सोनेयाची हाती होती. नाइकानी उंची जोडी येक दिली होती ते व त्याची अगोदरची येक येकूण चौकडा कानी होता व कंठी व पदक होते व घोडेयावर सामान कंडा-पटा व साखळी वगैरा बरेच होते. या राउतांची व मडकसिरेकर दाहा राऊत तलावेयास आले होते त्यांची गांठ पडली. मडकसिरेकर राउतास हे राऊत नाइकाकडील कलतांच त्यानीहि नाइकाचेंच नाव सांगितले. परस्परे सख्य जालें. त्यानी यानी मिलोन गुरें वलिलीं. वृक्षछायेस आलें. यावर नाइका-कडील राऊत फुटोन चहूकडे पांगले. सा राउतानसी मात्र हैबतराव राहिला हे संधी पाहोन मडकसिरेकर राउतानी हैबतरायावर भालेयाच्या जखमा केल्या. जलदी करून वस्त्राहरण करून देखील घोडी घेऊन मडकसिरेयास नेले. हैबत-रायावरावरील दुसरे राऊत होते. त्यानी हा कजिया पाहोन बाहेरचे बाहेरच पलोन गेले. हैबतराव येक रोज मडकसिरेयास होतो. मग लक्ष्मीबाईनी पाच सा जणास जिवदान देऊन सोडिले. नाईक कनमडीखाले आहे. किलेयाचा बंदोबस्त करावा तर लोक राहावयास रजावंद नाही. नवाब व घोरपडे पिछ करीत असता धर कसा धरवेल ? नाइकानी काही पैका खर्च करून गला किले-यावर चढविला होता त्याची सारावार करावयाकरितां नाईक किलेयावर जावयास निघाले तों लोकानी कजिया केला. लोकांस भासलें कीं हे किलेयावर गेले म्हणजे बलकाऊन राहातील. तेव्हा मोगलानें आम्हास लुटावे. नाईक आम्हामध्ये असलियानें आमचा उबर राहेल. आम्हास समजाविसीची व रोजमरेयाची व नालबंदीची उमेद राहिली नाहीं. आपला देश दृष्टीस पडेपर्यंत नाईक फौजेत असलियाने तटे संभाळून सुरक्षित घरास जाऊन या अर्थे नाइकांस किलेयावर जाऊ देत ना सारिखे जाले. नाइकास तों अवकाश नाहीं. प्रातःकाली उठोन गंतव्य केले पाहिजे. विलंब जालियावर नवाब परामर्षास येतील. अडचण पडली तेव्हां आबाजी नाइकी लोकांस समजाऊन आपण लोकाजवल राहोन नाइकास किलेयावर पाठविलें. नाइकानी गला घेववला तितका घेतला. राहिले-याची आशा सोडून फौजेत आले तो तेच रोजी सुभानराव याचे राऊत जाऊन कहीचा परामर्ष केला. दाहा घोडी आणिली. छ २० रोजी प्रातःकाली नाईक किला वोस टाकून कूच बारा कोशाचे करून मौजे पमसंदर पालेगराचे गावी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
मुकामास आले. नवाब छ मारी कूच करून निघाले ते मडकसिरेयाचे पश्चमेस किलेयाजवलोन कोशाचे दुफासलेयावर आले. तेथें पाहाडांचा खोंडा आहे. तेथे घोरपडेयाचा लाहानसा येक किलाहि आहे. तेथें येऊन फौज उभी केली. खासा नवाब शामियाना उभा करून उतरले. नाईक कांही राउतानसी कनमडी-खाले तलावर होते यांजकरितां मौकूफ राहिले. नाईक निघोन गेले यैसी बातमी येतां नवाब निघोन कनमडीखाले नाइकांचे तलावरच मुकामास आले हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports to the Peshwa that Babuji Naik being threatened by the joint forces of the Nawab and Subhanrao Ghorpade has evacuated the fortress of Kanamadi and is hurriedly retreating.*

No. 66] [*27-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. नवाब कनमडीखाले आले ते समई सा घटिका दिन शेष राहिलें होतें. किला नाईकानी वोस टाकिला. घोरपडे संतोषी होऊन आपले लोक किलेयावर स्वार केले. पटापटीची बैरंग[1] किलेयावर लाविली. नवाब किलेयाखाली आले. स्वारी उभी जाली. किला पाहो लागले. किलेयास बिंडे दोन आहेत. येक उतरेकडील उंच बालादस्त आहे. त्यास दोन परकोट. येक दरम्यानचा दुसरा सिखरचा. दक्षणेकडील बिंडा सपाटच. येकाच परकोटाचा किला काही कुबल आहे यैसें नाही. मर्द लोकी रक्षिला तरीच राहेल यैसा आहे. नवाब डेरेदाखल होताच खासाच किलेयावर स्वार व्हावयास निघाले तेव्हां खासा फौजेचे लोक किलेयावर चढविले. घोरपडेयांचे लोक काढिले. दोहो बिंडे-यांची बंदोबस्ती करून संध्याकालचा येक घटिका दिन शेष असतां पालखीत स्वारी न करितां पायउताराच सुभानरायासुधा किलेयावर स्वार जाले. स्वार होतां रहकलेयांवरील तोफांचे आवाज पंधरावीस करविले. किलेयावर बरंकदाजी फर्मा-विली व समागमे बंदुकाचे आवाज बहुत जाले. किलेयावर जाऊन पायउताराच दोनी बिंडे फिरोन किला पाहिला. आपले ठाणे किलेयावर काईम करून चहू घटिका रात्रीस मसालांचे उजालेयाने किलेयाखाले आले. नवाबाने किला काईम केला याजमुलें घोरपडे श्रमी जाले. छ २१ रोजी प्रातःकालीं नवाबानेहि बारा कोशांचे कूच करूनं नाइकांचे तलावर तल घालून प्रहर दिवस शेष असतां मुकाम

---

१ बैरक = निशाण.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

केला. नाईकानी त्या गावाजवलोन पांच सातसे रुपये घेऊन बारा कोशाचे कूच करून गेले. नवाबास वर्तमान कलताच नवाबाने त्या गावाजवलोन दोन हजार रुा घेतले. गाव मातबर आहे. बागाईत नारली पोफलीचे च्यार पांच बाग बेश आहेत. छ २२ रोजी नवाबानी बारा कोशांचा कूच करून मौजे मलकनूर प्रांत चित्रदुर्ग येथे येऊन नाईकांचे तलावर तल घालून मुकाम केला. इा छ १९ ताा छ २१ रोज तीन दिवस नवाबाने घोडेयावरच स्वारी केली. येकविसावे रोजी स्वारींत डोईस टोप घातला होता व कमरेस मोठी पेटी बांधोन खांदेयावर बंदुक घालून स्वारी केली. छ २२ रोजी स्वारी हतविर केली होती. छ मारी नाइकाकडील लोक मडकसिरेयांत कैदीस होते ते सुटोन येऊन नवाबाचे लस्करांत दाखल जाले. छ २३ रोजी नवाब कनमडीखाले आले. ते दिवसीं मार्गामध्यें साहा मुर्दे आढलले. मार्गावरच लंगोटीचोलणेयानसी पडिले होते. बरकंदाजीने मारिले. तेहि नाइकाचेच फौजेमधील होते. सुभानजीराव घोरपडेयांची व नवाबाची भेट जाली हे वर्तमान सुभानराव यांनी मातुश्री लक्ष्मीबाईस जासुदाबरोबर सांगोन पाठविले. त्याजबराबर नवाबाने आपलें येक जोडी पाठविली होती. त्या जोडीस लक्ष्मीबाईने दोघांस दोन कडी रुप्याची दिली व दोन मुंडासी दिली व बारा रुपये इनाम दिले. सेवेसी श्रुत व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. हे विज्ञापना. छ २२ रोजीं नवाबानें कनमडीचा किला सुभनराव यांचे हवाले केला. आपले लोक काढिले. हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh writes to the Peshwa that the Nawab greatly displeased his ally Subhanrao Ghorpade by occupying his fort of Kanamadi recently evacuated by Babuji Naik. The writer, at the end of the letter, adds that the Nawab afterwards restored the fort to Subhanrao.

No. 67] [*27-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. दिलावरखान सिरेकर याजकडे नाईकानी सिरेयांचे खंडणीकरितां बालाजी हरी वकील पाठविला होता. तो खान मारनिलेकडे गेला. पत्र देऊन बोली केली. खान मारनिलेने नाईकाचे भय धरिले. निमित्य की नाईकानी पूर्वी सिरेयांची पेठ जालिली होती. याजकरितां खान येही

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
बाळाजी हरीस सिरपाव, तीन वस्त्रें व पंधरा होन खर्चास दिले व आपणाकडून येक वकील दिला. नाईकास वस्त्रें व पत्र देऊन सिरेयांची खंडणी चुकवावया-करितां रवानगी केली. ते दोघे वकील किले रतनगिरीस आले तो ते दिवसी नाईकाचा मुकाम रतनगिरीचे दक्षणेस कोशाचे अंतरायानें होता. रतनगिरीहून वकिलाने नाईकास भेटावयास यावे तों नवाब नाईकावर येतराज जाले हे गुण-गुण सिरेकर वकिलास कलतांच रतनगिरीस पाय खोचून राहिला. बालाजी हरीने जावयाचा आग्रह केला परंतु आज जाऊ, उद्या जाऊ म्हणौन प्रतारणा करून राहिला. बालाजी हरीने आपली वस्त्रे व होन त्या वकिलाजवल ठेऊन निघोन नाईकाजवल आला तो नाईक माघारे कूच करून निघाले. आतां नवाबाजवल वकील पाठवावयास पाहिजे. गोविंदराव वकील मुकरर होता तो तर नवाबाकडे न येसा जाला. घरी जावयाकरिता रजा मागो लागला. तेव्हां नाईकानी बालाजी हरीस नवाबाकडील वकिली करार करून येक तट्टू व दोन जोडिया जासूद व नवाबास अर्जी देऊन रा केला. वकील मार येणे नवाबाचे लस्करास यावें तो आपली वस्त्रें व होन आणावयाचे आशेस्तव रतनगिरीस गेला. तेथे खानाकडील वकील होता त्यासी यासी कजिया जाला. सेवट बालाजी हरीने वस्त्रें व होन हस्तगत करून निघोन छ २२ रोजी येऊन नवाबाचे लस्करांत दाखल जाला. खान मारनिलेकडील वकील नाईकास पत्र होतें व वस्त्रें सिरपाव होते ते घेऊन माघारा खानाकडे गेला. बालाजी हरीने मिरजा मांबकसीची भेट घेतली. बकसीनेच थैली नवाबास रुजू करून, वकील आला आहे म्हणौन विदित केले. छ २३ रोजी नवाब कूच करून निघाले ते कल्याणदुर्गावरून पालेगरांचे पाहाड सोडून बारा कोश मजल करून वेदवती नदी उतरोन तीरीं मौजे मलकापुरास मुकाम केला. छ २२ रोजी नाईकाचा मुकाम जजरमदलीवर होता. नवाबाचे मुकामास व नाईकांचे मुकामास दिडा कोशाचे अंतर राहिले. ते दिवसी नवाबाचा तलावर तल जाला नाहीं. नवाब माघारेच राहिले. नवाबाचे लस्करामध्ये काही हाल राहिला नाहीं. तेविसावे तेरिखेस मार्गी येतां नवाबाचे लस्करचे घोडे तीस वाटेमध्ये राहिले व काही उंटे व बैल राहिले. लांब मजली जाल्या याजमुलें मोगली लोक हैरान फार आहेत. बंदगानआलीने खर्चास देविले ते आद्याप लस्करास पावले नाहीं याज-करितां सिपाई दुर्भाषणे मानमाने तैसी करितात. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh writes to the Peshwa about the claim for tribute from the province of Sire preferred by Babuji Naik, and details the movements of the Nawab's army in the vicinity of Kalyandurg.*

3062

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 68] [*27-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत-
प्रधान स्वामीचे शेवेसी

कृतानेक विज्ञापना. छ २४ रोजी नाईक बारा कोशांचे कूच करून रायदुर्ग डावे हाते टाकून गेले. नवाब कूच करून आले. नाइकांचे तलापासोन च्यार कोश माघारेच मुकाम करून राहिले. नवाबास व नाइकास सोला कोशांचे अंतर राहिले. नाइकानी तालिकोटेयास छावणी करावयाचा निश्चय केला आहे म्हणौन वर्तमान नाइकाचे फौजेतून आले. नाइकाबराबर छावणीस फौज येकंदर राहत नाहीं. अवघे देशास जाणार. खासा पागेचे घोडे शे दोनशानशी नाईक छावणी करणार. सातारेयास तो जात नाहीं या प्रकारचें वर्तमान आहे. छ २५ रोजी दोन कोशांचा कूच करून मुकामास नवाब आले. छ २३ रोजी नाइका-कडील वकील बालाजी हरि याणें मिरजा माखान बकसी याचे मारिफत नवाबाची मुलाजमत केली. नवाब बहुत रागास आले कीं, नाईक काये म्हणौन जलद माघारे जात नाहीं? गोविंदराव व बाबूराव केतकर काय करारमदार करून गेले? गोविंदराव वकील काय म्हणौन न आला? नाइकाची अकल का गूम जाली म्हणौन बहुत प्रकारें बोलिले. थैलीचा जाबसाल दिला नाहीं. छ २४ रोजी नाइकाकडून जासूदजोडी नवाबास थैली घेऊन आली. त्या जासुदानी वकिलाखेरीजच थैली गुजरानली. नवाब रागास येऊन थैली पाहिलीहि नाहीं. वकिलासहि दिवाणखानेयात यावयास मौकूफ केले. या प्रकारचे वर्तमान आहे. नादीरशाहाची फौज लाहोरदाखल जाली. दिलीपैलीकडील प्रांत फुटो लागला म्हणौन येथे खबर गरम आहे व येथे अफवाई खबर आहे की नवाब असफज्याहास नादीरशाहाचे वर्तमान कलले त्याजवरून गडबडले आहेत. नासरजंगास लेहून पाठविले आहे की तुम्ही येक बाहान पैदा करून जलद निघोन शहरास येणे याजकरितां नासरजग बाबू नाईकास काढून देऊन आपण शहरास जात आहेत म्हणौन यैका मातबराचे मुखे वर्तमान आईकिले. सत्य मिथ्य म्हणवत नाही. आढलले वर्तमान सेवेसी विनंती लिहिलीच पाहिजे. नवाब तुंगभद्रेपर्यंत जातील. पुढें विचार असेल तो सहजेच कलेल. नवाबाने तीन रोज घोडेयावर स्वारी केली व पायउतारा कनमडीचा किला पाहिला. याज-करितां नवाबाचे शरीरी आज दोन तीन दिवस स्वस्थता नाहीं. पडसा जाला आहे व आंगास मांदगी आली आहे. सेवेसी श्रुत होय. हिदायत मोहिदीखान मुजफरजंग हनुमंतसागराजवल कोणी गाव आहे त्यास लागले आहेत. मोर्च-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बंदी केली आहे म्हणौन वर्तमान आहे. कडपे कर्नालवाले नवाबाचे तैनात जाले आहेत परंतु अद्याप लस्करदाखल जाले नाहीं. सिरेकर दिलावरखान देवनहलीचे काम जालेयावर निघाला तो हुसकुटेयांकडे आपले जिलेयांत आहे. अद्याप नवाबाजवल आला नाहीं. नवाब आसफज्याहानें पांच लाख रुा अरकाटावर तनखा करून नवाब नासरजंगास लस्करचे तलबतनखेयाकरितां देविले तो पैका आणावयास नवाबाने तुंगभद्रातीर दाखल होताच सर्जावल[1] पाठविले होते. अनवरदीखानाने आपले बेव्यासमागमे खजाना रवाना करविला तो येत आहे म्हणौन वर्तमान होते तो पैका अद्याप आला नाही. रतनगिरीकर पालेगराचे वकील इसरापा व बाबूराव व हुसैनखान नवाबाकडे आले आहेत. त्यांची मुलाजमत छ २३ रोजी रात्रौ जाली. सेवेसी श्रुत जाले पाहिजे. छ २६ रोजी नवाबाने मुकाम केला. रायेदुर्गवाला नवाबास भेटावयास येत आहे. त्यास आणावयास नवाबाने अर्जबेगीचा पेशकार बलभराम पाठविला आहे. छ मारीच अबदुल गफूर सावनूरकर सावनुरास रा जाला. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports that men are deserting the Naik in large numbers and all his hopes of quartering in the Karnatak during the monsoon have been wrecked. News has been received of the advance of Nadirshah's forces upon Delhi in consequence of which Nasarjang is requisitioned to hurry towards Aurangabad.*

No. 69] [*27-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. नाइकांचा यैवज मुजफरजंगाकडे येक लक्ष तीस हजार रुा येणे. त्याचे वसलावर व्यंकटराव वकील नाइकानी मुजफरजंगाजवल ठेविला आहे. नारो यादव भिडे देशपांडे नसरापूरकर यांचे कर्ज नाइकाकडे नवद हजार रुपये आहेत. मारनिले नाइकाबरावर आहेत. नाइकानी सदरहू कर्जपैकी पंनास हजार रुपये अदवानीवर देवविले. नारो यादव येहीं आपला ब्राह्मण पैकेयाचे वसलास व्यंकटराव वकिलाकडे पाठविला. मुजफरजंगाने पंनास हजार रुा

---

१ वसूल तगादा करणारा ; ढालाईत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
रायेचुरावर तनखा करून दिले. रायेचूरकराने पंनास हजार रुा आपले माणसा-बराबर व्यंकटरायाजवल पाठविले आण लिहिले की आमचा दस्तायैवज मुजफरजंगाजवल गुंतला आहे तो काढून पाठवणे आण पैका आपले जिमे करून घेणे. पैका व्यंकटराव याजवल आला. व्यंकटराव मुजफरजंगाजवल जाऊन रायेचूरवाले याचा दस्तायैवज मागो लागला, तेव्हा मुजफरजंग बोलिले की पैका कोठे आहे? व्यंकटराव बोलिला की पैका सावकाराचे पदरी पडिला. परंतु दस्ता-यैवजाचा उजूर आहे. दस्तायैवज आला ह्मणजे पैका जिमेस लागेल. हे वर्तमान कलताच मुजफरजंगाने माणसे पाठऊन पैका आपले खजानेयात दाखल केला आण रायेचूरकराचा दस्तायैवज दिला. व्यंकटराव यैवजाकरिता बजीद जाला त्यास बोलिले की तुह्मास दुसरा यैवज देविला जाईल. नाइकाची फौज फुटली, वजन हलके जाले, याजमुले मुजफरजंगाने हात आटोपिला. आता त्या पैकेयाविसी नारो यादवाने नाइकास हटकिले. नाईकासी अर्जी करून बालाजी हरि वकिलाबराबर पाठविली. नारो यादवाचा ब्राह्मणहि वकिलाबरोबर आला. नवाबाजवल वकिलाचा जाबसाल येथास्थित होत नाही. तेथे ताकीदपत्र येणे संकट यास्तव नारो यादवाचा ब्राह्मण निघोन आदवानीस गेला. त्या ब्राह्मणाने सविस्तर वर्तमान सदरहूप्रमाणे सेवकास सांगितले ते सेवेसी विदित व्हावयाकरिता विनंती लिहिली आहे. सावनूरवाले याकडून अबदुल गफूरखान वकिल नवाबाकडे आला होता ते वर्तमान विनंतीपत्री सेवेसी लेहून पाठविलेच आहे. प्रस्तुत त्याची रवानगी नवाबाने केली. येका दो रोजा जाईल. छ २५ रोजी सेवकहि त्यांचे डेरेयास गेलो होता. वर्तमान मनास आणितां बोलत होता की, आमचे नवाबाने आसफज्याहची मुलाजमत दोन च्यार मर्तबे[1] केली. लेकीन नासरजंगाची मुलाजमत न केली. आसफज्यानी लेहून पाठविले कीं तुम्ही आमचे मुलाजमतीस न आलेस; असो. नासरजंग त्या तर्फेस आले आहेत त्यांची मुलाजमत करणे तेव्हां भेटीस यावे लागेल. परंतु कितेक गोष्टीचा बंदोबस्त करणे याजकरितां आम्हास खानानी पाठविले. आम्ही येऊन आपले खावंदाचा मतलब यांस सागितला की कांही आम्हाजवल न मागावे. आम्हास बहुत दिवस न ठेवावे. ताजीमत[2] करिमेत गौरव करावें. आम्ही तुमची रिफा[3] करून काजकाम सांगाल ते करूं. तुम्हीहि आमची मदद इमदाद[4] करावी. आमचे जिलेयात कितेक पालेगर नरगुंदवाला वगैरा शरारत[5] करितात त्यास खुद मुतवजे[6] होऊन तंबी करावी. आम्हास आपले जाणावे. हुजूरमध्यें आमचें साहिल्य करून आमचे बेटेयास मनसब आणवावी

---

१ मरातब = गोष्टी; मजकूर. २ ? ३ रिफाकत = स्नेह.
४ साहाय्य. ५ ? ६ उद्युक्त.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh.
म्हणौन व आणखी खानगी गोष्टी कितेक सांगितल्या तितक्या नासरजंगाही कबूल केल्या. बहुत मेहरबानी केली. बोलिले की, खानानी आम्हास भेटावें, आम्ही त्यांचे गौरव करून आम्हास कितेक कामें करणें आहे ती करून तिकडे येऊन तुमचे तर्फेस कोण्ही सरकश असतील त्यांस तंबी करून म्हणौन फर्माविले. आमची रवानगी केली. आम्ही गेलियावर खानहि भेटावयास येतील म्हणौन बोलत होता ते वर्तमान सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहा आहे. हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports to the Peshwa the substance of a conversation between the Vakil of the chief of Savnur and Nawab Nasarjang.*

No. 70] [*27-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. सावनूरवाले याकडून अबदुल गफूरखान व लालचंद मुनसी दोघे पालकीनिशीन छ १६ जमादिलोवली नवाब नासरजंगाचे लष्करांत प्रातःकाली दाखल जाले. त्यांचे भेटीस सेवक गेलो होतो. त्यास पुसिले की तुमचे खान नवाबास भेटीस येतील कीं काय? ते बोलिले की, आम्हास येथे कितेक मजकूर सांगोन पाठविले आहे त्याचा जाबसाल जाला पाहिजे. जाबसाल जालियावर आमची रवानगी जाली तर आम्ही जातो. अगर आम्हास ठेऊन घेतले, जाबसाल रा केला तर येख्तियार आहे त्याप्रो खान येतील. मध्ये येतील यैसे नाही. दर खजमत अजम भाऊसाहेबास आमचे खान भेटले याजमुलें नासरजंग यांस वाईट लागलें. कितेक प्रकारे बोलत होते. याजकरितां येथे हरयेक गोष्टीचा मुनकता[1] होऊन साफ जाबसाल उगवेल तेव्हाच खान येतील. बाबूजी नाईक आम्हाकडे बाकी आहे म्हणतो. त्याचा आम्ही तिरुका लागत नाही. त्याणें आम्हासी दगाबाजी केली ते गोष्ट आलमावर रोशन[2] आहे. कदाचित खान येथे आले आण बाबू नाईकाचे बाकीचे झट लागले तर काय करावें? याजकरितां संदेह. नासरजंगाचे व नाईकाचे अंतर कसें आहे हे कलत नाहीं. याचा शोध पुर्ता करू तेव्हा खान येतील. खानानी तुमचे धण्याचा भरवसा पुरता केला आहे म्हणौन बोलत होता. ते सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सुबाराव घोरपडे नवाबास भेटावयास येणार. आज उद्या भेट होईल. नाईकाकडील

---

१ मुनका = फैसला. २ स्पष्ट.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

शंकराजीपंत याणे श्रीरंगपटणवाले यांचे किलेयास भेद करून दोन किले घेतले ते वर्तमान पूर्वी विनंतीपत्री तपसीलवार सेवेसी विनंती लेहून पाठविली आहे. त्या दोहो किलेकरानी नाईकाचा किला सिदगड घेतला. नाईकानी कनमडी घेतले. येकूण च्यारी किले मुतशीलच[1] आहेत. सेवेसी श्रृत जाले पाहिजे. आता नाईकास किलेयाची रखवाली करणे मुस्कील आहे. श्रीरंगपटणकराचा जाबसाल आद्याप फैसल नाहीं. व्यंकटराव वकील याचा कबिला नवाबाने सिरेयांत ठेवविला. त्यानी बाहेर पेठेत ठेविला होता तो कबिला नवाबाने हुकूम करून सिरेयांचे कोटांत ठेवविला म्हणौन मारनिलेचा गुमास्ता सांगत होता. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. छ १८ राखरचे पत्र राजश्री बगाजीपंती सेवकास पाठविले त्यांत लिहिले आहे कीं, छ ३ रोजी निजाम आलीखान असदजंग वाजरेवर[2] नवाबास भेटले. सुलतानजी निंबालकर व जानोजीराव व सेख आलीखान जुनैदी यास रुसखत देऊन नवाब धारूरचा घाट चढोन औरगाबाजेस जाणार. सेवेसी श्रृत होये. चित्रदुर्गवाले याजकडील वकील नवाबाकडे प्रस्तुत आला आहे. रतनगिरीकर पालेगराने नवाबाकडे वकील पाठविला. जियाफत[3] पाठविली आहे. सेवसी श्रृत जाले पाहिजे. कडपेकर व कर्नालकर दोघे जण नासरजंगाचे तैनात होऊन आले. रायेचुराजवल आलियाचे वर्तमान आले आहे. मुजफरजंग अदवानीस गेले ते येत नाहीं. सेवेसी श्रृत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh, writing from the camp of Nasarjang, informs the Peshwa that two agents of the Chief of Savnur have come to interview the Nawab, and refers to the activities of Babuji Naik in the Karnatak.*

No. 71] [*27-5-1747*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. स्वामीची आज्ञापत्रें छ ५ जावलची बराबर संभाजी व दर्याजी जासूद सादर जाली ती छ २६ रोजी तृतीय प्रहरी प्रविष्ट जाली. स्वामीने चोपदारास दोन रोजमरे यो रुा १० व जासूदजोडीस दोन रोजमरे यो रुा २० येकूण रुा ३० तीस पाठविले ते पावले. स्वामीचे आज्ञेप्रो येथील वर्तमाने आढलल्याप्रो सविस्तर अलाहिदा विनंतीपत्रांचे पुरवणियांत सेवेसी लेहून पाठविली आहेत त्याजवरून विदित होईल. सेवकास आज्ञा की, तुम्ही दोन महिने राहाणे. मागाहून

---

१ मुतसील = ताब्यांतील. २ मांजरेवर. ३ नजर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दुसरा पाठऊन तुम्हास आणविले जाईल. स्वामीचा आज्ञा ते प्रमाण. सेवक आज्ञेप्रा नवाबाजवल आहे. नवाब नासरजंग सिरेयासच छावणी करितील. श्रीरंगपटणवाले याचा दुलकता (?) अद्याप चुकला नाही. नवाब युक्तीनेंच पालेगरांस हाताखाली घालीत आहेत. मुरारराव घोरपडेहि भेटीस येतील यैसें आहे. प्रस्तुत तों काजकामाचे दिवस राहिले नाहीं. चातुर्मासानंतरे काय करणें ते करतील. रामचंद्र चोपदार सरकारचा सेवकाचे तैनात आहे. काजकामांत बहुत खबरदार आहे. हरयेक वर्तमान आणावयाकरितां मेहनत करीत आहे. इजाफेयाचा उमेदवार आहे. सेवेसी श्रृत जालें पाहिजे. प्रस्तुत नवाबाचे लस्करांत दर रुपयास खुर्दा आलमगिरी तीस पैसे व कणीक पांच सेर, पीठ सात सेर, हरभरे नवदाहा सेर, जो(री) अकरा बारा सेर, तूप पावणेदोन सेर याप्रो आहे. सेवेसी श्रृत व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. नाईकाचे लस्करांतून येका ग्रहस्ताने सेवकास चिठी पाठविली. होती ते मागील विनंतीपत्राबराबर रवाना करावयास लिहिली. प्रस्तुत पाठविली आहे, त्याजवरून विदित होईल. दिलावरखानाकडील वकील रतनगिरीहून माघारा खानाकडे जात होता त्यास दिलावरखानाची ताकीद जाली की नाईकाकडे जाऊन मामलियेत चुकावणे. त्याजवरून वकील माार निघोन छ २६ जावली नाईकाकडे जावयाकरितां नवाबाचे लस्करास आला. येका दो रोजा नाईकाकडे जाणार आहेत. नाईक प्रस्तुत तुंगभद्रा उतरत आहेत. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh informs the Peshwa that Nawab Nasarjang has decided to encamp at Sire and that Murarrao Ghorpade will shortly come to pay a visit to him.

No. 72] *[26-6-1747?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री गोपालराव केशव

स्वामी गोसावी यांसी

पोष्य बाबूराव सदासिव नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणें विशेष. तुम्ही फौजसुधा तेरेजवल मुकाम केला आहे म्हणोन कललें. त्यास आमचा मुकाम नलदुर्गासमीप आहे. तरी तुम्ही फौजसुधा सत्वर पत्रदर्शनी भेटीस येणे. जाणिजे छ २६ जमादिलाखर. पत्रदर्शनी स्वार होऊन येणें. बहुत काये लिहिणें हे विनंती.

¶Babuji Naik Joshi, who is camping near Naldurg, asks Gopalrao Keshav to join him immediately with his forces.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामी

व ता राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो विठल दिमत राजश्री नागो राम चेरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विनंती विज्ञापना. तागाईत छ २१ सफर बुधवार प्राथकाळ मुकाम सेहर अवरंगाबाद येथे स्वामीचे कृपादिस्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. छ १८ मजकुरी नवाब असबज्याह व नासरजंग व सैदसरीफखान व सैदलस्करखा व हिदायेदमोदिखा वगैरे बसून अडीच प्रहरपरियेंत खलबत केलें. मजकूर केला कीं, हिदायेदमोदीखास भागनगरची सुबेगिरी नवी दिधली व पहिली खिजमत अदोनी व रायेचूर व विज्यापुरची सुबेगिरी बाहाल ठेवली. नासरजंगास अवरंगाबाद व बऱ्हानपुरची सुबेगिरी मोकरर केली यैसा निछय केला. दुसरे दिवसी छ १९ मिनहूस नासरजंग रुसून बसले. कारण की हिदायदमोदीखास नवी खिजमत भागनरची दिधली म्हणोन नासरजंग अजुरदा जाहाले. छ २० रोजी नवाब असबज्याही सैदलस्कखानास व पुरणचेंदास व हाकीमजीस नासरजंगाचे समजाइसीस या तिघा जनास पाठविले. कांही केल्या नासरजंग समजत नाही. हिदायेदमोदीखास भागनरचे सुबेगिरीची वस्त्रे अद्याप दिधली नाही. नवाब असफज्याह हस्तनापुरास जाणार म्हनोन तजवीज आहे. छ २९ सफरेस सेहरीहून कूच्य करणार. लक्षमण खंडागळा हजारा फौजेनसी सेहरी दाखल जाला. छ १८ सफरेस नवाबाची मुलाजमत जाली. कडप, करणूल वगैरे पठाण नासरजंगासमागमे आले होते त्यांसी राहावयांसी सहरात नवाबाही हवेलिया दिधल्या. पुरणचेंद दिवान यासी पाच संदी मनसब नवाबाही दिधली. दोन हजार फौज बक्षीच्या समागमे देऊन बाळापुरास खजाणा आणावयासी पाठवितात. स्वामीस कळावे. विशेष काये लिहिणे हे विज्ञापना. हिदायेदमोदीखास नवाबाही माही व मरातब दिधले. श्रुत होये.

¶*A letter from Aurangabad, written by Naro Vithal to the Peshwa and his brother, which, among other things, contains the news of the appointments of Nasarjang and Hidayet Mohidikhan to the subhas of Aurangabad and Burhanpur and Hyderabad respectively and of the arrangements that were to be made for the intended departure of the Nizam to Delhi.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नागो राम चेरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ ७ रबिलाखर मुा वामोरी येथे स्वामीचे कृपादिष्टींकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विशष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते घरास छ १ मिनहून पावलो. आनीक आठदाहा दिवस राहून सेवेसी येऊन पोहचतो. येते समई आज्ञा केली होती की, पोवाराचे वर्तमान, कोठे आहे, मनसुबा काये करितो हे सर्व यैकाल ते लिहून पाठवणे म्हणून आज्ञा. त्यांस येथे बामोरीजवल डोंगरगणास शांदीडशा रावतानिसीं होता. तीन मुकाम होते. चवथे दिवसी आमवासेचे आधले दिवसी कुचे करून खानदेशांत गेला. ते प्रांती फतेपुरी रा उदाजी पवार व आपण मिळोन काही फौज व कोली व भिल मेलऊन धारेस जाऊन धार जुजवावी हा याचा मनसुबा आहे म्हणून ये प्रांती येका दो जागा वर्तमान यैकिले. पूर्वीहि सेवेसी लिहून पाठविलेच आहे. शहरचे वर्तमान सयेदलस्करखान शहराबाहेर निघाले आहेत. नासकाचे रोखे जाणार. नासिक प्रांती उमाबाई दाभाडीन उपद्रव करिते यासतव सेह दिला आहे. रा जानोजीराव निंबालकर याचीहि फौज अगोधर काही थोडीवहुत रवाना केली. खानहि मागाहून जाणार. नवाब आसफज्या बुऱ्हाणपुरास दाखल जाहाले. पुडे हस्तनापुराकडेस जाणार म्हणून चरचा मात्र आहे. यैकिले वर्तमान सेवेसी लिहिले. हे खेडेगावचे वर्तमान. सतेमिथे ईश्वर जाणे. यैकिले ते सेवेसी लिहिले आहे. आपण बामोरीस घर बांधणार त्यांस लाकडे पाहिजेत. यैसियास, जेऊरास बाबली वगैरे रायेवल लाकडे मिळतात. कृपालु होऊन रा जानोजी निंबालकर यास पत्र आले तरी चालीसपनास लाकडे मिलतील. कृपा करणार मायेबाप आहेत. मी येथे आहे तवरच पत्र आले तरी मीच येथून जानबास पावते करून त्यांचें पत्र कमाविसदारास जेऊरी आनवीन आनि घरास काम लाऊन सेवेसी येईन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Nago Ram, writing from Wamori, communicates to Sadashivrao Bhau the news of the activities of the Powars, the Nizam, and Said Lashkarkhan. The Nizam, he writes, is at Burhanpur and Said Lashkarkhan has left Aurangabad and is marching towards Nasik.

3070

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 75] [*May 1748?*

श्रीनिवास

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचें सेवेसी

विनंती. पोष्ये केशव रघुनाथ कृतानेक सांा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा वैशाख शुधपर्यंत येथास्थित जाणऊन स्वकीय कुशलादि लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन परम समाधान पावलो. दरबारचा व आणखी कितेक अर्थ राजश्री गोविंदरावजी यांचे पत्रीं निरोपिला त्यावरून अवगत जाहला. इकडील वृत तर मातुश्री उमाबाई व सेनापति सेनासमुदायानसीं कांहीं दिवस नांसिकी वास जाला. आता कद्रू नदीवर आहेत. मनसबा व बंदोबस्त जो आहें तो अपूर्वच आहें. त्याचा तपसील काय लिहावा ? सारांश आपल्या पूजाफलानें भोग्य तो भोगितात. अधींच सर्व अशाश्वत; त्यांत अनीतिच अशाश्वत म्हणावें लागतच नाहीं. अस्या प्रसंगांत राजश्री गोविंद-रावजी आले आहेत. हे आपल्या बुधियुक्तीनें धावती करणें ते करितात. राजश्री माधवराव यांस आणिलें. याउपरी राजश्री दमाजी गायेकवाड यास आणून मामलत विल्हे लाऊन हरकसा आपला उलगाडा करून यावयाच्या धावतींत आहोंत. नवाब निजामनमुलुक अद्यापि बऱ्हा(ण)पुरावरीच आहेत. तेथून राजश्री सुमंत पंत आले तो अर्थ तपसिलें रावजीनी विनंतीपत्रीं लिहिलाच आहे. खुलासा वृधाचा पाहतां सांप्रत सर्व लक्ष उत्तरेच्या मनसबियावर ठेऊन तेथें कसें कसें होते हें पाहावें आणि बहुत असह्य श्रीमंताच्या उत्कर्षाचे व फौजसहित जाणें जालें. हुजूर यांची भीड पडेल, त्यानंतर हुजूरहि आपलें द्वेषी आहेतच, ते श्रीमंतास अनुकूल होतीलच आणि श्रीमंतांचे मनांतहि सांप्रत विशम आपणांविशयीं आलेंच आहे. येवंप्रकारे करून कांही उत्पात निर्माण होईलच व पठाणचे लोक आले आहेत, पादशाही फौजहि त्यांवर गेलीच आहे. यांचा जये पराजये कसा काय होतो व त्या लढाईस श्रीमंत सामील होतात कीं हे गेल्यापूर्वीच जूज उरकतें, हें कसें होते हे पाहतात आणि नवी जिनसी तयार करवितात. जागां किल्यांनी गाडे व तोफा तयार करवितात. बैलांच्या खरिद्या जागांजांगां करविल्या आहेत. बहुतसे साशंक होऊन धावतींत आहेत. आणी चर्चाहि करीत होते. म्हणें कीं हें गेले आहेत यांच्याहि चितांतहि उत्पात आहे. व तेथें मनसुरअलीखानांच्या चितातहि उत्पात आहे. कदाचित त्यांचा यांचा योग होऊन आलेच तर न कळे. परंतु हे मनसबे-बाज आहेत असा किरकुल मनसबा न वरित व त्या मनसबियास आपणहि लेखितों यैसे नाहीं. न कळे कदाचित मुख्यांचे संतानयुक्त सेना समारंभेंकरून आली यांच विचार आहे, अस्या कल्पना करितात. बातमीत सर्वदा आहेत व चालणेतहि

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहेत व अने(क) प्रकारच्या कृत्रीम धावतीतहि आहेत असें वृत जें अढललें तें सेवेसी लिहिलें. चितास आलियां श्रीमंतास यांचा भाव सुचवणें तो सुचवावा. स्वामीस विदित जाहलें तें श्रीमंतांसच जाल. दुसरे वृत वृधांचे चितांत स्वामीसी ममत्व वाढवावें हेहि आहे. परंतु सांप्रतच्या प्रसंगी पुण्यास जे उभयेता सभ्य आले त्या दिवसांपासून त्यां उभयतांतूनच भेद निर्माण होऊन जे आपले बहुतां दिवसांचे श्नेहित त्यांणींच वृधांस अणिखी लिहिलें तेथे आणखी सांगितलें येणेकरून असा भास जाला. अद्यापि तरी वृधाचे चितांत आहेच, जर हे माहास्थलास गेलियास तेथून उत्पात न करितां आपले स्वकीय प्रयोजनच जें साधणें तें साधून येतील तर सहजच उभयपक्षीं स्वच्छता जाली. सर्व किंतु सहजांत तुटले असाहि भाव आहे म्हणे. त्यांचे अंत:कर्ण कोण्हास कळणार! तत्रापि चिताचा भाव झाकत नाहीं. जो अढलला तो लिहिला आहे. जयेसिंगाच्या पुत्रांसींहि येतदुदेशेंच परम मित्रता आरंभिली आहे. सांप्रत तेंच हरोल आहेत. जये त्यांचाच आहे असेहि म्हणतात म्हणे. आणि स्वराज्यांत अनेक सरदारांसीं इष्टत्व आणि बनल्यानें मुख्यांचे आपले दर्शनहि व्हावे हेंहि मानस साहे. इत्याद्यभिप्राय यांणी आमच्या मित्रत्वास्तव सांगितलें आहेत. तर पत्रे पाहून गोप्यतेत आणांवीं. आमचे स्वकीय वृत तर आम्हांस स्वामीच्या कृपासंपाद्याहून अन्य अधिकोत्तर नाहीं. स्वामीनी कृपा केली ते विस्मर होत नाहीं. येथे आलिया दिवसापासून तो आधीच स्वामीची केली ममता व तें रीति व मनुश्यपरीक्षेंचा विचार सर्व स्मरतो. जसें उन्हांत गेलियावर छायाचें सुख स्मरते तद्वत स्वामीची कृपा येथें आलियावर कलों आली. लाभालाभाची चिंता आहे असे नाहीं. तो जो आपला भाग तों येईलच परंतु रीतीची स्थिति लिहिली आहे. जे आहे ते कालासारखे बरेच आहे. सर्वदा आज्ञापत्रीं सांभाल करावयास स्वामी समर्थ जाहेत. विदित होये. कृपा पूर्ण असावी हे विज्ञापना.

¶*Keshav Raghunath reports to Bhausaheb the apprehensions of the Nizam caused by the Peshwa's expedition in the North. He also refers to the movements of Umabai Dabhade.*

No. 76] [*1748?*

श्री

पुा श्रीमंत माहाराज राजश्री

पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विज्ञप्ति ऐशीजे. मजला येथे राहून दोन वर्षें जालीं. प्रस्तुत नवाब छावणीस अवरंगाबादेस आलें. मी यांचा निरोप घेऊन सेवेसी यावें तरी महाराजांची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
सुग्रीव आज्ञा. आज्ञेवेगले तरी येतां न ये. प्रस्तुत शहरांत महर्गता सोला सेर हरभरें व आठ रुो सेकडा कडबा. मजपासीं येक उंट, च्यार घोडीं. नित्य तीन रुपये पुरत नाहीत. याजकरितां मजला हुजूर यावयाचे आज्ञापत्र पाठवणार स्वामी धणी समर्थ आहेत. हे विज्ञप्ति.

¶*Some agent of the Peshwa with the Nizam, who cannot be identified from this letter, solicits permission to return home after being on duty for two years. The Nawab, the writer reports, has come to stay at Aurangabad.*

No. 77] [*1748?*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान ता। छ २६ रबिलौवलपावेतों मेा। पुणेयांस येथास्थित असे. स्वामीची आज्ञा मस्तकीं वंदून स्वार जालों ते जेजुरीची यात्रा करून छ २९ मिनहूस संध्याकालीं पुणेयास आलों. स्वामीचे आज्ञेप्रमाणें येथील काजकाम उरकून घरास जातों. कोकणांमध्यें येखादी सेवा सेवकास योजावी म्हणजे कुटुंबाची संस्था होईल म्हणोन पूर्वापासोन सेवेमध्यें विनंती करीतच आहें. सालगुदस्तां किले माणिकगड सरकारामध्यें आला. किले मारचे तालुकेयाचे परगणें दोन तुंगारतन व आउरवलीत; या दोहो परगणेयांची मामलियत सेवकास आज्ञा करावी म्हणौन ते समईं सेवेमध्यें विनंती केली होती. ते समईं आज्ञा जाली कीं, किले मार माघारा द्यावा लागतों; जर सरकारांत करार राहिला तर मामलियत तुम्हांसच सांगितली जाईल. सेवक भरवसेयानें होतों. सेवट ते समईं किला माघारा दिला. याजमुलें सेवक नाउमेद राहिलों. प्रस्तुत तो किला सरकारांत आला आहे. आतां माघारा जातो हे गोष्ट होणार नाही. याजकरितां सेवकाची विनंती सेवेमध्यें हेच की, कृपाळू होऊन सदरहू दोहो परगणेयांची मामलियत सेवकास आज्ञा करावी, म्हणजे कुटुंबाची संस्था होईल. अद्याप घर बांधिले नाहीं, झोंपडीत गुजराण करितों, ते घर बांधोन राहेल. स्वामी धणी मायबाप अनाथनाथ आहेत. सेवक गरीब. स्वामी कृपा करितील तरच स्थीत राहेल. सेवकाचे वृध्धपण, दौडधूप करावयाचे सामर्थ्य नाही, याजकारितां विनंती करितों. सदरहू रोजगारावर हजारों

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

उभे राहोन विनंती करितील. सेवकाचा विचार काय ? स्वामीनें कृपा करून दस्तगिरी केली आहें. कृपा करावयास स्वामी धणी मायबाप समर्थ आहेत हे विज्ञापना.

¶Raghunath Ganesh entreats Bhausaheb that he may kindly be appointed to the Mamlat of Tungartan and Aurvalit so that he will be enabled to pass his old age in peace without any anxiety for the well-being of his family.

No. 78] *[9-2-1749 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रंगराव शिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ २ रबिलावल मुकाम कसबें नाशीक स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वृत्त येथास्थित असें विशेष. मौजें चेंबूचे मुकामींहून पत्रें पाठविलीं तीं सेवेसी प्रविष्ट होऊन (लिखिता)र्थ ध्यानास आलाच असेल. ऐशियासी प्रगणें मजकुरीं तमाम गांवगंना रोखे करून स्वार वसुलास पाठविले आहेत. कसबें मजकूरचे जमीदार आणावयांसी स्वार दाहां पाठविले होते. त्यांसी मिर्जा बखर याणें जमीदार व पाटील धरून नेऊन गढींत बसविले; त्याजवरून छ मजकुरीं मुकाम मजकुरास येऊन तृतीय प्रहरीं दाखल जालों. तों मिर्जा बखर च्यार पांचशें स्वार व पांचशें बरकंदाज जमावसुद्धां बाहेर निघाला. मग त्यासी आम्हांसी युद्धप्रसंग होऊन मोगल शिकस्त खाऊन शहरांत गेला. आपल्यांकडील घोडीं पांच सात, व माणसें पांच सात ऐशीं जखमी जाली. तैसेंच मोगलाचे पाठीवरी शहरांत जावें तरी ब्राम्हणाची वस्ती त्यांसी उपद्रव लागेल म्हणोन न गेलों. स्वामीचे प्रतापेंकरून ठाणे सत्वरच फत्तें होईल. मोगलाच्या जुजांत मलसिंग जमातदार याच्या पथकांतील घोडा येक गोलीनें ठार जाला. स्वामीचे आज्ञेनरूप सर्व बंदोबस्त सत्वरच होईल. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶Rangrao Shivdeo Odhekar reports to the Peshwa the progress made in the attempt to capture Nasik.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 79] *[10-6-1749 ?*
[31-5-1750 ?

पो छ ६ रजब

श्रीशंकर

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेशीं

विनंती यैसी जे. नासरजंग याचे नांवें फर्मान व इनायत मनाईची चालल्यावर आम्ही वजीरास पुसिले, कीं जर फर्मानाप्रमाणें आमलांत आणून फिरला तर उत्तमच आहे. कदाचित जाला शोर आहे, मनांत स्फुंदत आला कीं च्यार कूच करतांच वजीरानी दबून सुभेदारीचा फर्मान पाठविला, चार मजल आणखीही दबाऊन जावे, अगर दिल्लीपर्यंतहि जाणें पडले तर काये चिंता आहे; जावेच जावे, ह्मणजे आपशेच दबून वजीरी मिरबकसीगिरी व हिंदुस्थानच्या जागिरा देतील. यैसे स्वमनी विचारून पुढें चालला तर काये विचार? वजीर बोलले कीं सुभ्याचा फर्मान म्यां बदलून देवविला नाही. लोकांनीं मजला बदनाम न करावे जे आसफज्याहा कमरदीखां मेल्यावर यानीं त्याच्या औलादीस पिसूनच टाकिले, यैसे न म्हणावे. माझ्या थोरपणास शब्द न लागावा, म्हणून आपल्याकडून जैफी केली, व आपल्यावर शब्द येऊं न दिधला. तुम्ही म्हणाल कीं यैसे नेक होते तर कमरदिखानाची विजारत व जागिरा त्याचे पुत्रास कां न दिधल्या? यैसे म्हणाल तर विजारतचे नांव मोठे. ते खुर्दसाल[1] या कामा योग्य नाहींत. त्यास हें काम दिधल्यानें पातशाहीचा बोझ न राहे. यास्तव ज्या खिजमेतें[2] व जितक्या जागिरे योग्य होते त्या खिजमती व जागिरे देवविली. नासरजंग बापाच्या हाताखाले तरबियेत जाला आहे. बाप असतांहि कांही दिवस दक्षणेंत ठशानें राहिला. नांवहि पदरी आहे, याकरितां त्यास सुभ्याचे बाहालीचा फर्मान दोविला. यैसेहि असतां जर मगरुरी धरून येईल तर काये चिंता आहे? पंनासा हजारा स्वारानशी चमलेपर्यंत जाऊन पाहिजे तैसे पारपत्य करीन. आम्ही बोलिलो कीं हे तो तुम्ही आपली नेकी केली, अथवा त्याचे दबावानें केले. जे जाले ते जाले. परंतु एखादी बुनियाद[3] यैसी बांधली पाहिजे कीं त्याचेच घरांत त्याचा मुर्दई[4] उत्पन्न करून परस्परे कलह लाऊन द्यावा, (हलके) करावे, आपला स्थापित उभा करावा म्हणजे सुभाहि

---

१ हलकट. २ सेवा, नोकरी.
३ कारस्थान. ४ विरोधी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपल्या हातांत आला, सुभेदारहि आज्ञांकित राहील, तुमच्या वजिरीचेहि नांव होईल. मुलकांत वजिरीचा जफ्त बसावयास कारण हेच आहे. म्हणो लागले कीं याचे घरांत ऐसा कोण्ही आहे? आम्ही विचारिले तेथून तेथें अस्तिनेतूनच[1] काढिली पाहिजे. विचारितां विचारितां मुतवसलखानाचा लेक सादुलाखां, आसफजाहाचा नातू, मोठ्या सादुलाखाचा पंतु, ज्यानें बाबूजी नाईकास मोडले, बरामर्द माणूस, पाच सात हजार राऊतहि बालगितो, थोडा बहुत मुलूकहि दक्षणेंत हातात आहे, व पुरातन त्यासी यासी स्पर्धाहि आहे. हाफीजुदीखां वगैरे त्याचे भाऊबंदहि दिलीत आहेत, तेहि या कामास इच्छितात व स्वामीचीहि मर्जी येतद्विषई आहेच. मागे-ही एक दोनदा आज्ञा आलीच होती. या गोष्टीची चालना केल्या चिती धरून सर्व प्रकारे साहित्य करून बोजी[2] सेवटास नेतील ऐसा भरंवसा जाणून त्यांचे नांव घेतले व स्वामीचीहि मर्जी आहे. साहित्य करून बोलवाला करतील, यैसे याचें मनांत बिंबविले. याचेहि ध्यानास गोष्ट आली. कबूल केले कीं काये चिंता आहे? तुम्ही त्याचे भावाबंदासी येथें गोष्टमात ठीक करावी म्हणजे पातशाहाचा पेषक नजरनयाजतंत[3] करून या गोष्टीचा भरंवसा आपले मोहरेनसी लेहून पाठवावा. ईश्वर इच्छेनें पातशाहास अर्ज करून फर्मान करून देतो. बनीकार (?) श्रीमंत आहेत. इतकें बोलने जाले. त्यास या गोष्टीचा अगत्यवाद स्वमीसहि आहेच. चितास आलिया सादुलाखानासी संदर्भ लावून पातशाहाचा पेषक माकुल[4] म्हणजे क्रोडी रुपयास गुंता नसावा. इतके मुकरर करून त्याच्या मोहरेनसी फर्दे वजीर पातशाहाचे नांवें अर्जीदास्ती घेऊन आपल्या पत्रासहित ईश्वरइच्छेनें येथून फर्मान हासल[5] करून स्वामीपासी पाठविला जाईल. नावास मात्र बाहुले ते उभे करावे. सर्व एखत्यारमदार स्वामीचा आहे. चित्तास आलिया याची चालना करून सविस्तर आज्ञा केली पाहिजे. स्वामीनी पूर्वी एकदोनदा यैसा मजकूर लिहिला होता; त्याजवरून आतां काबू[6] पाहून तंत[7] केला असे. जसे उत्तर येईल तसी बुनियाद बांधू. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणें? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*The writer (probably Hingne) reports to the Peshwa his discussions on the appointment of Nasarjang to the subhaship of the Deccan.*

---

१ अस्तनींतील अग्नि. २ डाव. ३ कबूल.
४ मुवलक. ५ मिळवून. ६ संधि
७ वेळेला योग्य.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 80] [*10-8-1749*

पो छ १९ रमजान

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. येथें प्रस्तुत नवाबास मुजफरजंगाचाच मोठा मनसुबा पडिला आहे. नित्य खलबतें होत असतात. सैद शरीफखानास व अबदुल-खैरखानास बोलाविलें आहे. अनवरखानास मुजफरजंगानें पत्र पाठविलें कीं तुम्ही आम्हांस लिहितां जें नवाब निजामदौला यांचें चित्तांत तुमचेविषयीं संकल्प-विकल्प किमपि नाहीं. तुम्ही यावें, भेटावें, येक विचारें असावें; तर याजपेक्षां आम्हांस अधिकोत्तर काय? परंतु नवाबाची ममता आमचे ठायीं नाहीं. पूर्वीपासोन तुम्हांस ठावकें आहे. ऐसें असतां तुम्ही लिहितां म्हणोन विश्वास मानावा तर त्यांचे ममतेचा विचार कर्तृत्वामध्यें अनुभवासहि येत नाहीं, म्हणोन लेहून तीन च्यार निदर्शनें नवाबाच अविचारांची अनवरखानाचे प्रत्ययास येतसारखी लिहिलीं. त्यांजमध्यें लिहिलें, अबदुल खैरखान यांचा व आमचे वडिलांचा ऋणानुबंद. आम्ही त्यांस चिच्यांचे[1] जागां मानितों. त्यांचा आमचा स्नेह विशेष. हे गोष्ट नवाबांस असह्य म्हणोनच त्यांस पदच्युत करून घरीं बैसविलें. या या प्रकारें नवाबाचें आचरण अनुभवास येतें, तेव्हां आम्ही विश्वास कोणे गोष्टीवरून मानावा? म्हणोन कितेक प्रकारें लिहिलें. तें पत्र बजिनस खानमशारनिले याहीं नवाबास दाखविलें, त्याजवरून बहुतच रुष्ट जाले. अबदुल खैरखानास बोलवीत होते तें मौकुफ[2] केलें. याजप्रमाणें वर्तमान आढळलें तें सेवेसी विदित व्हावयाकरिता विनंती लिहिली आहे. राजश्री बनाजी माधवराव यांस अद्याप निरोप नाहीं, याजकरितां काजी दाईम याचें घरास उभयतांही गेलों होतों; तेथें मशारनिले बोलत होते कीं प्रस्तुत नवाबास मनसबा मुजफरजंगाचा पडिला आहे. आम्ही प्रथमता नवाबास विचार सांगितला कीं तुम्ही दिलीस जावयाचा मनसबा न करावा. हैदराबादेस मुतवजे[3] व्हावें म्हणजे मुजफरजंगाचा बंदोबस्त सहजेंच होईल म्हणोन बहुत वेळां सांगितलें; परंतु त्यांचे प्रत्ययास आले नाहीं. जर दिलीचें जाणें मौकुफ करून हैदराबादेस जाते तर अवघ्याच गोष्टी उत्तम होत्या. ती गोष्ट न केली. दिलीसहि न गेले. तोहि लौकीक उत्तम न जाला. इकडे मुजफरजंगहि बलावले. या प्रकारें नवाबाचे बुद्धीस शाश्वत नाहीं. आम्ही उदंड अमीर पाहिले, परंतु ऐशी प्रकृत पाहिली नाहीं. व ऐसी सेवाहि निष्कर्षाची कधीं आम्ही केली नाहीं. यांचे

---

१ चुलता. २ तहकूब. ३ जाणारा, गमन होत्साता.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हातोन कसा परिणाम लागेल कळत नाहीं. प्रस्तुत या मनसबयास रावसाहबांचें साह्य असावें याजकरितां नवाब आम्हांस रावसाहेबांकडे पाठवितात. ते म्हणतात कीं तुम्ही प्रथम माहाराव यांजकडे जावें व तुम्ही उभयतां मिळोन जाऊन बंदोबस्त करावा. कदाचित माहाराव न येत तर ते आपणांकडून जो कोणही भला माणूस देतील तो घेऊन जावें, म्हणोन फर्मावितात. ऐशास थोरले रावसाहेब होते ते आपणांस जाणत होते. त्याचे आपले जाबसाल बहुत जाले. त्यांचीं पत्रें आपणांस बहुत आलीं तीं आपणांजवळ आहेत. रावसाहेबाचा आपला दंडक व्हावा म्हणोन उमेद बहुत आहे. लेकीन प्रथमता तेथील मर्जी कळलिया-विरहित जाणें मसलहत दिसत नाहीं, व माहाराव यांजसोबत जावें हेहि मसलहत दिसत नाहीं. याजकरितां राजश्री बनाजीपंतास बोलिले कीं तुम्हांस रुखसत करवितों, व आम्ही रावसाहबांचे खजमतेस अर्जी लेहून देतों. तुम्ही तेथें जातांच अर्जी गुजराऊन मर्जी मनास आणणें. जर खातिरेमध्यें आम्ही यावें असिलें तर तैसेच तुम्ही लेहून पाठवणें, व आमचे अर्जीचे जाबांत तुम्ही येणें म्हणोन लिहवणें; तदनुसार वर्तणूक करून म्हणून सांगितलें. याजवरून बनाजीपंतांची रुकसत येथून लवकरच व्हावीशीं आहे. रुखसतसमयीं कांहीं नवाबांस सांगणें असिलें तर सांगतील. मशारनिले हुजूर आलियावर सविस्तर वर्तमान विदित होईल. येथें नवाबास असें भासलें आहे कीं सर्व आहेत हे मुजफरजंगाचे पक्षाचे आहेत आपलेकडे चित्त कोणा येकाचें नाहीं. या प्रकारेंच सर्व अमीर त्याचाच स्तव करितात. यांचाठायीं आदर धरीत नाहीं व नवाबाचे विचाराचे शाश्वतहि दिसत नाहीं. प्रातःकालीं मनसबा योजितात तो संध्याकाळीं नाहीं, म्हणोन सर्व म्हणतात. नवाबांस छ ७ रमजानीं गुरुवासरीं पुत्र जाहला. प्रथम येक पुत्र नवाबांस आहे त्याच क्षेत्रीं प्रस्तुत पुत्र जाला. याजकरितां तीन दिवस जसन[1] केलें. अनवरुदिखानासारिखा कदीमी सरदार सरकार कामावर खर्च जाला त्याचा खेद नाहीं; आणि नवाबानें पुत्रोत्साह केला म्हणोनहि लोक म्हणतात. पुत्र जाला म्हणोन लोकांहीं नजरा केल्या. तीन दिवसपर्यंत नजरनियाज होत होती. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. वरकड वर्तमान येथास्थित आहे. पर्जन्य पुष्य नक्षत्राचा जाला. मध्यें पर्जन्य नव्हता. प्रस्तुत आठ दाहा दिवस वृष्टि होते. या प्रांतीं पिकें प्रस्तुत बरींच आहेत. सेवेसी विदित व्हावया-करितां विनंती लिहिली आहे, हे विज्ञापना.

¶*Letter addressed to the Peshwa from the camp of Nasirjang, reporting the latter's concern about the doings of Muzafarjang. From the hand-writing, the writer appears to be Raghunath Ganesh.*

---

१ उत्सव.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 81] *[11-8-1749?*

छ ९ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शामराऊ यादव कृतानेक सा नमस्कार विज्ञापना यैसी जे. येथील क्षेम तां अधिक सुद ९ गुरुवार जाणून स्वकीये कृपाकरून आज्ञा केली पाहिजे विशश. सातारियाची वस्त्रें देणे होती. परभारे जाऊ म्हटले तर आणाजी-पंताच्या विचारास न ये. आम्ही पुढे जाऊ म्हटले तर मजला सांगाते आणिले आहे. तसेच आपल्या येजमानापांसी घेऊन जाणे यैसे कितीक गोष्टीचा विचार जाणून येथे राहिलो. त्यास पंधरा दिवस लागले. श्रीमंत स्वामीची वस्त्रे दिली. उतर घेतले. प्रतिनिधीची वस्त्रे दिल्ही. पत्राचे उतर या ग्रहस्तास आज्ञा देविली. राजश्री फतेसिंग भोसले राजश्री स्वामीचे आज्ञेवरून सडेच सोमवारी येथे आले. त्याची वस्त्रे देऊन निरोप घेतला. स्वार होऊन जावे त्यास बुधवारी साइंकाली आरकाटेहून कासीद पत्रे घेऊन सोलावे रोजी आला. आपण स्वार होऊन पुढे आतनीचे मार्गे सावनुरावरून जातों. पत्राचे उतर सत्वर पाठवणे. हिदायेत मोहिदिखान याचा जासूद तेथे पत्रे घेऊन आला आहे. त्याचे उतर देऊन त्यास रवाना करणे. चितास येईल तर त्यांस मुबारकबाद[1] लिंहिणे. आपणहि सत्वरच जाऊन पोहोचतो. त्यास सर्व कुवंत स्वामीची आहे. यैसे हरकारे सांगतात. सैदलस्करखान कृस्णा उतरून गेले; परन्तु पुढे जायास विचार पडेल. आवरंगाबादेस वर्तमान कलल्यावर काये विचार होईल तो पाहावा. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Shamrao Yadao to the Peshwa : giving news about the Nizam.*

No. 82] *[22-8-1749?*

छ १ सो (सवाल ?)

श्री

राजश्री पंतप्रधान स्वामी गोसावी यांसी

॥ऽ श्रीमंत सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्यं श्रो पिलाजी जाधव दंडवत विनंती. येथील कुशल ता छ १९ माहे रमजान मुा औरंगाबाद जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. जासुदा-

---

१ स्नेहाच्या गोष्टी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बाा पत्र पाठविले ते छ माारी पावले. लिहिलें वर्तमान कळो आले. श्रावण मासीचा वाइदा भरून भेटीस येणे म्हणऊन आज्ञा केली, यैसियास आपण देशास जातेसमयी आज्ञा केली जे शाहरी राहून पेसकसीचा[1] पैका वारून पावलियाचा जाब घेणे. दिढा लक्षाची नेमणूक केली. यैसियास आषाढ मासीचा ऐवज जमा जाला तो नवाबाचें पदरी घातला. श्रावण मासीचा वाइदा नजीक आला त्यास खंडो गोविंदाकडू रुा वीस हजार देविले. त्यांजकडे चिरंजीव वरधोजी जाधव व स्वार पाथरीस पाठविले. त्यास खंडो गोविंद बलावले. च्यारसे स्वार व बरकंदाज ठेऊन वरधोजीसी कलागत केली. सेवट यानीही निग्र करावा तो इमानाप्रमाणावरी मध्यस्ती लोक घालून मजकूर घातला जे आपण शाहरास येऊन, बाकी तों आपणाकडे नाही. पांच हजार बाकी आहे ते परगणियांत आहे. त्यास आपण शाहरास येतो म्हणऊन इमान देऊन सेवट चुकाऊन पलोन गेला. तो स्वामीकडे आला असेल. येविसी च्यार पांच पत्रें स्वामीस लिहिली परंतु उतर न आले. श्रावण मासीच्या वाइद्यास ऐवज नाही. ये गोस्टीची बेहबुधी[2] करून पाठविली पाहिजे. तमसुक[3] गुंतली आहेत आणि वाइद्यासहि पैका पावत नाहीं. तेव्हा लटिकवाद येतो, आणि हा दरबार मोगलाईचा आहे. येथील प्रसंग तो आपणास विदित आहेत. विषश लिहिणे नलगे हे विनंती.



¶*Pilaji Jadhao to the Peshwa, mentioning difficulties in the collection of dues from the Nizam.*

No. 83] [*23-8-1749*

पो छ २७ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणांवरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान तागाईत छ २० माहे रमजानपावेतों मुकाम शहर औरंगाबाद येथें यथास्थित असें. नवाब निजाम-दौला यांस दिलीहून फरमान पातशाही येत आहे म्हणोन आवई वर्तमान पेशजीं

---

१ नजराणा. २ बेहबुधी = तरतूद. ३ करारपत्र, वचनपत्र.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

विनंतीपत्रीं हुजूर लेहून पाठविलें आहे. सदर्हू फरमान प्रस्तुत आला. छ १८ तेरिखेस सोमवारीं नवाबानें महमुदी बागा पैलाऊं[1] फरमानवाडी[2] उभी करून दोन प्रहर समयीं मोठे जुल्हसानें[3] फरमान घ्यावयास गेले. हत्तीवरून उतरतांच प्रथम डेरियांत जाऊन पोषाख उतरून शिरपांवचा पोशाख घेतला. त्याजउपर बाहेर कचेरीचे डेरियांत मसनदेजवळ आले. फर्मान मस्तकीं खोऊन आले. तदनंतर फरमान समागमें गुर्जबारदार आला होता, त्याणें सिरपेंच नवाब उभे असतांच बांधिला. याउपर कुर्निश[4] (?) बज्या[5] आणिली. त्याउपर गुर्जबारदारानें समशेरसमेत यकावज नवाबाचे गळां घातली. त्याची कुरनिशात केली. त्याउपर हत्ती रूजू केला. हत्ती पाहोन कुरनिश केली. मग मसनदेवर जाऊन बैसले. तमाम अमीरअंकारिबाहीं[6] नजरा दाखविल्या. मग हत्तीवर स्वार होऊन शाहरांत आले. फरमानांत काय मजकूर आहे तो कळला नाहीं. मागाहून सविस्तर वर्तमान लेहून पाठवितों. लोकामध्यें चर्चा जाली कीं तीन सुभेयांचा फर्मान नवाबास आला. सत्य मिथ्य कळत नाहीं; व राजश्री मल्हारजी होळकर यांस पातशाहानें तनखा नवाबावर दिली म्हणोन येथें बोली बहुत दिवस उठली आहे. दिवाणखान्यांत सेवकास बाजे लोक हें वर्तमान पुसत असतात. बारा लांख, पंधरा लांख, बावीस लांख, सत्तावीस लांख रुपयांची तनखा आहे म्हणोन जनचर्च्या आहे. येक प्रमाण नाहीं. ऐकिलें तें सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. होळकर कासारबारीखाले आले म्हणोन छ १७ तेरिखेस नवाबास अर्ज जाला. समागमें तीन च्यारशें स्वार आहेत म्हणोन चर्चा आहे. मजल दरमजल हुजूर स्वामीचे सेवेसी येत आहेत. सैद लष्करखान व अबदुल रजाकखान अद्याप कृष्णा उतरले नाहीं. उभयतां अनवरदीखानाचे कुमकेस पोंहचले नाहीं. याजकरितां नवाब सक्रोध आहेत. काजी दाईम व मोरोपंतास नवाब स्वामीचे सेवेसी पाठवणार म्हणोन बोली दाट आहे. सेवेसी श्रुत जालें पाहिजे. फतुहुदिन अलीखान अर्जबेगी यांचे तर्फेनें महमद रजा वगैरे दाहा आसामी दिलीस जातात, त्यांजबराबर पडतळाचे बैल आहेत. स्वामीचे खास मोहरेनशीं दस्तक असावें म्हणोन अर्जबेगीयाहीं विनंती ल्याहावयास सांगितले. याद लेहून दिली. ते याद बजिनस हुजूर रवाना केली आहे. यादीप्रमाणें दस्तकाची आज्ञा करावयास स्वामी धणी आहेत. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हें विज्ञापना.

¶*Raghunath Ganesh reports the arrival of Imperial Firmans for Nasirjang and the grand reception he accorded to them.*

---

१ पलीकडे. २ दरबारतंबू. ३ आनंदानें.
४ कुरनिस = वंदन. ५ केलें. ६ सरदार नातलगांनीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 84] [28-9-1749?

छ २ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणांवरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान तागाईत छ २५ माहे रमजान पावेतों मुकाम शहर औरंगाबाद येथें यथास्थित असें. स्वामीचें आज्ञापत्र छ ११ रमजानचें छ २० मिनहूस प्रविष्ट आलें, तेथें आज्ञा कीं प्रस्तुत नवाब कोणें मनसुबियांत आहेत, हिदायत मोहिदिनखान याणी अनवरदीखानास मारून अरकाटदाखल जाहाले म्हणोन येथें वर्तमान आलें. तेथें ही खबर येऊन पोहचली असेल; तर नवाबांनी मनसुबियाचा डौल कसा धरिला आहे, विचार काय करितात, फौजेची निगादास्त करितात, जलदीनें कूच करणार कीं शिथिलता आहे तो विचार वरचेवर लिहीत जाणें म्हणोन आज्ञा; ऐशास प्रस्तुत नवाबास हाच मनसुबा येऊन पडिला आहे. नित्य खलबतें होत असतात. रमजानची ईद जालियावर मुकरर कूच करणार. दाहा हजार स्वार नौनिगादास्त[1] फरमाविले. तमाम बकशींस फर्माविलें आहे कीं जो स्वार येईल त्याचा चेहरा ल्याहावा. छ २३ रोजीं शनिवारीं नवाब नौखंडेयांत दरबार करून बैसले होते. ते समयीं येक जमातदार तमाम नांवा शाहागडास जमा कराव्या म्हणोन ताकीद करून रुकसत केलें. कूंच करावयाची जलदी बहुत दिसते. नौनिगादास्त नित्य होत आहे. प्रस्तुत येथें मुसाहिबांत[2] अनवरखान व काजी दाईम व मोरोपंत[3] आहेत. नवाबानें न जावें फौजच पाठवावी म्हणोनहि नवाबांस विचार सांगणार सांगतात म्हणोन अफवा आहे. परंतु नवाबच कूच करून जाणार आहेत. तमाम मनसबदार लहान मोठे यांस तयार होऊन येणें म्हणोन जागां जागां यैनायतनामे सादर केले. तोफांचे सरंजामास बैल पाहिजे. बैलांची खरेदी फर्माविली आहे. बैल खरेदी होत आहेत. रात्रंदिवस मुजफरजंगाचा निजध्यास नवाबास लागला आहे. नवाबाजवळ जितके आहेत तितके खुशामते[4] गो आहेत. कोण्ही परिछिंन मनसुबा सांगे असा नाहीं. अनवरखान वृद्ध, काय म्हणत असतील तें न कळें. वरकड सर्व खुशामती आहेत. अनवरखानामध्यें कांहीं

---

१ फौजेची जमवाजमव, नवीन फौजभरती. २ स्नेही.

३ विठ्ठल सुंदरचा भाऊ ? ४ गो = बोलणारे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
सामर्थ्य राहिलें नाहीं. पालखींत बैसोन देवडीवर येतात. तेथें चौकीवर बैसऊन खजमतगार चौकी उचलून दिवाणखानेयांत आणितात, याप्रमाणें त्यांची अवस्था आहे. स्वामीचे सेवेसी काजी दाइमास पाठवणार म्हणून बोली दाट आहे. सैद-लष्करखान व अबदुल रजाकखान हे दोघेजण गुडमटकालास आहेत, अद्याप कृष्णापार जाले नाहीं. कडपे कर्नालकर यांच्या अर्ज्या येत असतात कीं आम्ही मुजफरजंगास पेश[1] होऊं देत नाहीं. तमाम घांट बंद केले आहेत. कुमक पोंह-चली म्हणजे यांचें पारिपत्य केलें जाईल. नवाबास फरमान पातशाहानें पाठविला, त्याचा शोध अर्जबागीजवळ व आणिक येक दों जागां केला तो, सासुबे दक्षणचे सुबेदारीचा फर्मान आहे म्हणोन सांगतात. परंतु अद्याप कितेकांस वसवास आहे. फरमानाचे नकलेकरितां राजश्री जानोजीराव निंबाळकर याचे वगैरें वकील इंतीजार[2] आहेत; परंतु अद्याप नकल कोण्हास प्राप्त जाली नाहीं. गुर्ज-बारदार फरमान घेऊन आले, त्याजबराबर जावेंदखानाचे मोहरेनशीं दस्तक होतें. त्याची नकल सांपडली ते सेवेसी विदित व्हावयाकरितां पाठविली आहे. फरमा-नाच्या नकलेच्या तलाशांत[3] आहों. सांपडलियावर सेवेसी रवाना करितों. नवाबाचे रिसालदार व जमातदार वगैरे लहान मोठे कोण्ही नवाबाचें इष्ट चिंतीत नाहीं. अवघे श्रमी आहेत. विपरीत भाषणें नानाप्रकारें करितात. सारांश, कोण्ही संतोषी नाहीं. याप्रकारचें वर्तमान आढळलें तें सेवेसी विदित व्हावयाविशी विनंती लिहिली आहे. नवाबास येक कन्या लहान दीड दोवर्षीची होती ते शांत जाली. सेवेसी विदित जालें पाहिजे. वेदमूर्ति राजश्री वासुदेव दीक्षित यांचें वर्तमान पूर्वी सविस्तर विनंतीपत्रीं लेहून पाठविले होतें त्याजवरून विदित जालें असेल. अलीकडे अद्याप स्वच्छ आहे. कायगांव वेदमूर्तीस मोगलाईतून इनाम आहे, तेथील उपव्द्यापांत मोरोपंत लागले आहेत. देशपांडियांस ताकीद करून तेथील कागदपत्र आणविले आहेत, म्हणोन वेदमूर्ति बोलत होते. प्रस्तुत वेदमूर्तीस सातारेयाहून थोरले देवडीकडील व राजश्री यमाजीपंतांचें पाचारणें आलें आहे. वेदमूर्ति भाद्रपद शुद्ध प्रतिपदेस सातारेयास जावयाकरितां सातारेयाहून स्वार होतील. सेवेशी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶*News-letter from Raghunath Ganesh to the Peshwa, reporting the fluctuating state of Nasirjang's mind and his anxiety to collect troops to oppose Muzafarjang.*

---

१ बळाऊं देत नाहीं. २ तयार, दक्ष.

३ शोध.

 CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रघुनाथ गणेश चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना. स्वामीचे कृपादृष्टीनें सेवकाचें वर्तमान तागाईत छ १२ माहे जिलकाद पावेतों मुकाम लष्कर नवाब नासरजंग यथास्थित असें. लष्करचें वर्तमान आढळल्याप्रमाणें ता। छ ८ मिनहून सविस्तर विनंती पत्रीं लेहून सेवेसी पाठविलें आहे त्याजवरून विदित होईल. अबदल हुसेनखान व रजवीखान यास नवाबानें स्वामीचे सेवेसी पाठवावयाकरितां रुसकत केलें. त्यांजबराबर राजश्री बनाजी माधवराव यास पाठवावयाचा निश्चय जालाच होता. छ ८ मिनहूस हरदो खान मशारनिले नवाबाजवळोन रुसकत होऊन गंजाचे पछाडीस राहिले. बनाजी माधवराव यांस रुसकत जाली नाहीं, याजकरितां आम्ही उभयतां सेवक राजश्री रायबिशनदास यांजकडे गेलों. ते बोलिले कीं येक दोन दिवस सरंजामाकरितां खान मशारनिलेंचे रवानगीस लागतील. तुम्हांसहि रुसकत होईल, म्हणोन बनाजीपंतास बोलिले. प्रातःकाळीं छ ९ मिनहूस धारुराहून नवाबाचा कूच जाला. दोन अडीच कोंश मौजे केज व चिंचगांवावर मुकामास आले. तेच दिवशीं हरदो खान मशारनिले लष्कराहून निघोन सातारेयास चालिले. सरंजामाची वाट पाहिली नाहीं. त्यांजबराबरचे स्वार त्यास धुंडीत राहिले. जे समागमें गेले ते गेले. राहिले ते छ ९ तेरिखेपासून छ ११ मिनहूपर्यंत लष्करांतून निघोन त्यांस सामील व्हावयास गेले. याप्रकारें खानमशारनिले जलदीनें सेवेसी आले आहेत. अबदल हुसेनखान यांनीं साबाजी गवली याचे खलाशीचा व राजश्री कृष्णराव मामा यांचे जागिरीचे बहालीचा करार केला होता, तरी ते सरकारचे नवाबाजवळ आम्हांस रुजू करूं दिल्हें नाहीं. आपणांजवळ घेतले होते. बनाजीपंताचेहि रुकसतीचे करार केले होते. शेवट इतक्या गोष्टी त्याजवळोन जाल्या नाहीं. जाते वेळेस दोन्ही थैलिया रायबिसनदास यांचे स्वाधीन करून गेले. बनाजीपंतास खान मशारनिलेसमागमे द्यावे म्हणोन करार नवाबानें केला होता. रायबिसनदास याही बनाजीपंतास सांगितलें, अबदल हुसेनखान यांसहि सांगितलें. तेहि दोन तीन दिवस बोलत होते कीं, हीं कामें करितों व तुम्हांसही घेऊन जातों. मग काय म्हणोन यांचे रवानगीचा मनसबा राहिला कळत नाहीं. पूर्वी राजश्री रामचंद्र बावा यांची व अबदल हुसेनखानाची भेट पैठणास जाली होती. तेव्हां भाष प्रमाण जाले होतें. बहुधां त्यांचे अन्वयानें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सेवेमध्यें आले आहेत ऐसें भासतें. पूर्वी सैद लष्करखान कार्यभागाकारितां स्वामीचे सेवेमध्यें येत होतें, तें येथें कितेकांस असाह्य म्हणोन त्यांस दरबारांतून बाहेर काढिले. त्यांचे जागां अबदल हुसेनखान योजिले आहेत. यांचें स्वरूप-ज्ञान खान मशारनिले सेवेमध्यें आलियावर सहजेंच विदित होईल. खान अजम सेवेमध्यें येते तर तर[1] रुबेकार[2] कामाचा जाबसाल करून घेऊन बनाजीपंतास समागमें घेऊन येत. त्यास आदिपासोन मजकूर जाबसालाचे विदित होते. प्रस्तुत अबदल हुसेनखान सेवेस आले आहेत. नवाबाजवळ मुसाहेबांत[3] कोण्ही मातबर नाहीं. अवघे खुशामतगो आहेत. अबदुल खैरखान आले आहेत. त्याजवर नवाबाचा चित्तापासोन प्रेमा दिसत नाहीं. खान मशारनिलेहि त्याच रीतीनें आहेत. वरकड लोक सर्व श्रमी आहेत. कोण्हीहि नवाबाचें अभीष्ट इछित नाहीं. खेरीज निंबाळकर नवदाहा हजार फौज जमा जाली आहे. अबदुल खैरखान नवाबास बोलिले, कीं जलद जावेसें काय आहे? मुकामांत करावें, शिकार खेळत जावा, इतकियांत फौजहि जमा होईल. त्याजवरून नवाब शिकार खेळावयास जातात. जनानेयाचे हजीबराबर जनाना सुद्धां जातात. मुजफरजंग फुलचरीस गेले म्हणोन येथें दाट बोली आहे. रजाअली, अबदल हुसेनखानांचा लेक, त्याजकडे सरकारचा ऐवज येणें आहे, तो नवाबाबराबर चाकरीस आला आहे. सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. साबाजी गवळिया-बाबत व राजश्री व कृष्णराव मामा यांचे जागिरीबा सरकारच्या थैलिया रायबि-शनदास यांही सेवकाजवळ दिल्या. आम्ही उभयतां थैल्या रुजू करितों. सदर्हू कार्याचे प्रयत्नांत लागलोंच आहों. मुजफरजंग फुलचरीस गेले. फिरंगियानें बमयफौज यांस नेले. बहुत सत्कार केला. सातशें तोफ येक रंजेंग[4] सोडिली. फौजेसहवर्तमान तीन दिवस यांची मेजवानी केली. दारूची लंका केली होती ते यांस दाखऊन प्रदित केली. दाहालक्ष रुपये खर्चास दिल्हे आणि बोलिला कीं दारूंगोळी जो सामान पाहिजे तो आपण पुरवीन. सर्व प्रकारें साहें आहे म्हणोन फिरंगियानें बहुत प्रकारें मनोधारण केलें. हें वर्तमान येथें सरफेयांत आलें. नवाबासहि या गोष्टीचा अर्ज जाला, याजवरून नवाब चितांत बहुत दर्शदर[5] आहेत. या मुकामीं दोन मुकाम जाले. येथून बाजरां नदीच्या तीरीं जाणार. स्वामीकडून अबदल हुसेनखान येतपर्यंत बाजरातीर इतक्यांत काळहरण करावें ऐसा मनोभाव दिसतो, उदाजी चव्हाण यांची अर्जी सैद लष्करखान याचे मार्फत नवाबांस आली. खानांनीं नवाबांस लिहिलें आहे, नवाबानेंही त्यांची

---

१ 'तर' शब्द अधिक पडला आहे. २ लक्ष लावून. ३ स्नेही सोबती.
४ Firing. ५ घाबरलेले.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जागीर त्यास बाहाल करावी. गौर करावा, म्हणोन करार केला आहे. उदाजी चव्हाणाची भेट खान नवाब भेटतील तेव्हां खानच करितील म्हणोन वर्तमान आढळलें. ते सेवेसी विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना. वरकड वर्तमान राजश्री बनाजीपंतीं लिहिले आहे त्याजवरून विदित होईल. स्वामीकडून साहित्य जालें तर याचा जय म्हणोन सर्व बोलतात. स्वामीनें त्याचें साहित्य केलें म्हणजे यांची अवस्था कठिण आहे. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶Raghunath Ganesh, the Peshwa's agent at Nasirjang's camp near Dharur, describes the disorderly character of the Nawab's doings. He reports the Nawab to be in great fear of his rival Muzafarjang.

No. 86] *[12-1-1750?*

श्री

सेवेसी विनंती सेवक विसाजी कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ १४ सफर मुकाम नजिक लासूर साइंकाल स्वामीच्या कृपावलोकनें-करून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री पिलाजी जाधवराव याजकडून छमजकुरी येच समईं पत्र आलें तें सेवेसीं रवाना केलं आहे, पावेल. त्याजवरून तेथील अर्थ निवेदन होईल. मोगलाकडील कही येथून चहूं कोसावर येती. कोणी विकत कडबा नेतात आणि कोणी लुटून नेतात यैसें आहे. सेवेसीं कलावे म्हणोन लिहिलें आसे. राजश्री हरि विठल लासुरापलीकडे धोपल-गावावर आहेत. आम्ही लासुराअलीकडे शाहजतपुरावर आहों, त्यास आम्हांस दिडा कोसाची तफावत आहे. आज्ञेप्रमाणें आम्हीं खबरदार आहों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶Visaji Krishna reports the trouble created by the foreign factions of the Nizam. Pilaji Jadhao also appears to be co-operating with the writer.

No. 87] *[22-2-1750*

श्री

श्रीमंत परम दयावंत मो रा पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक श्रीपत विठल सां नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम स्वामीचे कृपेकटाक्षें करून ता छ २५ रबिलोवल मा दरजागा बंदर कलसपाक येथास्तित असे. छ २४ रबिलावली समाचार चंदावरातून मुजफरजेंगखान यांचे कूच

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

फुलचेरीचे रोखे जालें. मजलबमजल नवाब निजामुदौला कूच करून घाट उतरल्यावरी कोठे मोकाम न करितां जेथें मुजफरजेग याचे मोकामात आहेत, तेथपावेतों जावें हाच कस्त करून चालले. हें वर्तमान त्यांसहि गेले. फौज त्याजपासी मोख्थसर[1] व लोकहि बेहिमत. चाकर थोडे दिवसाचे. मोठे महर्णव भारी मुदे डोइवरी असरा दम घ्यावयास नाही. फुलचेरीवाल्याने मुजफरजेंग खानास लिहिलें जे चंदावर मोरचे देऊन तुम्ही जेर केले आहे. अवल मसलहत हेच आहे जे ते जागा हस्तगत करून आपण तेथे मुस्तैकीम[2] राहावें लागेल. तितका मसाला उलफा[3] दारु गोली वगैरे सरंजाम येथून आपण पोंहचावितो. भारी फौजेनिसी नवाब नासरजेंगखान येतात म्हणून बेइस्तकलाल[4] होऊन जागा न सोडावी. कदाचित स्थळ हस्तगत होणेस कांही दिवस लगतसे असेलिया चंदीस येऊन बहीर ठेऊन जेरिदा होऊन मोकाबिला कराल तरी येथूनहि सरंजाम व मसालेह जेंगी पाठविला जाईल म्हणजे अर्जा हाजे(?) तुम्ही फुलचेरीस न येणें म्हणून लिहिले. दुसरी गोष्ट फौजेमधें लोक त्यास तन देत नाहीत. त्याने तलब सिपाही लोकांची काही बाकी ठेविली म्हणावी तरी अखेरसफर पावेतो साहा लाक रुपये अपल्या अरकान दौलतापासून[5] व तीन लाक रुपये चंदाखानजी-जवळून जुमले. णव लाक घेऊन तमाम सिपाहीयांचा गवगवा वारिला येसे असतां ते लोक मुरअत[6] करीत नाहीत. ज्यांपांसी पैसा भारी जाला, नवकर थोडे दिवसाचे, त्यांहीवरी सरदार गबरु जवळ कोणी पोख्त मातबर मसलहती दिवान अथवा बकसी मुसाहेब मसलहत तोडमोड करून सांगणार व आपण तदबिरवंत[7] खुद तरी आहे जे काये चिंताताले मंदावरीच तवाई येऊन बाज खाती तेहि गोष्टी नाही. गर्भश्रीमंत खानदान उमदा परंतु सरदारास दोन गोष्टी पाहिजेत. आधी हिमत दुईम सुज्याअत[8] ह्या दोनी गोष्टी आहेत. परंतु दूरदृष्टि पाहिजे. यांस सिपाह लोकानी तन दिल्हा पाहिजे. तमाम अवघा अरगजा जाला आहे. पाहावे. कार्याचा परिणाम कोणासहि न कळे. हें वर्तमान दरबारी वकील येथील त्याच्या लिहिल्यावरी सेवेसी लिहिले जाते. राा मोरोपंत व राा जानोजी निंबालकर व राा मुरारराऊ घोरपडे यांस व मुजफरजेंग खानजीस मफासला[9] पंदरा कोसाचा आहे. राा मुरारराऊ घोरपडेची काही फौज व राा जानोजी निंबाळकराची फौज कांहीसे झांला राउताहे त्या फौजेचा तलावा घ्यावा हा अर्थ जाणून पुढे गेले आहेत. तीन कूच चंदावराहून फुलचेरीचे रोखे

---

१ जुनी वतनी. २ तयार. ३ उलफा = शिधा.
४ माघारे फिरोन. ५ प्रमुख, उमराव ६ मुरवत.
७ विचारवंत. ८ धैर्य. ९ अंतर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाले. जुमले[1] दाहा कोस येऊन उतरले आहेत. नवाब नासरजंगखान चंदीचा रोख यानीहि धरिला. आबेनाबादा तो येऊन अगोधर दाखल होऊन पावेतो आपण मकान जवल करावा हाहि येक इरादा यांचा येसे येकिले जाते. नवाब नासरजंगखान व मुजफरजंगखान या उभयेताचा मफासला चालीस कोसाचा आहे. यावरी जे वर्तेल ते सेवेसी विनंती लिहीन. विशेश काये लिहू हे विनंती.

¶*Letter from Shripat Vithal to the Peshwa, reporting the intrigues of Muzafarjang with the French and the movements of Nasarjang against his rival.*

No. 88] [*24-4-1750*

पौ छ २७ जालोवल

श्री

विज्ञापना छ २७ जमादिलावल प्रहर रात्र वर्तमान प्रातःकालचे मागील दीड प्रहरांतील रात्र राहिली होती तेव्हां स्वामीचे लोकांनीं याचे लष्करावर बाण टाकले. बाणाची अवाई होताच लष्करांत गलबला फार जाला, त्याजवरून मिसलबंदीचे सरदार जागा जागा खबरदार होऊन उभे ठाकले. रामचंद्र जाधवराव याची व नासरजंग याची बातमी कोणासहि किमपि ठावकी नवती. वरकड लोक जसे मिसले मिसलेवर तयार जाले त्याप्रमाणें जाधवरावहि तयार होऊन छप्पा आला म्हणोन ऐसी आवाई घालून स्वार होऊन लष्करचे बाहीर नासिरजंगासुद्धा निघाले ते नीटच तिकडे गेले. सेवटी कांहींसा सुवारा जाधवराव याचा राजाजीस उमजला. त्याजवरून राजाजी[2] मागील दोन घटका रात्र असतां स्वार होऊन जाधवराव याचे गोटांत गेले. तेथें पाहिल्यानें जाधवराव नाहींत. जाधवराव तर अगोधरच निघून गेले. मग तर सिधांत वर्तमान कलले. बाहिरीचे लोक जाधवा-मागें जात होते. त्याचे मागे स्वार पाठवून बाहेर माघारे फिरविली. जनाजी जाधव, त्याचा चाकर तो तलावरच होता व हती अंबारीसुधा त्याचा तैसाच होता. राजाजी त्याची थोडीसी चौकशीहि केली व समाधानहि बहुत करून चार गोष्टीं खातरजमेच्या सांगून त्याजला नवाबाजवल घेऊन आले. कांहीं सामान वगैरे होता त्याची मात्र चौकशीहि केली. नासरजंगाचा सामान हत्ती वगैरे कुल तैसाच तलावर होता, तो सरकारांत ठेविला. नासरजंगाचे पांच हत्ती एक स्वारीचा व

---

१ सैन्याच्या तुकड्या. २ रामदासपंत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

एक निशाणाचा व एक नगऱ्याचा व एक माहिमरातबाचा एक यैसे पांच हत्ती व एकतीस उंठ व बैल व घोडी पागेची होती ते सरकारांत नेऊन दाखल केली. याजला पुर्त उमजले कीं जाधवराव तिकडे फुटून गेले. प्रातःकाली चार घटिका तजविजेंत राहून नवाब व राजाजी विचारांत होते. कूच करून स्वार होऊन उभेच होते ते समई हनमंतराव व आनंदाराये निंबालकर वगैरे तमाम सरदार स्वारींतच बोलाऊन त्यासी बहुत समाधानाच्या गोष्टी बोलून वरचेवर सरदारापासून आण-भाष घेतली कीं आकृत्रीम असावे.

¶*The letter describes the march of Nasarjang and mentions how Ramchandra Jadhavrao deserted his cause.*

No. 89] [*9-5-1750 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बनाजी माधवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। छ १३ जमादिलाखरपावेतो कृपावलोकनें जाणून स्वानंदातिषये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. नवाब सलाबतजंग यांच्या थैल्या व परवाना साता लाखाचा वगैरियास इनायेतनामे पाठविले ते पावले. ज्यांचे त्यास नवाब नसीरजंग आदिकरून प्रविष्ट केले. सर्वांही सलाबतजंगाकडे पत्रे पाठविली आहेत कीं ऐवज येथे नाही, कोठून द्यावे याची वाट करून पाठवावी. तेथून पत्रे आल्यानंतर याची वाट होईल. सेवेसी श्रुत होय. जासुद जोड्या २ जथे जोत्याजी नाईक हे पत्रें घेऊन आले होते. पुन्हा हजूर आले आहेत बहुत काय लिहिणें कृपा निरंतर असू दिधली पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Banaji Madhao to the Peshwa, saying that the letters of assurance received from Salabatjang have been handed over to the respective addressees.*

No. 90] [*16-10-1750*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक बनाजी माधवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ २९ जिलकादपावेतों मौजे जवले प्रांत तेरढोकी तेरणातीर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लस्कर नवाब नासरजंग कृपाकटाक्षावलोकनें जाणून स्वानंदातिशय लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. येथील वर्तमान बातमीचें वरचेवर लिहीत आलों. सांप्रत या मुकामी छ २३ मिनहूस आले तेच दिवशीं अबदुल रजाखान व सैद लस्करखान यांजकडील पत्रें आलीं. त्यांत वर्तमान आलें कीं मुजफरजंग याने अरकाटीहून चंदावराकडे कूच केलें. त्रिचनापलीकडेहि जाणार परंतु त्याचे फौजेने दबाव खादला आहे. त्याजमुलें फौज कितेक दुदील जाली आहे. पठाणहि कृष्णापार खानासी भेटून उभयत्र येक होऊन त्यांस तंबी करूं सकतो. आपण यावेसें काये आहे? त्याजवरून नवाब बहुत खुषवख्त जाले. तिकडील खातरजमासी वाटली आहे म्हणून सांप्रत राजकारण आरंभिले आहे. सैद शरिफखान वराडचे सुभेदार याजसमागमे रघोजी भोंसले येणार यैसी आवाई होतीच. सांप्रत त्यास जलदीचीं पत्रें गेलींच आहेत. लौकर रकारपूर्वकास घेऊन येणें म्हणून व निराळे जासूद रकारपूर्वकाचे बातमीस पाठविले आहेत कीं कधीं निघणार, निघाले कीं नाहींत अथवा कोठपर्यंत आले, काय वर्तमान तें वरचेवर पोहचलें पाहिजे म्हणून व उमाबाई दाभाडीकडे सा रोजाचे वाइदियाचे कासीद गेले आहेत. तिजकडेहि सूत्र आहेच. या समई राणीकडील पत्रें बहुत येत आहेत सातारियाहून पंत प्रतिनिधीचे मारफतीनें जवाबसाल लागला आहे. राणीचे मनोदय कीं नासर-जंगासी सख्य करून सांप्रत श्रीमंताचे प्रतापाखालें कोण्ही ठरूं सकत नाहीं. त्यास त्याचा उपमर्द करवावा यैसी योजना आहे. आपण आपले विचारें राज्याचा बंदोबस्त करावा म्हणून बहुत खुषामतीचीं पत्रें येतात. दोती रोजाखालें प्रतिनिधीचें पत्र आले तेच दिवशीं प्रतिउत्तर लिहून पाठविलें. मजकूर कोण्हासहि कलला नाहीं. सारांष हाच आहे. कालचे दिवशीं छ २४ मिनहूस खलबत जालें. मोरोपंत होते त्यानी मसलत दिल्ही आहे, कीं करकम वगैरे ठाणीं सरका-रचीं या प्रांतीं आहेत तिकडे मुतवजे[1] व्हावें म्हणजे दबावाने जागे सुटतील. सातारियाकडेहि हुलड पडेल. इतकियांत जबरदस्ती सरकारची कसी पडते तेंहि कलेल. निबर लागले तर सख्य तों आहेच. मो लागलें तर जसा प्रसंग पडेल तसें करावें. यांचे चित्तीं भ्रम सांप्रत ऐसा जाला आहे कीं आम्ही ज्यास हातीं धरूं तो थोर करूं. रघोजीकडे गतवर्षीपासून यांची ममता होती. ते समई खानानीं व जानबा निंबालकरानी उभयतानी मिळून राजकारण तोंडघसीं दिल्हे त्या दिवसापासून मुख्यास व सामादिकांस उभयतांचे असह्य फार जालें आहे, म्हणून खानास दरबारांतून काढिलें; मुलुकगिरींत योजिलें. जानबास

---

१ रोख धरावा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

या राजकारणांतून काढून आबदुल हुसेनखानास मधें घातलें. याजवरून दोघेहि मातबर या कामांतून काढिलें आतां रकारपूर्वकाचे उभारणीचे साहित्यावर आहेत. राणी व प्रतिनिधी, दाभाडे, रकारपूर्वक इतकियांचे आनुमत येक आहे, यैसें यास पुर्ते भासलें आहे. राजकारणें इतक्यांकडीलहि यांजकडे आहेत. आद्याप उमाई-कडील वकील तों कोण्ही आला नाहीं. कागदीपत्रीं कामकाज चालिलें जातें. अबदुल हुसेन व रजबीखान येकनिष्टेने श्रीमंताकडे गेले नाहींत. प्रतिनिधी आदिकरून राजकारणाचा दुहुळा[1] करावयास गेले आहेत. यांच्या जोड्या वरच्या-वर जात आहेत. आद्याप त्यांजकडील पत्रे न आली. सातारियाकडील वर्तमान स्थूल स्थूलतरी सेवकास कळावयासाठीं लेखनाज्ञा केली पाहिजे. उमदे लोक पुसत आसतात, त्यांस सांगितलें पाहिजे. न सांगितलें तर कपट केलें, सांगत नाहीं, यैसें समजोन आपल्याकडील गोष्टी सांगत नाहींत. याजकरितां सेवेसीं लिहिलें आहे. कृपा करणार स्वामी समर्थ आहेत. घरीं खर्चाची वोढी बहुत आहे म्हणून पत्रें येतात. आमचा तों येथें गुंता दिसतो. दुसरे राजबिराजीचे[2] दिवस आहेत. श्रीमंताचे प्रतापें येका वर्षीत दरबारी उमदे लोक सर्व कृपावंत करून घेतले आहेत. दरबारी मातबरी[3] कसी पाडिली आहे तें परस्परें स्वामीस कलत असेल किंवा नसेल हें नकले. या समई स्थल न टाकावें. येद्यपि राजश्री रघुनाथ गणेश आहेत तेहि स्वामीकार्यतत्पर आहेत. वरच्यावर साकल्य वर्तमान सेवेसीं लिहित आहेत. आम्ही ते ऐकचित्तें सेवेत सादर आहों. इतकाच विशेष कीं दीड वर्ष राहण्या-मुलें बहुतासी स्नेह वलखी जाल्या आहेत. व मातबरीहि पडली आहे. समयहि चाकरी करून दाखवावयाचा आहे. पर्जन्यकालपर्यंत येथें राहून चाकरी करून दाखऊन सेवेसी यावें, पुढे स्वामी समर्थ आहेत. सरफराज करतीलच. नवाबहि निरोप देत नाहीं. इतःपर सेवकहि निरोप मागत नाहीं. राजश्री मोरोपंताचीहि कृपा बाह्यात्कारीं सर्वांपरीस विशेष करितात. स्वामीचे प्रतापें मानमहत्त्व उत्तम आहे. खर्चाची बेगमी मात्र करावी. सेवा घ्यावी. पूर्वील कर्जहि फार जालें आहे. येकदंर हिसेब मागून सेवेसीं पाठवितों. घरची बेगमी खर्चाची केली पाहिजे. घरीहि कर्ज जालें आहे. कल्पवृक्ष स्वामी आहेत. विशेष लिहिणे शक्त नव्हे. कृपा निरंतर आसू दिधली पाहिजे हे विज्ञापना.

¶*News-letter by Banaji Madhavrao, the Peshwa's agent at Aurangabad. It describes the intrigues of Tarabai with Raghuji, Dabhade and the Nizam against the Peshwa.*

---

१ घालमेल, घोटाळा. २ राजबिराजी = राज्यक्रांती.

३ मातबरी = प्रतिष्ठा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 91] [5-11-1750

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ १६ जिल्हेज पावेतों कृपावलोकनें जाणून स्वानंदातिशये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. येथील वर्तमान छ १२ मिनहूपावेतों सविस्तर सेवेसीं लिहून पाठविलें होतें. आलीकडे नवाब नलदुर्ग परगणियांत तांदुळवाडीवर छ १४ मिनहूस आले. काल सोलापुराकडे सेर[1] किल्याची करावयास गेले; तेच समई सैदशरीफखान भेटले. त्यासी घोडें घडीभर उभें करून भाषण केलें. यांचे पत्र रकारपूर्वकास[2] गेलें म्हणजे त्यानी यावें यैसा योग दिसतो. फौज दोन हजार आहे. सेख महमद दायेमास रुकसत सीघ्र करणार. आबदुल सेरखानास बरें वाटत नाहीं, याजमुलें रुकसत करावें. नलदुर्ग किल्यांत कांहीं दिवस राहून आरोग्य जालियावर शहरास जावें यैसी मसलत होत होती. काय ठरतें पाहावें. हिदायेत मोहिदीखानाकडील वर्तमान चनापटणाकडे गेले म्हणून आहे. फौज त्यांची हलाख आहे, यैसी वार्ता दाट आहे. स्वामीकडे ग्रहस्त पाठविले आहेत, त्यांची मार्गप्रतीक्षा बहुत करितात. ते येत तोंपर्यंत हळुहळू मुकामांत करीत जातात. या प्रांतीं बोराजाण वगैरे जागे बंडगराचे होते ते ठाणी पाडीत सुटले आहेत. फौजा रिसालदार ते केले आहेत. सांप्रत वर्तमान इतकें आहे. सेवेसीं श्रुत होये; बहुत काय लिहिणें, कृपा निरंतर आसूं दिधली पाहिजे. हे विज्ञापना. बाजीराव यास रुकसत केलें. समागमें च्यार हजार फौज मोंगली आहे. मऱ्हाटी फौज देणार होते; सेवट कांहीं दिल्ही नाहीं. सुलतानजीचे पुत्रांची समागमें फौज द्यावयाचा विचार केला होता; त्यानी मान्य न केलें. मागून कांहीं पाठवितील तर न कले. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nasarjang's expedition into Karnatak and his daily doings on the way are described by Banaji Mahadeo from Aurangabad.*

No. 92] [27-11-1750

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी

यासीं

ऽ श्रामत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापवरिष्ठाभिधान निरंतर भगवदनुसंधान सावधान श्रीमंत माहाराव जसवंत निंबालकर दंडवत विनंती उपर. येथील क्षेम

---

१ सहल, पाहणी. २ रघूजी भोसले?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ता। छ ८ मोहरम जाणोन निजानंदलेखन करावे विशेष. सांप्रत मुसा बुसी यांनी राजश्री नागोराव यांजकडून पत्र लिहविलें आहे कीं मुसां लली गोरंदोर फुलचरीचे, यानीं आपल्यास भेटीस बोलाविलें; यास्तव जुलफकारजंग यांज-समागमें फौज देऊन, आपल्या प्रांताच्या बंदोबस्तास ठेऊन, आपण सडे फुलचरीस रा। जालों; ते कृष्णातीरनजीक जतपेठ येथून मछलीबंदर कोस साह येथें पावलों. इकडील वर्तमान तर इंगरेजानी बंगालियांतील बंदरानी हंगामा केला; यास्तव आपल्या पातशाहानीं फिरंगी गाडदी वगैरे मातबर जंगी सरंजाम फुलचरीस पाठविला आहे. त्यानी देवनामपटण इंगरेजाचे घेतलें. पुढे चेना-पटण घेणार; तें घेतलियावर बंगाला वगैरे श्रीमंताचे विचारें बंदोबस्त करूं. श्रीमंताच्या मर्जीप्रमाणें पूर्वीहि आम्हीं कितेक कामें केली व पुढेंहि करोन दाखऊं. श्रीमंतहि आम्हावर कृपा करितातच. प्रस्तुत इंगरेजाचें पारपत्य; आम्हास अगत्य तें श्रीमंतासहि अगत्य; यास्तव तुम्हीं श्रीमंतास लिहावें कीं, या प्रांती श्रीमंताची फौज आहे. तेथील सरदारास आज्ञापत्रें यावी कीं, हरयेकविशई अगत्य लागलियां आमचें साहित्य करीत; तर हें श्रीमंतास विस्तरे लेहून लिहिल्याप्रा। पत्रें साहित्याविशई सत्वर येतसें करावे ऐसे लिहिले आहे. त्यासी श्रीमंताचा त्यांचा स्नेह आहेच. त्यांच्या लिहिल्याप्रमाणें आपण कृपा करितीलच. श्रीमंताचे मर्जीस येत असलियां सदरहू पत्रें पाठवावी अथवा जैसी मर्जी असेल तैसे लिहावें कीं तदनरूप त्यांजला लिहिजेल हे विनंती.

¶*Janoji Nimbalker writes to the Peshwa that he was invited by the French to Jatpeth and asked by them to write to the Peshwa requesting on their behalf to help them in the war against the English.*

No. 93] [*24-12-1750*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांप्रति

वासुदेव दीक्षित अनेक आशीर्वाद उपरी. येथील क्षेम पौष शुद्ध ७ जाणऊन स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. बहुत दिवस आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी ऐसें न पाहिजे. येणारासमागमें पत्रद्वारें परामृश करीत असावें. यानंतर सांप्रत शहरांत तांब्राचें सैन्यांतील पत्रें सराफांचें दुकानीं पौष शुद्ध पंचमी शनिवारीं आलीं कीं नासरजंग मारला गेला. त्यावर येक दिवस स्तब्धसें होतें. आज सर्वत्र दाहा वीस सराफांचें येथें मुजरद जोड्या कासदांच्या आल्या. करनुलच्या पठाणानें दगा करून गोळीनें मारिला. डोकें कापिलें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दोनच्यार घटका सैन्यांत लूट जाली. तदनंतर हिदायेत मोहिदिखान यांची द्वाही फिरविली, मग निवळ जालें, असें सविस्तर वर्तमान लिहिलें आहे. आपणांस कळावें म्हणून लिहिलें असें. शहरांत सैद लष्करखान व दरगाह कुलीखान कोतवाल आहेत. हा कालपावेतों बंदोबस्त पूर्ववतच आहे. कळावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

¶*Vasudev Dikshit from Aurangabad communicates to the Peshwa the news about the treacherous murder of Nasarjang.*

No. 94] [*25-12-1750*

श्रीसुबराज

पुरवणी राजश्री सदासिवराव गोसावियांस

उपरी. नवाब नासरजंग याकडील वर्तमान तरी कर्नोल कडपेकर वगैरे यानी फिरंगियास सांगोन पाठविलें कीं, तुम्हीं रात्रौ येणें. आम्ही वाट देतों, नीट नवाबाचे डेरियावर जाणें, म्हणोन सांगितल्यावरून त्याच्या अस्पदेकडोन फिरंगी सातआठहजार आपले सामानानसी चालून नवाबाचे डेरियावर येऊन मोठा अनर्थ केला. तितका मारहि सोसून त्यास मारून माघारे सरकऊन, नवाब तिनीच्यारीसे स्वारानसी हवदेंत बसून, कर्नोल कडपेकराकडे सिवी देत तीर चालवीत गेले. दोनी तीर कडपेकरास लागतांच, कर्नोलकरानें हवदेंतून दोनी बंदुखांचे वार येकावरयेक चालविले, ते लागोन नवाब ठार जाले. सर्वेच पठाणानी डोसकें कापून बरछीस लाविलें. उजेडलेवरी हिदायेत मोहदीनखानास येख्तियार देऊन सर्वहि बंदोबस्त जाला. याउपरि घाट चढोन इकडे यावयाचा उद्योग करीत आहेत. याप्रकारें वर्तमान ज्यानी इतकें केलें तेथूनच लिहून आलें याउपरि जें वर्तमान येईल तेंहि लिहिजेल. पठाणानी अघटित कर्म केलें. ते दुसरियास मारावयास कोठें चुकतात असें वर्तमान छ १६ मोहरमीचें लेहून आले, याचा इतबार सर्वांनीं मानावा असें नाहीं. देखील हिदायेत मोहिदिनखान व नासरजंगाचे भाऊ यानी इतबार मानू नये, असा प्रसंग घडला आहे. रवाना छ ६ सफर. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा.

¶*News-letter reporting the circumstances of the death of Nasarjang.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 95] [*26-12-1750*

श्री

श्रीमंत भाऊ
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. आजी छ २६ मोहरमी अरकाटाहून नवाब आवदुल मजिदखान यांची कासीदजोडी आली. ताजी खबर. फिरंगियानी येकायेक चाली करून आगाडीवरी गोल्या टाकीत लडाई करीत आले. ते समई प्रहर रात्री होती. कडपेकर व कर्नोलकर व सावनूरकर यांची फौज नासरजंगाचे तैनात होती. या फौजेस तयार होऊन या मणून हुकूम केला. त्यास च्यार घटिका तयारी करावयास विलंब जाहला. मनात संशये नासरजंगानें आणिला कीं, पठाणानी फितवा केला, मणून पठाणावरी चाली करून आला. यास वसवास प्राप्त जाहाला कीं, आम्हास तयार व्होवयास हुकूम काये केला, स्वारी आम्हाचवरी करितो, यैसा निश्चये जाणून, सावणूरचे फौजेतील लोकानी बहुत मर्दानगी केली. नवाबाचे लेकाने बहुत सिपायेगिरी केली. नवाब नासरजंग यासी रुबरू होऊन त्याला गोली लागली. त्याचे डोसके कापिले, मणून वर्तमान आले. यानी हे वर्तमान यैकून नौबत वाजवावयास व तोब सोडण्याविशीं सांगून, तोफा सोडविल्या. याप्रो खबर. बाकी वर्तमान रो बगाजीपंत याचे लिहिण्यावरून विदित होईल हे विज्ञापना[1].

¶*Details of Nasarjang's murder are communicated to the Bhau by Trimbak Girmaji.*

No. 96] [*31-12-1750*

श्री

श्रीमंत राजश्री बाबा
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक चतुर्भुज मल्हार साष्टांग नमस्कार विज्ञप्ति. विनवयाकारणें ऐसे जे, पौश सुध १५ मुकाम कसबे पुणतांबें सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. लस्करांतून स्वार जालों ते आसीउंबरीस आलों. तेथून राजश्री राघो

---

१ याच मजकुराचें पंत प्रधान यांच्या नावचें पत्र आहे त्यांत 'याजकडील लोकांनीं त्याचें डोसकें कांपून भाल्यास टोंचून उभें केलें. छ १६ मोहरमी (१६-१२-१७५०) नासरजंग ठार जाहला' एवढा मजकूर जास्त आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
गोविंद याजकडे सरकारचें पत्र पाठऊन पागेचें पंचवीस राऊत आणिले, व सरकारचीं माणसें पंचवीस व किरकोल च्यालीस पनास माणूस मेलऊन, संभर दीडसें माणूस राऊत देखील तयार करून, कसबे मजकूरची वाडी येकरूखे आहे तेथें आला. तेथोन कसबा च्यारक कोस आहे तेथें राहिलों. कसबे मजकूरचा विचार मनास आणिला तो विठल सुंदर मोंगलाईकडील आमलदार त्याचा वडील बंधू चिंतोपत कसबे मजकुरीं ठाणियांत होता. त्याणें विठलपंतास बेलापुरीं पत्र लिहून पाठविलें कीं, श्रीमंतांकडून गृहस्त आले आहेत त्यांचा काये विचार? त्यावरून त्याणें आम्हांस पत्र लिहिलें कीं, तुम्हीं आम्हांस भेटून मग कसबे मजकुरीं जाणें; ऐसें पत्र लिहिलें. त्यावरून विचार पाहातां त्याची आज्ञा घेऊन कसबे मजकुरीं जावें तेव्हां खावंदाचे सलाबतीस अंतर करावें. यास्तव त्याचे भेटीस न गेलों. त्यास प्रतिउत्तर लिहून पाठविलें कीं आज मुहूर्त आहे, कसबे मजकुरीं जातों. मग आपले भेटीस येऊं. ऐसें लिहून पाठविलें. आणि कसबे मजकुरीं मार्गेश्वर वद्य १३ चे दिवसीं संध्याकाळीं दाखल जालों. ठाणेदार चिंतोपंत होते त्याणी गावाच्या वेसी बंद केल्या; त्यावरून त्याजकडे दोघे भले माणूस पाठविले कीं, वेसी बंद काये म्हणून केल्या आहेत? त्यास त्याणी सांगितलें कीं, आमच्या खावंदाचा आम्हांस हुकूम पाहिजे. तरी बेलापुरास जाऊन पत्र आणावें आणि सुखरूप यावें. पत्र आणिल्याविना कांही वेसी उघडीत नाहीं. मग फिरोन सांगून पाठविलें कीं, आम्हांजवळ आमच्या खावदाचीं पत्रें आहेत आणि दुसरी कोणाचीं पत्रें आणावी? बरवे प्रकारें समजणें, नाहीतरी वेसी मोडून गांवांत येतो. यैसें ऐकतांच वेसी उघडून गांवांतील समस्त लोक सामोरे येऊन गावांत नेले. आम्ही जातांच ठाणेदाराचे कचेरीस गेलों. भेटी जाली. परस्परें गोड गोस्टी भाशण जालें. त्यांची भेटी घेऊन बिन्हाडास गेलों. दुसरे दिवसीं तमाम खुमाचे खुम बोलाऊन आणिले. सरकारच्या सनदा वाचून दाखविल्या. रयेतीस अभयेपत्र होतें तें दिल्हें. सर्वांचा दिलासा केला. सरदेशमुखीचे कमाविसदार व वाडियांकडील कमाविसदार आहेत त्यास बोलाऊन त्यांचीं पत्रें त्यांस दिल्हीं. ते समई तो संतोश वृत्तीनें भाशण केलें. आपले घरास जाऊन परम श्रमी जाले कीं, सर्वांचें पोटिस्त बुडालें. यैसें बोलोन उभयेतां मोंगलाच्या ठाणेदाराकडे जाऊन विचार केला कीं, समस्त रयेत याजकडे जाऊं न द्यावी. याचे इतल्यानें कामकाजहि न करावें. ऐसा निश्चये केला, आणि ठाणेदाराची आमची खटखट लाविली. आम्ही विचार केला कीं धुलाजी वाड सा याचे मले २ होते व जगदेराव याचे मले २ येकून ४ मले आहेत ते जप्त केले, व बाजारची सेवसबजी व रोजांतलें सुदामत प्रमाणें मनास आणून घेऊं लागलों. तेव्हां ठाणेदारानीं तमाम गावच्या लोकांस ताकीद

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
केली कीं त्याजकडे कोणी न जाणें आणि बाजारांतहि सांगितलें कीं सेवसबजी[1] त्यांस न देणें, ऐसें जालियावरी आम्हीं गांवांत दवंडी फिरविलीं कीं, मोंगलाकडील अमलदार व सरदेशमुख व चौथाईकडील देखील सर्वांस कोणास सेवसबजी न देणें, दिल्ही होईल म्हणजे गुन्हेगारी घेऊं. ऐसी ताकीद केली; आणि त्यांस सांगून पाठविलें कीं आम्ही सेव घेत नाहीं, तुम्ही न घेणें. त्या दिवसापासून कोणीच घेत नाहीं. शाकभाजी कोणास पाहिजे तरी वाजवी पैसे द्यावे आणि घ्यावी यैसें जालें. त्या दिवसापासून रयेत बहुत संतोश पावली, आणि त्या दिवसापासून बाजारांत पांच सात माणसें मुकामीच ठेविलीं आहेत कीं, उदमी व्यापारी यासी कोणी जुल्म जोरावारी करितील तो करूं न पावे, या रीतीचा बंदोबस्त केला आहे; आणि तमाम सेटे महाजन व समस्त रयेतीस मिळोन त्याचे पदरीं द्वाही बांधिली, कीं मोंगलाचे कचेरीस व सरदेशमुखांकडे व चौथाईवाल्याकडे आम्हांवेगलें न जाणें. आम्हांस न पुसतां गेलेस तरी बेअबरू करून आणि गुन्हेगारी घेऊं. ऐसी ताकीद केली; याजमुळें मोंगलाकडील कामकाज बंद जालें म्हणून ठाणेदाराने च्यार पांच राऊत व सिपाई पाठऊन वाडी येकरुखे येथील पाटील दोघे धरून आणिले. त्याचे पाई बेडी घातली. त्या समयास सरदेशमुखाचे कमाविसदार याचे मतें बेड्या घातल्या. आम्ही त्यास सांगोन पाठविलें कीं त्याचा काये अन्याय असेल तो सांगावा, त्याचा जाबसाल केला जाईल. त्याचेविसीं सांगोन पाठवितांच त्यास नजरबंद केलें. स्थलांतरी ठेविलें. यैसें जालें. मग रातोरात राजश्री राघो गोविंद याजकडे पत्र पाठविलें. आणि सेंभर राऊत आणविले. ते दिवस उगवतांच वेसीजवल आले, तो ठाणेदारानें वेसी बंद केल्या, तेव्हां दाहा बारा कुराडी जमा करून, वेस फोडून, कुलूप मोडून, राऊत गावांत आणिलें; ते ठाणेदार ज्या हवेलींत होता ते हवेली वेढिली. हवेलीचे दरवाजियांत कांही राऊत व आम्हांकडील पाईचें माणूस व खासबारदार यैसे ठेविले. तो ठाणेदार घरांत होता तो जेथील तेथेंच दडून राहिला. च्यालीस पनास माणूस त्याचें व बारा पंधरा राऊत यैसे गांवात वारा पाणी जालें. मग येकरुखे येथील कैदेंत होते ते बेडिया तोडून आमचे हवाला केले. इतकें होये तों दोन प्रहर जालें. पाटिलास घेऊन आम्ही आपले ठिकाणास आलों. इतकें होये तों ठाणेदारानें येक उपलाणी राऊत बेलापुरास विठलपंताकडे पाठविला, तेथून त्याणें त्याचा भाऊ मोरोपंत सेंभर राऊत बरोबर देऊन पाठविला; तो तृतीय प्रहरीं येऊन पोंहचला. चिंतोपंतास बहुत प्रकारें फजित केलें. मोंगलाईचा आब गमाविला म्हणून रागास आले. ऐसा त्याचा पाणउतारा केला. मग

---

१ फिरतींत द्यावयाचा भाजीपाला.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
कितेक प्रकारें सलाईच्या गोष्टी कारवाई करून आमचे भेटीचा योग केला. पौश शुध नवमीचे दिवसीं त्याची आमची भेटी जाली. बहुतप्रकारें गौरवपुरस्कर भाशण करून समाधान केलें, आणि चिंतोपंतास सांगितलें कीं याचे इतल्यावांचून कांहीं काम काज कसबे मजकूरचें न करणें. सरकारचें कामकाज असेल तें याचे विद्यमानें करून घेणें. यासी अंतर केलिया आम्हांस शब्द नाहीं; आणि सांगितलें कीं, याचे विचारें कितेक रयेतीस कौलपत्र पाठऊन, कसबे मजकुरीं आणून, आबाद करणें; आणि हे कोणाची रदबदल करितील आणि कौल मागतील त्यास कौलपत्र देऊन त्यास आणावें. हे सांगतील तें आइकत जाणें; आणि येखाद्यास कौल देऊन आणून तरी कांहीहि हरकत न करावी; आणि सोमवारचा बाजार येथें सुदामत आहे तो हालीं भरत नाहीं, त्यास आम्ही कौल देऊन आबादानी करून तेथें उदमी व्यापारी स्थलोस्थलचे येतील, त्यास कोणे गोष्टीचा उपद्रव करूं नये, आणि बाजारचे वेसीवर झेंडा उभा करावा कीं पाटिलकीमुळें बाजारास कौल देऊन आबादी केली. ऐसा करार करून मोरोपंत बेलापुरास गेला. बाबुलगावीहून पागेचे राऊत आणिले होते, त्यास आज्ञा दिल्ही. या रीतीचें वर्तमान जालें तें सेवेसीं लिहिलें असे. झेंडा उभा करावयाची आज्ञा केली पाहिजे; व राघो गोविंद यास येक निरवणूकपत्र पाठवावें; आणि विठल सुंदर यांसहि निशेद करून पत्र द्यावें कीं आम्हांवेगलें कांहीं कामकाज न चाले. ऐसें पत्र आलियानें बहुत उत्तम होईल. सेवेसी श्रुत होये. सरदेसमुखाच्या कमाविसदारास व येक बांडियाच्या कमाविसदारास ताकीदपत्रें पाठवावीं कीं, मोंगलाच्या कमाविसदारास मिलोन वेडे चार केले तर कार्यास येणार नाहींत. या प्रमाणें पत्रें पाठवावीं म्हणजे उत्तम. या प्रांती नासरजंगाचें विपरीत वर्तमान आहे. याचा विचार काय करावा हे आज्ञा केली पाहिजे. त्याप्रमाणें वर्तणूक करून. सेवेसीं श्रुत जालें पाहिजे. कृपा लोभ असों दीजे हे विनंती.

¶*News-letter from Puntambe sent by Chaturbhuj Malhar to Baba (Ramchandra Baba ?) describing the situation in that part of the country. The paper mentions two more brothers of Vithal Sundar, Chintopant and Moropant.*

[*1750 ?*

, No. 97]

श्री

राजश्री **पंत प्रधान गोसावी यासी**

ऽ श्रीमंत सकलगुणालकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो पिलाजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. तुरकजातखान यांची स्त्री वजियाखानमजी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

याजकडे कोा खराडी हा गाव साहानक आहे. माहाराज कैलासवासियांचीं राजपत्रें त्याजपासी आहेत; आणि आपलीहि ताकीदपत्रे गुदस्ता दिल्ही होती. त्यास हमेदखान आमल चालो देत नाही. यास्तव त्याजकडील आतुनजी मोगलानी व धर्मोजी यादव सेवेसी आले आहेत. हे वर्तमान सांगतील. हमीदखान याचे वकील हुजूर आलेच आहेत. त्याजला आज्ञा होऊन वजियाखानमजी यांचा अमल सुरलित चाले ते करणार आपण समर्थ आहेत. विशेष काये लिहिणे ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao recommends to the Peshwa the restoration of the village of Kharadi to Vajiyakhanamji, wife of Turuktajkhan.*

No. 98] [*1750*

श्री

श्रीमंत कृपासागर सद्गुणाकर सेवितशंकपालितकिंकर प्रतापदिवाकर सर्ववरिष्ठाभिधान राजश्री पंतप्रधान स्वामीच्या चरणसेवेसी

दासानुदास विठलराव महिपत कृतानेक सां नमस्कार विज्ञप्ति उपर. येथील कुशल श्रीमद्विपुलप्रतापें असे. प्रार्थना कीं कनिष्ठ येकनिष्ठ सेवकानें राजश्री गोविंद खिजमतराव यांसमागमें विनतीपत्र पाठविले तें पवित्र नेत्रगोचर जाले असेल. उतर सादर न जाले याकारणें त्रिकरणे पत्रोत्तर मार्गानुकांक्षी आहेत. कृपापत्रागमन जाल्या स्वकीये भाग्योदये मानीन विशेष. लेखनमर्यादोल्लंघन यास्तव हेच विज्ञप्ति.

¶*Vithalrao Mahipat acknowledges the receipt of a letter from the Peshwa. The handwriting of the letter shows that he is the same man who writes the letters in the name of Janoji Nimbalker, in a highly ornate style.*

---

१ रोटीसाठीं दिलेला इनाम.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रीसुबराज

राजश्री सदासिवराव गोसांवी यांसी सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीो मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाब दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन केले पाहिजे विशेष. आपण व राजश्री पंडित प्रधान याणीं व राजश्री केशवराव यानीं विस्तरे लिहिल्यावरून भावार्थ कलों आला. पूर्वी परस्परें भेटी जाहली असतां कितेक संभाषण जालें त्याचें निदर्शन घडावें. आपण आम्हांस बंधू म्हणविले त्याप्रमाणें आमचा मनोदये सिधीतें पाऊन राजश्री पंत प्रधान व आपल्या भेटीचा योग घडावा या अर्थे पूर्वी आपण लिहिल्याप्रों रायेचूर प्रांते येऊन आपणास पत्रें लेहून पंधरा वीस मोकामे केली. आसें आसतां जवाबसालावर घालोन मोगलाकडे आनसंधान लाविलें असें दर्शविलें. त्यावरून बहुत अपूर्व वाटलें. मोगलास भेटावें आसेंच आसते तर भेटी होऊन कर्तव्य तें जाहले आसतें. जवाबस्वालाचा प्रसंग म्हणावा तर आपण बंधू, प्रधान पंत वडील, आमच्या मनोदयाप्रमाणे समर्पक करणे आपणास आवश्यक असतां आम्ही जवाबसालावर काये निमित्य घालावें? आमच्या मनोदयाप्रमाणें घडवाल हा आमचा चिताचा निशा आहे. सर्वत्रें दूर प्रदेसी होते ते आले. आपले येणे न जालें हेच आपूर्व वाटले म्हणून लिा; तरी आपण रायेचूर प्रांती मोकाम करावयाविसीं पूर्वी लेख केला तदन्वये भेटीची प्रतीक्षा करीत आसतां न आला म्हणून दर्शविलें हेच आश्चिर्य वाटलें. परस्परें भेटीचा लाभ घडावा हाच मुख्यार्थ जाणून राजश्री केशवराव यांस लिहिणे ते लेहून, सांगणे ते सांगून, राजश्री विठ्ठल अनंत यांस पाठविलें आहेत. ते पाऊन सर्व अर्थ कलोन, तदनसार समर्पक करून, उभयेताची रवानगी इकडे केलीच आसेल. आम्ही आपणाशिवाय नाहीं. आमचा भार आपणावर आहे. उचित तें करावें. +आपण लिहिल जे मद्यस्तीस दोष न लागावा या प्रकार सुचविल तर उभयताहि आपण आमास वडील. या प्रांती आपलेवर आमचा दुसरा विचार किमपि घडणार नाहीं. आमच मानस जे होणार राजकारण होतच आहेत. परंतु आपले दरशणाचा लाभ हेंच मुख्य बहुत लिहिण तर सूज्ञ आसा हे विनंती.

¶*Murarrao Ghorpade to Sadashivrao Bhau, accusing the latter of having started negotiations with the Nizam, when war was previously determined upon.*

+ येथून पुढें हस्ताक्षर खुद्द लेखकाचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 100] [*2-1-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

याप्रति

वासुदेव दीक्षित अनेक आसीर्वाद उपरी. येथील क्षेम पौष वद्य २ बुधवार जाणऊन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. पूर्वी सांडणीस्वाराबराबर पत्र आपण पाठविलें त्याचे उत्तर लिहिले आहे, त्यावरून विदित होईल. सांप्रत वो यज्ञेश्वर भट भागवत आले. यानी कितीक मुखवचनी वर्तमान सांगितलें तें सर्व कलों आलें. यानंतर छ २१ मोहरमचीं पत्रें खानाचे वकिलाचीं आलीं. नासरजंग मारलियावर पठाणानी हिदायेत मोहिदीखान याजभोंवतीं चौकी आपली बसविली. आपलाच यंख्तियार[1] करावा, खजाना घ्यावा असा विचार केला, तों फिरंगी पांच हजार येऊन पठाणाची चौकी उठविली, आणि आपली चौकी बसविली. पठाणास म्हणो लागले कीं असा सरदार तुम्ही दगा करून मारिला, निमकहरामी केली. आम्ही दीढ वरिष श्रमसायास केले, माणसे मारविलीं, करोड रुपयाखालें आलों, आणि तुम्ही निमकहरामी, धनी होऊं म्हणता, हें कसें होतें? फिरंग्यांचें बळ विशिष्ट आहे. पठाण याचे सैन्यापासून दोन कोस जाऊन राहिले व जानोजी निंबाळकर व रामचंद्रराऊ चंद्रसेनाचा लेक वगैरे हे आपले समुदयानसी वेगळे राहिले आणि हिदायेत मोहिदिखान यास सांगोन पाठविलें कीं आम्ही तुम्हास भेटत नाही. चाकर पातशाही; ज्यास पातशाही सनद येईल त्याचे तैनात राहू. निज्यामनमुल्क याचे धाकटे लेक तुम्हाजवळ आहेत, ते आम्हांकडे पाठऊन देणे. आम्ही बहुत दिवस त्याचा समागम दिल्हा, त्याचे सार्थक हे मुलें औरंगाबादेस पोहचाऊं. त्यानीं ते मुलें त्याजकडे पाठविलीं नाहींत. आपणाजवलच ठेविली. मोगलाई फौज आहे, ते आपली तलब चढली आहे ते हिदायेत मोहिदीखानापासीं मागतात. प्रस्तुत येक दरमाहा देऊं म्हणतात; ते घेत नाहीत. तेहि फौज वेगलीच आहे. फिरंग्याचे प्राबल्य बहुत आहे. हिदायेत मोहिदीखान व खजाना वगैरे नासरजंगाचे असा घेऊन दोन कोस मागें फुलचेरी-कडे दोन कोस कूच केलें, या प्रकारें वर्तमान सविस्तर लिहिलें आहे. पत्र येतांच आम्हास बोलाऊन सांगितलें त्यावरून लिहिलें असे. हिदायेत मोहिदीखान यांचीं पत्रें खानास व दरगाह कुलीखान कोतवाल व काजीस आलीं कीं तुम्ही आपली खातरजमा राखोन आपलाले अधिकारास सावध राहणे. कळावें म्हणून लिहिलें

---

१ अधिकार; सत्ता.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

असे. वरकड कितीक वर्तमान मुखवचनी येज्ञेश्वरभट भागवत यांस सांगितलें आहे; निवेदन करतील त्यावरून विदित होईल. बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Vasudev Dikshit writes to the Peshwa how, after murdering Nasarjang, the Pathans of Karnol, keeping Muzafarjang under restraint, tried to become masters of the situation themselves and how they failed in this attempt owing to the timely arrival of the French who rescued Muzafarjang and marched with him towards Pondicherry, taking with them the treasure of Nasarjang.*

No. 101] [*19-1-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ २ रबिलावल तृतीय प्रहर पावेतों कृपावलोकनें जाणून स्वानंदातिशय-लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. छ १ तारिखेचें आज्ञापत्र सादर जालें तें आजीच याच समईं प्रविष्ट जालें. तेथें आज्ञा की वरचेवर दिनप्रतीचें वर्तमान लिहीत नाहीं. नित्य दोन पत्रें पाठवावीं म्हणून आज्ञा, तर याच कामाविषईं सेवकाचें राहणे या स्थलीं जालें आहे. ज्या समईं जें वर्तमान आढळतें तें लिहून पाठवितों. वर्तमान विशेष आढललें त्याविषईं आळस केला यैसें तों होत नाहीं. सेवक लोकांस आज्ञा प्रमाण. नित्य दोन जोड्याही रवाना करूं. अद्याप सुलतानजी-कडील फौज आली नाहीं. येणार येणार यैसी मात्र आवाई आहे व वराडचीही फौज आली नाहीं. येका दो रोजांत दोन्ही फौजा येणार यैसें म्हणतात. नित्य दोन वेल दरबारास सेवक जात असतो. जें आढळतें तें लिहून पाठवितों. या वेगळें वर्तमानहि घेत असतों. सर्व बंदोबस्ती यथास्थित नगररक्षणाची आपले सामर्थ्या-प्रमाणें केली आहे. शाहा माहमुदाचा तकिया व मसजीद शहरास लगती आहे ते हस्तगत जालियास शहरास मोर्चा भारी आहे यैसें जाणोन बनाजी तेथें येऊन लगाब[1] पाहून त्याचे रक्षणास सातशें प्यादा नेमिला. तूर्त तीनसें प्यादा तेथें ठेविला आहे. स्वामी वाळुंजेवर आलियावर आणखी च्यारसें प्यादा तेथें ठेवितील. आपण खुद इदगियापुढें उभें राहावें व लोकांस ताकीद केली आहे. इदगियापुढें जाऊन उतरा म्हणून कोण्ही कोण्ही उतरतें. तेथें आसपास पाणी नाहीं याजकरितां लोक मन घालून उतरत नाहींत. स्वामीचाहि मुकाम लांब आहे म्हणून आमळसें आलीकडे आलियाचे वर्तमान आलें म्हणजे फौज झाडून तेथें राहील. खुदच

+ बालबोध अक्षर.

१ लागाची जागा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येऊन राहतील. दरगाईकुळीखान नित्य दरवाजे दरवाजे बुरुजो बुरूज फिरतच आहे. बलकटी यथाशाक्त करीतच आहेत. स्वामीच्या प्रतापापुढें काय राहणार आहे ! तथाप आहे तें वर्तमान लिहित आहों. कोणी खुषामती लोक काय सांगत असतील तें नकले. आजी स्वामीचें येणें सिवनेरीवरी जालें म्हणून आज्ञापत्र सांडणीस्वाराबराबर सादर जालें व शहरांतहि आवई दाट जाली याजवरून गडबड फार जाली. फौज तलाव्यास पाठविली आहे, व जागेहि वाटून दिल्हे आहेत. दीक्षित आद्याप संध्याकाळपावेतों पावले नाहींत. जेव्हां येतील तेव्हां सांडणीस्वाराबरोबर जाब पाठऊन देतों. कलावें म्हणून सेवेसीं लिहिलें आहे हे विज्ञापना.

¶*Banaji Madhavrao describes the progress of the mobilization of arms by Nasarjang.*

No. 102] [*19-1-1751*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक हरबाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील कुषळ तागायत छ २ माहे रबिलोवल स्वामीचे पुण्यप्रतापेकरून येथास्थित असे. यानंतर स्वामीचे सेवेसी पेशजीं विनंतीपत्र पाठविलीं तीं प्रविष्ट जाहालीं आसतील, हालीं राजकी वर्तमान तरी हिदायेत मोहिदीखान आपले समागमे आनवरखांजी वगैरे आमीर घेऊन फुलचरीस गेले तेथें फिरंग्याणी पुर्सिस केली कीं, तुम्हीं ऐसे सरदार नासरजंगासमागमे होतेस, आणि ऐसा आमीर याप्रकारें पठाणानी मारला हा भेद कैसा आहे तो सांगणें, तुम्ही सर्व मंडबी(ळी) त्याचं आन्न भक्षून त्याची हैगत केली हे वर्तमान पातशहास लिहून त्याचें उत्तर येईल तेव्हां तुम्हांस जाऊं देईन हें म्हणोन सर्वांस किल्यामधें ठेविले म्हणून च्यार रोज शहरांत वार्ता आहे. छ मजकुरीच आनवरखांजीचे घरीं पत्र आलें कीं फौज फुलचीहून निघाली. दरमजल आवरंगाबादेस येतात. पुढें वर्तमान येईल तें सेवेसी विनंतिपत्र लिहून. कितिक वर्तमान श्रीमंत स्वामीचे विनंतीपत्रीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. सेवक तापीचें श्नानसंध्या करून स्वामीचे शुभचिंतन करितो, विदित होये सांभाल पाळण करणार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञप्ति.

¶*Harbaji Ram sends news of Muzafarjang's advance upon Aurangabad with French assistance.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 103] [22-1-1751 ?

श्री

श्रीमंत महाराज राजश्री
नानासाहेब स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक भगवंत गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. सेवकाचें वर्तमान तागायत माघ शुध सप्तमी भौम्यवार मुकाम मामले बीड येथास्थित असे. सरलस्करचे चौथाईचे यैवजाकरितां राजश्री हणमंतराव निंबाळकर यांजकडे पाठविला. त्यास सांप्रत आज्ञापत्र सादर जालें कीं चोऱ्यासी हजार रुपये पुण्यास नेऊन राजश्री बापूजी बाजीराव यांस देणें. त्यास येथें तूर्त रुपये पनास हजार जमा जाहाले आहेत. निकट फारसी नित्य उठोन करितो. थोडकियाच दिवसांत झाडियानसी यैवज घेऊन मशारनिलेस पावता करितों. त्याजकडील कोण्ही विस्वासुक ब्राम्हण येता तरी सध्या जो यैवज जमा जाहला आहे, तो पुढें रवाना करून देतो. उरला तोहि निकड करून घेऊन पावता करून सेवेसीं येऊन पोहचतों. राजश्री पांडबा व धोंडोराम यांच्या व राजश्री हणमंतराव निंबाळकर यांची भेटी जाली. बोलीचालीचा सिधांत करून येका दो रोजांत निरोप घेऊन स्वार होऊन येतील. राजश्री आपाजी प्रभू दिमत राजश्री फत्तेसिंग भोसले यांची फौज च्यार पांच हजार परगणे पानगांव इकडे आली. सरलस्करचे फौजेसीं जुंझ जाहालें. आपाजी प्रभूस मोडिलें. सरलस्कराकडे पाडाऊ च्यार हती व दोनतीनसें घोडे आले, हे वर्तमान यांचे दरबारी आहे. याणी राजश्री फिरंगोजी पवार यास हजार फौज देऊन सिवपटणचे रखवालीस पाठविलें आहे. व राजश्री सेव्याजी मलवडे यास पांचशें स्वार देऊन पालीम परगणियांत रवाना केले. दोन अडीच हजार फौज बिडीयाजवळ आहे. शृत जालें पाहिजे. यैवजाकरितां राजश्री राऊ निंबाळकर यांस आणखीहि येक ताकीदपत्र पाठविलें पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Bhagwant Ganesh to the Peshwa from Bid, reporting an encounter between Appaji Prabhu and the Sarlaskar.*

No. 104] [3-2-1751

श्री

विनंती. येथील कुशल तागायत छ १७ माहे रबिलावल मुकाम लष्कर येथास्थित जाणऊन स्वानंदवैभवलेखनार्थ आज्ञा केली पाहिजे विशेष. नवाब हिदायेत मोहिदिखान आरकाटामधून कूच दरकूच चालिले. घाटापावेतों आले,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तो पठाण हिमत बहादर व करनालेवाले व आबदुल नबिखां कडकेवाला व आबदुल मजीदखां सावणूर बंकापूरवाला त्याचा लेंक तिघे जन आरकाटमधेंच राहिले होते त्यास पठाणाहीं चेंदाच्या (चंदासाहेब ?) लेंकासीं मिळून नेमलें होतें कीं हिदायेत मोहिदीखानाची व तिघे साहेबजाद्यांची जियाफत करून शहरामध्यें हवेलींत बोलाऊन नवाब नासरजंग द्यारखा यासी दगा करावा त्यास हेसुरान(?) हिदायेत मोहिदीखानास कळूं आल्याउपर हिदायेत मोहिदीखानानी जियाफतीनिमित्त शहरामध्यें न गेले. बाहेरूनच कूच करून चाला. त्यास घाटापावेतों येतां मागून पठान दरकूच करून जलदीनें येऊन पोहोंचले. त्यास लस्करामधें येऊन लस्करच्या आगाड्या पिछाडियास आजराहशरारतीच्या(?) बाहिरबुनगास लुटूं लागले. लस्करास आजार देऊं लागले. थैसियास फिरंगी हिदायेत मोहिदीखानासमागमे येत त्याचा आसबाबाचा[२] येक छकडा लुटून घेतला. त्याजवरून फिरंगी बहुत दिलगीर जाले आनि म्हणूं लागले कीं पलटणावर चढाई करूं. त्यास आज छ मजकुरीं नवाब हिदायत मोहिदीखान बमये साहेब जादे पठानावर चढाई केली त्यास पठाणहि तयार होऊन उभे राहिले. उभयपक्षीं लडाइ पडली. त्यास लढाई या मागें दोन जाल्या; परंतु हे लढाई थोर सफे-जंगची[३] जाली, बहुत लोक मारले पडले. पठाणाही फत्ते केली होती, परंतु ईश्वरास तमाम विश्वजनाची चिंता. याजकरितां पठाण मारले पडले. हिमतबहादुर याचे सीर साहेब जादा निजामआलीखां यानें आपलेंया हातें कापलें. सावनूरवाल्याचें सीर कापिलें. हिमतबाहाद्दराचा दिवाण मिर सैफुला त्याचेंहि सीर कांपिलें इतकीं सिरें भाल्यावर घालून आणिलीं. हिमतबहाद्दर यानें लडाईमध्यें मोठी जवांमर्दी[४] करून हिदायेत मोहिदियेखानाच्या हत्तीसी हस्ती भिडविला; परंतु नवाब हिदायेत मोहिदीखांही गोळी लागून कामास आले. त्यासिवाय आनीक उमदे कामास आले. नवाब निजाम आलीखां राजी बसले आनी त्यांची दाही फिरली. या उपर काये होईल तें लिहून. ईश्वरानें आजचेही थोर अरिष्ट वारले. जिवेच जात होतों. ईश्वरें वांचविलें. हातामध्यें जरब लागली त्यामुळें कष्टीं आहे. हिदायेत मोहिदीखान मारला गेला. जबून[५] जालें. सरदार बरा होता. आतां पाहावें कीं कैसें होईल. साहेबज्यादाहि जवामर्द आहे. शहाना आहे. कललें पाहिजे हे विनंती.

¶*News-letter to the Peshwa describing the engagement in which Muzafarjang was killed.*

---

१ मेजवानी. २ सामानसुमान. ३ कत्तल.
४ शौर्य. ५ वाईट.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 105] [5-2-1751

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक चंद्रभान मुधाजी जयेगोपाळ विज्ञापणा. येथील क्षेम तागायत छ १९ माहे रबिलावलपर्यंत स्वामीच्या कृपेंकरून सेवकाचें वृत्त येथास्थित असे विशेष. पूर्वी अबदुल खेरखानाची थैली व सेवकाचें पत्र कासिदाबराबर सेवेसीं पाठविलें आहे त्याज़वरून निवेदन होईल. याउपर छ १३ मजकुरी खोजे कुलीमखानाची थैली व वस्त्रें गुजरानिली. जबाणी वृत्त आज्ञाप्रमाण श्रुत केलें. मग दुसरे दिवसीं आपण मागती जाऊन जाबसाल मागितला, उत्तर दिधलें कीं येका दो रोजांत तुम्हास जाब देऊन. चौथे दिवशीं खानवालाशान येही आपणांसी बोलाविलें. खिलवतींत आम्हांस पुसों लागले कीं जबाणी काये फर्माविलें तें जाहीर करणें. आपण सांगितलें कीं नवाब नासरजंगास पठानाही मारिलें हे जबून जालें, त्यास तुम्ही येथें बसून काये मनसुबा केला आहे? तर अबदुल खेरखां व सेद शरीफखां व सेद लस्करखां कुल मिलोन काये पैरवी केली? तुम्हांसी व आम्हांसी पूर्वीपासून स्नेह आहे. नवाब आसफज्या होते तेव्हांही दरमियानें आपले तुम्हीच होते, पुढेंही आतां मातबर व पोख्तकार[1] तुम्हींच आहांत. आह्मीहि या प्रांती आलोच आहो. पुढें तरतूद काये केला म्हणोन या गोष्टी विचारावयासी मजला खिजमतीस पाठविलें आहे. तेव्हां त्याणी व त्याचे दिवान गिरधरलाल ऐसे म्हणो लागले कीं आमचा इरायेदा आहे कीं स्वामीनी या स्थळीं आगमन करावें. आम्हीं बेशक भेटीस येतों. येथील सुभे खेरखा जे द्रव्य देतील त्यापेक्षां आम्हीं दुगून[2] देवितों. रयेतीस या साहुकारास छेडनार नाहीं. त्याची तजवीज आहे. दुसरे हे जागा घेऊन देतों. आशेर किला आहे त्याच्या किलेदारासी साख्त[3] आहे. तेंहि स्थल प्राप्त होतें. तिसरे हिदायेद मोहिदीखां येतात, या गोष्टीची श्रीमंताचीं मर्जी काये आहे? आपण जाब दिधला जे तुम्ही कुल आमीर मिळोन काये तजवीज केली? याचा जाब त्यांही दिधला कीं पूर्वी हिदायेत मोहिदीखानांहीं सर्वांस इनायेत-नामे पाठविले. आपणासीहि आला कीं सुभेदारीचा कारभार आबदुल खैरखा-नाच्या सुपूर्त[4] केला आहे, तेणेप्रमाणें आपन कबूल करून घरीं बसिलों आहोत. सैद शरिफखानानी तों मानिलें नाहीं. त्यास शरीफखां व आपन येकदिल

---

१ विचारवंत. २ दुप्पट.
३ सख्य. ४ सुपूर्त = हवालीं काबीज.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
आहोंत. आपला खुलासा कीं नासरजंगाच्या भावास निजामआली यासीं होये ते गोष्ट करावी; व श्रीमंत स्वामीसहि याच राज्याची जरूर आहे, तेव्हां स्वामी व व आपण व सैद लश्करखां व सैद शरीफखां येकदिल जालों, तर जें करून ते होऊं सकेल. खैरखानाचा इरायेदा कीं हिदायेद मोहिदीखां होत हें उत्तम आहे. दुसरे म्हणों लागले कीं बिलफैल[1] आम्हांस वाली स्वामीच आहेत. दिलीहून कोन्ही सुबा ठेयरलियाउपर त्याचें म्हणविलें लागलें तर ऐसियांत स्वामी आम्हांस आपल्यासामील करून घेऊन आंगीकार कीजे. आम्हीं ज्यानमानासी हजीर आहोंत आगर स्वामीचे येणें या प्राा न जालें तर येक सरदार दोचौ हजार फौजे-नसीं येथें पाजे. त्यास आज्ञा कीजे कीं खोजे कुंलिमखांचा विचारांत राहून सांगतील ते कीजे. त्यास येथें जागाहि हस्तगत करून व दुसरेंहि स्थल घेतों व द्रव्यहि घेऊन आपण भेटीस येऊन पोहचतों. असे कितेक प्रकारें मजकूर यांचे आहेत. आतां नासरजंगाच्या मातुश्रीने व सैदलश्करखांही इनायेत पाठऊन यासीं बोलाविलें आहे. म्हणतात कीं जाणें जरूर लागलें. मग तेथें गेलिया-नंतर ते सांगतील त्यांच्या मर्जीप्रमाणें करनें लागेल. आतां सांप्रत कालीं आम्ही स्वामीच्या भरवसियानें आहोंत यैसा कृतनिश्चये आहे. यानिमित्य आपण सेवेसीं पूर्वी हुसेन बेग नामे पत्रें देऊन पाठविले आहे, त्यानी सविस्तर निवेदन केलेंच असेल. पुढें ज्याप्रमाणें आज्ञा होईल तैसी वर्तणूक करून. याचा जाब आपणासी लौकर आनविनें. त्याजवरून सेवकानें पत्र विस्तारें लिहिलें आहे. पुढें सेवकास आज्ञा पत्र येईल त्याप्रमाणें सालजाब त्यास सांगून. याची व खैरखानाची चित्तशुधता नाहीं. त्यास उभयतांही स्वामीसी आर्जो बंद आहेत. उभयेतांस कोने प्रकारें सांगावें येविसीं आज्ञापत्र पाठवावें. आणि खैरखानानी यैली सेवेसी पाठविली आहे त्यास आपणासी सांगितले कीं, आपल्या स्थलायोग्य विचारून आज्ञा कीजे. त्यास स्वामीची मर्जी असेल ते सेवकास आज्ञापत्र येईल तेणेंप्रमाणें ठयेराऊन सेवेसीं लिहून पाठऊन. येविशीं आज्ञा करावी. हे गोष्टीचा निकाल सत्वर जाला पाहिजे. दिरंग लागलिया याच्या गोष्टीचें शाश्वत नाहीं. कां जे हिदायेत मोहिदाखांही जलद येतों म्हणून हे यथें फिरोन नौदिगेरच्या[2] गोष्टी करतील. यास्तव येथील निर्गम सत्वर होये याचा बंदोबस्त करणार स्वामी समर्थ आहेत. राजश्री मानाजी निकम आंतुरलीवर आहेत. व राजश्री महिपतराव कवडे व राजश्री हरीपंत यावलकर आहेत. मोगलाची व यांची मामालियेत सिजल बैसत नाहीं. हर्शामर्श विशेष लागला आहे, व येथें राजश्री हरबाजी राम आहेत, त्यांजला आज्ञापत्र पाठविलें पाहिजे कीं चंद्रभान व तुम्हीं येके विचारें

---

१ निःसंशय, अगदी वस्तुतः.

२ विरोध.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कामकाज कीजे, आणि आपण खाजेम् कुलीनखाचे व आबदुल खैरखानाचें वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे. ज्याप्रमाणें आज्ञा येईल त्याप्रमाणें उभयेतांसी जाबसाल सांगून. येविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञापना. जासुदास येक रोजमरा येतां पावला होता, पुढें रोजमऱ्याविशीं आज्ञा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Chandrabhan Mudhaji, the Peshwa's news-agent at the Nizam's Court, reports the confusion created by the death of Nasarjang and solicits orders as to the future course to be pursued.*

No. 106] [*5-2-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसीं

विनंति. सेवक बनाजी माधवराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ १९ रविलावल मुकाम औरंगाबाद जाणून स्वानंदातिशय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. नवाब नासरजंग आंजनडोहीहून कूच करून पुढें चालिले. स्वकीयांत स्वामीचें आज्ञापत्र सादर जालें कीं त्याजसमागमें जाणे म्हणून आज्ञेप्रमाणें गेलें पाहिजे. पाल पडथळ सामान कांहींच नहुतां, याजमुळें खानाची आज्ञा घेऊन माघारे शहरीं आलों. कर्जवाम करून सामान सिध करून येका दों रोजीं स्वार होऊन लस्करांत जावें इतकियांत छ १७ मिनहूस सरकारचे हुंडीचे यैवजीं राजश्री शंकराजी नाईक भिडे यांहीं रुपये ९००० नवहजार व लग्नाचे फर्माविषीचें कापड किनखाब वगैरे जिनस दों ती हजाराचा रवाना केला तो परगणे वालुंज सरकार दौलताबाद येथून जवळ पाव कोसावर चोर राऊत आले त्यानी माणसें जखमी करून रुपये व कापड लुटून नेले, त्याजमुळें बखेडा बहुत जाला. आम्हांस वर्तमान कलल्यानंतर मुरादखान फौजदार व कमाविसदारास ताकीद केली. राऊत दिसत होते, परंतु कसब्यांतून धावणें निघून पाठलाग न केला, मुरादखान शहरांत होता. कमाविषदार जाधवां-कडील होते त्यानी पाठलाग केला असता तर राऊत जाऊं न पावते. ठिकाण तेव्हांच लागतें. औरंगाबादेसभोवते चोरराऊतानी उपद्रव फार मांडिला आहे. गरीबगोर मारले जातें. त्यांची दाद फिर्याद लागत नाहीं. हा माल समर्थाचां याजमुळें शोध केला असता तरी ठिकाणीं लागतें. तेथील लोकांनी गई केली.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
राऊत तों निघून गेले. वर्तमान श्रवण होतांच खानास व जानबा निंबाळकरांस सेवकाचीं पत्रें गेलीं. सेवकही स्वार होऊन जात होता इतकियांत वर्तमान यैकिलें कीं आज संध्याकाळीं अथवा उदईक खान शहरांत दाखल होणार आहेत, याजमुळें राजश्री शंकराजी नाईकाहीं राहविलें कीं तुम्ही खान आल्यानंतर या गोष्टीचा जाबसाल करून देऊन जाणें. नाहीतर खान आले तुम्ही नाहींत, म्हणजे गोष्ट दिरंगाईवर पडते. ताबडतोब होऊन मालाचें ठिकाण लागलें तर उत्तम नाहींतर वाट चालणे कठीण होईल. पुढे धंदाच राहतो. याजमुळें कितेक साहुकारानी वहमा खादला आहे याचा निर्वाह जाला तरीच नकषा राहतो. याजमुळें राजश्री राघो गोविंदास सरकार पैकियाची वाट परगणियाकडून करून घ्यावयाची आज्ञा जाली पाहिजे, अथवा पंचवीस राऊत व येक कारकून या कामाविषीं अलाहिदा वलुजेस पाठविला पाहिजे तेव्हां निर्वाह होईल. आज उदियांत खान आले म्हणजे जवाबसाल करून देऊन आज्ञेप्रमाणें लस्करांत जातों. न आले तर नाईकांचा गुमास्ता समागमे घेऊन जातों. लस्करांतच जवाबसाल होईल. राजकीं वर्तमान तर लौकिकांत कस्त[1] तों नवाबाचा फार दिसतो कीं हुजुरांत जावें, वजिरीस हस्तगत करावें, परंतु कोण्ही येकाचे चित्तास येत नाहीं कीं दक्षण सोडून जावें. यांत दोन तीन आसाम्या समागमें परिछिन जात नाहीं म्हणून राहिले आहेत. मिर कासमखान व खुजावंदखान व सफसिकन खान यैशे जात नाहींच म्हणतात. खानास तों कुल औरंगाबादची सुभेदारी देऊन ठेवणार व अबदुलरजखानास हैदराबाद वगैरे हवाले करून जाणार. वरकड हिदायेत मोहिदीखान वगैरे जेथें जेथें आहेत त्यानी आपला जिला सांभाळून असोन जानबासही औरंगाबादचे तैनात करतील. मजलदरमजल चालिले आहेत सराफ छ २१ मिनेहूस निघणार आहेत. बुऱ्हानपूर पावेतों जातील. पुढें जातील, साखरखेडल्यापासून काये मनसुबा करितील पाहावें. दिवस तों हिंदुस्थानांत जावयाचे नाहींत. वाटेस पाणी चारा मिळणें कठीण म्हणतात. कितेक अजुर्दे आहेत त्याविषईं सेर दरबारीं मोघम बोलिले, कीं जे दिलीस आम्हासमागमें यावयास अनमान करितील त्यांस गला दोरी बांधून वोढून नेऊं. यैसे बोलिले. वर्तमान या प्रकारीचें आहे सेवेसी श्रृत होये. स्वामीचे आज्ञेप्रमाणे लस्करांत तों जातों, परंतु खर्चाविचाची वोढी बहुत आहे. परामर्ष पोख्ता जाला पाहिजे. खर्च भारी निर्वाह होणे कठीण आहे. आम्हा समागमी सरकारांतून नेमून दिल्ह्या-प्रमाणें माणसें आहेत, व दरबारखर्च भारी पडतो, उपद्रव बहुत लागतो, येथें

---

१ जोर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
लस्करांत साहुकार वालखीचा कोण्ही नाहीं. याजकरितां खर्च लष्करचा चाले यैसा परामर्ष करविला पाहिजे म्हणजे स्थीत राहील. स्वामी सर्वज्ञ आहेत. सत्वर खर्चाविषी कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*News-letter from Nasarjang's camp, describing his measures for mobilizing his forces and strengthening his position.*

No. 107] [*10-2-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसीं

विनंति. सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ २४ रबिलावलपावेतों कृपावलोकनें जाणून स्वानंदातिशय लेखनाज्ञा केली (पाहिजे) विशेष. घोडी खानास प्रविष्ट करून मोताददार सेवेसीं आला आहे. खान घोडीवर बहुतच खूश आहेत. येथील वर्तमान तर हिदायेत मोहिदिखान आद्याप घाटं चढले नाहींत. पठाण मागें राहिले. जानबा श्रीवेंकटेश यात्रेस गेले. पुढें घाटावर भेटतील. चंदाखान तों फुलचरिसच राहिले यैसें तानाजीचें वर्तमान आहे. सातारियाकडील वर्तमान येथें आलें कीं गडावरील लोकानीं हंगामा फार केला. तोफाच्या गोल्यानी गोविंदराव चिटनिसाचे हवेलीचे सेजारीं मातबर येक दोन हवेल्या पाडल्या. पेठ लुटली गेली. सरकारची फौज होती ते वेणेवर राहिली. यैसीं वर्तमानें येतात. लस्करचेंहि येमाजी सिवदेवास निग्रह केल्याचें आलें. हिंदुस्थानाकडील मल्हारबासी माधोसिंगासी लडाईचा प्रसंग आहे. माधोसिंग बाहेर निघाला आहे. मल्हारबाचे तलावर उतरला आहे. फौज जमा करितो. मल्हारबा सांगानेरावर आहे, यैसें वर्तमान आहे. गायकवाड धुळें प्रांतीं आहे. बापूजी बाजीराव तों अद्याप लासुरावर आहेत. मुलुख खराब होतो म्हणून वर्तमानें वरच्यावर येत आहेत. आम्हीही बापूजी बाजीरायास लिहिलें आहे कीं पुढें हें स्थळ टाकून घाटमाथा जाणें. म्हणून खानानीं लिहविलें म्हणून लिहिलें आहे. सेवेसी श्रुत होय बहुत काय लिहिणे कृपा आसूं दिधली पाहिजे हे विज्ञापना.

¶*News-letter from Banaji Madhav, writing to the Peshwa all the items of news received by him from Satara and from Northern India.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 108] *[15-2-1751*

पो ७ रबिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंति. सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ २९ माहे रबिलावल संध्याकालपावेतों कृपावलोकनें जाणून स्वानंदातिशय लेखनीं आज्ञा केली पाहिजे. विशेष. आज प्राथःकालीं हिदायेतमोहिदीखानाकडील साहुकारियांत हरिचंद ताराचंद याचे वर्तमान आलें तेच क्षणी जसें श्रवण जालें तसें लिहिलें होतें. त्यानंतर येक 'गृहस्त राजश्री शामजीपंत टकले यांजकडील रामराऊ म्हणून त्या लस्करांत सराफियांत राहत होता. त्याचेंही पत्र सराफाचे पत्राबरोबर आलें त्याची नकल बजिनस स्वामीकडे पाठविली आहे त्यावरून तेथील वर्तमान कलेल. मागूनही येईल तें लिहून पाठऊं. राजश्री दीक्षित आजिजखानाचे दर्शनास आले होते. वस्त्रें प्रविष्ट केलीं बहुत संतुष्ट जाले. खानानी आम्हांस व दीक्षितांस सांगितलें कीं श्रीमंताचे सेवेसीं ल्याहावें कीं आमचे व आपले चित्तांत जें होतें तें ईश्वरें सिधीस नेलें. सर्व आपले घरचे जालें. इतःपर स्वामीनी माघारें फिरावें, गायकवाडाकडील व आपले राज्यांतील बंदोबस्त करावा. या प्रांतीं आल्यानंतर आमची श्रीमंताची भेटी होईल म्हणजे परस्परें सर्व मनांतील आशय कळों येतील, यैसें सांगितलें. आपणही पत्र लिहून आपलीच कासिदाची जोडी जलदीनें स्वामीपासीं पाठविली आहे. सेवेसीं श्रुत होय बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶Banaji Madhav reports further details of Muzafarjang's death and the interviews the writer and the Dikshit had with the Khan.

No. 109] *[17-2-1751*

छ ७ रबिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान यांप्रति

वासुदेव दीक्षित अनेक आशीर्वाद. व सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ १ माहे रबिलाखर-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पावेतों कृपावलोकनें जाणून स्वानंदातिशय लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. काल संध्याकाळीं खानांसहि लष्करचीं पत्रें आलीं, त्यांत विशेष इतकेंच कीं घांट चढून वीस कोंस राजोटी म्हणून जागा आहे तेथे लढाई झाली. मागून पठाण आले ते लुटीत आले. तेव्हां फिरंगियांसी विषाद आसबाब लुटण्यामुळेंच आला. मुजफरजंगांनीं पाठाणाचें घरास रामदासपंतास पाठविलें कीं विषाद न करणें; व फिरंगीयांसहि समजाविलें. उभयतां नाइकत; "तेव्हां लाढाई सुरु जाहाली. पठांणांनीं आपलें लष्कर सोडून आद कोंस माघारें गेले, मागतीं आले, लढाई जाली. फिरंगियाचा मार भारी याजकरितां पठाण न टिकत. तेव्हां तिनदां हजारांनशीं देखील चालू घेतलें न टिकत तेव्हां थोडक्यानशीं लढाईचें तोंड टाकून पठाण मुजफरजंगाकडे हिंमतबहादर पंचविसाशीं येऊन हौद्यापावेतों भिडला; तेथेंहि मार जबर जाहाला. दोन तरवार हिंमतखानाच्या मुजफरजंगावर याच्या त्याजवर ऐसें समयांत, मीर महमदखान पादशाही दिवाण कललें, गरीब माणूस तो येका हौद्यावर मुजफरजंगामागें होता, त्यानें हिंमत-खानावर गोळी चालविली. व रामदासपंतानी हिंमतखानाचें शिर हौद्यावरून चढून कापिलें. दोघांनी शर्त फार केली, म्हणून खान बहुत आश्चर्य मानीत होते. पहिल्या लढाईत नवाबचे पुत्र निजाम अलीखान याणें शिपाईगिरी बहुत केली. इतकी फत्तें जालियावर आज गैबी[१] तीर मुजफरजंगास लागला, तो डोळ्यांत लागला. जों लागला तों ठारच जाला, ऐसेंही वर्तमान आलें. पठाणाकडील मारले गेले बहुत. नवाबाकडील फारसे मेले नाहींत, फिरंगी बहुत कामास आले. मसनदनशीन सैद महमदखान सलाबतजंग निजाम-अलीखानाहून वडील त्यास केलें. द्वाही त्यांची फिरली म्हणून खानाहीं सेवेसी लिहिलें आहे. श्रुत होईल. आतां खानाचें मानस आहे कीं आपण तिकडे न जावें; माघारें फिरावें. आपला राज्याचा बंदोबस्त करावा जे ईश्वरें स्वामीच्या आपला चित्तांतील अर्थ केला. या प्रांती आल्यास परस्परें वर्तन होऊन पुढील इत्यर्थ करावा, ऐसें आहे. स्वामी सर्वज्ञ आहेत. चित्तास मसलत येईल ते केली पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Vasudev Dikshit and Banaji Madhavrao communicate to the Peshwa the news that Muzafarjang was killed in the battle between the Pathans and the French.*

---

१ गुप्त.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 110] [19-2-1751

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान यांप्रति

वासुदेव दीक्षित आसीर्वाद व विनंती सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ ३ माहे रविलाखर पावेतों कृपावलोकनें जाणून स्वानंदातिशय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. काल छ २ मिनहूस पत्रें दिलीकडील खानाचेथें आलीं; तेथें वर्तमान कीं फेरोजंगास दक्षणचे सुबदारीची खलत बादशाही जाली, व डेरेहि दाखल जाले. निघणार, व नसिरजंगास औरंगाबादची सुबदारीचीं ज्यावतीची पत्रें-हि येणार यैसे खानास परस्परें लिहिलीं आलीं आहेत. याजवरून काल आम्हां उभयतांस बोलाऊन खानानी सांगितले कीं हें वर्तमान श्रीमंतास ल्याहावें कीं फेरोजंग तों येणार. आमचे यजमान पुत्रच आहेत. इकडील त्रिवर्ग नवाबाचे पुत्र आहेत. त्यांस सर्व लोक सांगतील कीं तुमचे वडील भाऊ पितृ-स्थानीं आहेत, यांचे आज्ञेंत राहावें म्हणून. तद्वत तेहि राहतील. आतां-पासूनच किलेदार हैदराबादी आदिकरून सर्व त्यांस लिहितच आहेत कीं सर्व आम्ही तुमचे आहों म्हणून. तेच आल्यानंतर त्यासी बेरोख कोण वर्तणार आहे? असो इतके दिवस मसलत रावजी आम्हांस भलत्या गोष्टीची पुसत आसेल कीं कसें करावें. सांप्रत आम्हांवर हा प्रसंग या प्रकारीचा आहे. आम्ही कसे वर्तावें, आम्हांस काय सलाह श्रीमंत देतात, हें लिहून पाठऊन याचें उत्तर सत्वर आणविलें पाहिजे, म्हणून त्यावरून हें पत्र लिहिलें आहे. याचें उत्तर पाठविलें पाहिजे. आणखी म्हणत होते कीं इतके लौकर फेरोजंगानी वस्त्रें घेतलीं, हें कांहीं उगीच घेतलीं नाहीं, श्रीमंताचे अनुसंधानावरूनच घेतलीं आहेत व ममताहि श्रीमंताची त्यांजकडे आहेच यैसें म्हणत होते. कर्नाटकचें वर्तमान तर कडप्यापासून बारा कोसावर राखोटी आहे त्या मैदानांत युध जालें. ते दिवशीं मुजफरजंगाची मातुश्री व स्त्रीपुत्र फिरंगियानी निरालीं केली. खजाना मुजफरजंगास कर्जदाखल दिल्हा होता तोहि आपणांकडे नेला. निराले जाले; व आम्हांस मुजफरजंगाबा आमच्या मुख्यानी पाठविलें होतें. इतःपर आपल्या मुख्य कपितानास लिहून त्याची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं म्हणून. याजवरून खानहि म्हणत होते कीं बरें दिसत नाहीं. फिरंगी गालिब त्याच्या प्रसंगास या मुलांच्यानें पुरी पडवतें यैसा अर्थ नाहीं. पुढेंहि महदनर्थच दिसतो. जेव्हां भागानगरास स्वस्तिक्षेम येतील तेव्हां खरें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
तदनंतर शहरास दाखल जाले ते दिवसीं त्याचें पुनर्जन्म आहे. यैशा आशयावर बोलत होते. प्रमाणच आहे, मुजफरजंग मेला, फितुर वारला हें जालें नाहीं. ईश्वर काय करतो न कले. राजश्री बापूजी बाजीराव न्हाहाल डोंगरीवर आहेत; व रंगराव दादूखानहि घाटाखालें आहेत. इंद्रोजी कदम वगैरेहि साता पांचा कोसीं आहेत. सर्वत्र येकेठाईं होणार. गायेकवाडहि लांबकानीच्या मैदानांत आहेत. युधाची सिधता केली आहे. व बापूजी बाजीरावहि जैरिंदे जाले आहेत. युध होणार यैसें वर्तमान मुरादखानाचेथें आलें. आमचेहि जासूद गेले आहेत. वर्तमान येतांच लिहून पाठऊं. नेमीदास सावकार सांगत होते कीं मल्हारबासी माधोसिंगासीं सख्य जालें. यैसी पंच्याइसिची गोष्ट राहिली. छत्तीस लाख रुपये ठरले म्हणून सांगत होते. ईश्वर जाणें. आणखी कोठें शहरांत लिहिलें आलें नाहीं. सांप्रत वर्तमान इतकें आहे, पुढें येईल तें वरचेवर सेवेसीं लिहून पाठऊं. बहुत काय लिहिणें? कृपा असूं दिधली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Vasudev Dikshit and Banaji Madhav to the Peshwa, describing their conversation with the Governor of Aurangabad and the appointment of Ghaziuddin Ferozjang to the Nizam's masnad by the Emperor.*

No. 111] [*20-2-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ १९ माहे रविलाखरपावेतों कृपावलोकनें जाणून स्वानंदातिशय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. नवाब मुजफरजंग व पठाण परस्परें लडून वीर स्वर्गवासी जालियाचें वर्तमान व राजश्री बगाजी यादव यांच्या पत्राच्या नकला पाठविल्या त्या पावल्या; व सेवकास पत्र होतें त्यांत स्वहस्ताक्षर वली च्यार होत्या, तेथें आज्ञा कीं खानास वाचून दाखवावयाविसी लिहिलें होतें कीं निजाम आली तों

---

१ सडे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सर्व प्रकारें आम्हांसी स्नेह उत्तमच चालवितील. आमचे मनांत स्नेहाचे रीतीनें त्यांजपासून उमेद फार आहे. याचा विचार खानास पुसणें म्हणून. आज्ञेप्रमाणें विच्यारिलें. त्यास बोलिले कीं जे कांही रावसाहेबांच्या व आमच्या चित्तांत होतें तें ईश्वरें घडून आणिलें. आतां पुढेंहि हेंच उत्तम आहे कीं ज्या रीतीनें यांच्या वडिलांशीं स्नेह चालविला त्याचप्रमाणें यासींहि चालावें आणि पुढें यास कोण्हेहि गोष्टीचा उपसर्ग न लागे यैसे करावें. यैसें केलियानें रावसाहेबांस मोठें येश आहे कीं जैसें बोलत होते तैसेंच केलें. आम्हांस विचार पुसिला तर आमच्या विचारांत यैसें येतें. इतकियावर माहाराव जानोजी जसवंत तेथें येत आहेत. त्यांसहि या गोष्टीची सलाह पुसावी कीं ते तेथील विचारास वाकीफ आहेत. तुम्हांस जवल आहेत. समयानसार नेक सलाह देतील इतकें सांगितलें. याचा अर्थ ध्यानांत आणून देशकालानसार करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना

¶*Banaji Madhav reports to the Peshwa the condition of things after the death of Muzaffarjang. He also reports the friendly attitude of Nizam Ali Khan towards the Peshwa.*

No. 112] [*23-2-1751*

श्री

श्रीसकलगुणालंकरण राजमान्य
राजश्री रामाजी बावा गोसावी यांसी

स्नेहांकित चंद्रभान मुधाजी जये गोपाल विनंती उपरी. येथील क्षेम तागाईत छ ७ रविलाखर जाणून स्वकीय आपलें कुशल लिा गेलें पा विशेष. येथें आबदुल खैरखा तगीर[1] जाले. खोजे कुलिमखानास दिल्लीहून फर्मान व गाजीउद्दीखानाचा इनायेतनामा आला आहे. आतां सुभेदारी यांजकडे जाली. आमचा जाबसाल पूर्वी त्यांजकडे लागला होता, त्याचें उत्तर श्रीमंताची आज्ञा कीं राजश्री महिपतराव कवडे व हरी दामोदर यांजकडे लिहिलें, ते सालजाब करतील. त्यास खैरखानांनीं जाब दिधला जे, त्यांजकडे जाबसाल कीजे त्यावरून खोजे कुलिमखांजवळ मजकूर केला. तेंहि उत्तर दिल्हें कीं जप्ती उठली, जागिरा सोडल्या; आतां ही गोष्ट स्नेहांत दूर आहे. हा कुल मजकूर येजमानाच्या पत्रावरून श्रुत होईल. त्यास

---

१ बदलला.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आपण विनंती करून प्रतिउत्तर घेऊन काशीद येतील याबराबर आज्ञा येईल तैशी वर्तणूक करून. काम कांहीच नाहीं. येजमानाची मर्जी काय आहे हें सविस्तर कृपा करून लिहिलें पाहिजे. हें विनंती.

¶Chandrabhan Mudhoji to Ramaji Bawa, informing him that Abdul Khairkhan has been transferred and Kulimkhan is appointed to the subha of Khandesh to whom future plans should be reported.

No. 113] [*25-2-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक चंद्रभान मुधाजी जयं गोपाळ विज्ञापना. येथील क्षेम तागाईत छ ९ माहे रबिलाखरपर्यंत स्वामीच्या कृपेंकरून सेवकांचें वृत्त येथास्थित असें विशेष. स्वामिराजी कृपा करून सेवकास आज्ञापत्र छ २३ रबिलौवलचें पाठविलें ते छ २८ मिनहूस पावलें. तेथें आज्ञा ऐसी जे. आपण आंबडाजवळ आलों. शहरचे बोलीचा मजकूर राजश्री महिपतराव कवडे व राजश्री हरि दामोदर यांस लिहिणें. ते सालजाब करतील. त्यास पूर्वी खैरखानास सुभेदारी होती म्हणोन सालजाब तिकडे लावला होता. त्याची थैली व आपणांसी फर्माविलें होतें तेणें-प्रमाणें सेवेसी विनंतीपत्र पाठविलें होतें. जाब सतरावे दिवशीं आला. तेच दिवशीं छ २८ मीनहूस दिल्लीहून पातशाहाचा फर्मान व नवाब गाजुदीखानाचा इनायेत-नामा व वस्त्रें खोजे कुलिमखानास खानदेश व बऱ्हाणपूरचे सुभेदारीचीं आलीं. दुसरे दिवशीं फर्मान बाहेर घेऊन जाऊन खान मशारनिले आले. खैरखानाही आमलेफैला[1] रुजू करून आपले घरीं बैसलेत. आपण व राजश्री हरबाजी राम खैरखानासी मजकूर केला तेव्हां त्याणी उत्तर केलें कीं आपली सुभेदारी तगीर जाली. आतां सालजाब तिकडे करणें. आपण बाहाल[2] असतों तर या गोष्टीस अंतर न करितों, ऐसा जाब दिधला. मग आपण उभयेतां मिळोन खोजे कुलिमखानाकडे जाबसाल केला कीं या गोष्टीचा मजकूर राजश्री हरीपंतास लिहिणें लागतो; त्यास उत्तर दिधलें कीं आतां आमच्या जागिरा वगैरे कुलजती सुटल्यात, श्रीमंताच्या व आपल्या स्नेहांत दुसरा विचार नाही, ऐसें लिहिणें; व पातशाहाचा फर्मान व गाजुदीखानास निजामनमुलुक खिताब जाला त्याचा मजमुं[3] कुल वाचून अर्थ सांगून दाखविला व म्हणो लागले कीं राजश्री बापू भिवरावास आपणाकडे रवाना केलें होतें कीं आमच्या मर्जीप्रमाणें सांगोन तें करावें. मिरजा हुसेन बेग राजश्री बापूबराबर

---

१ तावा, अमल. २ पूर्ववत् कामावर. ३ मजमून, सारांश.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

होते ते राजश्री बापूनी पत्र आम्हांस लिहून पाठविलें होतें. मिरजास मागती त्याजवळ रवाना केलें. सारांश म्हणो लागलें कीं आमचे चित्तीं होतें कीं निजामनमुलुकाच्या घराण्यांत पयेरेव[1] होये तेच श्रीमंताच्या चित्तीं होतें तें जालें. आनि हिदायेद मोहिदीखां मृत्ये पावले. हें स्वामीस येश आलियाचे व आपण सर्व प्रकारें आतां स्थापित आहोंत यैस्या किती भाशण केलें. त्याणी थैली सोबत पाठविली आहे त्याजवरून निवेदन होईल. राजश्री दमाजी गायकवाड याची व राजश्री बापू भिवराव व राजश्री महिपतराव कवडे व राजश्री हरी दामोदर येकत्र होऊन मांडवे बहादुरपुरा शेरबेगचा याजवल युद्ध मोठें जालें. गायेकवाडाकडील दोन च्यार भले माणूस पडलेत व इकडीलहि थोडे बहुत लोक जाया जालेत. नाही तो गायेकवाड बऱ्हाणपुरावर येणारच होता. येथील वर्तमान स्वामीच्या आज्ञा-प्रमाणें राजश्री कवडे व हरिपंतांकडे पत्रें पाठविलीं आहेत; तेथील उत्तर येईल त्या-प्रमाणें करून. पूर्वी जासूद जोडी सेवेसी पाठविली, तेवीस रोज जाले अद्यापि आली नाही; आनि येथें बरोबर जोड्या तीन आहेत यासी खर्चास नाहीं. पुढें सेवकास ज्याप्रमाणें आज्ञापत्र येईल त्याप्रमाणें सालजाब करून. जाबाविशीं आज्ञा व खर्चाविशीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञापणा.

¶*Chandrabhan Mudhoji, the Peshwa's news-agent, reports that imperial orders have arrived appointing Khoje Kulimkhan to the subhaship of Khandesh and Burhanpur and describes the battle fought by Damaji Gaikwad.*

No. 114] [पो *7-3-1751*

पो छ १९ रबिलाकर

श्री

बातनी पत्र शहर अवरंगाबाद अहितुलाखान याजबराबर काफला व उमदे लोक सलाबतजंग याचे सइन्यास जात होते, त्यास बेदरचा किलेदार मीरमुक्रदाखान यानें अवघ्यास कैद करून ठेऊन लाख रुपये मागतात. निजाअलीखानानें किलेदार मजकुरास लिहिलें आहे कीं तुम्ही चाकर आमचे अहात. नवाब सलाबतजंग यास किला न देनें व तुम्ही फौज ठेऊन भाडेने पैका शिबंदीचा जो होईल तो आपन देऊं ऐसें म्हनतात व मिरजा बकर याजला करोडगिरी व अंबाडची फौजदारी जाली. येथील करोडी[2] आमल देत नाहीं. बहादरदीलखां दिवान आवरंगाबाद म्हणतो कीं तुम्हीं आंबडप्रमाणें येथील फौजदारी सोडून देने. आपन करोडगिरीतें[3] तुम्हांस

---

१ प्रवेश. २ कर. ३ करवसुलीचा अधिकार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दखल देऊं. दुसरें आयेकिन्यांत आलें कीं दमाजी गाईकवाड निजामआलीखानासी मिलाला, व करांडियाचे कबिल्यास निजामअलिखानानी धरलें, असें आयेकिन्यात आलें. निज्याम अलीखान बऱ्हाणपुरीं आदुखान्यांत दाखल जाले व अनवरखानाचे घरास खतनी लाविली आहे व तमाम उमदे लोक पैकेदार पलोन गेले विशेष विज्ञाप्ति.

¶*News-letter reporting the opposition of Nizam Ali to the accession of Salabatjang.*

No. 115] [*13-3-1751*

श्री

सेवेसी तुबाजी अनंत सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २६ राखर बुधवारपर्यंत येथास्थित असे. स्वामीची आज्ञा घेऊ(न) स्वार जालों. ते संध्याकालीं चौं घटका दिवसां लस्करास पावलो. त्या लस्करास व या लस्करास सोला कोसांची तफावत आहे. कालीची मजल लांब जालियामुळे दरबारास जावयाचे जालें नाहीं. आनवरखान बकसी व गोविंदराव वकील माहारायांचे, यैसें दोघेजण रा माहारायांच्या डेरियास आले. त्याणीं भेटीस जावयाचा मजकूर केला. त्यास लांब मजलीमुळे कोणांचे दिवटे व खिजमतगार आले नव्हते, याजमुळे व प्रजन्य आला याजमुळे भेटीस जावयाचे न जाले. कुचामुकामाची चिठी पाठवावी, त्यास ते गेले तेव्हा च्यार घटका रात्र जाली. तेथे पावले तेव्हां प्रहर रात्र जाली. याजमुळे गोविंद वकील यांची चिठीहि न आली व माणूसहि फिरंगी येऊ न देत. याजकरितां आजी सकाल दो घटका दिवसां चिठी मुकामाची आली. आजीचा मुकाम येथें आहे. प्रहरा दिवसां भेटीस जाऊन ते जें बोलतील तो मजकूर सांडणीस्वारांबा सेवेसी लेहून पाठऊन. या लस्करांत धारण हरभरें अडीच पाइली व जोरी च्यार पाइली आहेत. मौ सफीचे रात्री कुली वस्त्राहरण केले. सेवेसी स्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant explains to the Peshwa that he has been delayed on the way by rains and hopes to meet the Nizam soon.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसीं

विनंती. सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ २७ माहे रबिलाखर पावेतों कृपावलोकनें जाणून स्वानंदातिशयलेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आज्ञापत्रें कासिदाबराबर तीन पावलीं त्यांत खानासी बोलून निजामआलीस ये प्रसंगीं उचित लेखन करवावयाची आज्ञा होती. त्यास खानाचे चित्तांत तों असेंच कीं लेखन करून उभय पक्षीं स्नेह व सरकार किफायतीमुळें पुढील कार्याची पैरवी व आपले दौलतेची करामत आहे परंतु इतकें दिसतें कीं येथूनहि द्रव्य देऊन रवाना केले. पूर्वस्नेह तों आहेच. पुढेंहि त्यास द्रव्य द्या, स्नेह करा, म्हणून लिहिणें केवळ यैक्यतेचेंच दिसून सर्व कर्तव्य आपणच केलें, यैसें त्यास भासवणार नव बोलतीं भासवितील. येथूनहि कितेक आमित्र मनास मानल्यासारखें आम्हांविषईं लिहीतच आहेत. आम्ही तों येकनिष्ट नवाबाचे संततीची आहों. निज्यामदौलासीं येकनिष्टच होतो. मध्यें मुजफरजंगासी येकनिष्टता कार्यापुर्ती धरली होती. प्रसंग तसाच पडता तर कलतें. आतां दिलीहून पत्रें फर्मान गाजुदीखानानीं पाठविली तेंहि न्याबतीचीं हेंहि सर्वत्र विदितच आहे. सलाबतजंगाहीं इनायतनामें[1] न्याबतीचे जागीर गांडापूर आडीचा लाखाचा तनखा गुलजार परगणा शहाराजवल दु हजारी मनसबा इजाफा पूर्वील च्यार हजारी सांप्रत दु हजारी येकूण सा हजारी जाले इतकी कृपा केली. परंतु आपण कबूल करीत नाहीं. सांप्रत दोन लक्ष रुपये आपले घरीं येतात. हंगाम आहे परंतु घेत नाहीं, याचें निमित्त कीं आपण यांचे दौलतखाह. यांनी तों सिलंगणचे सोनें वाटावयाचें मांडिलें. आम्ही कबूल केलियावर सर्व जपत आहेत. मनमानेसारख्या जागिरा घेतील, मग यांजपासीं काय राहील. दौलत कशावर करतील. जो औरंगाबाद सुभियांत जीव तेवढा जागिरांत दिल्हा, मग काय करणार? तीन सुभे तों हातचे गेलेच दाखल. उरले तीन त्याची गत यानी या प्रकारें केलियास परिणाम काय? हजूर कारभारी मिळाले आहेत त्यांस आपलें नांव करावें, बरें म्हणवावें हाच प्रकार. ते समयास यांच्या कार्यास आले आहेत त्यांचें पथ्य त्यांस. दुसरे आम्ही जागीर न घेतली तर आणखी कोण्हांस घेतां येत नाहीं, याजमुळें ते द्वेषहि करितील. मनास आल्याप्रमाणें आम्हांविषईहि पैशुन्य[2] करतील. दिलीकडील मिलापीहि म्हणतील. तथापि आम्हांस हेंच लाजिमें[3] आहे कीं जागीर कबूल न करावी, यैसे पेंच आहेत.

---

१ कृपापत्र. २ लबाडी. ३ योग्य.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
अशांत श्रीमंतांकडील तरफसानी लिहिली तर विरुद्धदर्शी आहेत ते त्यांस विंबून पुर्ते बदनाम करितील हा आंदेशा होता. मग सेवकानें कमालुदीखान दिवाण व मजलसराये पेशकर यांसी स्नेह आहे. दुसरेयांचें सांगणें खानासहि प्रमाणांत आहे, मग यांजकडून सांगऊन लेखनाचे पल्यावरी आणून सलाबतजंगास ये प्रसंगीं स्नेह उत्तम प्रकारें राखावा. जे जे मनोरथ असतील ते करावे म्हणून बहुता प्रकारें लिहिलें आहे, व खानाचेंहि पत्र सेवेसीं पाठविलें आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Banaji Madhav reports to the Peshwa the attitude of Nizam Ali Khan and advises friendship with Salabatjang.*

No. 117] [*18-3-1751*

श्री

सेवेसी तुबाजी आनंत कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ १ जमादिलावल प्रहर रात्रपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून येथास्थित असे विज्ञापना. स्वामीचे अज्ञापत्र सांडणीस्वार यांजबा सादर जालें तें सा घटका रात्रीं पावलें त्याचा आभिप्राये कलों आला. येसियास स्वामीनी कितेक प्रकारे शब्द लाऊन लिा; त्यास जो प्रसंग दृष्टीस पडला अगर शोधांत येईल तो ल्याहावा. केवल बाधअवईचे वर्तमान सेवेसी काय ल्याहावें? त्यांचा काही दुसरा आर्थ दिसोन येत नाही. अवयोग बारा घटकापर्यंत होता. त्याजमुले त्रितीये प्रहरीं दरबारास गेलों. तेथे रामदासपंताची व माहाराव यांची बोलीचाली जाली. मग नवाबाकडे येकांती जाऊन बोलीचा करार करून मग जानोजी ढमढेरे व आम्हांस बोलाऊन समक्ष बोलीचा करार करून भेटीचा निश्चय केला, आणि माहाराव यास व आम्हास निरोप दिल्हा, ते चौ घटका रात्री डेरियास आलो. स्वामीकडे पत्र ल्याहावे तो पर्जन्य लागला. याजकरतां चौ घटकांचे आंतर पडले. तों सांडणीस्वार येऊन पोहोचले याजबा सेवेसी पत्र लिहिले आहे. मुरारजी घोरपडे व आणखीहि कोण्ही आले तऱ्ही कोणेविशी अंतराये आहे यैसे नाही. याप्रा राजश्री माहाराव याणी करार करून आपल्यास पत्र त्यानी लिा आहे, त्यावरून सेवेसी निवेदन होईल. आपण च्यार कोस कूच करून यावें. यांस आम्ही भेटीस उत्तर आलियावरी घेऊन येतो. बहुत काय लिहिणे हे विज्ञाति.

¶*Tubaji Anant informs the Peshwa of his discussions with the Nawab and the latter's consultations with Ramdaspant and Maharao Nimbalkar.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 118] [*19-3-1751*

श्री

सेवेसी तुबाजी अनंत कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ २ जावल दोन प्रहरपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. स्वामींचे आज्ञापत्र जासुदासमागमचे सकाल दोंघटका दिवसा सादर जालें. त्याजवरी राजश्री माहाराव यानीं गोविंदराव वकील राजश्री रामदास-पंताकडे पाठविले. त्यांस च्यार गोष्टी सांगोन भेटीस निघावयाचा निश्चये केला. त्याच्या विचारें उदईक यावें येसें होते. परंतु याणी बल देऊन आजीच निघोन यावें यैसा करार केला आणि त्यांसी बोलिले कीं आम्हास आजी रात्री तेथे न ठेवावे. माहाराव यानीं मान्य केले. राजश्री रामदासपंताची तयारी जाली. माहारावहि तयार जाले. स्वार होऊन भेटीस येतात. विदित जाले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant informs the Peshwa of the movements of Ramdaspant and Maharao.*

No. 119] [*22-3-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामी व भाऊ स्वामींचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबकराव गिरमाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल छ ५ जमादिलौवल पावेतो स्वामीचे कृपाकटाक्षावलोकने सावनुरी सुखरूप आसो विशेष. पूर्वी सरकारचे कासीदजोडीसमागमे हिदायेत मोहीदीनखान मारला गेला, कडपेकर पळून गेला, व कनोलकर व सावनूरकर याचे पुत्र कामास आले व नासरजंगाचे बंधु मसनदनिषीन जाहाले मणून पत्रें पाठविली, तीं सेवेसी पोहचून सर्व वर्तमान विदित जाहाले असेल. सांप्रत निजामआली यानी कनोल घेतलें. पुढे भागानगराकडे स्वार होऊन जाणार, व इकडेहि येणार मणून आवाई आहे. तिकडील वर्तमान परस्पर सेवेसी विदित होत असल. राजश्री सिवराव यास व आम्हास सेवेसी रवाना करावे, यैसा निश्चये केला. कोणते स्थली आज्ञा होईल, त्याप्रो सेवेसी दाखल होऊ, अगर पुण्यासच या मणून आज्ञा जाहालिया राजश्री सिवराव यास घेऊन येतो. राजश्री सिवराव यानीहि पत्रे सेवेसी लिहिली आहेत. चितारूढ होईल. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Girmaji writing from Savanur informs the Peshwa of Muzaffarjang's death, Salabatjang's installation and Nizam Ali's journey to Hyderabad.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 120] [पा *28-3-1751*?

छ ११ जावल.

श्री

विज्ञापना. दोन घटका दिवस आल्यावर नवाब स्वार होऊन बहिरबुनगा-सहित चालले. कामर+गावचा रोख दिसतो. हे विज्ञापना.

¶*Report that the Nizam is marching towards Kamargaon.*

No. 121] [*8-4-1751*

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसांवी यांसी

०॥ऽ

श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापवरीष्ठाभिधान निरंतर भगवदनुसंधान सावधान श्रो माहाराव जानोजी जसवंत निंबाळकर दंडवत विनंती उपर. येथील क्षेम ता छ २२ जावल मुा भागानगर जाणोन निजानंद लेखन कीजे विशेष. राजश्री रघोजीबावा भोंसले येथोन तीं कोसावर येऊन उतरले आहेत हे वर्तमान विस्तारें राजश्री भगवंतराव राम व राजश्री मनोहरपंत वकील यांनी लिहिले आहे त्यावरून विदित होईल. आजी उद्यां आम्हांस निरोप होणार आहे. आविलंबेच आटोपून येतों. निरंतर स्वयैभवातिशये लेखकास लेखनआज्ञा करून लेखन जाल्यां मन संतोशैकनिकेतन होईल. विशेष लिहिणें हेच विनंती.

¶*Janoji Nimbalkar informs the Peshwa that he will soon leave for Poona.*

No. 122] [पो *26-4-1751*?

पौ छ १० जाकर मुा वामोरी

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बापू
स्वामी गोसावी यांचे सेवेसी

पोष्य बनाजी माधवराऊ कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम दशमी मंगळवार पावेतों जाणून स्वानंदलेखन करीत असिलें पाहिजे विशेष.

+ ता पारनेर, जि. नगर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
आपला निरोप घेऊन आदित्यवारी आलों. खानाची भेटी जाली. वर्तमान सर्व निवेदन केलें. खानास शरीरीं अमळसें सावकाश नव्हतें. परंतु ते शहरास आले. आपलें राहणें मावारें आलें याकारितां आम्हांवर शब्द ठेविला तो अर्थ काय म्हणून पत्रीं लिहावा? थोर लोकांस आपले अन्याय वाटत नाहींत. बरें त्यांचीहि समजाविस उत्तम प्रकारें केली. सांप्रत येथास्थित कृपावंत आहेत. तुम्ही अबदुल खैरखानाचें वर्तमान लिहून पाठवणें म्हणून सांगितलें. त्यास अबदुल खैरखानास याच मनसुब्यानिमित्त निरोप दिल्हा. ज्या दिवशीं गणोरीस गेला त्याच दिवशीं येथें रहिमुल्लाखानाकडून पत्रें आलीं कीं आवजी कवडे आपणापासून दूर गेला. पहिली लढाई जाली. यानंतर आवजी तेथें राहिला नाहीं. प्रायशः आपल्या देशास जाईल ऐसें लिहिलें आलें. अबदुल खैर-खानाकडे येथून फौज जाणार होती तेहि जात नाहीं; थोडी बहुत गेली ती गेली. येक दोन मजली जाऊन तेथून नासरजंगास लिहितील कीं उभयेतांचा वियोग जाला. इतःपर काय प्रयोजन जाण्याचें आहे? येथूनहि मावारें येणें म्हणूनच आज्ञा जाईल ऐसें येथील वर्तमान आहे. बुराणपुरासहि जाणें अवश्यक आहे. तेथे गेलियावर कांहीं मागती नवकलह निर्माण जाला तर येत्न कांहीं नाहीं. येथील वर्तमान या प्रकारीचे आहे. नवाबानीं वालकोंडा फत्तें केलियाचें वर्तमान येथें आले. सेवेसी कळावे म्हणून लिहिले आहे. जिन्नस यादीप्रमाणें घेऊन दिल्हा आहे. हजराहजरी[1] येकां दो दिवसां येऊन पावेल. जिनसांचा पैका येथें आला तर उत्तम, नाहीं तर पुण्याहून शंकराजी नाईकाचें दुकानचें पत्र पाठविलें पाहिजे कीं जिनसांचा पैका यादीप्रमाणें पावला म्हणून पाठविला पाहिजे. बहुत काय लिहिणें? कृपा असूं दिधली पाहिजे हें विनंती.

तीनशें रुपये मैरालपंताकडून देविले ते अद्याप येथें आले नाहींत; तरी आणखी येक पत्र त्यास पाठऊन शीघ्र प्रविष्ट होय तें केले पाहिजे.

सेवेसी गणेश गंगाधर साष्टांग नमस्कार.

¶*News-letter from Banaji Madhav describing the precautions taken by Salabatjang in strengthening his position at different places.*

No. 123] [*26-4-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांप्रति

वासुदेव दीक्षित अनेक आशीर्वाद उपरी. येथील क्षेम वैशाख शुद्ध १२ शुक्रवार जाणऊन स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. बहुत दिवस

---

१ तात्पुरती व्यवस्था करून.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
आपणांकडील पत्र येऊन वर्तमान कळलें नाहीं. सांप्रत आपली पत्रें नसीरजंग यास व साता लक्षांचा परवाणा सलाबतजंग यांचा पाठविला, ते सर्व आम्ही व राजश्री बनाजीपंत मिळून पावतें केलें; व सलाबतजंग यांची दोन तीन ताकीद-पत्रें नसीरजंग यास आली कीं श्रीमंतांशीं आम्हांशी अतिस्नेह जाहला आहे. त्याचे मदतीस आम्ही इकडून राजश्री जानोजी निंबाळकर वगैरे पांच हजार स्वार रवाणा केले आहेत. तुम्ही तेथून पांच हजार फौज व रेहकले बाणाचे उंट १०० ऐसें सत्वरी रवाना करणें, व राजश्री सुलतानजी निंबालकर यांचे पुत्रास सजावल[1] पाठऊन ते फौज समवेत त्यांस जाऊन सामील होत ऐसें करणें. त्यावरून नसीरजंग यांनीं सैदहमीदखान सियादतखान याचा पुत्र यांस समागमें फौज व रेहकले व बाणांचे उंट शंभर तैनात केलें. शनवारीं येथून कूंच करून मजल दर-मजल येतील. शुक्रवारी डेरे दाखल जाले. नसीरजंगहि दो चौ दिवसां स्वार होणार आहेत. कळावें म्हणून लिहिले असें. वरकड राजश्री बनाजीपंत यांनीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. राजश्री सुलतानजी निंबाळकर याचे पुत्रास सजावल गेले आहेत तेहि येतील. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणे हे[+] आशीर्वाद.

¶*Vasudev Dikshit reports to the Peshwa that Salabatjang has written to Nasirjang (younger) to send succour to the Peshwa and to send a messenger to Sultanji Nimbalkar asking him to join the Peshwa immediately with his forces.*

No. 124] [*3-5-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंती. सेवक बनाजी माधवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ १७ माहे जमादिलाखर पावेतों जाणून स्वानंदातिशय लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. येथील वर्तमान तर आद्याप गाजुदीखान दीलीहून पांच सात कोस आलीकडे आले नाहींत. च्यारबाग दिलीत आहे, त्याजपासीं काजीचा बाग आहे तेथें राहिले आहेत. येतात. बरसातहि समीप आली, येतीलच. सलाबतजंगहि हैदराबादेसच आहेत. कूच जालें म्हणतात. आद्याप पांच सात कोस आले नाहींत, परंतु येतील. तेथीलहि नाना प्रकारें

---

१ वसूल तगादा करणारा; ढालाईत. + येथून बाळबोध अक्षर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सांगतात की फिरंगियासी त्यासी मनस्तापि आली आहे म्हणूनहि बोलतात. सारांष सर्वत्र असेंच आहे. चिरंजीव व्यवहार कांहीं दिसत नाहीं. खान नासिरजंग हे काल रोजियास गेले आहेत. उदईक येतील. येथून फौज रवाना करणार तेहि दिरंगाईवर पडलें आहे. खर्चावाचून लोक निघत नाहींत. खर्चास कठिण पडलें आहे. तनखा जाला आहे, त्याचा रुपया हैदराबादेहून वाट होऊन आलियावेगलें पावणे कठिण आहे. पाहावें कसें होईल. रामदासपंतहि सत्वरच मार्ग करून पाठवितील. सेवकाचें शरीरी कांहीं समाधान नहुतें. सांप्रत कृपामृतावलोकने आरोग्य आहे. पुढें हैदराबादेहून पांच सात मजली आल्यानंतर खानासहि बोलावितील कीं काये पाहावें. राजश्री दामोदर माहादेव फेरोजंगाबरोबर पूर्वी राजश्री शंकराजी मल्हार आले होते सैदाचा येखतियार कुल होऊन, तसेच समागमें येणार म्हणून त्यानीं नासिकीं घरीं पत्र लिहिलें होते, तेथून लोकांनी येथें लिहिले आहे. अबदुल खैरखान यास लाख रुपये सलाबतजंगानी खर्चास पाठविले. त्याच्या हुंड्या औरंगाबादेस येऊन बऱ्हाणपुरास गेल्या म्हणून खबर आहे. खाजमकुलीखान फेरोजंगाचे म्हणवीत होते त्यासी यानी सलुक असा केला, त्यामुळें फेरोजंगास विरुद्ध फार वाटलें व खानानी बादशाही फर्मान घेतला नाहीं. हेहि दुःख त्यास जाले. बेगमा व हिरजुलाखान वगैरे सर्व खानाचे उणेंच दिलीस लिहितात. त्याजवरून गाजुदीखानास यांचें वाईट फार वाटलें आहे. मीरकासमखान तोहि त्याचाच पक्षपाती, त्यासहि यांनी कैद केले. सारांश चहूंकडून फेरोजंगानीं खानावर रुष्ट व्हावें यैसा प्रसंग घडला आहे. सुखरूप दक्षणेत येऊन पावल्यानंतर पुढें काय करतील तें करोत. बहुत काय लिहिणें ? कृपा निरंतर आसूं दिधली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Banaji Madhav sends news of Salabatjang's arrival at Hyderabad and his having won over Abdulkhairkhan from the party of Ghaziuddin Ferozjang.*

No. 125] [*9-5-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बनाजीमाधवराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ २३ माहे जमादिलाखर गुरुवार पावेतों कृपावलोकनें जाणून स्वानंदातिशयलेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आज्ञापत्र सादर जालें तेथं दमाजीचें पारपत्य येथासांग करून त्यास शिक्षा केली व नासिरजंग फौज पाठवणार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वआपणहि मागून येणार त्यानीं या प्रसंगीं न यावें म्हणून आज्ञापत्र नासिर-जंगास व दीक्षितास सेवकास पाठविलें पावले. खानास प्रविष्ट करून उत्तर पाठऊं. येथें प्रथम वर्तमान गायकवाड भेटला म्हणून आलें तेच समई फौजेचें निघणें मानसिक[1]. आलीकडे हे वर्तमान आलियावर बाहेरील फौज शहरांत आली, परंतु या समई स्वामीनीहि न यावे म्हणून लिहिलें, हाहि याजवर उपकारच स्वामीचा जाला. खर्च लागतो. पर्जन्यकाल; लोक मागें पुढें येत होते त्यांची खातरतसली[2] करून पाठवणें हें बहुत संकटच होतें. ईश्वरें आपला बोल-बाला केला तो यांच्या संकटाच्या परिहारास कार्यास आला. आतां तों पत्र आलें हें फारच उत्तम जाले. यैवजाची त्वरा खानास सांगून करून सत्वर यैवज पावे तो अर्थ करावा म्हणून जरूर यैवजाविषीं आजहि खानाची आमची रदबदली जाली. खानानी पत्रें सलाबतजंगास लिहिली आहेत कीं येथें यैवज नसतां तुम्ही वराता केल्या त्यास पूर्वीच लिहिले होते. तेव्हां तुम्ही लिहिलें कीं दाहा लाख रुपये पाठवितों ते तों न पाठविले. बहुधा उभयतांत इष्टत्व आहे यांत अंतर पडावें, श्रीमंती औजुदें[3] आम्हांवर व्हावे, इतक्यासाठीं यैवजाची वाट न करितां वराता केल्या. बरें इतःपर सत्वर यैवज पाठवणें असे लिहून मुजरद अजुरदार जोडी पाठविली आहे, त्यास आठ दिवस जाले. आणखी आठ दाहा दिवसांत पत्र येईल. यैवजाचीहि वाट हुंड्यापांड्या पाठवितील म्हणजे देऊं म्हणून येथें यैवज ऐसी हजार रुपये खजान्यांत जमा जालें, ते सिपायांची च्यार-माही तलब चढली आहे, त्यांचे दंगे होतात म्हणून कांहीं थोडा बहुत यैवज पावता त्यास केला पाहिजे. त्याचा भरवसा पुरत नाहीं यैसे संकट आहे, म्हणून फार बोलिले. आठ पंधरा दिवसांत तेथून हुंड्यापांड्या उत्तर येईल त्याप्रमाणें वाट होईल. सेवेसी श्रुत होये. बहुत काय लिहिणें? कृपा आसूं दिधली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Banaji Madhav, the Peshwa's agent at Aurangabad, offers excuses for the failure of the Nizam's officers to make payments. He promises to send the dues as soon as received.*

No. 126] [*5-8-1751*

पा २४ रमजान

श्री

राजश्री महिपतराव आवजी गोसावी

आसीर्वाद- उपरी. गुलामसेदखान व शामजी गोविंद याजकडील यादी करारमदाराच्या पारसीची एक व दुसऱ्या हिंदवीच्या तीन लाखोटा करून आमचे

---

१ कठीण. २ खातरजमा. ३ कष्टी, नाराज.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जुजदानात होत्या त्या आहेत. याखेरीज यादी लिहून दिल्या होत्या त्याची पारसी करून मोहर करून घोडनदीहून गुलाम सेदखानानी पाठवून द्याव्या असा करार होता. त्या यादी आल्या किंवा नाहीं ? आल्या असल्यास तुमचे जवळ असल्यास पाठवून देणें; नाहीं तर तसेच लेहून पाठवणे. मोघम जागीर बराणपुरी पायमली व रनाळ्याची आम्हाजवल आहे. वरकड कलमाची तुम्हाजवल असली तर पाठवणें. छ २३ रमजान. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

¶*Bhausaheb to Mahipatrao Awaji, asking for despatch of the papers relating to the agreement.*

No. 127] [*17-8-1751*

छ १० सवाल

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. दिलीकडील वर्तमान तर नवाब सलाबतजंग याजकडील सालजाब नवाब बहादर यांचे विद्यमानें आहे. ऐशास यांनी पंचवीस लक्ष रुपये खजाना पाठविलियावर अर्जी केली ते नवाब बहादरानी गुजरानली. त्याजवर पातशाहा बहुत मुर्तवजे[1] होऊन दसखत खास जाब लिहिला व सलाबतजंगास-असालतन (?) फर्मान सुबेदारीचा व किताब असफुदौला ऐसा तजवीज केला. मागून येणार. राजे रघुनाथदास यास नवाब बहादरानीं पंजहजारी छालरदार पालखी तजवीज केली आहे. तेहि सुबेदारीचे फर्मानाबराबर येणार व पातशहानी लिहिले आहे कीं नवाब गाजुदीखानाचे व पंत प्रधानाचे खातरेकरितां नियाबत[2] म्हणून सलाबतजंगाचे नावें शुका लिहिला आहे तर तो रोखा प्रमाण न करावा. मागून असालतन फर्मान पाठवितो म्हणून पातशहानी बहुत कृपायुक्त लिहिले आहे, याप्रमाणे (मजकूर) * * * राा राजे रघुनाथदास काल छ ५ शवालीं दरगाहकुलीखान कोतवाल याजवळ करीत होते त्यांचें स्वमुखें ऐकिला तो सेवेसी लिहिला. रा मोरोपंत जानवाच्या विचारें रंभापुऱ्यांत येऊन राहिले. काल छ ५ मजकुरीं साइंकाळी जासूद दाहा जोडे पाठऊन पाई चालवीत हवेलीत आणून ठेविले व जासूद दरवाजियावर चौकी बसविले. राज्याजीनी आपणास न कळतां हा मजकूर जाला ऐसे दर्शऊन नवाबास अर्जी केली व रात्री नवाबानी मेवा अर्जबेग्याबराबर पाठऊन मोरोपंताची तसली[3] केली कीं रंभापुऱ्यांत राहणे

---

१ खूप. २ नायबीचा हुद्दा. ३ खात्री.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

काय उचित? आपले हवेलीत राहून आसीर्वाद मात्र देत जाणे. जासूदहि दरवाजियावरील उठविले. सांप्रत मोरोपंत जुने बाजारांत आपले हवेलीत आहेत. शहरांत आलियावर राज्यांजीची व यांची भेटी जाली नाहीं. चितांत विकल्प दिसतो. पुढें काय करितात हे पहावें हे विज्ञापना.

¶*The writer reports to the Peshwa news received from Delhi that Salabatjang and his Minister have been honoured with titles by the Emperor.*

No. 128] [*1751?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. गांडापूरची गढी पाडली. नेवासें येथील कौल घेऊन ठाणेदार काल गेला व चांदे येथील ठाणेदार गेला. दोन्ही ठाणी गेलीं. तेथील गढ्या पाडावयास पाठविले आहेत. वैजापूरचाहि काल गेला. तेथील गढी पाडावयास पाठविले व गांवकुसुहि पाडतील. सेवेसी श्रुत होय. कनड व येरूल इकडील फौजदार गेले. राजश्री जिवाजीपंत कनडेस आले आहेत. आम्ही आज येरूलच्या सुमारें जातों. विदित जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶*News-letter reporting that the fortifications at Gandapur and Vaijapur have been dismantled according to instructions.*

No. 129] [*1751?*

श्री

अर्ज विज्ञापना. मंदवार आडीच प्रहर मोगलाचा मुकाम आज लिंपनगावावर[२] जाहाला. प्राथःकाली मुरादखान स्वामी समर्थाकडे आले आहेत. सरदार लोक आपले आपले गोटाजवल मोर्चेबंदीन उभे आहेत. श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Report to the Peshwa of the Nizam's visit to Limpangam and Muradkhan's visit to the Peshwa.*

---

१ राजा रघुनाथदास म्हणजे रामदासपंत ७-४-१७५२ रोजीं मारला गेला त्यापूर्वीचें पत्र.

२ श्रीगोंद्याजवळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 130] [*1751 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. आमदानगरचे वर्तमान तरी सेनापती व बाणराव माल-वाड्याजवळ राहिले होते त्यास सेनापतीनी कूच करून जाऊन किल्यासंनिध सुराराव निर्मलकर यासेजारी राहिले. आपल्या जागा तमाम फौज आवळून आहे. विना थोरली मोगलाची फौज नर्जीक आल्यावाचून, यांचा निघावयाचा सुमार दिसत नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This probably refers to the rebellious attitude of Yashvantrao Dabhade, Senapati, who was anxious to join the Nizam.*

No. 131] [*Jan. 1752 ?*

श्री

आशीर्वाद उपरी. आज दोन महिने बहुत मेहनत करून मोगल बहुत जरबेंत आणिला असतां येकायेकीच अनीनें[1] * * * बहुतच सैल सोडिली यामुळें कोणाच्याहि मनास आलें नसेलसें वाटतें. हेच गोष्टी आणखी आठां चहूं दिवशीं वोढून होती तरी पुढिलें वर्षी कर्ज फेडावयासी गुंता न पडतां. आपण जें केलें असेल तें मागें पुढें दृष्टी देऊनच केलें असेल. आम्हांस जें सुचलें तें आम्हीं लिहिलें असें. आम्ही लिहिलें याजवरी कांहीं मदार नाहीं. हें आशीर्वाद.

¶*The context of this letter is obscure, but the writer reprimands a certain commander for letting the Nizam off so lightly, after having pressed him hard for two months.*

No. 132] [*21-1-1752*

श्री

विनंती उपरी. अजीचे वर्तमान वरचेवरी सांगोन पाठविले त्यावरून कळलेच असेल. संध्याकालचा च्यार घटिका दिवस उरला तेव्हां मोगल घाटाअलीकडे कोसभर येऊन गोदीच्या वोढ्यास पाणी थोडे आहे तेथेच राहिला. अजी पाणियावाचून फार हैरान आहे. चारा तो नहमीच नाहीं. दोन तीन जागा लोक उठले होते. बरीच जाली. आम्ही देवनईचे पाणियावरी हातऱ्या खोपट्या मोगलापासून दोन कोसावरी आहे. दादास आघाडीस राहावयास सांगितलें ते राहिलेच असतील. मोगल उदईक देवनदीवरी येईल. परंतु

---

१ लगाम.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सिनरावरी येईल किंवा वर्ताखालता होईल तो रोख पाहून लेहून पाठऊ; त्याप्रो कूच करणे तरी करावे. साताराहून दिनकरपंताचे व करवीरवासी यांचे कागद आले आहेत ते पाठविले आहेत. त्याचा काये विचार करणे तो करून उतरे द्यावी. आम्हासहि लेहून पाठवावे. राघो गणेश याचे कागद आले आहेत. त्याचा अर्थ काये तो लेहून पाठवावा. मातुश्रीचे मर्जीस विरुध पडते हे फार खाईल. अप्रमाणपण आपलेकडे येते. याचा विचार करावा हे विनंती.

¶*Sadashivrao writes of the movements of his own forces and those of the Nizam.*

No. 133] [*11-3-1752?*

पैवस्ति छ ६ जमादिलावल शुक्रवार

श्री

विज्ञापना. छ ५ जमादिलावल गुरुवार दीड प्रहर रात्र. आज याजला बातमी आली कीं स्वामीनी घाटबंदी तोफा ठेऊन करविली होती. तोफा घाटावरून काहडून माघारे नेविल्या. त्याजवरून याणींहि आपला नाईक व जासूद-जोड्या घाटावर बातमीसाठीं पाठविल्या होत्या तेहि खबर घेऊन आले कीं घाटावर तोफा नाहींत माघारे फिरून नेल्या. तरीहि याची संशयनिवृत्ति परिछिन्न होत नाहीं. न जाणूं श्रीमंती तोफा कोठे जवलपास ठेविल्या असतील अथवा कसा प्रकार असेल, याजकरितां आणखीहि जोड्या तहकीकें[२] वर्तमान आणायास्तव घाटावर पाठविल्या आहेत. याणी मनसबा केला आहे कीं उदईक मोठे प्रातःकाली आरुणोदयेपूर्वींच कुल लष्करासुद्धा स्वार होऊन चालावे. घांट पांच कोस अथवा सा कोस आहे. जर स्वामीच्या तोफा घाटावर नसल्या तरी लागलेच घाट चढून घाटावर मुक्काम करावा. कदाचित् तोफा घाटावर असिल्या तर स्वामी अर्धी फौज घाटावर तोफाचे कुमकेची पाठवितील. अर्धी फौज घाटाखाले मुकाबिल्याची राहील. तरी घाटाखाले तोंडासी पोहचून वर्तमान तहकी(क) घेऊन घाट न चहडता परिछिन्न खाले फौजा स्वामीच्या राहतील अथवा स्वामीच खुद्द फौजेनसी असतील तर फौजेचा पिछया दोन तीन कोस करून चालून यावें. दहा हजार सडी फौज याणी वेगळीच मराठे वगैरे सुद्धां केली आहे. यास सहसा न चुकावे ऐसा मनसबा याणी आपले जागा निश्चयेकरून केला आहे. त्यास उदईक हे आरुणोदयेपूर्वींच स्वार होऊन चालतील. जर

---

१ पत्र भाऊसाहेबाचें सखारामबापूनें लिहिलेलें. येथून पुढील मजकूर खुद्द भाऊसाहेबांच्या हातचा.

२ खरें, सत्य.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

घाट मोकला आसिलियावर जाऊन मुक्काम करीतीलच. जर अटकाव असला तर दुसरा पर्याये करितील म्हणून अगोधरच सेवेसी विनंती लिहिली असे. याचा बंदोबस्त यथास्थित करायाचा तो केला पाहिजे. दुसरे काल याजला बातनी येऊन पोहचली होती कीं स्वामीनी कुल करोल निवड करून व फौजा निवड करून चहूंकडे वाटणी करून तोफा समागमे घेऊन आज युद्धास यांसी यावें. त्याजवरून याणी आपले कुल सरदारासी एकचित्ते विचार करून आज सुलतानजी निंबालकर व आनंदराव निंबालकर व मुरादखां वगैरे सरदार दाहा हजार फौजेची निवड करून वेगलेच डावे (बाजूस) राजाजीहि वेगलेच हत्तीवर स्वार होऊन दहा हजार स्वाराचे बरोबरच चालत होते; व निजाम अल्लीखा व नवाब सलाबतजंग पांढरे व खंडागले व सरगर व खंदारकर व शिवाजी केशव वगैरे फौजेनसी बाहीरबुनगा एके जागा करून चालत होते. * * * * *

¶*This letter explains the military dispositions of the Peshwa and the Nizam in one of their numerous encounters.*

No. 134] [*21-3-1752?*

पो छ २२ जमादिलावल

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक निलो नरसिंह कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान छ १९ जमादिलावल मुा कटेहाली प्रा चिटगोपे निा हुमनाबाद सेवकाचें वर्तमान येथास्थित आसे विशेष. आज्ञा घेऊन आलो ते छ १० रोजी सैन्यास पावलो. रा रामचंद्र जाधवराव याच्या भेटीचा योग होत नाहीं. यंदाची स्तीत बदमामलीची आहे. परस्परे शोध केला. त्यास लतीबखान जमातदार सवासे राउताचा आहे. बहुत खेल्या आहे. याणे मुजफरखानास आणून भेटऊन दोन हजार गाडदी व हजार राउताचा करार करून ठेविला आहे. त्यास राजश्री आपाराव मल्हार याची आवघी जाहागीर काहाडून कलबुरगें व इंडी व तांबे येसे तीन परगणे सरंजाम दिल्हा. रो विरापा जाधव व आणखी येकादोघानी सांगितलें कीं मुज्फरखानास ठेविल्याने नवाबाचा व श्रीमंताचा श्नेह राहणार नाहीं त्यास प्रस्तुत येकत नाहीं. मुजफरखानाने निश्चये केला कीं नवाबासी व आथवा श्रीमंतासी येकदां युध्ध करू येसा बीरें[1] दिल्हा आहे. राजश्री परसरामपंताचा आतिशये विरोध करितात. जुनी दोन हजार व नवी दोन हजार फौज आहे.

---

१ भर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नवी फौज सुगी पावेतों आहे. सुगी जाल्यावर राहती किंवा नाहीं हे कलेना. रा॥ जाधवराव शब्देकडून वलगणा फार करितात. नवाब वांजरा उतरून पलीकडे गेले. तिकडे रा॥ जानोजी भो॥ याजकडील रा॥ गिरमाजी खंडेराव व रघोजी करांडे दाहा बारा हजार फौजेनसी आले त्याच्या शाहास गेले. भालकीकडे उपद्रव करावा इतक्यामध्यें तिकडे जाणे जाले. रो॥ आपाराव मल्हार नवाबाजवळ गेले, त्याचे बंधु रा॥ भास्करराव आजी पावेतो नजरबंद होते त्यास रा॥ वीरापा जाधव याणी रदबदली करून वाचऊन आपणाजवळ ठेविला आहे. जर वीरापा नसते तर त्याजला मारावयाचा निश्चये केला होता. यंदा मनुशे मारावयाचे फार चिंती धरिले आहे, परिनाम काये होईल पाहावे. बणंवारीदास वाणी होता. वर्षा दोवर्षात काहीसी सावकारी करू लागला. त्याणे जाधवरावजीस उपदेश करून दाऊदखान मारला, यामुळें कितेक गोसावी व सावकार भयाभीत जाले. पाच सात लक्षाचे सावकार जवळ होते त्यांजला धरून रोखे फाडून टाकले. मुकुंदराव ठेंगिलाचा जाधवरावजीचा विरोध आठ पंधरा दिवसा पडिला होता. लतीबखान विश[illegible]च्या आश्रयेकडून आहे, यामुळे याणी सूत्र करून मुजफरखानास आणून आल्[illegible] ठेविले. सबब बणवारीदास दोन दिवस उगेच आहे. कोण्हास उपद्रव करीत नाहीं. येकास येकानी मारावे येसा फितुरामध्ये आहे. तेथे नारायेणराव सांप्रत दर्शनास आले आहे ते ठेंगिलाच्या आश्रयेकरून येथे असताती. जाधवरावजीची भेट जालियावर जे वर्तमान होईल ते सेवेसी लिहून पाठवितो. मुज्फरखानाजवळ सध्या गाडदी खासगत गाडदी पनास पावणसे व राऊत चालीस पावेतो आहे. जाधवरावजीनी आपले गाडदी तीनसे दिल्हे. तोहि नित्य नवे गाडदी आले ते ठेवीत आहे. येथील प्रसंग याप्रकारचा आहे. पार(प)त्य सत्वर करणार धणी समर्थ आहे. मुज्फरखानास दूर करीत नाहीं येसा निश्चये करून ठेविला. छ ११ रोजी दीड प्रहर रात्री खलबत करीत होते की कसे करावे. त्यास लतीबखान याणी करार केला की आपण काही चिंता न करावी. मुजफरखानास दूर न करावे. यामुळे जे होणार ते हो यैसा बीर देऊन दो प्रहरा रात्री मुजफरखानाच्या डेऱ्या(स) लतीबखान मात्र गेला होता, तेथे काये विचार केला तो येका दो दिवसा लिहून पा॥. सेवक आल्यापासून फार खलबते होताती. भेट जालियावर त्याचे भाशन काये होईल ते सेवेसी लिा॥ पाठवितो हे विज्ञापना. रो॥ धोडो आकदेव रा॥ परसराम महादेव याचा निरोप घेऊन लस्करास येणार आहे हे विज्ञापना.

¶*News-letter from Nilo Narsinha to the Peshwa from the Nizam's Camp, informing the addressee how the Nizam had taken into service the trained artilleryman Muzaffarkhan and how this man is creating mischief for the Peshwa with the help of Ramchandra Jadhav.*

3132

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 135] [*2-4-1751 ?*

पो छ ८ जाखर

श्री

श्रीमंत राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक लक्ष्मण बावाजी साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। छ १६ जमादिलावल परियंत मो माहूब लस्कर नवाब सलाबतजंग येथे सुखरूप आसो विशेष. श्रीमंतानी रायेचुरच्या मुकामीहून राजश्री हणमंतराऊ निंबालकर याजकडे बातमीस पाठविले. त्यास उदगीरच्या मुकामी येऊन पोहचलो. त्यास येथील वर्तमान तरी नवाबाची व रघोजी भोसले याची माहूरचे मुकामी भेट जाली. जानोजी निंबालकर सा कोस पुढे गेले होते. रघोजीबावाने येक हती व येक घोडा व शंभर मोहरा दिल्या व येक सिरपेच दिल्हा. नवाबानी येक हती व येक घोडा दिल्हा व जिगा[1] व सिरपेच वस्त्रे दिल्ही. साता सरबारोची[2] (सरदाराची?) वस्त्रे दिल्ही, याप्रमाणे बहुमान जाला. रघोजी भोसले याणी आपले लेकास तीन हजार फौजेनिसी ठेवावे, मुलकात धामधूम करू नये, घासदाणा घेऊ नये, आमचे ममतेत आसावे, श्रीमंतास मदत होऊ नये, सा लक्ष रुपये द्यावे, त्यापैकी व समतचा रोखा दो लक्षाचा रघोजी बावानी घेतला तो माघारा द्यावा, बाकी च्यार लक्ष रुपये आखेरसाली द्यावे, याप्रमाणे करार सैदलस्करखानाचे व जानोजीचे विद्यमाने जाला आहे. वरकड कितेक जानोजीने रघोजीच्या चितात श्रीमंताविसी विपरियास आणिले की या प्रांते यावयासी कारण काये? श्रीमंतानीच पत्रे नवाबास पाठविली की रघोजीबावा मुलकांत धामधूम मनमानेसारिखी करितात तरी तुम्ही नागपूरपरियंत जावे म्हणजे आपणच तह करील. त्यावरून नवाब आले. येसियास श्रीमंतानी तुमची मदत कोणती केली? उफराटी तुम्हाविसी पत्रे मात्र येतात. तरी याउपरी जाल्या करारात आंतर न पडावे येसे होऊन रघोजीबावा लग्नानिमित्य निरोप घेऊन गेले. लग्नानंतर लेकास फौजेनिसी पाठवितो म्हणून करार केला परंतु लेकास पाठवीत नाही व रुपये देत नाही, मुलुक तुडवतो म्हणून भेटून तह करून गेले. जानबानी मेजमानी केली. हती घोडा सिरपेच दिल्हा. सैदलस्करखान दोनदा रघोजी-बावाचे डेरियास गेले होते. सारांश अर्थ हाच की या उभयताचे चितात आपले विद्यमाने तह जाला नाही याजकरिता उपद्व्याप बहुताप्रकारे करावा, सला बिघडावा, जुजावे, हे गोष्ट न जाली. आम्हासी समाधानेकरून ममतेत घेतले तरी मुलुक घेतला आहे यात काही फिरोन घ्यावा आणि नवाबास चाकरीचा मजुरा करून दाखवावा की फिरंगियाचे हाताने सला केला आसता आम्ही श्रीमंताचे समाधान रक्षून मुलुक फिरोन इतका घेतला. आमचे विद्यमाने सला केला असता तरी

---

१ पागोट्यास बांधण्याचा एक रत्नाचा अलंकार. २ सरबराई, सन्मान.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मुलुकच न दिल्हा आसता. बरे तुम्ही केले यात * * आम्ही याप्रकारे केले. येसी कितेक मजकूर आहेत. दिलीसहि पत्रे गेली आहेत की गाजदीखान दक्षणेच्या बंदोबस्तानिमित्य आले. त्यास त्याणी खालसा मुलुक गनिमास दिल्हा. बाकी खाष्ट मुलुक राहिला. त्या मुलकात फौजेचा सरंजाम व गनिमासी नित्य कलह होऊन बंदोबस्त होत नाही तरी पूर्ववतप्रमाणें सनदा पाठवाव्या व गनिमासहि पत्रें पाठवावी की गाजदीखान याणी तुम्हास मुलुक द्यावयासी प्रयोजन काय? तरी घेतला मुलुक फिरोन देणे म्हणून पत्रे गेली आहेत. त्याच्या उतराचा मार्ग लक्षित आहेत. पूर्ववतप्रमाणे सनदा आल्या तरी आम्ही याप्रांते राहतो. नाही तरी हुजूर येतो म्हणून लिहिले आहे. यामुले सार्वभोमास पंचवीस लक्ष रुपये परियेंत द्यावे व येक दोन लक्ष खर्चवेचहि करावा म्हणून याचे कोणी आप्त तेथे आहेत त्यास पत्रे गेली आहेत. लोकोतरात येथे रा मल्हारजी बावाचा बोभाट बहुत आहे की यासी सामील व्हावे. मातुश्रीनी लष्कर द्यावे व रघोजी दमाजी समस्तानी येकत्र व्हावे आणि श्रीमंतासी कलह करावा यैसा बोभाट ऐकितो. परंतु प्रमाण नाही. येकिले म्हणून लिहिले आसे. बाबूजी नाईकाची व मातुश्रीची पत्रे येथे समस्तास आली. त्यास बाबूजीनाईकास प्रतिनिधीनी गुंडालले म्हणून येथे वर्तमान आलेच आहे. गाजदीखानाचे लेक येणार म्हणूनहि वदंता आहे. नवाबास मुहिमेमुले कर्ज क्रोड रुपये जाले आहेत. त्यास सर्वावर पटी करून कर्ज वारावे, त्यास मराठे रजावंद[1] नाहीत यामुले प्रस्तुत राहिले. छावणीस जाऊन कर्जाचा परिहार करावा. खजाना करावा. फौज ठेवावी मग सला बिघडावा. प्रस्तुत विपरियास दाखऊ नये येसेहि आहे. ब्राह्मणपुरी पेशजी सुभा होता तो गत जाला. सबब दुसरा सुभा रवाना केला आहे. मल्हारबा येरुलात आले. तेथील मुलाणे व कसाई बाहीर घातले आणि देवलास काम लागले आहे म्हणून वर्तमान आले त्याजवरून श्रमी जाले. जानोजी निंबालकर व हणमंत-राऊ याणी रघोजी बावास मेजवानी केली. हती येकेक व घोडा येकेक व वस्त्रे दिल्ही, त्याचप्रमाणे रघोजीबावानी दिल्हे. पंचमीपरियेंत येथेच मुकाम आहे. पुढे भागानगरास जावे येसे आहे, आवरंगाबादेस जावे येसे आहे, प्रमाण नाही. पुढे आधिकोतर आढलेल ते सेवेसी लिहितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer Laxman Bavaji gives the Peshwa news about an interview between the Nizam and Raghuji Bhonsle and the mutual presentation of gifts, and the terms of an agreement settled between them through Said Lashkarkhan and Janoji. The arrival of Ghaziuddin in the South, the alliance between Babuji Naik and the Pratinidhi, the debts of the Nizam, the halt of Malharrao at Verul are some of the other topics mentioned in the letter.*

---

१ राजी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 136] [*29-3-1752?*

पौ छ ९ जमादिलोवल+

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक कावजी नाईक सां दंडवत विनंती. येथील कुशल ता। छ २३ माहे जमादिलावल मुा नजदीक उंबरखेड जाणून साहेबी सदैव अज्ञा केली पाहिजे. ऐसियासी सलाबतजंग याणी आवाई हैदराबादेची घातली आहे. परंतु औरंगाबादेचा रुख जायाचा दिसतो. सातसे बावीस बैल दारूगोळीचे व बाणाचे व तोफा मोठ्या दोन हतीने लोटाव्या ऐशा व लहान दाहा ऐशा छ २१ माहे मजकुरी लस्करांतून रवाणा अवरंगाबादेस केल्यात. सलाबतजंगाचे चितात आहे कीं हैदराबादेस जावें आणि सैदलस्करखाजीचे चितात आहे कीं अवरंगाबादेस घेऊन जावे. कुलकारभार सैदलस्करखानच करितात. कितीक वर्तमान रघोजी भोसले याची मी सेवेसी येऊन पोहचन तेव्हां निवेदन करीन. राजश्री विष्णुपंत सेवेसी येतील तेव्हां येऊन पोहोचूं. कांही खर्चयासी पाठऊन दिल्हे पाहिजे. येथे कर्ज मिळत नाहीं. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Kavji Naik to Raosaheb Vishvasrao, communicating the movements of Salabatjang.*

No. 137] [*27-4-1752?*

पुरवणी

तलबतनखा[1] सिपाही याची बहुत सरकारात आहे यामुळें सिपाही म्हणतात कीं हैदराबादेस जाल तर आतां आमची तलब देणें. नाहीं तर अवरंगाबादेस जाल तर दो महिन्या घेऊ. खानाच्या व जानबाचे चितात आहे कीं येथील बंदोबस्त केला तैसा साहेबासीहि सलुक करून घ्यावा. पुढे स्नेह करून चालावे, ऐसा रंग दिसतो. सेवकास येथे कर्ज बाराशे रुपयेपर्यंत जाले. साहेब दूर मुलुकगिरीस लांबले म्हणून खर्च यासी न पोहचले. येथें कर्जहि मिळत नाहीं, आणि अतिसाराचे वेथाहि अद्याप दूर जाली नाहीं. यामुळेहि कर्जदार बहुत जालो. त्यास पाच सात जोड्या जासुदाच्या सेवेसी पाठविल्या त्याचे उत्तरहि येत नाहीं. जर आज्ञा येईल तर सेवेसी पोहोचू. च्यार महिणे जालेत उत्तरच येत

+ 'जमादिलाखर' ह्याबद्दल जमादिलावल चुकीनें पडलेला दिसतो.

१ पगाराचा पैसा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाहीं. जासूद रामा व परसराम जथे तुलसाजी नाईक सेवेसी पाठविला होता तो थयेली सरकारची सलाबतजंगास व सैद लस्करखानजी यासी घेऊन आला. परंतु उत्तर पत्राचे घेऊन आला नाहीं. जर आज्ञा येईल तर उठून येऊं. नाही तर आज्ञेवाचून कैसे यावे? यास्तव राहिलों. जैसी आज्ञा होईल तदनुसार वर्तणूक करूं. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa's Vakil with Salabatjang reports the discontent of the Nizam's troops and his own monetary difficulties.*

No. 138] [*29-4-1752?*

पौ छ ८ जमादिलाखर

श्री

विज्ञापना ऐसीजे. छ २१ माहे जमादिलावलीं सलाबतजंग याणी सातसे आठसे बैल दारुगोळी व बान व दोन तोफा मोठ्या ज्यास हती लावावयास पाहिजेत ऐशा, व दाहा तोफा लहान अवरंगाबादेस पाठविल्यात आहेत. अवाई हैदराबादेची घातली आहे परंतु अवरंगाबादेस जातात. छ १९ माहे मजकुरी माहोरीहून कूच केले ते पाच कोस अलाकडे आलेत. तेथें च्यार मुकाम केलेत. त्याउपरी छ २३ माहे मजकुरीं तेथून कूच करून उंबरखेडाजवळ[1] पाच कोस अलीकडे उतरलेत. उंबरखेड पोयाची खराबी जाली. वैरणकाडी कुल लस्करची कही होते. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

सैद शरीफखान यासी अलजपुरची सुबेदार जाली. पहिले सैद लस्करखान याचा नायब होता त्यास आतांहि न्यायबतच खानांहीं दिल्ही. माहोरची किलेदारी फतउदीखान यासी दिल्ही. येथें राजकारणे कितीका प्रकारची खेळतात. त्यास बहुत खबरदारी करविली पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

राघोजी भोसले यांणी काही (म)धेस्तास काही दिल्हे नाही. तर सर्वासी शब्दानीच समजाविलें. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.+

¶*Salabatjang is reported in this letter to have despatched guns and ammunition to Aurangabad and himself to have started from Mahur.*

---

१ उमरखेड. + पत्रांतील माहिती नवीन आहे. स्पष्टता झाली पाहिजे.

No. 139] CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh [8-5-1752?

श्री

पुा श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. राजश्री बाबूजी नाइकहि येथे छ ४ रजबी साईंकाली प्रहरा दिवसा शहरात दाखल जाले. चार घटका दिवस साईंकालचे नवाबाची मुलाजमत जाहली. समागमे राऊत सेदीडसे होते. मुलाजमत होऊन खलबतहि ते समईच होऊन निरोप घेऊन डेऱ्यास गेले. बाह्यात्कारी वर्तमान येकतो की कांही नवाबासहि जाहागीर मागोन चाकरी करावी हा बेत आहे येसे वर्तमान येकतो. राजश्री आबाजी नाईक टोक्यास आहेत याप्रमाणे नाईकाचे वर्तमान येकिले ते सेवेसी लिहिले. फार श्रेमी आहेत. येथे शहरात लोकास कर्जे मागतात. कोनी देत नाही. खर्चास तर जवल नाही. शहरात माहागाई तर याप्रकारची. पुढें पाहावे काये होईल. येकिलेले वर्तमान सेवेसी लिहिल. रा बगाजीपंत तर वरचेवर लिहीत असतात. आपणहि येकिले ते लिहिले. वरकड वर्तमान येथील धामधुमीचे दृष्टीणे पाहिलेले जिवाजी गोविंद मुखवचणे सेवेसी निवेदन करतील हे विज्ञापना.

¶*The visit of Babuji Naik to the Nizam is reported to Bhausaheb.*

No. 140] [27-7-1752?

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजश्री पंत
प्रधान स्वामीजीचे सेवेसी

आज्ञांकित निलो नरसिंह कृतानेक सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. ता छ २६ रमजान मुा भालकी सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. सांप्रत इकडील वर्तमान राजश्री जाधवराव पंधरा वीस रोज हुमनाबादी होते. तेथून छ ३ रमजानी भालकीस आले. पूर्वी राजश्री त्रिंबकराव दाभाडे याचा भेटीचा संदर्भ होता तो याणी टालाटाल केला. न यैकिता छ १७ रमजानी मायाजी मान्या येऊन भेट घेऊन खामखा भेट घ्यावी यैसा विचार करून राजश्री जाधवराव दुसरे दिवसी सिकारीस गेले. तिकडे तेहि आले; जलसिंगेस भेट जाहाली. उपरांतिक ते जावयासी निरोप मागत होते. याणी निरोप न दिल्हा; हरयुक्तीने भालकीस घेऊन आले. मातुश्रीची भेट करविली. मातुश्रीनी दाभाड्यास कितेक उपदेश करून राहून घेतले. आपणाकडे पत्र लिा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे. उतर आलियासारिखे वर्तनूक करितील. पूर्वी बाघोजी नाा पाठविला, त्याणे निवेदन केले असेल. सांप्रत मातुश्रीहि श्रीजेजुरीस दर्शनास येणार आहेत; त्याजबाा आज्ञा होईल तर येईन. राजश्री नागोराम याजलाहि बोलाऊ पाठविले आहे. तेहि आठा चौ दिवसा भेटीस येणार. सध्या तांडूर परगणियात आले आहेत. यानी सर्व प्रकारे एकनिष्टता धरली आहे. राजश्री त्रिंबकराव दाभाडियासी आपणाकडे पाठवावे किंवा जिकडे जाईल तिकडें जाऊ द्यावा? त्याचे मानस की घडी येक, श्रीमंताच्या दर्शनास जावे यैसे म्हणतो, म्हणून यैकिल्यात येते. नीच शोबतीमुले काहीच सुचत नाही. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Nilo Narsinha to the Peshwa, writing about an interview between Trimbakrao Dabhade and Jadhav. He also asks whether he should send Dabhade to the Peshwa or allow him to go where he likes.*

[*12-8-1752*

No. 141]

पौ छ १८ सवाल

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णाजी रघुनाथ रिसबूड कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल श्रावण धवल चतुर्दशी मुकाम औरंगाबाद जाणून स्वामीराजे निजानंद वैभवलेखन-आज्ञा निरोपित असिले पाहिजे विशेष. राजश्री मल्हारजी होळकर व गाजुदीखान छ ७ सवाली नर्मदा उतरले, ऐल तीरास आले. तोफखाना व सरंजाम पिपलोद येथे आला. सलाबतजंगाची मातुश्री यासीहि हैदराबादचे बोलावणे आले. आजी उद्यां जाणार. सैदलस्करखान वगैरे आमीर यांचे कबिले येथून गेले. येथे दिवान पेशकार[1] यावर शिपाई यांचा दंगा बहुत. हैदराबादकर स्थळ सोडून बाहेर निघावयाचा विचार दिसत नाही. सिबंदीचाहि गवगवासा असे. न्यामदुलाखां करनुली होता. हजूर आला. मुजरफरखां गाडदी करनूलचे किल्यांत आहे. कडपेकर बैगनपलीचे किल्यास मोरचे लाविले. आरकाटकर त्रिचनापल्लीसच आहेत. त्याचा भाऊ आरकाटेस आला कळावे. सविस्तर वर्तमान वेदमूर्ति राजश्री दीक्षित स्वामीनी लिहिलें आहे, त्यावरून श्रुत होणार. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*News-letter from the Nizam's court at Aurangabad to the Peshwa, referring to Ghaziuddin who crossed the Nerbudda on 6th August 1752 along with Malharrao Holkar on their expedition into the Deccan. This was a fresh move on the part of the Peshwa to humble the power of Nizam Salabatjang who was supported by Bussy.*

---

१ मदतनीस, नायब, मुताल्लिक.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 142] [Recd. 9-8-1752?

पौ छ १० सवाल

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. राजश्री रामदासपंत यांस पत्र पाठविले आहे. गुजरानून त्यांचे पत्र रा माहाराव यांस आम्हाकडे यावयाविसीं पाठवणे म्हणोन पत्री आज्ञा जाली. आज्ञेप्रमाणे पत्र गुजरानून वर्तमान सांगितले, त्याजवरून राजे मार-निलेनी आपले पत्र माहारायाकडे छ २४ रमजानीच पाठविले. त्याजवर स्वामीचे पत्र छ २४ मजकुरी संध्याकाळीं गुजरलियावर दुसरे पत्र पाठविले. ती पत्रें त्यास पावली असतील. सांप्रत इनायतनामा नवाबाचा माहारावजीचे नांवें तयार करून राज्याजीनीं आमचे स्वाधीन केला तो बजिनस सेवेसी पाठविला आहे, पावेल. रा माहाराव यांचे विद्यमाने कांही वस्त्रें वगैरे राज्याजीनी पाठविलीं, त्याचे उतराविषई आम्हास पूर्वी सांगितले त्याजवरून सेवेसी लिहिले होते; परंतु उतर सादर न जाले. राज्याजी कालहि हटकीत होतें की उतर कां न आलें? ऐशास वस्त्रें वगैरे बायकांची पाठविली आहेत. पावली असतील. उतर आज्ञापत्रीं सादर व्हावें कीं यास सांगितले जाईल हे विज्ञापना+.

¶*Letter to the Peshwa from his agent with the Nizam, acknowledging the Peshwa's letters for Maharao Nimbalkar and communicating their despatch to the addressee.*

No. 143] [4-11-1752?

पौ छ २७ जिल्हेज

श्री

विनंती उपरी. राजश्री पंतप्रधान याजकडून पैका बैलावर येक दोनदा आला. कमावीसदारानी आम्हास येऊन सांगितलें, की नवाब येथ आहेत. पैका बैलावर येतो, या विशई काये आज्ञा? आम्ही सांगितले कीं नवाब राजश्री पेसिव्यास मुजाहीम[1] होतात यैसे नाही. सुखरूप घेऊन जाणे. कोण्ही मुजाहीम होईल तर आम्हास सांगणे. नवाबास जासूद बातमीच्याही खबर दिल्ही. नवाब बोलिले की आमचा त्याचा स्नेह आहे. म्हणोन बेवसवास बैल पाठवितात आणि

+ले. १९२ येथें वाचावें. १ विरुद्ध.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्ही त्यास मुजाहीम होऊं यैसे होणार नाही. करोडे रुा आसले तऱ्ही आम्हास हराम आहेत, तेथ हे तो काये मालियेत आहे? बैल सुरक्षित पोहचले असतील. बहुत काये लिहिणे? लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*The writer informs the addressee that treasure may be safely despatched on bullocks and that the Nizam has no covetous eye on it as he is on friendly terms with the Peshwa.*

No. 144] [*24-9-1752*

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक मल्हारजी होळकर कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील वर्तमान भाद्रपद वद्य १ स्वामीच्या प्रतापेकरून येथास्थित आसें विशेष. कृपा करून आज्ञापत्रे पाठविली पावोन बहुत बहुत संतोष जाला. सैदलस्करखान व राजश्री जानोजी निंबालकर यासी जाबसाल जाले त्याचा आर्थ लिहिला त्यासी सविस्तरे पुरवणीपत्री मजकूर लिहिला आहे त्यावरून श्रुत होईल. आजी भोकरधन नजीक मुकाम जाला. दो चो रोजानी अवरंगाबादेसमीप येतो. नवाब फेरोजंगहि रस्तियाने शहरास येतील. शहरचा बंदोबस्त होऊन स्वामीकडे जलद येतो. राजश्री हंणवतराव निंबालकर वगैरे याच्या आर्ज्या व नजरा नवाबास गुजराणावयासी आज्ञा केली, त्यासी आज्ञेप्रमाणें गुजराणली. त्याचें खातरतसलीचे[1] इनायेतनामे[2] मागून पाठऊन देतों. आवरंगाबादकर जे मुलाजमतीस येणार त्याचीहि उतम प्रकारें खातरतसली करऊन शब्दगौरवास नवाब चुकत नाहीत. खातरतसली करऊन बहुत प्रकारे समाधान करितात. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Malharrao Holkar to the Peshwa, communicating the arrival of Ghaziuddin near Aurangabad.*

No. 145] [*Oct. 1752?*

श्रीशंकर

राजश्री पंत प्रधान गोसावी यांसी

ऽ श्रीमंत अखंडितलक्षुमीआलंकरण महाविराजित स्नो तुळजाबाई शिंदे दंडवत विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखनाज्ञा करोन पत्री

---

१ खातरजमेचे. २ कृपापत्र.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सांभाळावें विशेष. कृपावंत होऊन चिरंजीव राजश्री यशवंतराव सिंदे याचे पत्र पा ते पा (फाटलें *) परम संतोष जाला. तेथें आज्ञा कीं नवाब अम (फाटले * *) उमराव निजामन मुलुक गाजुदीखान बहादर फेरोजंग दक्षणेस सुबेदार हो ऊन आले. अवरंगाबादेस दाखल जाले तुम्ही पातशा(ही) मनसबदार ताबेदार दक्षेणच्या सुबे(दारा) चे आहां. तरी तुम्ही आपले जमियेतीनसी (पत्र) दर्शनी अवरंगाबादेस जाऊन नवाबाची मुलाजमत करणें यांत तुमचा गौर सरफराजी बेहबुदी[1] आसे, तरी जलदीने जाणे म्हणोन आज्ञा करोन लिहिलें. तर हे गोष्ट बहुत उत्तम. पूर्वीपासोन आमचा अभिमान आपल्यासच आहे (फाटलें * *). आम्ही आपले आज्ञांकित; त्याजमध्यें चिरंजीवास नवाब सलाबतजंग याही न्यामदुलाखां बक्षीसमागमे (तै)नात करोन करनोळेस[2] पा होते. ते त्यासमागमेच हैदराबादेस आले. ते तेथेंच (आड)कले आहेत. त्यामधें आपल्याकडील आज्ञापत्र आले तेच बजिनस चिरंजीवाकडे (मु) जरद पा आहे. ते पत्र त्याजवळ पावताच निरोप (होईल त्या) प्रकारे घेऊन आम्हाकडे येऊन पोहचताच त्याची तयारी करोन अविलंबे शहरास जाऊन मुलाजमत हासील करतील. तेथेहि सर्व प्रकारे आपल्यासच उर्जित करणे ते करावे. येविसीचा अर्थ रा धोंडो अकदेव यास विस्तारे लिहिले आहे आणि आपले सेवेमधे रा लक्ष्मणरावहि पाठविले आहेत. हे विनंती करतां आपण जैसी आज्ञा करतील त्याप्रमाणे वर्तनुकेत आनिले जाईल. विशेष (काय) लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Tuljabai Sindia (of Torgal Manoli) informs the Peshwa of her son Yashvantrao Sindia having been detained at Hyderabad and of her willingness to execute the Peshwa's commands to go and join his forces with those of Ghaziuddin Khan.*

No. 146] [*Oct. 1752?*

श्रीशंकर

राजश्री **पंतप्रधान गोसांवी यांसीं**

श्रीमंत अखंडितलक्ष्मीअलंकरण राजमान्यविराजित स्नो तुलजाबाई सिंदे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीये कुशल लेखनाज्ञा करून आसीर्वादपत्रीं सांभालावे विशेष. आपणाकडील आसीरवादपत्र बहुत दिवस येत नव्हते. याजकरितां अमृतोतराची प्रतीक्षा सदैव सापेक्षित असतां सांप्रत

---

१ तर्तूद. २ कर्नूल.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आनंदरुप आसीरवाद (पत्र स्वामीने आम)चे नावे पाठविले ते [मस्तकी वंदून] चितास परम अह * * * * * * पत्रावलोकनी आपले चरणारविंदच अवलोकनांत आले. आज्ञापत्री आज्ञोतरे लिहिली की नवाब आमीरुल उमराव निजामनमुलक गाजुदीखान बाहादर फेरोजंग दक्षणेस सुबेदार होऊन औरंगबादेस दाखल जाले. सारी पातशाही मनसबदार दक्षणेच्या सुबियाचे ताबे आहात. आपले जमियेतीनिसी पत्रदर्शनी औरंगाबादेस जाऊन नवाबाची मुलाजमत करणे यांत तुमचा गौर सरफाराजी व बेहबुंदी[1] असे, तरी जलदीने येणे म्हणऊन अज्ञापिलें. त्याजवरून परम संतोश जाला. येसियासी आम्हास आपली आज्ञा वंद्य. आमचे मुरबी सर्व प्रकारें पूर्वीपासून गोसांवी समर्थ आपले सिरी आहेत; आणि सर्वस्वे आपल्या सांभालाचा आभिमान गोसांवियासीच वडिल-वडिलापासून आमचा सांभाल होत आला. तीर्थरूप कैलासवासीनी माहाराज छेत्रपतीची सेवा येकनिष्ठपणें करून कृपा संपादून घेतली होती. पुढें अनाथक-रुणानबंध कैलासवासी या राज्यांत आलियावरीहि छेत्रपति व कैलासवासी थोरले पंतप्रधान सर्व प्रकारे सांभाल करीतच आले. आतां आमच्या सांभालाचा आभिमान गोसांवियावाचून आणिक कोणास आहे? आपल्या आज्ञेप्रमाणे जमि-येतसुधा चिरंजिवास यावया विलंब नाही. आमचे वर्तमान राजश्री धोंडाजी अकदेव सेवेत निवेदन करितां अवगत होईल, आणि पत्रीहि विज्ञप्ति कीं चिरंजीव गतवरषी न्यामतुलाखांजीचे होमराह[2] करनोलच्या मोहिमेस रवाना केले ते करनोलची मोहिम करून न्यामतुलाखांजी बरावरीच भागानगरास दाखल जाले. त्यासी जागी * * * * * डे यावया आज्ञा * * * * आज्ञा होऊन लवकरीच येतील. आम्हीहि चिरंजीवास गोसावियाच्या आज्ञापत्राआगो-धरींच पत्रें लेहून पाठविली की तुम्ही लवकर येणे. इकडे नवाब निजामनमुलक फेरोजंग बाहादर औरंगाबादेस दाखल जाले म्हणऊन पहिलेहि पत्रे लिहिली आहे-ती आणि गोसांवियाचे आज्ञापत्र आलियावरीहि मागती पत्रे लेहून पाठविली तेहि लवकरीच येऊन पोहचतील. विशेष विस्तार काये लिहणे हे विनंती.

¶*Tuljabai Sindia to the Peshwa, informing him of her readiness to obey the Peshwa's command in waiting upon Ghaziuddin.*

No. 147] [*Nov. 1752*

श्री

विनंती उपरी. मोगल आज मरदा नदीवर मुकामास येणार; भालकीकडेहि रोख आहे. परंतु नदीवरच येतो. आपण यावें. उजवे बाजूस दादा व डावे

---

१ भरभराट. २ बरोबर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बाजूस आपण व पछाडीस मल्हारबा जयापा या प्रमाणें हातास हात करून यावे. रघोजीबाबा सरदाराचे व आपलेमध्यें, असे हातास हात करून यावे. आम्ही रात्री चौकीस होतो, त्या मध्यावर यावें. लस्करचे मुकाम तेथेंच असूं द्यावें. सब्याफौजेनसीं यावें हे विनंती.

(यास उत्तर)

मोगलाचा मुकाम जाहला. आम्ही सारे फौजेनसी मल्हारबा जयापा सुधां एका कोसावर उभे राहिलों. नागोपंताची चिठी आपण पाहिलीच. जाब सिदपा-बरोबर पाठविला. आपणांस पहावयास खातेरस आला तर रवाना करावा. मुकाम जाला असतां साऱ्या फौजा का ताटकळाव्या? आपण यावे. चौकीस दिवसास दोन हजार फौज ठेवावी. लौकर गोटास जावे. रात्रीचे चौकीस कालचे प्रकारे पांच हजार फौज वेळेवर घेऊन जाऊं. एके दिवसींच फार श्रम न करावे. काम पुढें फार आहे.

¶*Nana Purandare to the Peshwa and the latter's reply to it about the dispositions of the Maratha forces in an impending action.*

No. 148] [*11-11-1752*

श्री पांडुरंग

राजश्री शमशेर बहादर यांसी

विनंती उपरी. येथील वृत छ ४ मोहरम शनवार दोन प्रहर पावेतो यथास्थित असे. यानंतर आज्ञा घेऊन श्वार जालों त्यास आजीचा सहावा दिवस, पांच दिवस भालकीस यावयासी लागले. पतके समागमे दिल्हे ते एकत्र होणे. प्रजं-न्याचे नदीनाले ऐसे करितां पांच रोज गुजरले. आजी सावा दिवस. भालकीपुढें बेदरचे रोखे जात होतों. तो ताम्रहि आला. आजी भालकी नजीक दोन कोस मुकाम आहे. उदईक रविवारी कूच किंवा मुकाम कळत नाहीं. तूर्त मोगलांचे लस्कराजवळ भोवताले खटपट करावी ऐसे पूर्ण मानस. तो भालकी वगैरे भोवताली कोसी दुकोसीं जाधवाची ठाणी. पिजरांत मोगल याजकरितां बनत नाहीं. त्यामध्ये प्रेत्न करितो. या उपरी दुसरे काम नाहीं. जाली टाकून भालकीपासून अलिकडे दोन कोस च्यार कोस आला म्हणजे काम पाहिजे ते चालेल. आपण दोन पत्रें पाठविलीं ते पावली. हे वृत श्रीमंत स्वामीस विदित करून आज्ञा करितील ते लिहून पाठविणे. याप्रमाणे वर्तणूक करूं. याउपरी श्रीमंत स्वामीचा विचार काय कोठे येतील, तुम्ही व त्याचे वृत्त सविस्तर लिहिणे हे विनंती.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

होा राजश्री गोविंदपतास नमस्कार विनंती. लिा परिसीजे. रा शामजीपंत खुशाल आहेत. सविस्तर लिा प्रों श्रीमंतास श्रुत करून आज्ञा करतील तें लिहिणें. तेथील पुढे मनसबा कुल लिहिणे हे विनंती.

¶*The writer informs Samsher Bahadar of his own arrival near Bhalki and says that he (the writer) can attack the Nizam if he succeeds in enticing him away from Bhalki.*

No. 149] [*8-12-1752*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
दिनकर माहादेव गोसावी यांसी

सेवक विश्वासराव बलाळ नमस्कार. सुा सलास खमसैन मया व अलफ. लष्करांतून तीर्थरूपाचें पत्र छ १७ मोहरमीचें आलें तें छ २९ मिनहूस पावलें. त्यांत मजकूर लिहिला आहे, कीं आम्ही मजल दरमजल भालकीनजिक येऊन नवाब सलाबतजंग यांस चहूंकडून घेरून बसलों आणि तोफांचा व बाणांचा व जेजालांचा मार त्याच्या लष्करावरी केला. तेणेंकरून लष्करांत बहुतच दहशत पडोन तंग जाहालें. चहूं रोजांत दाणा वैरण मोगलाच्या लष्करांत न मिळेसी जाहाली; व आपली फौज बहुत, मोगलाची फारच कम. हे गोष्टीनेंहि सलाबत मोगलास विशेषच पडली, तेव्हां अजीजीनें फिरंगियाजवळूनच बोली घालविली कीं फेरजजंगानीं जो करार केला आहे त्याप्रमाणें घेऊन सला करावा म्हणोन बेजिदीनें[1] संदर्भ केला; तेव्हां छ १७ मोहरमीं नवाब सलाबतजंग याची व आमची भेट बहुता समारंभें जाहाली आणि सला केला. कोण्हे गोष्टीं लढा राहिला नाहीं म्हणोन लिहिलें आलें. हें वर्तमान संतोषाचें तुम्हांस कळावें म्हणून लिहिलें असें. जाणिजे छ १ माहे सफर.

¶*Vishvasrao Ballal writes to Dinkar Mahadev the happy news of the victory gained by the Peshwa's troops over those of the Nizam and the humble manner in which the latter sued for peace.*

---

१ लीनतेनें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 150] [*24-12-1752*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री दिनकर
माहादेव गोसावी यांसी

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुा सलास खमसैन मया व अलफ. येथील वर्तमान पहिले तुम्हांस लिहिलेच आहे. प्रस्तुत आम्ही कोडलूर[1] संगमासमीप आलो. नवाब कलबर्गियास आले. ते आम्ही कर्नाटकास जात असो. भीमाकृष्णा उतरून अविलंबेच पुढे जाऊन. राजश्री बाबूजी नाईक काये मनसुबा करितात, फौज कितीक आहे, काये उपद्वाप करितात, मातुश्री आईसाहेबांचा विचार काये, सांप्रत मर्जी कसी आहें, राजश्री प्रतिनिधि व राजश्री येमाजीपंत कोठे आहेत, फोज कितीक जमावली आहे, यांचा जोर कसा आहे, राजश्री दादो माहादेव यास प्रतिनिधीकडे रा करणे म्हणोन राजश्री त्रिंबकराव विस्वनाथ यांस लिहिले होते ते त्याजपासी पाठविले न पाठविले, काये वर्तमान ते लिहिणे. रा बाबाजी जाधव कोणे विचारात आहेत, त्यांची व नाईकाची मर्जी मिलते न मिलते, कसे करितात, ते सविस्तरे लिहिणे. वरकडहि नवलविशेष वर्तमान आढलेल ते लिहीत जाणें. वो राजश्री नारायेणबावास पत्र पाठविले आहेत ते त्यास पावते करणे. सर्व वरचेवर ठिकाणीकडील लिहीत जाणे. श्रीकृपेने दोहो तीही महिनियानी तिकडे आलियावर सर्व नीट होईल. छ १७ सफर बहुत काये लिहिणे.

¶*The Peshwa to Dinkar Mahadev, communicates the news of his movements from his camp near the confluence of the Bhima and the Krishna—known as Kadlur. The Peshwa further asks the addressee to supply him with all possible details of the situation at Satara, especially about Babuji Naik, Pratinidhi and Tarabai.*

No. 151] [*1752 End*

सेवेसी विनंती. आसीर्वादपत्र पाठविले ते पावोन सनाथ जाहालो. बाबास बरे वाटते किंवा नाही हे लिहिणे व सोबत्याचे वर्तमान काय व ज्याचे मुलकातून जाता त्याचा मजकूर काय व ज्याचे सेजारोन जाता त्याचे लस्करात काय

---

१ भीमा आणि कृष्णा ह्या दोन नद्यांचा संगम.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

विचार होतो व ज्या देशात जाता त्या देशातील वर्तमान काय वगैरे आढलेल ते लिहिणे म्हणून आज्ञा. येशास येथील सविस्तर वर्तमान राजश्री अमृतरावजी व राजश्री सिदबा निवेदन करतील त्याजवरून विदित होईल व आम्हास थोडेबहुत * * * * * * * * * * * * * न करतील त्याजवरून विदित होईल. बाबाचे शरीरप्रकृतीचे वर्तमान तर आहे तसेच आहे. औषध घेत असतात. घोड्यावर बसत नाहीत. प्रातःकाली श्नान होत नाहीं. घरास गेलियाउपरी महिनाभर औषधशेवन करून उतम पथ्य करतील तेव्हा प्रकृतीवर येईल असे आहे. आम्ही तुलजापुरास पंचमीस आलो. देवदर्शन जाहाले. येक दिवस मुकाम जाहाला. मंगलवारी कूच करून वराडानजीक आलो. याउपरी दरमजली घरास जाऊ. घरास गेलिया-उपरी तिकडील अधिकोतर कलेल ते सेवेसी लिहीन. राजश्री मल्हारबा पंढरीस जाणार होते ते राहिले. उभयेतावाच घरास जाणार. मल्हारबाचे मर्जीचा भाव असा कीं जे गाडदी खानानी दिल्हे आहे त्याप्रमाणे धन्यानी मेहरबान होऊन चालवावे असे आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. जानबा, सैद-लस्करखान परंड्यावर आहेत. मल्हार खिजमतराऊ काल लस्करात आले. मल्हारबास म्हणतात की भेट व्हावी, येक दिवस मेजमानी घ्यावी मग जावे. जवल आहे असे म्हणतात. याचा मनोदय लौकर जावे, गुंता करूं नये असा आहे. खिजमतराऊ लस्करातच आहेत. मोगल आवशाकडे आहे असे येकतो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Nana Purandare writes to the Peshwa about the illness of his cousin Mahadoba and gives news regarding the whereabouts of Janaba Nimbalkar, Said Lashkarkhan and others.*

No. 152] [*1752?*

श्री

राजश्री बाळाजी पंत प्रधान गोसावी यांसी

ऽ सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो रामचंद्र जाधवराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिलं पाहिजे विशेष. पूर्वी आपण कितेक प्रकारें आम्हास लिहिलें होतें. त्याच निश्चयावर आपले जागा स्वस्थ असतां नवाब बेदरास आले, परंतु आपले नेमास न टळलो. सेवट रा धोंडो आकदेव व नारायणराऊ याचे पत्रीं गोसावि-यांनी लिहिविलें कीं जाऊन भेटी घेणे विहित; त्यास नेकसलाह आम्हास हेच

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

असे. प्रतिपदेचे दिवसीं जाऊन पोहचतो. तोपावेतो राउळी फौजेचा लगाम वोढून धरून आमचे मार्गास अवरोध न ये ते केले पाहिजे. येविसी जे लिहिणे ते रा॥ नारायणराऊ यास लिहिले आहे, निवेदन करतील. रेणापुराअलीकडे कुल तालुका सरकारचा, त्यावर दुसाला आफत, स्वकीय देश समजोन यत्नेकडून संरक्षण केले पाहिजे. उभय पक्षी दुसरा विचार आहे ऐसें नाही. तेथें विशेष लिहिणे उपरोध असे. बहुत काय लिहिणे ? लोभ असो दीजे +हे वीनंती.

¶*Ramchandra Jadhav to the Peshwa, assuring him of his full support to the policy of the latter.*

No. 153] [*1752?*

श्री

पु॥ श्रीमंताचे सेवेसी

विज्ञापना. नवाबाजवळ मातबर फौजेचे मात्र माहाराव निंबाळकर आहेत. या वितरिक्त घरची फौज कांही चराईत आहे. येथून दोन च्यार मजली नवाब गेले म्हणजे लोक चराईचे येतील. सारांष बाहीरील कोणी निंबाळकरावितरिक्त आले नाहीं. सर्वत्रास इनायेतनामे[१] गेले आहेत कीं जलद येऊन पोहचने. खंदारकर व खंडागले वगैरे फौजा ठेऊन लवकर येणार म्हणोन वर्तमान आले होते. नवाब गंगापार जाले म्हणजे सरदार येणार ते येतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter from the Nizam's court, reporting to the Peshwa military preparations of the Nizam.*

No. 154] [*1752?*

श्री

राजश्री बाळाजी पंत प्रधान गोसावी यांसी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो॥ रामचंद्र जाधवराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. पत्र बमयेथैली नवाब गाजुदीखां बहादूर फेरोजजंग पाठविले तें प्रविष्ट होऊन पत्रार्थ अवगत जाला. आपणास अवश्यक जे कार्य त्यास साह्य जालिया स्वार्थ आणि परमार्थ साधतो. धणी राजी, त्यांत ईश्वर

+ हीं अक्षरें बालबोध. १ आज्ञापत्रें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राजी, म्हणून कितेक विस्तारे श्नेहभावे लिहिले, ऐसियासी उभय पक्षी दुसरा विचार आहे ऐसे नाही. आपली आमची भेटी होऊन समक्ष जे भाशण जाले त्याचप्रो गोष्ट आम्हाकडून अमलात येत गेली. न्याहीयेत[1] आपणावर हंगामा आंगेजे[2] केला, परंतु गोसावियाचे लिहिलें कदापि टाळिले नाहीं. याची साक्ष राउळाचे चितास आलीच असेल. ऐसे असोन सांप्रत आपले विचारावेगळे कैसें होऊं ? जो कर्तव्यार्थ करण तो आमचे हितावहच कराल. आम्हास पूर्ण भरंवसा आहे. व इकडील वर्तमान तर कनिष्ठ नवाब शहर हैदराबादेस आम्हापासून समीप वारंवार आपणापासी येणे व ठाणे जागिरा जेंखिरा[3] जमा करणे म्हणून लिहितात, याचा भाव आपले ध्यांनांत असेल. सारांश आमचे वचन जे पूर्वी जाले तेच प्रमाण. येविशई चितात संशय सर्वथा न आणावा. वरकड जे सांगणे ते स्वमुखे महंमद समी यास सांगून पहिलेच रवाना केले आहे. निवेदन करितां विदित होईल. थैलीचे उत्तरहि समर्पक आपल्या लिहिल्या प्रो पाठविले आहे. बहुत काय लिहिणे ? लोभ असो दीजे +हे वीनंती.

¶*Ramchandra Jadhav assures the Peshwa of his full support in whatever measures the latter undertakes.*

No. 155] [*22-6-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंती. सेवक शामजी गोविंद साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २० माहे शाबानपावेतों स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित आसे विशेष. छ १३ शाबानचे आज्ञापत्र सादर जालें ते छ १९ मिनहूस पावलें. इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री दादासाहेबाचीं लस्करचीं पत्रें छ १६ मिनहूचीं आलीं. मौजे वडझिरें परगणे सोनगीर प्रांत खानदेश येथें मुकाम होता. राजश्री मल्हारजी होलकर यांजकडे सांडणीस्वार गेला होता. जाबसाल घेऊन आला. राजश्री गंगाधर येशवंत येऊन भेटले. मागती राजश्री मल्हारबाकडे सांडणीस्वार रवाना जाला; ते इंदुरास होते. तेथून नर्मदा उतरून आलीकडे येतील. श्रीमंत राजश्री दादा तापी उतरोन पार जावें, भेटी होऊन सरकारची

---

१ निःसीम, फार. २ स्वीकारला.
३ सामान. + बाळबोध अक्षर.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आज्ञा जाईल त्याप्रमाणें बोलीचाली होऊन मल्हारबास घेऊन देशास येतील; अगर ते मालव्यांत जातील. राजश्री दादासाहेब पुण्यास येतील. नवाब सलाबतजंग आज रोज्यास तवाफ[1] करावयास गेले आहेत. नसिरजंगासिवाय महमद आनवरखान व दरगाह कुलीखान वगैरे कुल लाहान मोठे समागमे गेले आहेत. तीन च्यार दिवस तेथें राहून फिरोन येतील. शेवेसीं विदित होये हे विज्ञप्ति.

¶*The writer reports movements of Raghoba and Malharrao Holkar.*

No. 156] [*21-6-1753*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक शामजी गोविंद साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ १९ माहे शाबानपावेतों स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान नवाब सलाबतजंग दो चौ दिसानी दरबार करितात. खज्यान्यांत पैका नाहीं. सिपायांचा दंगा बहुत, व रोज खर्चाचाहि हंगामा आहे, त्यामुलें लोकांपासून पैका घेणार. दरगाह कुलीखान यांसी व नसिरजंग यासी चित्तापासून शुधता नाहीं. त्यास प्रस्तुत नसिरजंग याणी कोतवालीचे कामावर मिर्जा वकर, पहिला करोडगिरीचा[2] धंदा त्याजकडे होता, त्याजपासून पनास हजार रुपये नजर घेऊन कोतवाली त्यास सांगावी या विचारांत आहेत. आणखीहि तालुकदारांवर नजरा घेऊन धंदे सांगणार. साहुकारापासीं कर्जे मागतात. त्यास दोन तीन दिवस बसविले आहेत. साहुकारामध्यें तो जीव नाहीं. दिलीस मनसुर अलीखान याणी पुरे लुटले; त्यामुलें सावकारांचें नुकसान फार जालें; व पहिले नवाबानी कर्जे घेतलीं आहेत, आणि आमिलावर तनखा करून दिधल्या त्याचेहि रुपये आले नाहीं, त्यामुलें कितेक सावकारांचा कारभार आफ्तर आहे. प्रस्तुत दोन तीन लक्ष रुपये जबरदस्तीनें मागतात ते देत नाहींत. काय ठहरेल तें पाहावें. श्रीमंत राजश्री दादासाहेब राजश्री मल्हारजी होळकर याचे भेटीकरितां कूच दरकूच तापी उतरून पुढें गेले. नर्मदातीरी भेटी होऊन मल्हारबास समागमें घेऊन माघारे फिरणार होते. भेटी जाल्या असतील. या उपर कूच दरकूच माघारे फिरोन येतील. दिलीकडील वर्तमान मनसुरअलीखान हटोन

---

१ प्रदक्षिणा. २ जकात.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

च्यार कोस पलीकडे गेला. पातशाहानी जागाबजागा पत्रें पाठऊन फौजा जमा करितात. मातबर फौज जमा जालियावर बाहेर निघतील. मीरमनुहि येणार म्हणोन वर्तमान आलें आहे. मनसुरअलीखान याणी पातशाहा बसविला. त्याची वजिरी आपले पुत्रास दिधली, व मीरबक्षी सलाबतखान यास सांगितली. हफिजुद्दीखान व खानजादखान वगैरे आमीरहि त्याजकडे गेले आहेत व जाट व रोहिलेहि त्याचे रिफाकतींत[१] सामील जाले आहेत. अहमदशाहा पातशाहा यांजकडे माधोसिंग वगैरे रजपूत जमाव घेऊन जाणार आहेत. सेवेसीं विदित होय हे विज्ञाति.

¶*Shamji Govind reports court news from Hyderabad. He also relays information about the differences between the Emperor and his Vazir Mansur Ali Khan which, he says, have developed into open war.*

No. 157] [*22-9-1753*

(यावरचा मजकूर फाटला आहे.)

* * * * * * * * खोजे

अबदुल रहमाखान सायरचा बक्षी जाऊन घेऊन आला; मुलाजमत जाली; पाच मोहरा नजर केली; घटका रात्री बरखास. छ २४ जिलकाद शनवार एक प्रहर दोन घटका दिवस आल्यावर खिलवतात आले. आनंदराव निंबाळकर व लक्षुमणराऊ खंडागळे व भालेराऊ पांढरे व गोविंदराऊ वकील निा जानोजी निंबाळकर व माधवराऊ वकील निा हणमंतराऊ बारेयाब (?) जाबसाल करून एक प्रहर साहा घटका दिवस आल्यावर बरखास. आनंदराव व भालेराऊ व खंडागळे यासी हुकूम जाला जे मुसाबुसीकडे जाबसालाकरिता जाणे. संध्याकाळीं घटका दिवस राहतां खिलवतात आले. माकबीरखान व मीर मुक्तदाखान व मुस्तेदखान बारेयाब जाले व आनंदराव निंबाळकर व लक्षुमणराऊ खंडागळे व भालेराऊ पांढरे मुसाबुसीकडे गेले होते. मुसाबुसीनें गोशेमाहाला-जवळ डेरे दिल्हे होते. तेथे हे तिघेजण गेले. त्यांच्या यांच्या भेटी होऊन साहा घटका रात्री बरखास. मुसाबुसीच्या सुतरस्वारास तीन पारच्याचा खिलत व वी(स रुप)ये इनाम देऊन अर्जीचा जाब देऊन रुसकत केला.

छ २३ जिलकाद शुक्रवार दरबार जाला नाही. मुबारजखान व हणमंतराव निंबाळकर फिरंग्याकडे पा होते. मु(साबुसीने) गोशेमहालाजवळ डेरा दिल्हा होता. तेथे मुसाबुसी व हैदरजंग व मुसालास यांच्या व मुबारजखान व हणमंत

---

१ स्नेह.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रायाच्या भेटी जाल्या. पाच घटकापर्यंत यासी त्यासी जाबसाल जाला. मध्ये कुरान ठेऊन मुसाबुसी व हैदरजंग याणी शफत केली व नवाबाचे तर्फेने मुबारजखानाने शफत केली. मुसाबुसी व हैदरजंग च्यारमहालात गेले व मुबारजखान व हणमंतराऊ नवाबाकडे दोन प्रहर तीन घटका दिवस आल्यावर आले. नवाबासी जाबसाल करून दोन प्रहर च्यार घटका दिवस आल्यावर आपलाल्या डेऱ्यास गेले. संध्याकाळीं एक घटका दिवस राहतां खिलवतात आले. तर * * (पुढे मजकूर नाहीं)

¶*Daily report sent to Poona from the court of the Nizam.*

No. 158] [*24-1-1754*?

पौ छ ९ राखर

श्री

श्रीमंतांचे.....शेवेसी

विनंती. सेवक बळवंत बाबूराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना ऐसीजे. तागाईत छ २९ माहे रबिलौवल मुकाम साखोल पा उदगीर जाणून स्वामीच्या कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें. आता मोगलाच्या दरबारचें वर्तमान बेदरीं हे छावणीस होते याची बुध्य येक प्रकारची पाहून हावभरी जाहालियाचा मजकूर व अमर्यादेस हे वर्तू लागले ऐसें जाणून विनंतीपत्रें या मजकुराचीं पयेदरपये (पै दर पै) सेवेसी पाठवीत गलों. त्यास * * * यांविषयीं काय मर्जी आणले * * * केले. त्यास हे बेदराहून निरोपद्रव खुले बंदे आपली जमीयेत मेळवीत साहित्यांनशी येथें वर येऊन आजपरियेंत जमीयेत रात्री आठरा हजार स्वार रामचंद्र जाधवराव व आनंदराव निंबाळकर व यांची खासगत फौज व हणमंतराव निंबाळकर छ २७ माहे मजकुरीं लष्करासंनिध येऊन उतरलें. येसाजी मुकुंद बक्षी व तुकोजी चव्हाण रात्रौ च्यार घटका रात्र गेल्यानंतर सैन्यांत आले. राजश्री गोपाळराव माहादेव वकील निंबाळकरमजकूर यांचे हे उभयेतां बक्षी व चव्हाणमजकूर याचें येथें येऊन हे त्रिवर्ग येकें स्थळीं होऊन मसलत करीत असतां, प्रहरां रात्रीं विठ्ठल सुंदर यांचा चोपदार या त्रिवर्गास बोलाऊ आला. मग हे त्रिवर्ग स्वार होऊन विप्र कारभारी यांच्या येथें गेले. तेथें प्रथम भेटी या उभयेतांच्या होऊन आगत स्वागत जाहाल्यानंतर, मग विठ्ठल सुंदरास राक्षेसी कावा तो पाठच, तेव्हां या उभयेतांसी ममतेचीं भाषणें करोन तदनंतर निश्चय हा ठहरला कीं विठ्ठल सुंदराहीं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपल्या येजमानास घेऊन शिकारीच्या मिषें बाहेर निघावें, आणि निंबाळकराच्या व निजामअलीखानाच्या भेटी उत्तम प्रकारें व्हाव्या. तेव्हां छ २८ माहे मजकुरीं बुधवारीं दोन प्रहर तीन घटिकानंतर निजामअलीखान स्वार न होतां विठ्ठल सुंदर स्वार होऊन महमद कबीरखा बक्षी बादशाहा व अबदुल हाईखा हे पुढें जाऊन निंबाळकर मजकुरास नवाबाच्या येथें घेऊन आले. नवाबाची मुलाजमत करविली. तदनंतर निजामअलीखानाच्या येथें नेऊन याच्या भेटी करविल्या. खिलबत जाहलें. शिष्टाचार आगतस्वागत ममतापूर्वक भाषण होऊन मग पानदान व अत्तरदान इनायेत जाहलीं; मग स्वार होऊन आपल्या डेऱ्यासी गेले. त्यास हणमंतराव निंबाळकर यांचा संकल्प ऐसा होता कीं यावज्जन्मपर्यंत निजामअली-खानासी न भेटावे, परंतु प्रकार येका प्रकारचा पाहिला. (पुढें गहाळ)

¶Balavant Baburao informs the Peshwa of the reconciliation effected between Hanmantrao Nimbalkar and Nizam Ali by Vithal Sundar.

No. 159] *[14-3-1754?*

श्री

साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ १९ जमादिलावल गुरुवार मुकाम श्रीगोंदें जाणून स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे विशेष. कृपा करून पत्र पाठविलें तें पावोन संतोष जाला. सविस्तर वर्तमान कललें. या प्रकारेंच निरंतर आलिया मनुशासमागमें पत्र पाठऊन आपलें संतोषाचें वर्तमान लिहून सेवकाचा सांभाळ करीत गेलें पाहिजे. येथील सर्व प्रकार व सर्व मनुशमात्रांची वर्तणूक स्वामीस विदित आहे. त्याचा तपशील लिहिणें नलगे. छ १५ रोजीं लडाई जाली, त्याचा तपसील सेवेसीं लिहिलाच होता. छ १६ रोजीं आगाडीची पिछाडी केली. छ १७ रोजीं चांभारगोंद्यास आले. गावाजवलच मुकाम केला. छ १८ रोजींही मुकाम केला. हणमंतरायाचे व सदाशिव नारायेणाचे विद्यमानें करार जाला कीं, चांभारगोदें कोसभर टाकून जावें आणि पंच्याहात्तर हजार रुपये द्यावे. ऐसा करार जाला असतां चांभारगोंद्यासच आले. मुकाम केला. सिवार मले बाग कुल लुटिले. बाहिरील पेठांची घरें कुल मोडून आणिलीं. उपरांतिक गांवातील पेवें काढिलीं. काही मोकला दाणा होता तो सांपडला. दारू वीस मण सांपडली व बाणाचे चोथेवे काही सांपडले. चालीस मण भांडे सांपडले. हवेल्यात खणितात. शोध करितात. तूप तेल सूत अंबाडी ताग कांहीं सांपडला. हणमंतरायानी कुरकुर केली कीं आम्हांसी करार केला येक आणि

---

१ नळकांडी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
केलें एक. त्यांची समाजविस केली कीं आमचा करार फख्त हवेल्या जगवा-
वयाचा त्यास दाणा दारूगोला वगैरे जिनस जो सांपडेल तो घेतला पाहिजे.
लडाईचा प्रसंग दाणादारू गोला जरूर घेतला पाहिजे. याप्रमाणें समजाविसी
काढिली. सारांश मराठ्या सरदारापैकीं कोणी गैरतीचा[1] माणूस नाहीं. त्यांजला
येखानें पैजाराहि मारिल्या तरी सोसतील. चांभारगोंद्यांत खंडेरायाची वगैरे
देवलें होतीं. खंडेरायाच्या वगैरे मूर्ती फोडिल्या. शाल नारायण सिंद्याचे हवाली
केली आहे. प्रसंग या प्रकारचा. माणूस रिकामें नाहीं हे विनंती.

¶*News-letter from Shrigonda reporting a battle near that place between the Maratha and the Nizam's forces. The date is questionable.*

No. 160] [*27-3-1754?*

पो छ ३ जमादिलाखर

श्री

विनंती. सेवक रामजी नाईक घोगरे विज्ञापना. छ २ जमादिलावर रोज
बुधवार च्यारघटिका रात्रपरियेंत वर्तमान. ज्याधवराऊचे जागीर आगदीं जप्तीत
आणिले आहेत, त्यापैकीं नारायणखेडा परगणा राजेश्री रघुपतराव पिंगलेस जप्ती
दिल्ही. वरकड आगदी तालुका बहादर दिलखानास लिहून पाठविलें कीं ज्याधव-
राऊचे जागीर जप्त करणें व सदाशिवराव नारायेण निसबत निंबालकर यानी
चांभारगोंदीचे दाहा हजार रुपयेसमध्यें आले होते. आज राजेजीहीं आपले
कारकून गोपालपंतास राव मजकुराजवल पाठऊन आनपाणी बंद करून रुपयेची
निशा घेतली, याजवरून राव मजकूर बहुत आझुर्दा आहे व निंबाजी भोंसलेची
येक जोडी व पत्रें आली आहे कीं दोन हजार फौज व दाहा तोफानिशीं येऊन
पोंहोचतो हें वर्तमान आसे; व आज हातीस चारा मिलला नाहीं. कांटे मोड मोडून
घातले. लष्करांत कांहीं हाव राहिला नाहीं. सलाह केलियानच क्षेम आहे
म्हणतात. कित्येक सरदार फुटून नासरजंगाकडे येणार. सलाबतजंगाचे चित्तवृत्ति
कीं पुण्यास न जावें, स्नेहच करावे. व कितेकां मऱ्हाटेचे वकील आले होते कीं
येऊन पोहोंचतो त्यास ते लोक कोठें आहेत? सेवटी ते ते आवघें येकच जाले.
आता कोणाचे भरवसेवर युध करिता व पुण्यास कोण्हे प्रकार जातां या प्रकार
थोर्ली निज्यामआलीखानासी राग करून बोलला आहे. प्रहर रात्रीं दरबार
जाला होता. विठलपंत व मुरादखान व शिवाजीपंत तिघांनी गेले होते. काय
तजवीज जाला न कले. व यांस बातिनी आली कीं पुण्याभोताले लकडकोट

---

१ वजनदार, ज्याची भीड पडेल असा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बांधिले व मावले व तोफा ज्याबज्या[1] बसविलेत, यावरून आवघे दुचित आहेत कीं पुढें तो मार, माघून यांचा मार होईल, म्हणजे कांहीं ताल राहाणार नाहीं. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. चोराचा उपद्रव बहुत जाला आहे. रोज दाहा पांच घोडी नेतात. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter to the Peshwa by Ramaji Naik Ghogre, giving various items of news about Jadhavrao, Nasarjang (younger), Salabatjang and others.*

No. 161] [*4-8-1754*

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजश्री पंतप्रधान माहाराजाचे सेवेसी

आज्ञाधारक निळो नरसिंह कृतानेक सा नमस्कार विनंती. आज्ञापत्र ता छ १४ शौवाल मुा भालकी सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री रामचंद्र जाधवराव हुमनाबादेस छ ८ रोजीं गेले ते छ ११ रोजी संध्याकाळी भालकीस आले. मातुश्री लक्ष्मीबाईस वाटे लावावे हे तजवीज आजी येक महिना होत आहे. मुहूर्त येक दोन पाहिले परंतु स्वारी आली नाही. स्वारी आलियाची जोडी आल्यावर खामखा पाठवावे हे तजवीज आहे. राजश्री त्रिंबकराव दाभाडे याजला सोडावे कीं न सोडावे ह्या तजवीजीमध्यें आहे. जोडी पाठविली आहे. प्रतिउत्तर आल्यासारिखे वर्तणूक करितील. मुजफरखान या प्रांती आला म्हणोन वार्ता आली होती. परंतु शोध घेता कोठे ठिकाण लागत नाही. याजलाहि साफ सांगितलें कीं तुम्ही शोध करून लिंहिणें. त्यास जाधवरावजी त्याच्या शोधात आहे. भेटीस येणार होता परंतु सेनापतीस आटकाव जाला याकरिता संशय जाला यामुळे न आला. गुप्त जाला. याकरिता मुजरद इकडील जासूद शाहाणे खबरदार या प्रांतीचे ठेऊन शोधास पाठविले आहेत. ठिकाण लागली म्हणजे लिहून पाठवितो. येथील कारभार क्षणभंगुर, सिधांत होऊन येईल तो सत्य. मातुश्रीच्या व जाधवरावजीच्या चितात की खामखा श्रीमंताच्या भेटीस मातुश्रीस पाठवावे. जेजुरीयाच्या यात्रेस यावे. मग भेटी घ्यावी. कर्जाचा मजकूर तर सध्या रुपये देत नाहींत. खरीफावर देऊ म्हणताती. त्यास आज्ञापत्र आले तर लवकर रुपये देतील. राजश्री नागोराम याजवर रोजमऱ्हाची वरात दिल्ही. त्यास त्याणी रा धोंडो आकदेव याजवर वरात दिल्ही. वरात स्वाधीन केली. धोंडो

---

१ ठिकठिकाणीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
आकदेव याचे व नागोराम याचे चित्त शुध नाहीं, यामुळे रोजमरा मिळाला नाही. सेवकाचा कोणींहि अर्ज करावयासी सनिध नाही. महाराज धणी समर्थ. राजश्री त्रिंबकराव दाभाडे याणी विनंतीपत्र लिहिले आहे ते पावले असेल. सेनापतीच्या चितात कीं भेटी घेऊन कर्जाचा निर्वाह होये येसा मनोदय आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nilo Narsinha to the Peshwa: writes about the intrigues of Dabhade and Ramchandra Jadhao at the Nizam's court.*

No. 162] [*1754*]

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेशी

विनंती. सेवक गोपाळराव केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील सेवकलोकांचे वर्तमान तरी स्वामीचे कृपाकटाक्षेकरून येथास्थित असे विशेष. कृपा करून आज्ञापत्र सादर केले तेथें आज्ञा कीं परगणे पडदूरच्या फौजदारानें व जमीदारानें फंद करून राजश्री दमाजी पिसाळ याजकडील कृष्णाजी व्यंकटेश कमाविसदार धरिला आहे त्यास सोडून देवणे म्हणोन आज्ञा केली. ऐसियास राजश्री जयाजी सिंदे याचे तरफेनें राजश्री लक्ष्मणराव राम याच्या मारुफातीने परगणे मजकूरची सरदेशमुखीची कमाविस आम्हाकडे आहे. त्यास सालगुदस्ता-पासून पडदूरचा फौजदार व जमीदार सरदेशमुखीचा अमल सुरलीत देत नाहीं आणि कृष्णाजी व्यंकटेश याचेहि आम्हास अगत्य आहे. याजकरितां माघमासीं राजश्री आपाजी सोमवंशी सरलष्कर व गोरखोजी भापकर व शंकरराऊ देवढीकडील परगणे आंबडच्या देशमुखीच्या कामावर आहेत ते व आम्ही असे तीन चार हजार फौजेनसी पडतूर परगणियांत कसब्यानजीक * * * पंधरावीस मुक्काम करून राज (न) वट (?) केली; परंतु सरेदशमुखीचा तह न केला व [पुढे फाटले, किती ओळी गेल्या कळत नाहीं.] * * * * होते त्यास पडतूरच्या फौजदारानें लेहून मोगलांची फौज दोन तीन हजार बक्षी जिल्हेदार म्हणोन आम्हावरी आणिला तो सा कोसावर आलियावर सरलष्कर वगैरे तमाम पडतूर परगणियांतून निघोन गेले. कृष्णाजी व्यंकटेश याजला सोडावयाचेविशीं उदंड येत्न केला परंतु साध्य न जाला. या प्रकारचे वर्तमान सेवेसी विदित होये. या प्रांतीचे वर्तमान तर सालबसाल राजश्री रघोजी भोसले याजकडील फौजाची धामधूम. त्यामुलें आधिच मुलूक वैराण. त्याउपर गेले साली तांबेरा पडला. आवंदा रबीची नापेर जाली. जुज वस्ती कोठेकोठे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
गांवांआडगांव होते त्यास आवंदा खासे रघोजी भोसले या प्रांतें कार्तिक मार्गशीर्ष मासीं येऊन अतिशये धामधूम करून घासदाणे घेऊन मुलूक वैराण केला. त्याउपर देवढीकडील शंकराव परगणे आंबडच्या देशमुखीच्या कामावर आहेत त्यानीं या प्रांतीच्या नाडगौडीचा मामला करून हजार बारासे स्वार ठेवून या प्रांतें येऊन धामधूम केली. त्याउपर गोरखोजी भापकर आले त्यानीं घासदाणे घेतले. तदनंतर राजश्री आपाजी सोमवंशी सरलष्कर याणीं घासदाणे घेतले. त्याउपर राजश्री रायाजी भोसले दो ती हजारानसी आले त्याणी अतिशये धामधाम करून घासदाणे घेतले. सांप्रत आपाजी सोमवंशी सरलष्कर व रायाजी भोसले व गोरखोजी भापकर व शंकरराऊ असे पांच सात हजार फोजेनसी ऐके जागा होऊन पाथरी सरकारचे कुली परगणे लुटून फना केले. गांव मारितात * * व जाळितात, * * * * * * * बुडवितात, माणसे धरून * * * घेतात, कितेक लोक जीव घेऊन पळतात. मुलकाचा पाटावरोंटा होऊन भणाण जाला. रोज उठोन कहीखाले दहापांच गांवचा सिवार लुटितात. आज दोन महिनें हाच दंगा माजला आहे ऐसा प्रळये या प्रांते जाह (ला) आहे. कोण्हाच्या मुलकांत कोण्ही जाऊन करूं नये ऐसा दरबारी तह जाला असतां सालबसाल अतिशये धामधूम. गुदस्तापासून साहुकारास रसदेचा पैका पावला नाहीं. या मुलकाची करुणा येऊन बंदोबस्त करणार स्वामी समर्थ आहेत. राजश्री जानोजी निंबालकर याची जागीर मेहकर परगणियांत तीस गांव आहेत त्यास जानोजी निंबाळकर यांचे तरफेनें धोंडीराव पवार व गोपाळपंत व नागोजी पवार ऐसे पन्नास स्वारानसी आहेत ते सदरहू तिसां गावचा सरदेश-मुखीचा अमल देत नाहींत. या तिसागांवाखेरीज दिगर[1] जागिरीचे पंधरा वीस गांव इजारियानें त्यांनीं केले आहेत त्या दिगर जागिरीच्या गांवचाहि अंमल आज तीन वर्षे देत नाहीं. त्यानीं जागा जागा गढ्या बलकाऊन त्या दिगर जागिरीच्या गांवावर आम्ही कदाचित् स्वारी केली तरी कमाविसदाराचा प्यादा परगणियांत फिरूं देत नाहींत. प्यादे धरून फासी देतात. आज तीन वर्षे जाली. कमाविसदार धरून मार देऊन पांचसे रुपये घेतले ऐसा त्यानीं अतिशये मांडला आहे. इंगळास बोळंबे तैसे जाले आहे. येविशी जानोजी निंबालकर यास पत्र लिहिले तर मुखेकरून गोड गोष्टी बोलतात व * * * * पूर्वक लिहितात परंतु बोलणे * * * * * * * * यास आम्ही उपाये कोणता करावा? गतवर्षी राजश्री अवजीबावा या प्रांते आले. त्यानीं पारपत्य करावे तो राजश्री सुलतानजी निंबालकर व जानोजी निंबाळकर ऐसे

---

१ आणखी, इतर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पांचसात हजार फौजेनसी या प्रांतें चार महिने अवजीबाबाच्यां पिछयावर एकामजलीच्या तफावतीनें फिरले. सेवटी आवजीबाबाचा हात न पुरला अखेरसाली खानदेशप्रांती गेले. अवंदा या प्रांते येऊन कमाविसदार उगवावे तो करनाटकची मोहीम जाली. जानोजी निंबाळकराच्या लोकानीं तो मर्यादा टाकिली आहे. तरी स्वामीनी कृपा करून जानोजी निंबालकर यास पत्र लेहून मुजरद जासुदाची जोडी सरकारची पाठविली पाहिजे. जानोजी निंबालकर साहेबज्याद्याबा निर्मळप्रांते आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Gopalrao Keshav reports to the Peshwa the distress caused in the Patdur pargana by the exactions levied by the various chiefs.*

No. 163] [*29-11-1755*

पौ छ २५ सफर

श्री

शेवेसीं विज्ञापना. स्वामीचे पुण्यप्रतापें चाकण किला कार्तिक वद्य येकादसीस प्रातःकालच्या चौदा घटिका दिवसास फत्ते जाहला. निशाण चढऊन गणोजी कोडके शेवेसीं रवाना केले असेत. राजश्री आणानी लिहिलें आहे. विदित होईल श्रुत होये हे विज्ञापना.

¶*A note announcing the capture of Chakan.*

No. 164] [*29-11-1755*

श्री

शेवेसीं विज्ञापना. चाकणच्या किल्यात निशाण घेऊन पंचवीस माणसानसी आंत जाऊन किलेदाराची भेट जाहली. जाजती माणूस त्याणें पहिल्यानें घेतलें नाहीं. सरकारचे निशाण उभें केलें. च्यार घटका बोलीचाली जालियावर आणखीं पनास माणूस नेऊन नऊ बुरुजावर लोक दर बुरुजावर पांच पांच त्यामध्यें दोघे कुलबेकर, तिघे निसबत हरि दामोदर, याप्रमाणें व दरवाज्यास दर पांच प्रमाणें पाचा जागा पंचवीस व सदरेस पंचवीस याप्रमाणें लोक बसविले. तोंपर्यंत त्याचें येक माणूस बाहेर निघालें नाहीं. त्याणें आपल्या चौक्या उठऊन घरोघरातून लोक बसविले, आण ज्याची त्याणें सिपायानें आपली वस्तवानी कुल न्यावी ऐसा करार करून वस्तभावेसमागमें त्याचे लोकानी निघावें यैसा करार केला त्यास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपली गाठोडीं बाहेर काढितील तीं आम्हीं * * जाऊं देऊं ऐसें अणाजवळ बहुत * * * न आईकत. त्याजवल आमचें वचन गुंतलें कीं तुमचीं गाठोडीं मोघम जाऊं देऊं. उपाये न चाले. तेव्हां तजविजेनें सांगितलें किल्यांत गाठोडे बांधत्येवेलेस राजश्री मानाजीपंत दारूखाना याचे गुजारतीनें बांधणें, तेव्हां याप्रमाणे त्यानी मान्य केलें, आणि सांईकालच्या साहा घटिका दिवसास आलंदीस आणां गेले. आम्ही विस्वासराव रामाजीपंत किल्यांत आहों. यमाजीसुधां याउपर तिखट न वाटतां चौकसी विचारें करून करावयाची ती करितों. मालमवेसी किलेदाराची अजमासें पनासाची भासत्ये. सदरहुप्रमाणें रोकड आहे, ऐसी किल्यात गुणगुण आहे. दर्शनी कांहींच दिसत नाहीं. गला वगैरे लोकाचा आहे. त्याची परवानगी आणानी दिली. परंतु आम्हीं जाऊं दिल्हा नाहीं. उदईक न्या म्हटलें. किलेदाराची वस्तवानी सर्व बाहेर सिवाय गला काढवितो. व दारू गोली जेजाला तोफाविगळी पंचवीस जेजालदार तोफखान्याकडील ठेऊन घेतले आहेत. बाकीच्यास निरोप दिल्हा. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The letter gives further details about the capture of Chakan, and the measures that were taken to garrison it.*

No. 165] [*24-3-1756 ?*

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक निलो नरसिंह कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ २२ जमादिलाखर मुा कोन्हली ता सिरसी प्रा प्रतापपूर, स्वामीचे कृपावलोकनेकडून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विषेश. राजश्री परस (राम?) माहादेव याणी आज्ञेप्रमाण वर्तनूक केली. राजश्री रामचंद्र जाधवराव येकले जातीनिसीं शानवाजखान याच्या डेऱ्याजवल उतरले आहे. मुजफरखानास छ १७ जमादिलाखरी दूर केले. निरोप घेऊन हुमनाबादेस गेला. पुढे स्वामीकडे येणार. त्यास लोकाचा दंगा आणि खर्चास वाटेस नाही याकरिता पेठत राहिला आहे. रा पंतानी काही खर्चाचे कबूल केले आहे. ते देतील तेव्हा पुढे मार्गस्त होता येईल. फौजेचेहि वारापाणी जाले. जाहागीर पाच सात लक्षाची ठेवणार. मुकुंदराव ठेगील वगैरे लोक येक दोन दिवस हुमनाबादेस होते. त्यास जाधवरावजीनी सांगून पाठविले

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कीं आमची आवस्ता या प्रकारची आहे तुमच्या चितास येईल तिकडे जावे. त्यावरून लोक आपलाले ठिकाणास जाताती. येणेप्रा नवाबाची इतराजी जाली आहे. * * परगणे त्यास राजश्री जगजीवनराव पिंगले यासी दिवाणगिरी देणार यैसे वर्तमान असे. वरकड वर्तमान राजश्री धोंडो राम याणी लिहिले आहे, त्यावरून निवेदन होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nilo Narsinha informs the Peshwa of the removal of Muzaffar Khan from the service of the Nizam and of the differences that had arisen between the Nizam and Ramchandrarao Jadhao.*

No. 166] [*4-4-1756?*

श्रीदत्तात्रय

श्रीमंत सद्गुणमूर्ति राजश्री भाऊ साहेबाचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक जीवनराऊ केशव साष्टांग नमस्कार अर्ज विज्ञापना ऐसीजें. येथील क्षेम तागाईत छ ३ रजब मुकाम बैजापूर धर्म स्वामीचा येथास्थित जाणोन स्वानंदलेखकास आज्ञा करावी. (साहेबांस) प्रार्थना ऐसी जें, रुकनुदौला बाहादर याणी पत्र या सेवकास होलार[1] जोडी मुजरद पाठविलें कीं उभाउभी येऊन भेटून जाणें. या सेवकानें उत्तर लिहिलें कीं आपण बोलाविलें हें वर्तमान हुजूर लिहितों. आज्ञा आलियावर अलबते येऊं. मागती तक्रारपत्र आलें कीं हुजूर लिहावें कीं खानांनी बोलाविलें आणि स्वार होऊन यावें. बाहादरदीलखानाच्या पत्राचा श्लेष ऐसा देखिला कीं नवाब सलाबतजंग शिऱ्याहून दाहा कोंस पलीकडे गेल्यावर श्रीरंगपट्टणवाल्याच्या वकिलानें पैगाम फिरंग्यांस विचारून सात लाख रुपये देतों ऐसा लाविला. ऐशा कितीक जाबसालामुळें शाहानवाजखान यांसी व फिरंगियांसी अंजुर्दगी[2] फारच जाली; परस्परें बद्धवैर जालें म्हणून फिरंगियांनीं सैदलष्करखानाकडे स्नेह लाऊन पत्रें लिहिली कीं आम्ही सर्वस्व तुमचे, तुम्ही कामांत येत असाल तर त्यासारखी तजवीज करूं. सदर्हू मजकूर श्रीमंत स्वामीस विनंती होऊन मर्जी कैसी आहे ते कळावी म्हणोन रुकनुदौलांनीं तुम्हास बोलाविलें, त्याजवरून स्वार होऊन शहरास गेलों. काय बोलतील तें अर्ज केला जाईल. रुकनुदौलाची निष्ठा कर्तुत्व वगैरे सर्व या सेवकानें विनंती केलेंच आहे. स्मरण असेल. उपर परगणे कुंभारी बत्तिसगाव * * * * सवालाख रुपये कुलजागीर दुतर्फकात पैकी कुंभारी

---

१ महार. २ नाराजी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वगैरेंतील गांव हिसे जागीर सरकारांत ठेऊन तेथील कमाविस राजश्री गोविंदराव बाबदेव यांसी सांगितली. तेथील जमाबंदी राजश्री नारो बाबाजीच्या विद्येमानें जाली. वसूल चाली लागला. विशेष प्रार्थना ऐसीजें. कसबें कुंभारी तनखा ४२०० पैकी रुपये १८५० सरकारांत बा सुभानजी थोरात व किले पठा यांसी रुपये ४१६ बाकी राहिले रुपये १९३४. हे मदेंच खानम म्हणून कोण्ही बायेको आहे ते कोठें आहे कोण जाणें (?). सारांश हेहि येकूणवीसशें चवतीस रुपये मधेंच आहेत. जप्त करून वसूल घेणें म्हणून गोविंदराऊ बाबदेव यांसी आज्ञापत्र सादर करणार स्वाम समर्थ. दुसरे परगणे कुंभारी येथें कुलजागीर दुतर्फकात गरीबगुरीबांस आहे. मोगलांचा फौजदार तेथें कोण्ही नाहीं, फौजदारी मधेंच जमीदार खातात तर तेथील फौजदारी सरकारची सबब कीं कसबा जागीर सरकारचा. यास्तव तेथील फौजदारीची सनद चिरंजीव उतमराव जीवनराऊ याचें नांवें सादर केली पाहिजे; व येक ताकीदपत्र जमीदारास कीं उतमराव यांसी फौजदारी सांगितली आहे तरी यांसी रुजू राहून फौजदारीचा अंमल सुरलीत देणें; व येक * * * * पत्र राजश्री नारो बाबाजी नामजाद यांसी सादर करावें कीं फौजदारीचा अंमल बसऊन जमीदारांस आणऊन फौजदारपट्टीची वाट करून उत्तमराऊ जीवनराऊ याचे स्वाधीन करणें. ऐसें आज्ञापत्र सादर करणार स्वामी समर्थ; व फौजदार मशारनिलेस रोजमुरा दीडमाही रुपये पंनास व दाहा प्यादे याची परवानगी सनदेंतच असावी. गाय कपिला उत्तम गरीब फारच मिस्किन[1] पाठविली असे. पावेल. गुलकंद मर्दबान[2] येक नवा रुबरु करविला, खास खर्चयोग्य असावासा आहे. पाठविला. नजर गुजरेल हें विज्ञापना.

¶*Jivanrao Keshav, the Peshwa's agent, writes from Baijapur of the differences that had arisen between Salabatjang and his French supporters.*

No. 167] [*20-8-1756*

श्री

श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्रीस प्रति कृतानेक आशीर्वाद उंपरी. येथील क्षेम छ २३ माहे जिलकाद मुकाम माहानगर जाणून आपलें कुशल लेखण करीत गेलें पाहिजे. यानंतर तुम्ही श्रीमंतासमागमें सोंदे बिंदनूरचे सरहदेहून स्वार होऊन गेलियांसी पत्र हस्तआक्षरें आलें नाहीं. याजकरितां चित्त सापिक्षित

---

१ गरीब. २ काचेचें मोठें भांडें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

असतां तुम्ही राजश्री हरबाजीपंताबराबर हस्तआक्षरें पत्र साकल्यें श्रीचें स्थलीं दाखल जालियाचें लेहून पाठविलें तें पत्रें पावतां चित्त समाधानातें पावोन भेटीतुल्यें लाभ होऊन आला. लिहिलें कीं नवाब पुढें कृष्णातीरास आले. तुम्हास जमसीचे तैनात गुदस्तांप्रमाणें केलें. त्यास तुम्ही कृष्णातीरास कधीं दाखल होऊन कृष्णापार कैसें जालें तें, अवघी मंडळी सुरक्षित आली किंवा काये वर्तमान, तें लेहून पाठवणें म्हणून लिहिलें. तरी आम्हास सैद फाझुलाखानाचे तैनात पछाडीवर मो केले होते. नवाबाचे समागमेंच पछाडीवर चालत येत होतों. येत येत रायेचूर पावेतों आलों. तेथें ठाणे न्यामदुलाखानाचें होतें. त्यांनीं किलियासी अटकाव केला कीं, सिबंदीची वाट करून किला घ्या. तेव्हां तेथें घालमेल पडली. सिबंदीचा दारमदार होऊन न्यामदुलाखानाचे लोक बाहेर काहडून बसालतजंगास रायचूरचें किलियांत शिरपाव होऊन दाखल करून नवाब कृष्णातीरास आले तों कृष्णेस पाणी आलें. तेव्हां तेथें सोळा मुकाम झाले. तमाम जागा बजागाचे टोंकरे[1] आनऊन तमाम मनसब(दा)रासहि येक येक टोकरा देऊन कृष्णापार अखेर रमजानीं जालों. आमची मंडळी सर्व सुखरूप उतरली. येक घोडा मात्र येक्या शिपायाचा कृष्णेमधे बुडाला. वरकड लोकाची खराबी फार जाली. कितेकाचे टोकरे बुडाले. घोडींहि फार कृष्णेमधें मेलीं. आगोधर फिरंगियावर व हाणवंतराऊ व खडांगले व आनंदराऊ निंबाळकर, भालेराऊ पांढरे यैसे आगोधर उतरोन मार्गस्त केलें. ते तातडीनें उतरलें. सबब त्यांचे टोंकरेहि दोन च्यार बुडोन लोकांची चीजबस्त बुडाली. माणसेंहि मेलीं. घोडींहि दो ती पथकांत दोन तीनशें बुडाली. ते कूच करून हैदराबादेवर आले तों फिरंगी गोसेमाहालांत उतरले होते. मऱ्हाटे जाऊन किलियाजवळ राहून भोवतालें फिरंगियासी उपद्रव करूं लागले. तेव्हां फिरंगियानींहि मऱ्हाटी-यावर येकदोन वेळां गाडदी फिरंगी पाठविले. रात्रीस शफखून[2] केला. मऱ्हाटे तळ सोडून उखलिले. कितेकांचीं घोडीं उधळून गेले. कांहीं फिरगियाचे हातीं लागलीं. कांहीं फिरंगी गाडदीहि मारले गेले, त्यांचीं शिरें हजूर नवाबापाशीं पाठवलीं. त्यास फिरंगी काहले (काईल ?) जाले कीं आतां आमचे पिछियावर उठलें. तेव्हां त्यांनीं रुमीखान दुभाषी दहावीस गाडदी शहरांत इब्राइमखा जाफर अलीखान दिवान याचा जावई नायब सुभेदारीवर होतां त्यास रुमीखान गाडदी जाऊन दस्तक करून द्या, आम्ही माणसें कांहीं कामास रवाना करितों, या बाहनियाने जाऊन येकायेकीं इभराइमखानास मारिलें. तेव्हां मारून चालिले तें समयीं रायेन्ना भुवणगीरवाला त्याचा लेक होता त्यानें रुनीखानास व गाडदी

---

१ टोकरा=नाव. २ छापा घातला.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मारून टाकिलें. इब्राइमखान मेलियावर शहर खालीं जालें. फिरंगी दुसरे कोणी गोशे माहालांतून निघोन शहरांत च्यार माहालांत जाऊन राहिले. मऱ्हाटियांनीं शहरांत जातां घालमेल फार केली. परंतु अवघियासी रेटून गेला. त्यास हैदरकुलीखान नायेब इब्राइमखां शहरांत नवाबाचे हवेलींत शेंदोनीशें प्यादे चालीस पनास भले लोकानीं राहिला होता. रात्रीस त्याजवर जाऊन पडलें. त्याची दाहावीस माणसें मारून टाकिलें. तेव्हां तो रात्रीसच पलून किलियांत आला. नवाबाचे कबिलेहि हवेलींत होते, तेहि किलियांत आले. शहरचे लोक कितेक मातबर होते तेहि कबिले व मातबर चीजबस्त घेऊन किलियांत गेले. कितियेक लोक शहरांत असतां फिरंगियांनीं त्याची खातरतसली[1] केली, कीं आम्ही रयेत लोकाचे वाटे हरगीज[2] जाणार नाहीं. तुम्ही अफरातफरी न होणें. आपला उदीमव्यापार करून राहाणें. त्याजवरून कितेक लोक फार करून शहरांत राहिले. फिरंगियांनीं दारू व तोफा मात्र जेथें जेथें चांगल्या होत्या तेव्हडें मात्र आनून आपनाजवळ ठेविलें. सरंजाम जमा केला आणि खायचा जिनस तांदूळ चणे, गहूं हरभरे, तूप, गूळ वगैरे सरंजाम पोख्ता पांचसाता महिन्याचा करून च्यारमाहालचें डागडोजी बुरूज तयार करून तोफां वरत्या चढविल्या दाद माहलावरहि मजबुती गढीवजा करून त्याजवरही तोफा चढविल्या. च्यार मनोरे याजवरहि तोफां ठेऊन मजबुती करून राहिलें. त्यास नवाब कृष्णा-तिरीहून कोस दोन कोस कूच करीत दरमियान मुकामहि करीत आले, कीं पोख्त सरंजाम मेळऊन शहरास दाखलच व्हावें म्हणून स्थिर स्थिर आले. त्यास मुजफरखां गाडदी यासी बोलाऊन आणिलें. त्यास नौकर येऊन हत्ती बैसावयासी देऊन गाडदी कसरकम हजार ठेविले व काहीं सेंदीडसें स्वार येथे सेही[3] करून कितेक प्रकारें त्याची खातीरतसली करून त्यास पुढें हैदराबादेवर रवाना केलें. ते येऊन लगट हौदावर उतरलें. माघून जाफर अलीखान दिवाणहि चौहजार फौजानसी रवाना केलें. तेहि किलियाजवळ उतरले. त्याजवरहि रात्रीस येऊन फिरंगियांनीं शबखून केला असतां जाफर अलीखानहि सावध होतें. लढाई परस्परें जाली. दाहावीस गाडदी फिरंगी मारलें गेलें. याजकडीलहि दाहावीस माणूस कामास आलें. उलटोन शरांत गेलें. मागती फिरंगी चौरोजा तयार सेंदोनसें व तोफा दोनतीन घेऊन मुजेफरखान गाडदी यावर येऊन दिवसा पडिले. मुजफरखानहि पायेउतारा होऊन लढाई बरी केली. तेव्हां त्यांनीं तोफा व गाडदी कांहीं दबा धरून बैसले होते त्याजवर नेऊन मुजफरखानास घातलें. तेथें मार मोठीशी फिरंगियांनीं देऊन मुजफरखानास पाडाऊ करावें येथवर येऊन बेतली.

---

१ समजूत, समाधान. २ बिलकूल. ३ नियोजित, बहाल.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तेव्हां मुजफरखानांनीं जाफर अलीखानास सांगोन पाठविलें कीं आपणांवर येव्हढी येऊन बेतली असतां तुम्ही मदत न करा तेव्हां आपण मारले गेलियावर खोमी[1] कोन्हाची होईल? तेव्हा जाफरअलीखानांनीं आपले फौजेनसी चालोन गेला. हजार फौजेसमागमें लडाईचे तोंडास गेला तेव्हां संभर स्वार जवळ राहिले तितकियानसी घोडे चालविले. खडांगळे निंबाळकर भालेराऊहि होते. त्यास मऱ्हाठियाचा हात न पोंहचा. खडांगलियाचे दहा हजार खासे मात्र तोंडीं लागले. त्याजमधें त्याचा पुतण्या कामास आला. दोनतीन घोडीं कामास आलीं. बळवंतराऊ तों निघाले. जाफरअलीखानानें जातीनसी फारसी केली. फिरंगी चाळीस पनास तें रोजीं मारलें, जखमी जाले. तेव्हां मुजफरखानाची खैर होऊन हेहि मुस्तकीम[2] आपलें जागा राहिलें. तेहि आपले जागां राहून ते गोशमहालाकडें गेले. हे आपलें लष्करांत आले. इतक्या लढाईत मोठी लढाई हेंच जाली. त्याउपर फिरंगी बाहेर निघाले नाहींत. शहर धरूनच राहिले. जाफर अलीखानाची हवेली शहरांत होती. चीजवस्त हती वगैरे जिनसांना फिरंगियानें लुटून आनिला. दारूशिसेंहि त्याचें हवेलींत फार सांपडलें. त्यास दारूचा सरंजाम फिरंगियांनीं नानायुक्तीचा करून ठेविला कीं जे समयीं शहरावर हला करितील ते समयीं दारूचे सरंजामाखाले लस्कर उडवावें यैसा करून बसलें. नवाबहि कूच दरकूच सरंजाम जागाबजागाचा मेलऊन कारनोलकर पठाण मुनवरखा त्यास तसलीचे[3] कागद पहिली तकसीर[4] माफ करून त्यासहि आनिलें, तोहि च्यारशें जमाव आहे. कृष्णेस पाणी फार यामुळें सरंजाम त्याचा पोख्ता आला नाहीं. वरकड पालेकरी लोकापली आला(?). सेंभर स्वार दोनतीनसें प्यादा घेऊन आले. गुडमटकलवालाहि सेंपनास स्वार व पायेदळनसी दाखल जाला. गदवलवालियाचा दिवाण दीडसें स्वार च्यारसें प्यादां यैसे तेहि आले. ते मुजेफरखानासमागमेंच आगोधर शहरावर रवाना केलें होते. त्याचीहि मानसें घोडीं लढाईंत जायां जालीं. परंतु त्याच्यानें आंच घेवली नाहीं. निघाले. वरकड शंकरमा मेदकवालियांनीं हफशी सुरतेहून यासी मदत येत होते ते संकरमानी व आनंदराऊ निंबाळकर व पिंगळे वगैरेयांनीं त्यास घेरून कैद करून घेऊन येथें आले. राजश्री दाजीबा सरगंधी ते संवासें स्वारानशीं येऊन पोहोचले. तसेच आजेराद खंदारवालाहि सेंभरसवासें स्वार घेऊन पोहोचले. पिंगळेहि संभरस्वारानिसी आले. नांदेडवाला मोहतसलाखान दीडसें स्वार दोनशें प्यादियांनीं छ २२ जिलकादीं येऊन दाखल झाले. नरसिंगराऊ रा॥ रामदासपंताचा

---

१ कमीपणा, नुकसान. २ भक्कम; कायम.
३ खातरजमेचे. ४ दोष; चुकी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भाऊ निर्मलेहून तेहि छ २३ रोजीं संभर स्वार व च्यारसें प्यादियांसी येऊन दाखल जाले. नवाबहि छ ७ जिलकादीं किलियाजवळ येऊन राहिले. काम कारभार आजीपावतों शहानवाजखानीचा आहे. परंतु मुख्यें त्याचें नावें श्रमी आहेत. शामराऊ व भिवराऊ श्रीमंताचे तर्फेनें फिरंगियास पोहोचाऊन भागानगर सरहदपार करून त्यांनीं फिरावें. त्यास तेहि नवाबास लिहिलें कीं आम्हास श्रीमंताची आज्ञा होती. फिरंगियासी पार करून नवाबाची चीजवस्त घेऊन त्यास पलीकडे रवाना करावें या उद्देशें बराबर त्याचें दिल्हें होतें. परंतु फिरंगी बेइमानीस आलें. सरकारची चीजवस्त देत नाहींत. शहरांत दाखल जालें. त्यामुळें आपण स्वार होऊन श्रीमंतांकडे गेलें यैसें लिहिलें होतें; परंतु ते फिरंगियांचें मिलनीमधें होते. कांहीं घेऊन नवाबास जाहीरा या प्रकारचे लेहून उठोन गेले. मऱ्हाठियांनीं त्यास लुटून घ्यावें, मसलत केली होती. परंतु आनंदरायानें मना करून त्याजसें[1] काहाडून दिल्हें हें वर्तमान परस्परें तुम्हांकडेंही आलें असेलच. शामरायांनीं फिरंगियास सामील जाले नसते तरी इतका बखेडा न वाहाडितां. नवाबास तों भासलें कीं हा फितूर श्रीमंताकडून वाहाडिला. नाहीं तर फिरंगियाची काये मजाल होती? याउपर नवाब रोजबरोज चहूंकडील जमाव मेलऊन सिडिया तयार करून येकदां हला करावी, या मनसुबियांत असतां येकायेकीं वर्तमान आलें कीं फिरंगियास मदती मुसा लास बंदरीहून अकरासें फिरंगी व गाडदी येत व तोफांही च्यार पांच बराबर आहेत. तेव्हां यांनीं तमाम पालेकरास लेहून पाठविलें कीं ज्याच्या सरहदेतून येतील त्यास तंबी करून मारून घेणें. त्यास ते पालेकरासहि नेटून युद्ध करीत येथून चालीस कोंसावर आले यैकून येथून खडांगले व भालेराऊ व मुजफरखान गाडदी व हमीदुलाखां व मीरमुक्तजांखां किलेदार बेदर व हिसादुलाखां किलेदार उदगीरवाला यैसें पुढें पाठविलें. त्याची याची गांठ पंचवीस कोंसावर पडली. याची त्याची झटपट होत होत बोलाचालीवर आले. इकडील फौज गेली, त्यानी त्याच्या येक दोन तोफां सोडविल्या, कांहीं बुनगेहि लुटिलें, कांही गाडदी फिरंगीहि दाहांपांच मारिलें. कांहीं गाडदी मुसा लासाकडील उठोन मुजफरखानाकडे सें दोनसें आले. इतकें होऊनही मुसा लास रेटीतच चालिला. तेव्हा येथें सुतरस्वार रोजबरोज खबर घेऊन येत होते. तेव्हा मागती येथून सरंजाम आनखी आनंदराऊ निंबाळकर हफशी धरून घेऊन आलें. त्यास हफशी किलियांत कैदेमधें ठेविला. मग राऊ मजकूर व शंकरमा जमीदारीन मेदकवाली व पिंगळे व सिंदे व हके व नवाबाचा बक्षी रिसालदार दोनतीनशें व मकरंद नाईक निंबाळकर यैसें रवाना केलें,

---

१ त्यासच.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

छ १४ जिलकादीं येथून रवाना केलें. ते रोजीं हायातगिरीं राहिलें. दुसरें रोजीं छ १५ जिलकादीं सगरवम तेथें गेलों. तो फिरंगी तेथून चौ कोसांवर मलकापूर गावगढी होती, त्यांत जाऊन शिरला. दोन रोज गढीमध्यें दम धरून राहिला. भोंवताले मुजफरखां व खंडांगले वगैरे पुढें पाठविलें. ते घेरा देऊन बैसलें. इकडून फौज निंबाळकर वगैरें गेलें, ते नजीक मलकापूर घांटतोंड धरून बैसलें. तिसरें रोजीं फिरंगी गढींतून निघोन घांटतोंडावर आला. तेथें लडाई मोठी जाली. त्यांचा मार तोफांचा व बंदुखेचा अतिशय. लोकांस आंच न निघे घांट उतरोन आला. इकडून घांटतोंडीं लोक निंबाळकर वगैरें बैसले होते. तेही तयार होऊन आड व सन्मुख जाले. पछाडीवर खंडागलें भालेराऊ व मुजफरखां वगैरें जालें असतां त्यांनीं डोंगर धरून चालिलें. डोंगरावर शेलार याचे लोक प्यादे चहडून आडीव मार दिधला आणि मार्गहि धानबाड्याचा खुला होता यामुलें माघारें फिरून रस्तियाचें मार्ग जालें तें समयीं जाणोजी निंबाळकर वगैरे फौज सन्मुख होत्या. यांनीं जीव चालऊन घोडे घातलें असते तरी फिरंगी मारले गेले होते. लोकांनीं तोफाचे मारामुळें व बंदुखांचे मारामुळें हैरनिया (?) करीत परंतु तोंड लागेना. दर हैरनीस दाहावीस मानूस जखमी होये, घोडीं जखमीं होत. परंतु फिरंगी तोंड लागो न देत. तेंव्हां लोकांनीं मारामुळें कदर खाऊन सन्मुख होते ते मार्ग सोडून येकीकडे जाले. त्यास रस्तियाचा मार्ग सांपडला. ते रस्तियानें तोफेचे मार लोकांवर देत रेटून ह्या नगरांत दाखल जाले. लोक तोंड पाहानारच राहिले. यामुळें मऱ्हाटे लोकांची अपकीर्ति मोठीसी जाली. संकरमा मेदकवाली याच्या लोकांनीं डोंगराकडून मार देऊन फिरंगियाचे मोहर माघारां फिरविला आणि फिरंगायाचा सरदार दोशां जमावाचा होता तो धरून आणिला, यामुळें मेदकवालीचा नक्ष जाला. मेदकवालियास नवाबांनीं फारसें नवाजिलें. फिरंग[1] व शिरपाव दिधलें. फिरंगी ह्या नगरांत दाखल जाल्यावर हैदराबाद तेथून च्यार कोंस राहिली. त्यास मुसा भुसीनें पांचसे फिरंगी गाडदी व तोफां च्यार त्यास मदत पाठऊन शहरांत घेऊन आले. मऱ्हाठे वगैरे लोक मनसबदार तोंडें खाली करून लस्करांत येऊन दाखल जाले. यैसी गोष्टी जाली. यामुलें तमाम मऱ्हाठे लोकांचा इतबार नवाबापासून गेला कीं, येव्हडें नामी लोक असतां च्यारसें फिरंगी मारून घेतलें नाही तर पुढें मातबर कामें यांच्यानें कैसी होतील ? येथे नवाब सेर दरबार खोजे मोमीनखानास नांदेड दरबारचे परबणीचे आमीलाचा सिरपाव छ २२ जिलकादी जाला. छ २३ जिलकादीं

---

१ तलवार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

माहारावाची आनिखी फौज च्यारसें आली. आगोधर लोकांनीं बलवंतराऊ देखील राहू देतील. फौजा जूज राहिल्या आहेत. कलावें.

¶*This may possibly be a letter from Govindrao Patwardhan to his son Gopalrao. This important despatch describes in detail the hotly contested battle of Char Minar, outside Hyderabad. Bussy, dismissed by Salabatjang, took up a strategic position from which the combined efforts of the Nizam and the Marathas failed to dislodge him. The Peshwa's object was to get Bussy dismissed from the Nizam's service, so as to employ him himself. The Marathas were greatly impressed by the effect of Bussy's trained artillery at this battle, and this had subsequently a fatal influence upon their tactics at Panipat.*

No. 168] [*31-1-1757*

श्री

विज्ञापना छ १० जावल मंगलवार नवाब सलाबतजंग व नवाब निजामआलीखां सा घटका दिवस चंहडल्यावर स्वार होऊन चालले. लष्करहि तयार जाले आहे. बहीरहि[1] चालली. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*A despatch announcing that Nawab Salabatjang and Nizam Ali Khan moved on during the morning.*

No. 169] [*11-2-1757?*

श्रीलक्ष्मीकांत

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक जयेराम गोपाल कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता माघ वद्य सप्तमी मुा नजीक दारव्हे प्रांत वराड स्वामीच्या कृपावलोकने-करून अनंदरूप असों विशेष. इकडील वर्तमान तरी स्वामीची आज्ञा घेऊन राजश्री यजमान वराड प्रांतास आले असेत. नवाब सलाबतजंग ते प्रांतीहून गंगातीरास आलियावर मऱ्हाटे लोक जमा करून माहुर प्रांतास आला आहे. इकडे यावयाचा दबाव घातला आहे. राजश्री येजमान सैन्यसहवर्तमान सिधच आहेत. परंतु राजश्री सैदलष्करखान व राजश्री जानोजीराव निंबालकर मध्यस्त आहेत. त्याणी राजश्री अपाजीपंत दिा सैदसरीफखान हे सौरश्य करावयास पाठविले आहेत. बहुतेक सौरश्य होईल. सर्व प्रताप स्वामीचा आहे. येणेकडून

---

१ बाजार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राजश्री यजमानाचेहि ऊर्जित आहे. यावर वर्तमान होईल तें मागाहून सेवेसी लेहून पाठऊ. सदैव सेवकास आज्ञापत्रीं सांभाळ करणार स्वामी समर्थ आसेत. विशेष काये लिहिणें? कृपावृधि केली पा हे विज्ञापना.

¶*Jayram Gopal from Janoji Bhonsle's camp to the Peshwa, reporting the intended aggression of Salabatjang and the negotiations started at the same time for a reconciliation.*

No. 170] [*23-3-1757*?

श्री

पु॥ श्रीमंताचे सेवेसी विज्ञापना

शेरजंग रा॥ मोरोपंत व रा॥ धोंडोराम अवरंगाबादेस पावले. शेरजंगाकडून शुतरस्वार छ २ रजबीची पत्रे नवाबाचे नावे व रु(क)नुदौलाचे नावे घेऊन आला होता. त्यांत मजकूर कीं, उभयतां श्रीमंताची आज्ञा घेऊन आलो. लष्करासही(त) सत्वरी येतो. श्रीमंत तुम्हासी फारच निर्मल जाले. ते व आम्ही ज्याप्रो॥ श्रीमंतास पल्यावर आणिले आहे त्याप्रा॥ तुम्ही मसलतीचे रोखावर लवकर विना अनमान अविलंबे गेलिया केल्या सार्थकाचे फल असे. तरी जल्दी केली पाहिजे. जर समय चुकला तर गोष्ट येके प्रकारची दिसोन येईल, येणे प्रा॥ लिहिले होते. प्रस्तुत नवाबहि गलबल तर फार करीत आहेत. हे विज्ञापना.

¶*Letter addressed to the Peshwa reporting that Moropant and Dhondoram have advised Ruknudaula to be friendly with the addressee.*

No. 171] [*23-5-1757*

(पहिली ६ पानें नाहींत.)

* * * रे उमदे बरयाब जाहले. कागद दसखत केले. जाबसाल करून दीड प्रहर दिवसा बरखास्त पेशखाना जसवंतचे तळ्यावर होता तो इदग्यावर आणविला. दौलताबादेस सयरेस[1] जाणार. आखररोज घटका दिवस राहतां खिलवतेत आले. हकीम अबदुल लतीफखां व मीरकवामुदीखा दरयाब जाले. जाबसाल करून पांच घटका रात्री बरखास.

छ ३ रमजान रविवार प्रहर दिवसा खिलवतेत आले. हाजी हुसेनखा व अफजल बेगखां व हकीम अबदुल लतीफखां व हकीम मालजखां व फकरुदी

---

१ सहल, पाहाणी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
हुसेनखां व मीरकवामुदीखां बरयाब जाले. जाबसाल करून दो प्रहरा बरखास्त. आखररोज साहा घटका दिवस राहतां स्वार जाले. स्वारी हतीची शहानवाज-खानाचे घरास गेले. शहानवाजखान दरवाज्याबाहीर येऊन घेऊन गेले पांच मोहरा नजर केली. दोन घटका बसले होते. दोन घटका दिवस राहतां तेथून निघाले ते नवाब बेगम नासरजंगाची बाईको तिच्या घरास गेले. नवाबानी बेगमेस सात मोहरा नजर केली. घटका रात्री तेथून निघाले ते दोन घटका रात्रीं आपले हवेलीत दाखल जाले. दौलताबादेच्या किल्याहून दिलावरजंगाची अर्जी आली ते गुजरानली. त्यावर हुकूम जाला कीं पेशखाना दौलताबादेसहि जाये व राज्यासहि जा ये.

छ ४ रमजान सोमवार प्रहर दिवसा खिलवतेत आले. अफजल बेग व हकीम अबदुललतीफखां व मीरकवामुदीखां व फकरुदीहुसेनखा बरयाब जाले. जाबसाल करून दीड प्रहरा बरखास्त. *

¶*Daily report from the court of Salabatjang, forwarded to the Peshwa.*

No. 172] [*16-6-1757*?

श्रीराम

श्रीमंत महाराज राजश्री स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक येशवंतराये पुरुषोत्तम साष्टांग नमस्कार विनंती उपरी. छ २४ रमजानचें आज्ञापत्र सादर जालें कीं मोगलाईचें अमिलानें बेडीचे आबियानिमित्यें चढून येऊन कजिया केला. सरकारचीं घोडीं माणसें जायां करविलीं. त्यांचे पारपत्ये करणें किती? परंतु लहान गोष्ट, कलह दीर्घ, प्रयोजन काय? यास्तव दर्गाहिकुलीखान व शाहनवाजखानाचा पुत्र व मुरादखानास पत्रें देऊन उत्तम प्रकारें सांगोन पुढें कलह न वाढे व लबाडी न करीत, परिछिन्न करणें, ऐसें असतां कलह वाढला तरी समजोन घ्यावें लागल, व सरकारचे कमाविसदारांस उत्तम प्रकारें ताकीद केली असे. ते कजिया करणार नाहींत. तुम्ही चांगली ताकीद करून सविस्तर उत्तर लिा ऐसें सादर जालें तें छ २८ रमजानीं पावलें. नसीरजंग व मुरादखान यांस सांगितलें. हे मरजीवेगळे नसेत. उदयीक दरगाह कुलीखानाचें येथें फड घालून चांगली ताकीद करून विनंतीपत्रें सत्वर पाठवितों, व घोडियाचे रुपयाचे अनुसंधान सेवकानें अगोधर लाविलें व बहुत कायम केलें कीं घोडियाचे रुपये देणें येतील, सुटणार नाहींत. परगणा देईल, परंतु सांप्रत्ये

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अखरसाल जालें. सुरूसालीं समजोन घेऊं. आतां गोशगुजार[1] करून यांचे अंगीं शाह लाऊन कलह निवर्त करविला. दरगाहकुलीखानाकडून व आज्ञाधारकानें विनंतीपत्र लिहिलें, कासिदांबरोबर पूर्वी पाठविलें पावलें असेल. येथें काय सत्ता आहे कीं कळ वाडवीत व दुसरी गोष्ट केलियानें परिणाम कोणता? शहानवाज-खानाचे[2] पुत्रास उफराटें भयें जालें आहे कीं येखादी उपाध आंतर केलियास न यावें. वकील मुत(ल)काचे जागीं दुवार कलह वाढला आहे. आपल्यास लाभच आहे. अबदुल येहीखानानें लष्करांत पितियास[3] लिहिलें आहे. आम्हांस म्हणों लागला कीं तुम्ही भलते प्रकारें यैसें करा कीं नारोपंताखाले आमचा तालुक न राहे ऐसा मनाचा संकल्प करितात. ताजाकलम. प्रातःकालीं वर्तमान आलें कीं श्रीमंत दादा व सुभेदार मंजसौरेस[3] पावले. आतां जोडी पांचा दिवसांची नरमदेची आली कीं अवतार[4] कोंस पलीकडे आलेत सेवेसी कळावें. नवाब सलाबतजंगाचें छ १६ कूंच जालें. रमजानची ईद हैदराबादेस करितील. हे विज्ञापना. आणिख कितीक साकल्यें जीवनरावजीचें पत्रावरून अर्ज पहोंचेल. हें विनंती.

¶*Yashvantrai Purushottam, Peshwa's news-writer, reports some occurrences at the Court of Salabatjang and his movements.*

No. 173] [*12-10-1757*

श्री

पो छ २९ मोहरम शुक्रवार प्रहररात्र आवसीची

चिरंजीव राजश्री राव यांसी बालाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहींत जाणे विशेष. नवाब सलाबतजंग व निजाम अलीखान व बसालतजंग यांस बलवंतराव गणपत यानी कडपेकर मारला, फते केली, येविसीची पत्रे पाठविली आहेत. त्यास पावती करावी. मुसा लास दोन हजार गाडदियानसी बिडाजवळ आला अशी खबर आहे. परंतु येईलसे वाटत नाहीं. याचीहि बातमी ठीक राखणें. येत असले तर येऊन पावते करणे. मुसा बुसीचीहि बातमी फारच राखावी; याउपरी हे अथवा जाधवराव आदिकरून कोण्हीहि येईल त्यास तेथे मिलोन घ्यावे ऐसे केले पाहिजे. छ २७ मोहरम हे आसीर्वाद.

¶*Vishvasrao is asked to forward the letters of the Peshwa addressed by him to Salabatjang and his brothers, conveying the news of the death of the Nawab of Kadappa, at the hands of Balvantrao Ganpat.*

---

१ पुरावा. २ शहानवाजखान.
३ मंदसोर. ४ दशावतार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 174] [*31-10-1757*

श्री

सेवेसी विनंती. येथील वर्तमान तागाईत छ १७ सफर सोमवार च्यार घटका रात्र पावेतों येथास्थित असे विशेष. निजामअलीचा मजकूर काल विस्तारें लेहून सेवेसी पाठविलाच आहे. काल सडे जाले आहेत, त्याप्रमाणें अद्याप सडेच आहेत. जाधवरायाचे कुमकेस गेले नाहीं. जातील न जातील पाहावे. राजश्री जीवनराव केशव यांणीं सरकारच्या जागिरीची व शाहानवाजखान याच्या जागिरीची याद पारसी त्याजवर दसखत बसालतजंगाचें हातचे करून घेऊन आज संध्याकाळीं येथें आले. शाहानवाजखान यांजकडे आबाड[1] लिहिलें नाहीं. किरकोळ माहाल लिहिले आहेत. मशारनिलेंनीं यादी आणिल्या त्याच सेवेसी पाठविल्या आहेत. याप्रमाणें सनदा होतील. शाहानवाजखान यांची जाहागिरी यांणीं लिहिलियाचा वसूल येथें कळणार नाहीं. स्वामी तेथेंच मनास आणतील. यादी पाठविल्या आहेत. याच यादी सत्वर येऊन पावे ते केले पाहिजे. हें विनंती. येथील वर्तमानाच्या अफवा तेथें जनचर्चा मनास येईल तशा उठतील. यास्तव जे वेलेस जसें बातमीच्या पत्रावरून आढळेल तैसें सेवेसी लिहितों. जाधवराव सिंदखेडीच गांवाचा आश्रा धरून आहेत. संताजी वाबले व राणोजी भोईटे भोंवतें उभे आहेत. जुंजही त्याचे जालें म्हणून वर्तमान आहे. तेथून पत्र आलें म्हणजे सेवेसी लिहू. शाहानवाजखान याची याद जीवनराव यांनी आणिली, परंतु त्यास गांव परगणें कांहींच लाविले नाहीत. सनदा होत्ये समयीं नावें लागतील.

¶*News-letter to the Peshwa reporting that Nizam Ali is making ready for the battle and that he is not proceeding to relieve Jadhavrao.*

No. 175] [*4-11-1757*

श्री

विनंती उपर. येथील प्रसंगीचे वर्तमान छ २१ सुकुरवार दोन प्रहर मुकाम जसवतचे तले (ल) स्कर निजामआलीखां प्राथःकालपासून कुचाचा मजकूर व्होता. इभलाइमखा गाडदी दिडा प्रहरानी निजाम आलीखानाचे डेरियास आले. दोन घटका मसलत जाली. मग मुकाम केला. झेंडे उभे राहिले. आज तो कूच व्होता दिसत नाही व बसालतजंगहि याचे डेरियास आले नाहीत. आन

---

१ अंबेड.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आणखीही कोन्ही दरगाहकुलीखा वगैरे कोन्ही आले नाहीत. मीरसैदू कोतवाल मात्र आला व्होता. कही गेली. पलसीच्या डोगराकडे गेली. कळावे म्हणौन लिा आसे. बहुत काये लिा विज्ञाप्ति. फौजेची गणती व दाणियाचा निरख पाठविला आहे. कळावे म्हणौन लिा आसे विज्ञापना.

¶*The letter reports the movements of Nizam Ali and his officer Ibrahim Khan Gardi.*

No. 176] [*14-11-1757*

श्री

चिरंजीव राजश्री लक्ष्मणपंत नाना यांस प्रति रामचंद्र कोनेर आशीर्वाद उपरी. येथील कुशल ताा कार्तिक शुद्ध त्रितीया पावेतो मुा ठाणे पातूर क्षेम असे विशेष. तुम्ही पत्रे पाठविली व श्रीमंत साहेबांचे पत्र खास दस्तुर पुंर्जा[1] पाठविला. त्यांत आशयें कीं, येकनिष्ट भाव लिहिता तैसा प्रत्ययास आला पाहिजे. तर श्रीमंत साहेबी मजला येथे स्थापिले. हे सरदारी मातबर पंधरा सोळा हजार फौजेची, आणि मोगलाचा बिघाड. श्रीमत रावसाहेब आज दीड महिना जाहला टोंक्याचे मुकामास येऊन, पत्रेंहि रावसाहेबाकडील व श्रीमंतसाहेबांकडील दाहां पाच आली. प्रसंगास मी चुकवावे, न यावे, तमासा पाहावा, हा प्रकार श्रीरामचंद्र जाणे. मी काय करावें. अधिक शुधांत नागपुरींहून निघालों ते द्वेषेंकरून मलई[2] इमान प्रमाण करून तीन कोंसावरून माघारें नेलें, साडे सात लक्ष रुपयाची निशा करून घेतली. सिवाजी केशव च्यार लक्ष व त्रिंबकजी राजे याणीं इा बावांचा समागम ताा आजवरी व्याज मनोत्या दाहा दाहा वर्षांच्या बंगाल्यावर ऐवज श्रीमत केलासवासी याणी व्याजाचा वगैरे देविला होता तो मलई करून निशा करून घेतली. ऐवज नाहीं तेव्हां आपले पुंर्जे[3] सावकाराचे येथून काढून मी जातीचे पुर्जे लेहून दिल्हे. जर जातीचे पुर्जे लेहून न देतो तर आबरूवर गुजरती. निदान जिवावर गुजरती. मागें वडिलांनी हें कर्मे केली नाहींत ती मजल प्राप्त जाहली. इतकेंहि सोसून जातीनें न आटकतों; परंतु सर्वाची मलई. निश्चय हाच जाला कीं मी समयांस श्रीमंत साहेबांकडे न पावावें, यश न घ्यावें, बदनाम व्हावे, मोगलाचा मिलाफी ऐसीं पत्रे वकिलां हाती लिंहिवावीं; दोन वस्त्रें मात्र खर्चावी लागली म्हणजे पत्रे लेहून देतात. हा सर्व प्रकार ध्यानास आणून जातीवरच कबूल करून आश्विन वद्य ७ गुरुवारी निघालों. येकदां तो येऊन च्यार कोस शहर सोडून आलों.

---

१ पत्र. २ बोली? ३ खतें, पत्रें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
ते दुसरियांने फिरोन कजिया गाडदी फिरंगी सिपाई मिलोन कुरापत करून आबरू घ्यावी, तेव्हांही फिरोन गेलों. तेव्हां श्रीमंतापासी त्रिंबकजी राजे कुल येख्ययारी करून कारभार त्यांचे स्वाधीन करून लक्ष श्रीमताचे कृपेवर धरून निघालों. तेच रोजी बारा कोस व्याहाडास येऊन मुा केला. नागपुरांत होतों तेव्हां वराडची फौज रघोजी करांडे व जाचक मंडली व गावडे मंडली व दादजी पवार व मानापा सिरगिरे व आटोले हे समजाविले; आणि तयारी करितां वराडांत पंधरा रोज निरोप देऊन बिदा केले होते. आम्ही व्याहाडचे मुकामीहून आठरा कोंसाची मजल करून वरधा उतरलों. तमाम लोकांस ताकीद केली. दिपवालीचा मात्र उजूर. त्यास सोळा सोळा कोसाच्या मजली करून पातुरास आलो. आतां नागपुर येकदांचे सुटले. त्यास चिरंजीव येशवंतराव श्रीमंत रावसाहेबांकडे दीड हजार फौजेसीं वराडीत तयार होते तितके पत्र येतांच रावसाहेबांकडे गेले. मागाहून गावडे सातसे स्वार समजावीस करून लावून दिल्हे ते दाखल जाहले असतील. त्यास आतां या आटा रोजांत पांच हजार फौज श्रीमंत रावसाहेबाकडे चिरंजीवास पाठविले तेथें पाठवितो. आणि दाहा बारा हजार फौज जमा करून श्रीमंताची आज्ञा मागें आली होती कीं मुसा भुसी भागानगराकडून येतो तिकडे जाणे. तर आज्ञा आली तर तिकडे जाऊं; नाहीं तर हाहि जमाव घेऊन रावसाहेबांकडे जातों. यंदा वीस हजार फौज धरिली. इतके कजिये जिवावरील गुजरले, परंतु फौज तयार जाली. जर श्रीमंताचे पाई माझी निष्ठा यथास्थित आहे, तर मोगलाचा तह श्रीमंत साहेबाचे खातरख्वाह करून घेतो. दताजी सिंदे व हा जमाव वीस हजार पावेतों, यासिवाय हुजुरात वगैरे फौज आणीक आहे. मोंगलासी पंधरा रोज मात्र दुरून दुरून बोलावे. पंधरावे रोजी पातुरांतुन निघतो. आलीकडे पांच हजार फौज पाठवून देतो. मागाहून देसची फौज पांच हजार व वराडचीहि जमा करून आज्ञा येईल तिकडेस जातो. मजवर द्वेषिकानीं उपद्रव मोटा केला, नाहीं तर मोगलाचा कजिया दीढ महिना दोन महिने जाले लांबला आणि मी न यावें हे श्री जाणे. काये गुजरली असेल, दोन वर्षांचा कसाला, लोकांच्या समजाविसी, पुण्याचे साहुकार व वरकड साहुकार व वराडची दोन वर्शांची समजावीस नव्हती व इतकें आसोन पांच सात माणूस अगदीं वाइटावर कीं मजला यश न यावें, मी बदनाम व्हावे. परंतु माझा देव श्रीरामचंद्र. मी त्याचे आर्जव येथास्थित जीवापासून केले असले तर हे वेलेस मोगलांसी हे इतकेहि लोक साहेबकामावर घालून श्रीमंताचे मर्जी प्रा तह आवरंगाबादेचे भोवते परगणे करून मोगल देतो. वोढीकरितां व पेंचाकरिता च्यार रोज आधिक लागले

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

इतकाच आपराध दिसून आला; आणि निजामअलीने ग्रहस्तपण केले कीं इमान प्रमाण कुराण देऊन श्रीमंतासी स्नेह तुमचे मध्यस्तीने स्नेह करितों, तुमच्या समागमे श्रीमंताकडे भेटीस येतो, आणिक कितीक प्रकारच्या गोष्टी बालोन भरोंसा जाला, त्याजवर वराडचे फौजेचे खासेखासे सरदार समजाविसी करितां नागपुरास घेऊन आलो. पाऊस मागें आपण आलजपुरी तयार जाला, गाडदी बोलावून निघाला, बालापूरचे मुकामापावेतों मायावींच उत्तरे लेहूं लागला कीं मी सिबंदीकरितां निघालों, जाणे घडत नाहीं; तुमसी बोललो तोच कर्तव्यार्थ मजला आहे आणि घाट चढोन गेला. नाहीं तर करांडे व पवार जाचक यांनी लुटून मोकळा केला होता. तो आतां जाता ऐसे नव्हते. थोर थोराचा लेक, क्रिया असफज्यांचे घरीं लटकी नव्हती. बरें त्यास तो शहरास गेला आणि चौघे जण लिहीत गेले, लटकी लबाडीची पत्रें, ते निजामआली शहरास गेला आणि लिहिणारांची पत्रे श्रीमंतास खरी भासलीं, तर हजार प्रकार येकाच प्रकारांत आहेत, कीं श्रीमंताचा प्रताप भारी आणि मी जीवाभ्य श्रम करून लोक जमा करून निघालो तर वर्तणुकेत घडेल तें खरें. परिहार किती ल्याहावा! पुढें फौजेचा पैका काय होईल, ऐवज किती, दशा काय करतील, हे फिकीर तिळतुल्य धरत नाहींत. श्रीमंत धनी. यास पुढे कलेल तैसा निर्वाह करितील; परंतु येकदा करून दाखवीन. लेहून सार्थक नाहीं. या पंधरा रोजांत पातुरांतुन निघतो. आज्ञेची प्रतीक्षा रावसाहेबांकडील आज्ञा कैसी येते, भागानगर तर्फेस जाणे किंवा रुबरू बोलावितात? भागानगर प्रांतात मुसा भुसी दूर आहे. तूर्त येथे सर्व साहित्य अनकूल आहे. येथील गुंता उरकल्यास तो येऊन काय करितो? त्यास आज्ञा येईल त्यासारखी वर्तणूक होईल. चहूकडून बदनाम केले हा प्रकार श्रीरामजी माझे निष्ठेसारिखे मजला फल मिळेल. येक तकवा मजला—श्रीमंताचे पाय किंवा देव, नाहीं तर आमचे येथील रीत चौघांची वगैरे सर्वहि दोन वर्षांत येक येक माणसाची कळली नाहीं येसें नाहीं. जिवावर जातीवर जेथवर करावयाचे तेथवर अंतर केलें नाहीं. आतां नागपूरचे पेचांतून सुटलो. श्रीमत यजमान शरीरें बहुत श्रमी, भेरगी[1] उतरला आहे. दुष्ट ग्रहबाधा फार आहे. ईस्वर आरोग्य करील. सिवाजीपंत सेटिबा खराडे मात्र नागपुरी आहेत. तेहि ऐवजाची निशा करून तयार जाले. मागाहून येतील. येंदा[+]ची रीत केवल प्राणासी आबरूसींच पडली. गुंता भारी जाहला. तिकडील सेवेसी जरूर जरूर येणे, याजकरितां ज्याने जे केले ते सर्व कबूल करून निघालो. भलतीसीं गांठ तोडून कर्जदार व कितेक सिलेदार वगैरे देणेदार

---

१ वृषणाची सूज.

+ येथून अक्षर वेगळें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
कितेक होते ते एकीकडे ठेवून श्रीमंत राजश्री रावसाहेबांकडे लोक रवाना करितो. आम्हास आज्ञा येईल तैसे करितो. राजश्री त्रिंबकजी भोसले राजे मुख्य कारभारी करून निमित्यास च्यार दिवस त्याचे मर्जीकरितां चिरंजीव बाळोबा ठेविले आहेत. समागमे आणीत होतो त्याचे मर्जीकरितां ठेविले आहेत. परंतु येकदाचा सुटलों आहे. श्रीमंतास बरे फार वाटत नाहीं. भेरगा उतरला असे. परम्याची वेथा. पथ्य करीनात. भाऊ भाऊ मराठा धर्म श्रीमंतास व सर्वांस कलतच आहे. आम्हांस श्रीमंतानी म्हणून नागपुरांतू(न) काढून लाविलें. श्रीमंताची पुण्याहून सर्व सरदारास वगैरे पत्रे येतात तित्के मीर[1] पीर होतात. कांहीं प्रकार बरा नाहीं; परंतु तूर्त चाकरीवर हरइलाज करून लोक जमा करून फौज पाठवून देतो. श्रीमंत रायाची पूर्वी येक दोन पत्रे आलीं व हाली आली जे मुसा भुसीकडे जरूर जाऊन गांठ घालावी. गंगातीराकडे व आम्हाकडे फौज व मातबर सरदार रवाना करणे. हली त्याकडे फौज रवाना केली. मागती रातचा दिवस करून लोक जमा करितों. रावसाहेबांचीं आज्ञा येईल तिकडे जाऊं. जवलच काम पडेल तिकडे जाऊ. जेसी आज्ञा होईल तैसें करूं आमचा अभिमान सर्व श्रीमंतास आहे. आबरू त्यांची; आज्ञाधारकपणा करून आज्ञेप्रमाणे वर्तावे हाच विचार आहे. दुसरे होणेच नाहीं. तुम्हीं श्रीमंताचे मर्जीप्रमाणे वर्तणूक करीत जाणे. तेच मायबाप वडील तीर्थरूपांचे जागा आहेत. याजखेरीज आम्हांस गत नाहीं. सरदारी ओढगस्त कोठवरी तोड जोड माड (मोड ?) करूं. श्रीमंत कैलासवासीनी आम्हीं पांच चार वर्षे येथें नसता सारेच कारभारी. हाली सारेंच मीर पीर कोठवर रक्षूं. श्रीमंताचे व श्रीचे कृपेने उत्तमच घडेल. बहुत काय लिहिणे हे आशिर्वाद.

¶*Ramchandra Konher (Kolhatkar) to his younger brother Laxman. The writer is the Diwan of the Bhonsles at Nagpur. He says he is arranging to come at once with his forces for the help of the Peshwa against Nizam Ali, whom he describes as altogether untrustworthy. The Bhonsle brothers and their characters are also incidentally described. Janoji Bhonsle it seems was suffering from the results of his indiscretions.*

No. 177] [*24-11-1757* ?

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

तात्या स्वामीचे शेवेसी

सेवक अंताजी आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम जाणून ता छ ११ रोवल स्वामीच्या कृपावलोकने यथास्थित असे विशेष.

---

१ सरदार साधु.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

शहरचे वर्तमान, सलाबतजंग शहरात हवेलीस दाखल सोमवारी रात्री जाले. शहरीच ते राहतात. मोगलआली किले दौलताबाद येथे ठेवावे, तावेदारीस पहिले किलेदार द्यावे, बाहीरील कोटात किलेदार सैदलस्करखान यांचे भाऊ सैद आरफखान ठेवावे, याप्रमाणे करारनिश्चय जाला. शहानवाजखान यास बक्षीगिरी दिली. निजामअली व बसालतजंग या उभयतानी सिंदेखेडाकडे जावे ऐसे जाले. मंगलवारी कूचहि जाला आणि कांही फितूर शहानवाजखान याजकडील आढलला याजवरून कूच आदमासे पूर्वेच्या रोखे जाहले. तेथेच मुकाम जाला. शहानवाजखान यास आरगला केली. एकदोन दिवस मुकाम बारावे तेरावे तारखे पावेतो जाला. किलियांत शहानवाजखान यांचा जेष्ठ पुत्र आहे तो फिराऊन गोष्ट सांगतो. किला एकाएकी द्यावयाचा त्याचे चितात नाही. श्रुत व्हावे. शहरी चारावैरणीचा मोठा काळ पडला. बाहेर कांही मिळत नाहीं. शहरीहि झाडाचा देखील झाडा जाला. दाणे बाहेरून रस्त जात नाहीं. महागाई सर्व जिनसाची जाली आहे यामुळे कूच करणार आहेत. कळावें. बुधवारी तिसरा प्रहर कूच होऊन मोगलाई फौजेचे थेले (डेरे?) झालटे येथे गेले. शहरापासून तीन कोसावर गेले. कळावे बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Antaji Appaji from Aurangabad sends news about the doings and movements of the Nizam and his brothers and Ministers.*

No. 178] [*November 1757?*

श्री

सेवेसी विज्ञापना. पत्र पाठविलें ते प्रातःकालचे घटका रात्र राहिली तेव्हा प्रविष्ट जालें. तेथें आज्ञा कीं मोर्च्यापर्यंत राऊत जातात. गाडदी मात्र निघतात. सर्वांठायीं बंदोबस्त आहे. पठाणाकडे बंदोबस्त नाहीं. तिकडे उठावें, मिठी बसली तर बसवावी. खासें निशाण उठलें तर फिर * * * यैसें होऊं नये. लागानें करावें. जो * * * * मुजफरखानाच्या उजवे हाते गुढे आहे त्याजवर लाग पाहून लुटावें. भोंसले यांनीं टेकडीकडे सेह (द्यावा) यैसें दोन्ही आर्थ लिहिलें; त्या पठाणाकडील राण आम्ही नजरेनें पाहिलें नाहीं. मुजफरखानाच्या उजवे हातें गुढें आहे. त्याजवर गडबड आम्ही उदैक गुरुवारीं प्रातःकालीं तांबेसाज फुटतेंसमयीं करतो. आज अवेळ जाली, तेथें जाऊं तों प्रहर दिवस येईल. त्यांची सावधगिरी होईल. हें कर्म बेफामीचे आहे. निजेल्या जाग्यावर जाऊन पोहोचलें पाहिजे. त्याची सावधगिरी जाली नाहीं तों काम करून निघावे येणेप्रमाणें करावयाचा विचार आम्ही केला होता. फौज रात्र

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दिवस पहिल्या तलाकडे जाती तें राण पुरतें जालून कहीवर पुर्ता दबाव बसऊन येका दो रोजांत करावें यैसें होतें. शिवाजी केशव लस्करास आले आहेत, ते आल्यावर करावयाचें होतें तों आपलें आज्ञापत्र आलें. शिवाजी पण सोबती चांगला आहे. रास्ते बहुतसे जपतात, स्वामीस संतोष वाटावा म्हणून लिहीत नाहीं. वाजबी लिहिणें. चाकरीस व (हुजूर) यांस फार जपतात. याकरितां शिवाजीपंताची रवानगी सत्वर करावी. प्रातःकालीं मुजफरखानाच्या उजवें हातीं गडबड करून तैसाच थोडक्या लोकांनिशी येऊन पठाणाचा गोट (पाहावा). आंधाराचे जावयास वाटतीट लागभाग पाहून येऊं मग तें करूं. उदैक भोंसल्यास इशारत असावी. प्रातःकाळींच सांगावें. सूर्योदय जाला नाहीं तों टेकडी बुरज्याकडे पायेबंद बरा देणें, कीं गाडदी धाऊन तिकडे जात यैसें केलें पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdeo's letter from the field of action in reply to queries regarding the parts to be played by the different commanders in the ensuing action of Sindkhed.*

No. 179] [*1-12-1757*

श्रीगजानन

श्रीमत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक गणेश बलाळ दामले साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। कार्तिक वद्य पंचमी पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञापत्रें छ ७ सफरची रवानगी ती छ १८ रावली राजश्री व्यंकटराऊ याणी लखोटे फोडून आणून दिल्ही, ती पावली. तेथें आज्ञा कीं राजश्री सेनासाहेबसुभा व राजश्री बाबूराव कोनेर याचे एकनिष्टतेचे वृत लिहितां आणि सरकारचा ऐवज व राजश्री मुधोजी बावा यांचा वगैरे ऐवज देत नाहीं व श्रीमंत राजश्री विस्वासराऊ याजवळी येऊन सामीलही होत नाहीं. उफराटे मोंगलाचे साहित्य करून निजामअली यास शहरास रवाना करून दिल्हे आणि तुम्ही बजाऊन लिहितां ऐसे निशिध करून आज्ञापत्र त्यासी आतां यांवे, तपशील लिहिल्यानें आमचे प्रमाण नाहीं. श्रीकृपेने हेहि सर्व वोढी करून घरदार भरीस घालून लोकांचा तीन वर्षाचा राडा उगऊन कार्तिक वा। २ डेरादाखल जाले. आजी साबाजी भोसले याची समजावीस करून डेऱ्यास नेणार, ते डेऱ्यास आलियावरी मजल दर मजल येऊन श्रीमंत राजश्री विस्वासराऊ याजवळी दाखल होऊन चाकरीचा मजुरा * * * * * * दाखवावा आणि ज्यानी विपरीत * * * * लिहिले

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आहेत, त्याचा * * * * * द्रून पैका सरकारचा देणे आहे त्याचा * * * आपणासी करार करून घ्यावा, त्याप्रो वर्तणूक करावी, ऐसी उमेद दिसत्ये. त्यांत घडोन येईल ते प्रमाण. मीहि समागमें येतो. लक्ष प्रकारे स्वामीच्या पायासी याची बेमानी दिसोन येत नाहींसे दिसते. वोढी फारच आहे. हे वारंवार लिहिले तरी स्वामीस भासतें कीं हे बनाऊन लिहितात. कांहीं थंड जाले आणि तिकडील सिफारस लिहितात. याजकरितां फार लिहिलें नाहीं. दर्शनांती सर्व निवेदन होईल व याच्या कर्तुत्वात दिसोन येईल ते खरें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री साबाजी भोसले पंचमी सध्याकाळीं डेरेदाखल समजावीस करून नेले. त्यासी उंटे वगैरे नव्हते ते त्यासी दिल्हे. कांही घाव-याचे नख्त त्याची तर्तूद करून देणार ते दिल्हे, म्हणजे मजल दरमजल येतात. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ganesh Ballal Damle reports the difficulties of Janoji and Sabaji Bhonsle in marching and joining the Peshwa against the Nizam. The writer says they have started and are on their way.*

No. 180] [*29-12-1757*

पौ छ १७ रबिलाखर

श्रीविठलप्रसन्न

श्रीमंत माहाराज राजश्री पंत प्रधान स्वामीजीचे
सेवेसी

आज्ञाधारक दिगंबर नारायेण साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १७ माहे राखर प्राथःकाल माहाराजांचे प्रतापें येथास्थित आसे. यानंतर राजश्री हनुमंतरावजींची पत्रें मातुश्री व कुटुंबांस कारभारियासहवर्तमान छ ११ माहे मजकुरी आली कीं सलाह जाला. निश्चये जालियावर लेखण केला जाईल. त्यांवरून जेष्ठ कुटुंब रा। रेणुराये देशपाडे याचे हवेलीत राहातातो. कचेरीहि तेथेच होत आहे, त्यानी मातुश्री व वरकड कुटुंबे खुशीचे वर्तमान यैकून संतोषाचा समारंभ करतील, त्या पूर्वी आपन उल्लाव करावा हा उदेश धरूण कारबारियाचे आनुमत्ते स्वस्थळी तोफाचे बार केले. शर्करा वाटली. तदनंतर दुसरे दिवसी मातुश्रीनी ब्राम्हणास दोन दोन आने भूयसी दिल्ही. त्या उपर छ १३ सबल-गाडाचे वर्तमान आले. तमाम गावखेडी व कसबे उज्याड होऊन येथे आले. मार्गात चोर राऊत लुटितातो. छ १५ स रात्रौ रावमारनिलेचे पत्रें आली कीं बिगाड जाला. कारण कीं राजश्री दताजीराव सिंदें याजला पंनाससहश्राची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जागीर द्यावी हे श्रीमंताची आज्ञा. सांप्रत शाहनवाजखानाचे व रा जानोजी-राऊ निबालकर याचे मारफातीने सलाह होनार. श्रीमंतानी रा शामजीपंत टकले यांस मोगलाकडे रो केले आहे. बहुधा सलाह होईल. स्वामीकडील वर्तमान आहे जे राजश्री गोविंद सिवराम यांस छ १४ स रात्रौ नवाबाकडे रवाना केलें आहे. बहुधा सलूक सत्वरच होतो. फिरगियाकडील वर्तमान आले कीं अद्यापि हयेदराबादेपलीकडे आहेत, येणार. भुकनदास साहुकाराचे गुाचे लिहिले छ ११ स पोहचले. एथील वृत्तांत तर ज्या दिवसात सलाहाची बोली होती तेव्हा निश्चित होते. प्रस्तुत बिगाड जाणून कुसाच्या खिंडी बुजायास काम लाऊन ज्यांबज्या[1] बुर्जानी आलंग वाटून दिल्हे आहेत. बरकंदाज व गारदी बुर्जानी आहेत. रा गोमाजी सुपेकर नानाजी जगनाथ उभयता आद कोसानी बाहेर निघत असताती. आपले शक्तीनरूप तरतूद करिताती. छ १० स राजश्री दताजीराव सिंदे याचें पतक पाचशे स्वाराचें बीडचे गावकुसाने गेले. वदंता होती कीं रावमारनिलेनी श्रीगोंदियास रो केले होते, जे आपले कबिले तेथून निघोन सागोलियाचे किलियात जावे. शेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञापना.

¶*Digambar Narayan describes to the Peshwa the dispositions of the Maratha forces for the ensuing battle against the Nizam and the measures taken for settling the dispute amicably.*

No. 181] [*December 1757?*

श्री

सेवेसी भगवंत आनंदराव कृतानेक सां नमस्कार विनंती. आज भृगुवासरी श्रीगंगापार सरकारचा अटाला[2] उतरला. लस्करचे बुणगे उतरत आहे. दक्षण तीरी मुकाम पुलाचें डावे बाजूस दीड कोसावर केला आहे. जागा चांगली मैदान फौज राहावयास आसी पाहून राहिलों. यांस उजवे बाजूस तोफखाना, डावे बाजूस राजश्री बापू याप्रमाणे आहे. दोन प्रहर दिवसाचे वर्तमान लिहिले आहे. आज अगदी उतरलियावर तपशीलवार लेहून पाठवीन. कलावें, बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*The writer Bhagwant Anandrao reports that he has crossed the Godavari and encamped on the south bank.*

---

१ ठिकठिकाणचे. २ अटाला = फौज.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 182] [*1757?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान गोसावी यांसी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नो माहाराव जानोजी जसवंत निंबाळकर कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये स्वानंद सदैव निजानंदलेखन करीत असिले पाहिजे विशेष. पत्र पाठविलें पावोन लेखनार्थ अवगत जाहला. साळी कलवांतीण ईविसी लिहिलें. ऐसियासी लक्षुमणराव आटोळे मवास होऊन जागिरीचाहि गाव बळकाविला आहे. विना त्यांचे पारपत्य जाल्याविवरिक्त ते देहावर येतात ऐसे नाहीं व आपणाकडील जासूद त्याकडे गेला होता तेथील वर्तमान अर्ज करील. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Janoji Nimbalkar to the Peshwa, informing him of the rebellious conduct of Lakshmanrao Atole.*

No. 183] [*1757?*

श्रीजयति

विनंती उपरी. काल आमचे मुकाम मौजे तांदुलवाडी परगणे मलकापूर येथें होते. तेथून कूच करून मौजे निंबगांव परगणे सिंदखेड या गावाजवल नदीपार येऊन मुकाम केला. नवाबाचा तोफखाना दते (?) अलीकडे आला. उतार उत्तम होता. हें वर्तमान तुम्हांस कलावें म्हणून लिहिलें. याउपरी अमानतखानाचा आजिचा मुकाम कोठे? उद्यां तो कोणे रोखें जाणार? आम्हीं कोणे रोखें यावे? तें तुमचे विचारें राऊत टाकोटाक पाठऊन खबर आणवणें म्हणून नवाबानी सांगोन पाठविलें. त्याजवरून हें पत्र जलदीनें लिहिलें असे. तरी त्यांचा मुकाम व रोख व आम्ही कोणें रोखें यावें तें राउताबरोबर लेहून खबर पाठवणें. नवाबास अर्ज करावा लागतो. पुढेंहि खबर वरचेवरी पाठवीत जाणें. आम्ही नदीआलीकडे आलों. या उपरी त्यास यांस समीपता जाली. खबर उत्तम राखली पाहिजे. तुम्हीं सावध राहोन खबर वरचे(वर) पाठवीत जाणें. येथून जाफराबाद साहा कोस आहे. नवाब आमचे खबरीवरी बेफिकीर आहेत. तुम्ही खबर वरचेवरी पावायास अंतर न करणें हे विनंती.

¶*This seems to refer to the campaign of Sindkhed. The writer asks for orders where and how he should move.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 184] [19-1-1758

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

बलवंतराव स्वामी गोसावी यांसी

पोष्य त्रिंबक सदाशिव कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ ८ जमादिलौवल पावेतों मुकाम राम(क?)सगांव गंगातीर प्रगणे आंबाड यथास्थित असें विशेष. सांडणीस्वाराबराबर व काशिदाबराबर येथील वर्तमान सविस्तर लेहून पाठविलें आहे त्याजवरून सर्व कळेल. प्रस्तुत श्रीमंतांनीं लिहिलें आहे त्याजवरून सविस्तर कळेल. नवी जागीर मोगलांजवळून पंचविसा लक्षांची घेतली; त्यापैकी बाबूजी नाईकास तेरा लाखाची जागीर नळदुर्ग किल्ला करार केला. यंदा बंदोबस्त करून यैवज जमा करावा. पुढील वर्षी मातबर फौज थोर कामास प्रमुख होतील. दत्ताजी शिंदे यांस शिंदखेड देणार. गांडापूर, मानूर, वैजापूर, नेवासे, शिरें हे माहाल मात्र हुजूर ठेविले. वरकड नाईकास दिल्हे. नाईकावर कृपा फार उत्तम आहे; तेहि निष्ठेनें प्रस्तुत आहेत. तुम्हास कळावें. मुसा भुसी आले; येका दो दिवसां भेटी होतील. तदोत्तर बोलणें चालणें स्वछ होऊन देउल-घांटाकडे श्रीमंत जाणार, तेथून तुम्हाकडे गोपाळराव मल्हारराव याची रवानगी होईल. गुजराथेस दतबास पाठवावें यैसें आहे, व विश्वासराव यांसहि पाठवावे ऐसे आहे. कोणतें ठहरेल पाहावें. तुमची चाकरीचुकरी तिकडे चांगली जाहाली. सरकारचीं कामें चांगलीं दोन तीन जाहालीं. सारे मिळोन येकदील आहां, येणेंकरून श्रीमंताचें चित्त स्वच्छ चांगलें आहे, तुम्हास कळावें. गुजराथ कर्नाटक इकडे रवानगी फौजाची जाहालियावर जानोजी भोंसल्याकडील यैवज उगऊन घेऊन मग माघारें फिरून येसे (ढे?) पाहून शिमग्यास श्रीमंत दाखल होणार असा डौल आहे. सविस्तर कळावें म्हणून लिहिलें असें. बहुत काय लिहिणें? लोभ असो दीजे हे विनंती.

पोष्य महिपतराऊ आवजी दंडवत विनंती. सविस्तर लिहिलें आहे, कळेल. लोभ असो दीजे हे विनंती. पोष्य गोविंद शिवराम साष्टांग नमस्कार विनंती. सदैव पत्रीं परामर्ष होतो येणेंकरून आनंद आहे. दर्शन लौकर व्हावें हेच इच्छा ईश्वर लौकर पूर्ण करो हे विनंती.

¶*Trimbak Sadashiv to Balavantrao Mehendale, reporting news from the Peshwa's camp about the distribution of territory acquired from the Nizam, and the future plans contemplated by the Peshwa about the subjugation of Gujarat and the Karnatak.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 185] [*5-4-1758* ?

पौ छ ४ साबान

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती. शेवक विठल निळकंठ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता। छ २६ रजबपावेतो मुा। करमाळें स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा मुकाम अंकलकाठी अलीकडे नदीवरून स्वार जालों ते राजश्री गोविंद खिजमतराव व राजश्री नरसो मल्हार समागमे छ ९ रजबी ठाणे मजकुरीं दाखल जालों. दुसरे दिवसीं राजश्री महाराव जानोजी निंबाळकर याची भेटी घेतली. त्यास आज्ञा केली की होळी समीप आली, होळी जाली म्हणजे तुमच्या कामाकाजास सुरुवात करूं. त्याजवरून आपणहि त्याची आज्ञा मान्य करून राहिलों. होळी जालियावर पंचेमी शेशटीस कचेरीस जाऊन माहालोमाहालास ताकिदा मागितल्या कीं पाटील व कुळकर्णी यांची कची दप्तरें आणून हिसेब रुजू करून द्यावे ऐसी बोली घातली. त्यास राजश्री माहाराव जानोजी तों रुबरू जाबसाल करीत नाहीं. याजकरितां रो। गोविंद खिजमतराव याजकडून हाटकितों. त्यास आज उद्यां (फाटलें) दाखवितात. ताकिदा देऊन माहालोमहाल अमल सुरळीत देत नाहींत ऐसे बोलणियावरून भास(ते). गोविंदराव म्हणतात कीं आम्ही चौथाईवाले यासी ताकिदा देऊं, तुम्ही आणि चौथाईवाले समजोन घेणे. आपण पाटील कुळकर्णी तुम्हासी रुजू करणार नाहीं ऐसे पष्ट छ २५ रजबी जाब दिधला. त्याजवरून आम्हीं त्यासी जाबसाल केला की तुम्ही लस्करात श्रीमंतासी करार करून आला आहात आणि येथे बदफैलीच्या गोष्टी सांगतां! या कर्माने परिनाम कैसा लागल? त्याजवरून जाबसाल केला कीं श्रीमंत येऊन आमचा मुलूख सुखरूप मारोत, परंतु आम्ही पाटील कुळकर्णी रुजू करणार नाहीं. तुम्ही आणि चौथाईवाले चितास येईल त्याप्रमाणे समजोन घेणे. परगणे हवेली परांडे येथील तुम्हास रा। जानोजी निंबाळकर यांचे मोहरनसी जमा वसूल दाखवितों. त्याजवरून आकार होईल त्याची चौथाईपैकीं चौथाई घेणे. ऐशा बदमामली गोष्टी सांगतात. गोविंदरायानी स्वामीच्या रुबरू जे कलमे कबूल केली त्यास अतां म्हणतात कीं खावंद ऐकत नाहींत, आमचा उपाय काय आहे? आम्ही त्यांस ताकीद केली कीं रा। नरसो मल्हार यांसी पैसा न द्यावा आणि त्यानी छ २१ रजबी रोख बारा हजारांचे तोडे दिधले आम्ही वि * * * * मना केले असतां तुम्ही (फाटले) तां हे गोष्ट कार्यास येणार नाहीं. त्यास गोविंदराव बोलले कीं आम्ही चौथाईचा पैका

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नरसो मल्हार यासी झाडून दिला आहे, तुम्ही आणि ते समजोन घेणे; आणि नरसो मल्हार यांनी स्वामीपासी कबूल केले कीं कुलमामलेतीस वाकफगार करून देतां. त्यास येथें म्हणतात कीं आपणच मामलेतीस वाकफ नाहीं ते तुम्हास काय सांगावे? आम्ही जैसे उचल्याहात पैका घेतों ऐसा तुम्हीहि जो ऐवज देतील तो घेणे. ऐशा मिलाफी गोष्टी सांगत होते. तो पुणियाहून श्रीमंताचे ढलाईत व पंचेवीस रुपये मसाला रा॥ तिमाजी नाईक रोकडे याच्या कजियाबद्दल अला. त्यास छ २२ रजबी पुणियासी गेले. स्वामीनी पा॥ हवेली व पा॥ वांगी येथील करार करून घेतला कीं एका महिन्यांत श्रीमंताचे पत्र चौथाईबद्दल आणूं. त्यास मुदत होऊन आठरोज अधिक जाले, अदियाप पत्र येत नाहीं; आणि निंबाळकर तो त्यास ऐवज देतात; आणि आम्हांस म्हणतात तुम्ही ते समजोन घेणे. ऐसे एकएकाचे मिलाफी आहेत. पा॥ वासी येथील मोकासा रा॥ साबाजी नाईक निंबाळकर यासी आहे. तेथील ताकिदा जमीदारास व तालुकदारास मागितल्या त्यास म्हणतात कीं तुम्हास माहालांत दखलगिरी देणार नाहीं. साबाजी नाईक (फाटले) ल घेतात ते आणि तुम्ही समज (फाटलें)णे तैसेच पा॥ भूम येथील रुजुवातीबद्दल रो॥ मुधोजी नाईक निंबाळकर यानी व मैराळ शामराज गु॥ देशमुख नि॥ रा॥ जानोजी निंबाळकर यांनीं मुचलके दिधले आहेत आणि येथें बदफैली करितात कीं ज्याप्रमाणें साऱ्या माहालाची वाट होईल त्याप्रमाणें तुम्हास दखलगिरी देऊं. पाटील कुलकर्णी जमा करावयासी अनकूल पडत नाहीं. ऐसे वरच्यावर गोष्टी सांगतात. हा कालपावेतों अंमल बसून वसूल सुरळीत देत नाहींत, मौजे कम येथें रोखा केला आणि स्वार पाठविले त्यास फकीर महमद यानें रोखा फिराऊन टाकला की आम्ही श्रीमंताचे प(त्र) आणून देतों, अमल तुम्हास देत नाही. आम्ही सरकारात निशा करितों ऐसा जाब दिला. यास स्वामीनी ताकीदपत्रें रा॥ जानोजी निंबाळकर यास व रो॥ मुधोजी निंबाळकर यासी व फकीर महंमद यासी व गोविंद खिजमतराव यासी व नरसो मल्हार यासी पाठविलीं पाहिजेत. सेवेसी श्रुत होय बहुत काय लिहिणे हे विनंती.

स्वामी महाराजांचे सेवेसी आज्ञाधारक सिवाजी गिरमाजी चरणावर मस्तक ठेऊन सिरसां नमस्कार विज्ञापना. लिा॥ परिसोन सेवकावर कृपेची वृद्धी केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*Vithal Nilkanth to Bhausaheb, informing him how Maharao Nimbalker tried to put off the payment of the dues to the Peshwa. The terms that were agreed upon by Govind Khijmadrao were set aside by Nimbalker who is altogether reluctant to make the payment.*

3182

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 186] *[14-6-1758?*

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

पोष्य शामजी गोविंद साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ ७ माहे सवाल मुकाम लस्कर नवाब दरजागा हैदराबाद येथास्थित जाणून स्वकीये कुशललेखन करावें विशेष. आपण सांडणीस्वारावरोबर पत्र पाठविलें तें पावोन वर्तमान कलों आलें. आपण चंदे[1] रोज मुधोल प्रांतीं राहूं. श्रीमंताचीं पत्रें येतील तीं सत्वर पाठवणें, व नवाब हैदराबादेस कितीक दिवस राहणार तें सविस्तर लिहून पाठवणें, म्हणोन लिहिलें. त्यास कादरखान गाडदी व रेणकोदासपंत मेदक वगैरे परगणियाचे नजरेचा यैवज वसूल करावयासी मागें राहिले आहेत. ते आलियावर सत्वर येथून कूच करून जाणार. नवाब सलाबतजंग बेजवाडियास आले. तेथून कूच करून खममेस येणार. करनेल फुर्द इंगरेज याचा जाबसाल ब्रिजनाथ दिवाण बसालतजंग याचे विद्यमानें होता. त्यास इंगरेजास आणून नवाबाची मुलाजमत करविली, व त्याचे मतलबाची[2] फर्द दसखत[3] करविली. त्यास येक दो कलमांत कांहीं तफावत दिसोन आला, व त्याजला यांजकडीलहि पक्ष आहे. यास्तव बेरुकसत[4] निघोन मछली बंदरास गेला. त्यावरून बसालतजंग वगैरे जमातदार मिलोन नवाब निजामअलीखान यासी युधप्रसंग करावा यैसा आपसमध्यें[5] येका[6] करून माघारे फिरले, खममेस येऊन पोंहचले. फरासिसाचा जमान जुलफिकारजंग वगैरे तेथेंच आहेत. सलाबतजंग याचा विचार यासी सख्यच संपादावे. बसालतजंग याचा विचार विरुधावर. हेही येथून कांहीं नित्यकृत[7] खर्चाची बेगमी करून कूच करणार. श्रीमंतास साहित्याविसीं यानी लिहिलें आहे; त्याचा जाबसाल अद्यापि आला नाहीं. नवाबाचे विचारें आपण प्रस्तुत लोहगांव मुधोल प्रांतीं राहावें, पूर्वी आपण विचार लिहिला होता, त्याचा अंदेशा[8] यांस पडला आहे. मागाहून ठहरेल गोष्ट त्याप्रमाणें सेवेसीं लिहिलें जाईल. बहुत काय लिहिणें? लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Shamji Govind reports to Bhausaheb negotiations between Salabat and the English which have not been concluded owing to a hitch in some of the clauses of the treaty.*

---

१ कांहीं दिवस. २ मतलबाचें पत्र. ३ निशाणी, सही.
४ निरोप घेतल्याशिवाय. ५ आपसामध्यें. ६ येक विचार.
७ नेहमीं लागणाऱ्या. ८ संशय.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No 187] [*22-10-1758*

श्रीराम

छ १६ सफरी राजे विठलदास पोटदुखीचे आजारामुळे दरबारास गेले नाही. इबराहीमखानाचा वकील खर्चास मागायासी आला याची गोष्ट खातरेस आणिली नाही. छ १७ सफरी राजे विठलदास दोप्रहरा दरबारास गेले. तेथे इबराहीमखानासी व यासी रुबरु जाबसाल सख्तगोईचे[1] जाले. त्याजवरून बरतरफ केले. हिसोब पाहतात. संध्याकाली निजामअलीखां स्वार होऊन नवाब सलाबतजंगाचे येथे गेले. दरबार जाला नाही. खिलवतात होते. छ १८ सफरी राजे विठलदास तिसरे प्रहरा दरबारास गेले. इबराहीमखानाचे देनियाचा हिसोब केला तो तीन लक्ष रुपये बाकी निघतात. साहुकारास बोलाऊन म्हनो लागले की (तीन लक्ष) रुपये आम्हास कर्ज देन. काम जरूरीच आहे. अद्याप घेतले नाही. तेकाजा[2] बहुत आहे. महदुदखां नामे गारदी हजारा गारदियानसी बेरोजगारा आला आहे. छ १९ सफरी राजे विठलदास दोप्रहरा दरबारास गेले. कुल अमीर आले होते. निजामअलीखानाहीं दरबार केला होता. महदुदखानाची मुलाजमत जाली. नौकर ठेवनार. विशष लिा विज्ञप्ति.

¶*News-letter from the court of the Nizam giving details about Vithaldas and Ibrahim Khan and his debts, and the latter's dismissal from the Nizam's service.*

No. 188] [*21-12-1758*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

सेवक केसो बलाल नामजाद प्रोां कुंदगोल कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १९ माहे राखरपर्यंत स्वामीचे कृपाअवलोकनेंकरून सेवकाचे व प्राा मजकूरचें वर्तमान येथास्थित असें विशेंष. स्वामीची वरचेवर आज्ञापत्रे येतात कीं रसदेस ऐवज सत्वर पाठऊन देणें. त्यास या प्रांतातील लोक तमाम वारा पिऊन भडकत आहेत. जर येकादेयाचे पारिपत्य करावें तरी सर्व कावले येकच आहेत. राजश्री विसाजीपंत याजकडे कुंदगोलची मामलत राजश्री गोपालरायाकडून करार जाहाली होती. हाली ते धारवाडांत आहेत. त्याजकडें येथील जमीदाराचे सूत्र आहे. रोज येत जात असतांत. त्यासहि

---

१ निष्ठुर भाषण. २ तगादा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अद्यापि भरवसा आहे कीं मामलत आम्हाकडेच होईल. ऐसा त्याचा मजकूर त्यावरून येथील ग्रहस्तास सांगोन वसूल पडो देत नाही. आमावास्यापर्यंत वाट पाहून पुढे सालजाब करावा ऐसे मतलबात आहेत. स्वामीस मामलत करणे असेल तरी सरकारची ताकीदपत्रें सत्वर पाठऊन देणें, नाही तरी बहुत संकट आहे. या रानात फौज नाही त्यास्तव कोणी कोणास भीत नाही. येलवतीकरानें नवाबाचे खेडखेड्यानी लोक ठेविले आहेत. जमा फार केला आहे. खामखा सावसी अगर कुंदगोल्याचे गला पडावें असा करार केला आहे. चौकडून हीच बातमी येथें त्यामुलें सिबंदीहि साडेसातसेपर्यंत माणूस ठेऊन हुशार आहों. खावंदाचे पुण्य समर्थ आहें. आजतागा सर्व आपला तालुका क्षेमरूप आहें. पुढें कठिण आहे. फौज लौकर पाठऊन द्यावी. मामलत करणे नसेल तरी लौकर सोडून द्यावी. दौतून येंक लौकर करावे, यात उतम आहे. दुई अथःपर न करावी. निश्चये येक जाहाला म्हणजे सर्वत्र ठीक राहातील. आतां हंगाम असों. सिबंदीस कर्ज काढून देणे लागते, त्यास्तव सनदा लौकर पाठऊन द्याव्या. स्वामी सर्वज्ञ आहेत. आम्ही काये ल्याहावें. बहुत कायें लिहिणे, कृपा असावी हे विज्ञाप्ति. या दो स्थलाची आवाई दाट चौकडे आहे; मग कोणीकडे दंगा करितो ते न कळे. सर्व प्रताप स्वामीचा असे हे विज्ञापना.

¶*Keso Ballal requests the Peshwa to take over to him the mamlat of Kundgol, otherwise it would be taken by the jamidars from Visajipant to whom it is assigned by Gopalrao. The writer asks for more men to quell the disturbances in the province.*

No. 189] [*1758 ?*

(गज ?)पतीराज जमीदार मेस्तर गर्नाल आगरेज मछलीबंदराहून कूच करून कृष्णातीर बजवाड्याचे सुमारें बंदराजवळून पांच कोस आले. मुसाबुसीचें ठाणें गुंटुरांत होतें तें उठून आलें म्हणोन याप्रमाणें आर्ज जाली. छ १५ रोज शनवार च्यार घटका दिवस आल्यावर खिलवतेंत आले. दोघे हकीम व रायेराया दर्याब[1] जाले. जाबसाल करून प्रहर दिवसा बरखास्त. आखर रोज च्यार घटका दिवस राहतां स्वार जाले स्वारी पालखीची बसालत-जंगाचे डेऱ्या * * पुढें येऊन पांच रुपये येक मोहोर नजर केले. तीन घटका तेथें बैसले, तेथून स्वार होऊन मग आपल्या डेऱ्यास गेले. हुकूम

---

१ दर्याप्त = जाहीर, हजर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
मुकाम गजपतिराज व मेस्तर गर्नाल याची आर्जी आली ते गुजरली. छ १६ रोज रविवार दीड प्रहर दिवसा खिलवतेंत आले. बसालतजंग व शौकतजंग व शेरजंग व रायेराया दरयाब जाले. जाबसाल करून दोन प्रहर येक घटका दिवसा बरखास्त. मेस्तर गर्नाल मछली बंदरांत दाखल जाला, व गजपतिराज जामीदार कूच करून राजबंदरीकडे गेला, म्हणून अर्ज आली. आखर रोज कोणास याद केलें नाहीं. हुकूम मुकाम छ १७ रोज प्रहर दिवसा खिलवतेंत आले. रहिमुलाखां व महमद कबीरखां व दोघे हकीम दरयाब जाले. जावसाल करून येक प्रहर च्यार घटका दिवसा बरखास्त. आखर रोज तीन घटका दिवस राहतां स्वार जाले. स्वारी पालखीची गालब साहेबाच्या दरगाहास तवाफ[1] करावयास गेले. दरगाहास पनास रुपये चढविले. तेथून येक पागोटें व येक रुमाल तबरूक इनायेत जाला. तेथून एक घटका रात्री हतीवर स्वार होऊन डेऱ्यास आले. मुजाफत जातां येतां अडीच कोस हुकूम मुकाम. गजपतिराज जमीदार कूच करून राजबंदराकडे गेला. इंगरेज मछलीबंदरावर * * दाखल जाला. बंदरचा बंदोबस्त करितों म्हणून अर्ज आली. छ १८ रोज मंगलवार येक प्रहर येक घटका दिवस आल्यावर खिलवतेंत आले. बसालतजंग वगैरे उमदे अहलेकार[2] दरयाब जाले. कागद दसखत जाले. शौकतजंगास खानगी दिवानी जाली. खिलत पाच पारचे. आज तागीर अबदूल फखरखां शेरजंगास बादशाही दिवानी जाली. खिलत च्यार पारचे आज तागीर मीरमहमदीखां फतोदी महमदखान यास अवरंगाबादची मुछदगीर जाली.

¶*A mutilated portion of a diary of a Nizam's court forwarded to the Peshwa.*

No. 190] [*13-12-1761*

पो छ १६ जावल

चंद्रवार

श्रीगणेश

सेवेसी गोपाल गोविंद व मल्हारराव भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १५ जावल रविवारी स्वामीचे कृपेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असें विशेष. कालचा युद्धाचा निश्चयें करून स्वामीनी आज्ञा केली त्याप्रमाणें आम्ही संध्याकालपावेतो तयार होऊन उभे होतो; स्वामीनीहि पाहिलेंच

---

१ प्रदक्षिणा. २ कामगार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

असल. स्वामी युद्धाचा निश्चये करितात आणि सेवकास आज्ञा करितात. आम्ही युद्ध न करावें असें लिहिले तरी आमचे पदरी नामर्दी येते; यास्तव आम्ही कांहींच लिहीत (नाहीं.) परंतु जर करून स्वामी सारे फौजेचे युद्ध केले तरी हजार पांचसे घोडे माणूस जायां होईल. फौजेचे काम कारीगार होणार नाहीं, तेव्हां मोगल सेर होईल; आणि आपली फौज कामातून जाईल. यास्तव आपण होऊन जुंज सहसा करोन (अपूर्ण)

¶*Gopal Govind and Malharrao Bhikaji on the impropriety of conducting the operations against the Nizam at that time as they would lead to no tangible result in their favour. The letter refers to a future campaign.*

No. 191] [*17-2-1759*?

श्री

श्रीमंत राजश्री साहेबाचे सेवेसी

अज्ञाधारक विष्णु सदाशिव कृतानेक विज्ञापना ऐसीजे. साहेबांचे कृपादृष्टी-करून सेवकाचे वर्तमान ता॥ छ १८ माहे जमादिलाखर मु॥ वाजरा संगम नजदीक कोडलवाडी येथास्थित असें. ऐसियासी नवाब सलाबतजंग निरमल प्रांतात वीस मुकाम केलत, त्यास हैदराबादेचा कांहीं पैका यावा यासाठीं दबाव घालून बसले होते; आणि हैदराबादेस जातों यैसेहि बोलतात. त्यास औरंगाबादेचा बहुत हेत दिसतो. सर्व कारभार खानच करितात आणि जानबाचाही विचार याचे प्रमाणेच आहे. जासूद जोड्या ज्या होत्या त्या सेवेसी पाठविल्या. आतां कोन्ही जासूद नाहींत. एक जोडी दुखन्या पडली आहे ते जवळ आहे. खर्चायाची विपत्य होते आणि कर्जहि बारा तेरासे रुपये जालेत. आतां कर्ज मिळत नाहीं. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*Vishnu Sadashiv, the Peshwa's agent with the Nizam, reports to him the movements of Salabatjang and his affairs. He adds that he has no funds at his disposal and has contracted debts.*

No. 192] [*Recd. 25-8-1752*?

छ २६ सवाल

श्री

पु॥ श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. सैदलस्करखान स्वामीकडे गेले तेव्हां कविजंग आपले नायेब वकील मुतलकाचे व सफशिकनखान दिवाण व हैदरयारखान खानसामां व

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
शाहनवाजखान यांस भागानगरची सुबेदारी ऐसें नेमस्त करून दिल्हें होतें व फिरंगियासी खानासी आणप्रमाण जाली. खान गेलियावर कविजंग व सफशिकनखान वगैरे फिरंगियासी मिळोन खानाप्रमाणे सर्व कागदपत्र कविजंग पाहून दसखत आपले करून मग नवाबाचे दसखत करवीत होते व कारभार करीत होते. खान गेलियावर मुस्तइदखान यानीं नवाबास सांगून खजानियाचा दारोगा आपले तर्फेचा केला व दरबार सालजाबात आपण दखल करूं लागले. सलाबतजंग यांस कागदपत्रांत किमपि कांहीं परिश्रम नाहीं. पहिले रामदासपंत चित्तास आलियासारिखे नवाबाकडून दसखत करून कागदपत्र घेत होता. अलीकडे खान वकील केले म्हणजे जे युक्तायुक्त ते यानी पाहून दसखत करावे याप्रमाणे नवाबानीहि दसखत मात्र करावे. बरे वाईट येख्तियार खानाचा केला होता. अलीकडे खान गेलियावरहि त्याप्रमाणे कविजंग करीत होते. सांप्रत मुस्तईदखान यांनी कारभारात दखल केला यामुळें कविजंग व सफशिकनखान आपले जागा उदास आहेत. व नवाबासी मुस्तइदखान बहुत पेष आहेत. पहिले दिवसापासून पढणें लिहिणें हास्य विनोद मुस्तईदखानासी निर्भीडता जाली आहे व चित्त मिळाले आहे. खानाचे दबावाकरितां मधें कांहीसा अडताळा जाला होता. खान निघालियावर मागतीं त्यानीं रीघ केला. नवाबास हरयेक कार्याविषई हरयेक तऱ्हेने समजावितात. खानाचें पक्षी आहेत, यांजकडून नवाबाची मर्जी थोडीसी फिरविली आहे. याकरितां कविजंग व सफशिकनखान यानी येथील चर्या कारभार सर्व खानास लिहिला आहे व उदासीनपणें कारभार ज्याप्रमाणे चालवायाचा तो चालवितात; परंतु पहिलेप्रमाणे ऐक्यता होती त्यांत अंतर पडले आहे. सेवकाने छ १२ रोजीं सफशिकनखानास सांगितले कीं मुस्तइदखान आदिकरून येकदोघे तुमचे वाईटावर आहेत. सिपाईलोकांस चिथाऊन तुमसी कलह करावा (जे) उपहास तुमचा व्हावा या गोष्टीचे विचारात आहेत. हे वर्तमान तुम्हास कळले असेल. तथापि आम्ही ऐकिले ते आपले श्रेहास्त * * तों त्याजवर खानमजकुर बोलिले कीं गोलकुडकर किलेदारास गाजुदीखानाचा इनायतनामा आला व त्याने नवाबाजवळ पाठविला. या संधीत मुस्तइदखानाने प्रेरणा केली कीं हेहि तिकडे मिळाले आहेत; यांसहि पत्रें येत असतील. छ ११ रोजीं नवाब आम्हासी बोलिले कीं फेरोजजगाचे इनायतनामे आणिक लोकांसहि येत असतील परंतु आम्हास काय कळे ? तेव्हां आम्ही उत्तर दिल्हे कीं कासिद त्यांजकडील दाहा जोडे आले आहेत. त्यांस आणून तंबी करावी म्हणजे सहजच सांगतील. ज्यास ज्यास पत्रें आणिली असतील व दिल्ही असतील ते नावे घेतील ऐसे उतर दिल्हे. सारांश नवाब चितापासून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्हासी साफ दिल नाहीत. प्रस्तुत हा मनसुबा प्राप्त जाला आहे व नसिरजंग या मध्यस्तीस गेले आहेत म्हणून लौकिक आम्हा लोकासी सलुक करितात, ही गोष्ट आम्हासही कलतच आहे. व नसिरजंगासहि येथील कचे वर्तमान लिहिलें आहे. पाहावे त्याचे चित्तास काय येतें. याप्रमाणें सफशिकनखान सेवकासी बोलिले. पहिले पत्र स्वामीचे आलें होते त्याचे उतर ही थैली दिल्ही. सारांश खानाची मंडळी शाहनवाजखान भागानगरचे सुबेदारीचे वाहाण्याने निराळेच आहेत. आठा चौ रोजा बोलाविल्यास दरबारास येतात. या चौ पांचा रोजात कविजंगहि दरबारास येत नाहीत. तबियेत काहिली म्हणतात व आपले घरी आहेत. सफशिकनखान व हैदरयारखान दरबारास येतात. दिवाणी खान-सामाजीचे कामकाज चालवितात. सारांश नवाबाची मिजाज लेकुरपणाप्रमाणे क्षणभंगुर आहे. फेरोजजंग नर्मदा उतरोन येत तर नाहीत. आले तर पराजये पावतील; याप्रमाणे सकंभट जोसी पुणतामकर याने नवाबास सांगितले आहे. त्याजवर बहुत कृपा करितात व लिहून दिधले आहे कीं आमची फते जाली म्हणजे पुणतामे दरोबस्त जागीर भटमजकुरास द्यावी व फेरोजजंगाचे इछावरावर पर्जन्यामुळें मुकाम बहुत जाले व कितेक लोक उठोन गेले म्हणून वर्तमान आले व स्वामी थेउराहून फिरोन पुण्यास गेले हें वर्तमान येथें आलियावर नवाबाची निष्ठा जोसियावर बहुत बसली आहे. रोज दरबारास बोलावितात व पुसतात. दीडशे रुपयें महिना देतात. याप्रकारे लेकूरकारभार सर्व आहे. प्रस्तुत * * आरंभिला आहे. छ २२ शवालपर्यंत शादी अखेर होईल. पुढें पाहावे निघतात कीं काय. किल्यातून दाहा लक्ष रुपये खजाना काढला. * * येक येकमाहा येथे देविला व च्यार च्यारमाही आमिलावर तनखा केली आहे. आमिलावर तनखा वसुलास लोक गेले आहेत परंतु आमील आज म्हणता दोन महिनियां दिल्हे तर फार जलद दिल्हे. येकमाहा मात्र नख्त मिळतो. सर्वत्र सिपाहियानी निश्चये केला आहे कीं मागील तलब झाडून घ्यावी व पुढें गाड्याचे रिसाले शेशें दोनदोनशें स्वार आहेत त्यास महिनें भारी आहेत त्याप्रमाणे महिने करून देतील तर रफीक[1] व्हावें नाही तर तलब मागील घेऊन निरोप घ्यावा. या प्रमाणे सफशिकनखानासी येक दोघे उमदे जमातदार बोलिले. खानमजकुराने उतर दिल्हे कीं प्रस्तुत लग्नाची शादी आहे. हे आखर जालियावर तुम्ही ज्याप्रमाणे म्हणाल त्याप्रमाणे खावंदास अर्ज करू. खावंद काय जाबसाल करील तो तुम्हास सांगू. याप्रकारे सिपाही लोक म्हणतात; व हंगामा करणार यामुळें सफाशिकनखान व कविजंग भयभीत आहेत कीं नवाबाची कृपा अवकृपा

---

१ स्नेही.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कोण पुसतो. प्रस्तुत आम्ही कारभारांत फिरतो. कांहीं व्यंग पडले म्हणजे सिपाई लोक प्राणाचे ग्राहक होतील. येक येक महिना देविला त्यास हातास यावयास दोन महिने पाहिजेत तो आणिक दोन महिने चढले. या प्रकारे ही साकळी तलबेची वाढतच आहे. मुलकातून आमिल लोक या दिवसांत कांहीं पाठवीत नाहीत. येथून यानी तनखा मात्र केल्या आहेत. तेहि रुपये समय अवस्था पाहून देतो देवितो म्हणतील. सर्व सिपाहीलोकांचे व फिरंगियाचे लक्ष किल्याचे खजानियावर आहे. दाहा तों छ ९ शवाली आले ते वाटतात. पुढेहि पाहिजेत तेव्हां तेथूनच येतील. किल्यांत पंचेतालीस लक्ष रुपये होते त्यांतून दाहा आले व पुढेंहि येणार यैसे वर्तमान आहे. कृपावृद्धि व्हावी हे विज्ञापना.

¶*This news-letter tries to explain the complicated affairs at the court of the Nizam. A misunderstanding had arisen between Kavijang and Mustaid Khan owing to the childish conduct of the Nizam. Saphshikan Khan, Nasirjang and other minor sardars are also mentioned.*

No. 193] [*17-5-1759*

श्री

सेवेसी विनंति. सेवक केशवराव लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागाईत छ १९ रमजान पावेतो मुकाम सराटी नीरा उत्तरतीर स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालो ते मोहदेस आलो. तेथून दुसरे दिवसी कूच करून वेलापुरचा मुकाम केला. वेलापुरीहून छ मजकुरी दों घटका दिवसा नीरा उतरोन आलीकडील तीरी सराटीस राहिलो. कारखाना स्वामीचे आसीर्वादे सारा नीरा कमरे इतक्या पाण्यांत उतरला. या उपरी मजल दरमजल बोरघाटाचे वाटेने कारखाना पुण्यास जाईल. नाऱ्याच्या तोफा पाहाण्याविसी स्वामीनी आज्ञा केली होती त्यावरून तोफा पाहिल्या. परंतु जंबुरे बांगडी[१] आपल्या कार्याचे नाहीत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Keshaorao Laxman Panse, who subsequently fell at Udgir, reports that he has got his guns over the Nira river.*

---

१ तोफेचा प्रकार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 194] *[Date of receipt 26-5-1759*

पो छ २८ रमजान सन तिसा

श्री

विज्ञप्ति ऐशीजे. गुदस्तां निजामआलीखानाचे कर्तुत्व ठावकेच आहे. बसालतजंगानी स्वामीस लिहिलें येक, जीवनरायासी[1] बोलत गेले येक, सेवटी बंधुबंधु येक होऊन केले येक. त्यास आलीकडे हैदरजंगास मारिल्याचा फुंदे[2] व भोसल्यांसी जुंजल्याचा फुंद जाला आहे व जमीयतहि अवंदा फार जाली आहे. नवाबाजवळ[3] आल्यावर नवाब व बसालतजंग त्याचे लगामी लागतील यांत गुंता नाहीं. पुढेंहि निजामआलीखान बखेडा करावयासी चुकणार नाहींत. याचा विचार माहाराजानी करून ठेविलाच असेल हे विज्ञप्ति.

¶*Letter communicates to the Peshwa the aggressive and hostile attitude of Nizam Alikhan.*

No. 195] *[13-6-1759*

पो छ २२ शौवाल

सन सितैन

श्री

सेवेसी महिपतराव लक्षुमण सा नमस्कार

विनंति उपर. येथील कुशल ता छ १७ शवाल जाणून स्वानंद लेखकास आज्ञा केली पाहिजे विशष. नवाब सलाबतजंगाचे लस्करांतून वर्तमान आले कीं मिस्तर गरनाल समागमे लडाईस यावयास आनमान करितो. दोनतीनसे फिरंगी व गाडदी हजार वीस तोफा यैस्या बराबर देतो. बसालतजंगाचा निश्चये कीं जितकी फौज बराबर आहे तितक्यानसीच निजामआलीसी जुंझावे. बंदगानआली दसखतखास निजामआलीस लिहितात कीं आम्ही कांही तुम्हासी जुंझत नाहीं. बसालतजंग चालून येतात, लस्कर जवल आल्यावर आम्ही तुम्हापासी येऊ. बसालतजंग बळेच आम्हा हातीं तुम्हास बिघाडाचे कागद लेहवितात. तुम्ही हैदराबादेबाहेर निघोन पुढे येणे. कदीम सरदारसुद्धा आम्ही तुम्हाकडे येऊं. बसालतजंग येकले आपल्या दो चौ हजारा लोकानसी काये करितात पाहू व बळेच बसालतजंग आम्हा हाती श्रीमंतास लेहवितात कीं निजाम आलीस राजी नाहीं. तुम्ही कुमक करणे. निजामआलीस मारून घेऊं यैसें बंदगानआली निजामआलीस लिहितात. निजामआलीही पुढे सलाबतजंगाकडे चाल करितात.

---

१ पेशव्यांचा वकील. २ गर्व. ३ सलाबतजंग.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
चहूंकडे फितूर आहे. जुलपकारजंग व खाजे रहमतुलाखां खमममधे आहेत त्याजवर निजामआली फौज पाठवितात. बसालतजंग जुलपकारजंगास लिहितात कीं आम्हाकडे येणे. इंगरेजाचे लोक न आले तर जुलपकारजंग बसालतजंगापासी पोहचतील. नवाब सलाबतजंग यानी रायेरायांस निजामआलीकडे पाठवावयाची तजवीज केली आहे. सलूक होतो यैसे येथील उमदे बोलत आहेत. बसालतजंग जुलपुकारजंगापासी जाऊन फुलचरीकडे जाणार. येक वार्ता आहे कीं आदवणी-कडे जाणार पुढे जैसे वर्तमान येईल तैसे सेवेसी विनंती लिहिले जाईल. निजाम आली बळेच वलीआहद होईलसे दिसते हे विज्ञापना.

¶*Mahipatrao gives a description of the political situation at the Court of the Nizam. The letter is written 5 or 6 months prior to the battle of Udgir*

No. 196] [*18-8-1759*

छ ६ मोहरम

भाद्रपद सितैन बुधवार

श्री

सेवेसी विज्ञापना ऐसीजे छ ५ जिल्हेजी सीताराम वकील दिा आनंदराम राजा सिकाकोलवाला यांनीं नवाब निजामअलीखान यांची मुलाजमत केली. आनंद-राम राजा यांचे तर्फेनें नजर होन २३३ व रुप्यांची झाडे २ व हस्ती दोन, वस्त्रें सफेद सीकाकोलची ५८, व लाख रुपये, पैकी पंचवीस हजार रुपयांचे होन, बाकी पाऊण लक्षाच्या हुंड्या दिल्ह्या. तेथून इभराहीमखान गाडदी याजकडे जाऊन मुलाजमत केली. नजरवस्त्रें बहंगी[1] २ व रुप्याची झाडें २ बहंगी एक व पस्तोल २ दिल्ही. छ ६ जिल्हेजीं नवाब निजामअलीखान यांस गुलामसैदखान यांनीं मेजमानी केली. सायंकाळीं दोनघटका दिवसास नवाब निजामअलीखान व इभराहीमखान व महंमद गौसखान व शोकतजंग व कादरखान गाडदी वगैरे मंडळीसहवर्तमान आले. खाना खाऊन दोन अडीच प्रहर रात्रपर्यंत नाच जाला. राजे विठलदासहि होते. नाच अखेर जालियावर नवाब जातेसमई गुलामसैदखान याणीं सात वस्त्रें बादली व जडावाचा सिरपेच व कलगी व घोडा एक ऐसी नजर केली. छ ८ जिल्हेजी नवाब निजामअलीखान दरबारास नवाब सलाबतजंग याचे गेले होते. भालेराव पांढरे यांचे पुत्रापासून बारा हजार रुपये नजर घेऊन पंचहजारी मनसब दोनहजार स्वार साहेबनौबत दिल्ही. फकरुदीखान यांचे पुत्रास मेदकची किलेदारी दिल्ही. मीरहसनखान यास येलगंदलची किलेदारी

---

१ बंगी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दिल्ही. मुरादखान छ मजकुरी आले. नवाब निजामअलीखान यांची मुलाजमत केली. पांच मोहरा व दोन बंदुखा व फिरंग[1] एक नजर केली. नवाब सलाबतजंग याची मुलाजमत करावी. त्यास शरीरास समाधान वाटेनासे जाले याकरितां दरबारासही गेले नाहीत. ज्वरास उतार पडला म्हणजे त्यांचीही मुलाजमत करितील. छ ९ जिल्हेजी राजश्री मल्हारजी होळकर यांजकडील वकील जयरामपंत नामे येथें नवाब निजामअलीखान याजकडे आले आहेत. राजे विठलदास यांचे विद्यमानें नवाबाची मुलाजमत केली. प्रस्तुत येथेंच आहेत. राज्याजीचे व त्यांचे एकांती भाषण होत असते. परंतु मजकूर काय करितात तो अद्यापि परस्फुट जाला नाही. बारकाईनें शोध मनास आणून सेवेशी लिा जाईल. नवाब निजामअलीखान यांनीं लोकांस कांही देऊं केले आहे. त्याचा जाबसाल नवाब सलाबतजंग यांसी करितां दरम्यान कांही एक फांट पडला होता, यास्तव नवाब सलाबतजंग छ १४ जिल्हेज बुधवारीं नवाब निजामअलीखान यांचे घरीं जाऊन चार घटका खिलवत जाले. कितेक समाधानाच्या गोष्टी बोलून नवाब स्वार होऊन आपले दौलतखान्यास आले. छ १८ जिल्हेजी नवाब निजाम-अलीखान कितेक लोकांस सिरपाव द्यावयासीं घेऊन नवाब सलाबतजंग याचे दरबारास गेले. त्यादिवसीं दरबार न जाला. नवाब निजामअलीखान एकले खिलवतीत गेले होते. त्यास जडावाचा सरपेच देऊन रुकसत केले. त्याजवर छ २१ रोजीं दरबारास जाऊन लोकांस सरफराज केले. मोरो सुंदर राजे विठलदास याचे बंधु आकोल्यास आहेत. त्यास सा हजारी मनसब किताब राजे मुरारदास बहादर दिल्हा. तसलीमात राजे विठलदास यांनी केली. राजे विठलदास यांचे पुत्रास वासिमांत देवाज्ञा जाली. त्याचा पुत्र लहान संगमनेरास आहे. त्यास हजारी मनसब दिल्ही. त्याची तसलिमात राज्याजीनी केली. आबदुला सिराजी यांस पूर्वी सिकाकोळ राजबंदरीकडे पाठविले होते त्यास सी हजारी मनसब किताब बहादरीचा दिल्हा. रफदुलाखान यास किलेदारी पानगलची देऊन सिरपाव दिल्हा. मालीखान सैद जमालखान याचा पुत्र यास किलेदारी तारीकुंडा येथील देऊन सिरपाव दिल्हा. महमंद अकरंब यास नलगुडा येथील किलेदारीचा सिरपाव दिल्हा. बाळकिसन चौधरी हैदराबादकर यास एलूर व मुस्तफानगर येथील आमीली इजारा देऊन सिरपाव दिल्हा. येणेप्रमाणें सिरपाव देऊन दरबार बरखास्त जाहला. छ २२ जिल्हेजी नवाब सलाबतजंग यांनीं नवाब निजामअलीखान यास मेजमानी केली. निजामअलीखान यास मोत्याची माळ एक व जेगा जडावाचा एक व वस्त्रें दिल्हीं. इभराईमखान गाडदी

---

१ तलवार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यांचे लकीची शादी आहे. आदमखान याचे भावासी निसबत केली. नवाब सलाबतजंग छ २३ रोजी शादीस गेले. इभराईमखान यांनीं नजर एक मोहर पांच रुपये व वस्त्रें ११ व घोडा १ दिल्हा व त्याचे दोघा लेकांनी पांच पांच रुपये नजर केली व नरसिंगराव रामदासपंताचा भाऊ यांनी आकरा रुपये नजर केली. तेथून नवाब स्वार होऊन आपले दौलतखान्यास आले. गोलकुंडातून सरंजाम तोफा व सिसे व दारू व बाण वगैरे आणिले होते, त्यास गोसेमहालांत व च्यार माहालांत कारखाना घालून तोफा दुरुस्त करवितात. व सिशाचे गोले तयार करवितात. नवे तोफांस बैल पाहिजेत याकरितां माहालोमाहलीं बैलांची फर्मास करून आणविले आहेत. नवाब सलाबतजंग यांनीं आपले सिबंदीचे खर्चास पंधरा लाख रुपये देणे म्हणोन नवाब निजामअलीखान यांसी आज्ञा केली, त्यावरून तूर्त पांच लाख रुपये यांचीं सरंजामी करून दिल्ही. पुढें बाकीचेही तजवीज करून देतील. शोकतजंग यांणी दिवाणीचा इस्तफा दिल्हा होता. त्यास नवाब सलाबतजंग यांनीं कबूल न केला, प्रस्तुत दिवाणीचें कामकाज थोडेबहुत त्यांजकडे चालत आहे. सेवेसी विदित होय हे विज्ञाप्ति.

¶*News-letter from the Nizam's court reporting the arrival of Sitaram, the vakil of the Raja of Sikakol, and the daily doings of Nawab Salabatjang.*

No. 197] [*23-8-1759*

पौ छ १३ मोहरम सन सितैन

श्री

सेवेसी विज्ञापणा. येथील मजकूर छ २९ जिल्हेज गुरुवारचे वर्तमाण. रा शमजीपंती आणास राजश्री विठलपंताकडे पाठविले. आजी दोन घटका बसोन मुखे कामाचा निरगम करावा, आपण त्यचप्रमाणे द्रबार भरला होता, भीड फार होती. लोकामधी सिरून कोणासी सागितले. त्यनी मान्ये केले. रा शमजीपंत गेले. दोघाचा जाबसाल जाला. तेच छीनी नवाब निज्यामआलिखाणाचे द्रबारास गेले. रा विठलपंतास सागितले, आजी आम्हास निछेयेरुप करार करून सांगावे. निज्याम आलिखान रा विठलपंत दोघे बसले. विचार करून सागितला. रा विठलपंत बोलले की आपण श्रीमंताकरता तोडजोड करितो हे तुम्हास कलले की नाही? रा शमजीपंतास घेऊन निज्यामआलिखाणाजवल गेले. तेथे जाबसाल जाला. कराराप्रमाणे देतात. त्यत येक बोलून ठेवले की बसालतजगानी आधीक काही देऊ केले तर त्यातोन बदलून पडाल रा शमजीपत बोलले की हे कधी होणार नाही. श्रीमताचे आस्वेसन आहे की

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नाही? तुम्हास कागद वाचून दाखविला. वारेवार काये सागावे? नवाब निज्याम आलीचे काही चितामधी काही नाही. हेच मात्र आपली प्रतिमा वाढऊन दाखविता आम्ही आसे आहो. स्वामीस कागद लिहून पाठवावयाविसी हुकूम केला आसे. ते समई आपण समागम गेलो होतो. श्रृत होये हे विज्ञापणा. बसालत-जंगास खांद्यावर न घेणे श्रीमंताचा करार आहे. तुम्हासी आत्र न करावे. बसालतजंगानी वस्तरे घोडे बोपीलें[1] पाठविले; सेभर गेले तर काये चिता आहे? आपण द्रम्यान आहो. आत्र पडणार नाही, ऐसे रा॥ शमजीपत बोलले. श्रवण होऊन प्रविस्ट होये हे विज्ञापणा. लवकरच डेरे बाहेर होणार आहेत. दसऱ्या-आलीकडे डेरे बाहेर होतील हे विज्ञापणा.

¶*News-letter to the Peshwa communicating the attitude of the two brothers Nizam Ali and Basalatjang and their mutual jealousy.*

No. 198] [*September 1759*

श्रीगजानन

सेवेसी सां॥ नमस्कार विनंती. येथील क्षेम तिसरा प्रहर, आपण सांडणी स्वाराबरोबर पत्रे पा॥ ती पावली. आज निबालकर घाटगे याचे घरी पितरे होती, याजकरिता आवघे मानकरी तेथे जमा जाले. भोजन जाले. रा॥ भवानीपंत आदकोस पुढे येऊन सरकारचे रवेजवेल[2] उभे राहिल आहेत. रा॥ नानासाहेबहि मानकरी दहा वीस पचवीस जे येतील ते घेऊन येतात. वरकड फौज पुढे जाणार हे विनंती.

¶*A letter announcing that Nimbalkar has accepted an invitation to dine with the Ghatges, probably a reply to a query about Nimbalkar's political attitude.*

No. 199] [*12-10-1759?*

श्रीनारसिंह

बंद १/२/३

वर्तमान लशकर ता॥ छ १२ सफर उमरखां ताहरमहमदखानाचा भाऊ यांचे समागमे पाचसे स्वार व गारदी खयेरंनिसाबाई नवाबसाहेबाची याजला रुकसत केले. अवरंगाबादेस येऊन मुरादखानाचे घरचा झाडा मालमालियेतचा घेऊन त्याचे भावाबंदास बायेकास हजूर घेऊन येणे छ १५ सफरास कूच करतील.

---

१ व पील = हत्ती. २ रव = सैन्याची रांग

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथे वार्ता आहे. मुरादखां भावासुधे किलियात आहे. त्याजवर कस्ट तसदी फार आहे. आईश असलियां वाचेल; नाही तर येथे कितेक म्हणतात की निवर्तला. परंतु अद्याप कितेकांस वाचायाचा भरवसा आहे. याचे सोडायाचे जाबसालामधे नवाबाची बहीन होती. तिजला मुखियानी आज्ञा केली कीं आता न सोडिलिया उतम आहे.

बहादूरदिलखानावर सजावल जाले होते. याचे कयेद करायाचे फिकरीत होते. त्याचा फडचा दोन लक्ष येकूनपनास हजार रुपयांवर जाला. त्याची जागीर साठ हजाराची बहाल केली.

मीर मा हुसेनखान याजकडे इजारा हसनाबाद परगना येथील चौथाई प्रा भागानगरचा होता. यावर त्याचा भाऊ व लेक यानी सांप्रत्य भागानगरचे परगणे इजारा केला होता. पहिले त्यानी लक्ष रुपये दिधले होते. सांप्रत्य त्याजवर सजावल करून पनास हजार रुपये आनखी घेतले. लशकरात वार्ता आहे की आनखी लोकास बसऊन त्याजपासून पैका घ्यावा.

मानखानापासून पैका सैद लशकर-खानाचा कोठे आहे तो पुसोन घ्यावा

रायेराया संभुलाल दिवान खासगत सलाबतजंगाचा होता. त्याजला लक्ष रुपये मागतात. पाहव काय होईल.

दाऊदखां जमातदार यान आपले तलबेसाठी हगामा फार केला म्हणऊन याजला येकले दरबारात दबाऊन बसविले. कयेद केले. याचे बसलियावरून आनखी जमादार मधे येऊन फडच्या केला. चौथाई तलब माहबमाह घेत जावी. बाकी तनखा करून घ्यावी. दंगा न करावा.

हयेदरयारखा शेरजेंग यासी मीर मुसाखानासी फार श्नेह आहे. यानी नवाबसाहेबासी करार केला आहे की श्रीमंताकडील जाबसाल वसुलाचा करारमदार जो काही आहे तो आपण त्याजपासी जाऊन बंदोबस्त करून घेऊ. यावर येथे वार्ता आहे की शेरजंगास श्रीमंत दादासाहेबाकडे रुकसत करणार आहेत.

सफदरमहमदखां कोतवालास येकादो रोजा रुकसत शहरास करतील. त्याचे समागमे स्वार गारदी व उमरखां वगयेर लोक तइनात केले आहेत.

रंगोपत वकील जानोजी भोसले यानी अरजी मीरमुसाखाजीचे मारफतीने गुजरानली. गोष्टी स्नेहाच्या फार लिहिलिया होत्या. याजकडोन त्याचे नावा इनायेतनामा सादर केला.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

धोंडी विनायेक वकील नवा(ब)साहेबाचा हयेदरनायेकाचे लशकरांत होता तो भागानगरास आला. त्याचा इतबारी कारकून खते समागमे घेऊन आला आहे. मुलाजमत होईल.

रामचंद्र जाधवराऊ याचे नाव इनायेतनामा गेला होता कीं आपली फौज शाहजी सुपेकर याचे समागमे देणे. त्यावरून त्यानी अर्जी केली की हुकमाप्रमाणे सुपेकराचे समागमे फौज दिधली.

वर्तमान अवरंगाबाद ता। छ २० सफर वार्ता जुबानी कासदअली. शाहजी सुपेकर हजारा फौजानसी घाटाखालते बीड प्रांतात आला. आपली कुटंब बिडाहून घेऊन अवरंगाबादेस यावं म्हणऊन हनवंतराऊजीचे बायेकोस इनायेत-नामा देऊन जाबसाल केला. बायेको मजकूर दोन तीन हजारास्वारानसी येऊन भांडन करायास सिध जालियावरून सुपेकरहि आपले स्वारानसी उभा राहेला. त्याचे याचे भांडन जाले. बायेकोकडील घोरपडा, चव्हान, पावार तिघे मारले गेले. सुपेकराची मानस कामास आली. काही पलाली. सुपेकर जखमी होऊन कयेद जाला. अनखी वार्ता आहे की काही दोन च्यारसे स्वार निंबाल-कराचे चाकरीबदल सुपेकरासी आले होते. काही बोलीचाली म्हणऊन त्यानी सुपेकरास कयेद केल. मारल. [पुढील पाने गहाळ.]

¶*Mutilated portion of a daily report from the court of the Nizam.*

No. 200] [*1-11-1759*

पौ छ ११ रावल
गुरुवार च्यार घटका
रात्र चढती

श्री

आसीर्वाद उपरी. सलाबतजंग शहरदाखल जाहाले. याउपर निजामअली कूच करणार म्हणून सर्व बातमीचे पत्रावरून वर्तमान अवगत जाहाले. ऐसियास कूच करावयास त्यास द्रव्याची अनकुलता असली पाहिजे. दुसरे चरण अगदी नाही. कूच जाहाले तरी आसपासचे गावखेडी दाणा तुम्ही जो त्याचे कबज्यातील तो आधी लुटावा; उरला तो जालावा. सुब्या जालाव्या. उभा शाळू लाहान आहे तो काहीच कामाचा नाही व त्यास इलाजहि नाही. पूर्वी रामदासपंताने चरण बहुत घेतला होता व पीकहि अपरमित ते वेळेस होते. जर त्याच कूच

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

न जाहाले तरी झाडा काढून त्याचे आसपासच व गीर्द आठ कोस लुटून जाळून फना करून टाकणे. कूच जाहाले तरी दोन फौजा करून दो बाजूस जडून असत जावें. वोढे अडचण. पाणी नाही, मजलीमुलें लांबणी पडेल तेथे पथके उठवणे, इत्यादिक करवीत जाणे. छ १० रबिलावल हे आसीर्वाद.

¶*The Peshwa suggests to the Bhausaheb that he should endeavour to cut off Nizam Ali's food-supplies and compel him to retreat.*

No. 201] [*10-11-1759*

श्रीभवानी

श्रीमंत राजश्री विसाजी
पंतबाबा स्वामीचे सेवेसी

पौष्यांकित आंबाजी जिवाजी कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ १९ माहे रावल जाणून स्वामीनी आपले संतोशातिशय सदैव लेखनआज्ञा करणे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले पाऊन संतोश पावलो. तेथे आज्ञा जे, सविस्तर वर्तमान सरकारच्या पत्रावरून कळो येईल व भेटीहि लौकरीच होईल म्हणून लिहिलें. त्यावरून बहुत संतोश पावलों. ईश्वरी दया आम्हावरी पूर्ण आहे तरी स्वामीचे आगमन लौकरीच होईल. आवंदा या प्रांती राजकारणे फार दिसो येतात. प्रस्तुत नवाब बसालतजंग व मुसा भुसी पुलचेराकडून सरकारच्या प्रांतातून बसालतजंग याच्या भेटीस आला आहे. बसालतजंग यांनी नेलूर सर्दपलीकडे (आर) काट प्रांतेस जाणार म्हणोन आवई घालोन, बदवलाजवळी उतरून बदवलात पार मामला व दुउरी(?) ठाणे बसऊन लस्करचे मुा जवळी वामांकी नदी धरून उतरले आहे. कडपेकरास तिनी लाख रुो नजर देणे अगर मुलुक सोडणे म्हणून तगादा लाविला आहे. त्यास कडपेकर नवाब अबुदुल माहसनखानाचा पालक सरवरखानी व माहसनखानाची बाइको बिबी म्हणणार मारावे मराव म्हणून तमाम बरोजगार व चाकर व सुखवस्ती दोनी हजार जमाव करून, मजबुदीने आहेत. बसालतजंग याजकडे जमाव हजार बारासे फौज पायगणती व च्यारपांच हजार बार, तोफा थोर लहान पंनास, जेजायला वगैरे फिरंगी च्यारसे, ऐसा जमाव आहे. आजउदियात नवाब बसालतजंग याणी मागितलिया प्रो पैसे द्यावे, नाही तरी लढाई करावी ऐसा निश्चय जाहला आहे. होईल ते खरे. कडपे मोगलाच्या हातास गेलिया सरकारच्या राज्यासी घसघस आहे. ऐसियासी स्वामीचे आगमन लोकांत जालिया उत्तम.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कडपाची फौज येताना उपरी (फाटलें * *) घेऊन छ १५ रबिलावली गुरमकोंडेस दाखल जाली. आणिक जे काय वर्तमान असेल ते मागाहून लिहा पा. कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*News-letter to Visaji Krishna by Ambaji Jivaji, reporting the aggressive activity of Basalatjang at Kadappa and other places in the Karnatak.*

No. 202] [*21-11-1759?*

पौ छ १ रबिलाखर

श्री

पुा सेवेसी विज्ञापना. पधराहजांर रुा पावले नाही म्हणोन पुरवणी लिहिले आहे. येशास आताच राऊत पैका घेऊन आले. स्वामीचे कूच बुधवारी होऊन इकडेच येणार म्हणऊन सागत होते, त्यास स्वामीची स्वारी इकडे येऊन किला पाहावा म्हणजे पुढे सर्वहि तरतूद आज्ञेप्रा होईल. साडणीस्वाराबराबर किल्याचा नकसा व मोजणी इमारतीची व खंदकाची वगैरे तोफाचा झाडा व गावखेडियाचा तनखेजाबता वगैरे सर्व लिहून शनवारी सेवेसी रवाना केला. त्यास आज पाच दिवस जाले त्याजवर येकदोन पत्रेहि आली. परतु साडणीस्वाराबराबरील पत्रे पावलियाचे उतर आले नाही; तरी पावले न पावले याचे आज्ञा उतर पाठवायास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. विदित जाले पा हे विज्ञप्ति.

¶*The writer prays that he should be informed whether the maps and plans of the fort were received or not by the addressee.*

No. 203] [*23-11-1759*

छ ११ राखर मुा
वानवडी सोमवार सितैन
मार्गसीर्ष

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शामजी गोविंद साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता छ २ माहे राखर मुा हैदराबाद स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित असे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
विशेष. सिधोजी व भिवजी जासूद याजबरोबर आज्ञापत्रे छ २१ रौवलची सादर जाली. ती येथें छ १ राखरी दाहावे दिवसीं पावलीं. अहमदनगरचा किला करारापैकी हस्तगत जाला. पुढे करारातील बाकी राहिले स्थळ व जागिरीचे परवाने करून देतात कीं नाहीं ते लिहिणें म्हणौन आज्ञा. यैसियासी किला घेतलियाचें वर्तमान मुरादखान यानी च्यार दिवस सरकारचे पत्राआगोधर लिा होते ते वर्तमान पूर्वी सेवेसी विनंतीपत्रीं लिा आहे. मुरादखानाचे पत्रावरून राजे विठलदास यांनीं सेवकास बलाऊन म्हणों लागले कीं आम्ही स्थळे व जागीर देत असता हे गोष्ट अमलांत यावी हे विहित नवते. त्यावरून सेवकासी त्यांसी भाषण बहुतप्रकारें जाले की, श्रीमंताही सा महिने करारप्रो अमलांत यावयाची प्रतीक्षा केली. आखेर तुम्ही तों दोन्ही स्थळे व जागीर देऊन चुकले आहां. हाली बाकी राहिले स्थल व जागिरीच्या सनदा करून दिल्हियावर कलह कशास वाढेल! यैसें परस्परें भाषण जालें. त्यास त्यांचे शरिरी स्वस्छ नाहीं, ज्वराचा अतिशये याकरितां राजे विनायेकदास यांस व आम्हास नवाबाकडे पाठविले. तेथे जाऊन यादी निवडून काढविल्या आहेत. त्या रवाना करावयासी अर्ज केला, त्यावरून सेवकास म्हणों लागले कीं, यादी तैजवीज[1] जाल्या आहेत त्याप्रों परवाने करून घेणें. स्थळाच्या सनदाहि देतों. आम्हाकडे काहीं गुंता नाहीं. त्यास सेवकानें विनंती केली कीं, यादी श्रीमंताकडे पाठवितो, तेथून करार होऊन आलियावर परवाने करून घेतले जातील. किल्याच्या सनदा यादीबरोबर पाठवावयासी द्याव्या. त्यास नवाबाहीं मान्य केले. तदनंतर दोन दिवस राजे विठलदास यांची तबियेत फारच काहाली[2] जाली, म्हणौन जाबसाल जाला नाहीं. तों सरकारचे पत्र छ २१ रावलचे येऊन पोंहचलें. त्यावरून राजे विठलदास याजपासीं जाऊन च्यार गोष्टी खरपूस सांगितल्या. त्याणीं राजे विनायेकदास यांजला आम्हाबार देऊन नवाबांकडे लस्करांत पाठविले. त्याप्रों नवाबाचे समक्ष जाऊन उतर प्रत्योतर केलें. त्यास नवाब म्हणों लागले की, आम्हाकडून किले व जागीर करारप्रो द्यावयासी अंतर नसतां जलदी करून किला घ्यावयाचा नवता; अगर आम्हास देणें नसता तर किल्याचा बंदोबस्त पोकळ कशास राखतो? श्रीमंताही किला हस्तगत करून औरंगाबाद प्रांती फौज रवाना केली आहे व जमिदारास जप्तीचेविसीं ताकीद केली आहे व निर्मळवालियास कुमकेचेविसीं पत्रे वरचेवर येतात. बसालतजंग यासहि आश्रय देतात म्हणौन येकतों. त्यास खामखाये श्रीमंतांचे विचारें विरुध्द करावे यैसे असिले तर आमचा उपाये काये? आमचे

---

१ तयार. २ हैराण.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तों चितांत कायेवाचा करारांत अंतर करावयाचें नाहीं. मी फख्त सिपाई, वचनांत अंतर नाहीं. आतांहि किल्याच्या सनदा देतो, यादी करार होऊन आलियावर परवाने करून देऊं, यांत अंतर नाही. याप्रकारें बोलोन, मुनसी-याकरून[1] दोही किल्यांच्या सनदा तयार करविल्या. त्याच्या नकला मुनसीचे हातच्या सेवेसी रवाना करावयासी दिल्ह्या. सनदावर मोहर करून सेवकाचे स्वाधीन अमानत करणार की, श्रीमंतास पत्रे आम्ही लिा आहेत. तुम्हीहि सविस्तर लिहून उतरे आणवणे. श्रीमंताही निःसंशये ल्याहावे म्हणजे किल्याच्या सनदा श्रीमंताकडे आगोधर पाठवणें. जागिरीचे परवानें दोचौ रोजांत तयार करून तुमची रवानगी केली जाईल यैसा निश्चये होऊन खलिता व यादी सेवकाचे स्वाधीन केल्या. तेथून रात्रौ राजे विठलदास याजकडे येऊन त्यांचे पत्र सेवेसी घेतलें आणि सांडणीस्वार नवाबाचे सरकारचा मागोन घेऊन हालीं पत्रें सेवेसी येणे प्रो.

१ खलिता नवाबाचा.

१ राजे विठलदास यांचे पत्र विस्तारयुक्त लाखोटा.

१ यादी जागिरीच्या परगणे गांवगना व जागीरदारांची इसमनविसी[2] लाऊन घेऊन बंद सुमार.

८ सरकार अहमदनगर बंद.
५ सरकार परेंडा बंद.
५ सरकार दौलताबाद बंद.
१ सुबे विज्यापूर बंद.
१ येकंदर यादी बंद.
२०
—वीस बंद.

१ याद विज्यापूरचे सुभांत माहाल सिरे मान्य न जालें तर त्याचे यैवजी निवडून काढिले आहेत त्याची.

२ किल्याचे सनदांच्या नकला सरकारचे मुनसीचे हातच्या.

१ बनाम[3] जानोजी निंबालकर.
१ बनाम कविजंग.
२

---

१ मुनशीकडून. २ इसमवार. ३ नावानें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१ सेवकाचे विनंती पत्राचा लाखोटा.

१ देवाजी नागनाथ यांचे पत्राचा लाखोटा.

८

—येणेप्रो पत्रे मार बेग सांडणीस्वार दिा महंमदखान जमातदार याजबार आज शुक्रवारी रवाना केली आहेत. सेवेसी प्रविष्ट होतील. उतरे नवाबास व राजे विठलदास यास समाधानपूर्वक सादर जालीं पाहिजेत. यादी पाठविल्या आहेत त्यापैकी सिरें वगैरे श्रीमंत मान्य करणार नाहीत. बालेघाटावर देणे म्हणौन रदबदल बहुत केली. त्यास सेवटीं यादी निवडून पाठविल्या आहेत यापैकीं सिरे वगैरे श्रीमंताचे चितास न येतां पाउणे दोन लाख तनखा पावेतो विज्यापूरचे माहालांचे यादींत द्यावे यैसा करार ठहरला आहे, येविसीं सरकारची मर्जी असेल त्याप्रो गावगना यादी ठहराऊन सादर करणार स्वामी खावंद[1] आहेत. नवाबानी सेवकासी उतर प्रत्योतर केलें आहे त्याप्रो समाधानपूर्वक उतरे आलियावर येथें गुंता काही पडणार नाहीं. पत्रांचीं उतरें व परवाने करून घ्यावयाच्या यादी सरकारचे सांडणीस्वाराबार जलदीने आलीं पाहिजेत. सरकारची पत्रे सादर जाली आहेत त्यांची उतरे मागाहून विनंतीपत्रीं घराऊ जासुदाबार रवाना करितो. सेवेसी विदित होय हे विज्ञप्ती.

¶*Shamji Govind Takle writes to the Peshwa that the Nizam is thoroughly displeased with the Peshwa's action in taking secretly the fort of Ahmednagar in spite of a treaty which is being signed to settle matters.*

No. 204] [*27-11-1759*

छ ९ राखर सितैन

मार्गसीर्ष

श्री

सेवेसी विज्ञापना. निबगावचे ठाणे पेशजी मल्हारबानी घेतलें होते, त्यावरी राजश्री जानोजी भोसले याजकडील लोकानी घेतले. गढी पाडून टाकली. त्या ठाण्याविशी राजश्री भगवंतराव कडेकर तेथे विनंती करीतच आहेत व मल्हार(बा)-कडीलहि रदबदली आहे. ठाणे चागले म्हणावें तरी तेहि नाही. यांचा त्याचा काजिया मात्र होतो. येविशीं जसी आज्ञा येईल तसें करू. हशमी लोक नगरचे (फाटलें) * * पाहिजेत येविशी राजश्री दिनकर * * सांगितलें होतें

---

१ समर्थ.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

त्यास प्रस्तुत तेथे दोन हजार हशमी माणूस करार केले आहे, त्यापैकीं साहा सातसे माणुस येथें पा(ठ)ऊन द्यावें. सिंहगडचे बारगीर रिकामे जाहाले आहेत त्यांस येथे पाठवावें. गढी मल्हारबानी घेतली. फिरोन जानोजीबाबाकडील कारकुनाने घेतली. भगवतरायाची विनंती घ्यावी. त्याचाहि कारकून येथे आहे. जसी आज्ञा तसे करायास सिध आहे. जानोजीबाबास बाईट वाटेलच. वतनाचा प्रकार आहे, तो कललाच आहे. नगरांत त्याचा गुमास्ता होता तोहि उठवावा लागेल. यांत जसी आज्ञा होईल त्याप्रो करूं. दोन हजार माणूस हशमी स्वारीचे नेमले, त्यांत पाच सातसे येथे ठेवाया * होऊन यावे. खाजबारदार * * कून येत नाहीं. माधवराम * करावी, सिहगडी भरती जालीच आसेल. बारगीर उतरावे. आपले घोडे आटोपून येतील. दौलतराव घोरपडे यास लाख दीड लाख नेहमी व तीनसे राऊत करार व्हावे. हणमसागर सरजामांत देणे तर द्यावे, जालेहाल देऊ नये. नगर पहिली आज्ञा आली होती त्याप्रो नारो बाबाजीचे हवाला करितो. रा छ ६ रालाखर हे विनती.

¶*The handwriting shows the letter to be from Bhausaheb to the Peshwa, on the subjects of Nimbgaon, Nagar and Jalihal, and the dispute about these places between Janoji Bhonsle, Holkar and others.*

No. 205] [*27-11-1759?*

पुरवणी २

सेवेसी विनंती. येथील मजकूर छ ६ माहे रबिलाखर व मग मुसा भुसी स्वार दोन घटका रात्रीस आपले डेरे स्वार होऊन गेला. मग नवाब तीन घटक रात्रीस स्वार होऊन आपाले डेरेस दाखल जाहल. ता छ ५ माहे रबिलाखर हैदराबादेहून नवाबांचे बातमीचे जासूद आले. त्यानी वर्तमान सांगितल कीं ता १९ छ माहे रबिलावल व सलाबतजंग डेरेस दाखल म्हणून सांगितल. आनखी नवाब निजामअली छ २४ माहे रबिलावलीं डेरे दाखल म्हणून वर्तमान आले आहे. आनखी शाहरमधे घरास व सावकार पाटी लाविली आहे म्हणून येथ वर्तमान आल व निरमलवाले सुरराव याजवरी पाइल काही फौज पाठविल होती त्यास नवाबाचे फौज काही लडाई जाहली म्हणून वर्तमान येथ आहे. तिकडून वर्तमान साहेबास आलेच असल, आनकी येथ वर्तमान नवाबास बिरजनाथा यान लिहिल

+ पत्र भाऊसाहेबांचे नानासाहेबास, यापुढील मजकूर खाशाच्या हातचा आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
होत की मुजफरखान यान जे हरामी केली म्हणून, त्यास श्रीमंत साहेबानी गाडदि-
यास मारून टाकल, म्हणून नाथा यानें तेथून लिहिल होत. मग नवाब बोलले
की जे कोनी कजे हरामी करील त्याचा मुलाजा काय म्हणून बोलले. येथ
वर्तमान आल होत म्हणून सेवेसी लिहिल आहे. सेवकाची तकसीर माफ करावी.
ताा छ ६ माहे रबिलाखर च्यार घटका दिवस चडतां नवाब निजामअलीकडील
अबदुलफकरखान नवाबाचे दरबारास येऊन दोन घटका नवाबाजवल बसला
होत. मग स्वार होऊन अबदुलफकरखान आपले डेरेयास गेला. मग पार
दिवस चडितां अबदुलफकरखान यानें हैदराबादे साडिनीस्वार रवाने केले व
राा मुरारराव घोरपडे याचा वकील व सैदपूरचे मोकामावरी आला होता. आमचे
अगोदर येऊन गेल आहे व घोरपडे याची फौज घाटाखाले गेली आहे. म्हणून
वर्तमान आहे व कर्नूलकर पठाणाचे वर्तमान तरी नवाबाने त्यास बोलाऊ पाठविल
होता. त्यानी जवाब दिल्हे कीं आम्हांस हैदराबादेहून पत्र आली आहेत की
तुम्ही स्वार हजूर येणे म्हणून पत्र आली आहेत म्हणून त्यानी जवाब दिल्हे.
आनकी निजामअली यास पत्र पाठविल आहेत. त्याचे उतर आले तरी तुमचे
भेटीस येऊं म्हणून त्यानी यास जाब दिल्ह. आनकी सिद्यास कौल पाठविले
आहे. नवाब निजामअली याने इभरामखान गाडदी यास काढून दिल्हे म्हणून
वर्तमान आले आहे. आम्ही येथून बातमी रो भगवंतराव याजकडे पाठवीतचेहो.
आनकी व जर (?) केरूरच किलेस राा लक्षुमनराव यास पत्र पाठविलेच आहे.
बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*A report of daily happenings from the Darbar of Nizam Ali is sent to the Peshwa.*

No. 206] [*27-11-1759*

श्रीपुरवणी

सेवेसी विज्ञापना ऐसजे. ताा छ ६ माहे रबिलाखर येथील मजकूर खममचे किलेस
सिलेमखान याचे मोरचे लावले होत, त्याजवरी नवाबाकडील मीर आबास त्याज-
बरोबर हजार गाडदी व तोफा पाच गुडरेच ठाने मधे होत, त्यास नवाबाने
बोलाऊ पाठविल होत. तो येताना खममवरी न आला. सिलेमखानास त्यास
दोन कोसाचा आंतरा होता. त्यास सिलेमखान मीर आबास यास सागून
पाठविल की तुम्ही आम्हाकडे यणे म्हणून सागून पाठविल. मग त्यान जवाब

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दिल्ह, आम्ही कोनाकडे येत नाहीं, म्हणून सांगून पाठविल. मग सिलेमखान याने तजवीज केली कीं मीर आबास याजवरी चढून जाव, यासीच पाईल[1] टकर घवी म्हणून तजवीज केली. वर्तमान मीर आबास यास कळताच याने रात्री जाऊन सिलेमखानाचे लस्करावरी सपा पडले. सिलेमखान व त्या(चा) पुत्र गुलाबखान तो दोग पाळून गेले. लस्कर लुटल गेल. शहे दोन मानूस कामास आल. नवाबाचे लोकास काही व दोन तोफा याचे हातास लागले म्हणून वर्तमान आले आहे. येथ मीर आबास येणार आहे. आलेवरी बयाजवार सेवसी विनंती केली जाईल. नवाबानी आदबानीचे फौज गुलाम मोहिदीनखान यासई बोलाविल आहे. त्याचे वर्तमान आहे. मोकेवरी आहे म्हणून वर्तमान आहे. ताा छ ९ माहे रबिलाखर नवाबानी मुसाभुसी व जुलपुकारजंग यास मेजवानी केल. आगाडीस लस्करातून आद कोसावरी जिलेबचे डेरे नदीतीरी आबरीमधे दिले. हे दीडपार दिवस चडता, आपन स्वार होऊन डेरेदाखल जाहले. मग मुसाभुसी यास बोलाऊ पाठविल. मागील पार दिवस राहतां मुसा भुसी जुलपुकारजंग आले होते. शहेभर[2] स्वारानिस आल. मग येताच त्याची जेवन जाहल. व इदु हिंदु लोकांस मिठाई दिल्हे. जेऊ (न) उठलेवरी मुसाभुसी व जुलपुकारजंग हे नवाबाजवळ आले. मग नवाबानी च्यार घटका कळं-वातणीचा नाचा करवि(ला). मग मुसाभुसी व जुलपुकारजंग याने नबास अर्ज करून आपले बरावरी घाडिदी याचे सुबेदार व कुमनदा यास मनसब करून दिल्हे तरी हे आम्हास रान देतील म्हणून अर्ज केल. मग नवाबानी कबूल केल. मग वअलीयारखाने वाता(?)यास च्यार हजारी मनसब दोन हजार स्वार, आलंमनगारा सिदी हिलाल यास एक हजार पाचसही मनसब किताब हाजी हिलाखा व हाजी मुनी सुबेदार गाडदी याचा त्यास पाचसही मनसबे मुनीखां व उमरखान सुबेदार यास पाचसेही मनसब किताब उमरखा व सुलतान साहेब यास पाचसही मनसब किताब सुलतानखा व नरसना दुभासी यास किताब मैईपातराव रामचंद्र-राव यास दोन हजारी मनसब व नागोराव यास दोन हजारी मनसब व हजार स्वार इतके यास नवाबानी मनसब दिल्ह. शावाल दस्तक करून दिल्हे. कागदपत्र करून दिल्हे हे विज्ञापना.

¶*News-letter from the Nizam's camp, reporting the entertainment given to Bussy by the Nizam and the gifts and honours bestowed on various persons. The writing is not very clear.*

---

१ पहिली टक्कर घ्यावी. २ शंभर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 207] [*Rccd. 23-12-1759*

पौ छ २ जाबल

संध्याकाल प्रहर रात्र

श्री

विज्ञापना च्यार घटका दिवस राहाता हिवऱ्यावर मुकाम जाला. पछाडी हिवऱ्याकडे आहे. हिवऱ्याजवळून स्वारी आली. गढीजवल लस्करचे लोक जातात त्याजवर गढीचे लोकानी गोळे टाकिले. प्रस्तुतहि लस्कर कहीवाले वगैरे हिवऱ्याजवल जातात त्याजवर गोळ्या टाकितात. वरकड वर्तमान मागून तपसील लिहिण्यात येईल हे विज्ञापना.

¶*The paper describes a skirmish at Hivare.*

No. 208] [*26-12-1759*

पौ छ ६ रबिला-

खर सितैन

श्रीविठलराज

श्रीमंत माहाराज राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक त्रिंबक जगनाथ सा नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान ता छ ५ माहे राखर मुकाम सिवपटण माहाराजांचे प्रतापें येथास्थित असे विशेष. छ ३ माहे मजकुरी नवाबाचा इनायेत[1]नामा सांडनीस्वाराबार राजश्री हणमंतराव निंबालकर यासी येऊन पोहचला. त्यामधें मजकूर लिहिला आहे कीं, आपन डेरेदाखल जालो. तुम्ही जलदीने बर्मये[2] फौज मातबर हजूर येऊन पोहचणे. येथे आलियावर तुमची परदाख्त[3] (?)चितानरूप केली जाईल. सर्व प्रकारे खातीरजमा राखणे व राजश्री गोपालराव वकील रावमजकूर यानीं पत्र पाठविले त्यामध्ये मजकूर लिहिला आहे की, राजश्री सदाशिव नारायेण दिवाण सुंदराबाई श्रीगोंदियामधे आहे त्याची पत्रे वरचेवर राजश्री विठल सुंदर यासी रावमजकुराचे नालिसीची[4] जातात त्याजवरून ते यासी बहुत आजुर्दा[5] आहेत. रो लक्षमन खंडागले यासी पांच हजार फौज ठेवणे यैसे सांगितले. त्यास परबनी परगणा जागीर देणार, राव मजकुराचे ठाई आरूचे[6] फार धरली आहे, परंतु थोर सरदार,

---

१ कृपापत्र, आज्ञापत्र.

२ फौजेसुद्धां.

३ बरदास्त.

४ निंदा.

५ नाखुश.

६ अरुचि=अप्रीति.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

फौज मातबर येकायेकी बिगाडता येत नाही. दुसरे बसालतजंगाकडे यांचे मानस हेहि त्यास आसाध्ये आहे. रो विठल सुंदर दिवान निजामआलीखान व सदासिव नारायेण दिवान सुंदराबाई हे धाकुटपणी येके जागा विद्याअभ्यास करीत होते ते वळख धरून जेव्हा बाईवर दिवानावर नानाजी जगनाथाने आरगला[1] केली, तेव्हा सेर (?) दरबार विठल सुंदरानी राव मजकुराचे वकिलास व कारभारी सांगितले कीं सदाशिव नारायणाचे सर्व प्रकारे आम्हास आगत्ये आहे. तुम्ही त्याची खलासी करणे. नाहीतर उतम नाही. दुसरे वकिलानी वर्तमान लिहिले आहे कीं, इभराहीमखान गाडदी दूर केले, त्यास लस्करबाहेर काहाडून दिधले. सांप्रत त्यांचे वकिलास पैगाम[2] केला आहे की, तुम्ही गाडदी मजकुरास समजाऊन घेऊन येणे. त्याचा पूर्ववत गौर केला जाईल; व नवाब बसालतजंग आदोनीसंनिध बमये फौज व गाडदी व तोफखाना मातबर सरंजामानसी व मुसा लाश फिरंगी त्याचे समागमे यैसे आहेत. आरकाट वगैरे मुलूक जप्त केला. पुढे दरयेक स्थलच्या नजरा घेतात. त्यास निजामआलीनी बहुताप्रकारे समाधाने करून लिहितात; परंतु ते याचा इतबार धरीत नाहीत. राजश्री हणमंतराव निंबालकर यानी च्यार हजार फौज सही[3] केली. गाडदी यानी देवडीवर हंगामा केला म्हणौन त्यास दूर केले. पुढे कारभारी सिपारस करितात. मागती बहाल करतील किंवा कैसे हे पाहावे. षष्टी जालियावर बिडास जानार. तूर्त येक मास नवाबाकडे जात नाहीत यैसी बोली दाट आहे. याहीवर निकडीची पत्रे आली तरी पाहावें. रो सोनजी भापकर याचा मुकाम खडकतावर होता तेथून कूच करून माहाराजाकडे येणार. रो येसाजी भगवंत याचीहि रवानगी करितो यैसे बोलतात. चरणरजांचे स्वाधीन च्यार जासूद जोडी आहेत. तीन रवाना हजूर केल्या. येक जोडी राहिली. आज्ञा तर चहू रोजा बातनी रवाना करावी. यैसियास जोडीयास सत्वर आज्ञापत्र देऊन आम्हाकडे रवाना करनार माहाराज समर्थ आहेत. विशेष काये लिा हे विज्ञाप्त.

¶Trimbak Jagannath informs the Peshwa that the Nizam has requisitioned Nimbalkar's forces as war is imminent. He also refers to Ibrahim Khan's dismissal from the Nizam's service and the differences between Basalatjang and the Nizam.

---

१ अडथळा. २ बोलणें लागले आहे. ३ नेमली = तयार केली.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 209] [*27-12-1759*

छ ६ जावल शुक्रवार

दोन प्रहर

श्री

विज्ञापना. सुक्रवार साहा घटका दिवस आल्यावर नवाब स्वार जाले. आज स्वामीचे सैन्यातून यांची बातनी आली कीं फौजाची निवड जाली व बाजू वाटून दिल्ह्या आहेत. त्याजवरून याणीहि फौजा मिसलबंदीप्रो जिकडील तिकडे सांगून स्वार जाले हे विज्ञापना.

¶*A despatch to the effect that the Nizam has divided his army and has assigned the divisions their respective positions.*

No. 210] [*27-12-1759*

छ ६ जालौवल शुक्रवार दोन प्रहर

श्री

विज्ञापना छ ६ जावल शुक्रवार. स्वामीकडून याजला बातनी येऊन पोहचली कीं स्वामीनीं आपल्या फौजा चहूंकडे निवड करून वाटणी केली आणि तयार होऊन येत आहेत. याजवरून याणीहि आपले फौजेची चहूंकडे वाटणी केली आहे. पछ्याडीस उजवे बाजूंस आगाजी सरगर व नवाजखा व कादरखा गाडदी व पछ्याडीचें तोंडावर खंडागलें व खंदारकर व पछ्याडीचे डावें बाजूस हनवंतराव निंबालकर आगाडीचे बाजू डावे बाजूस शिवाजी केशव व पांढरे वगैरे डावे बाजूस आगाडीचे रामचंद्र जाधव व आनंदराव निंबालकर व शंकराई व रायेणा व नासरजंग सेखआलीखा व अबदुल बदीखां सुद्धा अगाडीस महमुदखां गाडदी दरमियान नवाब निजामुदौला व नवाब सलामतजंग व कबीर माखा व त्यांचे डावे बाजूंस इस्माइलखा पठाण याप्रमाणे मिसलबंदी[१] केली आहे आणि चालत आहेत. तोफाहि चहूंकडे वाटणी करून दिल्या आहेत. बहिरबुनगे दरमियान घेऊन चालत आहेत. हे विज्ञापना.

¶*Details of the Nizam's forces and the positions of the various commanders are communicated to Bhausaheb in this letter.*

---

१ सैन्याची रचना,

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 211] [*27-12-1759*

पौ छ ६ जावल

शुक्रवार दोनप्रहर

श्री

विज्ञापना. छ ६ जमादिलावल शुक्रवार प्रातःकालीं दोन घटका रात्र असतां कुच्याचा नगारा जाला, लस्कर तमाम तयार जाले. आज निंब्यादेहाऱ्यावर घाट चढून जावें हा मार आहे. मग पाहावें कोठें जाऊन मुकाम करितात. परमानंदाचे खेडल्यांत[1] सुरतसिंग हजारीचा व्याही होता. तो प्रस्तुत पनास पाऊणसें स्वारानसी सुरतसिंग हजारीकडे आला आहे. पहिले तो आपले सरकारांतहि होता. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A news-letter referring to the Peshwa's progress.*

No. 212] [*28-12-1759*

पौ छ ८ जावल तीन

प्रहर रविवार

श्री

सेवेसी कृष्णाजी नारायेण साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ ७ जावल संध्याकालपावेतो वर्तमान दोन घटिका दिवस मागील राहिल्यानंतर मिसलबंध[2] करून निजामआली डेरादाखल जाहाले. सलाबतजंग आगोधर डेरे होताच डेरियासी गेले. डोंगरावरच्या तोफा मागती मिसलीच्या मिसलीस लागू करून जागा जागा आपले मिसलीस गेले. उदईक मजकूर[3] केला कीं, दोन प्रहर रात्रीस नगारा करून दिवस न निघाला तो कोसभर जमीन जावे. आज येथें मुकामासी नेमणूक नहती. मुकाम मौजे कुंभे भालवणी येथील नेमला होता; परंतु चोहीकडे फउजेची बंदोबस्ती जाहाली याजकरिता मुकाम केला. उदईक दोन तीन घटका रात्र असता स्वार होऊन जातील. याप्रमाण मजकूर केला आहे. बाजारात आज कोठून लूट न आली व गावहि कोठे लागला नाही. याजकरिता माहर्गता येणप्रमाणे.

गला वजन पके.	तांदूळ वजन पके.
४।६ बाजरी वजन पके.	४४६ बारीक चांगले.
० जोरी मिळत नाही.	४४६॥ मध्यम प्रतीचे.

---

१ जिल्हा नगर. २ कोणीं कोठें उभें राहावें याची योजना. ३ मसलत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

४४७ हरभरे.	४४७ मोठे आसडी.
४४१४९ तूप.	४४६ कणीक
४४२॥ गूल.	४।२ दाल तुरीची.
४४।।।९ साखर.	खुर्दा टके पका
४४३ तेल.	२।
	४॥७ लाकडे वजन दर रु(प)यासी

यणप्रमाणे निरेखे[1] वगैरे वर्तमान आहे. येक दोन या प्रकारे घाबरे केले तरी माहर्गताहि पडल. आज गोपालरावजीनी हती येक घेऊन गेले. कबोडी[2] तटे वगैरे बहुत नेली, माणसहि मारली. त्याजउपराती खाशास खबर जाहाली तेव्हां तिकडील बंदोबस्तीस पतके पाठविले. याणी दुसरा मजकूर केला आहे की, जे समई आपल्या फऊजा येतील त्यासमई झेंडे उभे करून बहीर जमा करून तोफा घेऊन लडाव, झेंडे उभे केल्याने बहीर जमा लवकर होत्या त्याजवरी आज आपल्या फउजा आल्यानंतर मुकामासी जा(ऊ)न पावले. येथें मुकाम केला. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. संध्याकाल जाहल्यानंतर पाऊस थोडकासा आला होता, त्याणे कमाणा भिजल्या. तोफाचे वायेबार केल. बंदुकाहि मोकल्या केल्या. वरकड अधिकोतर वर्तमान काहीं आणल्यानंतर लिहोन पाठवितो. सेवेसी श्रुत होय विज्ञापना.

¶*Movements of Nizam Ali and Salabatjang are reported.*

No. 213] [पो *30-12-1759*?

पो छ ८ जावल

रविवार प्रहर रात्र

श्री

विज्ञापना. रविवार संध्याकालचा दोन घटका दिवस राहतां नवाब निजाम-आलीखान डेरेदाखल जाले. मुकाम जाल्यावर च्यार घटकापावेतों पछाडीकडे उभे होते. उपरांतीक डेरेदाखल जाले. वरकड लोक आपलाले मिसलीवर उभे आहेत. अगाडीस स्वामीचे सरकारचे लोक काही नमूद जाले होते, त्याजवर तोफांचे गोले डागिले. कांहीं फौज निवड होऊन पछाडीकडून स्वामीचे

---

१ बाजारभाव. २ ओझ्याची.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

फौजेकडे आल्या आहेत. या सैन्यापासोन तरी निघाल्या. मग तलावा देऊन येतील, किंवा कोस दोन कोस पुढें येतील * * * * यास्तव सावधता असावी हे विज्ञापना.

¶*The writer communicates the movements of Nizam Ali and advises caution.*

No. 214] [*1759?*

छ ३ सवाल

(पहिले ५ बंद असावे.)

श्री

६ पुा विनंतीपत्र

रुखसत करावे ऐसा करार ठरला. बसालतजंग नवाबाकडे आले. नवाब बसालतजंगास घेऊन छ ५ सावानी जेथे बहीर सोडून गेले होते तेथे बहिरीत दाखल जाले. तेथून कूच दरकूच अवरंगाबादेस आले. बसालतजंगास अद्याप रुखसत करीत नाहीत व रुखसत करावयाचे मानसहि दिसत नाही. सुबेदारी विज्यापूर सुभ्याची यांचे नावे आहे, तशी आहेच. तालुक्यांत कामाचा सरंजाम दिवान पोहोचावितो. कळले पाहिजे म्हणोन सविस्तर विनंती केली असे हे विनंती. रवाणा छ ४ रमजान.

¶*This is the last of six sheets of a letter, communicating the arrival of Basalatjang, Subhedar of Bijapur.*

No. 215] [*1759?*

श्री

सेवेसी विज्ञापना यैसीजे. याच्या आपल्या भेटी उदईक रविवारीं होतील. त्यास आपण येथून थोरल्या येवनाचे भेटीस उदगीर प्रांते तो आहे तेथें जाणार. अवधियांचे बलात्कारें तेथें भेटीस जाणें जरूर जाहालें आहें तर आपण येथें व्यंगोक्तीच्या गोष्टी बहुत आइकिल्या आहेत. आपण उदागीर प्रो जातील तेव्हां सेना बस्त समागमें न्यावी व दर्शन घेणें तें बहुत विचारेंकडून सावधपणें घ्यावें. जंवरीं त्यांजपासून आज्ञा होऊन च्यार मजली येणें होये तंवरी बहुत बहुत सावधता असावी. लक्षां विनंतीचे जागा हे विनंतीचे स्मरण असो द्यावें. भेटीस येतो तरी हेच विनंती करणें होती. पत्रीं तरी हेच * * * * * चिटी वाचून फाडून टाकावी हे विज्ञप्ति.

¶*The writer advises that the utmost caution should be observed in paying a personal visit to the Nizam. The date and reference in the letter are uncertain.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 216] [?

श्रीनारसिंह[1]

वर्तमान लशकर ताा छ २ रबिलावल नवाबसाहेबाही सिकार हरणाची तयार केली आहे. नित स्वार होऊन जातात. रात्री तिरनदाजी करितात. अवघे अमीर दरबारास येतात. कांहीं कामकाज दस्तखत जाले नाही.

श्रीमंत दादासाहेबाची पत्रे शुतरस्वाराबरोबर पावली. पावलियाउपर मीर मुसाखाजी व गुलाम सईदखाजीस बोलाविले. त्यासी खिलवत केली.

शाहाजी सुपेकरास दारकाबाईने मारले म्हणऊन अर्ज जाला. त्यावरून फरमाविले आहे की राजे रामचंद्र जाधव यासी इनायेतनामा पाठविणे की सुपेकराचे लेकाची कुमक करून दारकाबाईस तोडणे. यावर न अयेकेल तर तिचा मुलक बीड प्रांत जप्त करणें.

खतें जानोजी भोसले याची रंगोपंत वकील याचे मारफतीनें आलीं. त्यावरून शामजीपंत टकले यास जानोजी भोसले याजकडे पाठवावयाचा नेम जाला, शामजीपंत टकले जानार आहेत.

हयेदरयारखानास बरा वाटत नाही म्हणऊन मीर मुसाखांजी याचे घरास अले. सफदर महमदखां याचें पुत्र पुडे जाऊन आपले घरी आनिले. येक प्रहर बसले होते. सीरचेच अकरा पांघुरणे दिधली, आतां हयेदरयारखाजीस बरा वाटत आहे. दरबारास गेले होते. त्याचा पुत्र छ १५ रबिलाखरी रुकसत होनार आहे.

शामजीपंत टकले यानी रसद देऊन उंडनगाव व जाफराबाद येथील जागीर हयेदरयारखाजीपासून इजारा करून घेतली. त्यासी श्नेह फारसा आहे.

वर्तमान अवरंगाबाद ताा छ १५ रबिलावल इनायेतनामा येथील अधिकारी याचे नांव अला की हयेतखानाने बावीस हजार रुपये शहरचे लोकापासून घेतले. याचे खत मुकीमखा हिमतखानाचा मेहवना याने लशकरांत लिहिले ते खत धरले गेले. हजुरात पोहचले म्हणऊन हयातखांवर सखती करून पयेका हुंडी करून पाठवणे. त्यावरून येथले अधिकारी याने त्याचे घरी आणपानी बंद करून तीन दिवस उपासी ठेऊन रुपये वीस हजार वसूल केले. हजूर पाठविले.

येथे वार्ता आहे की श्रीमंत माधोराऊजीस हयेदरनाकाची खते अली की वीस लक्षे रुपये देऊन सुला (सल्हा) करितो त्यावरून सुला जाला. परंतु अद्याप तहकीक वर्तमान आले नाही.

वर्तमान अले की चाभारगोंदियामधे स्वार फौज चाकर ठेवितात, श्रीमंताही नालबंदी फौजेस दिधली तयारी होत आहे. मोगलावर जानार आहेत.

---

१ पुढील काकीदींतील पत्र आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

परगणे टाकली येथे ठाने श्रीमंत दादासाहेबाचे बसले. वाळजेत मुराखानाचे जागीरचे गावावर सरदेसमुखाने जप्त केली.

सदासिवराव रामचंद्र याचा अमल पा वालजेत आला. येथील सुबेदार अमल देत नाही, म्हणत आहे की अठरा हजार रुपये आमचे परगणियावर अहेत त्याची निशा करून देणे परगनियांत जागीरचा अमल करणे.

कविजंग व अनखी याचेविशई हयेदरयारखानी मीर मुसाखानास म्हणऊन नवाबास सागून इनायेतनामे अमदानगरास पाठविले ऐसी वार्ता आहे.

¶*Daily report from the Nizam's court communicating the news to the Peshwa.*

No. 217] [*23-6-1760*

श्री

सेवेसी विनंती सेवक माधवराव सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम छ ९ जिलकाद प्रहर रात्र मुा नायेगाव स्वामीच्या कृपेकरून कुशल असे. सांडणीस्वारासमागमे पत्र आलें तेथें आज्ञा कीं तोफखाना घेऊन अविलंबे येणें, त्याची आज्ञेप्रमाणेंच मजली लांब करून स्वामीसेवेसी येऊ हजर होतो. दोन चार रोज अधिक लागले यास्तव धणी रागास येतील त्यासी काम किरचंड बहुत, परंतु स्वामी आज्ञेवरून रात्रीचा दिवस करून आटोपिले. सहा तोफा व तीन संदुका व दोन गरनाळा व त्याचा सरंजाम जो लागेसा तो समागमे घेतला आहे. आजी एथें नायेगांवी मुक्काम केला. उद्यां मंगळवारी वरवंडावरी मुक्कामास जाऊं. गुरुवारी भीमापार होतो. प्रतिपदेस स्वामीच्या पायापाशी दाखल होतो. हे सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Madhaorao Shivdev informs the addressee that as instructed he has, without delay, started to join him.*

No. 218] [*1759 ?*

श्रीशंकर

सहश्रायु चिरंजीव राजश्री माधवराव यासी आसीर्वाद उपरी. श्रीमंत राजश्री नाना येथे कलमास[1] आले. तुम्ही लस्करसुधा कूच करून कलमास येणे. रा नारोपंत यास पत्र रा भिवराव याणी लिहिले जाहे, तोफखानासुधा येणे. बहुत काये लिहिणे ? रा मंगलवार तिसरा प्रहर, हे आसीर्वाद.

¶*The addressee Madhaorao (Panse ?) is ordered to come to Kalam with his troops and guns.*

---

१ गांवाचें नांव (कलंब).

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 219] [13-8-1760

श्री

साहेबाचे सेवेसी दंडवत विज्ञापना येसीजे. आज्ञापत्र आले तेथे आज्ञा कीं कूच करून श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे बाजूनें बाजू उतरावें. त्यांस काल मंगलवारी रोहे रामेश्वर येथेच मुकाम करावा लागला; कारण कीं मागून येक दोन पथके येणार होतीं तें आली. छ १ मोहरमी कूच करून मौजे हरगूल परगणे आवसे येथे मुकाम केला. उदईक कूच करून लस्करानजीक येतो. सडे होऊन श्रीमंत राजश्री दादासाहेब यासी पोहोचतो सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer promises to join the army under Dadasaheb.*

No. 220] [1759?

पुरवणी वंद २.

खंडागलाहि मारला जाईल आणि मोगले लोकहि धरले जातील. प्रां भोकर्दन यथील ठाणे खंडागलियाने घेतले. कमावीसदाराची घोडी वगैरा वस्तभाव व धोंडो राम याचे पुतणे प्रा मजकुरी मजमूच्या कामावर होते त्यासी यांचीहि घोडी व वस्तभाव कुल नेली. ते यका पांघुर्णासी शहरास आले. राजाराम बाबूराव कमावीसदार कनडातून हजूरच्या रावतानी पुणियासी नेला, म्हणोन हिमत-खानाच्या येथे वर्तमान आले होते. मुरादखा खरडियासी आले आहेत. सुलतानजी निंबालकर याजकडून समजाविसीकरितां पाहावे मनसबा काय करितात. सिवाजीपंत बेदरीहून पडदुराकडे आला आहे. तो उंडणगांव व धावेडे या प्र-गणियात यतो म्हणोन आयकतो. ऐसे वर्तमान आहे. यक पत्र दर्गाकुली-खानास व यक पत्र हिमतखा कोतवाल यासी लिहावे म्हणजे बातमीच्या उपयोगी आहे. यांत जे माहाराजाच्या मर्जीस येईल ते खरें. मी चाकराने इतका परिहार लिहावासा नाही, परंतु याची पत्रे आली म्हणजे उतम आहे. दर्गाकुलीखा आपलिया सारखिया गोष्टी सांगतात आणि याचा जिव्हाला आपलियाकडेच आहे. उगाच त्याजसारिख्या गोष्टी सांगतात. जे वर्तमान नवलविषश आलिया, वरच्यावर लिहीत जाईन. सेवेसी विज्ञाप्ति.

¶*This is only the second sheet of a letter announcing the capture of Bhokardan by Khandagla and other items of news of the Nizam's Sardars.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 221] [*1759 ?*

श्रीपांडुरंग

सेवेसी विज्ञापना. लस्कर मोगलाचें कुंभारी[1] मंगरुलावरच आहे. सिनरकर देशमुख फतेसिंग आपल्या जमावानसी सें दीडशें श्वार व काही प्यादे हती (एक) १ ढाल यैसे श्रीच्या दर्शनास यवनाच्या लस्करातून आले आहेत. श्रीदर्शन करून सिनराकडे जाणार म्हणतात. आज भोमवारीं क्षेत्रास आले. सेवेसी कलावें म्हणौन लिा आहे. बहुत लिहिणें शक्ति नव्हे. कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The Nizam's forces are reported to have arrived at Kumbhari and Mangrul.*

No. 222] [*Recd. on 2-1-1760 ?*

छ १२ जावल पौष
सितैन

श्री

सेवेसी विज्ञापना यैसीजे. सोनजी भापकर पुण्याहून पलोन बिडाकडे आले. तेथून येक ब्राह्मण वकील व अर्जी येथे पाठविली आहे. वकिलाची मुलाजमत छ २७ राखरी राज्याजीनी दरबारास नेऊन केली. त्याचा मुदा आहे की, तुमचे सरकारात चौघे सरदार मन्हाटे आहेत त्याप्रों जागीर मनसबेने वाढविल्यास मी हाजर आहे. त्यास येथून उतर जाईल त्याप्रो सेवेसी लिहून. याचे भारबारदारीस उंटे नवती त्यास उंटाचे कारवान आले होतें त्यापैकीं दोनसें उंट नव खरीद करून त्यामध्यें शंभर उंट सलाबतजंग याकडे दिल्हे व शंभर यांनीं आपल्याकडे ठेविले. काली उभयेता बंधू व राज्याजी यैसे च्यार घटका कूचसमई येके जागा बसोन काये मनसबा थाटला ते ते जाणत. जाहिरत लांब लांब मजली करावयाचा निश्चये ठहराऊन मुकामास आले. याउपरी सा सात कोसी कूच करून नांदेडचे रुखे जाणार. पुढें मन्हाटे सरदार वगैरे मिलालियावर सांडणीस्वाराबार आज्ञापत्रें येतील त्याप्रो पैरवी करणे ते करितील. सुरारायावर यांचा दांत मोठाच होता; परंतु स्वामीकडील जाबसाल येक प्रकारचा दरपेश[2] आला आहे यास्तव त्याची समजावीस हरयेक प्रकारची काहाडून त्याजला हाती घेणार. स्वामीकडील सल्लखाचा विचार ताली न बसलियास पुरती हाताभोवती गुंडाळून खामखा झुंजणार, यांत संदेह नाही. दिलीकडील[3] बातनी कलमी याकडे आली कीं, आबदाली

---

१ जि. सोलापूर. २ पुढें. ३ पत्र शामजी गोविंद टकले याचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लाहोरास लाख स्वारानसी येऊन दाखल जाला. त्या प्रांती मऱ्हाठ्या फौजा होत्या त्या झाडून निघोन दिलीस येके जागा जमा जाल्या. पातशा वजीर यास खर्चास दोन लाख रुपये देऊन पातशाहास बाहेर काहाडिले. दिलीतील साहुकार वगैरे तमाम पलोन आगरियाकडे येतात. हा फितूर सर्व मलकाजमानी व मनसूर आलीखानाचे पौत्राचा आहे. याउपर येईल वर्तमान ते विनंतीपत्री लिहा जाईल. शेवेसी विदित होय हे विज्ञाप्ति.

¶*Shamji Govind Takale informs the Peshwa how Sonji Bhapkar, a prominent Maratha sardar, has been won over by the Nizam. The letter also reports news from Delhi.*

No. 223] [*5-1-1760*

छ २२ जमादिलोवल
सितैन पौष
भौमवार

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ-
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक कृष्णाजी फुलांबरी[1] मुा लस्कर नजीक कारंजेकड विज्ञापना. येथील क्षेम तागाईत छ १५ माहे जमादिलावल पावेतो साहेबाचे कृपा (द्रिस्टी)-करून येथास्थित आसो विशेष. राजश्री जानोजीबावा व मुधोजीबावा याच्या भेटी जाल्या. मुधोजीबावास दिवाणगिरीची वस्त्रें दिल्हे. कामकारभार यानी करावा. वरकड लोकांचा समजाविसीचा तह पडला आहे. दोचौ रोजी देणे घेणे करून बंदोबस्त करावा यैसा येथील मजकूर आहे. आठाचौ रोजी कूच करून तिकडे येणार म्हणोन बोलतात. त्यास रा देवजीपंत व बालाजी केशव या उभयेतास रा पिराजी नाईक याच्या जोड्या गेल्या आहेत कीं दोघास दो गडावर घालावें. यास रा मुधोजीबावा याजकडें जोड्या व कागद आल्या होत्या की तुमच्या जोड्या पाठऊन त्या उभयेतास गडावर घालण म्हणोन आल्या; परंतु यानी त्यांस उतर केले जे वडील तुम्ही आहे. तुम्ही जोड्या पाठऊन गडावर घालणें म्हणोन त्याच्या जोड्या गेल्या आहेत. परस्तुत कारभारांत रा रघोजी करांडे व नानाजी कृष्ण आहेत. त्यास रा त्रिंबकजी राजे व व्येंकटराव यासी पुढे आपणाकडे पाठवावे; यैसे बोलतात की जाऊन कामाचा बंदोबस्त करिता तो आपणहि आठा

---

१ फुलंब्री.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चौ रोजी मागून येतो. दोनी फौजा मिलोन पंधरा सोला हजारपावेतो आहेत. सरकारचे सांडणीस्वार पहिलहि दोघजण आले आहेत आणि हलीहि दोघ आले त्यास रवाना करणार आहेत. कागदपत्र तयार जाले आहेत. मागून सांडणी-स्वार आले त्यावरून जलदी निघावयाची आहे. जलदीन जाऊन पोहचावे यैसे वर्तमान येथील आहे. साहेबाचे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶*The reconciliation and the subsequent meeting of the Bhonsle brothers are communicated to Bhausaheb. The Bhonsles have agreed to keep Dewajipant in confinement, says the writer.*

No. 224] [*6-1-1760*

श्री

सेवेसी रामजी रायाजी घोगरे विज्ञापना. छ १६ जावल मुकाम तर नवाबाचा जाला. फौजा चहूकडे उभे आहेत. माहाराजाच्या फौजा डावे बाजूस येऊन उभ्या ठाकल्या याजकरिता इकडूनहि विनायकदास व मुरादखान व शंकरी व रायणा डावीकडे जाऊन उभे राहिले आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Message from one Ramji Ghogre giving dispositions of the enemy's troops.*

No. 225] [*9-1-1760*

छ २३ जमादिलावल

श्री

राजश्री सदासिव पंडित
गोसांवी यासीं

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो फतेसिंग भोसलें रामराम विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष. सांप्रत आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लिहिला अर्थ सविस्तर कलों आला. निज्यामअलीखानांनी जागीर व किले द्यावयास केले त्यापैकीं नगर घेतलें. बाकी येक किला व जागीर द्यावी ते द्यावयास अन-मान करितात यैसें दिसोन आलें. त्यावरून नगराहून कूच करून दरमजल गंगातीरें मंनरथास येणें जालें. मोगल थोडा आहे; मन्हाटे अद्यापि आले नाहींत पुढें त्याचे सुमारें जात असों. आपलेकडील फौज राजश्री आपाजीराव दिवाण

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यांबा सत्वर लाऊन द्यावी; व उतरेकडील वर्तमान सिंद्यानी पठाणास बरेच जेर केलें. प्रस्तुत सलुखावरी पडिलें आहे. वजिराने पातशाहा नवा केला. आतां सारे येकत्र होऊन आबदाली लाहोरावर आला आहे त्यावरी जाणार म्हणोंन लिहिलें तें साद्यंत कलोन बहुत संतोसी जालों. निज्यामआलीनीं अनमानाचा जाबसाल केल्यास श्रीकृपेने त्याचे अगोंध[1] आपणास काय आहे? आपणच हैगैखालीं नेऊन आजीवर रक्षिलें. पुढें चितावर धरिल्यास सर्वहि यथास्थित घडोन येईल; तरी यंदा सावधपणें सारा विचार मनोदयानरूप करून घ्यावा. आम्हास सदैव संतोशाचें वर्तमान यावें हेंच सर्व काल इछित असों. * * वरचेवरी साकल्यार्थ लिहीत जावा; व उतरेकडील * * सुवार्ता निरंतर लिहित जावी. आपले सरदार व * * * * सर्व येकत्र जाल्यावर आबदालियाचेहि कठिण नाही. वर्तमान येईल ते सदैव ल्याहावें कळलें पाहिजे. येथील फौज पाठवावयाचा मजकूर तरी मागेंच फौज आपल्यापासीं यावी; परंतु राजश्री आपाजीराव[2] दिवाण यांची समजावीश न पडली. ते पुण्याहून रुस्वा करून वाईस गेले. सांप्रत राजश्री पंतप्रधान यानीं राजश्री आपाजी भावजीचे पुत्र रा रावजी आपाजी यांस फौजेचा मजकूर सांगोन पाठविले ते पर्वी येथे आले. हालीं यांबराबरी इकडील सरंजामी पथकें व पागा देऊन लौकरीच आपल्याकडे रवाना करितों. आजी उद्यां निघतील. गुंता किमपि नाही. देशचीं पथकें व पांढरे हे आपल्यापासीं आलेच असतील अगर आणवावे. वरकड आपण मोगलाच्या तोंडावरी आहों. यास्तव तेथे कोणेविशी गडबडों नये. चिंता करूं नये म्हणोन लिहिले तरी आपण असतां फिकीर काय आहे? दिन प्रतीनें आपला प्रताप ज्यादा व्हावा हेंच येक लक्ष धरून वरचील चिंता सर्व सोडिली. सदैव पत्रीं साकल्यार्थ लिहित जावा. रा छ १९ माहे जमादिलोवल. स्वहस्ते[3] तपसिलवार लिहिले तेनेकरून बहुत संतोश जाला. आपन आसता कोनाची काये फिकीर आहे. आपन सर्व फौजा जमा करून आपले मनोदयानसार होईल. रात्रंदिवस आपनास कल्यान इछितों. ईस्वराजवल तुमच्या प्रतापापुढे कोनाचेहि चालणार नाही. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Bhonsle acknowledges a letter from Bhausaheb informing that war with the Nizam is inevitable as the latter is unwilling to cede the territories stipulated in the treaty.*

---

१ कठीण. २ गाडगीळ.

३ येथून पुढें अक्षर फत्तेसिंगाचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 226] [*10-1-1760*

छ २१ जमादिलावल
सितैन पौष

श्री

विनंती. सेवक विठल शिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. छ २० रोज गुरुवारीं लष्करापुढें दोन कोंस तेथून कूच करून चौदा कोस आलों तों उदगीर दाहा बारा कोंस पुढें आहे. उदगीर काल चोवीस कोस होती. मोगलांकडील वर्तमान लष्करांतून माणसें आलीं व गावगना वर्तमान व सरकारच्या जोड्याहि आल्या त्या पावल्या असतील. काल मोगल उदगीरीपासून पांच कोंस होता; आज उदगिरीस दाखल होणार. उदगीरीपासून दो कोंसावर हेरोल[1] आला होता. मुकाम उदगिरीचा जाला. काल जाधवरायाची भेटी जाली. इकडें माणसाच्या सांगण्यांत मोगलाच्या लष्करांत वर्तमान कलबुर्ग्यावर बसालत-जंग आला, त्याजकडे दरकूच मोगल जातो. धारूरच्या घांटे निंबाळकर मोगलाकडे येणार. त्याची सावधगरी करावी. बसालतजंगावराबर घोरपडे दोन आहेत. मुरारजीचें नांव घेतात. मुधोळकराचे, त्यांत लंगडा घोरपडा आहे. त्यास मुधोळकरच दोघे मालोजी संकराजी आहेत. त्यास मुरारजी म्हणतात हें न कलें. गावढली वर्तमान लष्करांतून माणसें आलीं तीं सांगत होतीं. त्यास मोगलाची बातमीस हजार दोन हजार मऱ्हाठे बातमीस बाहेर निघाले ऐसें वर्तमान आहे. आम्ही उदैक चंद्रोदयीं स्वार होऊन उदगिरि संनिध जातो. काय वर्तमान तें कळेल. मोगलाचा मुकाम जाला तर घांटाखाले ती कोंसावर राहूं. कूच जालें तर उदगिरीपुढें जाऊं. स्वामींनीं सावरगावचा घांट चढोन सडी फौज करणें तर करून पुढें लांब चालावे. उदैक होईल वर्तमान ते सेवेसी लिहूं. आज दोन च्यार कोंस आम्ही पुढें जावें, परंतु सरकारचीं पथकें कृष्णाजीपंताखेरीज लष्करांत होतीं ते आज चौघटका दिवस राहिल्यास सामील जालीं. बरगे अद्याप आले नाहींत; रात्रीं येतील. तैसेंच आम्हांकडील कितेक लोक गोटांतच होते. आज दगडी राण जाल. फार पडले. नालबंदीसाठी व मागील लोकांसाठी तृतीयें प्रहरीं मुकाम केला, उदैक नजरानजर होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. दारूं गोळी कांहीं पोहचली तर उतम असें, हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdeo reports to Bhausaheb the movements of Nizam Ali and Basalatjang and Jadhavrao on the eve of the battle of Udgir.*

---

१ आघाडीची टोळी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 227] [*11-1-1760*

श्री

पुा राजश्री सदासिव पंडित
गोसांवी यासी

विनंती उपर. मोगलाच्या लस्कराचे वर्तमान छ १४ जमादिलोवलचे मौजे येकराल पा बोधन येथील मुकामचे आले. त्यास उदगिरीकडे यावयाचा मजकूर आहे. साहा रोजानी उदगिरीस यावे. उदगिरीहून कलबरगे, धारूर अवसे, दोन तीन विचार जावयाचे आहेत, त्यामध्यें उदगिरीस आल्यावर कोणत्या रोखें होतात पाहावें. या प्रांते यावयाचें कारण उभयता निंबालकर व जाधवराव त्रिवर्गास मेलऊन घ्यावे यैसें यैकिजेतें. आपणास कलावें यास्तव लिहिलें असे. रा छ २१ माहे जमादिलोवल. यां[1] गोस्टीची फिकीर आपन केलीच आसेल. सूचनार्थ लिंहिले आहे. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Bhonsle sends Bhausaheb news that the enemy's army is moving towards Udgir to effect a union with the forces under Nimbalkar and Jadhav.*

No. 228] [*17-1-1760*

श्री

सेवेसी कृष्णाजी नारायेण विज्ञापना. छ २७ जमादिलोवल प्रहर रात्रपावेतो वर्तमान येथास्थित आसे विशेष. वर्तमान नवाव निजामअलीखान दोन प्रहरी डेरादाखल जाहाले. नवाब नासरजंग याचा हती येथे राहिला होता. तो मस्त होता. तो आज याणी आपल्याच काल्पतें[2] घेऊन आले. तो बांधा होईना. याजकरता त्यावर चिरेंकी[3] सोडली त्यायोगे करून त्याणे माणे (?) (माणसे) व बईल बहुत मारले. माणूस १ बईल पाच, घोडी दोन म्हईस १ माणूस गडेकरी यणेप्रमाणे मारून दोन घटका दिवसापासून मागे निंबालकराचे मिसली-पलीकड डोंगरात उभा होता. माहात वरच आहे. बहुत उपाय केले परतु हाती यासी आटपेना. भाले बहुत मारले. हाती तेथेच आहे. माणसे, राऊत, सारे माहात गेले होते परंतु हती हाती लागेनासा पाहोन मागती माघारे

---

१ पत्र फत्तेसिंग भोसले अक्कलकोटकर यांचें असें. २ कळपांत.
३ दारूचे बाण.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आले. माहात हातीन दुसऱ्या हातीचा धरून मारीत होता परतु भाला डेरेहि येक दोन फाडले. येणेप्रमाणे हतीने काजकाम केले. आजचा निरेख येणेप्रा.

वजन पके		लाकड पैशाची
८८२	ताा मोठे साा	८८१
८८१॥	ताा बाा साा	खुर्दा टके
८८१॥	कणीक	२। पका
८८२॥	पीठ बाजरी जोरी	० नालबदीस रुो दोन लागतात
८८३	जोरी बाजरी	८८४ मीठ
८८२॥	दाल तुरची	अजमासे येथे खर्च येणेप्राा
८८॥९	तूप	३००००० माणूस
८८॥९	तमाखू	५०००० घोडे
८८॥९	सुपारी	३००० उंट
०	पाने	७५००० बईल
	१०० कची	२५० हती
	७५ पकी	३०० गाढवे
८८१	गूल	
८८२	तेल	
८८॥	साखर	

येणेप्रमाणे आजचे वर्तमान. जिनस पहिल्यानें मात्र दाहाविसास मिळाला. आता काही मिळत नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Narayan describes the confusion caused by an infuriated elephant in the Nizam's army. The writer also gives the rates of some articles.*

No. 229] [*Recd. on 12-1-1760*

छ २२ जमादिलोवल

शनिवार

श्री

सेवेसी विज्ञापना. फौजेत दारूगोलीचें साहित्य कोणीकडे नाहीं. किरकोळ थोडीसी आणिली होती ते जाली. त्यास दारूगोलीची पोख्त बेगमी व बाणाचे उंट दोनच्यार यैसे पाठवावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ असेत. +सेवेसी

+ येथून पुढें अक्षर विठ्ठल शिवदेव यांचे हातचें असें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रृत होये हे विज्ञापना. सांडणी स्वार सरकारचा व निजामआलीखानाचा यैसे लस्करातून आले ते आज्ञेप्रो पुढे रवाना केले. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdev asks for a supply of ammunition for his artillery.*

No. 230] [*Received on 13-1-1760*

छ २३ जमादिलौवल
रविवार

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीनी मजकूर सांगितला तो सर्व श्रीमंत राजश्री दादासाहेबांस सांगितला. सर्व गोष्टी उतमच आहेत, परंतु रात्री बाहेर जागत बसावें, त्याने बेवसवास राहावे, आम्ही वसवास खाऊन राहतो, ये गोस्टीने त्यास हिमत आपल्या स्वरूपास योग्य नाही. छेबिने मातबर तीन ती रोजा काली यैसे नेमावे. जे दिवसी रात्री अगर पाहाटे हला छापा घालणे ते दिवसी रात्री जागून करावे यैसी मरजी आहे. याप्राा श्रीमंत दादासाहेबी स्वामीस लिहिले आहे. दरकूच चालेल तेव्हा राहाणे तर राहावें यैसे आहे. यांत स्वामीची मरजी तैसी आज्ञा करावी. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Orders about the operations are issued shortly before the battle of Udgir.*

No. 231] [*13-1-1760*

छ २३ जमादिलौवल
सितैन रविवार

श्री

वडिलांचे शेवेसीं विज्ञापना. आम्हीं आजी दोन प्रहरां मोंगलांचे लस्कराजवळ गेलों. राजश्री विठलराव याची आमची भेटी जाली. प्रस्तुत ते आम्हीं येके जागांच आहों. वडिलीं आज्ञा नवती म्हणून लडाई न जाली. चांगले निवडीचे लोक जवळ गेले होते. दाहा पांच बाण मारिले. गोली थोडी बहुत वाजली. त्याचे लोकहि नाल्याचा अश्रा धरून लस्कराबाहेर जवलच उभे होते. घोडे थोडे राऊत गाडदी पुढें आले होते. लढाई आज्ञाहि आजीची नवती. प्रातःकालीं जो विचार करावयाचा असेल त्याची सविस्तर आज्ञा करावी. आता मुकामास आलों. मोंगलापासून तीन कोसावरी आलीकडे मुकाम केला आहे. मोंगल भालकीचे वेलेपेक्षांहि थोडकाच आहे. कलावें हे विनंती.

¶*Raghunathrao to the Bhau : reports a slight skirmish.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 232] [*13-1-1760*

छ २३ जमादिलोवल सितैन

प्रहर रात्र सितैन

श्रीशंकर

+सेवेसी विज्ञापना. मोगलाजवल आलो. मोगल पाहिला. फार थोडा दिसतो. बाहेर गाडदी हजार दीढ हजार व फौज असी तुटून आली आहे. आम्ही जवल आहो. बाणमात्र कांहीं मारविले. लडाईचे जोगे आहे; परंतु स्वामीसी आज कबूल केले होते की, जुंझत नाहीं. बाणमात्र थोडे बहुत मुहूर्तानें मारून माघारे येऊ, यास्तव माघारे गोटास जाणार. ते फारच तुटून आले तरी मारावे लागतील. फारसा मोगल नाहीं. स्वामीस कलावें. विठल सिवदेव वगैरे पथके यास बोलाऊन घेतलें. सकाली आपण केव्हां येणार ते त्याहावें. आम्ही आज उजवे बाजूस स्वामीचे पडलो. कलावे हे विनंती.

¶*Raghoba reports that he has moved near the enemy's forces which appear to be too small to withstand a heavy attack from the Maratha lines.*

No. 233] [*14-1-1760*

छ २४ जमादिलोवल

सितैन पौष्य इंदुवार

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीनी चिठी पाठविली तेथे आज्ञा कीं श्रीमंत दादासाहेब गोटास गेले म्हणून यैकिलें. बहुधा गेले नसतील. तुम्हीहि गेला नसाल. गेला असला तर चौक्याचा बंदोबस्त करणें. इकडून काही आवाईची खटपट होईल त्याची बातमी राखणे म्हणून आज्ञा. गोटास जावे, छेबिने ठेवावे म्हणून स्वामीस दादासाहेबी लिहिले होते, त्याचा स्वामीनी राजश्री महिपतरायाबा सांगून पाठविले. त्यावरून राहावयाचा निश्चये जाला; परंतु जेथे उभे होतो तेथेच राहावे, परंतु पाणी जवल नवते; आणि गैरविल्हें लोकाचा चारादाणा येणार नाहीं याकरिता गोटापुढें खडीच्या सुमारे दादासाहेब आम्ही सर्वत्र राहिलो. येक छेबिना द्वारकोजी निंबाल(कर), जनार्दन राम, बरगे, हांडे, परकाले यैसे मातबर चौकी जिकडे उभे होते तेथे ठेविली आहे; म्हणजे स्वामीकडील गोटापुढेंहि बंदोबस्त राहिला. मोगलासहि पायेबंद इकडील राहिला. त्याचे डावे बाजूनें चौक्या बसविल्या आहेत. खबरदारीस अंतर होणार नाही. आज इकडून दिवसाची खटपट बरीच जाली. बाण गोळे

+ पत्र रघुनाथरावाचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चालिले. त्याच गारदी तोफा चालून वोढण्यापलीकडे आल्या. आपल्याकडील बाण टाकावयास लोक व गारदी गेले होते त्याजवर चालून आले. त्यांची याची बरीच गोलीगोली जाली. हे निघोन आल्यावर ते पाठविर आले तेव्हां राउतानी दाटी करून हटाऊन लाविलें. इकडे तोफेच्या गोल्यानें व गोल्यांनीं सा सात घोडीं पडलीं. येक दोघे भले माणूसहि पडले. आम्हाकडील तीन घोडी ठार जाली. येणेप्रो वर्तमान इकडील असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdeo reports a skirmish between the Maratha advance-guard and the Nizam's outposts.*

No. 234] [*14-1-1760*

पौ छ २४ जावल
दोनप्रहर भोमवार

श्री

विज्ञापना. छ २४ जावल मंगलवार प्रातःकाल च्यार घटका रात्र राहाता कुचाचा नगारा जाला. लस्करची तयारी होत आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

काल रात्रीं मुरादखां तेथून येथे आले. दरबारासच गेले. त्या वेळेस रामचंद्र जाधवराव व राजाजीहि होते. प्रहरभर खिलवत होती. उपरांतिक घरास आपलाले गेले. सेवेसी श्रुत होये. हे विज्ञापना.

¶*The letter gives the news of the march of the Nizam's armies.*

No. 235] [*15-1-1760*

पो छ २४ जावल
भोंवार दोनप्रहर

श्री

सेवेसी आज्ञाधारक रामजी रायाजी विज्ञापना. छ २४ मंगळवार मागील चार घटका रात्र असता कुचाचा नगारा जाला. लस्करची तयारी होत आहे. कालरात्रीं मुरादखा येथें आले ते दरबारास गेले. दरबारास रामचंद्र जाधवहि आले होते. प्रहरभर खिलवत जाली. उपरांतिक घरास आले. न जाणू कसा विचार जाला. आज शोध लागेल. मराठे सरदारानी जितके हनमंतराव वगैरे आहेत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

याजल' मोठी खर्चाची येऊन पडली आहे. लोक खर्चास मागत आहेत. याजला मागें पुढें फार पाहतात, की यैसे वेळेस कोठून द्यावे? जे होते ते सरून गेले. बोभाटसा आहे. लस्करात अन्नाची मोठी महर्गाई आहे. जोंधळे ८।' सजगुरे ८८८ गहू ८८७ कणीक ८८४ पीठ बाजरी व जोंधळे ८८६ तूप ८८।।। याप्रमाणें निर्ख कालचा आहे हे विज्ञापना.

¶*A news-letter announcing that the Nizam has taken the offensive, that he is in consultation with Ramchandra Jadhav and that they are in great straits for money.*

No. 236] [*15-1-1760*

श्री

विनंती. सेवक विज्ञापना छ २५ जमादिलावल नवाबाचा मुकाम कसबे पाडास उजवे देऊन डेरे केले. मौजे वऱ्हाडावर आघाडी जाली. येथील मजकूर माग लिा आहेत. राजे विठलदासाचे पागेस दोन घोडीं घेऊन आले. आपले पागेमधी मोहनसिंग बारगीर होता तो येथें फार कहरी करीत आहे. आर्जा मुकाम त्याणेच कसबे पाडसास घेऊन आला. सारे रात्र विठलदास निज्यामआलीखाण त्यास निजूं दिल्हे नाहीं. सारी कारस्तानी सांगतो. फितवा फार जाला. कोणाचे मरजीस येत नाहीं. स्वामिकार्यें करून दाखवावें. सर्व भाग्येहाण जालें. सर्व करतवेत्ता स्वामीचे स्वाम आहेत. बरें वाईट स्वामीनीं आपलें स्वारीत करावें, खुशमता सर्व मिळाले आहेत. सेवेसी श्रुत होये. आतां सलुखीचा प्रकार तोडे मागितलि ते द्यावे. पैसा पणोपण (?) आहे. आम्हापासून आडविलें पाडून घेतलें. आतां आम्हीं * * खात्रेस येईल तें घेऊन ऐसा विचार आहे. हे विज्ञापना.

¶*The Peshwa is informed that one Mohansing has spoken contemptuously about him to Nizam Ali and Vithaldas.*

No. 237] [*Recd. on 15-1-1760*

छ २५ जमादिलौवल
सितैन भौमवासर

श्री

सेवेसी गुंडो कासी विज्ञापना यैसीजे. कादरखान व सूर्याराव व सोकतजंग यैसे कहीस गेले होते. कही भरतां स्वार साहेबाचे ५० आले. याची फौज मोगलाची गारदी व स्वार मिळोन पांचहजार होते. ते उभेच होते. पन्नास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्वारांनीं घोडीं दटाऊन कहीवर आलें. उंट तीन घेऊन गेले. कादरखान वगैरे यांच्यानीं कांहीं पुढें होवले नाहीं. अडचा प्रहरां मागारें फिरोन पछाडीवर येऊन पोहोंचले. आपलाल्या मिसलेवर[1] आले. मागती साहेबाच्या फौजेवर तोफाचे गोले च्यार डागले. निशाणें मागारीं साहेबाचीं सरलीं. यावर मागारें येऊन कादरखान २ दरबारास गेले. घटका १ तेथें बैसोन उठोन डेरियासी आले. साहेबाचा मोर्चा तोफाचा लागला आहे. तो मोर्चा बहुत उत्तम आहे. यैसाजे. साहेबांकडील तोफाचे गोले रामचंद्र जाधवाच्या डेरियापासी येऊन पडले. रामचंद्र जाधव अघाडीस तेथून गोला जातो तों वरूनच जातो. कोन्हास न लागे यैसा मोरचा उत्तम प्रकारचा आहे. बान येक निजामलीच्या डेरियापासी येऊन पडला. लशकरांत खलबल फारशी जाली. मानसें ३ जीवें मेलीं व घोडीं २ मेलीं. जखमीं मानसें च्यार जालीं व घोडीं जखमीं २ जालीं. यैसे वर्तमान जालें. कबिले व वस्तभाव वगैरे उदगिरींत गावांत पाठविलें. आणिकहि पाठवणार. सडे होणार. आजीं धान्यें दर रुपयाचें शेर ४४६ जालें आहे. थोर खलबल जाली आहे. कळावें. यानंतर येकडीस सिवेस खेडेयांस अंतर दिढा बानाचें आहे. तेथें गारदी निशाणें सात आहेत गारदी ४०० च्यारसें पांचसें आहेत, व त्या वोस खेडियास व निजामअलीच्या डेरियासी अंतर बाना १ येकाचें आहे. त्या निशाना-पासी जेजाला ७५ आहेत. सेवेसी श्रुत होय. साहेबीं जिवाजी नाईक व जासूद पाठविलें ते पावले. त्याजमागून जोत्याजी काळे व बाबाजी काळे व बाबाजी नाईक यैसें दो घटकां रात्रीस आम्हापाशीं पाठविलें. जबानीं वर्तमान सांगितलें त्यावरून कळलें. आम्ही बरे सावध घटके घटकेची बातमी पाठवणार सेवक असो. कादरखान याच्या चित्तांत कीं छापा घालावा. आम्हीं बंदोबस्त करणें ते करूं परंतु दगा करणार आहेत. विभ्रामखानावर[2] कादरखान फारसा कष्टी आहे. उदईक कादरखान तुमच्या लशकरावर बाहेर निघणार यैसी वार्ता आहे. वरच्यावर सेवेसी बातमी पावेल. बाबाजी नाईक व जोत्याजी काळे रातोरात साहेबांकडे येतील. जबानी वर्तमान याजबरोबर पाठऊं ते सेवेसी श्रुत करतील. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Gundo Kashi to Bhausaheb : reporting a skirmish of the foraging parties of the two combatants and the advance of Kadarkhan on the following day.*

---

१ नेमिलेल्या जागेवर. २ इब्राहीमखान.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 238] [*16-1-1760*

पौ छ २९ जमादिलोवल
सितैन माघ सणवार

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे चरणसेवेसी

सेवक आज्ञाधारक सिवराम आनंदराव सां नमस्कार विनंती उपरी. आजी छ २६ माहे जावल बुधवार दोन प्राहरावरी जाधवराव याचे गोटावर गोले सुटले, ते पहिला गोला येऊन जिनसीत पडून बैल ठार जाहला. दुसरा गोला जाधवराव याचे कनातेस लागोन पडला. तिसरा गोला देवडीनजीक आपले राहुटीजवल पडला. चौथा गोला आम्हाजवल राहुटीस लागोन हंसराये मुनसी याचे राहुटीत पडून माणसाचा पाये मोडला. मरेल. ५ पाचवा गोला रा श्रीनिवासराव याचे राहुटीपासी पडून येक सिपाई व घोडी ठार जाहली. याउपरी जाधवराव दक्षेण दिशास फौजसह वर्तमान उभे होते त्यापासी पडून दोघ भले माणूस व घोडे २ ठार जाहली. माणूस जगणार नाही. पाये मोडला आहे. लस्करात जाधवरायाचा डेरा व झेंडा मात्र उभा राहिला. बुनगे व लोक पलोन पछयाडीस गेले. सेवेसी कलावे हे विनंती. आमचे राहुटीपासी पडला तो गोला सेवेसी पाठविला आहे हे विनंती.

¶*Bhausaheb is informed of the casualties caused by the artillery.*

No. 239] [*Received on 16-1-1760*

पो छ २६ जमादिलोवल

श्री

राजश्री सदाशिव रावजी गोसांवी यांसी

श्रीमंत प्रतापगुणवंत ऐश्वर्यकुसुमविलसितैकवसंत श्रेष्ठोदार्यस्वभाव श्री माहाराव जसवंत निंबालकर दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणोन निजानंद लेखन करावें विशेष. शास्त्रसंमतानुमतें लोकरीत कीं देव भूदेव श्रेष्ठसेव्य यांजला जे कृपांकित त्यांनी मकरसंक्रमणप्रयुक्त तिलशर्करा स्वश्रेयस्करा जाणोन अर्पावी. म्हणोन लोकरीतीप्रमाणें संक्रमणाचे तील शर्करायुक्त सेवेसी पा आहेत. तिळीं यावे म्हणोन लिहावे तरी आपण पूर्वीच तिळीं आले आहेत याजकरितां न लिहिले. हे विनंती.

¶*Janoji Nimbalkar sends his Sankrant greetings to Sadashivrao Bhau.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 240] [*16-1-1760*

पैा छ २६ जोवल
पौस्य बुधवार

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीकडे लढाई बहुत जाली. आम्ही घरी राहिलो यामुले तोंडास शाई लागली. आमचा इलाज काये ? लेक चाकर ज्या चुलीस घातले तेथे जळावे. तेथे राहावयाचा विचार सांगितला तो प्रत्यास न आला. आम्हास राहू द्या ते न थैकिले. स्वामीचे दोन निरोप आम्हास पाठवणे म्हणून आले. जाऊ देणे विनंती केली. जाऊ नका साफ सांगितले. आज संध्याकाली अंताजी माणकेस्वर याच्या फडनिसाबा निरोप सांगून स्वामीनी पाठविला की विठलपंतास मोगलाचे पाठीमागे पाठवणे. बापूजी नाईक ते खटपट करतील थैसे सांगून पाठविलें तेहि मरजीस येत नवते; परंतु बापूबा फौज पाठवणे. तुम्ही राहाणे. आम्हाजवल कोण्ही नाही; तेव्हा बापूबा फौज देऊन बापूजी नाईकाच्या सहावर पाठविले. मग सा घटका बसऊन विचारे विचारे करून बोध करून उदैक खासे निशाण फौजा घेऊन आम्ही तेथ नेहमी राहावे. कृष्णराव, रामचंद्र गणेश थैसे निशाणाजवल आम्ही राहावे. बापूने आमचे फौजेत राहावे. श्रीमंत दादासाहेबी श्नानसंध्या करून मागून यावे. सातसे लोक त्याजबा नेमिले. येणेप्रा करार ठराऊन चौ घटका रात्री डेऱ्यास आलो. रामचंद्र गणेश स्वामीकडे पाठविले आहेत, येणेप्रा वर्तमान सांगितला. प्रातःकाली श्रीमंताचे खासे निशाण घेऊन येतो. माझा अन्याये नाही. आज्ञेप्रा वर्तावे लागते. स्वामीचे हुजरातचे लोक जखमी व ठार जाले असतील ते मातबराची नावे ल्याहावयास आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdev expresses his regret at having missed the battle.*

No. 241] [*Received on 17-1-1760*

पौ छ २७ जालौवल
सितैन पौष्य गुरुवासर

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी आज्ञाधारक सिवराम भास्कर व रामचंद्र माहादेव सा नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम स्वामीच्या कृपाविलोकनेकरून येथास्थित जाणून स्वकीये निजानंदलेखनाज्ञा केली पाहिजे विशेष.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राजश्री दमाजीबावा गायेकवाड समसेरबाहादुर यासी आज्ञापत्र जासूद घेऊन आले ते उतम समई प्रविष्ट होऊन संतोषाभिवृध जाली. पत्री आज्ञा की, खासा स्वारी बहुत दिवस निघाली असता आद्याप तुमचे येणे होत नाही हे काये ? त्यास, दमाजीबावास व आज्ञाधारकास निजध्यास हाच आहे की, फौजेसह आविलंबे खावंदासंनिध जाऊन पोहचावे. याकरिता पुण्यांत कर्ज काडून लोकास नालबंदी नगद दिल्ही आसता देसच वलणचे लोक येऊन पोहचत नाहीत. याकरिता नित्य तीन कोस कूच करितों. प्रस्तुत लोक दररोज येतात. पागा गुजरात प्रांतीहून आणविल्या होत्या. प्रांत दूर, त्याकरिता त्यासहि दिसगत यावयासी लागली. प्रस्तुत पागाहि काही आल्या व काही आठाचौ दिवसात येऊन पोहचतील. आणि फौजसह राजश्री दमाजीबावा सेवेसी मजल दरमजल येतात. त्यास व सेवकांस हाच उदेग आहे की, आविलंबे खावंदाजवल जाऊन पोहचावे. इतकियावर विलंब नाही. खावंदचाकरी येकनिष्ठ करून दाखवावी आणि विशेष ऊर्जित करून घ्यावे हाच विचार निरंतर आहे. श्रृत व्हावे. विशेष लेहावे तर खावंद ईश्वरस्वरूप ऊर्जित करणार समर्थ आहेत, हे विज्ञाप्ति.

¶*The writers, obviously in the employ of Damaji Gaikwad express regret at the latter's inability to join the armies of the Peshwa who had summoned them. The difficulties, they add, will soon be overcome and they will join without further delay.*

No. 242] [*18-1-1760*

पो छ २८ जालौवल

सितैन माघ शुक्रवार

श्रीमार्तंडनाथ

सेवेसी भास्करराम विनंती यैसी जे. उभयेता मुख्य दोन प्रहर दोन घटका दिवस जालियावर स्वार जाले. तेथे उजवी बाजूकडे सैफुलाखां व इमामजंग व खंदारचा राजा यैसे तिघें व टावी (डावी ?) बाजू चंद्रसेन राजा व सुलतानखां व काही रिसालदार व आगाडीवर गुलाम सईदखां व इसलामखां पठान व सरमस्तखां व येक दोन रिसालदार व पछाडीवर सुऱ्याराऊ व कादरसाहेब व जाफर आलीखां व तिघें रिसालदार याजसिवाये मध्यें दोन्ही बाजूकडें फौज यैसे मार खात खात येऊन आपले चौकीचे स्थलीं दोन दीड घटका दिवस असता मुकाम जाला. तदनंतर रात्री गुकारपूर्वकाची भेटी घेतली. म्हणो लागला की

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh.

आजी काही नवलआपूर्व वर्तमान नाहीं की सांगावें. इतके लिहा की इंकारपूर्वक नूतन गारदी तुम्हाकडे आला आहे त्याकडोन बहुत सावध असने. त्याचा इतबार न करणें. दगाबाज आहे. मी त्याचा आहे म्हणोन सागितले आसे. बुनग आवघें किल्यात सोडिले. काही किंचित समागमे आले आहे. माहगाईहि बहुत होईल. चारा मात्र आजी थोडाबहुत मिळाला आपले तळाचा. रात्री लस्करहि बहुत सुनसान होते. तळबनीत (?) नित खासे डेरें व लस्कर पडले आहे. यैसे वर्तमान छ २७ जावल रोज गुरुवारचें आसे. हे विज्ञापना. कागदाची पाने ५ (६ ?) बंद करून पाठवायाची आज्ञा केली पाहिजे. येथे कागद मिळत नाही. लिहायासी तर अगत्य पाहिजे हे विज्ञापना.

छ २८ सुकरवार

नगारा कुचाचा जाला कलला पाहिजे.

¶*The writer Bhaskarram gives the movements of the enemies' forces and asks the addressee to be on his guard as regards Ibrahim Khan who, he says, is not to be trusted.*

No. 243] [*19-1-1760 ?*

श्रीशंकर

सेवेसी विज्ञापना. पत्री आज्ञा जाली कीं सकालच्या व संध्याकालच्या तोफा भारी माराव्या, दुपारच्या फार मारू नयेत. त्याप्रमाणेच होईल. कालचा दिवस तर उगाच गेला. आज उत्तम मुहूर्तसमई दो प्रहरा तोफा लागू केल्या. थोडकीच मारगिरी जाली. तोफा तापल्या. या उपर संध्याकालच्या मागती लागू होतील. आज्ञेप्रमाणेच होईल. आजच मुहूर्तेंकरून निशाण मोर्च्यांत आणिले. निशाणाजवल मी येऊन नेहमीच राहिलो आहे. आजून मोर्चेयाची सोय जाली नाहीं. जागा जागा मोर्चे उगेच बसले आहेत. याउपर बाजूनें बाजू नेमून देऊं; त्याप्रमाणें मोर्चे बांधोन कायम होतील. पुढें दरोबस्त खडक, सुरुंग चालावयाचा प्रकार नाहीं. तोफाचे मारगिरीनें जेर जाल्यावर जो प्रकार होणे तो होईल. स्वामीचे पुण्य समर्थ आहे. माणूस किल्यातील आहे ते खरे चांगले आहे; परंतु सलाबतीनें जेर होत येतील. तोफाहि सोय पाहून दुसऱ्या आणवितो. स्वामीचे दराऱ्यानें सर्व होईल. नेटच धरले तर आठचार दिवस धरतीलसे दिसते. कोटाची इमारत चांगली फार आहे. रुंद नाहीं. मारगिरीनें पडत पडत पडेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Despatch reporting that cannonading of the walls of Udgir has commenced.*

---

१ इब्राहिमखान गारदी ?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 244] [*19-1-1760*

पौ छ ८ जमादिलाखर रविवार

श्रीगजानन

सेवेसी विनंती. सेवक मल्हार चिंतामण वाघ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता माघ सुध १ मंदवार स्वामीचे कृपेकरून आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थित आसे. यानंतर येथील सविस्तर तपसिलवार वर्तमान सांडणी-स्वाराबरोबर लेहून पाठविले त्याजवरून अवगत जालेच असेल. सांप्रत वर्तमान तर आज तिसरा मुकाम. लस्करचा राडा पत्रीं लिहिता पुरवत नाहीं. येक रोजमुरा देऊन घाट चढोन जावे, दोन्ही फौजा येकत्र कराव्या, त्यास रो जानोजी भोसले रुपया नाहीं, कोठून रोजमुरा द्यावा यैसेच आज दोन दिवस बोलवत होते. त्यास आम्ही रात्रौ जाऊन त्यास साफ साफ भीड तोडून बोलिलो जे हे दौलत याउपर राहात नाहीं. श्रीमंतानी भिघाड ताम्रासी केला तो तुमचे भरवसियावर केला नाहीं! तुमचे ताम्राचे इमानप्रमाण पूर्वी जाले आहेत. तुम्ही काही मजल दरमजल येऊन आपले कल्याण करून घेत नाहीं हे श्रीमंतहि जाणतात!! परंतु राजश्री रघोजी बाबाचा बोल लागेल म्हणोन आपणाकडून आंतर पडूं न द्यावे, याजकरितां बोलाऊ पाठऊन बळेच येशाधिकारी तुम्हास करावे, ते तुम्हास ईस्वर बुध देत नाहीं. मागें यैसेच तुम्ही येशवंतराव कोनेर पाठऊन येश संपादिले! त्याप्रमाणच येंदा दिसोन येते. बरे, जसे कराल तैसे पावाल! आम्ही उदईक स्वार होऊन श्रीमंताकडे जातो. आपला परिणाम उत्तम होय ते करणे. तेसेच त्याचे कारभारी पिराजी नाईक, शामजी फुलाजी वगैरे यास प्रथक प्रथक कान उघडोन सांगितले की ही दौलत राहे यैसा कारभार करणे. त्यास सर्वानी (अपूर्ण)

¶*Malhar Chintaman Wagh to the Peshwa, communicating the inability of Janoji Bhonsle to join the Peshwa as requested and the remonstrance which the writer conveyed to Janoji.*

No. 245] [*21-1-1760*

श्री

साष्टांग नमस्कार विनंती उपरी. काल रविवारी युद्ध फार चांगले जाले. श्रीमंताच्या फौजा चहूंफेर होत्या. रात्र जाली नसती तरी लोक यांच्या लष्करांत येऊन सिरते. स्वामीनी तोफा लाविल्यावर राजे विठलदास चालोन आले होते. हणमंतरायास म्हणो लागले कीं तोफावर चालोन घ्यावे. तोफा सोडवाव्या.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
तेव्हां हणमंतरायानीं उत्तर केले कीं हा समय नाहीं. संध्याकाल जाला आहे; व श्रीमंताच्या फौजा तोफाचे मागे तयार आहेत, आणि श्रीमंतानी बंदोबस्त उत्तम प्रकारे केला आहे कीं चहूंकडे फौजा नमूद केल्या आहेत. ऐसा प्रकार सांगितल्यावर राजाजी व हणमंतराऊ एका जागाच उभे राहिले आणि हलू हलू चालत होते. तों इतक्यांत जाधवराव आगाडीकडोन चालोन आले ते स्वामीच्या गाडध्यानी ढासण[1] धरिलें होतें तेथें चालोन गेले. गाडद्यानी ठेरून मार दिल्हा गाडद्यानीं शर्तें केली. त्या उपरी करोली जाली. खडांगल्यासी व स्वामीच्या सरकारच्या लोकासी वेगलीच गांठ पडली. खंदारवाल्यासी वेगलीच गांठ पडली. इकडे मातबरच जूज जाले. राजे विठलदास व हणमंतराव व जाधवराऊ व मुरादखा व रायेणा व शंकरी व सदाशिव नारायेण वगैरे ऐसे एका जागा होते. सारांश चहूंकडील सरदार खंदारकर व खडांगले व सिवाजी केशव वगैरे शंभर सवासे घोडे ठार जाले व शेदोनशें मनुष्य ठार जाले. व दोनचारसे मनुष्य जखमी व दोनच्यारसे घोडी जखमी जाली. कालची लढाई फार चांगली जाली. येथील लोक सर्व तारीफ करीत राहिले, व स्वामीनीं चांगली तरतूद केली कीं तोंडी मातबर लढाई लाऊन चहूंकडे ताण बसविला. हे मोठी तरतूद केली. काल या लष्करांत फार नाश जाला. दीड प्रहर पावेतो उभेच होते. मुक्काम न करावा ऐसा मजकूर करीत होते. मग शेखआल्लीखा जुनेदी याणीं सांगितले कीं हे गोष्ट उचित नाहीं, मुक्काम करावा. त्याजवरून दीड प्रहर रात्री मुक्काम केला. सारांश कालची लढाई चांगली शर्तीची जाली. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A graphic description of a severe engagement at Udgir.*

No. 246] [*20-1-1760*?

पौ छ १ जमादिलाखर

शनवार

श्रीशंकर

सेवेसी विज्ञापना. सोलापुराहून बातमी बशालजंग याजकडे गेली होती. त्यासी बसालजंग याणे रायेचुराहून कूच करून कलबुरगियास येत आहे, याप्रमाणे बातमी सोलापुराहून नाईकाकडे काल रात्रीस आली. त्याची बातमी आपण राखीतच आस्तील. सारा वेळ जपत असावे म्हणोन आज्ञा आली. त्यासी

---

१ मान्याची जागा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आज्ञेप्रमाणे जपतच आहो. स्वामीनी सांडणीस्वार वरचेवरी पाठवावे. उठावयाची वेळ येईल तेव्हा अगोधरच सुमार पाहून ल्याहावे म्हणजे इकडे तोंड लावितो. अथवा तर्कानेही आम्हास कळले तरी तोंड लावितो. केवळ खबरच न कळली तरी इलाज नाहीं. आम्हीही याप्रमाणेच करू. सखारामास संध्याकाळी पाठवितो. सारांश आता कमर बांधली ती सोडू नये. दोहोचहू महिन्याने तरी ईश्वरी कृपेने आपले कार्य होईलच. बसालतजंग व निंबाळकर खंडागले याची बातमी राखावी. जलद बातमी ठीक पोहचली तरी कामावर पडेल. खंडागल्याने लबाडी केली तरी काये चिंता आहे ? बातमी ठीक आल्यास पारपत्य श्रीकृपेने उतमच होईल. आणिक येक मनसुबा सुचला आहे की पाच हजार फौज व दोनतीन तोफा अस्या भागानगर व जाधवरायाचे मुलकात घालून खंडण्या घ्याव्या धामधूम करावी म्हणजे केवल मोगल जेर होईल. मनसुबा फार चांगला आहे हे विज्ञापना.

¶*A wholly autograph letter probably from Raghunathrao to Sadashivrao communicating the movements of Basalatjang and advising certain tactics and precautions.*

No. 247] [*20-1-1760*

श्री

विनंती उपरी आपण चिठी पाठविली ती पावली. आज तोफा लावावयाच्या आहेत तरी सत्वर यावे म्हणोन लिहिले. त्यास प्रातःकालची तयारी करून लिहिल्याप्रमाणे बाजूवर आलो असो. रा छ १ माहे जमादिलाखर हे विनंती.

¶*The writer, evidently an artillery officer, reports that he has taken up his position and is ready to open fire.*

No. 248] [*20-1-1760*

छ १ जाखर सितैन

माघ

श्री

सेवेसी विनंती. मोंगलाचे लस्करांत फतेसिंगबावा याजकडील जासूद जाधवराव यांजकडे इकडील त्याचे माहाल आहेत त्याचें ताकीदपत्राविसी गेले होते ते चौकीस सापडले. त्याजवल लाखोटा होता त्यात लस्करची कांही बातमी आहे यास्तव तेच पत्र पाठविलें आहे त्यावरून कळेल. वरकड किरकोळी पत्रे होती ती माघारी दिल्ही. हे त्याचे वर्तमानाचे पत्र पाठविले. काही विशेष नाही हे विनंती.

¶*This is probably Raghunathrao's letter to Sadashivrao, forwarding an intercepted letter from the enemy.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 249] *[Recd. on 26-1-1760*

छ ७ जमादिलाखर
सितैन शनवार

श्री

राजश्री बलवंतराव गणपत
स्वामी गोसावी यासीं

विनंती उपरी. राजश्री दमाजी गाईकवाड फौजसुधा आले म्हणून वर्तमान कळले. यैशास मारनिलेची नेमणूक पेसजी आम्हाकडे केली होती; तरी आपण तीर्थरूपास विनंती करून मारानिलेस आम्हाकडे पाठऊन देणे. बसालतजंगाची बातमी बहुत राखावी. बाहेर सापडल्यास वीस हजार फौज त्याजवर छापा घालावयास पाठवावी. तसीच निंबालकर व खंडागले याच्या बातम्या राखाव्या. सापडल्यास पारपत्य करावे लागेल. सविस्तर उलगडून ल्याहावे. बसालतजंगाचे बातमीविशी बाबूजी नाईकासहि ताकीद केली आहे. तिकडे बातम्या फार राखाव्या. आम्ही फारसी राखीत नाही. बातमीचा भरवसा तुम्हाकडीलच आहे. आम्ही थोडी थोडी राखितो. वर्तमान वरचेवरी लिहीत जावे हे विनंती.

¶Raghoba asks Balwantrao Ganpat to send him contingents under Damaji Gaikwad. He also suggests a surprise attack to put Basalatjung out of action.

No. 250] *[22-1-1760*

श्री

सेवेसी रामजी नाईक विज्ञापना. छ ३ जमादिलाखर च्यार घटिका दिवसपावेतो वर्तमान यथास्थित आसे विशेष. राजाजी, शंक्रणा, मानसिंग जाधव, रायणा, विनायेकदास, मुरादखा, खनदारकर राजा इतके जण मिळोन डोंगराकड गेले आहेत. याचा मजकूर मनास आणितां सागता गोपाळरावजी भेटावयासी जातात. बरोबर कबाडी वगैरे कहीचे साहित्य आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

तोफा व सरंजाम घेऊन गेले. गोपाळराव याचा रोख आहे. काही दबकत जातात. गडबडसी आहे. बरोबर गाडदीहि आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

+ पत्र राघोबाचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ताा सदासिवपंत निंबाळकराकडील यासी राजाजीची बलावणी दोनतीन आली परंतु सिबंदीचा गवगवा आहे म्हणोन गेले नाहींत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramji Naik (Bhide ?) to the Peshwa, communicating the movements of the several sardars of the Nizam against Gopalrao (Patwardhan).*

No. 251] *[23-1-1760*

छ ४ जमादिलाखर बुधवार सितैन

श्री

सेवेसी विज्ञापना. तुलाजी पराऊ (?) याजकडील जखमी तीन याची बसावयाची तर्तूद दररोज करून देत जाणे म्हणोन आज्ञा. त्यास ठाणेयात जखमी चाकूरच ठेवा म्हणत होतो परंतु राहत नाही. तीन पालख्या रोज उठोन कोणाच्या आणाव्या ? साऱ्या पालख्या सडे स्वारीतच आहेत. आणखीहि लोकांचे फार जखमी आहेत व नवे होतच आहेत. त्याची बसावयाची तर्तूद कैसी होते ? इब्रामखानाकडे आठ पालख्या लोकांच्या दिल्ह्या आहेत. त्या अद्याप ज्याच्या त्याचे हाती येत नाही. बिगारीचे * * * फिरोन कोणी बुणगियात पालखी आणीत नाही. स्वामीनी त्यास ताकीद करून जखमियास चाकुरास ठेवावयाची आज्ञा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*This letter gives interesting details about the arrangement for the treatment of the wounded on the field.*

No. 252] *[25-1-1760*

छ ६ जमादिलाखर

गुरुवार

श्रीशंकर

†राजश्री बलवंतराव गणपत स्वामी गो विनंती उपरी. सखाराम भगवंत याजकडील चिठी आली ती पाठविली आहे. लक्षुमी तोफ फुटली. कामातून गेली. यास्तव दुसऱ्या दोन तोफा थोरल्या तोफखान्यापैकी पाठऊन देणे. लक्षुमीस पाहावयास म्हणोन येक माणूस आला होता. विचारीत होता की कोठे तोफ राहात असते. यैसियासी त्याणी जादू केली किंवा उगीच फुटली हे कलत नाही. परतु जाया जाहाली खरी. दुसऱ्या दोन पाठवणे हे विनंती.

¶*Raghunathrao to Balvantrao Ganpat Mehendale asking him to send two more cannons to replace the gun "Laxmi," which had burst.*

---

† सबंध पत्र राघोबाच्या हातचें आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 253] [*28-12-1759*

छ ७ जमादिलोवल

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. मोगलाचे आगाडीचे गांव जाळून टाकणें, कुणाची भीड मुर्वत न धरितां जाळणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रो गांव लुटून जाळितों. कोणाची भीड मुर्वत धरीत नाहीं, व जाळावयास आळस करीत नाहीं. शुक्रवारचा मुकाम घाणनिंबगावचा केला होता. आज मोगलाचे आगाडीचे सुमारे व कांही उजवा बाजूचे सुमारे पाणी पाहून तीनच्यार कोस तफावत टाकून राहूं. पुढें आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करूं. परंतु लढाईची तजवीज करून सर्वास खबर पाठऊन एक वेळ चांगली लढाई दिल्ही पाहिजे त्यासिवाय मोंगल हलखुद[1] राहाणार नाहीं. यात साहेब धणी आहेत. मर्जीस येईल ते आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna reports his movements to the Peshwa and urges that the enemy should be followed up and routed.*

No. 254] [*26-1-1760*

छ ७ जमादिलाखर शनवार

श्री

शेवेसी[+] विज्ञापना. आज्ञेप्रो कूच करून स्वामीचे पाठीमागे दोहो कोसावर येतो. राजश्री दमाजी गायकवाड याचे डेरेदांडे सारे गेले. त्यास काही नाही. याजकरिता शेवेशी विनंती लिहिली आहे. कोतवाल डेरा लहानसा द्यावयास आज्ञा जाहाली तर देऊ. रा छ ७ जाखर प्रातःकालचा सा घटिका दिवस हे विज्ञापना. खंडागले धारूरचा घाट परवाचे दिवशी चढून धारुरासच मुकाम आहे म्हणून काल कृष्णाजी अनंत यांचे स्वारानी बातमी आणली हे विज्ञापना.

¶*Nana Fadnis reports the movements of Damaji Gaekwad and Khandagale.*

No. 255] [*20-1-1760*

छ ८ जमादिलाखर रविवार

श्रीशंकर

सेवसी विनंती. आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंती. प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम ता छ १ माहे जमादिलाखर मुकाम नजीक पिंजरी

---

१ ठीक. + सर्व पत्र नाना फडणविसाचें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
मंगरूल वरघाट माहराजाचे कृपावलोकनेंकरून येथास्थित असे विशष. येथील वर्तमान तर राजश्री विसाजीपंत जोग व रा मल्हार चिंतामणी हे उभयेता छ २५ रोजी विसाजीपंत व छ २६ रोजी मल्हार चिंतामण मुकाम पिंजरी येथें आले. त्यासी सरकारचीं पत्रें उभयेतांजवल होती ती राजश्री जानोजी बावास व राजा संकराऊ यासी यैसी दिल्ही. येथील राड स्वामीचे पत्रावरून फार करून उरकले. येथे मुकाममारास येऊन दादजी पवार वगैरेयाची समजाविशी करून बहुत करून कारभार उरकला आहे. त्यासी उदईक कूच करून कूच दरकूच स्वामीचे सेवेशीं यावे हा निश्चय जाला आहे. त्यासी कांहीं गुता नाहीं. वराड प्रांतीचा कारभार सुभेदारीचा रा पिराजी नाईक निंबाळकर याजकडे दिल्हा. निमित्य कीं नागउरात (नागपुर ?) हवाले लोकाचे घेतले समजाविशीचे; पैकीं वराडचा यैवज दिल्हा. कृष्णाजी गोविंद याजकडे सुभेदारी होती. त्यासी वराड खराब जाले याजमुळें मारनिलेनीं कबूल सुभेदारी सालमारीं न केली. त्यासी यंदा पिराजी नाईक याणी या सरदारीचा बोढा फारसा बोहडला आहे. सारा गुता (गुंता)[1] उरकून या आठा दिवसांत स्वामीचे पायापासी येतों. आलियानंतर सकल अर्थ निवेदन केला जाईल. उभयेता कारभारी विप्र नागउरात (नागपुरांत ?) आहेत. ते नाहींत म्हणून च्यार लोकहि जमा जाले आणि लवकर कितेक गुते होते ते उरकले. नाहीं तर येक राऊत नजरेस न येता! जितका मातबर तितका दुखविला यैसे आहे. चवदा पंधरा हजार फौज जमा आहे. परंतु कोन्हेहि प्रकारे स्वामीपासी यावे मग जे होईल ते हो, हा मनोदय आहे. सरकारचे यैवजासाठीं आम्हीं फार तष्ट लावले आहे. तजवीज करून देऊं, परंतु आतां चाकरीचे दिवस आहेत. चाकरीस गेलियाउपरी चाकरी करून दाखऊ, खुशाल करून, मग नादारी दाखऊ. रुपये आम्ही ठेवूं यैसे नाहीं. परंतु विचारे देऊ. श्रीमंतानी आमची आन राखून घ्यावे आम्ही लेकर आहोत. घोळ सरदारीवर फार पडेल, यैसे बाबासाहेब फार बोलले. त्यासी कोण्हे प्रकारे घेऊन येतो. आम्ही लबाडी पत्रीं कोठवर ल्याहावी, येकहि गोष्ट खरी होईना ? काय करावे. हे नित्य बोलतात कीं आम्ही श्रीमंताचे सेवेसी येतो. तेथें आलियाउपरी शंभराचे लाझेदार. शंभर कर्जदार उभे राहतील. त्यासी हे सरदार खराबीत आली, ताकत नाहीं, तेव्हा आटकून पडू. आमची आब जाई (अपूर्ण)

¶*Vyankatrao Moreshwar to the Peshwa giving reasons for Janoji Bhonsle's dilatoriness in joining the Peshwa's forces.*

---

१ जास्त शब्द.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 256] *[Recd. on 29-1-1760*

पौ छ १० जाखर मंगलवार

श्रीशंकर

सेवेसी विज्ञापना. काल रात्रौ राजश्री सखारामपंत याजबराबर लढाईचा मजकूर सांगून पाठविला तो उत्तमच आहे. आपण जो विचार केला असेल तो उत्तमच केला असेल; परंतु इभराईमखान गारदी मोगलाईच्या लढाईस वाकब फारच आहे, याजकरितां हा सला यासहि पुसल्यास उत्तमच आहे. आपणहि पुस्तीलच, परंतु सूचनार्थ लिहिले असे. आम्ही सिद्धच अहो. एकदा लढाई उत्तम केल्याखेरीज मोगलासहि फौजेचे स्वरूप कळत नाहीं याजकरितां केलेच पाहिजे. आम्ही तयार आहो. जेव्हां कर्तव्य तेव्हां करावे. आम्हाकडे वरच्यावर सांडणीस्वार खेलवीत जावा हे विनंती.

¶Raghunathrao to Sadashivrao approving the plan of campaign communicated through Sakharam Bapu, and advising consultation with Ibrahim Khan Gardi.

No. 257] *[पो 29-1-1760*

पौ छ १० जमादिलाखर

मंगळवार

श्री

सेवेसी विज्ञापना. रात्री मजकूर मल्हार नाईक रास्ते याचे स्वाराबराबर लिहून पाठविला व हली मुहूर्ताचा मजकूर सांडणीस्वाराबरोबर लिहून पाठविला आहे. याचा जो निश्चय कर्तव्य तो ठराऊन सत्वर लिहून पाठवावे त्याप्रमाणें सिधता येथें केली जाईल. कळावें. पथकें तो आम्हाकडील स्वामीनी रवाना केलीच असतील. नाही तर संक्राजी घोरपडे व रायाजी पवार व दमाजी गायकवाड यास सत्वर पाठवावे. आज तोफाचे बार फार जाहले. काय वर्तमान तिकडील ते (पुढील गहाळ)

¶Raghunathrao writes that Shankroji Ghorpade, Rayaji Pawar and Damaji Gaikwad, with their troops, should be quickly despatched to him.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 258] *[30-1-1760*

श्री

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री मल्हार चिंतामणीं गो यासी

सेवक सदासिव चिमणाजी नमस्कार सुा सितैन मया व अलफ. राजश्री जानोजी भोंसले सेनासाहेब सुभा व राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर हे इकडे येतच आहेत; परंतु प्रस्तुत मोगल दरकूच येऊन आवशावरी राहिला आहे. मऱ्हाटी फौज अद्याप येऊन मिळाली नाही. यैशा संधीत येक दोन मातबर झुंजे करावीच करावी, यैसा * * * * * तरी तुम्हीं त्यास बहुता प्रकारे सांगोन लांबलांब मजली करून दरकूच अतित्वरेने येऊन पोहचत ते गोष्ट करणें. यैशा समयास येऊन पावले तरी बहुत काम होऊन येईल. ते असते तरी आजवरी सर्व फैसला जाहाला असता. आतां फौजा जमा जाहाल्या. आम्ही निकड करूं. ते राहातील, याकरितां त्याही चौ रोजांत येऊन पोहचावें. येका दो दिवसीं निकड करू. सारा मोगल पाहाता थोडा. निकड केलिया सारेच काज जाहालिया मग हे येऊन उपयोगी नाही. यास्तव त्यास लांबलाब मजली करऊन घेऊन येणे. दिरंग न लावणे. जाणिजे छ ११ जमादिलाखर

लेखन
सीमा.

¶*Malhar Chintaman is instructed by the Bhau to speed up the Bhonsle brothers as rapid movements of the Maratha forces would leave the Nizam little time to get ready for action.*

No. 259] *[31-1-1760*

पौ छ ११ जमादिलाखर
बुधवार

श्रीशंकर

सेवेसी विज्ञापना. जुजाचा मजकूर आपण कधी करार केला? गुरुवारी शुक्रवारी शनवारी तीन दिवस बरे आहे म्हणोन सेवेसी लिहिलेंच आहे. आपणहि दिवस पाहेलाच असेल तरी निश्चयाची गोष्ट लिहिली पाहिजे. त्याप्रमाणें आम्हीं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सावध असो. गुरुवारापासून रविवारपावेतो बरेच आहे. परंतु बारा तेरा घटिका एक एक मुहूर्त आहे. वेळ पाहून गाठ घालावी लागेल. यास्तव अगोदर सविस्तर ल्याहावे हे विज्ञापना.

¶*Raghunathrao to Bhausaheb suggesting the best astrological time for attack.*

[*January 1760?*

No. 260]

श्री

सेवेसी रामकृष्ण गंभीरराव व राजाजी नाईक विज्ञापना ऐसी जे, आज प्रातः-काली कूच करून चालले तेव्हा आगोधर हरोल श्रीमंत रा॥ भाऊसाहेबाचे समोर चालले. आपण पाठीमागे त्याजकडे रोख करून कोस पावेक गोठाहून हरोल गेला होता. मग त्याची बातमी आली की, इकडे नाल्यात पंचवीस तीस तोफ लाऊन दहा बारा हजार फौज उभी आहे हे बातमी आलियावर मागे मुरडले व तिसराका प्रहरी नवाब व निजामआलीखान दोघे भावाची स्वारी उभी होती त्याचे जवल आम्ही उभे होतो. इतक्यात श्रीमंत रा॥ भाऊसाहेबाकडील गोले आले ते उभता बंधूचे हती उभे होते त्याचे पुढे राऊत होते हात दहाकाचे अंतराने ते येके राउताचे घोडियास गोला लागला. ते घोडा ठार पडला. दुसरा गोला आला ते येक माणूस ठार जाले. गोले तेथे फार येऊ लागले तेव्हा नवाबाने हती मुरडून माघारे गेले. ते गावाचे आसऱ्याने उभे ठाकले. हारोलीवर फार गोल्याचा मार बसला. आबदुल खंदार याचा लेक आबदुल फतेखान सरकारचे हतीवर बसला होता, त्या हत्यास गोला कुसीत पुढे लागला. मग त्यां मुलाने व महावताने उडी टाकून खाले पडले. हती अद्यापि तो जिवंत आहे. परंतु वाचणार नाही, मरेल. गोला खाले पोटात उतरला. दोन चार घोडी व माणसे पाच सात पडली ऐसी खबर निजामआलीखानास आली की हरोलास फार निकट पडली आहे. मग नवाब तो येथे गावापासीच बसले राहिले. निजामआलीखा हरोलीस कुमकेस गेले. याचे गेल्यावर आपले लोक तोफ घेऊन माघारे सरले. येक जासुदास गोला लागला तो हात उडोन गेला. मग त्या जासुदास नवाबापासी आणला. नवाबाने दोन रुो इनाम दिल्हे व घोड्याची आसामी दिल्ही. व राजा रामचंद्र याजकडील पठाण सिलेदार होता तो ठार पडला व त्याची दोन घोडी पडली. येक बाइको व येक पोर गोल्याने मेली. येक गारदी मेला. येक अरब व येक बाणदार येसे दाघे उजवे बाजूस गोल्याने ठार पडले. तोफेचा बैल येक मेला. गोला लागून येक माणसाचा हात उडाला

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ता जखमी जाला. येक माणूस आणिख प्यादा ठार जाला. आस्तमानी निजामआली मोरच्याची बंदबस्ती करून डेऱ्यास दाखल झाला. इतकी खबर आताची होती ते सेवेसी विनंती लिहिली आहे. आणीख रात्रीची बातमी जे येईल ते मागून सेवेसी विनंती लिहिली जाईल हे विज्ञापना.

¶*The havoc caused by Maratha fire in the Nizam's advance-guard is reported.*

No. 261] [*Recd. on 21-1-1760*]

श्री

शेवेसी विज्ञापना. मोगलाचे लस्करची माणसे आपले लशकरापासून दोन कोसपर्यंत गवतास हजार दोनहजार माणूस जाते. आमचे चौकीवर ताकीद करतों, परंतु चहूकडून ताकीद होत नाही. येविसी आज्ञा करणे ते करावी. अथवा मोकलीक केली असली तर तसीच आज्ञा करावी हे विज्ञापना.

¶*The writer complains that the enemy's forage-parties are allowed free access to roam about and collect grass round the Maratha posts. This, he says, should be prohibited.*

No. 262] [*Recd. on 21-1-1760*

पो छ २ जाखर

प्रहर रात्र

श्री

सेवेसी विज्ञापना. नवाबाचा मुकाम जाला. रामचंद्र जाधवाचे लशकरची उंट घोडे गोला लागून ठार जाली. सिवाजी केशो याचा भला माणूस ठार पडला. दोन बेदड्याचे पायाचे टुकडे उडालें. लक्ष्मणराऊ खडांगलें याची हुनाडपलकराची घोडी ठार झाली. दोन बईल गोला लागून ठार जाले. सेवेसी श्रुत होय हें विनंती. नवे कबाला करावयाचें केलें. येथें गोन * * *

¶*This despatch describes the havoc created in the Nizam's army by the Peshwa's artillery.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[*January 1760*

No. 263]

दौलताबादेहून बाण आणावे

१ महिपतराव चिटनीस बालकोबा याणी व कृष्णराव बलवंत याणी भाऊसाहेबाकडील फौज जमा करून एके ठाई जमा होऊन आज्ञा होईल तेथें कामकाज करावे. जवल उभे राहात जावे. खेरीज विठ्ठल सिवदेव व अंताजी माणकेश्वर देखील महिपतराव बालकोबाजवल.

१ गणेश विठ्ठल सिदी अंबर यास ताकीद करावी कीं तुम्ही थोरल्या तोफखान्याजवल राहावें. पुढें आज्ञेसिवाय वाढू नये. सर्व गारदी एकत्र जमा करून राहावें.

१ सर्व लोकास ताकीद कीं हुकमासिवाय पुढें जाऊ नये. निशाणाजवल जाऊन उभे राहावे सर्व लोकानसी.

१ महादाजी नाईक व वणगोजी नाईक माने पाटणकर यानीं निराली टोकेली[1] करून एके जागा उभे राहावे.

१ धाकट्या बुनग्यांत केसो गोविंद याणी राहून एक पागा त्याजवल ठेवून बंदोबस्त करावा.

१ जेर जखमी जे असतील त्यानीं परिछिन्न दौलताबादेस जावे. जखमेस तूप उधोपंताकडून देविले आहे.

¶*Military disposals commanded by Bhausaheb just before the action of Udgir.*

[*Recd. on 1-2-1760*

No. 264]

छ १३ जाखर

सितैन

श्री

सेवेसी विज्ञापना. चिठी पाठविली ती पावली. यैशास आता संध्याकाल होत आला. मोग(ल) जागा धरून राहिला. आडचणीची जागा. तोफाची मारगिरी केलियास सोसून राहील. थोरला मनसबा आज काही होता दिसत नाही. आम्ही आपली बाजू टाकून आघाडीस वोढऊमुळे जालो. तिकडेहि बुणग्याचा बंदोबस्त करावा लागतो, यैसा प्रकार आहे. याची काय ती आज्ञा केली पाहिजे. त्याप्रो वर्तणूक करू हे विनंती. जगोबा सखारामाचा पुतण्या गोला लागोन ठार जाहले हे विनंती.

¶*Raghunathrao to Sadashivrao reporting his movements in the action of Udgir.*

---

१ टोळी ?

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 265] [*Recd. on 1-2-1760*

छ १३ जाखर सितैन

श्रीराम

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब

स्वामीचे सेवेसी

सेवक शामराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. स्वामीचे तों आज्ञेप्रमाणे शाहाजहांस न येणे म्हणून लिहिलें आहे, परंतु जेष्ठाहीं अंतस्थ कुरान व खास शुकें[1] वरचेवर यावयाविशई पाठविले असेत; व विरजनाथहि मुख्य श्रीमंतापासोन स्थापन करावयाचें आश्वासन घेऊन गेले आहेत. यास्तव बसालतजंग रायेचुरास अढोनीहून आले आहेत. पांच हजार फौज समागमे असे. विजापुरांत बिरजनाथ निगाहदास्त[2] करितात. दोन हजार गाडदी व पनास तोपाहि बसालतजंगापासी असेत. सत्वरच इकडे येणार. हमनामाचे[3] हमनामास मागती बाहिले आहे[3]. त्याजला तों स्वामीचे पायांवेगलें दुसरा विचार नाहीं. यैशास आतां कृपापत्र जमावसुधां सत्वर त्यांहचे यावयाविशई दिल्हे पाहिजे. येथील सर्व मंडलीनें अंतस्थ लिहिले आहे कीं समये यावयाचा हाच आहे; याजकरितां ते येतात. स्वामीनी द्वारकादासाचें हाते काम घेतले तर आमचा उपाये नसे. रासखुल अकिपंताने जावे न जावें काये आज्ञा? त्याची निष्ठा स्वामीचे पायासी दृढतर आहे; व पुढेहि काही वर्तनूक आज्ञेखेरीज करनार नाही. येथील तों ग्रहस्तांस निग्रह फारच आहे. बहुदां अंतस्त स्वामीकडील काही लोकांचे अनुमतहि आहे. उतर खास दसखते चतुष्ट[4] न होता प्राप्त व्हावे. कांही अनखीहि प्रसंग योजिला आहे. घडोन आलियास प्रमाण. छ २ जमादिलाखरपरियंत बसालतजंग रायेचुरी आहेत. स्वामीनी सांडणी पुढें पाठवायाचा निश्चये केला तर आपले पत्रहिं सेवेसी पाठवीन. उतराची प्रतीक्षा असे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The writer informs Bhausaheb of the movements of Basalatjang and refers to some secret negotiations.*

---

१ आज्ञापत्र. २ बंदोबस्त.

३ या वाक्याचा अर्थ नीट लक्षांत येत नाहीं. ४ षट्कर्णी न जातां.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 266] [*Recd. on 1-2-1760*

पौ छ १३ जमादिलोखर

श्री

सेवेसी विज्ञापना. आज मोगल पुढें गेला. संध्याकालपर्यंत चिठी न आली. स्वाराच्या बातमियां आल्या त्यास आज्ञा जे पुढे न येणे; आहा तेथेच उभे राहाणे. चिठी आलियावर मुकाम करणे, यैसे बातमीच्या स्वारानी सांगितले. सकालची चिठी आली त्यातहि यैसी आज्ञा. काल फौजेचे नजीक राहावे तरी पाणी नव्हते. हाली मोगल कोणत्या रोखास जातो, आम्ही कोणत्या रोखास यावे, आमचे बातमीचे रोखाने यावे तरी चिंचोली पा आवसे आम्हापासून तीन कोस आहे, त्या रोखावर उदईक जावे. पुढे मोगलाचा व स्वामीचा रोख राखोन मुकाम करणे जाहाला तरी करू यैसा सुमार आमचा आहे. त्यास तेथील रोख गाव कोणत्या रोखे बुनगे घेऊन कोस दोन कोसी पडे यैसी आज्ञा आहे. त्यास पाणियामुले जैसी सोये पडेल तैसे राहावे लागते. पाणियाची सोई संनिध असलियासी अंतर पडणार नाही. अस्तमानी चिठी आली जे आखरवईवर येऊन राहाणे. त्यास आखरवईस आमचे स्वार पाणी पाहिले त्यास पुरेसे नाही, याजकरिता येथेच मुकाम केला. आखरवई येथून ढालपुढे[1] कोशभर आहे. प्रातःकाली कूच करून आखरवाई उजवी सनिध टाकून चिखोरड्यावरून चिंचोलीचे सुमारे यावे यैसे आहे. त्यास याजप्रमाणे यावे किंवा दुसरे गावावरून यावे ते आज्ञा जाहाली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*This is a communication from some sardar that he is encamping according to instructions.*

No. 267] [*1-2-1760*

पैवस्ति छ २० जमादिलाखर

माघ सन सितैन

श्री

राजश्री नाना पंडित

प्रधान गोसांवीं यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित राघोजी आंगरे वजारतमाब रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये संतोष लेखनाज्ञा करीत असिलें पाहिजे विशेष. छ ७ जाखरचें पत्र मुजरद जासुदासमागमें आलें तें छ १० मिनहूस थलचे मुकामीं प्रविष्ट जाहालें. मोगल

---

१ निशाण.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

उदयगिरीवरी आहे, त्याचें लष्करावरी सरकारचे तोफखानियाचे गोळे लागू होऊन घोडीं उंटें बैल चीत जाहालीं, यास्तव मोगल डेरे उपडून माघारां सरला. परस्परांचे गाडदीवाले यांचा मुकाबला होऊन शें दोनशें माणूस मोगलाचें कामास. मोगल विचारांत पडला आहे व दाणा वैरणीचेंही संकट जाहालें आहे म्हणोन संतोषाचें वर्तमान लिहिलें तें श्रवण होऊन संतोष जाला तो पत्रीं कोठपर्यंत ल्याहावा? आपलें पुण्योत्कर्षापुढें तांब्रानें वलवल केलियांस काय होणें. असें जाहालें पारिपत्यावरून देहावरी येऊन उमजोन कृपा संपादोन घेईल तरीच त्याचा परिणाम लागेल, नाहींतर कळतच आहे. खुशालीचें वर्तमान याच न्यायें क्षणांक्षणां लेहून यावें. श्रवण व्हावें हेंच अपेक्षित असो. थोर संतोष हाच असे. रवाना छ १३ माहे जमादिलाखर बहुत काय लिहिणें कृपा करीत असिलें पाहिजे हें विनंती.

¶*Raghuji Angria congratulates the Peshwa on his victory over the Nizam at Udgir.*

No. 268] [*3-2-1760?*

श्री

सेवेसी विनंती. येथें तोफखानियाची निशाणे आली. तोफा आणावयास गेले त्याहि येतात. केशवराव यास दहन करावयास माहिपतराव व सर्व मंडळी गेली. ते बुलगियात नाही. आमचे फौजेचे उजवेकडे दोन अडीच कोस जाळावयास नेल्हेत. ते तेथून येथेंच येणार. तेव्हा त्यांचे समाधान करावयास बुलगियात जावयाचे नाही. एक अलीखान फक्त मात्र. त्यास तिकडे येथील सर्व ठीक करून जावे तर फार रात्र होईल. त्या तिकडे कोण्ही पाठवावा, जावेच अशी आज्ञा जाली तर जाऊं. येथें प्रहर लागेल. तोफा मोडतोड दाणादुणाही सोई येथील पाहाणे यास उसीर फार लागेल. कळावे हे विज्ञापना.

(पत्राचे पाठीवर जबाब भाऊसाहेबाचे स्वदस्तुरचा आहे)

तुम्ही गोटास न जाणे. तेही प्रहर रात्री आल्यावर समाधान करणे. कारखाना येतो तो जथून दाणादुणा सकाळची सोई निघायाची जखमी मेले सर्व ठिकाण लावणें प्रहर रात्रपर्यंत राहून करणें. आसीर्वाद.

¶*Letter from Raghunathrao to Sadashivrao and the latter's reply to the same. It refers to the death of Keshavrao Panse killed in an action at Udgir.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 269] [*3-2-1760*

पौ छ २२ जमादिलाखर

श्रीविठलराज

आर्जी त्रिंबक जगंनाथ यैसीजे. छ १५ माहे जाखर त्रितीये प्रहर रो हणमंतराव निंबालकर व शाहबा सुपेकर वगैरे फौजसमवेत स्वार होऊन धारूरास गेले. रायानी रो शाहबाबराबर दोन हजार फौज व गाडदी व रोहिले वगैरे सरंजाम देऊन पुढे रवाना केले. आपन दोन कोसपर्यंत त्यांजबराबर जाऊन मागती संध्याकाली फिरून गावांत आले. रात्रीं आम्ही जाऊन त्यांस पुसिलें कीं तुम्ही फिरून काये निमित्ये आलेत? म्हणू लागले कीं शाहबाबराबर फौज रवाना केली. आज आम्हीहि स्वार होऊन जाऊ. फौजेबराबर आपन कासियास जावे? मागून जावें हेच उतम. याजकरिता छ १६ माहे मजकुरी राव धारूरास जातात. महाराजांचे पत्र रायास आले त्याचे उतर रवाना हजुर केले असे. राव बोलले कीं तुह्मी श्रीमंत साहेबास आर्जी लिहिणे कीं आम्ही जेथे असलो तेथे साहेबाचेच आहोंत. * * * * * कर व भुमकर व पानगांवकर धारूरास आम्ही दाखल जालियावर तेहि येणार; तर त्याची तरतूद माहाराजानी करावी की त्या स्थलास येऊन पावेत. भिकाजी नाईक काले व जासूदजोडिया हजीर असे. इतकियावर धारूरास पावलियावर विनंतीपत्र रवाना होईल हे विज्ञाप्त.

¶*Trimbak Jagannath reports that Hanmantrao Nimbalkar has despatched his forces in advance.*

No. 270] [*Recd. on 3-2-1760*

पौ छ १५ जमादिलाखर

श्रीशंकर

सेवेसी विज्ञापना. जुंज जाहाल्यानंतर दो कोसावर मुकाम केला. बातमीस राऊत ठेविले होते. त्याणी बातमी येऊन सांगितली कीं मोगल पौण कोस आहे. त्यावरून राहुट्या पाहून च्यार घटका दिवस असतां कूच करून कोस दीड कोस मावारे येऊन मुकाम केला; याजकरितां अद्याप लोक मिसलीस नाही आले याजकरितां जखमियाचा समाचार घेतला नाहीं. याजकरितां प्रातःकाली जखमियाचा समाचार घ्यावयासी प्रहर दिवस लागेल, तरी आपण मोगलाची बंदोबस्ती प्रातःकाली करावी. आम्ही प्र(हर)दिवसानंतर तयार होऊन येऊ. यानंतर आपणाकडील जखमी व आम्हाकडील जखमी यांस रोज उठोन पालख्या दर कूचांत

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

द्यावयाची खटखट पडेल. कारण कीं जखमी फार, पालख्या थोड्या. याजकरितां दोहींकडील जखमी सोलापूरचे किल्यांत ठेवावे आसे आमचे विचारे आले आहे. त्यांत आपले मर्जीस येईल तसें करावे. आह्मी काही तयारी करितो. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶Letter from Raghoba possibly to Bhausaheb that his division cannot be ready for action as the sick and wounded have to be attended to. He suggests that the wounded be removed to the fort of Sholapur as they could not be removed from place to place owing to paucity of conveyances.

No. 271] *[5-2-1760*

पौ छ २० जाखर
माघ सितैन

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक त्र्यंबक विनायक मुकाम तलागड कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञाप्त. तागायत छ १७ जमादिलाखरपावेतों शेवकाचें व राजपूर प्रांताचें वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जालें तेथें तांब्रांचे फौजेची व सरकारचे फौजेची गाठ पडोन मोंगलाचे पराभवाचें वर्तमान लिहिलें. लढाई जाली. सरकारचे सेंपनास माणूस कामास आलें. मोंगलास हटऊन दिल्हे. सें दोनसें माणूस त्याचें ठार जालें. प्रस्तुत किले उदगिरीवर कोंडून ठेविला आहे. आपले फौजेचा गीर्दनवा असोन घासदाणा बंद केला याप्रमाणें केलें आहे. हें वृत्त आज्ञांकितानें श्रवण करून बहुतसा आनंद जाला. स्वामीचे प्रतापेंच करून सर्व शत्रू पादाक्रांत इषतमात्र क्रोधावलोकनेंकरून जाले व पुढेंहि होतील सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶Trimbak Vinayak congratulates the Peshwa on his success at Udgir.

+ रघुनाथरावाचें पत्र.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 272] [*6-2-1760*

पो छ २५ जमादिलाखर
सितैन

श्री

श्रीमत् राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

अज्ञाधारक विष्णु सदासिव कृतानेक विज्ञापना एसीजे. स्वामीनी तीन पत्रे पाठविलींत व छ १८ माहे जमादिलाखरीचे पत्र पाठविले त्यांत फत्ते जाली खासे हती बाकी मात्र राहिले म्हणून सेवकास कृपादृष्टीकरून लिहिलें ते छ २१ जमादिलाखरी लस्करात बसालतजंगाचे पोहचलीत. बहुत हर्ष जाला तो कोठवर मुखवचनेकरून बोलावा? त्यास राजे ब्रिजदास छ १८ रात्रीस दाखल लस्करांत जालेत. आम्हास पत्रे निंबाजी नाइकानी छ २० माहे मजकुरी संध्याकाळीं पोहोचिविलींत. आम्ही जासूद समाचारास पाठविला. तेव्हा तेव्हांच राजे ब्रिजदास बहादर यांसी पत्रे दाखविलीत. फौज सरकारची रवाना तुम्हाकडे जाली हा दबाव टाकून नवाबास अर्ज करून बहुता प्रकारें समजाऊन कलबरगेयाहून स्वामीकडे येत होते. स्वामीचे पुण्य प्रतापेकरून आणि अन्न बहुत दिवस खाले म्हणून चित्त सेवकाचे स्वच्छ जाले. त्यामुळे हजार युक्ती करून दहा कोस कलबरगे सोडून अलाकडे आले होतेत ते कलबरगे याकडे फिरविलेत. जेव्हां आज्ञा होईल तेव्हां, स्वामीची आज्ञा होईल तेव्हांच घेऊन येऊं. कांहीं चिंता न करावी. कार्यभाग आपला मनोदयानरूप करून घ्यावा.

[पुढील बंद गहाळ].

¶*Incomplete letter from Vishnu Sadashiv congratulating Bhausaheb on his success.*

No. 273] [*10-2-1760*

श्री

चिरंजीव शिधोजी तरडे मुकाम गरोड यासी येसाजी तरडे हवलदार दिमत पीलखान मुकाम लष्कर नगर, स्वारी राजश्री पंतप्रधान अनेक आशीर्वाद उपरी. येथील क्षेम तागाईत माघ वद्य नवमी पावेतों सुखरूप असों. यानंतर श्रीमंत राजश्री भाऊसाहेबाचें लष्करचें वर्तमान माघ वद्य द्वितीया रविवारीं लढाई जाहाली. चिरंजीव खंडबांनीं श्रीमंत भाऊसाहेबा हुजूर दोन तीन उलटण्या करून तरवार मारली. लौकिक चांगला केला. जखम तरवारची

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मांडीवर येक लागली आहे ती हलकी आहे. आठां चहूं दिवशीं बरी होऊन बुंलग्यांतून सडे स्वारींत येतील. कांहीं चिंता नाहीं असें त्यांचें घरीं सांगणें. तुम्ही दाणे घेणें, आणि गोठा मोडला आहे तो बांधणें. सारे माणसांस सांगणें जे बहुत खबर राहाणें, तुम्ही आपणांस जतन करणें. बहुत काय लिहिणें हें आशीर्वाद.

¶*Yesaji Tarde to Sidhoji Tarde : informs of the heroic deeds performed by Khandba Tarde on the field, in the presence of Sadashivrao Bhau.*

No. 274] [*10-2-1760*

छ २६ जमादिलाखर
माघ वा १३

श्री

सेवेसी विनंती. रविवारचे जुंज जाहालियावर मोगलाकडील पेगाम बोली-चालीचा घेऊन महमद कबीरखान व गुलाम सैदखान व रायेरायां हे आले. बोलणे चालणें जितके व्हावयाचे तितके जाहाले. त्यानीहि बहुतच बजीद होऊन नवाबाचे तर्फेने बोलले. सेवटी येणेप्रमाणे करार ठहरला.

जागीर ४५००००० पंचेतालीसलक्षाची. त्यास आवरंगाबाद सुभ्यांत फार द्यावी व बेदर सुभ्यांत व विज्यापुरांत आवरंगाबाद सुभ्यात सारी द्यावी. त्यात ती लाखाची मात्र त्याचे कोणी आगत्याचे आहेत त्याची राखावी. वरकड सारी घ्यावी. बाकी बेदर व विज्यापूर. येणेप्रमाणे करार ठहरला.

किले
१ आशेर
१ मोल्हेर
—
येणेप्रमाणे दोन किले
शहरें :—बुराणपूर
१
विज्यापूर
१

येणेप्रमाणे करार ठहरला. विठल सुंदर यास निजाम आलीखानानी चाकरी वरून दूर करावे. ठेऊ नयेत. हा करार करून * * निजाम आलीखानानीं आपले मर्जीप्रमाणें व नवाबाचे संतोषे राहावे. तिलमात्र अंतर करूं नये याप्रमाणें शफतपूर्वक मध्यस्त बोलले व निजामआलीखानानी येविषी आपली निष्ठा, व बेज्या वर्तणार नाही, सर्व प्रकारे अनकूल राहूं, म्हणून आपले हाते कागद लेहून पाठविला. त्यावरून कबूल केलें. परंतु (निजाम) आलीखान

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बहुतकरून वराडांतच जातील असे आहे. नवाबाचा सिबंदीचा दंगा वगैरे फार उपद्रव आहेत ते याचे गला पडतील. यानी कोणत्या आमिषावर वारावे हे कलतच आहे. यास्तव जातील. त्याचे मध्यस्तहि हाच प्रकार येथें बोलतात. मराठ्याची जागीर राखली त्यांत घालमेल पुढेपाठी करू नये. ते न आले म्हणोन त्याजविषयीं संशय चितांत आणू नये. बहुत संतोष त्यासी असावे. हाहि करार करून घेतला. येथून मोगलाने कूच करून अवशाचे सुमारे माघारे जावे. मग जिकडे जाणे तिकडे जावें हा विचार ठहरला. ये वेळेस मराठे आले नाहीत. त्यामध्ये खंडागल्याचे मनात फारच चटपट होती. धारुरपावेतो आले. हणवंतराऊहि धारुरास आले. त्यास खंडागल्यानी हणमंत-रायांसी फारच आग्रह केला कीं खामखा सडे होऊन जावेच जावे हा बीर देत होते. परंतु येथून हणमतरायास दोही प्रकारची लिहिणी लिहीत गेलो. व येसाजी भगवंत मा * * कडील चांगला शाहाणा माणूस प्रसंग जाणता त्यांस हेच प्रकार वरच्यावर लिहीत गेले व कालची लडाईहि चांगली जाली हें वर्तमान त्यास कलले. त्यावरून थबकून राहिलेच. खंडागले वलवल करीत होते. परंतु त्यासहि राहणे जाहाले. आता तो सल्याचा प्रकार ठहरतो मग * * काय आहे जानबानी करावा. याप्रमाणे सेवटपरियेंत निभावले. अंतर काडीइतकें केले नाहीच. हेच पुर्ती निशा जाहाली. जानबा-विषी पका जाबसाल ठहरून घेतला. जानबाविसी संशय काही आणावासा नाहीच. राा† छ २२ जमादिलाखर हे विनंती.

¶*This is Sadashivrao Bhau's letter to the Peshwa from the battlefield of Udgir, communicating the details of the negotiations which the Nizam started after his defeat.*

No. 275] [*10-2-1760*

पो छ २५ जमादिला-
खर सितैन

श्रीमार्तंड प्रा

श्रीमंत राजश्री बाबा
साहेब स्वामीचे सेवेसी

पो धोंडो आकदेव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुषल ता छ २२ जाखर मुकाम ठाणे गुंजोटी येथास्थित असे विशेष. बसालतजंग या

---

† येथून अक्षर वेगळें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रांतास आला. यास्तव श्रीमंतानी आपणास रवाना केले म्हणून यैकिले. ऐसियासी आमचे वर्तमान तरी मोगल कलबुरगियास येतां मुरूगचा किलेदार पहिला होता त्यास सांप्रत कलबुरगीयाची किलेदारी जाली आहे, त्याणे मोगलास उतेजन देऊन अलंदेस आणिले. ठाणियाचे घालमेलीत फार होते, परंतु तो मनसबा धण्याचे पुण्य करून सर्व राहिला. मग गावची खराबी फारच केली. जिराईत तो झाडून काडी राहिली नाहीं. तैसेच गावातहि लुगाऱ्यानी सिरोन खराबी केली. बाणदारहि रखवालीस आणिले होते, परंतु लस्करांत कैद येकंदर नाहीं. खराबी होऊन रखवाली खर्चवेच पडिला तो देणे आला. तेथून आजी रविवारीं प्राथःकाली मोगलाने कूचे करून मुरूमच्या मार्गें आवशाच्या रोखे चालिला तो तेथून माघारा फिरला. मागती आलंदेच्या सिवारांत दोन प्रहरपरियेंत उभा होता: तेथून किन्हीच्या मार्गे आला. गावांत झांबडाझोंबड केली. बायेका नग्न देखील केल्या. काही नेल्या. यैसा आतिसेय जाला. गुरे ढोरे सापडलीं ती नेली. तेथून जांब गेरुंवेवाडीच्या सुमारें आला. तेथेहि प्रहभर उभा राहिला. मग होदलूरच्या रानात जाऊन पलीकडे दिगीच्या सिवारात आला. तेथे आस्तमानापावेतो विचारांत पडिला होता. मग काये विचार केला तो नंदगूरसिंदगूरच्या वोढ्यावर मुकाम केला. आपले फौजेचे आवई मोगलाच्या लस्करांत दाट आहे. याजमुलें आजी फारच घाबरा जाला. चर्चा लस्करात आहे की, कल्याणास जावे आथवा कलबुरगीयास जावें. रात्रीतून पलोन जातो की राहतो हे बातमी आलियावरी सेवेसी लिा जाईल. आपले आवईमुलें तमाम खेडी घाबरी झाली आहेत. यास्तव राजश्री बाजीपंत आपणाकडे आले आहेत तरी हे विनंती करितील त्याप्रमाणे गुंजोटी आलंद परग(णी)याची खेडियाची रखवाली होऊन जिरात राखणार स्वामी समर्थ आसेती. लस्करचे लुगारे धावतां राहाणार नाहीत. मोगलाचे आवाईमुले तिकडील इकडे पल जातो येतो, तो लुटला जाईल. याकरिता ताकीद व्हावी की, सरकारच्या तालुकियामधे धावो न पावेत तरच रयेत लोकाचे क्षेम आसे विशेष. सेवकहि स्वामीची स्वारी आली आसता सेवसी यावे; परंतु आलंद आवांतर खेडी पायेमालीत आली ते तोंडी माती घालताती, त्यास दिलदिलासा[1] देऊन सेवेसी येतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Dhondo Akdev reports the ravages committed by Basalatjang in the province adjoining Gunjoti.*

---

१ धीर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 276]

पौ छ २४ जमादिलाखर

श्री

सेवेसी नागो राम चरणावरी मस्तक ठेऊन सिर सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २३ जाखर सोमवार प्रातःकालपावेतो स्वामीचे कृपा-कटाक्षेकडून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामाची आज्ञा घेऊन निघालो ते गुंजोटीआलीकडे साहा कोसावर मौजे सातसूर पो आवसे येथे रविवारी मुकामास आलो. मोगल बसालत (जं) ग यांजकडील वर्तमान राजश्री धोंडो आकदेव गुंजोटीकर याणी आम्हास बातमीपत्र लिहिले कीं, मोगल आलंदेस आला. आमचे फौजेचे आवई गेली, त्यामुळे मुरूमच्या मार्गे आवशाचे रोखे चालिला. येथून माघारा फिरला. मागती आलंदेच्या सुमारे आला. आलंदेच्या सिवारांत दोन प्रहर उभा होता. तेथून किन्हीच्या मार्गे आला. गावात झावंडाझावंड केली. बायेकादेखील नग्न केल्या, काही नेल्या. तेथून जांबेगरूंधे-वाडीच्या सुमारे आला. तेथेहि प्रहरभर उभा राहिला. मग देहळूरच्या रानात जाऊन पलीकडे दिगीच्या सिवारांत आला. तेथे अस्तमानपावेतो विचारात पडला होता. मग नंदगूर सिंदगूरच्या वोढ्यावर मुकाम केला. फार घाबरा जाहाला. चर्चा लस्करात आहे कीं, कल्याणास जावें आथवा माघारे फिरोन कलबुर्ग्यास जावे, येणेप्रो मारनिलेनी लिहिले. ते पत्र बजिनस बातमीचे स्वामीकडे पाठविले आहे, त्याजवरून श्रुत होईल. आम्ही सोमवारी कूच करून गुंजोटी परगणियांत कसब्यावर मुकाम करविला आहे. तेथून मोगल सा सात कोस आहे. आम्हीहि लस्करात पत्रे रा कृष्णाजी गिरधर व रा विस्णाजी सदासिव व त्रिमल गुरुराव यांस लिहिले आहेत की, नवाबानी मुकामच करावा, पुढे येऊ नये. आम्ही सत्वरच येतो. नवाबाची आमची भेटी जालियावर उत्तमात पडेल. पत्राचे उतरे अद्याप आली नाहींत. याउपरी जे वर्तमान होईल ते सेवेसी लेहून पाठऊ. सिंदगूर नंदगुरापासून स्वामीचे लस्कर आठ नऊ गावे आहे. आम्ही कृष्णाजी गिरधर व त्रिंबक गुरुराव यास परिछिन लिहिले कीं, नवाबाही पुढे येऊ नये. पुढे आलियास गोष्ट नासेल म्हणून साफ लिहिले आहे. श्वामी प्रताप थोर. मोगलास दहशत होऊन माघारा फिरला. पुढे वर्तमान होईल ते सेवेसी लिहून पाठवितो. कलबुर्गे परगणा व यातगीर परगणा देखील किला आगत्ये करून घ्यावा. यातगिरीचे किल्यामुळे पंचमाहाल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

व सुरापूर वगैरे जागा आमल रायेचूरपरियेंत सुरलीत बसवीन. किला फारच उत्तम गुंज्यासी (?) म्हणून विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Nago Ram to Bhausaheb that the presence of his force in prant Gunjoti overawed Salabatjang who had agreed with the writer to come to an understanding.

No. 277] *[12-2-1760*

पौ छ २७ जाखर

सितैन माघ

श्रीमार्तंडप्रा

श्रीमंत राजश्री भाऊ

साहेब स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक धोंडो आकदेव कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुषल ता छ २४ माहे जमादिलाखर मुकाम आवराद प्रा गुंजोटी लस्कर राजश्री नागो राम येथास्थित असे विशेष. बसालतजंग कलबुरगियास आलियाची बातनी सेवकाने लिहिलीच होती. कलबुर्गीयाहून कुचे करोन आलंदेस येऊन मुकाम केला. जिराईत तो कही लस्करची जाली. गावचे रखवालीस नवाबास अर्ज करोन बाणदार व इतमामी आणिले; तऱ्ही गावची खराबी लस्कराने फार जाली. दुसरे रोजी कूचे करोन किन्ही व जांबगेरुधेवाडी, होदलूर वगैरे गाव अलंद परगणियाच राहादारीत लुटले. गुरें ढोरें साप (अपूर्ण)

¶Dhondo Akdev from Awarad, prant Gunjoti, reports the ravages of Basalatjang.

No. 278] *[13-2-1760*

पौ छ २५ जमादिलाखर सितैन

श्रीविठलराज

विज्ञेत त्रिंबक जगंनाथ यैसाजे. येथील वर्तमान ता छ २५ माहे जाखर मुकाम किले धारूर माहाराजाचे प्रतापे येथास्थित असे विशेष. छ २४ माहे मजकुरी राजश्री हणमंतराव निंबालकर यांचे वकील गोपाल माहादेव यांचे पत्र आले.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्यामधे मजकूर लिहिला आहे की, सलूक जाला. जागीर व दुर्गे मातबर दिधली. येका दो रोजा उभयेता लस्करचे कूच होनार आहे. हे वर्तमान यैकून रायानी आपले कारभारी बोलाऊन आनून यासी येकांत केला कीं, आपली गत काये? सर्वथे श्रीमंत स्वामीची आज्ञा पाळण करून यावत्काळपर्यंत बसून राहिलो, आद्याप खावंद बोलावीत नाही. त्यास तरी आमचे ठाई आरूच, पुढे मसलत कोनती करावी? यैसे च्यार घडीपर्यंत बोलोन सेवटी निश्चये केला कीं, आपले मुरबी सर्वथे श्रीमंत साहेब आहेत. आम्हास आश्रा व भरवसा त्यांचे पायाचा आहे. ज्यामधे आमचे सौकर्य ते आवशमेव करतील. पूर्ण भरवसा आहे यैसे बोलोन उठले. भोजनास गेले. च्यार घडी दिवस राहता रो लक्ष्मणराव खंडागले रायांचे दर्शणास आले. त्यानी येकांत केला. त्याजपासून महद आपराध जाला आहे. त्याचेमुळे बहुत श्रमी आहेत. म्हणू लागले कीं, जे गोस्ट होऊ नये ते जाली, पुढे कोनती तजवीज करावी? रायांनी उतर दिधले की, श्रीमंत साहेबास आर्जी गरिबी दाखऊन करावी. त्यामधे जैसे त्यांचे खातिरेश येईल तैसे करतील हे गोस्ट त्यास पसंद न पडली. त्यांचे दुराचरण त्याजपुढे येत आहे. खाने अजम मुरादखान व सेख आलीखां वगैरे शहरीहून निघाले, सनिध आले. हे वर्तमान रायानी सेर दरबार सांगितले. त्याजवरून शेवटी विज्ञेत जरूर जानऊन लिहिली. सांप्रत रानोजीबाार जासूदजोडिया देऊन त्याचे बातनीबाा रवाना केले. त्यास शहरचे रुखे रानोजी मजकूर गेला. तिकडून बातनी रवाना हजूर करील. विशेष काये लिहिणे हे विज्ञात.

¶*Maharao Nimbalkar, on the instigation of the Peshwa with whom he had friendly relations, did not participate in the campaign of Udgir. The news that a treaty was concluded between the Peshwa and his master the Nizam made him naturally anxious to know his own position as there was no communication from either party. The writer in this letter says that Maharao relies on the Peshwa to see that his interests do not suffer.*

No. 279]

पौ छ २५ जमादिलाखर [*13-2-1760*

श्रीमार्तंडनाथ

विनंती सेवेसी भास्कर राम यैसी जे. गुकारनामक येक प्रहर निजेला होता. मग उठोन मुखप्रक्षालन करून कनिष्टापासी गेले. त्यावर कनिष्ट काही भक्षायासी गेले. गुकार दरवेशमहमदखानाकडे आले. ते दोन आडीच प्रहरपरियेंत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
येथेच होते. त्यावर राजा विकार विप्र दरबारास आला. तो आंदरच होता. त्यावर तिसरे प्रहरा भवानी शंकर व भवानी नाईक व बलवंतराऊ व धोंडो राम आवघे आले. ते आर्जबेगी त्याचेथे गेले. आवघे कारकून दिवानीचे जमा जाले. कागदापत्राचे काम सुरू जाले. तीन घटका दिवस राहिला. त्या वेळेस विकार विप्र दरबारातून निघाले ते आवघी मंडळी कागद तयार करीत होते तेथे येऊन बसले. त्या वेळेस आवघे सिपाही व जमातदार विकारास तलबेसाठी बरें वाईट बोलोन म्हणों लागलें कीं आमची तलब द्यावी. नाही तर आम्ही तलबेसाठीं मरून जाऊं. तेव्हां विकाराही उत्तर दिल्हे कीं आतां तर आपण कामास जातों. उदईक तुमचा फर्चा करून देऊ. येसा लोकांचाही दंगा आहे. आजी बाजारचा निरख माहाग जाला.

¶*News-letter probably from the Nizam's Court to the Peshwa written in enigmatical terms by one Bhaskar Ram. The Brahman Vikar referred to appears to be Vithal Sundar, who is being pressed by the troops for their pay. It is not known who this "Gukarnamak" mentioned in this letter may be.*

No. 280] *[16-2-1760*

छ २८ जमादिलाखर
सितैन माघ शनवार

श्रीविठलराज

विज्ञापना त्रिंबक जगंनाथ यैसीजे. येथील वर्तमान ताा छ २६ माहे जाखर मुकाम किले धारूर माहाराजांचे प्रतापे येथास्थित आसे विशेष. राजश्री हणमंतराव निंबालकर छ २५ माहे मजकुरी दो प्रहरा भोजन करीत होते त्यासमई येकायेक राजश्री खंडागले यांनी नगारा करून जिनबंदी व सर्व लस्कराची तयारी केली. रायानी त्यास सांगून पाठविले की, इतकी गडबड काये सबब केली? त्यानी सांगून पाठविले की, च्यार हजार फौज येऊन तमाम कही आपली वळून नेली तरी तुम्ही तयारी करून पुढे चालणे. कहीची घोडी व उंटे नेली असतील ते सोडऊन आनू. त्याजवरून रायानीहि नगारा करून पुढे दोनसे राऊत पाठविले. त्यांस सांगितले कीं, तल्यापासी जाऊन उभे राहणे. तिकडून फौज आली तरही त्यासी खटखट न करणे. खंडागले मजकुरानी तरी दारू गोला वाढून आपन तलावर बमै लस्कर सिध्द होऊन बसले व पुढे च्यारसे राऊत पाठविले. त्यास सांगितले कीं, तुम्ही पुढे जाने, तिकडून फौज आली म्हणजे आम्हास बातनी पाठवणे. आपण त्वरित स्वार होऊन येतो. ते राऊत पुढे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दोन कोस गेले. त्यास सरकारची फौज कोठेहि आडलेना. च्यार राऊत कही भरवीत होते ते पुढे वाढून आले होते तितके मात्र देखिले. उपरांतिक चौ घटका फिरून आले. कहीची तटे व उंट वगैरे सहीसलामत येऊन पोहचले. खंडागले मजकुरास वसवास पोटामधे आहे त्याजकरिता आवाई खातात. रायांस हे वर्तमान कलियावर बहुत नाखुश जाले. बोलो नये ते बोलले व म्हणू लागले की, यैस्या मनुष्याचा समागम नसावा. छ २५ माहे मजकुरी खंडागले यानी आपले दिवानाचे पुत्र बमये तीनसे राऊत व प्यादे वगैरे सरंजाम देऊन पडदुरास रवाना केले. बहुधा सरकारचे ठाणे जाईल याजकरिता पूर्वसूचनेस गेले. राव निंबालकर माहाराजांचे शुक्रगुजार[1] आहेत. विशेष काये लिहिणे हे विज्ञाप्त. भिकाजी नाईक सरकारचाकरीस हजीर असेत.

¶*Letter from Trimbak Jagannath giving news about Maharao Nimbalkar and Khandagale.*

No. 281] *[19-2-1760*

पा छ १२ रजेब

श्री

समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बालाजी बाजीराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे. निजामअलीखाने यासी बंदबस्तीने प्रेरिला अस्ता दरम्यानें चालत्या तहचा बिघाड करून लढाईच्या मुकदम्यास प्रवर्तला. त्याच्या पारपत्यास राजश्री सदाशिवपंत व राजश्री रघुनाथपंत व राजश्री विश्वासराव फौजसुधां पुढें जात असतां मुकाबिला होऊन मातबर लडाई जाली. शत्रूस नम्र केला, हें वर्तमान परस्परें ऐकिलें जात असतां छ २० जमादिलाखरींचे विनंती पत्रें पाठविले तें छ ३० तेरखेस हुजूर प्रविष्ट जाहाले. तेथें सविस्तर युद्ध प्रसंगाचा मजकूर व मोगलाकडील चंडोलीचे मातबर सरदार ठार होऊन बहुत सेना मारली गेली. हत्ती व तोफा व जेजाला बाण पाडाव केले हें संतोषवृत लिहिलें तें स्वामीस श्रवण होऊन बहुत समाधान जाले. लोकांही छाती थोर करून तोफखान्याचा अराबा पिवोन कोत्या हत्याराची लडाई केली, त्यामुळे सेवकाकडीलहि मर्द माणूस मातबर कामास आले व काही लोक जखमी आहेत म्हणून लिहिलें. शत्रूचा प्राणापहारी संग्राम प्राप्त जाला. तेथें लौकिकाचे लोक कार्यावरी खर्च जाल्याविना कार्य कैसें होतें? सारांश तुम्ही येशश्वी आणि स्वामीच्या पायांसी तुमची दृढतर निष्ठा; तेव्हां तुम्हापासून सर्वकाल शत्रूचा पराभवच हा निशा असावा आणि त्रिवर्गास वरचेवरी लेहून त्याणी आपणास सर्व

---

१ आभारी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रकारें रक्षून शत्रूस पराभवीत ते गोष्ट करणें. वरचेवरी संतोषयुक्त सविस्तर अर्थ विनंती पत्री लेहून स्वामीस संतोषावाती करीत जाणे. वरकड लिहिणें ते राणीवास वाडा चौथा याणी तुम्हास लिहिलें आहे त्यावरून कलेल. जाणिजे, रवाना छ १ माहे रजब बहुत लिहिणे तरी सूज्ञ असा.

¶*A letter from the king congratulating the Peshwa on the splendid victory at Udgir.*

No. 282]

पौ छ ९ रजब [*21-2-1760*

सितैन फाल्गुन

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र कृष्ण रिसबूड कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ ३ माहे रजब मुा। लस्कर बसालतजंग नजीक कल्याण जाणौन स्वामीनी निजानंदवैभवलेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. माहाराजाची आज्ञा घेऊन श्वार जालो ते पंढरपुरास पावलो. तेथें वर्तमान कीं बसालतजंग कलबुरगे प्रांती आहेत. तेथोन विसा विसा कोसाच्या मजली केल्या. तुलजापुरास आलो. तेथें वर्तमान की नवाब बसालतजंग कल्याणावर आहेत. तेथून दरकूच येऊन राजश्री नागोराम याच्या लस्करात कल्यानाजवळून साता कोसावर आहे तेथें राहिलो, तो छ २ माहे मजकुरी श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यानी नवाबास खलिता पाठविला आनि पत्रे पाठविली कीं विज्यापुरची सनद देतात किंवा देत नाहीत याचा जाबसाल करून पाठवणे, व त्याचा बेत भावास भेटायाचा आहे कीं काये ? भेटायाचे आसले तर ते हैदराबादेस जातेसमई भेटावे आणि आम्ही आदवानी रायेचूर त्याजकडोन बसालतजंगासच बहाल ठेविले आहे ते काडीत होते. यात भावाची भेट घ्यावी ऐसे काही नाहीं. त्यानी रायेचुरासच जावे आणि विजापुरची सनद करोन पाठवावी या प्रकारे कितेक मजकुर लिहिला होता. जलद सनद करोन पाठवने म्हणोन लिहिले, तेव्हां च्यार घटिका दिवस होता. तेव्हाच राजश्री नागोराम याचे श्वार समागमे घेऊन प्रहर रात्रीं लस्करात बसालतजंगाच्या आलो. नवाबाची मुलाजमत जाली. श्रीमंत राजश्री भाऊ-साहेब यानी लिहिले त्याप्रा। जाबसाल केला. सनद विज्यापुरची तेव्हाच रात्रीच करून मोहर करोन घेतली. बसालतजंग बहुत श्रमी जाले की आम्ही तो आपण

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लिहित गेलेत त्याप्रा कूच दरकूच कल्यानावर आलो. तस्यात भावाचीहि पत्रे आली की तुम्ही आम्हाकडे या. ऐसियास भावाने पत्र लिहिले त्याचा जाब आम्हीहि लिहिला की तुम्हाकडेच येतो. म्या आपल्याजवल आपला कारभारी पाठविला. आपण करार केला त्याजवरोन कूच दरकूच आलो. आपणास भास गेला की तुम्ही तिकडेच जाता. बरे नाही म्हटलियाने संपादत नाहीं. बरे आताहि सर्व प्रकारे आम्ही तुमचे आहोत. जे उचित जाणाल तैसे करा, या प्रकारे बोलले. सध्या याजवल फौज सात हजार श्वार आहेत; व गाडदी सात हजार आहेत, व तोफा बासस्ट आहेत. कलावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञात.

¶Ramchandra Krishna Risbud from the camp of Basalatjang—the Nizam's brother—writes to Bhausaheb that he has according to instructions secured the Sanad for the Bijapur Subha from Basalatjang who appears to be well disposed towards the Peshwa.

No. 283] [*21-2-1760*

पौ छ ५ रजब सितैन

फालगुन

श्री

सेवेसी नागो राम चरणावरी मस्तक ठेऊन सिरसां नमस्कार विज्ञापना. ता छ ३ रजबपावेतो मुा मुदगड पो प्रतापपूर येथें स्वामीचे कृपाकटाक्षेकडून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. पेशजी सांडणीस्वारासमागमे दोन पत्रे पाठविली ते पावलीच असतील, सविस्तर वृतांत श्रुत जाहालाच असेल. राजश्री धोंडो आकदेव व रा भवानजी ताकपीर यैसे बसालतजंगाकडे पाठविले आहेत; हे वर्तमान सेवेसी लिहिलेच होते. त्यास उभयेता नवाबाकडे गेले. भेटी जाहाल्या. बोलणे चालणे जाहाले कीं आपल्यासिवाय दुसरा आर्थ किमपि नाहीं. जसी आपली मर्जी त्याजप्रमाणे वर्तावे. हा मजकूर बोलणे जाहाले. व विज्यापूरचा मजकूर नवाब सलाबतजंग याचे व निजामआलीचे सनदेप्रमाणे नवाब बसालतजंग याणी सनद करून दिल्ही. किलेदारास पत्र गुलाम मोहिदीनखान याचे घेतले की किला हवाली करणें हे पत्र घेतले. स्वामीस पारसी थैली नवाबाची व राजे त्रिजनाथ याची येणेप्रमाणे दोन थैल्या यैसे कागद घेऊन बुधवारी उभयेता सा घटका रात्रीस आम्हाजवल येऊन पोहचले. जाहले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. दुसरा मजकूर नवाबाचे बोलण्यात आर्थ की, सर्व प्रकारे निंबालकराचा अभिमान धरिला त्याजप्रमाणे आपण पदरी पडावे. नवाब निंबालकराची जागीर देत असतां न घेतली, आणि विज्यापूर आमचे घेतले.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रीमंत राजश्री नानासाहेबी पुणियात राजे त्रिजनाथ याजवल आभये दिल्हें तेच हृदई धरून इकडे आलो. आवशापावेतो येऊन मग आपणाजवल सामील व्हावे हा आर्थ होता. याप्रमाणे मायाममतेच्या गोष्टी दर्शऊन उभयता जवळ बोलिले. दुसराहि आर्थ की, आंतरंगीचा मार्ग की नवाब निजामआलीस पत्रें जात होती की हिमत धरावी, मुसलमानीचा अभिमान न टाकावा, आम्ही सत्वरच येऊन पोहचतो, म्हणून आर्थ आंतर्यामीचा होताच हेहि स्वामीस विदितच आहे. त्याचा दोहीकडेहि विचार आहे. जसे युक्तीस पडेल तसे करावे हा आर्थ आहे. आढळले वर्तमान लिहिले आहे. पारसी थैल्या दोन आल्या, त्या जासूदजोडी समागमे पाठविल्या आहेत पावतील. किलेदारास पत्र घेतले आहे ते आम्ही ठेऊन घेतले आहे. आम्हाकडील राजश्री मल्हार जगनाथ सडे होऊन आम्हाजवल आले. त्याजसमागमे राऊत देऊन किलेदाराचे पत्र देऊन विज्यापूरचे (अपूर्ण)

¶*A report from Nago Ram to the effect that Salabatjang has agreed to the secession of Bijapur as already stipulated in the treaty with his brothers. "Salabatjang", the writer further says, " while evincing friendship towards the Peshwa, is in secret correspondence with his brothers."*

No. 284] *[22-2-1760*

छ ७ रजब सितैन

श्री

(सेवेसी) त्रिमल गुरुराव सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ ४ माहे रजब मो लस्कर बसालतजेंग नजीक कल्याण स्वामीचे कृपाकटाक्षेकडोन सेवकाचे वर्तमान येथास्तित (असे) विशेष. नवाब बसालतजेंगास बोलावणेबदल निजामआली, * अबदुल फकरखा, सरदारजेंग आले होत. पांच महिने * * तर त्यास नवाबानी ठेऊन घेतले की, नवाबाकडे येता * * * च जाणे जाहाले नाहीं याजकरिता सरदारजेंगास * * * दिल्हा. त्यानी बोलिला जे अजी पांच महिने राहून काम गेलिया आम्हाकडे शब्द लागल. तुम्हाकडील कोणी मातबरास पाठवणे यैस बोलिल. याजकरिता बिरजेना (थ) छ मजकुरी सरदारजेंगाबराबरी निजामआलीखानाकडे (रवाना) केले. बिरजेनाथानी आम्हास सांगितले जे उभयेता बंधूचे भेटीचा योग घडत नाहीं. लटकी समजाविसी करून येतो. मग कूच करून श्रीमंताचे आज्ञाप्रमा(णे) (आ)दवानीकडे जाण होईल यैस सागितले आणि आम्ही त्या(चे) (दि)वान जव्हायेरमलाचे तोंडे येकिले जे, उभयेता बंधू(ची) भेटी होणार. उभयेताचे भेटीनंतर हरयेक मसलत (क)रून

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मग येथून कूच करणार, यैस वर्तमान आ(हे). पुढ जाहाले वर्तमान सेवेसी लेखन करू. समर्थाप्रति विशेष लिहिणे शेक्त नव्ह हे विज्ञापना.

¶*Trimal Gururao reports the movements of Basalatjang and his proposed interview with Nizamali.*

No. 285] [*22-2-1760*

छ ७ रजब सितैन सो-
मवार संध्याकाल फालगुन

श्री

सेवेसी त्रिमल गुरुराव सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ ४ माहे रजेबपावतो मा कल्याण स्वामीचे कृपाकटाक्षेकडोन सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विशेष. येथील वर्तमान राजे बिरजेनाथ यासी राजश्री नागो राम याजकडे नवाब बसालतजेंगानी पाठविले होत. बिरजेनाथ नागोपंताकडे जाऊन कितेक मजकूर श्रीमंतासनिध करार करून आले होत ते मजकूर सांगितले. त्याचे प्रमाणे श्रीमंताचे आज्ञानसार वर्तणूक करितो यैस बोलिल. रा नागोरामजीन सांगितले जे, करारप्रमाणे रायेचूर आदवानी त्या प्रांती राहावे, ते सोडोन कलबर-गेस आला हे वर्तमान श्रीमंतास कलल याजकरिता आम्हास फौजसुधा रवाना केले. पुढ श्रीमंताचे आज्ञाप्रमाणे वर्तणूक केलिया तुमचे कल्याण आहे यैस कितेक ममतेचा भाव दर्षेविला आणि सर्व प्रकार नवाब सलाबतजेंगापासी श्रीमंतानी तुमची स्थापना केलिया दाहा लक्षे रुपयेची जागीर द्यावी यैस बोलिल. ही गोष्टी राजे बिरजेनाथानी अंगिकार[१] केल. तुम्हाकडील मातबरास पाठवणे. नवाबासी हे वर्तमान सर्वहि सांगून याचप्रमाणे करारमदार करून देवितो यैसे बोलोन राजश्री नागोपंताकडील राजश्री धोंडो अकदेव, भवानजी ताकपीर उभये-तास समागमे घेऊन आले. नवाबाची भेटी जाहाली. नवाबानी ही गोष्टी मान्ये केली नाहीं. प्रस्तुत मजकूर राहिला. विज्यापूरचे सनदप्रमाणें मुताबक परवाना करून देणेस फार कष्टी जाहालें. सेवटी विज्यापूरचे परवाना करून दिल्हे. राजेश्री रामचेंद्र कृष्ण वकील छ १ रजब लस्करास कल्याणचे मुकामी आले. छ ३ रोजी नवाबाची भेटी जाहाली. यैली गुजरानिले. आज्ञाप्रमाणे नवाबासी जवाबस्वाल केल. त्यासी नवाब बोलिल जे सर्व प्रकार श्रीमंताचा आमचे दुसरा विचार नाहीं. त्यानी सांगितलेप्रमाणे येथच राहिलो. नवाब सलाबतजेंगाकडे गेलो नाही. पुढेहि श्रीमंताचे मर्जीप्रमाणे करू. रायेचूर आदवा-

---

१ कबूल केलें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नीस जाणे म्हणतात तर तैसच करूं. आम्हास मातोश्रीचे भेटीस्तव, आपले लग्न व्हावयाच आहे याजकरिता जाणे जरूरच आहे, यैसे बोलिले. हा मजकूर रो नागोपंतानी व रामचंद्रपंतानी सेवेसी विनंती लिहिली आहे त्यावरून चितारूढ होईल. नवाब बसालतजेंगानी सलाबतजेंगास अर्जी लिहिली आहे जे, दरमजल तुम्हाकडे येत होतो इतकियांत तुमचे व गनिमाचे सख्यत्व जाहाले यैस कळल, आणि गनिमाची फौजहि आम्हास मुजाहीम जाहाली. पुढे आम्हास काये आज्ञा म्हणून लिहिले आहेत. दोनीकडे अनसंधान ठेविले आहेत. गदवालची फौज दीडसेहे स्वार, पांचसेहे हशेम व खोजे हमीदुलाखा मुबारजजेंग हैदराबादेहून छ २५ रजब नवाबाचे लस्करात आले. पुढे जाहाले वर्तमान सेवेसी लेखन करूं. विशेषे लिहिणे शेक्त नव्ह हे विज्ञापना.

¶*Trimal Gururao reports negotiations conducted by Basalatjang with Nago Ram through Brijanath.*

No. 286] *[22-2-1760*

पौ छ ७ रजब सितैन
फाल्गुन सोमवार

श्रीगणराज

श्रीमंत् राजश्री पंत भाऊ
साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक गोपाल गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ४ रजब मो आंबिलवोहल स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामीनी लिहिल्यावरून श्रीमंतानी दौलताबादेस पाठविले. बुधवारी मोकाम मजकुरास आलों. किलेदारास पत्रें पाठविली जे, नवाबाचा व श्रीमंताचा सला जाला. तहात किला श्रीमंतास दिल्हा. नवाबाचा परवाना आहे. तुंम्ही आपणाकडील कोणीं मातबर माणूस पाठऊन देणे. त्यावरून त्याणी माधोराव म्हणून ग्रहस्त पाठविला. परवाना त्यांस दाखविला. ते म्हणो लागला जे आपण आपणाकडील कोणी शाहाणा माणूस पाठवावा. त्याजसमागमें परवाना पाठवावा. किलेदार परवाना पाहातील त्यावरून मिर्जा कामीलबेग व नारो माहादेव याजसमागमे परवाना पाठविला. त्याणी परवाना पाहिला. उपरांतिक बोलले जे तुम्ही परवाना आणिला, खराच आहे. परंतु आपणास काही आजीपा-

---

१ प्रतिबंध करणारी, हरकत करणारी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

वेतो पत्र आले नाहीं म्हणून शफत केला. बोलिले जे, आपणास परवाना वेगला आलियाउपरी उर्जूर[1] नाहीं. किल्यात माणूस तीनसें आहे. दारूगोलीचे सामान करतात. केवल लबाडीच्या गोष्टी सांगत नाहीं. स्वामीनी नवाबाचा परवाना किलेदारास व येक इतबारी मनुष्य परस्पर किलेदाराकडे पाठवावा व दुसरे परवाने येक दोन सेवकाकडे पाठवावे. नवाबानी किला तहात दिल्हा, परवाने सरकारात दिल्हे, यैसे असतां किलेदारास आजीपावेतो परस्पर पत्र पाठविले नाहीं याचा अर्थ काये? हाली विनंती लिहिल्याप्रों येक वेगला परवाना किलेदारास व सेवकाकडे येक दोन याप्रो पाठवावे. किलेदाराचे पत्र आले तेच सेवेसी पाठविले आहे. किला माणूस पाहून स्वाधीन करावा हे विज्ञापना. उभयेता नवाबांचे परवाने असावे असा आशये किलेदाराचा आहे यास्तव उभयेतांचे परवाने पाठवावे. हे विज्ञापना.

¶*Gopal Govind Patwardhan reports to Bhausaheb the refusal of the commandant of Daulatabad to make over the fortress to the Marathas as he has no instructions from the Nizam. Bhausaheb is requested to get the necessary permits sent to the commandant.*

No. 287] [*22-2-1760*

छ ७ रजब सितैन फाल्गुन

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र कृष्ण रिसबूड कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल छ ४ माहे रजब जाणून स्वामींनीं निजानंदवैभवलेखनआज्ञा निरोपित असिले पाहिजे विशेष. राजश्री (नागो) राम यास आज्ञापत्र आलें होतें कीं, विज्यापूरच्या सनदा करून पाठवणें. त्यास पंत मजकुरांनीं सेवकास सांगितलें व आज्ञापत्र दाखविलें व म्हणाले कीं सरकारची आज्ञा याप्रमाणें आहे. त्यास तुम्ही नवाबांस बहुत प्रकारें समजाऊन सांगोन विज्यापूरच्या सनदा तयार करून पाठऊन दीजे. त्यास नवाब बसालतजंगास अर्ज करून सनदा भावणजी ताकपीर व राजश्री धोंडो अगदेव याच्या स्वाधीन करविल्या, सेवेसी पावतील. व छ २ माहे मजकुरीं च्यार घटका रात्रीं नवाब बसालतजंगाणीं सेवकास बोलाऊन मातमपुरशीचीं[2] तीन वस्त्रें दिलीं, तेव्हां दिवाणखाणियांत बसले होते व दरबारही भरला होता. व दरबार बरखास्त करून सेवकास व राजे ब्रिजनाथ बहादर यांस खिलवतेंत बोलाऊन नेले. प्रथम म्हणाले कीं तुम्हास निघोन किती दिवस जाले?

---

१ आक्षेप, तक्रार. २ दुखवट्याची.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रीमंत राजश्री नानासाहेब यांणीं काय काय सांगितलें आहे तें सांगा. त्याजवरून सेवकानें उत्तर दिलें कीं, श्रीमंत राजश्री नानासाहेब यांणीं सेवकास आज्ञा केली कीं, आपण कोणीकडे जातात ? तुमचा आमचा करार कीं तुम्ही विज्यापुरावरून यावें, कृष्णा उतरूं नये. ऐशियास तुम्ही कांहीं तें मनांत न आणितां नीटच कलबुर्गियावरोन कृष्णा उतरोन आलेत, तेव्हां आमचा तुमचा करार कोठें राहिला ? बरें; आतां तुमची मर्जी काय ? कोणीकडे जाता ? व माहाराजानी वेगळी पुरवणी राजश्री नागो राम यांस लिहिली होती कीं, या प्रकारें यांसी बोलणें, त्याप्रमाणें बोललों, मर्जी कीं तुम्ही भावाची भेट घेऊं नये, परिछिंन दगा होईल व आम्ही तुमची अदोनी रायेचूर मोठ्या जोरावरीनें ठेविलें. आतां विज्यापूर तुमचें कां घेतों कीं तुमच्या भावाच्या मनांत खतरा न जाये. तुमचा आमचा येखलास जो आहे तों प(र्यं)त काहीं अंतर नाहींच, यास्तव विज्यापूर घेतलें. त्याजवर ते म्हणाले कीं तुम्ही बोललें तें प्रमाण. परंतु याची गोष्ट ऐशी आहे कीं आम्ही शाहा महिने अगोधरच आपला दिवाण कुल येखतियारी व कृष्णाजीपंतास सेवेसी तोहफे[1] देऊन पाठविलें. त्यासी तुम्ही ती महिने या उपरांतिक सिद्धांत ठराव बोललेत कीं तुम्ही विज्यापुराहून यावें. राजे विजनाथ आले तेव्हां म्हणाले कीं, मी श्रीमंत राजश्री नानासाहेब यांचे पायावर हात ठेऊन आलों कीं मीं त्याजला घेऊन येतों. त्यास विज्यापुराहून आम्ही येतों. परंतु तुमचें लष्कराचें लढाईचें तोंड सुरूं जालें यास्तव जवळील वाटेनें कलबुर्गियावरोन आळंदेस आलों, ते समयीं आपलें पत्र आलें कीं, तुम्ही कल्याणाकडे जाणें, इकडे न येणें. त्याजवरोन दरकूच माघारां फिरोन गेलों. नाहीं तर आम्ही पुढें येऊन माघारे फिरोन जावे ? परंतु तुमचा स्नेह जरूर यास्तव फिरलों. तुमचें मनांत भावासच भेटावयास आलंदेवर गेलों होतों. जर याजकरितांच गेलों असतों तर तेथून चौदा कोस जरीबी होते. दरकूच जातों. परंतु सारांश तुमची मर्जी रक्षिली. आतां भावानीं आम्हांस पत्रें या वाटें आलों म्हणोन पाठविलीं कीं तुम्ही इकडेच येणें. त्या म्याहि दुनियादारीच्या वाटेनें भावास लिहिलें कीं, मीही तुम्हाकडेच येतों, म्हणोन मोहरेनशी पत्र पाठविलें. आतां भावानीं पत्र लिहिलें असतां म्यां त्याजला काय ल्याहावें ? म्यां तों सर्व गोष्टी तुमच्याच लिहिल्याप्रमाणें केल्या. वेंकटराव जानोजी याचें माहाराजास आगत्य पडलें आणि म्यां तुम्हाशीं इतका स्नेह संपादिला असतां माझें विज्यापूर घेतलें. याचें उत्तर से(व)कानें हें आज्ञेप्रमाणें दिल्हें कीं, तुमचा स्नेह बहुत म्हणोन तुमचा तालुका माहाराजानें राखला, नाहीं तर निजामअलीखान ठेवीत नव्हते. मोठ्या जोरावरीनें ठेविला.

---

१ नजर.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आतां विज्यापूर कां तुमचें घेतलें कीं तुमच्या भावाचें मनांत खतरा न जावा यास्तव घेतलें; नाहीं तर विज्यापूरची मालीयेत की (काय?) म्हणाले कीं विज्यापूरचा मजकूर फारसा नाहीं. जर मजला आज्ञा केली असती तर मीच देतों व आतां आपण घेतलें म्हणोन मजला कांहीं वाईट वाटलें असेल तर शपथ आहे. माझा स्नेह जो आहे तोच आहे. माहाराजानी पत्र पाठवितात सनदा करून घेऊन तुम्हीच गेलेत म्हणोन बोलले. मजला म्हणाले कीं, तुम्ही श्रीमंतांपर्यंत जा व तुमच्या समागमें मातबर माणूस देतों. विज्यापुराविषयीं विनंती करा. जर मर्जीस न ये तर मजकडेच इजारियानें द्या. शेवटीं वरकड सर्व त्याखालील मुलूख घ्या. किल्ला व साहा हजार रुपये तेथील जकात आहे तेव्हडी तरी द्या. म्यां म्हटलें कीं, तुम्ही म्हटलेत तें प्रमाण; परंतु खावंदाची आज्ञा नाहीं. सेवेसी विनंती लिहितों. त्यास ज्याप्रकारें उत्तर येईल त्याप्रमाणें करीन. याप्रमाणें कितेक गोष्टी बोललों. जर काम सरकार किफयेतीचें काहीं असतें तर सेवेसी येतों, परंतु तें तों कांहीं नाहीं. त्यास येविषयींची काय आज्ञा ल्याहावी? आनखी बोलले कीं मजला बंदगानआली वारंवार लिहितात कीं तुमची शादी करावयाची आहे. त्यास उभाउभी येक दिवस राहोन शादी करोन जा. परंतु शंभरावें वाटें जर चौवे सरदारांनीं भरवसा दिल्हा तर येक दिवस तेथें राहीन दुसरे दिवशीं स्वार होऊन पंचमाहालांतून आपले मुकामास जाईन, याप्रकारें समक्ष बोलले. छ ३ माहे मजकुरीं सरदारजंग यांनीं म्हणजे अबदुलफखरखान यानीं नवाबास विचारलें कीं, मजला आज साहा महिने जाले, आतां नवाबांनीं कूंच करून औसियावर आले. ऐसियास आतां म्यां कोणत्या सुखसोईनें जावें? त्यास राजे ब्रिजनाथ यांस समागमें द्या कीं ते जाऊन त्यांसी च्यार गोष्टी समजाऊन शिष्टाचाराच्या सांगितल्या म्हणजे त्यास इतबार पुरेल, यास्तव समागमें द्या. तेव्हां निश्चय जाला कीं जावें. तेच वेळेस प्रहर रात्रीं सरदारजंग यास मुहूर्त होतां तेव्हां लष्करा-बाहेर निघोन राहिले व दोन प्रहर रात्रौ सेवकास राजे ब्रिजनाथ यांनीं बोलाऊं पाठविलें. म्हणाले कीं, आम्ही तो बंदगानआलीकडे जातों, च्यार शिष्टाच्याराच्या गोष्टी सांगोन येतों व शादीचाही आग्रह आहे, त्याजविषयीं रायेरायाहातीं बंदगानआलीस सांगवितों कीं, हा समय नाहीं, पुढें होईल व तुमच्याच म्हटलिया-प्रमाणें अदवानीस नवाब नेतो, ऐसें बाहियातकारें बोलले. आणखी चौ जागां शोध घेतां दिसून येतें कीं, बंदगानआलीशीं समक्ष यांनीं बोलावें आणि याच्या त्यांच्या भेटी व्हाव्या; परंतु पाहावें, कोणता सिद्धांत ठेरतो, येकां दो दिवसांत कलेल तो सविस्तर सेवेसी लिहितों. राजश्री नागो राम यास माहाराजांनीं वेगळी पुरवणी लिहिली कीं त्याजप्रमाणें त्याशीं जाबसाल करणें, त्यास सेवकानें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्याप्रमाणेंच जाबसाल केला आणि तेव्हांच जाऊन सनदहि तयार करून घेतली. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.....सेवेसी आज्ञाधारक निंबाजी माणकाजी साष्टांग दंडवत.....

¶*Ramchandra Krishna Risbud sends news of his interview with Basalatjang about Bijapur.*

No. 288] [*22-2-1760*

छ ७ रजब सितैन

श्री

सेवेसी नागो राम चरणावरी मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ४ रजब भृगुवासरें मुकाम ताडमुंगली परगणे कल्याण येथें स्वामीचे कृपाकटाक्षेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. आम्ही शुक्रवारीं मुदगडावरून कूच करून पुढें च्यार कोंस आलों. त्यास शुक्रवारींच नवाब बसालतजंग याजकडील राजश्री ब्रिजनाथ हे नवाब सलाबतजंग याजकडे भेटीस गेले. समागमें दोनशें स्वार व गाडदी शें दीडशें आहेत. शुक्रवारीं कसबें निलग्यास जाऊन मुकाम करावा, शनवारीं आवशास जावें, नवाबाची भेट घेऊन कितेक मजकूर बोलोन माघारें यावें, उपरांतिक नवाब बसालतजंग याची व नवाबाची भेट जाहाली तरी होईल; तोवर नवाब बसालतजंग कल्याणावरच आहेत. स्वामींनीं पेशजी आम्हास लिहिलें होतें कीं, नबाब सलाबतजंग व आम्ही जवळ आहों तोंच बसालतजंग यांणीं भेट घेतली तरी नवाबाची भेट घ्यावी ऐसें होतें म्हणून राजश्री ब्रिजनाथ गेले आहेत. कदाचित आम्ही आडथळा करावा तरी आपलीहि आज्ञा नाहीं आणि त्यांजकडेहि येकनिष्ठपणाचा गुंता नाहीं. आवशास नवाब असिले तरी भेट घेऊन मग स्वामीचे भेटीस यावें. कदाचित आवशास नवाब नसिले तरी आगोदर स्वामीची भेट मग नवाबांकडे जावें हा विचार आहे. जाहालें वर्तमान लिहिलें आहे. विज्यापूरची सनद रविवारीं फौज व मल्हार जगन्नाथ कारकून चिरंजीवासमागमें देऊन रवाना करतों. शुक्रवारीं रवानगी करणार म्हणून पेशजी स्वामीस लिहिलें आहे. त्यास बसालतजंग याचें लष्करांतून वर्तमान ऐकिलें कीं सनद नवाबांनीं दिल्ही खरी परंतु चित्तांत विकल्प आहे. विज्यापुरास दोनशें राऊत व गाडदी पाठविणार हें वर्तमान ऐकिलें आहे, त्याजवरून लष्करांत बातमी ठेविली आहे. त्याचें चित्तांत कीं बऱ्हाणपूर व अशेर व मोलेर वगैरे जागां ठाणीं बसोन अमल बसेल तेव्हां विजापूर हवालीं करावें, हा मनोदय. यवन लोक मसलतीनें आहेत. त्याणीं

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

यास सांगितलें आहे त्याजवरून राऊत तिकडे पाठवावयाची तजवीज आहे म्हणून वर्तमान यैकिलें. म्हणून येक दोन दिवस आम्ही इकडून रवानगी करावयास दिरंग केला आहे. गाडदी व स्वार तिकडे रवाना जाले तरी आम्हीच हजार पांचशें राऊतानिशीं जलदीनें जाऊन पोहचून राऊत व गाडदी लुटून घेतले जातील. स्वामींनीं जमीदारांस व भवतांली ठाणीं आहेत त्यांस ताकिदी पाठवाव्या. किल्ल्यांतील प्याद्यांच्या जमांतदार हजारी येक आम्हास भेटला. किल्ल्यांतील लोकांची सिबंदी फार चढली आहे; च्यार दिवस आडथळा पडेल म्हणून हजारी सांगत होता आणि त्याणेंच हे बातमी राऊत गाडदी पाठविणार हें सांगितलें आहे. तथ्य वर्तमान यैकिलें, त्याजवरून लिहिलें. तेथें गेल्यावर जसा प्रसंग दृष्टीस पडेल तशी तजवीज करूं. कार्य करूं. सनदा जमीनदारांस व भोंवतांलीं ठाणीं आपलीं आहेत त्यांस ताकिदी चव्हाणास ताकीद करावी कीं, किल्ल्याचे गांव बळकाविलें आहेत ते झाडून सोडणें, त्यास पत्र, ऐशीं पत्रें सेवकाकडे पाठवावीं. सनदां व ताकीदपत्रें सत्वर रवाणा केलियास सर्व साहित्यें करितील. सरकारचें अभयपत्राणें जमीदार बेवसवास भेटतील म्हणून विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. कल्या(णा)वर नवाब आहे. आम्हास त्यास तफावत च्यारपांच कोसाची आहे. हें विज्ञापना.

¶Nago Ram writes to the Peshwa about the intended meeting between Nawab Salabatjang and Basalatjang and further communicates to him the reports that the sanad, regarding Bijapur, was not granted by the Nawab with the best of intentions.

No. 289] *[19-2-1760*

पौ छ ९ रजब सितैन

फाल्गुन

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेबाचे सेवेसी

अज्ञाधारक विष्णु सदासिव कृतानेक विज्ञापना यैसीजे. पहिले नवाब बसालतजंग यासी कल्यानाकडे फिरविलीयाचे वर्तमान व कल्यानास पोहचलियाचे वर्तमान सेवेसी विनंती केली होती ते पावली असतील. सांप्रत छ १ माहे रजब पावतो कल्यानास मुकाम नवाबाचे जालेत. स्वामी विज्यापूरचे किल्याखाली करायाविसी नागोरामजीस पत्र लिहिलीत. त्यास पाचसात दिवस जाबसालाखाले घातले होत. त्यास आता छ १ माहे मजकुरी राजे ब्रिजनाथ भेटावयासी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
नागोरामाचे गेलेत. भेटीनंतर काये तह पडतो तो विनंती करूं. ब्रिजनाथ म्हणतात जे आमसी करार काये केला आणि हे काये केले? आमची किला घेतला. त्यास स्वामीनी ल्याहावे की, तुम्ही काये करार इष्टत्वाचा केला आणि पा ताबे येथील अडीज हजार रुपये घेतलेत आणि गुरे नेलीत? विष्णु सदाशिव (व)कील यासी कलूहि दिल्हे नाही आणि दुसरे गुंजोटी व आलंद पो याची गुरे व सारा गाव खराब केलेत हे काये इष्टत्व केले यैसे ल्याहावे. त्याची बदला किला गेला. गुराढोरासाठी रदबदल केली. त्यास बेकैदीने यैसा बोलला की वाचेमधे आणू नये. आमची फार बेंकर राखिला. त्यास ब्रिजनाथास हुजूर बोलाऊन घेणे म्हणजे सर्व कार्य निघून येते. आमचेविसी नवाबास पत्र व ब्रिजदासास पत्र पाठवावे. खर्चयासी पाठऊ(न) द्यावे. दोमहिन्याची बेगमी श्रीमंत नानासाहेबी केली होती. (अपूर्ण)

¶*Vishnu Sadashiv to Bhausaheb: informing him of the movements of Basalatjang and reporting the objection raised and the terms of the treaty arranged by Brijanath. The writer suggests to the addressee the lines on which the arguments of Brijanath should be met.*

No. 290] [*24-2-1760*

छ ६ जमादिलाखर शुक्रवार

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री दमाजी गायेकवाड देसीहून येत होते, त्यास घाटा-खाले खंडागले याणी दमाजीबावा मजल चालोन आले, मुकाम जाहला, लस्कर चौकडेस वैरणदाणियासी गुंतले आण दोन अडीच हजारानिसी ढालाजवळ निशाणे पाडून बाजारपर्यंत येऊन मारामारी केली. दामाजीबावा भोजन करीत होते, तो डेऱ्यानजीक येऊन पावले. सिलेदार याणी आपलाली घोडी वस्तभाव घेवून पलाले. खास पागेसी गाठ पडिली. वरकड भले लोक कोणी उभे राहिले नाहीत. दमाजीबावानी जातीने संभाळून निघाले. दमाजीबावास उजवे हाताचे पंज्यावर तरवारेची जखम येक आहे. त्याचे डेरे जामदारखाना सर्व नेले. चारियासी उंटे गेली ती राहिली. वरकड भले लोकानी आपली घोडी वस्तभाव घेऊन पळाले. दमाजीबावा परेलीचे घाटे आले. खंडागला जोगाईच्या आंब्यावर आज आला. खंडागला याणे दगा केला. अगोधर सेवेसी मोघम बातमी आमची आली ते लिहिली आहे. हाली मानाजी जाधव दमाजीबावाकडेस पा.[१] त्याणी सविस्तर सांगितले, मंगळवारी दोन प्रहरा त्यास दगा जाला. आज आम्हापासून दोन कोस

---

१ प्रतिष्ठा.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

उजवे हाते राहिले आहेत. च्यारपाच हजार फौज खंडागल्याची बातमी राखोन परभारे त्याचे काम करावे, नाहीतरी मोगलास सामील होईल. सेवेसी श्रुत होये. आपल्याकडेस खंडागल्याची बातमी ठीक असेल त्यारोखे पा. आम्हीहि आंब्याचे रोखास बातमी पा आहे हे विज्ञप्ति. गुरुवारी प्रहर रात्र पहिला प्रहर, ज्या गावावर मुकाम आपली चिठी आली तेथे केला आहे हे विज्ञप्ति.

¶*News-letter reporting surprise attack on Damaji Gaikwad's army by Khandagle.*

No. 291] [*25-2-1760*

छ ७ रजब

श्री

सेवेसी विनंती. आजी नवाब उभयताचे बोलणे आज्ञेप्रो इमान प्रमाण जाहाले. परस्परे दिल्हे घेतले. कनिष्टासी पुर्ते बोलणे. जेष्टाची मर्जी ठीक नव्हती भेट मात्र जाहाली. कागदपत्र कुचामुले पुर्ते न जाहाले यास्तव मजलीपर्यंत जातो. जर न जावे तरी जे कागद जसे पाहिजे तसे काही आम्ही दोघे असल्याखेरीज होणे नाही. याजकरिता जरूर जाणोन गेलो. येक दोन दिवस लाऊन कामे पुर्ती उरकावी ही आज्ञा ही लांब पडेल यास्तवमात्र शब्द न यावा. कामे पुर्ती जाहाल्याखेरीज न यावे यास्तव जातो. कलावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*One of Peshwa's negotiators reports his doings.*

No. 292] [*February 1760*

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीनी कृपा करून चिठी पाठविली. तेथे "आम्ही आलसी. आम्हाकडू(न) सर्व गोष्टीने चाकरीत अंतर पडते. लांब फार राहातो. चौकीचा बंदबस्त आमचे वस्तू होत नाही. स्नानसंध्या आमचीच फार. मोगलाचे लस्करांत दाणादुणा कहीकबाड जाते ते आम्हाकडूनच जाते" ऐसे बहुता प्रकारें शब्द लाऊन लिहिले ते प्रमाणच. आपल्या ध्यानास येईल ते अन्यथा कोण म्हणेल? वरकड सर्व सरदार मेहनती, त्याची हिमत अधिक, मनसबा अधिक हेहि येथार्थ: आम्ही दोन महिने स्वामीच्या सनिध राहून दोन च्यार जुंजात प्रथम लडाईचे तोंड आम्हाकडूनच लागले. घोडी दोन अडीचसे पडिली, माणसे पडिली व जखमी जाली. वरकड तमाशा पाहाणार, ते आम्ही सारखेच. समक्ष

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
चाकरी करीत असतां तेथेहि आम्ही कोठें राहातों चाकरीस द्रिष्टीस पडत नव्हतो हेहि लोकांच्या सांगितल्यावर आपण म्हणत होतें. आता तो स्वामीपासून आठा कोसावरी आलो आहो. सर्व गोष्टीने आम्हाकडूनच चाकरीत अंतर पडते, हे स्वामीच्या ध्यानास आलियाचे अपूर्व नाही. च्यार दिवस मात्र पछाडीस येऊन जाहाले. स्वामीच्या चिठ्या येऊ लागल्या जे सलूक होतो, मोगलाचे कहीस उपसर्ग न देणें, हेहि स्वामीच लिहितात. आपलेच आज्ञेवरून करणे लागले. हाली असा प्रकार लिहिला तरी स्वामीचे मनसबे क्षणक्षणाचे ज्या वेलेस जो जसे सांगतो ते आपल्यास प्रमाण वाटते. आणि त्याचप्रमाणे लिहिले येते. आमच्या लस्करातून दाणीयाची वोझी जातात, त्यास आम्ही जाऊ देतो, ऐसें आम्हास काहीच कलत नाही. यास्तव इतबारी कोणीयेक ज्याचे सांगितले आपल्यास प्रमाण पडे ऐसा येखादा आम्हाजवळ पाठऊन द्यावा, तो सांगेल तेच प्रमाण मानावे, लोकांच्या सांगितल्यावरी न जावे. मोगलाचे कार्य जाहालिवरी पुढें विनंती करणे ते करून. सेवाचाकरी जिवाभ्य करून रात्रंदिवस श्रम करून कर्जाचे डोंगर केले त्याचे सार्थक गौरव स्वामीनी उतमच केला. याजपेक्षा दुसरी अधिकोतर जोड नाही. असो. श्रीसता प्रमाण. स्वामी ज्याप्रमाणे आज्ञा करितात त्याचप्रमाणें सेवा करितो; परंतु स्वामीची आज्ञा अगर चिठी आली ते प्रमाण मानू नये (असे) हालीच्या चिठीवरून ध्यानास आले तरी कोणते रीतीने वर्तावे हे आज्ञा करावी. त्याचप्रमाणे वर्तणूक करून. नांदुरावरी राहाणे. आपली आज्ञा त्याचप्रमाणे राहून. पुढे दीडा कोसावरी चौकी पाठवितो. लोक आपल्यापासी फार दूर राहिलो म्हणौन सांगतात आसो. सांडणी स्वार व जासूद येतात त्यासच विचारावे जे, आम्ही किती दूर आहो, त्यावरून कलेल. बोरघाटावरून आमल्याकडून मोगलाची कही भरून आली, आम्ही ठिकाण लाविले. तिकडील बंदबस्त स्वामीनी केला असेल तो विदितच असेल. कही तिकडून येते, नाव आमचे होतें यास उपाय काय करावा? पसंगैहत (?) सेवा चाकरी केल्याने ध्यानात काय येणार? तरी पछाडीस थोडी फौज असिली तरी कार्यास येईल. येथें दुसरीयाची नेमणूक करून पाठवावे म्हणजे आम्ही समक्षच राहून चाकरी होईल तें करून म्हणजे आम्हाकडे सर्व दोष वारेल. वरकड सविस्तर राजश्री अवचितराऊ विनंती करितील त्यावरून ध्यानास येईल. सेवेसी+ श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Vithal Shivdeo tries to repudiate the charge of slackness made against him.*

---

१ पश्चात्.

+ पत्र विठ्ठल शिवदेवाचें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 293] [*February 1760*?

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादा साहेब
स्वामीचे चरण सेवेसी

सेवक आज्ञाधारक सिवराम आनंदराम चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती यैसीजे. काली रविवार लडाई खूब जाहाली. लष्करांत माहाराजाकडील तोफाचे गोळे येऊन पडले, ते माळावरी येक सिपाई व घोडा १ ठार जाहला. नवाब निजामआलीखां याचे अंबारीवरून गोले जाऊन पलीकडे पडले. त्याजवरी दिवस दोनी घटिका उरला असतां मोकामाचा जाला. आपणांकडील लोकानी तोफ लाऊन पाणी बंद केलें होतें. या सबब तोफखान्यावरी नवाबानी हला करविली, तेसमई आपणांकडील लोकानी खूब सांभाळून तोफा काहाडून घेऊन गेले. तोफा हिरून घ्याव्या म्हणोन सिपाई लोकानी इकडिले बहुत कस्त करून सिपाई बहुत जखमी जाहले. राजश्री जाधवराव याजकडील दाहा पंधरा घोडीं ठार जाहालीं, आणि वीस पंचवीस घोडीं गोळी लागोन जखमी आहेत. सिपाई लोक पंचवीस तीस जखमी आणि दाहा पांच जेर आहेत, यासिवाय नवाबाकडील लस्करचे सिपाई जागाजागा दोनतीनसें जखमी म्हणोन वर्तमान आइकिलें. आजी मागती तोफा लावणार म्हणोन येथ वर्तमान आले आहे. तोफावर मागती चालोन घ्यावे म्हणोन अवघियानी मनसबा केला आहे. माहाराज जे काम करतील ते पोख्ती गोस्टी करावी. ज्या गोष्टीनें आपण बोलवाला नक्षे होये ते गोष्टी करावी. यावरी साहेब धणी आहेत. चित्तास येईल तें खरें. सयाजी जासूद बातनी देऊन येत असतां वाटेंत त्यास तोडिले. झोलणा वगैरे सर्व नागवोन घेतलें. त्यासी सेवेसीं पाठविलें आहे. जाहाले वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे. पुढें जें वर्तमान होईल तें सेवेसीं निवेदन करूं. मोंगल व इतर लोकाचे मनी लढाई खूब करावयाची आहे. सेवेसी कलावें हे विनंती.

¶*Sivram Anandrao, from the Nizam's camp, reports an action in which the Nizam lost a number of soldiers. He sends information to Raghunathrao and asks him to be on his guard as an attack on the Maratha batteries was being planned.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्री

श्रीमंत राजश्री बलवंत रावजी
स्वामीचे सेवेसी

पोष्य नागो राम कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहाले तो सोमवारी गुंजोटीस आलो. मोगलाकडील बातमी आली कीं, मोगल कल्याणचे किल्यास आश्रास गेला. गुंजोटीपासून दाहा कोस आहे. आम्ही बुधवारी कूच करून मुदगड प्रा प्रागपूर (प्रतापपूर) येथे गेलो. तेथून मोगल साहा कोस आहे. राजश्री ब्रिजनाथ यास आम्ही पत्रे लिहिली होती की, सांप्रत योग नवाब बसालतजंग याचे कल्याणाचा आहे, तरी आम्ही फौजसुधा आलो आहो. भेटीस यावे. त्याजवरून त्याणी उतर लिहिले की, आपल्याकडील शाहाणा माणूस पाठवावा. बोलणे होऊन मग भेटीस येऊ म्हणून उतर आले. त्याजवरून आम्हाकडील (राजश्री धोंडो मुकुद) पारसनीस आहेत त्याजसमागमे पारसी थैल्या देऊन लस्करात पाठविले आहे. राजश्री ब्रिजनाथजीस लिहिले आहे. त्यास त्याचा सालजाब लौकरच येईल. उपरांतिक ब्रिजनाथ याची आमची भेट होईल. जे बोलणे होईल ते मागाहून लेहून पाठऊ. वरकड कितेक मजकूर आपल्यास विनंती करून आलो आहे. यादगीर व कुलबुर्गाविसी विनंती श्रीमंतास व आपल्यास केलीच आहे. प्रसंग हाच आहे तरी समयास श्रीमंतास स्मरण देऊन जागिरीत करून घ्यावे. आपल्यास स्मरण वारंवार गणेशराव देतील. मैरालची पेठ (राजश्री) धोंडो आकदेव याजकडे होती ते सांप्रत जागीर राजश्री विठल सुंदर याणी करून घेतली आहे. त्या पेठेस व श्रीस नाना प्रकारे उपद्रव होतो. ब्राह्मणास उपद्रव होतो; तरी सांप्रतकाली जागिरीत मैरालची पेठ व गाव आपल्याकडे सरकारात करून घ्यावा म्हणून रा धोंडो आकदेव याचा आग्रह फार. देवस्थल आहे करून घ्यावे. बसालतजंग आवशास यावयाचा निळये होता. श्रीमंताचे फौजेचें सेहामुले मागती माघारा कल्याणास गेला. किला त्याणे जवळ केला, आम्ही साहा को (सावर) मुकाम केला आहे. त्याजकडील भला माणूस आलियास करारमदार आज्ञा श्रीमंताची आहे त्याप्रमाणे बोलून निछे (निश्चय) करून सांडणी स्वार रवाना करितो. नवाबाणे आपणाकडेस श्रीमंतास पत्र लिहून सांडनीस्वार रवाना केला आहे. तेथे मार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लिहोन पाठवितील तो सेवकास मार कळवावा. त्याप्रमाणे येथे आम्हा बोलोन कामकाज..... व येतो बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶Nago Ram writes to Balwantrao that negotiations with Salabatjang have been opened. He requests the addressee to use his influence with the Peshwa in order that he may be granted a Jagir in the newly acquired provinces of Yadgir and Kalburga.

No. 295] *[9-2-1760*

छ २३ जाखर माघ
सितैन सोमवार दोन प्रहर

श्री

सेवेसी नागो राम चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ जाखर पावेतो स्वामीचे कृपाकटाक्षेकडून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचा निरोप घेऊन निघालो ते लस्करापासून पंधरा कोसावर टाके मालुर्डी पो आवसे येथ शनवारी मुकाम केला आहे. मोगलाकडील वर्तमान तरी कलबुर्ग्याआलीकडे तीन कोसावर चिंचोली म्हणून गांव आहे तेथे आहे. सोमवारी त्याचे लस्कराआलीकडे ती चो कोसाआलीकडे जाऊन पोहचतो आणि बातमी स्वामीकडे वरचेवर पाठऊ. थैल्या पारसी आद्याप पावल्या नाहीत व जासूदजोड्या पांच स्वामीनी देविल्या होत्या त्या पावल्या नाहीत. त्यास ताकीद होऊन लौकर पाठविल्या पाहिजेत. थोरात व रणसिंग व ताकपीर येथे सर्वत्र येके जागा आहो. उदैक छ २२ जाखरी रविवारी कूच करून गुंजोटी परगणियांत दाहा कोस जाऊ. येते समई कलबुर्गाविसी व यादगिरीचे किल्या-विसी स्वामीस विनंती केली होती. आपण आश्वासन दिल्हे आहे. यादगिरीचा किला फार सरस नामांकित. बागाईत फार व निमे परगणा भिवरथडीस लागला आहे. इकडे पंचमाहाल व चितापूर व सुरापूर व रायचूर समीप. इतके जागा आमल बसेल. किला हातास आसावा. तसेच कलबुर्गे गुंजासी फार आहे. तर्फा पाच व हवेली येक येकून सा तर्फा आहेत. मुलूक फार सरस. घेतल्यास फार उपयोगी पडेल. येविसीची विनंती करणे ते केलीच आहे. प्रसंगी सेवकाने जवल असावे. त्यास स्वामीसेवेमुले इकडे आलो. कलबुर्गे प्रांतात शाहाबाद ठाणे आमचे आहे. त्यास आम्ही गढी उतम बांधली आहे. पंचवीस हजार रुा खर्च लागले आहे. पेठ सरस कसबा आहे. पेठेस कौल दिल्हा आहे. वाणी उदमी फार आहेत. आम्हाकडील पागा व उंटे व हती व खिलार गुरे व सेल्या मेंढरे आहेत. बसालतजंग याणी उपद्रव केला होता. जागा चांगली

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

म्हणून बचाव जाला आहे. गुरेंढोरें बहुत नेली म्हणून वर्तमान यैकतो. ठाणियाचे आसपास गाव आहेत. त्यांची याद सेवेसी आलाहिदा पाठविली आहे. गणशेराव प्रविष्ट करितील. परगणा जाहाला तरी उतमच आहे. नाही तरी निदानी हे तरी गाव करून घ्यावे. आगत्य जाणून सेवेसी विनंती लिहिली आहे. हसनाबाद व निलगे हे दोनी माहाल चांगले गुंजासी (?) आहेत. जागिरीत घेतल्यास उतम आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nago Ram, who had been despatched towards Kalburga to checkmate Salabatjang, keeps the Bhau informed of his moves. He advises the addressee to include Yadgiri in the territory to be demanded from the enemy as the place occupies a strategic position. At the end he suggests that the place and some of the country round it may be granted to him in Jagir.*

No. 296] *[Recd. on 1-3-1760*

पौ छ १२ रजब
सितैनी माघ

श्रीगणराज

सेवेसी गोपाल गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. परवाने आल्या उपर किलेदारानें किला उगाच काही न बोलता दिल्हा तरी उतम जाले. कदाचित परवाना आल्याउपर सिबंदीचे व खास जागिरीची अड घालितील यास्तव विनंती लिहिली असें. जसी मर्जी तसा जाबसाल करीन. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

¶*Gopal Govind Patwardhan seeks advice regarding terms to be offered to the Killedar of Daulatabad.*

No. 297] *[5-3-1760*

छ २२ रजब सितैन

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १६ रजेब पावेतों मुकाम मौजे इरलें परगणें नलदुर्ग स्वामीचे कृपेंकरून येथास्थित असें विशेष. आलीखान गाडदी याजकडील बंदुखा १५० दीडशें वगैरें सामान तोफखान्याकडील छकड्यावरील आहे तें याच्याबराबर यावें तें न आलें, याजकरितां सेवेसी विनंती लिहिली आहे. तरी सदरहू बंदुखा वगैरें सामान जें राहिलें

---

१ पुष्कळ वस्तीचे?

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आहे तें हाजिराहजीर येऊन लस्करांत पोहचें तें करणार धणी समर्थ आहेत. आलीखानाकडील गाडदी रोजमरा घेऊन श्रीमंत राजश्री दादासाहेबाचें लस्करांत राहिले आहेत. त्याचें ठिकाण मशारनिलेकडील गाडदी लाऊन विनंती करितील त्याप्रमाणें त्यांस ताकीद होऊन जलद येत तें करावें. येतेसमयीं बंदुखाबराबर जासूदजोडी द्यावयाची आज्ञा जाहाली पाहिजे. हजिरीचे दस्तक देविलें पाहिजे. उदईक आमचा मुकाम बारोली (हारोळी ?) नजीक तुळजापूर उजवें तीन कोंस येथें आहे. पथके कोणीं मागोन येणार ते अद्याप आलीं नाहींत. येखादा मुकाम करून वाट पाहूं. जर न येत तरी आमचा इलाज काये ? मग कूच करून जाऊं. स्वामीनी नेमणुकेप्रमाणें लोकांस ताकीद केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶Visaji Krishna writes that 150 guns and some other articles pertaining to the artillery should be sent to him without any delay.

No. 298] *[22-3-1760*

पो छ १४ साबान
सन सितैन

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ ४ मंदवार मुकाम लष्कर नवाब बसालतजंग नजीक गबूर, प्रांत कलबुरगे, जाणून स्वामींनीं निजानंदवैभवलेखनाज्ञा निरोपित असिलें पाहिजे. विशेष. पूर्वी सेवेसी विनंतीपत्रें पाठविलीं होतीं तीं पावलींच असतील. त्याजवरून सविस्तर वर्तमान सेवेसी श्रुत जालें असेल. यानंतर छ १ माहे शाबानीं मुकाम भगीवगंदल (?) येथून निजामअलीखाण याणी नवाब बसालतजंग यास येक हत्ती व येक घोडा वस्त्रें देऊन रुकसत केलें. दुसरे दिवशीं निजाम-अलीखाण यांणीं साडेसाहा कोसाचे कूच करून कुहीरचे रोंखे गेले. व नवाब बसालतजंग याणी दो कोसाचे कूच करून मगलंगरी प्रांत चिटगुपें येथें येऊन उतरले. सायंकाळीं नवाब सलाबतजंग बसालतजंगाच्या डेरियास येत होते, त्यास बसालतजंग सामोरें जाऊन येक घोडा सतका करून सोडून दिला.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सलाबतजंग यास डेरियास घेऊन आले. दोन घटिकापर्यंत बसले होते. त्यास त्यासी बोलणें जालें कीं, मी आपल्याशीं पहिलेपासोन येकनिष्ठेनें आहे. आतां तीं निजामअलीखानाशीं शपथा जाल्या व आपली आज्ञा घेतलियानंतर फिरोन माझे डेरियास आले होते. खाना खाऊन फिरोन आणप्रमाण जाली. त्यास मजला जे समयीं आज्ञा येईल त्या समयीं येतों याप्रमाणें बोलणें जालें. त्याचा खुलासा इतका कळला. निजामअलीखान बसालतजंगाचें घरीं आले होते तेव्हां त्यासी त्यांसी बोलणें जालें कीं, आम्ही शिकाकोलाकडे जातों. पुढें अबदुल्ला शिराणी यांस पांचशें स्वार देऊन पाठविला आहे व आम्ही दरकूच जातों. गणपतिराज जमीदार शिकाकोलचा मेला आहे, त्यास तें मैदान खाली आहे, तिकडे जाऊन तिकडील बंदोबस्त करून इंग्रेज पहिल्यापासोन आपल्याकडे लाऊन ठेविले आहेत. त्यास मुसा भुशीप्रमाणें मुलूक देऊं म्हणोन उमेद्वार करून दोन हजार फिरंगी व दोन तीनशें तोफा व समागमेंची फौज आहेच, आणि आणखीही दाहा बारा हजार फौज जमा करून येतों. तुम्हास जे समयीं बोलावीन ते समयीं येणें. याप्रमाणें कितेक गोष्टी बोलले. उभयतां मात्र दोघेच होते. सेवकानें चोबदार खिजमतदार यांस दरमाहा करून लाऊन ठेविले आहेत, त्यास येक खिजमतदार जवळ होता त्यानें सविस्तर जालेला मजकूर सांगितला व नासरकुलीखान खानसामा बहुत प्रमाणिक हा स्वामीचा हरयेक कामांत सई करितो. त्याचेहि तोंडे दाखला पुरला त्याजवरोन सेवेसी विनंतीपत्रीं लिहिलें आहे त्याजवरोन सविस्तर श्रुत होईल. तळावरोन आज सेवेसी विनंती-पत्र लिहिलें. कूच करून कमलापुर पा कलबुर्गे येथें गेले. तेथोन कलबुर्गे च्यार कोंश आहे. ब्रिजनाथ निजामअलीखान याचें लष्करांत गेले आहेत. तीन दरकुचें जालीं. अद्यापि आले नाहींत. माहाराजांनीं सेवकास आज्ञापत्र व राजश्री नागो राम यासही पत्र पाठविलें व नवाबास थैली पाठविली ते पावली. व राजश्री नागो राम यानी सेवकास सविस्तर लिहिलें त्याजवरोन सविस्तर कळले. आजचे मजलीस आज्ञेप्रमाणें बोलतों आणि सविस्तर सेवेसी लिहितों. कलबुर्गि-याचा किल्ला खोजे रहमतुलाखान यांस दिला आहे. त्यास कदीम किल्लेदार आहे तो अद्यापि अमल देत नाहीं म्हणोन कलबुर्गियास जाऊन अमल बसऊन देऊन पुढें जाणार. खोजे रहमतुलाखानास बहुत मानितात. त्याचें घरीं येकांदों दिसां जातात. खोजे रहमतुलाखान निजामअलीखान [अपूर्ण].

सेवेसीं निंबाजी नाईक सा दंडवत.

¶A meeting of Basalatjung and Nizamali is reported to the Peshwa. Gajapatiraj referred to belonged to Chikakole.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 299] [*5-4-1760*

छ १९ साबान सन
सितैन

श्रीविट्ठलराज

श्रीमंत माहाराज राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

आज्ञांकित त्रिंबक जगंनाथ सा नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान ता छ १८ माहे शाबान मुकाम बीड माहाराजांचे प्रतापें येथास्थित आसे विशेष. राजश्री हणमंतराव निंबालकर यासी सरकारचे पत्र व आयाल-मुराद+ घोडा बराबर जासूद जोडा पाठविला व चरणरजास आज्ञापत्र सादर जाले कीं रायास घोडा प्रविष्ट करून उतर रवाना हजूर करावें. आज्ञेप्राने घोडा रायास दिधला. उतर जासुदाबार मागून रवाना हजूर होईल. तेथील वर्तमान रो गोपालराव माहादेव येवनाकडील वकील येथे येऊन पोहचले. रायांचे दर्शण घेऊन त्रिवर्ग बंधूनी इनायेतनामे[1] राव मजकुरास पाठविले होते ते यासी दिधले. त्यामधे मजकूर लिहिला आहे की, तुमची आर्जी बरचेवर येऊन पोहचली कीं, युध्ये प्रसंगीं लाईलाजीकरितां आपन शामील न जालो. याजकरिता संशये मुलाजमतीस यावयाचा जाला आहे; तर येतदविशई संशये चितामधे आनावा यैसा आर्थ नाही. दरगाहा श्रीमंत साहेबाची फौज बेशुमार दरमियान येऊन उतरली असतां तुम्ही कैसे यावे. आपन कस्ते[2] केला होता कीं, धारूरास येऊन तुम्हास आपनामधे शामील करून घ्यावे. आम्हापासी तोफखाना व फौज वगैरे सरंजाम मातबर असतां तेथवर येणे कठीन जाले. तुमची बिशाद[3] काये? इतकीयाकरितां तुम्ही कदापि हे गोस्ट चितामधे न आनने. खातीरजमा राखोन आपले स्थलीं राहाणे. बादजबरसात तुम्हास हजूर बोलाऊ पाठऊ त्यासमई दिरंग न लाविला पाहिजे. याहीवर तुम्हास संशये फारच आसेल तरी निजामआलीखानानी लिहिले आहे की, आपन त्या जिलीयास थोडक्या जमावानसी येऊन तुम्हास घेऊन जाऊं. सर्व प्रकारे समाधान आसो दीजे. हे पत्रें रायानी वाचून पाहून बहुत खूश जाले. त्या दिवसीं राव माारनुलेची वर्शगांठ[4] होती. दिवानखाणियांत फर्श[5] गालिचे वगैरे करून शादी केली. मुतसदी व जमीदार व हाली[6] मवाली वगैरे लोकानी नजरा गुजरानल्या. छ १४ माहे मजकुरी वाळूहर व वाकली परगणियाचे कमायेशदाराचे पत्र रायां आले कीं, पा मजकूरचे

+ मोठ्या आयाळीचा. १ कृपापत्र, विनंतीपत्र. २ निश्चय. ३ ताकद.
४ वाढदिवस. ५ फरशी, लाद्यांची जमीन. ६ उच्चनीच सर्व लोक.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कितेक गाव बदले आहेत. वाजबी जमाबंदीचा यैवज वसूल देत नाहीत. हे लोक जोरतलब[1] आहेत. यैसियास फौज व तोफ या जिलीयास रवाना जालिया जरबेत येतील. वाजबी पैसा आदा करतील. त्याजवरून रायानी सासे स्वार व तोफा २ व गाडदी पाऊनशे धोंडजी पोवार व दुसरा येक सरदार करून त्याजबार रवाना केले. आपन या स्थलीच आहेत. बक्षीसी बोलले कीं, सरंजामी लोक बहाल ठेऊन वरकडाची तारीख बंद करणे. दसरा जालियावर मागती सही करूं, यैसे बोलले मात्र आहेत. आद्याप आमलामधे आनिले नाही. पा पाथरी येथील कारभार पायेमालीमुले ओफतर[2] जाला आहे. तेथील कमायेशदार जुजरसीस[3] पोहचत नाहीत म्हणऊन राजश्री तुकोजी चव्हान मायेचे मानूस व दौलतख्वाह[4] आहेत यास त्या स्थलास एका दो दिवसात रवाना करणार आहेत. चरणरजाचे स्वाधीन च्यार जासूदजोड्या आहेत त्यापैकी केरोजी जथे येसाजी नाईक व आबाजी जथे रानोजी नगरकर तीन महिने गैरहजीर आहेत व लक्ष्मण जथे राणोजी नगरकर त्याच्या पायांस दुख जाले आहे. त्याच्याने चाकरीस पोहचवत नाही. हजूर आहे. या तिघाचे यैवजी जासूद पाठवनार माहाराज समर्थ आहेत. विशेष काये लिहिणे हे विज्ञाप्त.

¶*News about the restoration of amicable relations between the Nizam and Hanmantrao Nimbalker is communicated to the Peshwa.*

No. 300] [*7-4-1760*

छ २० साबान सितैन चैत्र

श्रीगणराज

शेवेसी गोपाल गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १९ शाबान रात्र द्वितीयें प्रहर चंद्रोदयें स्वामीचे कृपेकरून सुखरूप असों विशेष. स्वामीनी सांडणीस्वारांसमागमे पत्रें पाठविली ती पावली. पेशजी याद स्वामीनी करार करून पाठविली होती तेच याद जासुदांबा पाठविली आहे. त्या यादींत जागीर येकसष्ट हजारांची आहे व रुपये पांसष्ट हजार त्यास आम्ही तोडमाड करून येकतीस हजार रुपयांची जागीर ठराविली. बाकी जागिरीचे यैवजी रुो जाजती कबूल केले. रुो जाजती आजी पडले तरी येकसाला पडतील, जागीर दरसाल होईल, यास्तव सरकार किफाईत जाणून दीक्षितबावानी व नारो बाबाजी याणी मी याप्रमाणे ठराविली ते पेशजी लिहिलेच आहे. आतां आम्ही कमी

---

१ मग्रूर, पुंड. २ बिघडला आहे.
३ बारीक चौकशी. ४ स्नेही.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करूं म्हटल्यास होत नाही. सेवकास येणे म्हणून आज्ञा केली, त्यास या पत्राचे उत्तर येतांच सेवक स्वार होऊन येईल. आमचे सर्वांचे मते मातबर स्थलावर नजर देऊन सेवेसीं परवा यादी पाठविली आहे त्याप्रमाणे करार करून पाठवावी म्हणजे स्थल हस्तगत होईल. मर्जीस न ये तरी उपाये नाही. मी सेवेसी आल्याउपरी तीन हजार पाईचे माणूस व हजार रावताच्यांने मोर्चे होत नाहीं. कालकला सेवकावरी शब्द येईल जे, याणी समजाऊन लिहिले नाही. यास्तव वारंवार विनंती लिहितो. मोर्चे ठेवणे तरी बंदोबस्तीने ठेवावे. थोडे माणसा दम निघणार नाही. सर्वांचा विचार मनास आणिला. आमचेहि विचार याचप्रमाणे की थोडे सामानानिसी हे स्थळ राखवत नाही. मोर्चे खंदकावर आहेत. आतां मागे आणिल्याने आव राहात नाही. यात जसी आज्ञा तसी वर्तणूक घडेल. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Gopal Ganesh Patwardhan, in this letter, discusses the terms which should advantageously be offered for winning over the fort of Daulatabad.*

No. 301] *[8-4-1760*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक नारो बाबाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ सावान पावेतों स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा कीं, 'राजश्री विठल विश्राम व आटोले व राऊत याचीं पथकें तुम्हाकडे पेशजी पाठविलीं होतीं. त्यास सांप्रत रावताचें काम न हीं. तरी सदरहू पथकें हुजूर पाठवणें' म्हणोन आज्ञा. त्यास चिरंजीव राजश्री सिवाजीपंत व राजश्री विठल विश्राम याचें पथक महिनाभर राजश्री गोपालरायापासीं किले दौलताबादेस आहेत. हाला करून शहर घेतलें. ते शहरांत मोर्च्यामधी आहेत. छ २० शावानीं वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित याचे मारफातीनें किलेदार व हजारी राजश्री गोपालरायास येऊन भेटले. आज छ मजकुरीं राजश्री उधो वीरेश्वर व शंभर माणूस सरकारचे माहकोटच्या दरवाज्यांत गेले. उदईक किलेदार बाहेर जाणार. किलेदार बाहेर गेलियावरी सरकारचे लोक किल्यांत जातील आणि विठल विश्राम याच्या पथकास हुजूर

---

१ एकादे वेळेस, संकटकाळीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
पाठवितों. आटोले व राऊल हीं दोन्ही पथकें आंतुरास आहेत. तेथील किलेदार भील ठेऊन आंतूर परगणियांत उपद्रव करितो याकरितां दोन्ही पथकें चौकीस ठेविलीं आहेत. त्यास किलेदारानें किल्यास जागीर आहे त्याचा आमल सालाबादप्रमाणें करावा, भिलाचा संग्रह न करावा, यैसा करार जाहल्यावरी आटोले व राऊल हुजूर सेवेसीं पाठवितों. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Babaji Nagarkar (Abhyankar) reports the capture of Doulatabad by Gopalrao Patwardhan.*

No. 302] [*12-5-1760*

पौ छ २५ रमजान

श्री

विज्ञापना ताा छ २५ रमजानपावितो मुकाम नजीक किले दौलताबाद आदकोस येथे बुनगेसुधां येऊन राहिलों. प्रातःकाळीं सांडणीस्वारासमागमें आज्ञापत्र आलें, त्यांत आज्ञा कीं, दौलताबादेच्या दक्षणेस आंबराई पाणी आहे तेथे येऊन राहणे, त्याप्रो आलों. मजलीस येतांच स्वामीकडून जासूदजोडी पत्र घेऊन आली, त्यांत लिहिलें कीं, किल्याचे दक्षणेस पांच कोस खराडी आहे त्या मुा तुम्ही आलेत न आलेत हे लिहून पाठवणें. त्यास सांडणीस्वाराबरोबर प्रातःकाळीं पत्र आलें त्याप्रो येऊन राहिलों. राजश्री विसाजीपंत गंगातीरास आले म्हणोन जनार्दनराम याजकडील रामाजीपंत यांणी गंगेच्या मुकामीहून जनार्दन राम यास लिहिले आणि तुम्ही हे वर्तमान कांहीच लिहिले नाहीं. त्यास विसाजीपंत कोठे आले आहेत, समागमे फौज किती आहे तें तुम्हास कळले असेल तैसे लिहून पाठवणे म्हणोन लिहिले. त्यास नेऊरगावावर गंगातीरी एक मुकाम बुनग्याचा होता, तेथें विसाजीपंताची कांहीच बातमी आइकिल्यांत आली नाहीं, मग कशावरून ल्याहावें? जनार्दनपंताकडील रामाजीपंतास बलाऊन आणून रुबरू पुसिलें, त्यावरून त्याणी सांगितलें कीं, बाजारी वर्तमान आइकिले ते उगेच जनार्दनपंतास मात्र लिहिले होते. केवळ दरबारांत जाईल ऐसे कळते तरी लिहितो कशास? याप्रमाणे सांगितले. स्वामीस विदित जालें पाहिजे. अलीबेग सांडणीस्वार दिमत पागा हुजूर याजबरोबर पत्र देऊन विसाजीपंताकडे स्वामीनी पाठविला तो येथे येऊन सांडणीचे खर्चास येथून तीन रुपये घेऊन वामोरीचे सुमारे गेला आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer communicates his arrival at Doulatabad and mentions reasons why he did not report the movements of Visajipant.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 303] *[24-6-1760*

छ २१ जिलकाद

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीचे कृपेकरून छ १० जिलकाद मुा किले सोलापूर येथें सुखरूप असो विशेष. आम्हाकडील सविस्तर वर्तमान राा रामचंद्र गणेश यानीं सेवेसी निवेदन केलें असेल. धारासिवाकडे एक मास लागला. खर्चास नाहीं त्यामुळें सरकारचा अमानत यैवज अकलकोटी होता तो जरून जाणोन रुो पनांस हजार खर्चास त्यातून घेतले. काही रा रामचंद्रपंतास दिले. कांही आम्हाकडे खर्च जाले. सविस्तर वर्तमान सेवेसी आल्यावर निवेदन करूं. बाकी ऐवज बारामतीस चिरंजीव राजश्री रामचंद्र गोविंद याजकडे पाठविला, त्याणी प्रविष्ट केला असेल. सरकारचा ऐवज परवानगीशिवाय खर्च न करावा, परंतु बिरजलाल याची मोहीम. जवळ पैसा नाहीं, कर्जहि न मिळे; नाइलाज, जरून जाणोन ऐवज घेतला क्षमा करणार स्वामी धनी आहेत. रा रामचंद्रपंत याणी ऐवजाची सनद पाठवून देतो म्हणोन कबूल केले परंतु अद्याप सनद आली नाहीं. हल्लीं कारकून ऐवज न्यावयाकरिता आले त्याणी निकड फार केली, ते कोठवर लिहावी? त्यास आज्ञापत्र सादर होऊन सेवेसी आणविला पाहिजे. संनिध आल्यावर जे आज्ञा करणें ते करावी. सेवक आज्ञेप्रमाणें वर्तणूक करील. श्रीमंत रा नानासाहेबास लिहिलें आहे त्यावरून सेवेसी निवेदन होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer reports to Raghunathrao that he has been forced to appropriate the treasure at Akalkot for his own expenses.*

No. 304] *[24-6-1760*

छ २१ जिलकाद

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ता छ १० जिलकाद मुा किले सोलापूर येथे आपले कृपेकरून सुखरूप असो विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री दादासाहेब यांही विजापूरचे मुकामीहून आमची सरंजामी करून देऊन सुरापूर वगैरे प्रांतांत रवाना केले. प्रांतांत चार दिवस राहून रुो मेळऊन खर्च बाहेर पाडावा तो दिवस थोडके, दोन महिने मृगास राहिले, गैरहंगाम, आज्ञा घेऊन मजल दरमजल भीमातीरास आलों. तो सरकार जहागिरीत बृजनाथ याणे बहुत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
उपद्रव करून घासदाणा घेऊन गांव मारूं लागला हें वर्तमान कळल्यावर पारपत्य करावें हे जाणोन सटे होऊन पाठलग केला. त्याणे रात्रीचा दिवस करून धारासिवांत[1] जाऊन राहिला. भोवताले आम्ही फौज घेऊन राहिलो. मागाहून श्रीमंतास वर्तमान कळल्यावर राजश्री रामचंद्र गणेश पाच हजार फौजेनसीं रवाना केले ते सामील जाल्यावर पारपत्य स्वामीचे पुण्यप्रतापे यथास्थित जाहले. मारनिले निरोप घेऊन पुणियास गेले. आम्ही सुरापुरप्रांते आलो. इतकियांत नवाब सलाबतजंग यादगीर कोल्हूर याप्रांती आले. सरकार जाहागिरीस उपसर्ग लागेल यास्तव दहा कोसाचे तफावतीने शह राखोन भीमातिरीं होतों. सुरापुरचा घांसदाणा थोडाबहुत घेतला. नवाब कलबुरग्यास गेले. उभयतांच्या भेटी होऊन कूच करून सेडंबेवर गेले. आम्ही भीमा उतरोन पेरोदाबादेवर आलों. नवाबाचे मुकाम तेथेच होते. राा नागो राम यांचे परगणियांचा बंदोबस्त करून द्यावा. ऐसियास नवाबाची पत्रे व वकिलाची पत्रें आम्हांस आली कीं, जहागिरीस उपसर्ग न देणे. आमचा व श्रीमंताचा स्नेह आहे, विरुद्ध न करावें, व राजश्री रामचंद्र जाधवराव याचे मुलुकास उपद्रव लागतो, ते सरकारकामांत बहुत तत्पर, त्याचे परगणियास उपसर्ग न लागू द्यावा म्हणोन धोंडो राम याणीं लिहिले. त्यावरून आठ दिवस मुकाम करून राहिलों. मोगल कूच करून भागानगराकडे गेल्यावर आम्ही कलबुर्गे परगणियांतून आलंद परगणियात येऊन फौजेस निरोप देऊन सोलापुरास आलो. गार्दी व तोफखानियाची रवानगी पुणियास येथून करितों. रवानगीस ऐवज नाहीं. यामुळें कर्जवाम करून समजावीस काहडून लोकास निरोप दिल्हा. येथून दोती रोजा कूच करून बारामतीस येऊन सेवेसी लिहून पाठवितो. आज्ञेप्रमाणे वर्तणूक होईल. गैरहंगामी निरोप दिल्हा व बृजनाथ याचे शहास महिना सवा महिना लागला. राजश्री रामचंद्र गणेश याणीं फौजेस निरोप दिल्हा आम्हीहि द्यावा, त्यास निजामनअली उदगिरीजवळ, देशी फौज कोणी नाहीं, यास्तव शह राखोन होतो. ते भागानगरास गेले, आम्ही सुरापुराकडे गेलों. मागती ते कलबुर्ग्यास आले, आम्ही सरकारचे जहागिरीस उपद्रव हलाली हरामी करील हे जाणोन जवळ येऊन राहिलों. स्वामीचे पुण्यप्रतापें फारसा उपद्रव लागला नाहीं. मोगल भागानगराकडे गेल्यावर आम्ही फौजेस निरोप दिल्हा. श्रीमंत दादासाहेबी रवाना केले ते समयी एक रुपया खर्चास दिला नाहीं. दरमाहे लाखा रुपयाचा खर्च. समागमें स्वारी सिकारी करून रुो मेलवावे तो दिवस नाहींत. बृजनाथाचा शह पडला त्याउपर उभयेता मागल कलबुर्गेप्रांती आले. जहागिरीची रखवाली करितांच संकट पडलें.

---

१ मोगलाईत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्वामीचे पुण्येंकरून मुलकाची रखवाली करून मोगलाचा शह राखून मात्र राहिलों, यामुळें कर्ज जाहलें. सेवेसी आल्याउपर सविस्तर वर्तमान निवेदन केले जाईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer reports to the Peshwa the movements of the Nizam's troops and his own measures to oppose the enemy.*

No. 305] [*24-6-1760*

छ २१ जिलकाद

श्री

सेवेसी विज्ञापना. बृजनाथ सरकारचे जहागिरीत येऊन बहुत उपद्रव करून घासदाणे घेऊन गांव मारूं लागला. आम्हास वर्तमान सुरापुर प्रांते भिमातीरास आल्यावर कळलें. तेव्हां सुरापुरचें कार्य ठेऊन पाठलाग केला. त्यास धारासिवांत कोंडिला. अकलकोटास सरकारचा ऐवज होता तो ठेवावयास मातबर ठाणे नाहीं, धामधूम फार जाणोन किले सोलापुरी ऐवज पाठविला. त्यास धारासिवी मोहीमसीर, जवल एक पैसा नाहीं. व सावकारहि मातबर नाहीं, जरूर जाणोन, पंन्नास हजार रुो घेतले. त्यापैकीं कांहीं रामचंद्रपंत यांस दिले. कांही आम्हाकडे खर्च जाला. हे वर्तमान रामचंद्रपंती निवेदन केलेच असेल. बृजनाथ यांणीं सरकार जहागिरींत रुो घेतले ते माघारे द्यावे ऐसा करार जाला. त्याजपासीं ऐवज नाहीं. हें जाणोन पंन्नास हजार रुपयांचे ऐवजी तीन वोली[1] किले सोलापुरी ठेविल्या आहेत. वोली उत्तम आहेत. ऐवजहि येईल. परंतु स्वामीकडे बसालतजंग याणी वकील सेवेशी पाठविला आहे. अर्ज करून वोली सोडवाव्या म्हणून वर्तमान आइकिले तर सरकार जहागिरींत पैसा घेतला तो परतून द्यावा ऐसा करार. हली स्वामीपासीं रदबदली करतील. विनंती कबूल न करावी. बृजनाथ यामुळे खर्च आम्हास फार जाहला. सरकारचा ऐवज सुबादला खर्चास घेतला. परस्परे कर्जाचा ऐवज वोली आहेत याजकरितां सेवेसी विनंती लिहिली आहे. सेवकानें रुपये मेळवायासी बहुत प्रयत्न केला, परंतु दिवस नव्हते, मोगलाचे शह, त्यामुळें कर्ज जाहलें. सर्व क्षमा करणार स्वामी धणी आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer reports the trouble caused by Brajnath and his having appropriated the treasure of Rs. 50,000 from Akalkot.*

---

(1) Hostages.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 306] [*9-7-1760*

पौ छ ६ जिल्हेज

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री रामचंद्र गणेश गो।

सेवक बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुा इहिदे सितैन मया व अलफ. तुम्हीं विनंतीपत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. खंडागलियानी पडतूरचे ठाणे सोडून पळून गेले, म्हणोन लिहिले ते कळले. ऐशास तुमचे फौजे देखील काम काये ? कमाविसदारानी ठाण्याची मजबुदी केलीच असेल. तुम्हीं पत्र पावताच फौजेनसी हुजूर येणे. रा त्रिंबक खंडेराव तुम्हांजवल आले असिले तर त्यासहि बा घेऊन येणे. जाणिजे छ २९ जिलकाद. * तेथील ठाण्याची बंदोबस्ती करून तुम्ही येणे.

लेखन सीमा.

¶*The Peshwa asks Ramchandra Ganesh to return at once from Padadur with his forces and with Trimbak Khanderao as his armies have nothing to do, Khandagale having fled from that place.*

No. 307] [*12-9-1760*

छ ३ सफर सनवार

श्री

दंडवत विनंती. येथील क्षेम छ २ सफर भृगुवार मुक्काम औरंगाबाद येथें यथास्थित असे विशेष. स्वामीचे पत्र सोमवारचे आले ते कालीं प्रविष्ट जाले. नवाबानीच विचार करून शहराकडे गेले. बहुमानार्थ तुम्हावर फुले टाकली. त्यास उत्तम दिसेल ते विचार करतील. आपणहि यैसे एश कशास घ्यावे म्हणून लिहिले. यैशियासी ये समई तो एवढेच येश दिसोन येते. मध्यस्त त्याकडील उभयेतां मातबर मनुष्य आले ते आपणाजवळून बोलून आले. त्याचे वस्तू कांहीं जाबसाल होत नाहीं. खावंदहि त्यास पुसत नाहीं. आम्हासी मात्र बोलले कीं, याउपरी आपण कूच करून खानदेशांत जावें आमची कामेकाजे तटली आहेत. फौजा जमा करून ठेविल्या त्यास विना आपल्या कूच जाहल्याखेरीज निरोप देतां येत नाहीं. आपल्या फौजा जमा होत आहेत. हे स्वस्थलास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आले. आपला कूच न जाहाल्यासी यास धीर पुरत नाहीं. याकरितां आम्हासहि निरोप (न) देत. निरोपावेगले येतां न ये. आपणास दोन चार पत्रे पाठविली आहेत त्याचे उतर येत नाहीं. स्वामीचा विचार मनातील काये आहे ? आम्हास याउपरी काये ते आज्ञा केली पाहिजे. तदनरूप वर्तणूक करून. कामाकाजाची पैरवी होऊन येत नाहीं, येविसीचा आर्थ राजश्री बगाजीपंती लेहून पाठविला आहे त्यावरून विदित जाहाला असेल. मध्यस्ताची पत्रे आपणाकडे गेली त्याचे उतर आले नाहीं. त्यास लेहून पाठवावे. आम्हास निरोप होयेसे करावे. खावंदाजवल येऊन विदित होये हे विनंती.

¶ *News-letter from Aurangabad announcing the intentions of Nawab Salabatjang.*

No. 308] [*12-9-1760*

पौ छ १० सफर

श्रीगणराज

श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामीजीचे सेवेसी

आज्ञांकित येशवंतराव गोपाळ व बाबूराव बापूजी कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल भाद्रपद शुद्ध ३ तृतीया जाणून मुकाम नलेगांव स्वामीचे कृपेंकडोन क्षेम असें विशेष. इकडील वर्तमान सजावर दौवला उदगीरकर याचा आमचा विचार जो आहे तो स्वामीचें ध्यानांत आहे. सजावर दौला उदगिरीस आले आहेत. सरंजाम गोळा होत चालला. बेदराहून फलटण येक आल. आम्हास बातनी आली ; सबब आम्ही गांव उजाड करून दिल्हा. पेशजीं शिवबंदी आहेच. आणखी नवा सरंजाम प्यादें वगैरं दोनशें सरंजाम ठेवला. या वेळेस कसरकम (आहे) पांचशें सरंजाम आम्हांपाशीं आहे. आम्ही सावधपणेंच आहोंत. परंतु थोरला शह बेदरीं आहे. याजमुळें रात्रन-दिवस दुचंका(?) खाऊन आहों. त्यास पेरणीचे कुणबियांनीं पेरणीचा हंगाम चालला, आम्ही लेकरेंबाळें बैलढोर, आणावीं किंवा न आणावीं म्हणून उपद्रव मांडला आहे. येविषयीं तीर्थरूप गोपाळराव आपांस दोन पत्रें पाठविलीं, ते येत नाहींत, अगर शाफ उजाड करणें, अथवा बैलढोरें आणऊन पेरणी हुशारीनें करणें म्हणून लिहीत नाहींत. मारावें किंवा मराव अयैसें[1] लिहितात. उत्तरा हस्त यांत पेरणी रबीची जाहाली तर जाहाली. नाहीं तर पेरणी राहिली, म्हणजे कसरकम ज्याद दाहा हजार रुपये येणें तो पेंच ; शिवाय शेतबाडी

---

१ ऐसें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
आमचें घरचा तो पेंच कुणबियास, तों वरषाचं आणजात (आणतात?). हाकीम साहुसावकार फेडावा ते राहात त्याजवर पेंच, पुन्हा गांव जमन कठिण, अयैसें वर्तमान जाहालें आहे. बातनीचें वर्तमान तर सजावर दौवला यास धोशांचे लेकाचे तैनात केले आहे. सरंजाम गोळा करोन नडसी, नादापूर, माहोर आवढ्या प्रांतीं जाणार अयैशी वदंता बोलतात. येक फलटन आलें होते ते उदगिरीहून पुढें गेलें मागोन दोन फलटनें येणार ते आले म्हणजे सजावर दौवलाची फौजसुद्धां तिकडे जाणार अयैसें बर्तमान असें. प्रांतांत नवाबाची फौज जागीजागीं पागां जागीं जागीं शाहा थोरला बेदरीं पंचेवीस कोसांवर अयैसें आहे. दुसरें घरकृत्य वर्तमान तीा आपा करनाटकचें स्वारीस येथोन निघाले. वीस हजार रुपये कर्ज लोकांचं जाहलं, व्याजं चढत चाललीं आहेत. करनाटकचे स्वारींत, त्याजवर गुजरली. अर्थी प्राणकडोन बुडालें. मुल सरकार चाकरीवर गेले. त्यास जातीस स्वामींनीं प्राण वांचवून आणिलें हें आम्ही काय लिहाव? कुल मुळकास माहीत जाहलें आहे. मुलुकगिरींत जखमी वगैरें वांचोन आले आहेत. ते येथें धरणी देऊन बसले आहेत; त्याचे लेकराबाळासुद्धां थोड्या बहुतानें चालवावं लागतं. हा पेंच करनाटकाहून पुण्यास आले. आपला बखेडा जाहला आहे. स्वामींची कृपा आपल्यावर आहे; अर्थी प्राणकडोन बुडालें आहे. कांहीं सरंजाम माघा व मूल निवर्तील त्यास इनाम गांव, मोकासे मागावे ते आपलीं काम येकीकडे ठेऊन, राजश्री बळवंतराव गोविंद आमचे मुलकाचे गृहस्थ, मातबर माणूस लक्ष्यापती त्याचा शेरा; खत करून मामलत केली. सावकार आपण उभा करून दिल्हा. मनमाने तोटा, कोण्ही हिसोब समजाइला नाहीं; अगर मामलतीची वहिवाटहि आपणांकडे नाहीं. आंबाड वगैरे स्वराज्यांतील मामलत, आम्हांस कोण्हास तेथ जाऊन बसावयास येईल म्हटलीया तेहि कोण्ही देत नाहींत. सावकारांचीं धरणीं नित्यशः होया लागलीं आहेत, तें वर्तमान येथें येतें. येथील मंडळी आक्रोशेंकरून हयरान तो विस्तार पत्रीं कोठवर विनंती ल्याही? वरंवाल, लातुर, नडसी, सरकार नांदेडच्या बाबती शेरंपतदारांनीं याजकडे मक्ता करून दिल्हा. कसरकम तिसा हजारांची मामलत दोन हजार आख चडऊन मामलत यांचे स्वाधीन बत्तीस हजारास दिधली. त्यास सालगुदस्तं सेरसाल जाहालें आहे. परंतु अधेला वसूल नाहीं. सालमजकुरास आतांच कोण मोजितो? त्याजवर ते आपणच येथं असते तरी दाबादुबाने घडणें तें घडतें. सालमजकूर सालगुदस्त मिळून चौष्ट हजार आणि महालमजकूर सोळा हजार येकूण ऐशी हजार रुपये येणें त्यास जागां नाहीं. बेदरीं दोनतीन कारकून व माणसें वरचेवर जातात. जेव्हां ताकिदां देतील तेव्हां वसूल सुरवात मार्गश्वर पुषें मासापासोन जे होणें तें होईल हा पेंच. पागा इकडे चारणीस पाठविल्या

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्यास वरचेवर पत्र पाठवितात जें, पागांची सरबराई चांगली व्हावी, जर अंतर पडेल तर कामाचें नाहीं. आज साहा महिने पागा येथ आली आहे, कळेल तशी सरबराई स्वामीचे कृपेनें जाहाली. परंतु खर्चास पुण्याहून दाहा हजार कर्ज काहाडोन पोतें चाल पाठविलें. तेथेंच बट्टा हुंडणावळ देऊन बाकी नऊशें व नऊ हजार आम्हांस पावलें त्याच्या अलीकडे सोनं पांच हजारांचें कर्ज काहाडोन पाठविलें. चवदा हजार मात्र आम्हांकडे आले. पागचे खर्चाचा मजकूर पाहातां भाद्रपद अखेरपावतों कसरजाद पावणलांख, परंतु कमी पडणार नाहींत, आयेसा विचार जाहला आहे. पुण्यांत त्याचे प्राणास सुख नाहीं. येथें आम्हास सुख नाहीं, ऐसा प्रकार जाहला आहे. हें वर्तमान आम्ही स्वामीस न ल्याहावें आम्हास गरजच नाहीं. आम्ही त्याचे प्राणांवर भाकरी खाऊन दोन चिरकुट[१] फाडोन पडलों आहों; अद्यापि बाहेर गेलों नाहीं. करनाटकास मात्र तिघेजण समागमें गेलों होतों. दोघे जखमा खाऊन आले, येकजण ठार जाहाला. हें वर्तमान स्वामीस साक्षे आहे. लिहिण्यास कारण त्यास सुख तेथें नाही. आम्हांस येथें कर्जदार, व शिवबंदी व जखमी लोक व घरचा खर्च कोण्ही देइनात. तापत्राखाले हायराण. पागेचे खर्चास नाहीं. वितला सोसून असतां हे गांवाकडे येईनात. याजमुलें घरीं लेकरेंबालें हायराण. नवाब साहेबाचा शहाजवळ बरें जाहलें तर उत्तम, वोंगळ जाहलें तर हे नाकारे अपेशी, म्हणोन परिछिन्न आम्हांस मानतील. याअर्थी येकंदर मजकूर सेवेंत लिहिलें आहे. कृपाळु होऊन येकंदर ध्यानास आणून त्यास वांटें लाऊन द्यावा अगर आम्हांस काय आज्ञा करावयाची तें करावी. दुसरें पागेचे खर्चाचा परामृषे त्यांस सांगून जलदी पोहचें यैसें करावें. साल गुदस्त बाबत कडबा लाख सवालाख सुमार टाकळींत तैसाच राहिला आहे; आणि धान्ये जिलकाद जिल्हेजचें धारणेचें आहे. सेवेसी कळावें. सारांश तिाजीस स्वामीनीं रवाना करून दिधल्यानें उत्तम आहे. संस्थान माहाराजाचं आहे. नलेगावचा बंदोबस्त नांदेड वगैरे सरंजामाबो ऐवज उगवणें, सर्व स्वामीकडे असें. आम्ही आतां घरी किती दिवस रिकामे बसावे? यइस हे आज्ञा करावी. थंड कुंची पावरणें, चिरकुट नवें जुनें आहे तें तुम्ही जुन जांत भाडपात्रही आहेत (?) हें कोणास देणे असेल त्यास द्यावें; अगर सरकारांत तरी न्यावें. आमचा पैका मालमालियेत उगऊन देवणार स्वामी आहेत. सेवेसी कळावें. विशेष काय लिहिणें लोभ कीजे हें विज्ञप्ति.

¶*Yeshwantrao Gopal to the Peshwa reporting the affairs of the Nizam and Karnatak and the difficulties of his own situaiion. The letter shews how gradually the Peshwa and the Nizam came to open blows in spite of the treaty of Udgir.*

---

१ वस्त्र.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 309] [*November 1757*

श्री

श्रीमंत महाराज राजश्री दादासाहेब
स्वामीचे चरणसेवेसी

सेवक सिवराम आनंदराव चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती ऐसीजे. काली मंगलवारीं कूचे करून निघाल्यावरी मुकामाचे स्थलीं आपणाकडील फौजा घेऊन आसपास उभ्या होत्या. त्यांत पछयाडीवर आपणांकडील फौजानी खूब लडाई केली, ते समई पछयाडीचे लोकांनीं आव टाकून माघारी तोडें केलीं तेसमई कुमक संकराईने केली. इकडून राजश्री जाधवराव यानी कुमक * * * व याजकडील राजश्री गंगाजी * * * येक दखणी भला माणूस याचे कपालास गोली चाटीत गेली आणि दोघ जेजाल बारदार गोली लागून जेर आहेत. दोनी तिनी घोडीं पडलीं. दोन तीन जखमी आहेत. पागाचे बारगीर २ जखमी दोन घोडीं जखमी, व गंगाजी बंडकराचा बसता घोडा जखमी, येणे प्रमाणे जाधवरावाकडे जखमी जाहाले; आणि आघाडीकडील वर्तमान, आघाडीकडे राजश्री दाजी निंबाळकर, व खंडागल्या यानी सांभालिलें. निंबालकराकडे येक भला माणूस जखमी, त्याचे हातांचीं बोट तुटली; आणि संताजी मांडकर ठार जाहला. वरकड जागाजागा कितीयेक लोक जखमी आहेत, म्हणोन वर्तमान आइकिले. लडाई जाहलियाउपरी नवाब निजामआलीखां याजकडे जाधवराव जाऊन अर्ज केला कीं मुरादखां व संकरेमा व रायेणा वगैरे आपले कामाचे नाहींत. त्यास आपणापासी ठेऊन घेणे. तुमचे मनीं तमाशा पाहणे आहे तरी आपले हेमरा[1] निंबालकर करून देणे. पुढें तुम्ही अग्नींत उडी टाकणें म्हणून हुकूम केलिया अग्नींत उडी टाकूं हणोन बोलिले. त्यास नवाबानी उत्तर दिल्हें कीं प्रातःकालीं तुम्हांस त्यास बोलाऊं पाठऊं. रुबरू जें सांगावयाचें तें सांगू, म्हणोन समाधान करूं * * * अघाडीस येऊन * * * गेले नाहींत. राजश्री श्रीनिवास * * साहेबाकडे येणार आहेत. जाहलें वर्तमान सेवेसीं लिहिले असे. पुढें जें वर्तमान होईल तें तेवेसी निवेदन करूं. राजश्री दत्ताजी सिंदे याचे स्वस्थानावरी राजश्री नारोशंकर ठेविले आहेत. राजश्री सिंदियासारखी करणी कांहीं दिसोन येत नाहीं ऐसें येथील लोक बोलतात. सेवेसीं कळावें हे विनंती.

¶*Letter reporting to Dadasaheb the action of Sindkhed in which the Nizam's army had to retreat. The defeat was due to the squabbles between the commanders of the Muhammadan army.*

---

१ बरोबर, स्वाधीन.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 310] [*1760?*

सेवेसी पुंडलीक नाईक रास्ते विज्ञापना. सिवनेरचे राजकारण तिगस्तापासून आम्हाकडे होते, त्यास मोंगलाचा धाकटा भाऊ ननूमिया संमतास मिळोन पाचहजार रुो घेऊन त्याणेंच राजकारणाचा मार खाली उतरून केला. सेवटीं कार्य जाले नाहीं. पाच हजार रुो तसेच त्याचे निसबतीस राहिले. त्याचे बाजिनस खंत आहे. साल मजकुरी उपद्वाप करून सावकाराचा रुपया खर्च जाला व खावदकार्यहि होऊन आलें. अलीकडील वृत निवेदन करणे आहे ते समक्ष विनंती करणे ते करूं; परंतु मागील त्या मोगलाकडे पाच हजार रुो येणे ऐशास प्रस्तुत कांही ऐवज सरकारातून मोगलास दिल्हा आहे. त्याची परवानगी होऊन ऐवज त्याचे पदरी पडणार यास्तव विनंती लिहा आहे. तरी पाच हजार रुो उगऊन घेणार स्वामी समर्थ आहेत. जर या समई गोष्ट राहिली तरी पुढें स्वामीच करणार धनी आहेत हे विज्ञाप्ति.

¶*Pundalik Naik Raste to the Peshwa regarding the negotiations for the surrender of Shivner. More light is needed to make this episode clear.*

No. 311] [*1760?*

श्री

पुरवणी श्रीमंताचे सेवेसीं

विज्ञापना. छ ८ रोजीं दसऱ्याचे दिवसीं प्रातःकालींच नवाबानीं स्वारी तयार करून स्वार होऊन खपऱ्याच्या पाहाडास दरगाहास जियारत[1] करावयासी गेले. खपऱ्याचा पाहाड भागानगरापासोन साहा कोस आहे. नवाब प्रातःकालींच गेले. आणि संध्याकाळी फिरोन आले. समागमें मीरमुसाखां व गुलामसैदखां वगैरे गेले होते. नवाब शहराबाहीर निघाले, ते समई स्वारी समागमे हाती होता त्यानें नवाबाचेच खाशा पालखीचा येक भोई जिवें मारिला.

राजबंदरी, सिकाकोल, मुस्तफानगर, मूर्तजानगर वगैरे सरकारची मामलत हसन आलीखानासच सांगितली. येथें नसीबयारखां त्याजकडून जाबसाल करीत आहेत. फर्दा मतलबाच्या दसकत जाल्या. मागून तपसील सेवेसी लिहिण्यांत येईल. बाथेजापंत तसाच येथें बसला आहे. हे विज्ञापना.

¶*News-letter to the Peshwa from Hyderabad reporting the visit of the Nawab to a Durga on the Khaprya Hill, 6 miles from Hyderabad.*

---

१ दर्शन.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 312] [*1761 ?*

श्री

शेवेसी सेवक बाबूराव सामराज कृतोनक साष्टांग नमस्कार विनंती. त्रिंबक गिरधरासमागमें पत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं येजमान अविलंबें घेऊन येणे व तुबाजीपंताहि पाठविलें व मागून जासुदासमागमें येजमानास स्वहस्ताक्षर पाठविलें. यैसी तिनीहि पत्रें येकदाच पावलीं. यैसियास सेवकानें मध्यस्ती पुणियापासून केली, त्यामध्यें तिलप्राये आंतर नाहीं. उगीच पत्रें संदेहात्मक येतात. येथें तों किमपि दुसरा विचार नाहीं. फौजेच्या वळणाकरितां कलबर्गियाजवली मात्र गेलों होतों. तेथून नीट आपले फौजेचा सुमार धरून कोठे न गुंतता हसनाबादेच्या परगणियास आलों. उदईक कूच दरकूच पुढें येतों. आपण कोणे विशईं मनांत संदेह मानावा यैसें नाहीं. जे आज्ञा आपण पहिलेपासून केली आहे तेच प्रमाणांत आणिली आहे. काडीमात्र जुमस[1] नाहीं, यैसे असतां वारंवार प्रतिपत्रीं छाडून साहेब काशास लिहितात ? या साहेबाखेरिज दुसरा अवलंब नाहीं हा पुर्ता भरवसा मानावा. सेवक * पासून साहेबाच्या अनाचा (गूण ?) एकादा दिवशीं पायहि द्रष्टीस पडे तो सुदीन आहे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञाप्ति. सौभाग्यादिसंपन्न मातुश्रीसहि आपलीं पत्रें वाचून दाखविलीं. त्याणीही पत्र स्वामीस लिहिलें आहे. बाकीतील अर्थ राजश्री संकराजी राम लिहितां श्रृत होईल हे विज्ञापना.

¶*Baburao Shamraj reports his arrival at Hasanabad, and his readiness to execute faithfully his master's instructions. Is this Baburao Shamraj Atre the sikenavis of Fatesing Bhonsle ?*

No. 313] [*1761 ?*

श्री

तीर्थस्वरूप राजश्री राजे जीवनराव[2] बडिलांचे सेवेसी

विनंती. श्रीमंत प्रतापवारिष्टाभिवान राजश्री पंतप्रधान स्वामीनी एकांती खिलबतात फर्माविलें, कीं जानोजी भोसले याणी पुणियात असतां करार केला

---

१ संशय. २ पेशव्यांचा वकील निजामाजवळ जीवनराव केशव.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कीं किला गावेलचा नवाबाचा द्यावा. वराडात अमल तह नासरजंगाचे वेळा जैसा होता त्याप्रो वर्तावें. गंगथडीस घासदाणा जाजती न द्यावा. सुरळीत सदरहु करारा प्रो वर्तावें. ते पों एकही गोष्ट अमलांत न आली, बदमामली करून वराडांत पैका घेतला. गंगथडीस घासदाणा घेतला, मुलुक पायेमली-खाली आला. उपरी नबाब खुबदौलत वानरासंगमपरयेंत गेले; परंतु फौज सरदार मराठे व फिरंगी कोणी नवते. तंबी पोहोचोन सदरहु प्रो अमलांत यावें ते न आलें. नवाब फिरले. जाधवरायाच्या मुलकाच्या बंदोबस्तास गुंतले. असो हे साल गेले; परंतु पुढे आतापासूनच महाराव जानोजी निंबाळकर व हणमंतराव निंबाळकर यासी सांगावें कीं दोघेजण एके विचारें वराडांत जाऊन, भोसल्यास तंबी करून, सदरहु कामें सरकारची करणें. उभयेता निंबाळकरास वसुली पंनास लाखाचा मुलुख आहे. व भोसले यासही पनास लाखाचा मुलूक आहे. हे म्हणतील कीं, त्याजपासीं फौज फार तरी सरकारच्या कामावरी एक वरीश आणिखी पांच हजार फौज ठेविली तरी काम होईल. पैका कोठे म्हणतील तरी एक वरीश उभयता निंबाळकर चाकरीसच आले नाहींत. कदाचित आले तरी जानोजीचा पुत्र सातआठसे, हणमंतराव दोन हजार मुलुक आहे त्या प्रो फौजा निरंतर पांच हजार याजपासीं असावी. पांज हजार फौज एकसालीं जाजती ठेवावी. खावंदाचे काम करून द्यावें, तरीच जन्मपरियंत मातबरीने मुलुक देऊन ठेविलियाचें फळ. नाहीतरी इतका मुलुक खावंदाने त्याजवर कैसा बोल ठेवावा की ती चाकरीस नच आले पैका वसूल जाला तो खजाना मागे पडला. त्यापेकी खर्च करून जाजती पांच हजार फौज ठेवावी, आणि खावंदाचे एक काम वराडचे करून द्यावें, त्यांतच उत्तम. उभयेतां निंबाळकर यांजपासीं दाहा हजार फौज प्रतिवर्षी असावी. एकसाल घरातील ऐवज खावंदाच्याच मुलकांत मेळविला, त्यापैकीं खर्च करून फौज ठेवावी, आणि काम करावें. तरीच खावंदानें मातबरीने बाळगिल्याचें फळ व निंबाळकराचे सेवक धर्मास उचित असे, सदरहु मजकूर एकांती नवाब समसामुदौला[1] बहादर यासी एक एक अक्षर वाचून दाखऊन सदरहू प्रों करऊन वराडात नवाबाचा अमल सुरळीत होय. गावेलचा किला घेऊन चाकरी मातबर निंबाळकर याची अजमायेक[2] होय ते करणे म्हणोन लिा ऐशास याचे उत्तर केले जे श्रीमंताच्या आमची श्नेह जे करणे ते आम्हास (अपूर्ण)

¶*Letter addressed to Jivanrao Keshao, Peshwa's Vakil with the Nizam, giving details of the latter's plans. The second sheet is lost.*

---

१ सलाबतजंग. २ अजमा = मोठेपणा, कीर्तिरूप.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रीमलारी

राजमान्य राजश्री त्रिंबक गिरधर स्वामी गोसावी यांसी

सेवक बाबूराव सामराज नमस्कार विनंती उपर. येथील कुशल तागायत रबिलाकर जाणून स्वकीये लेखन करणें विशेष. तुम्ही दोनी पत्रें पाठविलीं तीं पावलीं. बहुत अपूर्व वर्तमान तुम्ही लिहिलें. चाकरी बरदास्त गुन्हा लाजीम यैसें समर्थाचें आहे हें खरें जालें. नाहक लाटिकें कोणाचे सांगीवरून यैसी गोष्टी बजवावी हें उत्तम कीं काये? या कर्मासाठीं आम्ही आपला कबिला समागमें घेऊन आलों. भरलें घर सातारचें टाकिलें. येथील वर्तणूक जे आमची आहे ते राजश्री संकराजीपंत श्रीमंताकडील आहे त्यास विदित आहे. आम्ही परिहार कोठवरी ल्याहावा? बरें जे आसेल तें ईश्वरास ठावकें असेल; सुभेदार येथें असतां यैशा गोष्टी कैशा यैकतात? येवंच त्याच्या भोलेपणे ह्या गोष्टी होतात, आणि विनोदें भलतें बोलतात सेंच लौकिकांत होतें. त्यासहि ठावकें आहे; विस्तार काय लिहिणे? तुम्ही वर्तमान वरचेवर लिहित जाणे. आम्ही तुम्हांस सांगावें यैसें नाहीं. तुम्ही परकी आहां यैसें नाहीं. बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Baburao Samraj to Trimbak Girdhar: reports his innocence in a certain affair of which he was suspected.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh